Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Samaj Foundation Chennai

AYURVED MAHASA.

1951 G. K. U.

Domain. Gurukul Kangri Co

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

079432

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

COMPILED

Diamond Book Binding H
Moh Karachh B.H.E.L Road

Stock Verification-2024

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद प्रसारक मंडळी सातारा या संस्थेचे पुरस्कृत मासिक

आयुर्मीमांसा

95
COMPILED
079432
079432

★

या अंकांत-

कज्जली-कल्प : वैद्य पु. वि. धामणकर, आयुर्वेद-भूषण
चंद्रप्रभा-गुटी : वैद्य नृ. ना. वागेवाडीकर, आयुर्वेद-चिकित्सक
पालेभाज्या : वैद्य दत्तात्रेयशास्त्री जळूकर
संपादकीय : वादसंवाद : कॅन्सरपासून बचाव इ.

★

प्रमुख संपादक : वैद्यरत्न गो. आ. फडके, आयुर्वेदाचार्य.
कार्यकारी संपादक : ब. ल. वष्ट, आयुर्वेद विशारद.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आगाशे–रुग्णालयास सहाय्य करा

संस्थेच्या हितचिंतकांना विनंति

आयुर्वेद प्रसारक मंडळी, सातारा व आर्यांग्ल वैद्यक महाविद्यालय, रुग्णालय, प्रसूतिगृह इ. तदंगभूत संस्था यांची १९१८ सालापासून सर्वस्वानें सेवा करीत असलेले डॉ. मो. ना. आगाशे यांच्या षष्ठ्यब्दिपूर्ति–प्रसंगीं त्यांच्या सेवेचें प्रतीक म्हणून डॉ. मो. ना. आगाशे रुग्णालयाची स्थापना करावी असा संकल्प जाहीर करण्यांत आला होता. हें नवें रुग्णालय प्रशस्त व आधुनिक चिकित्सा–साधनांनीं सुसज्ज होणार असल्यानें संस्थेच्या सेवाकार्यांत त्यामुळें एक मोलाची भर पडणार आहे.

डॉ. आगाशे यांच्या सत्कारानिमित्त जो रोख पन्नास हजार रुपयांचा निधी हातीं आला तो या रुग्णालयाच्या उभारणीसाठीं आता पावेतों खर्च झालेला असून हें रुग्णालयाचें बांधकाम पुरे होण्यासाठीं अद्याप सुमारें एक लक्ष रुपयांची आवश्यकता आहे. रुग्णालयाचा तळमजला जवळजवळ पुरा होत आला आहे. पुढील कामाकरितां तात्काळ निधी–सहाय्याची आवश्यकता असून संस्थेच्या सर्व हितचिंतकांना मदतीची विनंति करण्यांत येत आहे.

महाराष्ट्रांतील आयुर्वेदप्रेमी जनता, सातारा जिल्हा व शहरांतले संस्थाप्रेमी नागरिक, संस्थेचे माजी विद्यार्थी व दानशूर धनिक यांनीं ही कळकळीची विनंति ध्यानीं घेऊन यथाशक्ति तांतडीनें व सढळ हातानें देणग्या देऊन संस्थेपुढील हा आर्थिक पेंच सोडविण्यास सहाय्य करावें असें विनवीत आहोंत. वेळ थोडा आणि गरज निकडीची हें जाणून आपल्या देणग्या खालील पत्त्यावर धाडण्याची कृपा करावी.

शं. ह. साठे
अध्यक्ष.

वि. ल. आगाशे
पां. के. कोल्हटकर
कार्यवाह, आ. प्र. मंडळी सातारा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद प्रसारक मंडळी सातारा या संस्थेचें मासिक

आ यु र्मी मां सा

संचालक : आयुर्वेदीय अर्कशाला लि. सातारा

र्ष १४ वें] मे १९५१ [अंक ५ वा

र्षिक वर्गणी ३ रुपये : किरकोळ अंक ८ आणे

कोणत्याहि महिन्यापासून वर्गणीदार होता येते.

आयुर्मीमांसेंतील लेखांतून व्यक्त होणारी मतें ही त्या त्या लेखकांची मानली जातील. संपादक त्यांशीं नेहमींच सहमत असतात असें नाहीं.

आयुर्मीमांसेंत प्रसिद्ध होणाऱ्या लिखाणाविषयींचें सर्व हक्क संस्थेच्या स्वाधीन आहेत.

वर्गणी ज्या अंकाअखेर संपत असेल त्या अंकानंतर त्या त्या वर्गणीदारांना पुढील वर्षाची वर्गणी पाठविण्याविषयीं सूचनापत्रें जातात. ज्यांची वर्गणी संपली आहे अशा ग्राहकांनीं हें पत्र मिळतांच म. ऑ. नें वर्गणी पाठवावी. म. ऑ. आली नाहीं अगर अंक नको असल्याबद्दलहि पत्र आलें नाहीं तर त्या वर्गणीदारांना पुढील अंक व्ही. पी. नें पाठविला जातो.

अंक मिळाला नसल्याची तक्रार त्या महिन्याच्या दहा तारखेच्या आत करावी. म्हणजे शक्य असल्यास दुसरा अंक पाठविला जातो.

सर्व पत्रव्यवहार 'व्यवस्थापक आयुर्मीमांसा, अर्कशाला बिल्डिंग, सातारा' या पत्त्यावरच करावा.

वैद्य, डॉक्टर व औषध विक्रेते यांच्या माहितीकरितां

आयुर्वेदीय औषधी-निर्मात्यांची सूची

(हें सदर प्रत्येक अंकांत नियमितपणें प्रसिद्ध होत राहील. भारतांतील विशेषतः मुम्बई राज्यांतील सर्व आयुर्वेदीय औषधी–निर्मात्यांचा या सदराद्वारे वैद्य, डॉक्टर व विक्रेते आणि ग्राहक यांना सातत्यानें परिचय होत राहील. एक प्रकारे "Buyer's Guide" हें या सूचीचें स्वरूप असल्यानें या सदराचें महत्त्व जाहिरातदारांना वेगळें सांगावयास नको.

ज्या जाहिरातदारांच्या जाहिराती इतरत्र या अंकांत वर्षाच्या करारानें घेण्यांत आलेल्या आहेत त्यांची माहिती या सूचींत *विनामूल्य* छापली जाते. केवळ सूचीसाठीं मजकूर पाठविणाऱ्या जाहिरातदारानीं वर्षाचे करारानें जाहिरात दिली पाहिजे. वर्षाचा दर फक्त तीस रुपये आहे. ही रक्कम आगाऊ द्यावी लागेल. मजकूर जास्तीत जास्त चार ओळी असावा.)

श्रीपाद फार्मसी, पेण.

विविध प्रकारच्या औषधी वनस्पतींचें विक्रेते. महाराष्ट्रांतील आयुर्वेदीय कारखान्यांना माल पुरविण्यांत यतो. वैद्य व ग्राहकांनीं माहिती मागवावी. वाकेरीभाते खात्रीचे मि ते.

शा जादवजी लल्लूभाई आणि कं०

सर्व प्रकारची काष्ठौषधि व औषधी निर्मितीसाठीं लागणारी कच्ची द्रव्यें यांचे विक्रेते. २४५ काळबादेवी रोड मुंबई २.

जी. ए. मिश्रा आयुर्वेदिक फार्मसी, झांशी. (यू. पी.)

विविध आयुर्वेदीय इंजेक्शन्सचे निर्माते. इंजेक्शनविषयक "सचित्र आयुर्वेदिक इंजेक्शन विज्ञान" या पुस्तकाचे प्रकाशक.

अरविंद केमिकल वर्क्स, छिंदवाडा (मध्य प्रदेश)

विविध आयुर्वेदीय इंजेक्शन्सचे निर्माते. सचित्र आयुर्वेदिक इंजेक्शनचिकित्सा (मूल्य ३ रु.) या पुस्तकाचे प्रकाशक.

डॉ. पुरोहित फार्मसी, कोल्हापूर.

पुरोहित श्वासहारी, शोधना इ. विख्यात औषधांचे निर्माते.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

संपादकीय–

आयुर्मीमांसेच्या या अंकांत दोन चिरंतन महत्वाचे लेख प्रसिद्ध झाले आहेत. वैद्यराज पु. वि. धामणकर, आयुर्वेदभूषण यांचा कज्जली-कल्पाविषयींचा लेख त्यांच्या संकल्पित औषधीकरण शास्त्रविषयक ग्रंथांतील एक प्रकरण अशा स्वरुपाचा आहे. औषधीकरण शास्त्राची आधुनिक चिकित्सक भूमिकेवरून बुद्धिवादी पुनर्रचना करण्याचें महत्तम कार्य श्री. धामणकरांनीं आरंभिलेलें आहे. संशोधनाविषयीं योजना आंखीत असलेल्या सरकारमान्य तज्ञांनीं त्यांच्या या कार्याची दखल घ्यावी आणि औषधीकरण शास्त्राच्या संशोधन व पुनर्संस्करण प्रश्नाची जबाबदारी त्यांच्या हातीं सोपवावी. म्हणजे एक विभाग त्वरित हातावेगळा केल्याचें श्रेय मिळूं शकेल.

श्री. धामणकरांच्या या परिश्रमांचीं दखल उत्तर-भारतीय आयुर्वेद सेवकांकडून घेतली जात आहे याचा उल्लेख करणें अवश्य आहे. कलकत्त्याहून प्रसिद्ध होणाऱ्या 'सचित्र आयुर्वेद' या मासिकांत धामणकरांच्या मीमांसेंतून प्रसिद्ध होणाऱ्या या लेखमालेचीं भाषांतरें होत आहेत व त्यांचा सहर्ष आदर केला जात आहे. मुंबई प्रांतांतील उच्चपदस्थांनीं त्याची दखल घेतली पाहिजे. आयुर्वेदाच्या संकल्पित नव्या अभ्यासक्रमांत 'औषधीकरण विद्या' हा ऐच्छिक विषय ठेवला जावा अशी आमची सूचना आहे.

या अंकांतील 'चंद्रप्रभा' या वैद्यराज वागेवाडीकर यांच्या लेखाचें महत्वहि अनन्य साधारण आहे. औषधीकल्पांच्या शरीरावरील कार्यसंबंधीं बुद्धिवादी विवरण करून सांगण्याची अत्यंत आवश्यकता आहे. औषधे आणि त्यांचे कार्य यांच्या मधल्या दुव्यांची सोपपत्तिक संगति लावण्याचा प्रयत्न या लेखांत वागेवाडीकरांनीं केलेला आहे आणि तोहि आधुनिक भौतिक शास्त्रा ऐवजी प्राचीन सांख्य वैशेषिकांच्या आधारें! श्री. वागेवाडीकरांच्या या लेखमालेचेंहि सर्वत्र स्वागत होईल अशी आम्हाला खात्री वाटते.

डॉ. आगाशे रुग्णालय–निधि

या अंकांत कव्हर पृष्ट दोनवर छापलेले विनंतिपत्रक महाराष्ट्रांतील आयुर्वेद प्रेमी जनतेनें व विशेषतः आर्यांग्ल वैद्यक महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांनीं ध्यानीं घ्यावे अशी विनंति आहे. डॉ. आगाशे यांच्या आयुर्वेद-सेवेचे प्रतीक म्हणून उभारल्या जाणाऱ्या या रुग्णालयाचें काम पुरे करण्याची जबाबदारी संस्थेच्या हितचिंतकांवर व डॉ. आगाशे यांच्या चाहत्यांवर आहे. डॉ. आगाशे यांच्या षष्ठ्यद्बिपूर्तीनिमित्त जो निधि उभारण्यांत आला होता त्या करिता देण्यांत आलेली देणगीची आश्वासनें आ. वै. महा-विद्यालयाच्या कांहीं माजी विद्यार्थ्यांनीं पुरी केलेली नाहींत. ही वेळ अत्यंत महत्वाची आहे, इमारत बांधली जात आहे आणि पैशाची वाण निकडीनें भासू लागलेली आहे. हा उपक्रम अर्धवट सोडता येणार नाहीं. ज्या माजी विद्यार्थ्यांना कोणत्याहि मार्गानें हस्ते परहस्ते या निधीस मदत करणे शक्य आहे त्यांनीं ती तात्काळ करावी. स्वतःची आश्वासित रक्कम तावडतोब पाठवून द्यावी. इतकेच नव्हे तर ज्यांना शक्य आहे त्यांनीं यावेळीं कांहीं रक्कम कर्ज म्हणून धाडली तरी तिचा स्वीकार केला जाईल.

हें काम तडीस कसें जाईल याची संस्थेच्या कार्यकर्त्यांना मनस्वी चिंता वाटत आहे. या कार्यकर्त्यांच्या वैयक्तिक त्यागाची व श्रमाची परिसीमा झाली आहे ही वस्तुस्थिति औचित्य आणि संकेत यांचा भंग करूनहि संस्थेच्या सुहृदांना सांगावीशी वाटते.

आतां वैयक्तिक पत्रांची वाट न पाहातां निधीसाठी सर्वांनीं सहाय्य करावें अशी कळकळीची विनंति आहे. संस्थेने तिच्या हितचिंतकांना ही अत्यंत निर्वाणीची हांक आहे. तिला साद मिळेल अशी आम्हांला खात्री वाटते.

सर्व प्रकारची आयुर्वेदीय औषधें शास्त्रोक्त पद्धतीनें तज्ञ वैद्यांच्या देखरेखीखालीं तयार केली जातात.

ठिकठिकाणीं एजंटस नेमणे आहेत.

दि आयुर्वेदिक धन्वंतरि फार्मसी

अहमदनगर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वाद-संवाद

लोकसंख्या आणि तिचें नियंत्रण

ले: - ब. ल. वष्ट

'मॉडर्न रिव्ह्यू' या कलकत्त्याहून प्रसिद्ध होणाऱ्या मासिकाच्या एप्रील १९५१ च्या अंकांत 'लोकसंख्या आणि तिचें नियंत्रण' या विषयावर एस्. के. गुह यांचा एक विस्तृत लेख प्रसिद्ध झालेला आहे. त्यांतल्या विचारांचा, विवेचनाचा व निष्कर्षाचा सारांश पुढें देत आहे. वाढत्या जनसंख्येचे उदर-भरण हा मानवसमाजापुढील एक निरंतरचा प्रश्न असून इतिहास कालापासून वृद्धांची हत्त्या, नरबली, चेटूक, गर्भ-पात, भ्रूणहत्त्या, युद्ध इ. उपायांनीं हा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न निरनिराळ्या टोळ्या, मानववंश व राष्ट्रे यांनीं केला असल्याचे त्यांनीं या लेखाच्या प्रारंभी नमूद केलें आहे. केवळ युद्धांनीं १९१४ पर्यंतच्या काळांत एकूण १५,०००,०००,००० इतक्या जनसंख्येचा बळी घेतला असल्याचें आढळून आलें आहे. किर्बी पेज यांच्या मतानुसार पहिल्या जागतिक महा-युद्धांत २०,०००,००० लोक जखमी झाले. १३०००,००० नागरी जनता ठार झाली. १०,०००,००० सैनिक धारातीर्थी पडले. याखेरीज निर्वासित, पोरकी मुले, विधवा, कैदी आणि बेपत्ता यांची संख्या प्रचंडच होती. या महायुद्धामुळेच केवळ जगाची लोकसंख्या चार कोटींनीं घटली असल्याचें सिद्ध झाले आहे. दुसऱ्या महायुद्धांतील जीवितनाश यापेक्षाहि भीषण आहे.

रोगराई

प्रतिवर्षी जगांतील प्रचंड लोकसंख्या निरनिराळ्या रोगांना बळी पडत असते. सहाव्या शतकांत कित्येक वर्षे-पर्यंत प्लेगनें प्रत्येक दिवशीं पांच हजार माणसें मरत होतीं. अकराव्या शतकांत या रोगानें युरोपच्या एक चतुर्थांश लोक-संख्येचा बळी घेतला. हिंदुस्थानांत १९३२ ते ४१ पर्यंतच्या काळांत प्रतिवर्षी निरनिराळ्या रोगांनीं ६२०१४३४ माणसे मृत्युमुखीं पडत होतीं असें भोर कमेटीच्या रिपोर्टांत म्हटलें आहे.

बालमृत्यू

हिंदुस्थानांत या शतकांत आतांपर्यंतच्या मृत्युसंख्येपैकीं निम्मे मृत्यू दहा वर्षाखालील मुलांचे झालेले आहेत असें भोर समितीच्या अहवालांत लिहिलेलें आहे. गर्भवती आणि नूतन प्रसूत स्त्रियांच्या मृत्यूचाहि आंकडा असाच मोठा आहे. प्रति-वर्षी अशा दोन लाख स्त्रिया हिंदुस्थानांत मृत्यूच्या खाईत ढकलल्या जातात.

दुष्काळ

लोकसंख्येचा भार कमी करण्याचा सर्वांत मोठा मक्ता दुष्काळानें घेतलेला आहे असें दिसून येतें. जगांत आतांपर्यंत भीषण असे साडेतीनशे दुष्काळ पडलेले आहेत. त्यांपैकीं हिंदु-स्थानांत ३९ वेळां प्रचंड दुष्काळ पडलेले आहेत. १९४३ सालच्या दुष्काळांत केवळ बंगालमध्यें तीस लाख लोक मरण पावले.

याच्याच भरीला भूकंप, वादळे, महापूर, अपघात यांच्यामुळें घडणारे मृत्यू घातले म्हणजे प्रचंड गतीनें वाढत जाणाऱ्या लोकसंख्येच्या या महा वृक्षावर प्राणघातक घावहि अगणित पडत आहेत असे म्हणावे लागते. पण आज जगाची लोकसंख्या इतकी वाढली आहे कीं ही कोटयावधी पोटे भरण्याकरिता अन्न कोठून आणावे असा जगासमोर भेसूर प्रश्न उभा आहेच.

हिंदुस्थानचा अन्नप्रश्न

श्री. गुह यांनीं आपल्या या अभ्यास पूर्ण लेखांत हिंदुस्थानची जनसंख्या आणि अन्नप्रश्न यांचे केलेलें विवेचन येथें संक्षेपानें देत आहे.

फाळणी झाल्यापासून हा अन्नप्रश्न अधिकच भीषण झाला. इतर कोणत्याही देशापेक्षा हिंदुस्थानची मृत्युसंख्या प्रचंड असूनहि लोकसंख्येचे नियंत्रण करणे या देशांत आवश्यक होऊन बसलेलें आहे. हिंदमधील मृत्युसंख्येशी जनसंख्येचे असलेलें प्रमाण ब्रिटन अगर अमेरिका यांच्यापेक्षां अधिक असून जपानच्या खालोखाल आहे. नव्या जनगणनेप्रमाणें भारताची लोकसंख्या पस्तीस कोटीहून अधिक आहे. यांत ब्रह्मदेश, मलाया, सिलोन, आफ्रिका, व पाकिस्तान येथून परतणाऱ्या भारतीयांची सारखी भर पडतच आहे. जनतेला आता थोडीफार वैद्यकीय मदत मिळू लागलेली असल्या-मुळें यापुढे मृत्यूचे प्रमाण घटत जाऊन त्या मानानें लोक-संख्येचा आकडा वाढतच जाईल.

लोकसंख्येवरून आपल्या अन्नपरिस्थितीकडे नजर टाकली तर असे दिसून येते कीं उपलब्ध धान्याच्या प्रमाणानुसार हिंदमधील प्रत्येक नागरिकाला एकवेळहि पुरेसे जेवण मिळणें कठीण आहे. प्रो. के टी. शहा आणि डॉ. राधाकमल मुकर्जी यांची या प्रश्नाचा अभ्यास करून जे निष्कर्ष काढले आहेत त्यावरून सध्याचा अन्नपुरवठा व्यक्तिगणिक १२०० कॅलरीज इतका आहे. वास्तविक माणसाला ३६०० कॅल-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रीजची गरज असते. यावरून पासष्ट टक्के लोक जीवनाला अवश्य असण्या इतक्या अन्नालाहि मुकलेले आहेत असे दिसून येईल.

फाळणीमुळें हिंदच्या वाट्याला लोकसंख्या ऐंशी टक्के आली पण जमीन मात्र ७३ टक्के मिळाली. एका माणसाला दररोज एक पौन्ड म्हणजे सोळा औंस अन्न लागते या हिशेबानें पाहिले तर हिंदुस्थानला अठ्ठेचाळीस दशलक्ष टन धान्याची गरज आहे, पण अन्नोत्पादन मात्र त्रेचाळीस दशलक्ष टन आहे. या आकडेवारी पेक्षाहि आपण गेल्या तीन वर्षांत परदेशांतून किती धान्य आणलें हें पाहाण्यासारखे आहे.

वर्ष	धान्य आयात (दशलक्ष टनांचे आकडे)	मूल्य (आकडे कोटींत)
१९४७–४८	२·८५५	१२२·४९
१९४८–४९	३·४४४	१३८·४२
१९४९–५०	२·१७५	८२ ५०

प्रतिवर्षी अन्नपरिस्थिति अधिकाधिक गंभीर होत चाललेली असून १९५१ अखेर चाळीस लक्ष टन अन्नधान्याची आयात करावी लागेल असे सरकारच्या प्रवक्त्यांनी वेळोवेळी जाहीर केले आहे.

अधिक धान्योत्पादनाची योजना

धान्याच्या बाबतीस देश स्वावलंबी करण्याच्या हेतूनें 'अधिक धान्य पिकवा' ही मोहीम १९५२ सालापासूनच आरंभिण्यांत आली आहे. १९४७ साली स्वतंत्र भारताच्या सरकारनें [अन्नस्वालंबनाची पंचवार्षिक योजना आखून त्या दिशेनें प्रयत्न चालविलें आहेत. पण अपेक्षेच्या मानानें या योजनेचे यश अत्यंत तुटपुंजे व निराशाजनक असून १९५२ अखेर अन्नस्वावलंबी होण्याचे स्वप्न साकार होण्याची अद्यापहि कसलीच चिन्हें दिसत नाहींत.

कुटुंब नियोजन आणि संततिनियमन

या परिस्थितींतून मार्ग काढण्याकरितां व समाज सुदृढ, निरोगी, स्वास्थ्यशील आणि कार्यक्षम होण्यासाठीं कुटुंब नियोजनाची आवश्यकता मान्य करणें भाग आहे. ब्रिटनमध्ये १९१० सालापासून संततिनियमन व कुटुंबनियोजन करण्यांत येत आहे. आज तेथें प्रत्येक विवाहित जोडप्या मागे २·२५ मुले असे संततीचे प्रमाण पडते. त्यामुळें राष्ट्रीय आरोग्य रक्षण योजनेसारख्या प्रचंड योजना ब्रिटनमध्यें कार्यवाहीत येऊ शकल्या.

हिंदुस्थानांतील विचारवंतांचे या प्रश्नाकडे आता लक्ष जाऊ लागलेले दिसते. स्वातंत्र्यपूर्व कालखंडांत राष्ट्रीय नियोजन समितीनें केलेल्या ठरावांत कुटुंब नियोजन संततिनियमन आणि सुप्रजाजनन यांच्या आवश्यकतेवर भर दिलेला होता. या समितीचे अध्यक्ष आजचे आपले पंतप्रधान प. जवाहरलाल नेहरु हेच होते. त्यांनीं भारताच्या आजची अन्नपरिस्थिति ध्यानीं घेऊन या योजनांचा पुरस्कार करावा.

म्हसकर समितीचा अहवाल

आणि आयुर्विद्याकारांचें 'संपादकीय'

आयुर्मीमांसेच्या मार्च अंकांत प्रसिद्ध झालेल्या 'आयुर्वेद हितचिंतक' यांच्या म्हसकर–समितीकृत अहवाल विषयक लेखाचा परामर्ष घेतांना पुण्याच्या आयुर्विद्याकारानीं प्रस्तुत समीक्षण विषयक लेख केवळ टीकात्मक व 'दुर्बोध' आणि निष्कारण गैरसमज करणारा आहे असा अभिप्राय नमूद केला आहे.

म्हसकर समितीच्या इतिवृत्तांत अनुस्युत असलेल्या आयुर्वेद संशोधनासारख्या विषयासंबंधीं लिहितांना तें लिखाण 'बालबोध' असावें हा प्रधान हेतू लेखकासमोर असण्याची आवश्यकता नव्हती. तेव्हां तो 'सामान्य वाचकांना' दुर्बोध झाला असला तरी 'जाणत्याना' निश्चित समजण्यासारखा आहे आणि या लेखांत संशोधन-विषयासंबंधीं कांही जिव्हाळ्याचे मुद्दे मांडण्यांत आलेले आहेत म्हणून शास्त्रीय चर्चेच्या अपेक्षेनें त्या लेखास प्रसिद्धी देण्यांत आली. गेल्या अंकांत याच 'वाद–संवाद' सदरामध्यें या लेखांतील चार मुद्द्यांच्या मीं प्रश्नरूपानें पुनश्च उधृत केलेले आहेत. लेखाचा हेतू केवळ 'टीकेसाठीं टीकेचा' आहे कीं नाहीं या गौण प्रश्नावर भर न देतां आयुर्विद्याकारांनीं उपरोल्लेखित मुद्यांविषयीं आपली भूमिका मांडून म्हसकर समितीच्या अहवालांतील 'विशेष अर्थ' अभिव्यक्त केला असता तर 'आयुर्वेदाच्या नवोदित शास्त्रीय जगांतील उच्च भूमिकेवरून विचार करण्याची' परंपरा आयुर्विद्याकारांना अभिप्रेत आहे तिचा आविष्कार दिसून आला असता.

आयुर्विद्याकारांचें मतैक्य

पण आयुर्विद्याकारांनीं त्यांच्या मतें आक्षेपार्ह ठरलेल्या आयुर्मीमांसेंतील समीक्षणविषयक लेखांतल्या एका विधानास मान्यता दिलेली आहे याबद्दल मी त्यांनें अभिनंदन करतो. म्हसकर समितीच्या प्रतिवृत्तांतील पान २३–२४ वर 'पंच महाभूत व त्रिदोष सिद्धांत' या विवाद्य मानलेल्या विषया

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अंतिम निर्णय करण्याकरितां पंधरा तज्ञांची समितीं नेमून तिचे एकमतानें वा बहुमतानें होणारे निर्णय बंधनकारक मानले जावेत अशी शिफारस केली आहे. शास्त्रीय प्रश्नांचे निर्णय बहुमतानें घेतले जाणे इष्ट आहे काय असा मुद्दा मीमांसेतील लेखांत प्रस्तुत शिफारसीविषयी लिहिताना उपस्थित केला होता. पाटणा–परिषदेतील तज्ञांच्या निष्कर्षांचा परामर्श घेताना आयुर्विद्याकारांनीं त्यांच्या एप्रील अंकाच्या पान ३९० वर ***'शास्त्रीय प्रश्न बहुमतानें कधींच सुटत नाहींत***, तेव्हां पाटण्यांत जें ठरलें ते सर्व खरे असे मानण्याचे मुळीच कारण नाहीं' अशी ग्वाही दिली आहे. म्हसकर समितिची वरील शिफारस आणि आयुर्विद्याकारांनीं सांगितलेला प्रस्तुत सिद्धांत व तो पाटण्याच्या तज्ञाना लावून त्याचे प्रात्यक्षिक दाखविण्यांत प्रदर्शित केलेली तत्परता लक्षांत घेता आयुर्विद्याकारांनीं समीतीच्या अहवालाविषयीच्या एका आक्षेपाला उत्कृष्ट तात्विक पाठिंबा दिलेला आहे असे दिसून येईल. आता उरलेल्या तीन मुद्यांविषयीं त्यांनीं आपलें मत व्यक्त करण्याचे राहिले आहे.

हा आणखी एक 'अहवाल'!

दिल्ली येथून प्रसिद्ध होणाऱ्या 'जर्नल ऑफ आयुर्वेद' या इंग्रजी नियतकालिकानें वरील संपादकीय मथळयाखाली म्हसकर समितीच्या अहवालाविषयी आपलें मत व्यक्त केलें आहे; या संपादकीयाकडे मी आयुर्विद्याकारांसारख्या म्हसकर समितीच्या प्रतिवृत्ताच्या पुरस्कर्त्यांचें लक्ष वेधू इच्छितो. म्हसकर समितीच्या सूचनांचे स्वागत करताना त्या समितीच्या शिफारसींतील कांहीं शास्त्रीय प्रश्नांविषयींच्या भूमिकेविषयीं मत प्रदर्शन करण्यांत आले तर त्याबद्दल कोणास विषाद वाटावयास नको. या शास्त्रीय प्रश्नांची चर्चा, प्रस्तुत. मतप्रदर्शन केवळ टीकाबुद्धीचे आहे असे म्हणून टाळणें हें तर टीकात्मक लेखानें होणाऱ्या उच्च विचार परंपरेच्या हानी 'पेक्षाहि अधिक हानिकर आहे; हें सांगावयास पाहिजे असे नाहीं.

संपूर्ण वातरोगांवर उत्कृष्ट ठरलेलें
रामबाण औषध

झटपट तेल

हें एकदां वापरल्यानें डोक्याचे ज्ञान व क्रियातंतू बलवान होतात. डोके दुखी, अर्ध शिशी, चमक भरणें व संधी वात यांवर रामबाण उपाय.

नवहिंद केमिकल वर्क्स, मुंबई नं. १२

सोल एजंट:– बाना एजन्सी
खंडेलवाला मॅन्शन, मुंबई १५

मद्रास आयुर्वेदिक इंजेक्शन्स व बी. टी. होमिओपाथिक इंजेक्शन्स करितां

प्रत्येक तालुका व प्रमुख शहरासाठीं एकेक एजंट नेमावयाचा आहे. अटी व माहिती पत्रक याकरितां लिहा—

सोल डिस्ट्रिब्यूटर्स

Dr. Y. VENKATRAO & Co.
Ragireddi Buildings
AMALAPURAM [S. India]



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भारतीय आरोग्य–विज्ञान

फलाहार

पान, फूल, फल, शेंग, कंद, मूळ इ. स्वरूपांत भाज्यांचा उपयोग

लेः—वैद्य दत्तात्रेयशास्त्री जळूकर

भोजनांत भाज्यांचें महत्त्व अन्नाचे बरोबरीनेंच आहे असें म्हणावें लागतें. आम्ही ज्या भाज्या नित्य भोजनांत वापरतों त्यापेक्षां कितीतरी अधिक भाज्यांचा उल्लेख रोगपरत्वें पथ्यापथ्य विवेचन करतांना आयुर्वेदांत केलेला आढळतो. आम्हा आजच्या चिकित्सक वर्गाला तर त्या भाज्यांचीं नांवेंहि माहीत नाहींत, मग प्रत्यक्ष ओळख तर दूरच राहिली! व म्हणूनच पथ्यापथ्य सांगतांना आमची फारच कुचंबणा होत आहे. अलीकडे चिकित्सेचा थाटहि सर्व पाश्चात्त्य धर्ती–वरच आयुर्वेदीय वैद्यांचाहि जात असल्यानें विद्यालयांतून अध्यापन कार्यांत याबद्दल बरीच अनास्था होत असल्यास आश्चर्य तें काय ? आपणास या लेखांतूनहि आज बहुतांश आमच्या नित्य खाण्यांत असणाऱ्या भाज्यांचीच माहिती घेणें बरें होईल. नाहींतर काशीयात्रेस जाऊन आल्यावर अक्रोडाचें फळ न खाण्याचें व्रत घेतल्यासारखीच गंमत व्हावयाची. कारण आम्ही लेखांत लिहिलेल्या भाज्यांचें संपूर्ण आयुष्यांतहि दर्शन होण्याची वानवा असल्यावर भर–मसाट लांबलचक वर्णनच केवळ वाचून ज्ञान कसें होणार ? पुढें मागें जर रोगपरत्वें आहार–विहारावर कांहीं लिहिण्याची पाळी आलीच तर मात्र हा खुलासा पथ्यापथ्य विधींत करतां येईल.

पालेभाज्या, फळभाज्या, फूलभाज्या, कंदभाज्या असे भाज्यांचे ४ प्रकार संभवतात; कोणत्याही वनस्पतीचें मूळ, हें त्या वनस्पतीच्या पोषण द्रव्यांचा पुरवठा करणारें जणूं सर्व पोषण द्रव्यांचें संग्रहालयच असल्यामुळें ह्याचें प्रस्थ पान, फूल, फळीपेक्षां जड असल्यास आश्चर्य तें काय ? व असलें हें जड प्रस्थ पचनी पाडणें कांहीं सोपें काम नव्हें हें काय मग सांगायला हवें ? याच्या उलट सदा हवेंत लटकत राहून कुणीहि येणारा जाणारानें ओरबाडावे अशा विचाऱ्या पानांची–पाल्याची स्थिति असते व म्हणूनच बहुधा हा कोण्या झाडाचा पाला ? अशा वाक्यानें एखाद्या गरिबाची संभावना करण्याची प्रथा व्यवहारांत पडली असावेंसें वाटतें. यावरून वेली, क्षुप, तरू वृक्षांचीं मुळें पचनास जड व पानें पचनास हलकीं असतात. हें सहज ध्यानांत येणार आहे.

पालेभाज्या हृचा द्रवप्रचुर असल्यानें त्यांना वैद्यकीय परिभाषेंत 'आप्य' म्हणतां येतें. शिवाय त्या क्षारमय असतात व म्हणून त्या मूत्रल व सारक असतात. पावसाळ्यांत पुन्हां हवेंतील आर्द्रता, अम्लता, क्षारत्व वाढून ह्या पाले–भाज्यांचे ठिकाणीं दोष निर्माण होतात आणि म्हणूनच चातुर्मास्या मध्यें पालेभाज्यांचे सेवन वर्ज्य होय. अधिक जलांशा–मुळें यांचे ठिकाणीं सडण्याची, आंबण्याची क्रिया फार लौकर होते हाच ह्या निषेधांतील हेतु होय. निर्दोष प्रकृतीच्या लोकांनीं सुद्धां इतर ऋतूंत ह्या पालेभाज्या सेवन करण्या पूर्वीं उकळून व त्यांतील पाणी पिळून नंतर तूप–तेलाच्या फोडणीचा संस्कार करून मगच खाण्यांत वापरणें चांगलें.

एक गोष्ट विशेषतः लक्षांत ठेवणें इष्ट आहे कीं भाज्या ही वस्तु नुसत्याच खाण्याची नसून भोजनांत पूरक म्हणून रसांच्या रुचि वैचित्र्यानें भोजनाची आवड वाढवून पचना साहायक अशा त्या 'मध्यस्थ' होत.

पालेभाज्या

चंदनबटवा घोळ, मेथी, तांदुळजा, चुका, शोपालक, चाकवत, करडई, कोथिंबीर, मुळा, अळू हृचा भाज्या सर्व सामान्यतः पालेभाज्या म्हणून आपल्या उपयोगांत येत असतात. हरभऱ्याच्या राजगिऱ्याच्या व खसखशीच्या पानांचीहि प्रथा आढळते. या शिवाय पहाडवेल, गुळवेल, हरणदोडी सारख्या रानांत आपोआप उगवणाऱ्या वनस्पतींच्या पानांचीहि भाजीं ज्वरामध्यें पथ्यासाठीं घेण्यास सुचविण्यात आली आहे.

या सर्वहि भाज्यांमध्यें जीवन्ती म्हणजे हरणदोडीची भाजी सर्व श्रेष्ठ आणि सार्षप म्हणजे मोहरीचे पानांची भाजी विदाहि–अत्युष्ण म्हणून सर्व भाज्यांत कनिष्ट मानली आहे. असें आहे तरी चुका, चाकवत, मेथी, शोपालक, पोकळा हृचा भाज्या त्यांतल्या त्यांत पथ्यकर आहेत; फक्त त्यांच्या मधील सारक धर्म व विशेष क्षार आणि अम्लत्व दोष नष्ट करण्यासाठीं त्या वर सांगितल्याप्रमाणे उकळून पिळून नंतर फोडणी देऊन करणें इष्ट असतें. त्या भाज्यां–तील बहुतेक भाज्या पातळ भाज्या म्हणून भोजनांत आम्ही करीत असतों व अवष्टंभ प्रवृत्तीच्या लोकांना त्या तशाच घेणे हितावहहि असतें; परंतु पालेभाज्या व पावसाळा हृचा दोन गोष्टी मात्र एकत्र असल्या कीं मग त्या सारक धर्माला जो पूर येतो तो मात्र अवारणीय असतो शिवाय पावसाळ्याच्या दलदलीच्या व सर्द हवेंत आणि प्रदेशांत निसर्गतः आंबण्याचे म्हणजेच कृमींची उत्पत्ति त्यांत अधिक होत असल्यानें शक्य

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

तो पालेभाज्या टाळाव्यात; निदान त्या पातळ भाज्या म्हणून तरी करूं नयेत. ह्या भाज्या नुसत्याच पाला शिजवून फोडणी देऊन करण्याची पद्धति नाहीं हीं त्यांतल्या त्यांत चांगली गोष्ट आहे. सारक धर्माला आळा घालण्यासाठीं तुरीची किंवा हरभऱ्याच्या, मुगाच्या डाळीचें किंवा त्यांच्या पिठाचें मिश्रण ह्या भाज्यांत केले जातें. तसेंच शेंगदाणा, तिळाचें किंवा खसखशीचें कुट, हिंग जिरें खोबरें व गूळ इ. पदार्थांचें मिश्रण केल्या वांचून सहसा ह्या भाज्या केल्या जात नाहींत ही फार उत्तम पद्धति आहे. त्यामुळें अम्लक्षार प्रतियोगित्व, जंतु नाशकत्व आणि सारक धर्माला आळा बसतो व त्यांतील शीघ्रपाचन, आंत्रांच्या गतीस चालना देण्याचा धर्म, रस रक्तपरिपोष व त्याचा अप्रत्यक्ष परिणाम म्हणजे लोहानें होणारें रक्तवृद्धीचें कार्य उत्तम प्रकारें होतें.

मेथी, हरभऱ्याचीं पानें, खसखशीचीं पानें, कोथिंबीर यांच्यासारख्या भाज्या कडक उन्हांत वाळवून ठेवून भाज्यांचे दुष्काळाचे दिवसांत म्हणजे उन्हाळ्यांत यांचा उपयोग करण्याची प्रथा पांढरपेशे वर्गातील मोठ्या जुन्या कुटुंबांत व पुष्कळशा शेतकऱ्यांच्या कुटुंबांतून आढळते. अळूसारख्या प्रशस्त पानांना स्वच्छ धुवून हरभऱ्याचे पातळ पिठाचा लेप देऊन (त्या पातळ पिठांत योग्य प्रमाणांत तिखट मीठ, जिरें व हिंगाचा वास लावून) त्याच्या वळकुट्या करून योग्य आकारांत कापून वड्या कराव्यात व त्या तळून काढाव्यात. फारच रुचकर होतात. एवंच ह्या पालेभाज्या यांतील दोषनाशक असें त्यांवर संस्कार करून वापरल्यास पथ्यकर होतात. व त्यांतील सारक द्रवप्राचुर्यामुळें मूळव्याध, कृमिदोष, मेह, कुष्ठ, रक्तपित्त इ. विकार नाशक होतात.

आरंभीं सांगितल्याप्रमाणें मूळ किंवा कंद हे पचनास अति जड आहेत व पानें हीं पचनास अति हलकीं असतात अर्थांतच पानांपेक्षा फुलें, त्यापेक्षां फळें पचनास जड असा हा आपोआपच क्रम लागला तर नवल नाहीं. "पत्रे, पुष्पे, फले, नाले, कन्देच गुरुता क्रमात् –" हें वैद्यकाचें सूत्र याचेंच दर्शक आहे. मुळ्यासारख्या कांहीं भाज्यांचा यास अपवादहि आहे. यांत "पुष्पंच पत्रंच फलं तथैव यथोत्तरं ते लघव: प्रदिष्टा:" असा थोडासा विपरीत क्रम लागतो. मुळ्याच्या पानांची व प्रत्यक्ष कोवळ्या मुळ्याची भाजी ज्यांनीं खाल्ली असेल त्यांच्या चटकन लक्ष्यांत येईल. अस्तु ! आतां पानानंतर फुलाच्या भाज्यांकडे वळूं.

फुलांच्या भाज्या

हदग्याचीं, हरणदोडीचीं, कोबीचीं व केळीचीं फुलें क्वचित् चिंचेचींहि भाजीसाठीं उपयोगांत आणल्याचें पाहाण्यास आढळतें. दिसायला पुष्कळ व शिजल्यावर थोडी अशी फुलाच्या भाजीची स्थिति असते. करंजाचे कोवळे अंकुर, शतावरीचे व वेळूचे कोंबे हे सुद्धां भाज्यांमध्यें गणले जातात. गुणानें रुक्ष असल्यामुळें भरपूर तेला – तुपाशिवाय ह्या भाज्या उपयोगांत आणणें इष्ट नसतें. केळींच्या व हदग्याच्या फुलांच्या आंतील कडक कोंब (किंजल्क) काढूत टाकून नंतर हीं फुलें वाफवून पाणी पिळून भाजी करणें चांगलें. ह्यांत तूर, मूग अथवा हरभऱ्याची डाळ किंवा पीठ घालून किंवा न घालतांहि भाजी केली तरी चालते. अत्यंत रुचकर, पचनास हलक्या, रसरक्त वृद्धिकर म्हणून यांची उपयुक्तता आहे.

आयुर्वेद–वार्ताविशेष

म. प्रां. वैद्यसंमेलन

मेच्या शेवटच्या आठवड्यांत वेळगांव येथें महाराष्ट्र प्रांतिक वैद्यसंमेलनाचें अधिवेशन मुंबईचे वैद्य ग. स. अभ्यंकर यांचे अध्यक्षते खालीं भरणार आहे. स्वागताध्यक्ष वैद्य म. भा. वाटवे हे आहेत. संमेलन प्रसंगी प्रदर्शनहि भरणार असून चर्चा, शंकानिरसन, निबंध स्पर्धा इ. विविध कार्यक्रम होणार आहेत.

केंद्रीय चौकशी समिति

मध्यवर्ती सरकारनें आसवारिष्टे व अफू भांग युक्त औषधें यांच्या वरील नियंत्रणांचा फेरविचार करण्याकरितां व नियंत्रणामध्यें प्रांता प्रांतातून सुसूत्रता आणण्याकरितां एक समिति नेमलेली असून तिच्यापुढें ऑल इंडिया फार्मासिस्ट अॅसोसिएशन मुम्बई या संस्थेनें आपले निवेदन सादर केले आहे.

मानवत येथील आयुर्वेद अभ्यासमंडळाचा विधायक कार्यक्रम

श्रीक्षेत्र गुंज (जि. परभणी) येथील प्रचंड यात्रेंत यावर्षीं यात्रेकरूना वैद्यकीय सहाय्य देण्याच्या हेतूनें अभ्यास मंडळानें धर्मार्थ दवाखाना ठेवला होता.

दवाखान्यास लागणारी औषधी वैद्यांनीं, सभासदानी पुरविली. व सहकार्यानें कामाची वाटणी करून एक जुटीनें दवाखान्याचे काम अत्यंत व्यवस्थेनें पार पाडलें.

यात्रेंत एकंदर दोनशेंचेवर उपचार करण्यांत आले. त्यापैकीं उन्हाळी अतिसाराचे रोगी चिकित्सेंत प्रमुखत्वानें होते. यांतून कांहीं अत्यावस्थ होते. त्यांना वेळींच उपचार व शुश्रुशेचे मार्गदर्शन झाल्यामुळें इशकृपेनें त्यांची प्रकृती सुधारली एकही रोगी दगावला नाहीं.

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri
CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

" आयडोनेल "

आयोडिनचें मलम

सांधेदुखी : ग्रंथीची सूज

-: मु का मा र :-

नायटे : गजकर्ण

इत्यादिवर उत्कृष्ट गुणकारी

-० धूतपापेश्वर ०-

इंडस्ट्रीज लि.

पनवेल – मुंबई

सातारा:- द. रा. कुलकर्णी व व्ही. जी. डिंगणकर

द. सातारा जिल्हा एजंट:-भारत वस्तु भांडार सांगली

कोल्हापूर डेपो:-वि. अ. पाडळकर, महाद्वार.

५६ वर्षांच्या अनुभवानें मिळालेल्या दक्षतेनें युक्त व

संपूर्ण शास्त्रशुद्ध औषधांची निर्मिति

हेंच ऊंझा फार्मसी च्या

औषधांचे वैशिष्ठ्य आहे

ऊंझा फार्मसी लि. च्या सुसज्ज कारखान्यांत अनुभवी व सुशिक्षित निरीक्षकांकडून प्रत्येक औषध शास्त्रोक्त तसेंच पेटंट उत्तम द्रव्यापासून निर्माण केलें जातें. औषधें संपूर्ण शास्त्रशुद्ध व ५६ वर्षांच्या अनुभवानें प्राप्त झालेल्या दक्षतेनें युक्त निर्माण केलीं जात असल्यामुळें, जे लोक एकवेळ आमचीं औषधें वापरतात, ते हमेशा आमचीच औषधें मागवितात; आणि याच कारणामुळें आमच्या फार्मसीचीं औषधें वैद्य, डॉक्टर व औषधालयें व घरोघर सर्वत्र वापरलीं जात आहेत.

आजपासून आमचीं औषधें वापरून चिकित्सेंत यश प्राप्त करा.

ऊंझा फार्मसी लि. ऊंझा (उ. गुजरात)

महाराष्ट्र एजंट-*जयंत अँड कंपनी, पुणें शहर.*

दमा हटतो तो कायमचाच. पुरोहित श्वासहारी हें एकच २८ वर्षे सतत प्रख्यात व अनुभविक असें डॉक्टरी औषध आहे कीं, जें तात्काळ आराम देऊन आस्ते आस्ते दमा बरा करतें. औषध घेण्यास सुरुवात करतांच कफ सुटतो, धांप कमी होते, पचनक्रिया सुधारते व फुप्फुसें मजबूत होऊन कांहीं कालानंतर दमा निखालस बरा झाल्याचा अनुभव येतो. रु. ३।।, ६ व १० किमतीच्या पॅकिंग मधून सगळीकडे विकत मिळतें अगर कारखानदार

डॉ. पुरोहित फार्मसी, कोल्हापूर (एस. एम्. सी.)

पुरोहित श्वासहारी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

औषधीकरण-शास्त्र

कज्जली कल्प

ले. वैद्य – पु. वि. धामणकर, धूतपापेश्वर, पनवेल.

सुरवातीला आहार विहारांत बदल करून रोग-चिकित्सा करीत असत पण पुढें ही पथ्यापथ्य चिकित्सा अपुरी वाटू लागली. म्हणून तिला असात्म्य अशा विषांची जोड देण्यांत आली. विष संयोगानें औषधाचें वीर्य वाढलें. बलवान दोषांचें नियमन योग्य तऱ्हेनें होऊं लागलें. पण औषध तेजस्वी. त्या मानानें त्याची जपणूक फार व योजनाही अति दक्षतेनें करावी लागे. त्यामुळें कालांतरानें तीही सदोष वाटूं लागली. तेव्हां औषधींना पारदाची जोड देण्यांत येऊं लागली. हा संयोग मात्र फार हितावह ठरला. कारण (१) औषधी कल्प टिकाऊ होऊं लागले. (२) औषधांचें वीर्यं वाढलें. (३) अल्प प्रमाण कार्यक्षम ठरलें. (४) रुचीचा प्रश्न फारसा उरला नाहीं. (५) विषसंयोगांतले भय दूर झाले. त्यामुळें आजचे चिकित्सा पद्धतींत तिन्ही प्रणालींचा समावेश झालेला दिसतो.*

नागार्जुनानें पारद औषधीउपयुक्त ठरविला. पण त्याच्या चापल्यामुळें तो औषधींत मिसळण्याकरितां चरक प्रणीत पाटावरवंटा त्यास तितकासा उपयुक्त वाटेना. म्हणून त्यानें प्राचीन यंत्राचें संस्करण केलें. नि त्यास खल्वयंत्र असें नांव ठेंवलें.

कज्जली कल्पांत मर्दनास महत्व विशेष म्हणून ती क्रिया साधून देणाऱ्या यंत्राचा विचार प्रथम केला पाहिजे. मर्दनांत रगडणें (Press) आणि घांसणें (Friction) ह्या दोन क्रिया होत असतात. दाबा (Pressure) नें पदार्थ सूक्ष्म सूक्ष्म होत जातो व घर्षण घडतें. घर्षणा (Friction) नें उष्मा निर्माण होऊन, औषध न सडतां, त्यांतील द्रव्यांचा संयोग घडून येतो. उदाः– " तप्तेन तप्तमयसा घटनाय योग्यम् । विक्रमोर्वशीयम् (कालीदास ।) व त्या योगाचे सामर्थ्य वाढते.

मर्दनमात्राः—मर्दनानें औषधी मिश्रणास चिक्कणता येऊन मर्दन क्रिया अवघड झाली पाहिजे. दुसरें लक्षण म्हणजे औषधाची गोळी कर्दळी किंवा रिठयाचे बियासारखी गुळगुळीत, चकचकीत व्हायला पाहिजे.+

हें कार्य साधून देणारा खल दीर्घ वर्तुळाकार असावा लागतो. त्याचा खोलगट भाग, औषध बाहेर न जातां, घसरा पुरेसा देतां येईल इतपत लांब, रुंद नि उंच असावा लागतो. बत्ता हा सुद्धां हातांत नीटनेटका धरता येऊन घोटण्याची क्रिया योग्य तऱ्हेनें घडवितां येईल असा जाडजूड, ऊंच आणि वजनदार असावा लागतो. मर्दन क्रिया बत्त्याचे आकारमानावरच विशेष अवलंबून असते, बत्त्यास मर्दकः, घर्षः, घर्षणी, अशीं संस्कृत भाषेंत नांवें आहेत. त्यावरुन बत्ता व त्याचेकडून होणाऱ्या क्रियांचा सम्यक् बोध होतो.

अर्ध चंद्र खलाचें वर्णन

ग्रंथोक्तः—खल उंचीनें दहा अंगुळे, सोळा अंगुळें लांब, दहा अंगुळें रुंद सात अंगुळें खोल, सभोंवती दोन अंगुळे जाडीचा, पातळ (कांठ) राखलेला, अत्यंत गुळगुळीत, अर्धचंद्राकृतीं असावा. व त्याचा बत्ता बारा अंगुळें लांब असावा. असा जो खल तो रस सिद्धीला योग्य असा सांगितला आहे. ह्या खलांत पांच पळें (२० तो.) पारा शुद्धयर्थ मर्दन करावा. किंवा उचित असेल त्यामानानें अन्य खलांतही घालावा.※

ह्या आकाराचें खलांत वीस तोळे पारा खलता येतो. हें मान लक्षांत घेऊन अपेक्षेनुसार खलाचा आकार वाढवावा. सामान्यतः चाळीस तोळे औषधीमिश्रण उत्तम खललें जाण्यास खल व त्याची मापें खालील प्रमाणें असावीत.

प्रचलित खलाची उंची ६" खलाची वरची सपाटी २०"×१०" सपाटीमधील खळगा १६"×६"×४" तळाची

---

*१ द्रव्यं विषयुतं यत्तद्रव्याधिकगुणं भवेत् । र. र. स.
२ एकोऽसौ रसराजः शरीरमजरामरं कुरुते ।। र. र. स.
३ अल्प मात्रोपयोगित्वादरुचेरप्रसंगतः ।
क्षिप्रमारोग्य दायित्वादौषधिक्योऽधिकोरसः ।।र. र. स.

+ यावच्चिक्कणतां याति सर्वमेकत्रमर्दयेत् । २८६
प्रमेहहर, र. यो. सा.

※ उत्सेधेच दशांगुलः खलु कला तुल्याङ्गुला यामवान्विस्तारणे दशांगुलो मुनिभिर्तैर्निम्नस्तथैवा ऽङ्गुलैः । पाल्याव्द्यंङगुल विस्तरश्च मसृणोऽतीवार्ध चन्द्रोपमो घर्षो द्वादशकाङ्गुलश्च तदयं खल्वोमतः सिद्धये ।।
अस्मिन्पंचपलः सूतो मर्दनीयो विशुद्धये ।
तत्तदौचित्य योगेन खल्वेष्वन्येषु योजयेत् ।। र. रु. अ.

२१ ८४१८५

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लांबी १२"×६" बत्याची उंची १२" वरची जाडी २" बुंध्याची जाडी ३"

कज्जली कल्प ह्या सदराखालीं कज्जली हिंगूळ आणि सिंदूर युक्त औषधी योग येतात.

कज्जली:—पारा गंधकाचे मिश्रण काजळासारखें काळें व घूसर होतें. म्हणून त्यास कज्जली म्हणतात. कज्जलीचे कस:—

स्पर्श:—श्लक्ष्ण, रंग–काळा, धूसर

चंद्रिका:—कज्जली कागदांत दाबून ती वडी उन्हांत धरल्यास त्यांत चांदण्याप्रमाणें चमक–चंद्रिका दिसतां कामा नये.

पाऱ्याची चमक कज्जली नखावर घासल्यानेंही प्रतीत होते. सुटा पारा नखाचे रेषेंत जाऊन बसतो. ती जागा पांढरी दिसते.

पारा गंधकाच्या रासायनिक मिश्रणाचे लाल रंगाचे तीन पदार्थ उपलब्ध आहेत १ हिंगूळ, गिरीसिंदुर ३ रससिंदूर. रसायन शास्त्र दृष्टया हे तीन्ही पदार्थ एकाच वर्गांत बसू शकतील. परंतु गुणधर्मतः ते परस्पराहून भिन्न आहेत; हें खालील श्लोकावरून स्पष्ट होईल.

१ ***हिंगूळ***–हिंगुलः सर्वदोषघ्नो दीपनोऽति रसायनः।
सर्वरोगहरो वृष्यो जारणायाति शस्यते॥ र. र. सा
हिंगुलं मधुरं तिक्तं चोष्णं वात कफापहम् ।
त्रिदोष द्वंद्व दोषोत्थं ज्वरं हरति सेवितः । नृपनिघंटु

२ ***गिरीसिंदूर***–उत्पत्ति–महागिरौ शिलान्तस्थो रक्तवर्ण च्युतो रसः ।
सूर्यातपेन संशुष्को गिरिसिंदूर मीरितम् ॥ र. प्र. सु. अ. ७

गुण–रसबंध करं भेदि त्रिदोष शमनं तथा ।
देहलोहकरं नेत्र्यं गिरिसिंदूर मीरितम् ॥ र. प्र. सु. अ. ७
त्रिदोष शमनो भेदी रसबंधनमग्निमम् ।
देह लोह करं नेत्र्यं गिरिसिंदूर मीरितम् ॥ र. र. स.

३ ***रससिंदूर***–क्षुद्दोध कारकः प्रायःसद्यः कामाग्निदीपनः
ज्वरादिकानयं दोषान् संयोगान्नाशयत्यपि ॥ आ. प्र

हिंगूळ व गिरिसिंदूर हे दोन्ही खनिजच. भूगर्भांत अत्यंत खोल जागीं पारा गंधकाचे मिश्रणापासून एक रस तयार होतो. तो द्रव वर यत येत खडास्वरुपांत थंड होतो. तो हिंगूळ; रसाचा कांहीं भाग त्याही पेक्षां वर येतो.आणि दगडाच्या छोटया छोटया कपाऱ्यांतून पातळथर रूपानें सांठतो. त्याला गिरि वा पत्रचा रससिंदूर म्हणतात. असें हिंगूळ व गिरिसिंदूरा बाबत रसायन शास्त्रीय उत्तर मिळतें. रससिंदूर हा पदार्थही खनिजच. पण तो नैसर्गिक नसून कृत्रिम आहे. कृति एक पण एक नैसर्गिक तर दुसरी मानुषी.

औषधाची घडण त्याचें कार्य व क्षेत्र ह्यांचा परस्पर संबंध असतो, ' हें लक्षांत घेतां कज्जली कल्पांतील, ज्वर अतिसारादि रोगहर योगांत हिंगुळाला स्थान देणें हितावह ठरतें. पण आजकाल खडचा हिंगूळ उपलब्ध नाहीं. मिळतो हिंगूळ तो कृत्रिम, किंबहुना तलस्थ रससिंदूरच, त्यामुळे मोठी पंचाईत झाली आहे. ती दूर व्हावी म्हणून खडचा हिंगुळाचा शोध लावला पाहिजे. किंवा खनिज हिंगूळाचे गुणांचा पदार्थ तरी निर्माण केला गेला पाहिजे.

द्रव्यांची निवड

कज्जली कल्पांत खनिज, उभ्दिज, प्राणिज असे तीन प्रकारचे पदार्थ असतात. पैकीं कांहीं नुसते साफसूफ करून घेण्यानें भागतें तर कांहीं शुद्ध करावे लागतात व कांहींचे मारणही करावें लागतें. शोधन मारणाचे सामान्य आणि विशेष असे दोन विधी असतात. विशेषांचा उपयोग विशिष्ट योगांत करीत असतः–

– शोधनविधी –

शोध्य	शोधक
हिंगूळ–	उडिदाचे पिठांत गुंडाळून धोत्रा बी तैलात तळलेला. (१२२ पंचबाण)
गंधक–	गाईचे तूप व दूध–१६ कनकसुंदर र. यो. सा.
हरताळ–	कोहळा रस, तैल व चुन्याची निवळी–१६ कनकसुंदर र. यो. सा.
मनशीळ–	जयंती रस–१६ कनकसुंदर र. यो. सा

---

१ धातुभिर्गंधकाद्यैश्च निर्द्रवैर्मर्दितोरसः ।
सुश्लक्ष्णः कज्जलाभोऽसौ, कज्जलीत्यभिधीयते ।
र. र. र. अ. ८।५

२ शुद्धं सूतं तथा गंधं खल्वे तावद्विमर्दयेत् ।
सूतं न दृश्यते यावत्किन्तु कज्जलवभ्दवेत् । र. रा. सु.

३ कज्जली रसगन्धोत्था सुश्लक्ष्णा कज्जलोपमा ।
तत्तद्योगेन संयुक्ता कज्जली बंध उच्यते ॥ र. र. स.

४ कज्जलीं यहांतक मर्दन करे कि सुखने पर धूपमेभी चमक मालूम न पडे । ६८१ मृत्युंजय र. यो, सा. भाषाटीका वै.पं. हरिप्रपन्न

५ नष्ट सूतं यदाचूर्णं भवेत्कज्जल संनिभम् । रसपर्पटी र. यो. सा.

६ यावत्कल्कं भवेन्नीलम् । १९५ त्रिनेत्र–र. यो. सां.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

माक्षिक— सैन्धव व महाळुंगरस—१६ कनकसुंदर र. यो. सा.

मोरचूद— मांजराची विष्ठा व टंकण—१६ कनकसुंदर

मंडूर— शतावरी रस, दह्याची निवळी, तूप ५४ शतावरी मंडूर, र. यो. सा.

बचनाग— गोमुत्र, १८० अमृत रसायन—र. यो. सा.

पारा— कोरफड १४७ तालकेश्वर—र. यो. सा.

" — हिंगूळांतून काढलेला १५८ जयमंगल र. यो. सा.

" — रस कापूरांतून काढलेला ११७ अतिसारांतक र. यो. सा.

योग निवडतांना व तदनंतर तदंतर्गत शोध्य शोधक पदार्थ व शोधन संस्कार ह्यांचा विचार करायलाच हवा. अपेक्षित योगाचे गुणधर्म वाढविण्याचे दृष्टीनें हा विचार हितावह ठरतो. हें प्राचीनांनीं मान्य केल्याचें वरील संदर्भ दर्शवितो. तो अनुभव जमेस धरून इतर योगांतही तें धोरण कसें अनुसरावें ह्याचा नमुना.

– शोधन –

योग	रोग	शोध्य	शोधक	कार्य शुद्धि	आधार
१ आनंदभैरव	वातदोष	गंधक	दूध व तूप	बल्य	र. प्र. सु.
२ एकांगवीर	वातरोग	,,	एरंडेल	वातशमन	र. ज. नि.
३ कनकसुंदर	आमदोष	,,	महाळुंग-रस	पाचन	र. चि.
४ गंधक-रसायन	कुष्ठरोग	,,	माका	रसायन	र. का. धे.
५ त्रिभुवन-कीर्ति	ज्वर	हिंगूळ	आलेंरस	दीपन	आ. प्र.
६ पीयूष-सागर	शुक्र-क्षीणता	,,	गाईचे दूध	बृंहण	र. त.
७ वसंत-कल्प	अबलत्व	,,	लिंबूरस	पाचन	यो. त.
८ ज्वरांकुश	ज्वर	बचनाग	गोमूत्र	आम-पाचन	क्र. यो. त.
९ लक्ष्मी-विलास	क्षय	,,	शेळीचे दूध	अस्थि-पोषण	र. त.
१० मृत्युं-जय	ज्वर	,,	त्रिफळा	आम-शोधन	र.सा. सं.
११ त्रैलोक्य-चिंतामणी	जरा-क्षय	,,	गाईचें दूध	रसायन	र. चं.

मारण

धातु	मारण	योग	आधार
१ अभ्रक	आंवळचानें	३२२ प्रमदानंद	र.यो.सा.
२ कांतलोह	अनग्निसिद्ध	३०३ कांतलोह रसायन	,,
३ ताम्र	गंधकानें	३६२ उदयभास्कर	,,
४ ,,	सूरणानें	अर्शः कुठार	शा. ध.
५ नाग	अफूनें	पुष्पधन्वा	वृद्धवैद्य
६ प्रवाळ, मौक्तिक	चंद्रपुटी	कामदुघा	,,
७ रससिंदूर	वंगेश्वरांतील	वसंतकुसुमाकर	,,
८ लोह	त्रिफल्यानें	आरोग्यवर्धिनी	,,
९ ,,	मनशीळानें	१८३ अमृतलोह	र.यो.सा.
१० ,,	रक्त-रोहिड्यानें	यत्कृत्प्लीहारी	वृद्धवैद्य
११ ,,	डाळिंबसालीनें	रक्तपित्त	,,
१२ शंख, शौक्तिक, कपर्दिक	अग्निसिद्ध	प्रवाळपंचामृत	र.यो.सा.

प्रक्रिय अंगें

१ संयोग, २ भावन, ३ पुटन, ४ मर्दन, ५ शोषण, ६ अवगुंठन, ७ धारण.

१ संयोगः—प्रथम प्रत्येक द्रव्य पृथगशः ९० नंबरचे चाळणींतूत सूक्ष्मतर करून घ्यावें. नंतर त्याचें रासायनिक प्रीति अगर वैर लक्षांत घेऊन द्रव्यांची मिश्रणें तयार करावींत. उदाः– पारा सुवर्णादि अच्छ धातु अगर गंधक ह्यांशिवाय इतर पदार्थांशीं मिसळत नाहीं. टंकण हा बचनागाचा प्रतिकारक आहे. मिश्रण क्रमाचीं उदाहरणें:—

१ अग्निकुमार— (पारा + गंधक) + (बचनाग + टंकण) + (इतर)

२ आनंदभैरव— (बचनाग + टंकण) + हिंगूळ + (इतर)

३ इच्छाभेदी— (पारा + गंधक) + (जेपाळ + मिरें) + (इतर)

४ कर्पूर रस— (हिंगूळ + अफू) + (इतर)

५ कामदुधा— (गेरु + इतर)

६ गर्भपाल— (हिंगूळ + नाग + वंग) + (इतर)

७ ज्वरांकुश— (पारा + गंधक) + (बचनाग + टंकण). + (जेपाळ + मिरें) + (इतर)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

८ सु. मा. वसंत- (हिंगूळ + सुवर्ण) + (इतर)
९ सूतशेखर— (पारा + सुवर्ण) + गंधक + (बचनाग + टंकण) + (इतर)
१० लक्ष्मीविलास- (सिंदूर + सुवर्ण) + (इतर)

अफू, गुग्गुळ, शिलाजतु सारखी डिंकयुक्त किंवा चिक्कण द्रव्ये प्रथम भावना द्रवांत विरवून मग त्यांत इतर पदार्थ मिसळावेत. तर केशर, कापूर, इ. सुगंधी द्रव्यें औषध तयार होत आलें म्हणजे मिसळावीत. अशा प्रकारचें संयोग अधिक श्रेयस्कर होतात.

भावन

हेतु:—औषधी संयोग दृढ व स्थिर व्हावा. औषधी द्रव्याचें वजन अगर आकारमान न वाढतां मूळ द्रव्याच्या कार्यकारी शक्तीचा उत्कर्ष व्हावा.

व्याख्या:--एका औषधींत अगर औषधी मिश्रणांत त्याच वा अन्य पदार्थांचे द्रव मर्दन, आतप वा अग्नि ह्यांचे सहाय्यानें जिरविणें.

भावनाद्रव प्रमाण:—शुष्क द्रव्यांत द्रव जिरवावयाचा असतो. त्याचा हेतु वर स्पष्ट केला आहे. तो साधण्यास मर्दन उत्तम जमावें लागतें. त्याकरितां द्रवाचें सहाय्यानें शुष्क द्रव्यानें ओलेपणा धारण केला किंवा तें चटणी अगर कल्कवत् झालें कीं द्रवाचें तें मान योग्य जाणावें. ×

*भावनाद्रव प्रकार:*भावना द्रवांत रस, हिम, फांट, कषाय इ. कल्पना संभवतात. ह्यांचा निष्कासन विधी मागें आल्याच आहे. पण किती मिश्रणांस सामान्यतः किती रस लागतो हें पहायचें झालें तर त्याचें ढोबळ प्रमाण असें आहे. औषधी मिश्रणाच्या वजना इतकें क्वाथ्य द्रव्य घ्यावें. त्यांत आठपट पाणी घालावें. काढा करावा व अष्टमांश शेष उरवावा. तो द्रव भावनेस योग्य मानाचा समजावा. म्हणजे सामान्यत: मिश्रणाचे वजना इतकाच द्रव पुरेसा होतो. +

आतप भावन विधी:—वरचेप्रमाणें रस घालून औषधी मिश्रण चिखलासारखें करून दिवसा उन्हांत व रात्रीं चांदण्यांत ठेवून सुकवावें. असें सात दिवस केलें म्हणजे एक भावना पुरी होते. भावनेची संख्या सांगितली नसेल तेथें ती तीन ते सात समजावी.*

भावना परिणाम:—भाव्य द्रव्याचे बल विशिष्ट मर्यादेपर्यंत वाढावें अशी अपेक्षा असते. पण तिची खू सर्वत्र सांगितलेली असतेच असें नाहीं. क्वचित् ठिकाणीं त उल्लेख सांपडतो. उदा. भावयेत्सर्व चूर्णं तदम्ल वर्गविशेषतः। यावत्तदम्लतां याति गुटिकाऽमृतरूपिणी ।
३३ शंखवटी. र. यो. सा.

भावनाक्रम:— पहिला पक्ष औषध शरीरांत सार पुढें पुढें सरकत सरकत असतें. त्यांतच त्यांचे जागोजाग रसांनीं वियोजन होत असतें. हें वियोजन भावनांच्या उ क्रमानें होत असतें. तेव्हां ग्रंथांत दिल्या क्रमानेंच भाव घ्याव्यात असें एक मत आहे.

दुसरा पक्ष ग्रंथांत दिलेल्या वनस्पतींच्या भाव यथा लाभ व यथा काल द्याव्यात. त्यांत विशिष्ट क्रमा अपेक्षा नाहीं. कारण चरक चिकित्सेच्या पहिल्या अध्यायाच तृतीय पादांत करप्रचीतीय रसायन तयार करतांना भाव द्रव्यसंग्रह सांगितला आहे. त्याचा क्रम कसा लावावा ह्य बाबतचें स्पष्टीकरण टीकाकारांनीं " ऋषयस्त्वेव जान योग संयोगजं फलम् " असें दिलें आहे.

संयुक्त कल्पाचे गुण समच्चित स्वरूपांत अनुभवाय असल्यानें त्यांतील औषधी द्रव्य, भावना द्रव्य ह्यां पृथगशः स्थान नाहीं. असें मत द्वितीय पक्षीं असल्यानें भाव द्रव्यांचा कांहीं विशिष्ट क्रम असावा असा आदेश ते नाहींत.

भावनेचा काल:—ह्यांत एक भावना किती काल सुकवावी, व ती किती नि केव्हां द्यावी ह्या दोन गोष्टी अंतर्भाव होतो. वनस्पती ओले सुकेपणीं निरनिराळ्या गुणां संभवते. अपेक्षित गुण कोणते, ते ज्या स्थितींत असतात स्थिती भावनेला योग्य समजावी.

उदा:–१ गुळवेल, शतावरी, कूष्मांड, अडुळसा ओलींच सांगितलीं आलीं आहेत.+
२ आलें–मलसारक–सुंठ–मलसंग्राहक.
३ शेवगा बीं वाळलेलेंच घ्यावें.

भावना द्रव्याची निवड--

ह्यांत त्या वर्गापैकीं कोणती वनस्पती, नियुक्त वनस्पती कोणतें अंग, कोठें योजावें ह्या गोष्टींचा समावेश हो प्रथमवर्ग विषयक विचार करूं. अग्निमुखरसाचे पाठ

×द्रवेण यावता द्रव्यमेकीं भूयार्द्रतांव्रजेत् ।
तावत्प्रमाणं निर्दिष्टंभिषभिर्भावना विधौ ॥

+भाव्य द्रव्य समं क्वाथ्यं क्वाथ्या दष्टगुणं जलम् ।
अष्टांश शेषितः क्वाथो भाव्यानां तेन भावना ॥ भै. र.

*दिवा दिवातपे शुष्कं रात्रौ रात्रौ निवासयेत् ।
शुष्कं चूर्णीकृतं द्रव्यं सप्ताहं भावना विधिः । भै. र.

+ गुडूची कुटजो वासा कूष्मांडंच शतावरी ।
अश्वगंधा सहचरी शतपुष्पा प्रसारणी ।
प्रयोक्तव्या सदैवार्द्रा । ....शार्ङ्गधर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

' मर्दयेदम्ल योगेन ' असें म्हटलें आहे. अशा वेळीं सर्व अम्ल-वर्ग विचारांत घ्यावा लागतो. हा वर्ग निरनिराळ्या ग्रंथकारांनीं निरनिराळ्या तऱ्हेनें वर्णिला आहे उदा:-

अम्लवर्ग:-अम्लवेतस, जंबीर लुंगाम्ल चणकाम्लका: ।
नागरंगं तितिडीच चिंचा पत्रंच निम्बुकम् ॥
चांगेरी दाडिमं चैव करमर्दस्तथैवच । भा. भै. र.

अम्लपंचक:—कोल दाडिम वृक्षाम्ल चुक्रिका
चाम्लवेतस: । नि. शि.

फलाम्लपंचक-जंबीर नारंग सहाम्लवेतसै स तित्तिडी-
कैश्च सबीज पूरकै: : नि. शि.

अम्लवर्ग-चांगेरी लकुचाम्ल वेतस युतं जंबीरकं
पूरकम् ।
नारंगं फलशाडवो पिचकपित्थाम्लंच बीजाम्लकम् ॥
अंबष्ठा सहितं द्विरेफसहितं पंचाम्लकं तद्वयम् ॥
विज्ञेयं करमर्द निंबुक युतं स्यादम्ल वर्गाव्हयम् । नि. शि.

हें सर्व मिळून आंबट पदार्थ चौदा भरतात. त्यांत आंवळा धरला किं तें पंधरा पदार्थ येणें प्रमाणें:—

१ अम्लवेतस २ अमसूल ३ आंवळा ४ ईडलिंबू
५ करवंद ६ कागदीलिंबू ७ चणकाम्ल ८ चुका
९ चिंचाफळ १० चिंचापान ११ डाळिंब १२ नारंग
१३ बोर १४ महाळुंग १५ लकुच

अपोलोज आयुर्वेदीक इंजेक्शन्स
अद्यावत प्रयोगसिद्ध कल्प

आद्य आयुर्वेदीय संस्था म्हणूनच ' प्राइड ऑफ इंडिया ' हें नामाभिमान या संस्थेला योग्य ठरते. आमची इंजेक्शन्स या देशांत व परदेशांत विकली जातात आणि आंग्ल वैद्य व आयुर्वेदीयांमध्यें तीं सारखीच लोकप्रिय झालीं आहेत. आमच्या ट्रेनिंग इन्स्टिटयूटमध्यें वैद्यांना इंजेक्शनचें शिक्षण दिले जाते. विशेष माहितीसाठीं लिहा व एजन्सी नियम आणि मोफत कॅटलाग मिळवा.

दि अपोलो फार्मास्युटिकल वर्क्स लि.
प्रतापगंज बडोदा.

पदार्थ	गोड	आंबट	खारट	कडू	तिखट	तुरट	विशेष	वीर्य
अमसूल	+	+	−	−	+	+	−	उष्ण
अम्लवेतस	०	++	−	+	+	+	मांसवेधी	,,
आंवळा	+	+	−	+	+	+	०	शीत
ईडलिंबू	०	+	−	+	−	+	दंतशठ	उष्ण
कंवठ	०	+	−	−	−	−	—	,,
करवंद	०	+	−	+	−	−	—	,,
कागदी-लिंबू	०	+	−	−	+	−	अति-रुच्य	,,
चण-काम्ल	०	++	+	−	−	−	दंतशठ	,,
चींच (कच्ची)	०	++	−	−	−	−	...	,,
चींच (पक्की)	+	+	−	−	−	−	बस्तिशोधक	उष्ण
चुका	−	++	−	−	−	−	...	,,
द्राक्ष (कच्ची)	−	+	−	−	−	−	...	,,
डाळिंब	−	+	−	−	−	−	...	,,
महाळुंग	−	+	−	−	−	−	जिव्हाहृ-च्छोदन	,,

आंबट पदार्थांमधील अम्लें
(इंडियन मटेरिआ मेडिका- डॉ. नाडकर्णी)

अम्ल-वेतस	टॅनिक	गॅलिक	ऑक्झॅलिक	क्रायसोफॅनिक
आंवळा	,,	,,	...	...
चणकाम्ल (खाटी)	ॲसेटिक	मॅलिक	,,	...
चींच	,,	,,	टार्टरिक	सायट्रिक
चुका	टॅनिक	रुमॅसिन	लॅपॅथिन + क्रायसोफॅनिक सम	
द्राक्ष	,,	,,	सायट्रिक	...
लिंबू महाळूंग	फॉस्फे-रिक	मॅलिक	सायट्रिक	...
कंवठ	सायट्रिक	...	...	...

अम्ल पदार्थांची योग्य निवड करतां यावी म्हणून प्राचीन अर्वाचीन दोन्ही दृष्टीकोण दर्शक तक्ते वर दाखविले आहेत. सर्वांत अम्लवेतस अगदीं निराळा नि तीव्र पदार्थ दिसतो. चींच व चणकाम्ल ह्या दोहोंतच ॲसेटिक ॲसिड आहे नि हेच दोन पदार्थ विषूचिकेंत जुलाब नि पेटके थांबविण्यास उत्कृष्ट उपयोगी पडतात, चिंचेमधला बस्ति-

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शोधक धर्मही विशेष लक्षांत घेण्यासारखा आहे. चणकाम्ल-कानें दांत शिवशिवतात. तेव्हां तो घेतांना दांतांना स्पर्श होऊं न देण्याची दक्षता घ्यावी. चणकाम्लकाचे पर्याय शब्द, आंब, व खाटी.

भावना द्रव्यांत अम्लवर्गाप्रमाणें मधुरादिवर्ग उल्ले-खितात. तेथेंही अशाच तऱ्हेनें पदार्थाची मांडणी करून व प्रत्येक पदार्थासंबंधानें विचार करून मग त्याची निवड करावी.

द्रव्याची निवड झाली कीं त्याच्या उपयुक्त अंगावय-वांचा विचार करावा. द्रव्यास अनेक अंगें असतात. त्यांत गुणांचे वैशिष्ट्यही असूं शकतें. उदा० कडू पडवळ-पत्रं पित्तहरं शीतं तस्य वल्लिकफापहा.

मूलं विरेचनं प्रोक्तं फलं दोषत्रयापहम् ॥ म. पा. निघंटु

हा गुणदायक पदार्थ त्या त्या अंगांत विशिष्टकालीं असतो. तेव्हां उपांगाची निवड होतांच त्याचा *आहरण-कालहि नियुक्त करावा. आपलेकडे विविध अंगांचा विविध ठिकाणीं उपयोग सांगण्यांत येतो उदा०—

धोत्रापानः – धत्तूर पत्र स्वरसेन विभावयेत् ।
३२१२ दुग्धवटी भा. भै. र.

धोत्रामूळः—उन्मत्तमूलांबु वारिणा भावयेत् ।
५६६२ मृत्युंजय—

धोत्रा बीं तैलः—कृष्ण धत्तूर तैल निबंधैः
४४२ भूत भैरव- र. यो. सा.

धोत्रा बीं तैलः—धत्तूर तैलेन विमर्द्यसम्यक् ।
विलास वैद्यजीवन

धोत्रा बींः—धूर्तबीजं त्रिभिः समम् ।
२१६५ ज्वरांकुश भा. भै. र.

धोत्रापंचांगः—संक्षुद्य कनकं शाखा मूल पत्र फलैःसह
कनकासव भै. र.

येथें धोत्र्याचें अंगावयवांचा निर्देश आहे. पण उन्मत्त-रस, कफकुठार, पंचवक्त्र, प्रमदानंद, पुष्पधन्वा, वातविध्वंस, विश्वतापहरण इ. च्या भावना द्रव्यांत धोत्र्याचा उल्लेख सामान्यानें आला आहे. हचा कामीं आधुनिक रसायन शास्त्राची कांहीं मदत होते कां पहावी. उदा. धोत्रापान-धोत्र्याचे पानांत खुरासनी अजवान मध्यें असलेलें हायोसाय-मिन नामक द्रव्य पांच टक्के व सूचींत असलेलें अॅट्रो नामक द्रव्य अत्यल्प असतें. बियांत हायोसायमिन व मोठ्या प्रमाणांत व अॅट्रोपिन अल्पप्रमाणांत असतें. (औ. डॉ. वा. ग. देसाई.)

धोत्र्याचें पानांत धत्तूरिन नांवाचे विषसत्व, चिकट पदार्थ व अल्ब्युमिन असतें. (इं. मे. डॉ. नाडकर्णी.)

धोत्र्याचें पानांतील कार्यकारी द्रव्य, धोत्र्यास येतात तेव्हां तेथें अधिकांत अधिक असतें. पुढें तें क होत जातें. धोत्र्यास फुलें आलीं कि त्याचीं पानें औषधी यो जाणावींत. पानें आणण्याच्या दिवसाचे काला संबंधा विचार करतात. उदा. डिजिटेलिसची पानें सायंकाळीं खु वींत. कारण तीं सकाळच्या खुडचापेक्षां जोरदार असत (डेन्स्टन)

धोत्र्याचें बियांत धत्तुरिन, राळतैल, चिकट प मॅलिक अॅसिड प्रोटिडस्, स्कोपोलामाइन् असतें. सुकलेलें पानांपेक्षां अधिक कैफी असतें.

(इं. म. मे.) डॉ. नाडकर्

वरील माहिती लक्षांत घेतां इतर पदार्थांबा असाच दृष्टिकोन ठेवून भावना द्रव्यांच्या अंगावयवांचे विशि कल्पाचे उपयोग करावेत. उदा.

एकांगवीराच्या भावनाः—

१ निर्गुंडी (पान), आलें (कंद), आंब (ताजें फळ), कांडवेल (ताजी), शेवगा (ताजी) यांचा रस.

२ सुंठ (कंद), मिरें (फळ), उपलेट (मूळ यांचा फांट

३ हिरडा (फोल), पिंपळी (फळ) कुचला (बी अक्कलकाढा (मूळ)

वेहेडा- (फोल) रुई (मूळ) चित्रक (मूळ आवळकंठी (फोल)--- यांचा काढा.

ह्याप्रमाणें अंग प्रत्यंगांच्या कल्पांचा विचार करा व द्रव, अगदीं निवळ स्वरुपांत, भावनेकरितां योजा म्हणजे औषध गैरवाजवी वाढत नाहीं. द्रवांतील उप भाग अधिक प्रमाणांत लाभतात व औषधही अधिक कार्य बनतें.

पुटनः—पुटन विधीत विशेषत्वानें अग्नितत्वा अधिक संबंध येतो. अग्निसंयोगानें कांहीं औषधींचे क कारित्व वाढतें, असें कांहीं आचार्यांचें मत आहे. ते म्हणजे अग्निसंस्कार मानतात. रससंख्यान् पुटान्दद्या वीर्यंवृद्धये । (२२४ अर्कानलेश्वर) पण कांहीं भावनेऐवजी

---

*आहरण कालः—तत्र यानि काल जातान्यागत संपूर्ण प्रमाण रसवीर्यं गंधानि कालातपाग्नि सलिल पवन जंतुभिरनुपहत गंधवर्ण रस स्पर्श प्रभावाणि गृण्हीयात् ।
१२ च. सं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

संज्ञा वापरतात. व सर्वत्र पुट शब्दोऽत्र भावनार्थे विधीयते। असें सांगतात. मृत्युंजय भा. भैं. र. ६७४ र. का. धे. भावनाद्रव मर्दनानें जिरवला किं त्याला भावना म्हणतात. पण तोच द्रव जिरविण्यास चंद्र, सूर्य, अग्नि ह्यांचें सहाय्य घेतलें किं त्याच विधीला पुट ही संज्ञा देतात. तेव्हां जो लाभ पुटानें होतो तोच भावनेनेंही होतो असें नाहीं. हेतु सामान्यत्व असलें तरी साधनें पृथक् असल्यानें त्या मानानें गुणधर्मात बदल हा न्हायचाच. तेव्हां जो बदल अपेक्षित असेल तो लाभण्याचा मार्ग पसंत करणें इष्ट होय. उदा. कज्जली कल्पांतील गांधारी वटी, चतुर्मुख, लक्ष्मीविलास सुवर्णभूपति, इ. औषधांना अग्निसंस्कार (पुट) सांगितलेला आहे.

शोषण:—शोषण विधीस अग्नीचे सहाय्य अपेक्षित असतें. ह्यांत काल हाही एक महत्वाचा घटक समजावा लागतो. भावना द्रव अगर सिद्ध औषध ज्या गतीनें सुकवायाचें असेल तसें अग्नीचें उष्णतामान राखावें लागतें. खलांतील मर्दन कार्य संपल्यावर चंद्र, सूर्य आणि अग्नि ह्यांचे सहाय्य औषध सुकविण्यास घेतात.

औषध सुकतांना सडूं अगर उबूं नये किंवा तें फार गरमही होऊं नये अशी अपेक्षा असेल तेथें नेहमीं मंदोष्मा पसंत करतात. तो सूर्याकडून मिळतो. उष्णताधिक्यानें लिंबूरस आंबट होतो. गंधद्रव्यें उडून जातात, क्वचित प्रसंगी हिंगूळ अगर कज्जलींतला पाराही उडतो. त्रिभुवन कीर्ति, आनंद-भैरव, कनकसुंदर प्रमदानंद इ. हिंगूळयुक्त लालरंगाचीं औषधें कडक उन्हांत फार वेळ ठेवल्यानें रंगानें विटतात तसेंच इच्छा भेदीमधील जेपाळांतलें तेल, कपूरादिवटीतला कापूर, नागरसांतील कस्तूरी हवेंत विरतात. तेव्हां हे दोष टळतील अशा बेतानें औषध सुकविण्याचें उष्णतामान आतप अगर छाया व काल ठरवावेत. उदा०

आयुर्वेदाच्या क्षेत्रांत अद्वितीय
अशा शक्तिशाली
अरविंद आयुर्वेदिक इन्जेक्शन्स

चा उपयोग करून रोग्यांना शीघ्र निरोगी करा व यश मिळवा, शक्ति व शुद्धता याबद्दल पूर्ण गॅरंटी दिली जाते. सूचिपत्र मागवा—

सचित्र आयुर्वेदीक इंजेक्शन चिकित्सा—

मूल्य ३ रु. पोस्ट खर्च १० आ.

व्यवस्थापक:— अरविंद केमिकल वर्क्स छिंदवाडा (सी. पी.)

आतप

विभावयेत् खरातपे। ३१६ ज्वरेभसिंह ॥
वटी घर्मेण शोषयेत्। ७० पंचामृत ॥
वटी चंडांशु शोषिता। ९७ रसराजेंद्र ॥
विशोष्य सूर्य किरणैः। ३०६ लोहामृत ॥

छाया

छाया शुष्कम् १०६ अंजन भैरव
शोषयेतातपवर्जितम्। १६ पंचलोहभूपत्ति
स्निग्धच्छायेनिवेश्य। ३६७ खेचरी गुटी
छायायां शोषयेद्बुधः १५७ राजलींला र. सो. सा.
भावयेत् सप्त वारांस्तत् घर्ममध्ये पुनः पुनः।
१०१ अजीर्णारि

सिद्धिप्रमाण:—भावनाद्रवांतील सारभाग औषधी योगांत राहतो. त्यामुळें मूळ औषध कांहीं अंशानें वाढतें. भावनांची संख्या अधिक तर ही वाढही अधिक. सामान्यतः ही जी वाढ होते ती मधून औषधावरील मर्दनाचा खर्च भागतो म्हणून ***औषधांवर घेतलेली मेहनत वाया जात नाहीं.*** असें म्हटलें जात असावें. प्रमाणाबरोबर गुणसंपत् व बलही वाढतें; त्यांचें मोल होऊच शकत नाहीं. सिद्धीप्रमाण ठरविण्यांत आणखीं एक फायदा होतो. तो असा कीं प्रत्येक औषधांत मूळ द्रव्य किती आहे तें कळतें. प्रमाण वाढींलाही मर्यादा असतें. उदा० अग्निकुमार, इच्छाभेदी, आनंदभैरव, कनकसुंदर अशा औषधांत म्हणण्या सारखीं वाढ होत नाहीं पण कांहींत होते. उदा०—

औषध	मूळप्रमाण	वाढवा	सिद्धिप्रमाण
एकांगवीर	३३	१५	४८
गंधकरसायन	६३	३७	१००
म. वातविध्वंस	१६	१२	२८
वसंतकुसुमाकर	३२	१५	४७
सि. ल. विलास	१३२	४८	१८०
सु. मा. वसंत	१८	१०	२८
सूतशेखर	१७	३	२०

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अवगुंठन:—तयार झालेल्या औषधाचे गोळीवर आवरण देणें, हृचाचें नांव अवगुंठन.

हेतु:—(१) शब्द, स्पर्श, रूप, रस आणि गंध हृयांचे ज्ञान किंवा त्यांचा संसर्ग बाधक ठरूं नये; (२) कापूर, कस्तुरी, जेपाल तैल इ. उयशील द्रव्यें उडून जाऊं नयेत; (३) वीर्य अक्षय्य रहावें. हे तीन प्रमुख हेतु होत. उदा.

विधीः—

१ अनेन विधिना खादेन्मुखे शोथं न विन्दति ।
गोधूम चूर्ण सन्नीय विदध्यात्सूक्ष्म कूपिकाम् ॥
तन्मध्ये निक्षिपेत्सूतं चतुर्गुंजामितं भिषग् ।
ततस्तु गुटिकां कुर्याद्यथा न स्याद्रसो बहिः ॥
सूक्ष्म चूर्ण लवंगस्य तां वटीं अवधूलयेत् ।
दन्तस्पर्शो यथा नस्यात्तथा तामम्भसागिलेत् ॥
७३ कर्पूररस र. यो. सा भा. प्र.

२ दघ्नाक वलितं गिलेत् । ४२३ उपदंश कुठार र. यो. सा. नू. क.

३ गुटिका सक्तु मध्यगा । ६० शम्बूकरस र. यो. सा. टो.

४ दंतस्पर्श विनाग्राहचं औषधं पथ्यशीलिना । ६४६ व्रणांतक र. यो. सा.

५ शाणैकं सेवयेद्यस्तु दंतस्पर्श विवर्जितः । १६ शंखद्राव र. यो. सा.

६ ततःसूतं प्रयुंजीत तवराजेन संयुतः । ४९२ मदन कामदेव र. यो. सा. रसालं.

वर गहुं, सातू, तवकील हृयांचा उपयोग केला आहे त्याप्रमाणें आधुनिक पद्धतीनें सेल्युलोज व जिलेटीनचा उपयोग करतां येण्यासारखा आहे. पिठापेक्षां हे दोन पदार्थ अधिक दिखाऊ व टिकाऊही.

– धारण –

व्याख्या–औषध ठेवण्याची व्यवस्था.

हेतुः– १) औषधास हवा लागून वातावरणांतील बद लांची बाधा त्यास होऊं नये, २) रासायनिक प्रीति व वैर साधक व्हावींत. ३) औषधी योगांतील उयशील द्रव्य उ जाऊं नये. ४) स्नेह स्थिर रहावेत. असे अनेक हेतु धार योजनेंत संभवतात. पात्र प्रकरणीं सर्वच धारकांचा यथास विचार केलेला आहेच. येथें फक्त नमुनें देतो.

१ वायूस्पर्शो यथा नस्यात्तथा ***कूप्यां*** निवेश्ययेत् ।
४६६ सूचिकाभरण र. यो. स

२ ***लोहपा***त्रे सुगुप्तं विदध्यात् । २५१ त्रिवृताय स्कृति र. यो.

३ क्षिपेन्***नाग करण्डके*** । प्रमेह मर्दन रस र यो.

४ ***दन्तभांडे*** निवेश्य । ९५ मदनकामदेव र. यो.

५ ***दन्त*** भांडे ऽथवा ***शार्ङ्गे काष्टे नैव कदाचन*** ।
ज्वरांकुश शाङ्ग

६ स्थापये***त्स्निग्ध भांडेतु*** कर्पूराद्यैः सुधूपिते ।
३९ कपिकच्छूपाक र. यो.

काल

हृचामध्यें औषध केव्हां करावयास घ्यावें तें के पुरें करावें, नि तें किती वेळ खलावें इतक्यांचा समा होतो. सामान्यतः साखर, डिंक, गुग्गुळ, लवण, क्ष क्षीरयुक्त औषधें पावसांत घालूं नयेत. किंबहुना तत्पू करून योग्यस्थानीं सुरक्षित ठेवावींत. सामान्यतः प्र भावना किमानपक्षीं ३ ते ७ दिवस चालू ठेवावी. खल्वदा उत्तम चिकणाई येईपर्यंत खल चालू ठेवावा. (यावच्चिक यातिं। १८६ प्रमेहहर किंवा यावत्त दम्लतां याति । शंखवर्द

पारदयुक्त औषधें अक्षय्य टिकाऊ तर खरींच त्यांतली लक्ष्मीविलास, सु. मा. वसंत, वसंत कुसुमा बृहत् सुवर्ण मालिनी वसंत अशीं रसायन औषधें वि पद्धतीनें वर्षानुवर्षे ठेवल्यास त्यामधील दोष कमी होतात. गुण वाढतात असें मानलें जातें.



रामतीर्थ ब्राह्मी तेल

(स्पेशल नं. १) (मेडिकेटेड) डोक्याचे ज्ञान व क्रियातंतु बलवान करते केस काळे आणि मजबूत होतात. टक्कल पडलेल्या जागीं पुन्हां केस येतात. खवड़े उवा, लिखी यांचा नाश होतो. स्मरणशक्ति वाढते. डोळ्यांत घातल्यानें दृष्टी सुधारते. कानांत टाकल्यानें कानाचे रोग नाहींसे होतात. गाढ झोप लागते.

सर्वऋतूंत सर्वांना उपयोगी. सर्वत्र मिळतें. मोठी बाटली किं. ३–८–०, लहान बाटली किं. रु. २.

श्री रामतीर्थ योगाश्रम, ८ उमेश धाम, २ रा विन्सेंट स्क्वेअर, दादर जी. आय्. पी. रेल्वे स्टेशन जवळ, मुंबई १४.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

औषधी गुणधर्मशास्त्र

चंद्रप्रभा गुटी

ले. वै.:--नृसिंहाचार्य बागेवाडीकर

ग्रंथोक्त पाठ व गुणधर्म

पाठः--', चंद्रप्रभा वचा भूस्ता मूनिंब सुरदारवः
(भूनिंबामृतदारुकम्)
" हरिद्रातिविषा दार्वी पिप्पलीमूल चित्रकम् "
" त्रिवृद्दंतीं पत्रकं च त्वगेला वंशलोचना "
" प्रत्येकं कर्षमात्राणि कुर्यादेतानि बुद्धिमान् "
" धान्यकं त्रिफला चव्यं विडिंगं गजप्पली "
" सुवर्णमाक्षिकं व्योषं न्दौ क्षारौ लवणत्रयम् "
" अेतानि शाणमात्राणि संगृण्हीयात् पृथक् पृथक् "
" न्दिकर्षं हतलोहं स्याच्चतुः कर्षा सिता भवेत् "
" शिलाजत्वष्टकर्षस्यादष्टौ कर्षाश्चगुग्गुलोः "
" विधिना योजितैरेतं कर्तव्या गुटिका शुभा "
" चंद्रप्रभेति विख्याता सर्वरोगप्रणाशिनी " भै. र. "

कापूर वेखंड, नागरमोथा, काडेचिराईत, गुळवेल, देवदार, हळद, अतिविष, दारूहळद, पिंपळमूळ, चित्रक, निशोत्तर, दांतीमूळ, तमालपत्र, दालचिनी, वेलदोडे, एक एक तोळा, धणे, हिरडा, बेहडा, आवळकाठी, चवक, वावडिंग, गजपिंपळी, सुवर्णमाक्षिक, सुंठ, मिरे, पिंपळी, जवसार, सज्जीखार, सैंधव, पादेलोण, बिडलोण, हीं प्रत्येकीं तीन मासे, लोहभस्म दोन तोळे, खडीसाखर चार तोळे, शुद्धशिलाजतु आठ तोळे, व शुद्धगुग्गुळ, आठ तोळे, ह्या सर्व द्रव्यांची बेरीज बेचाळीस तोळे होते.

टीप—कापूर किंवा कचोरा असें कै. गंगाधरशास्त्री जोशी यांनीं आपल्या गुणधर्म शास्त्र या पुस्तकात पान १३ भाग ३ रा यांत दिलें आहे. या कल्पांत कापूर घेणें योग्य आहे. कारण तेच प्रधान द्रव्य आहे.

चंद्रप्रभा हें नांव कां दिलें ?

'प्राचीन परंपरा अशी आहे कीं, कोणत्याही योगांत प्रधान असलेल्या द्रव्याचे नांव त्या योगास देत असत. हें खालील सूत्रावरून दिसून येते.
" यद्वि येन प्रधानेन द्रव्यं समुपसृज्यते "
" तत्संज्ञकः स संयोगो भवतीति विनिश्चयम् "
(चरक, कल्प. अ. १२)

या कल्पांत कापूर हें प्रधान द्रव्य असल्यामुळे या कल्पांत कापराचे जे पर्याय शब्द आहेत त्यांतील चंद्रप्रभा हें नांव दिलें आहे.

या कल्पांतील द्रव्यांचे विश्लेषण

आयुर्वेदाचार्यांनीं द्रव्यांचे वर्गीकरण रसावरून पाडलेलें आहे. ते सहा प्रकारचे आहे. १ स्वादु २ अम्ल ३ लवण ४ कटु ५ तिक्त ६ कषाय.

या वर्गाप्रमाणें या कल्पांत असलेल्या द्रव्यांचे प्रमाण खालील प्रमाणें आहे.

शेकडा	रस	तोळे मासे
६०·२	कटु	२५–३
२५	तिक्त	१०–६
१३	मधुर	५–६
१·२	कषाय	६
·६	अम्ल	३
		४२ तोळे

या रसात्मक विश्लेषणानंतर आपण सेंद्रिय निरिंद्रिय विश्लेषण पाहूं.

सेंद्रिय द्रव्यें—कापूर, वेखंड, नागरमोथा, काडेचिराइत, देवदार, हळद अतिविष, दारुहळद, पिंपळमूळ, चित्रक, निशोत्तर, दंती, तमालपत्र, ' दालचिनी, वेलदोडे, वंशलोचन, १–१ तोळा. धणे, त्रिफळा, चवक, वावडिंग, गजपिंपळी, त्रिकटू, जवखार, सज्जीखार ३–३ मासे. खडीसाखर, ४ तो. गुग्गुल ८ तो. हीं द्रव्यें तोळे. ३१.

निरिंद्रिय द्रव्यें—सु. माक्षिक, ३ मासे, लोह २ तोळे. शिलाजित ८ तो. सैन्धव ३ मासे. पादेलोण ३ मासे, बिडलोण, ३ मासे हीं द्रव्यें ११ तोळे.

आयुर्वेदीय बऱ्याच कल्पांत सेंद्रिय आणि निरिंद्रिय द्रव्यांचे संयोग किंवा समवाय केलेले आहेत. ते कां ? असा प्रश्न नेहमी विचारला जातो. म्हणून या संबंधी थोडेसें स्पष्टीकरण करणें आवश्यक आहे.

या निरिंद्रिय द्रव्यांत कांहीं योगवाहि द्रव्यें आहेत. वरील द्रव्यांत सु. माक्षिक आणि शिलाजित हीं दोन द्रव्यें योगवाहि असल्याचा आधार आयुर्वेदांत सांपडतो. बाकीचीं निरिंद्रिय द्रव्यें योगवाहि आहेत कीं नाहींत ? तर तीहि योगवाहि कार्य करतात असें वैशेषिक शास्त्राचें मत आहे. हें पुढील विचारावरून दिसून येईल.

' अुपष्टंभको ऽ पि पार्थिवभागः सदृशरूपअेवानुवर्तते '. पार्थिव द्रव्यें हीं सदृश कार्य करणारीं आहेत. म्हणजे सेंद्रिय

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

द्रव्याप्रमाणें कार्य करतात. याचप्रमाणें योगवाहि द्रव्यांचेहि कार्य होते. हें पुढील व्याख्येवरून कळण्यासारखें आहे.

" यद्द्रव्यं द्रव्यांतरेण तुल्यगुणेनाऽपि युक्तं सत्तद्गुणानुवर्तते स्वंच कार्यं तद्विरूद्धं किंचित्करोति, तद्योगवाहि द्रव्यम् ॥ भृत्यवत् ॥

जें द्रव्य विरुद्ध गुणात्मक द्रव्यांशीं मिश्रण केलें असतां त्या द्रव्याच्या गुणाप्रमाणें कार्य करते व आपले स्वतःचें कार्य दुसऱ्या द्रव्याला अविरोधि असलेले करते, ते द्रव्य योगवाहि. सेवक ज्याप्रमाणें आपल्या मालकाच्या कामांत मदत करतो त्याप्रमाणे हे योगवाहि द्रव्य कार्य करीत असतें.

या विवेचनावरून ह्या दोन द्रव्यांचा संयोग कां केला हें समजण्यासारखे आहे. सेंद्रिय द्रव्यें हीं प्रधान आणि निरिंद्रियद्रव्यें हीं अप्रधान आहेत. प्रधान द्रव्यें हीं शरिरांत प्रामुख्यानें कार्य करणारी आहेत, या द्रव्यांतही विशिष्ट कार्य करणारी प्रमुख द्रव्यें असतात. या कल्पांत कापूर हें प्रमुख द्रव्य आहे. या कल्पाचे गुणधर्म या प्रधान द्रव्यावर अवलंबून आहेत. म्हणून याच्या गुणधर्मांचा विचार करू.

" कर्पूरो मधुरस्तिक्तः शीतलः सुरभिर्लघुः "
" नेत्र्यलेखनकृत्वृष्यः कटुः प्रीतिकरोमृदुः "
" मदकारीच संप्रोक्तः कफदाहतृषापहः "
" रक्तपित्तंकण्ठरोगं नेत्ररोगं विषं तथा "
" पित्तंचमुखवैरस्यं दौर्गंध्यमुदरंतथा "
" मूत्रकृछ्रं प्रमेहंच मलगंधंच नाशयेत् " (नि. र.)

रसः—मधूर, तिक्त, कटु.
गुणः—शीत, लघु. मृदु.
वीर्यः—शीत.
विपाकः—कटु.

कर्मः—पित्त, कफ, नाशक, मुत्रकृछ्र, प्रमेह, आक्षेपक नाशक, निद्राप्रद, वेदनाहर, दुर्गंधनाशक, वृष्य, लेखन, मदकर, दाह तृषा नाशक रक्तपित्त, कंठरोग, नेत्ररोग, विष, मुखवैरस्य, दौर्गंध्य, उदररोग, मलगंधनाशक.

यानंतर आपण चंद्रप्रभेचे गुणधर्म कोणते लिहिलें आहेत ते पाहू.

" चंद्रप्रभेति विख्याता सर्वरोगप्रणाशिनी "
" निहंति विंशतिर्मेहान् कृच्छ्मष्टविधं तथा "
" चतस्रश्चाश्मरीस्तव्दत् मूत्राघातांस्त्रयोदश "
" अण्डवृद्धिं पाण्डुरोगं कामलां च हलीमकम् "
" दन्तरोगं नैत्ररोगं स्त्रीणामार्तवजां रुजम् "
" पुंसां शुक्रगतांदोषान्मदाग्निमरुचिं तथा "
" कासं श्वासं तथा कुष्ठमग्निमान्द्यमरोचकम् "
" वातपित्तकफव्याधीन् बल्या वृष्या रसायनी "
" समाराध्य शिवं तस्मात् प्रयत्नाद्गुटिकामिमाम् "
" प्राप्तवांश्चंद्रमा यस्मात् तस्माच्चंद्रप्रभा स्मृता "
भै. र.

कापूर आणि चंद्रप्रभा यांच्या कार्यातील साधर्म्य वैधर्म्य खालील प्रमाणें आहे.

साधर्म्य	वैधर्म्य
प्रमेह, मूत्रकृछ्र, उदररोग, पित्त, कफ नाशक, वृष्य, वेदनाहर, नेत्ररोग नाशक.	अश्मरी, मूत्राघात, अण्[डवृद्धि], पांडुरोग, कामल[ा], हलीमक नाशक, का[स], श्वास, कुष्ठ, अरु[चि], वात, व्याधि नाश[क], बल्य आणि रसायन कार्य

वरील कार्यांत जो भेद दिसून येतो त्याचे कारण अ[से] आहे कीं, या कल्पाचीं कारण द्रव्यें जीं आहेत त्यांचे कांह[ी] कार्य दिसून येतें. उदा. शिलाजित आणि गुग्गुळ यांचें रसाय[न] कार्य. किंवा दुसरें उदा. लोह आणि सु. माक्षिक यां[चें] पाण्डुरोग नाशक कार्य. याचप्रमाणें अश्मरीनाशक, मूत्राघात अण्डवृद्धि नाशक कार्यें शिलाजितामुळें होऊ शकतात.

कोणत्याहि कल्पाच्या गुणधर्मांचा विचार करीत अस[तां] पुढील सूत्राचा अवश्य विचार करावा लागतो.

" इति द्रव्यक्रियायोगमानाद्यैःसर्वमादिशेत् "

द्रव्य, क्रिया योग, मान (प्रमाण) यांचा विचा[र] या कल्पाचे गुणधर्म पाहात असतां केला आहे.

१ द्रव्यः— सेंद्रिय आणि निरींद्रिय द्रव्यांचा समन्[वय] षड् रसांच्या वर्गीकरणांत केला आहे. सृष्टींत उत्प[न्न] झालेले कोणतेहि द्रव्य षट् रसांना सोडून नाहीं. सुवर्ण व[र्ग] निरिंद्रिय द्रव्यांचे रस प्राचीन आचार्यांनीं सांगितलेले आहेत.

या कल्पांत कटु रसात्मक द्रव्यांचें प्रमाण ६०.२ आ[हे] म्हणून ह्या कल्पाचे गुणधर्म कटु रसात्मक द्रव्याप्रमाणें ह[े] असतील असें अनुमान काढणें चुकीचे होणार नाहीं. पण [हे] अनुमान या कल्पाचे बाबतींत योग्य नाहीं असें वर दिलेल[्या] चंद्रप्रभेच्या गुणधर्मावरून लक्षांत येण्यासारखें आहे. हा क[ल्प] कटु रस प्रधान असल्यामुळें उष्ण गुणात्मक कार्य घडावय[ास] पाहिजे. पण तें घडत असल्याचें अनुभवास येत नाहीं. [उ]लट शीत गुणात्मक कार्य घडतें असा अनुभव येतो. तर असें कां ?

कार्यद्रव्यांचे गुणधर्म केवळ कारण द्रव्यावर अवलं[बून] असत नाहींत. तर ते द्रव्यांच्या विशिष्ट रचना पद्धती[वर]

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अवलंबून असतात. या कल्पांत उष्ण गुणात्मक द्रव्यें ६६.८ आहेत. आणि शीत गुणात्मक द्रव्यें २०.८ आहेत. या आंकड्यावरून या कल्पाचें कार्य उष्ण गुणात्मक होते असें मानणें योग्य नाहीं. म्हणूनच आयुर्वेदाचार्यांनीं द्रव्य, गुण, आणि कर्म यांचा विचार रस, वीर्य, विपाक आणि प्रभाव यांच्या द्वारे सोडविला आहे.

चंद्रप्रभा कल्पातील गुणात्मक द्रव्यांचे प्रमाण

गुणात्मक द्रव्यें	शेकडा–प्रमाण
अुष्ण........................	६६·८
सर........................	३२·८
लघु........................	५२·९
रुक्ष........................	४४·०९
शीत........................	२०·८
पिच्छिल........................	१९·०४
विशद........................	१९·६
स्निग्ध........................	१८·५
तीक्ष्ण........................	११·३
सूक्ष्म........................	२०·२

या गुणांच्या प्रमाणावरून पाहतां या कल्पांत अुष्ण, लघु, रुक्ष, सर हे गुण अुत्कटत्वानें आहेत. ज्या द्रव्यांत ज्या गुणांचे प्रमाण अधिक आहे त्याप्रमाणें कार्य घडते असा एक सिद्धांत आहे. आणि जे अल्प आहेत त्यांचे कार्य घडत नाहीं. (भूयसाल्पमवजीयते) तर या कल्पांत अुष्ण गुणांचे प्राबल्य असल्यामुळें या कल्पाचे कार्य अुष्ण गुणाप्रमाणें व्हावयास पाहिजे पण असें दिसून येत नाहीं. ग्रंथांतही तसें वर्णन लिहिले नाहीं. हा कल्प अुलट शीत गुणात्मक कार्य करतो असें अनुभवास येते, ते कां ? हा विचार पुढें करीत आहे.

या कल्पांत कटुरसात्मक द्रव्यें ६६·८ आहेत. म्हणून अुष्ण गुणात्मक द्रव्यांचें प्रमाण तितकेंच ६६·८ आहे. पण हीं सर्व द्रव्यें अप्रधान आहेत. प्रधान द्रव्य कापूर हें आहे. याचे प्रमाण ·६ आहे. कापुराशिवाय शीत गुणात्मक द्रव्ये २०·२ आहेत. हीं सर्व मिळून २०·८ होतात. कारण द्रव्यांत असणारे गुण कार्यद्रव्यांत असावयास पाहिजेत व त्यांचे कार्यही घडावयास पाहिजे. हा सिद्धांत आहे खरा, पण कांहीं अपवादात्मक कांहीं द्रव्यें आहेत म्हणून आयुर्वेदाचार्यांनीं द्रव्य, गुण, कर्म यांचा समन्वय रस, वीर्य विपाक आणि प्रभाव यांच्या द्वारे केला आहे. स्वाभाविक द्रव्यांत सुद्धां वेगळेनिराळेपणा दिसून येतो. त्याचे कारण द्रव्यामध्यें असणारी शक्ति रस, वीर्य, विपाक, आणि प्रभाव यापैकीं कोणत्याहि अेके ठिकाणीं अुद्भूत असते म्हणून त्याद्वारे कार्य होते. या कल्पांत ही शक्ति शीत गुणांत अुद्भूत होत असल्यांमुळें बाकीच्या गुणांचे कार्य घडत नाहीं. या शक्तियुक्त गुणासच वीर्य या नांवांनीं संबोधिलें आहे. कल्पांतील द्रव्यांचे वर्गीकरण सेंद्रिय, निरिंद्रिय, यांचा अंतर्भाव रसात्मक वर्गीकरणांत होतो हें मागें सांगितलें आहेच. याप्रमाणें प्रधान आणि अप्रधान द्रव्यांचा अंतर्भाव षड्रसात होतो. या कल्पांत कटु रसात्मक द्रव्यें प्रधान आहेंत, त्यांचे प्रमाणही फार मोठे आहे. पण या प्रधानद्रव्यांत कापूर हा कर्ता आहे. त्याचे कार्य हें मुख्य आहे. त्याच्या कार्या प्रमाणें बाकीची द्रव्ये कार्य करतात. हें पुढील सूत्रावरून समजून येईल.

" फलादीनां प्रधानानां गुणभूताः सुरादयः "
तेहितान्यनुवर्तंते मनुजेंद्रमिवेतरे " (च. क. अ.१२।४७)

फलादि द्रव्ये प्रधान आहेत आणि सुरादि द्रव्यें अप्रधान आहेत. अप्रधान द्रव्ये ही प्रधान द्रव्याप्रमाणें कार्य करतात. या ठिकाणीं द्रव्यांच्या प्रमाणाचा विचार करावयाचा नाहीं. असें अनेक कल्प आहेत कीं, त्यांत असणाऱ्या प्रधान द्रव्याचे प्रमाण अत्यंत अल्प आहे. उदा० पुनर्नवासव यांत पुनर्नवा ही वनस्पति चार तोळे आहे. पाणी २०२८ तोळे आहे. या कल्पाचे कार्य कसें होत असेल ? याचा विचार जवळजवळ अडीच वर्षें करीत होतो. रसायनकल्पातील तत्वें या पुस्तिकेंत मी, हें कार्य कसें घडतें ? असा प्रश्न उपस्थित केला होता. पण आज हा प्रश्न सुटलेला आहे. प्रधानद्रव्यें अत्यंत अल्प असलेले अनेक कल्प सांपडतात. पुनर्नवासवांत पुनर्नवा ४ तो. चंदनासवांत चंदन ४ तो. पिप्पल्यासवांत पिंपळी २ तो. लोध्रासवांत लोध्र १ तो. उशीरासवांत उशीरद्वय ८ तो. या प्रमाणे अुदाहरणें देतां येतात.

आतां पर्यंत द्रव्यें कोणकोणत्या हेतूनीं मिश्र केली याचे विवेचन केलें. साधारणपणें याचा सारांश पुढील प्रमाणे मांडता येईल.

द्रव्यांचे रसात्मक वर्गीकरण, नंतर सेंद्रिय आणि निरिंद्रिय वर्ग या दोहोंचा अंतर्भाव रसात्मक वर्गीकरणांत, कसा आहे ते दाखविलें. नंतर निरिंद्रिय द्रव्यांचें योगवाहि कार्य सांगून कल्पातील त्यांचे महत्व दाखविलें. यानंतर गुणांचा विचार करून बहुगुणात्मक द्रव्यांचा विचार कसा एकदेशीय आहे आणि अल्प गुणांचे महत्व किती आहे ते विशद केलें. या विचारास पोषक असलेलें द्रव्यांचे प्राधान्य वर्णन केले. याप्रमाणें द्रव्यांचे विश्लेषण केल्या नंतर आपण द्रव्यांचा संयोग कोणत्या तत्वानीं केला आहे ते पाहूं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

योग:—"इति द्रव्यक्रियायोगमानार्थेस्सर्वमादिशेत्" या सूत्राप्रमाणें पाहाता अनुक्रमानें द्रव्यानंतर क्रिया म्हणजे काय याचे विवेचन करावयास पाहिजे. पण कल्प तयार करीत असतां द्रव्यांची निवड केल्या नंतर त्यांचा संयोग कोणत्या तत्वांनीं होतो हें पाहणे आवश्यक आहे. संयो-जित न होणारीं द्रव्यें यांत आहेत कीं काय याचे ज्ञान आवश्यक आहे. म्हणून क्रियेच्या अगोदर योगाचा विचार करीत आहे.

कोणताहि कल्प तयार करावयाचा झाल्यास द्रव्यांची निवड कशी करावी? प्राचीन आचार्यांनीं कशीं केली आहे? हें समजावून घेणें आवश्यक आहे. या ज्ञानाशिवाय प्रभावी कल्प तयार करतां येणार नाहींत. आयुर्वेदा-चार्यांनीं द्रव्य, गुण, कर्म, सामान्य, विशेष समवाय, असें सहा पदार्थ सांगितलें आहेत. त्यापैकीं सामान्य आणि विशेष याना कल्पामध्यें फार महत्वाचे स्थान प्राप्त होते. म्हणून त्यांच्या व्याख्या काय केल्या आहेत त्या प्रथम समजावून घेणें भाग पडते.

सामान्य:—सर्वकालीं सर्व पदार्थांच्या वृद्धीला जें कारण ते सामान्य होय.

विशेष:—दोन द्रव्यांच्या संयोग कालीं एक द्रव्य दुसऱ्या द्रव्याच्या ऱ्हासाला कारण होते. त्यास विशेष असें म्हणतात.

सामान्याचे कार्य:—चरकाचार्यांनीं "सामान्य-मेकत्वकरं" असें सांगितलें आहे. हें सामान्य तीन पदार्थांच्या ठिकाणीं असते. द्रव्य, गुण, आणि कर्म. द्रव्यांचा गुणांचा, कर्मांचा संयोग करावयाचा असल्यास द्रव्यसामान्याचा विचार करावा लागतो. दोन द्रव्यें कोणत्या वर्गातील आहेत ते पाहावें लागते. उदा. दोन पार्थिव द्रव्यांचा संयोग. किंवा आप्य द्रव्यांचा संयोग हाच एकत्वकर आहे. याचप्रमाणे गुणांचा संयोगही करावा लागतो. उदा शीत गुणात्मक द्रव्यांचा संयोग.

तसेंच दोन समान कर्मांचा संयोग एकत्वकर आहे. उदा. रेचन कार्य करणाऱ्या दोन द्रव्यांचा संयोग.

याप्रमाणे संयोग केलेले कल्प आहेत. पण त्यांचा विचार करावयाचा म्हटल्यास लेखाचा विस्तार होईल. म्हणून यांची उदाहरणें देत नाहीं.

या कल्पांत रसांचे सामान्यत्व आहे. कटु रसात्मक द्रव्यें ६६'८ आहेत. द्रव्यांचे वर्गीकरण रसात्मक पाहावें असें वचन आहे. त्याला अनुसरून हें सामान्य दाखविलें आहे. हे एकत्व अत्यंत महत्वाचे कल्प तयार होत असतां त्यांचा एकी भाव निर्माण व्हावा लागतो. हा एकी भा येण्यासाठीं क्रियेची आवश्यकता असते.

विशेष:—या कल्पांत विशेष द्रव्यें तिक्त, मधु कषाय आणि अम्ल रसात्मक आहेत. हीं द्रव्यें व रसाच्या गुण-कर्ममध्यें एकीभूत न होतां निराळेपणानीं रा तात. अशा दोन प्रकारच्या द्रव्यांची रचना कशीं होते याचा विचार आवश्यक आहे पण तो पुढें पाहूं.

कल्पांत विरोधि गुण-धर्मात्मक द्रव्यांचा संयोग कर आवश्यक आहे. समान गुण-धर्मात्मक द्रव्यें मिश्र कर विशिष्ट गुण-धर्मांची वाढ केलेली असते. त्याचे दुष्परिणा होऊ नयेत म्हणून विरोधि गुण-धर्मात्मक द्रव्यांचा एक प निर्माण करावा लागतो. हल्लीच्या लोकशाही युगांत रा कारभार चालविणाऱ्या पक्षाला विरोध करणारा एक प असतो. संसदेंत त्याला महत्वाचें स्थान असतें. याचप्रमा कल्पांतही या विशेष नांवाच्या द्रव्याला महत्व आलेले आ हा पदार्थ बहुद्रव्यांच्या गुण-धर्मामुळें शरिरावर जें दुष्परिणा होतात ते होऊ नयेत म्हणून संयोजित केलेले असतात. उद जेपाळयुक्त जे कल्प आहेत त्यांत सुंठ, इ. द्रव्ये संयोजि केलेलीं आहेत, जेपाळामुळें पोटांत मुरडा होतो तो हो नये हा हेतू आहे. याचप्रमाणें कल्पांत जीं विशिष्ट द्र बहुप्रमाणांनीं संयोजित केलेलीं आहेत त्यांचे शरिरावर परिणाम घडतात ते होऊ नयेत हा हेतू आहे.

या कल्पांत दोन वर्ग आहेत. १ बहुसंख्यात्म २ अल्पसंख्यात्मक. बहुसंख्यात्मक कटुरसात्मक द्रव्यें, अ संख्यात्मक तिक्त, मधुर, कषाय आणि अम्ल. चंद्रप्र गुटीचे कार्य शरिरांत योग्य रीतीनें होण्यासाठीं म्हणजे ति मुळें दुसरे व्याधि उत्पन्न होऊ नयेत म्हणून इतर वि पदार्थात्मक द्रव्यांची योजना केली आहे.

सृष्टींतील कोणतेही द्रव्य घेतलें तरी त्यांत साम आणि विशेष हे एकत्वकर म्हणजे वृद्धिकर आणि विशे ऱ्हासकर असते. हे तत्व दृष्टीसमोर ठेवूनच सांख्य पुढील सूत्र सांगितलें आहे. "सामान्य विशेषात्मा धर्मलक्षणावस्था परिणामः" सृष्टींत स्वाभाविक उ होणारे द्रव्य असो किंवा कृत्रिम तयार केलेलें द्रव्य त्यांत सामान्य आणि विशेष हे दोन पदार्थ असता आपणांस या दोहोंचाहि उपयोग करून घ्यावयाचा आहे लक्षांत ठेवणें आवश्यक आहे.

क्रिया:—संस्काराला क्रिया असें म्हणतात. (संस्कार इत्यर्थः) म्हणून संस्कार म्हणजे तरी काय ? त कार्य काय ? ते पाहूं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

074432

संस्कार म्हणजे करण, याचा तरी अर्थ काय ? संस्कार या शद्बांत सं + कार असे शद्ब आहेत. सम् म्हणजे चांगले-योग्य, कार म्हणजे करणें. योग्य करणें तो संस्कार होय. स्वाभाविक द्रव्यांत कांहीं गुण शरिरास अपाय करणारे असतात ते नाहींसे करून त्या ठिकाणीं दुसऱ्या गुणांना बसवून द्रव्यांच्या कार्यांत बदल घडवून आणण्याचें जें साधन किंवा क्रिया त्यास संस्कार असें म्हणतात.

हा संस्कार करण्याचीं साधनें पुढीलप्रमाणें आहेत. पाणी, अग्नि सन्निकर्ष, शुद्धि, मन्थन, देश, काल, यांना अनुसरून भावना, याशिवाय खलण्याचा संस्कार आहे. तोहि महत्वाचा आहे. आतां आपण या संस्कारामुळें गुणांतर कसें घडतें याचा विचार करूं.

पाणी आणि अग्नि संनिकर्षाचे उदाहरणः-तांदूळ हा स्वाभाविक गुरू आहे. पण तोच स्वच्छ धूवून पाणी घालून, अग्नीवर ठेवून शिजविल्यानंतर लघु होतो. या संस्कारामुळें गुरू गुणाचा नाश होवून लघु गुण संस्कारांनीं उत्पन्न होतो.

मन्थनः—शोथकृत दधि घुसळण्यामुळें शोथहर कार्य करतें.

देशः—कल्प तयार करुन भस्म राशींत पुरुन ठेवणें.

कालः—आसव, अरिष्ट यांना बंद भांड्यांत विशिष्ट काल पुरून ठेवणें. यांत देश आणि काल या दोन संस्काराचा अन्तर्भाव होतो.

या संस्कारामुळें गुणांतर होतें कां द्रव्यांतर होतें असा एक वादग्रस्त प्रश्न सध्यां उपस्थित केला गेला आहे. त्या दृष्टीनें या विषयावर थोडेसें लिहिणें बरें.

आयुर्वेदाचार्यांनीं "संस्कारो हि गुणांतराधानमुच्यते" असें स्पष्ट म्हटलें आहे. पण आजचा वैद्य वर्ग (कांहीं) गुणांतर म्हणजे द्रव्यांतर असें म्हणूं लागला आहे. चरकाचार्यांना गुणांतर शद्बांत बदल करतां आला असतां कीं नाहीं ? असा प्रश्न मनांत येतो. जर गुणांतर म्हणजे द्रव्यांतर असें आपण गृहीत धरलें तर आयुर्वेदीय वाङ्मयांत किती घोटाळा निर्माण होईल याची कल्पना आमच्या वैद्य बंधूना आलेली नाहीं. द्रव्य, गुण, कर्म, सामान्य, विशेष आणि समवाय असें सहा पदार्थ आयुर्वेदाचार्यांनीं ठरविलें आहेत. यांच्या व्याख्या व स्पष्टीकरण केलेले आहे. पण ते लक्षांत न घेतां गुणांतर म्हणजे द्रव्यांतर म्हणणें हें धाडस होते, तरी याचा विचार मी स्वतंत्र लेखांत करणार आहे. असो. थोडेसें विषयांतर झाले याबद्दल वाचकांनीं क्षमा करावी.

चंद्रप्रभा या कल्पांतील द्रव्यावर कोणते संस्कार केलेले आहेत ते पाहूं. या कल्पांत गुग्गुळ साखर हीं दोन द्रव्यें गुटिका तयार होण्यास साधन म्हणून वापरलेली आहेत.. गुटिका कशी तयार करावी याचे वर्णन शार्ङ्गधर संहितेंत पुढील प्रमाणे दिलें आहे. त्यांत साखर, गूळ, गुग्गुळ वगैरे द्रव्यें किती प्रमाणानीं मिश्र करावी याचे वर्णन आहे.

"सिता चतुर्गुणा देया वटीषु द्विगुणो गुडः"
"चूर्णाच्चूर्णसमः कार्यो गुग्गुलुर्मधु तत्समम्"
"द्रवं च द्विगुणं देयं मोदकेषु भिषग्वरैः"
(शा. सं. म. खं. अ. ७.)

चूर्णांच्या समभाग गुग्गुळ सांगितला आहे पण या कल्पांत चूर्ण २२॥ तोळे आहे. गुग्गुळ ८ तो. आहे. इतका कमी कां ? यांत साखर ४ तोळे आहे. आणि शिलाजित ८ तोळे आहे. शिलाजित हा गुटिका बनविण्यास उपयोगी असल्यामुळें गुग्गुळ ८ तोळे घेतला असावा. साखर, शिलाजित, आणि गुग्गुळ मिळून वीस तोळे होतात. गुग्गुळाच्या कार्यांत मदत करणारीही द्रव्यें मिश्र केलेली असल्यामुळें त्याचे प्रमाण कमी आहे.

या ठिकाणीं गुग्गुळच कां घेतला ? गूळ, किंवा नुसती साखरच कां घेतली नाहीं ? या कल्पांतील द्रव्यें प्रामुख्यानें कटु रसात्मक आहेत, समान द्रव्यें हीं एकत्वकर असल्यामुळें समान रसाची योजना केली आहे. गुग्गुळ साखर आणि शिलाजित यांचे एकजीव होण्यासाठीं त्रिफळ्याच्या काढ्यांत हीं द्रव्यें टाकून त्याचा पाक करून नंतर बाकीच्या द्रव्यांची चूर्णें मिश्र करावी. नंतर ह्या सर्वाचा खल करावा. या संस्कारामुळें काय कार्य घडत असावें ?

आयुर्वेदाची बैठक सांख्य, न्याय, वैशेषिक यांच्या विचार सरणीवर आहे. या शास्त्रांचा अभ्यास हल्लीं जवळ जवळ लुप्त झालेला असल्यामुळें संस्कारांनीं गुणांतर कसें घडते हें आम्हांस कळण्यास अडचण पडूं लागली. चरकाचार्यांनीं पुढील सूत्र सांख्याच्या विचार सरणीतून सांगितलेले आहे.

"अेवमेतेषां रसानां षट्त्वमुपपन्नं न्यूनातिरिका विशेषात्महाभूतानां भूतानामिव स्थावरजंगमानां नानावर्णाकृति विशेषाः"

एका अव्यक्त रसापासून मधरादि षड्रस हें स्वाभाविक परिणामामुळें महाभूतांच्या कमी अधिक मिश्रणानें तयार होतात. तसेंच या महाभूतांच्या कमी अधिक मिश्रणानें (संयोग, समवाय) स्थावर जंगमात्मक, नानावर्णा-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्मक नानाआकृत्यात्मक, विशेष अशीं द्रव्यें तयार होतात. हें जें चरकाचार्यांनीं सांगितलें आहे ते स्वाभाविक परिणाम वादाच्या भूमिकेवरून आहे. म्हणजे सृष्टींत उत्पन्न होणाऱ्या, वाढणाऱ्या, आणि नाश पावणाऱ्या द्रव्या संबंधि हें विचार आहेत. याशिवाय द्रव्यावर आघात करून त्यामध्यें जो परिणाम घडवून आणला जातो तो संस्कारामध्यें अंतर्भूत होतो. याला आपण अस्वाभाविक परिणाम म्हणूं.

प्रथम स्वाभाविक परिणाम कसें घडतात याचा विचार करूं. हा परिणाम म्हणजे काय ते प्रथम समजावून घेऊ.

परिणाम:—साम्यावस्थेंतून वैषम्यावस्थेकडे जाणे. अविशेषातून विशेषाकडे किंवा अयुतसिद्धातून युतसिद्धाकडे जाणे.

सृष्टि ही मूळ एका जड द्रव्यापासून उत्पन्न झाली आहे, असें सांख्याचे म्हणणे आहे. या जड द्रव्यांत सत्व, रज, आणि तम असें तीन गुण आहेत. यांची साम्यावस्था बिघडली म्हणजे वैषम्यावस्था सुरू होते. ही अवस्था सुरू झाली म्हणजे सृष्टीमध्यें नानावर्णात्मक, नानाआकृत्यात्मक द्रव्यें उत्पन्न होऊ लागतात. उदा. शरिरांतील दोष वात, पित्त, आणि कफ हे ज्या वेळीं विषम होतात त्यावेळीं रोग उत्पन्न होतात. जसें दोषांच्या वैषम्याला कारण परंपरा आहे तसेंच सत्व, रज, तमालाहि कारण परंपरा आहे. सृष्टि ही ज्या मूळ जड द्रव्यांतून उत्पन्न झाली त्यास प्रकृति असें म्हणतात. हिचा पुरुषाशीं संबंध झाल्यानंतर या त्रिगुणांत वैषम्य सुरू होतें. हें मूळ कारण आहे. यानंतर जे कारण घडतें त्यांस निमित्त कारण असें म्हटलें आहे. ह्या निमित्त कारणालाच संस्कार असें आयुर्वेदाचार्यांनीं म्हटलें आहे. सत्व, रज, आणि तम ह्या गुणांचे महत्व जड द्रव्यांत कसें आहे याचा विचार करूं. जड द्रव्यांत रजाचे कार्य फार महत्वाचे होते. रज म्हणजे शक्ति या शक्तिकडूनच एकंदर द्रव्याची रचना होते. ही शक्ति जड द्रव्यांत सुप्तावस्थेंत असते. ही उद्भूत होण्यासाठीं निमित्त कारणांची आवश्यकता आहे. निमित्त कारणांनीं ही शक्ति उद्भुत झाल्यानंतर द्रव्याची पुनः नवीन रचना होते. म्हणून द्रव्यांच्या गुणांत बदल होतो. मूळ द्रव्यांच्या परमाणूत बदल होत नाहीं. कार्यद्रव्यांना जीं कारण द्रव्यें आहेत त्यांत बदल होत नाहीं. एवढेंच नव्हे तर कार्यद्रव्यांतही फारसा बदल होत नाहीं. उदा. मातीचा घट घेऊ. हा घट प्रथम शामवर्ण असतो. अग्निसंस्कारानंतर रक्तवर्ण होतो, या ठिकाणीं घट हें कार्यद्रव्य कायमच आहे. फक्त गुणांतर मात्र झालेलें दिसतें. याचप्रमाणें (तोय) पाणी संस्कारानींही गुणांत घडतें. उदा. चर्म (कातडे) हें घेऊ. वाळलेलें चर्म पाण्यां भिजत घालून त्याला ठोकून मृदु स्निग्ध करतां येतें प्रथ हें रुक्ष, खर असतें. या ठिकाणीं पाण्यांत भिजविणें, आघा या संस्काराचा उपयोग केलेला आहे. हीं उदाहरणें व्यवहारां तील घेतलीं आहेत. हीं साधी सोपी आहेत. यावरून गुणांत कसें होतें तें सहज लक्षांत येईल.

या कल्पांतील गुग्गुळ, शिलाजित, आणि साखर ह्या द्रव्यांचा प्रथम पाक तयार करावा. ह्या अवस्थेंत ह्या तीन द्रव्यांचा समवाय तयार होतो. नंतर बाकीच्या द्रव्यांशी त्यांचा समवाय होण्याकरितां त्या पाकांत ती द्रव्यें मिश्र करून खल करावा लागतो. या दोन संस्कारामुळे द्रव्यांचा सजातीय द्रव्यांशीं, गुणांचा सजातीय गुणाशीं, कर्माचा सजातीय कर्माशीं, समवाय म्हणजे एकीभाव निर्माण होतो. आणि हें निराळे कार्य कार्य द्रव्य सजातीय कारण द्रव्याप्रमाणे कार्य करतें कां विजातीय कार्य करतें ते पाहावें लागेल. या कल्पांत उष्ण, लघु रुक्ष, सर गुणांचे आधिक्य आहे. पण या गुणांचे कार्य घडते असें दिसत नाहीं. तर ते कां ? वर सांगितलेल्या संस्कारामुळें जो समवाय होतो त्यावेळीं शीत गुण हा कार्य द्रव्याचा मध्य बिंदु बनतो आणि बाकीचे गुण त्यांच्या भोंवतीं राहतात, असें सांख्यांचे म्हणणे आहे. [अेवमेकैकगुणसंभवात् प्रधानगुण आश्रित्य अप्रधानगुणः परिणाम भेदान् प्रवर्तयन्ति] या मध्य बिंदूत असणाऱ्या द्रव्यास उपादान कारण असे म्हणतात. या कल्पांत कापूर हें द्रव्य शीत गुणात्मक आहे या कार्य द्रव्यांत तेंच उपादान कारण आहे. उपादान कारणांच्या भोंवतीं बाकीचीं द्रव्यें जमतात. आणि तीं उपष्टंभक म्हणून कार्य करतात. म्हणजे उपादान कारण असलेल्या द्रव्याप्रमाणे कार्य करतात. हीच शास्त्रीय विचारसरणी चरकाचार्यांनी "फलदीनां" या सूत्रांत सांगितले आहे. याचे विवेचन वर केलेले आहेच.

द्रव्यांत असणाऱ्या रज, तमाच्या कार्याचे वर जें त्रोटक वर्णन केलें आहे त्या संबंधि आणखी विवेचन केलें असता या विषयावर जास्त प्रकाश पडेल असें वाटते.

प्राचीन पदार्थ विज्ञानशास्त्र, असो किंवा आधुनिक पदार्थ विज्ञानशास्त्र असो. या दोहोंतही रजाला (शक्तीला) शास्त्रज्ञानीं अत्यंत महत्वाचे स्थान दिले आहे. इकडे वैद्यांनी लक्ष देणें आवश्यक आहे. याच प्रमाणें तमाचे महत्व दोन्ही शास्त्रांत आहे. तम म्हणजे जडत्व किंवा वस्तु संचय. परमाणूंचा संयोग होय.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

या रज, तमामुळेंच कार्यद्रव्यांची रचना होते. या कार्यद्रव्यांत शक्ति हीं सुप्त, सत्व हें उपसुप्त, आणि तम उद्भूत असते. (जडत्व) हीं कार्यद्रव्यें सृष्टींत अनंत आहेत. त्यांना कोण उत्पन्न करतो ? याचे विवेचन सांख्यांनीं पुढील प्रमाणे केले आहे.

शक्तीची अक्षयता आणि बदलः— त्रिगुण (सत्व, रज, तम) हे विविध रूपें धारण करून अनेकविध कार्यें करीत असले तरी त्यांना उत्पन्न करतां येत नाहीं. किंवा त्यांचा नाश होऊ शकत नाहीं. दृश्य आणि अदृश्य रूपांच्या दृष्टीनें आपण कार्यद्रव्यांचा विचार करूं लागलो तरीहि जडत्व, आणि शक्ति यांची बेरीज नेहमी एकच राहते. सत्व, रज, आणि तम यांच्या एकत्र क्रियेमुळे परिणाम पद्धतींतून निर्माण होणारी गुणधर्मयुक्त द्रव्यें यांचीं वाढ किंवा नाश होऊं शकतो. याचे कारण रचना पद्धतीत होणारा बदल होय. ह्या बदलाचा संबंध भ्रामकतेनें प्रत्यक्ष त्रिगुणांशी लावला जातो. जडत्व, आणि शक्ति यांच्या विविध रचना पद्धतीमुळें कार्यद्रव्यांत निरनिराळ्या शक्तींचा जन्म होतो. या शक्तीचे सजातीय आणि विजातीय असे दोन भाग पडतात. यालाच आयुर्वेद क्षेत्रांत समानप्रत्ययारब्ध आणि विचित्रप्रत्ययारब्ध असें म्हणतात. ज्या शक्तीमुळें द्रव्यांची रचना होते ती शक्ति काय चीज आहे हे आजच्या पदार्थ विज्ञान शास्त्राचा अभ्यास केलेल्यांना मी सांगावयास पाहिजे असें नाहीं. द्रव्यांचा खरा धर्म म्हणजे शक्ति हाच आहे. (योग्यतावच्छिन्ना धर्मिणः शक्तिरेव धर्मः—) ही शक्ति कार्यद्रव्यांच्या रस, वीर्य, विपाक, आणि प्रभाव यापैकी कोणत्या स्थानांत वसली असेल त्या स्थानाकडून शरिरांत कार्य घडते. संस्कारामुळें शक्तिस्थानांत बदल होतो म्हणून शुद्धि वगैरे संस्कारानीं द्रव्यांच्या गुणधर्मांत बदल होतो. हा द्रव्यांत बदल झालेला दिसत असला तरी एकूण शक्ति कायम असते. ही एकच असलेली शक्ति रस, वीर्य, विपाक आणि प्रभाव यापैकीं कोणत्या स्थानांत वसत असेल त्याच स्थानाला गुणधर्मशास्त्रांत महत्व आहे. जसें एक हा आकडा एक, दश, शत, यापैकीं कोणत्या स्थानांत बसला असेल त्याप्रमाणें त्याचे महत्व गणितशास्त्रांत आहे. चंद्रप्रभा या कल्पांत ही शक्ति शीत गुणांत असल्यामुळें या कल्पाचे कार्य शीतवीर्यानीं घडते. हा शीत गुण अल्प प्रमाणांत असला तरीहि याचेच कार्य घडते. संस्कारांतील निरनिराळ्या क्रियेनीं (आघात, नोदन वगैरे)मूळ द्रव्यांचे विभजन होवून जी निराळी रचना होते तिला कारण आघात नोदन वगैरे बाह्य शक्ति आहेत.

मानः— कार्यद्रव्यांत असणाऱ्या कारणद्रव्यांचें प्रमाण पाहणें. कारण द्रव्यें कोणकोणत्या गुणांचीं, किती प्रमाणांनीं मिश्र केलीं आहेत याचा विचार अवश्य करावा लागतो. गुरु गुणांच्या द्रव्यांचे प्रमाण फार आहे आणि लघु गुणात्मक द्रव्यांचें प्रमाण अल्प आहे. तर कार्यद्रव्यांचें कार्य कसें घडतें याचें अनुमान करतां येतें. या कल्पांत उष्ण गुणात्मक द्रव्यांचें प्रमाण बाकीच्या गुणांच्या मानानें फारच अधिक आहे. बाकीचीं अल्प गुणी द्रव्यें हीं बहुगुणात्मक द्रव्याप्रमाणें कार्य करतात. (विरुद्धधर्मसमवाये भूयसां स्यात् सधर्मकत्वम्.)

या कल्पांत बहु गुणांचें कार्य घडत नाहीं. म्हणून येथें मान म्हणजे प्रमाण याचा विचार करण्याचें कारण नाहीं.

आदिः— म्हणजे आपण घेतलेल्या द्रव्यांचा देश कोणता आहे याचाही विचार अवश्य करावयास पाहिजे. कांहीं कांहीं वनस्पति विशिष्ट देशांत उत्पन्न झाल्यामुळें त्यांच्या ठिकाणीं विशिष्ट गुणांची वाढ झालेली असते. उदा. जांगल देशांतील तांदूळ लघु असतात. तर आनूप देशांतील तांदूळ गुरू असतात.

हें सर्व विवेचन कल्पांचे गुणधर्म ठरविण्यास उपयोगी पडणारे आहे. याची कल्पना वाचकांना आली असेलच. आतां आपण चंद्रप्रभा या कल्पाच्या गुणधर्माकडे वळू.

आयुर्वेदीय कारखानदार व वैद्य यांस लागणारीं औषधि द्रव्यें

दुर्मिळ अस्सल अष्टवर्ग, केशर, सर्व प्रकारची काष्ठौषधि, कस्तुरी, अंबर मौक्तिक (मोती खाका) शौक्तिक, शंख, शुद्ध शिलाजित, सुवर्णमाक्षिक, गोरोचन, प्रवाळ, पारा, गंधक, इ. सर्व प्रकारचीं खनिज व वनौषधि द्रव्यें घाऊक व किरकोळ प्रमाणांत पुरवितो,

गुलकंद आणि मोरावळा हे ठोकबंद मिळतील.

अस्सल व खात्रीपूर्वक माल हेंच आमचें वैशिष्ट्य !!

विशेष माहितीसाठीं साप्ताहिक दरांचें छापील पत्रक मागवून घ्यावें.

शा. जाधवजी लल्लुभाई आणि कं.

२४५ काळबादेवी रोड, मुंबई २

टे. नं. ३१७९६ Telegrame- **AYURVED.**

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दुर्धर कॅन्सर पासून बचाव

परवांच "लुनिआँ आंतरनाशिवोनाह कांत्र कांसे" (कॅन्सरविरुद्ध आंतरराष्ट्रीय संघ) ह्या संस्थेनें "कॅन्सर दिन" पाळण्याचा आदेश दिला व या देशांत "कॅन्सर सप्ताह" पाळण्याचा येत आहे.

कॅन्सर हा जगांतील मानव जातीला ग्रासणाऱ्या रोगांतील सर्वांत वाईट असा रोग आहे; व आज तागायत आधुनिक शास्त्रीय प्रगतीनें त्यावर विजय मिळविलेला नाहीं. तरींसुद्धा तो होऊं न देण्याची काळजी झाल्यास त्याची जलद चिकित्सा व त्यावर इलाज ह्यांचा अवलंब करून आपणांस ह्या रोग्याचे प्रमाण कमी करता येईल.

कॅन्सर हा एक प्रकारचा व्रण आहे. हे व्रण उपद्रवी व निरुपद्रवी असे असतात. निरुपद्रवी व्रण कित्येकदा उपद्रवी बनतो. एकाद्या जखमेची त्वचेवरील खूण, शरीरावरील तीळ, ह्यावर रासायनिक किंवा दुसऱ्या प्रकारच्या सतत घर्षणाचा परिणाम होतो अशा प्रकारचे शरीरांतील मांस ह्या सर्वांवर कॅन्सरचा अुद्भव होऊं शकतो.

ह्या रोग्याची प्राथमिक सुरुवात फसवी असते. म्हणून त्याचा पत्ता लागणें कठीण ठरते. कॅन्सरमुळ सुरवातीला वेदना होत नाहींत. आणि वेदनाना सुरूवात झाली म्हणजे जीव वांचविणें विकट होते. जरी कांहीं जातीचे कॅन्सर बरे करता येत असले तरी शस्त्रक्रिया, रेडियम व खोल क्ष किरण ह्यांचा उपयोग आयुष्य वाढविण्यासाठीं होतो व ह्या आयुष्यांत जगण्यासारखे असें फारसे कांहीं नसते.

एकादा कॅन्सरचा रोगी उपचार केल्यानंतर ३ वर्षे, ५ वर्षे वगैरे जगला तर तो "बरा झाला" असें मानण्यांत येते. ह्यावरून कॅन्सर मनुष्याचा कसा संहार करतो त्याची कल्पना येईल. कॅन्सरमुळें होणाऱ्या वेदना असह्य असतात. फक्त मॉर्फियाचा उपयोग करून ह्या थोडचा कमी होतात; पण नंतर त्याचासुद्धा प्रभाव कमी होतो.

आपल्या देशांत कॅन्सरच्या मृत्युसंख्येचे विश्वसनीय असे आंकडे नाहींत. परंतु मृत्युचें प्रमाण बरेंच असावे. कारण, ह्या रोगाची चिकित्सासुद्धा होत नाहीं. जगांतील कॅन्सर-मुळें होणाऱ्या मृत्युच्या आंकड्यावरून असें दिसतें कीं मृत्युचें प्रमाण ५० : ५० हें आहे; परंतु स्त्रियांचा कॅन्सर बहुधा स्तन व जननेंद्रियें ह्यांचा असतो. आपल्या भगिनी स्तनांत गांठ वगैरे आल्यास व दुसरीं कांहीं चिन्हें दृष्टोत्पत्तीस आल्यास, खोटचा लाजेच्या कल्पनेमुळें, त्याची चिकित्सा करून घेण्यास हयगय करतात.

कॅन्सर सामान्यतः उतार वयाचा रोग असून तो वयाच्या चाळीस वर्षानंतर उद्भवतो. म्हणून मध्यम वयाच्या माणसांनीं विशेष काळजी घेऊन त्याची लौकर चिकि[त्सा] होण्यासाठीं योग्य तपासणी करवून घेतली पाहिजे.

कॅन्सरच्या बाबतींत लौकर चिकित्सा व उपचार हो[णें] ही आयुष्य व मरण ह्यांची बाब ठरते. सामान्य प्रॅक्टि[स] करणारे डॉक्टर व जनता ह्यांना कॅन्सरच्या धोक्या[ची] जाणीव असणें आवश्यक आहे. ह्यामुळेंच जीव बचाव[ता] येईल. मुम्बई राज्यांत टाटा मेमोरियल कॅन्सर हॉस्पिटल [हें] चिकित्सा, उपचार व रोग्याना ठेवण्यासाठी असें सुसज[्ज] केंद्र आहे. सरकारी व खाजगी हॉस्पिटलांतहि रेडियम [व] अेक्स रे ची सोय आहे.

रेडियम व एक्स रे ह्यांचा अुपयोग रोगाचे परमा[णू] जाळण्यासाठीं होतो. रेडियम ठेवल्यानंतर किंवा अेक्स[-रे] किरणांचा मारा करण्यांत आल्यावर रोगाच्या व रोगग्र[स्त] नसलेल्या अशा दोन्ही जातीच्या परमाणूचा नाश होतो[.] परंतु रोगग्रस्त नसलेले परमाणू जास्त गतीनें वाढतात [व] ह्या वाढीच्या वेगाच्या फरकावर रोग्याची आयुर्मर्या[दा] आंखलेली असते. जरी कांहीं जातीचे कॅन्सर बरे होत अस[ले] तरी आयुष्य थोडचाशा वर्षांनीं वाढविण्यासाठी व भयं[कर] अशा वेदनांपासून थोडीशी सुटका करून घेण्यापलि[कडे] रोग्याला अुपचाराचा फायदा होत नाहीं.

आपले राज्य धरून देशांतील राज्यांतील सरका[रें] चिकित्सेसाठीं जरूर असलेले दवाखाने, पॅथॉलॉजिस्ट व दु[सरे] शास्त्रज्ञ ह्यांचें शिक्षण अुपचार साधनें वगैरे क्षेत्रांत सुधार[णा] घडवून आणीत आहेत. मुंबअीच्या सरकारी जी टी. हॉस्पि[-] टलांत अेक्स–रे–यंत्रे व किरण देण्याच्या शास्त्रांतील शिक्ष[ण] वगैरेंची सोय आहे. जिल्ह्याच्या हॉस्पिटलांतहि अेक्स[-रे] यंत्रें आहेत. खास शिक्षण घेतलेला व कार्यक्षम अशा डॉ[क्ट]रांचा वर्ग निर्माण करण्यासाठी शिक्षणाची सोय केलेली आ[हे.]

कॅन्सर व दुसरे संहारक रोग हे कह्यांत ठेवावय[ाचे] असल्यास रोग टाळणाऱ्या वैद्यक शास्त्राचा गुणकारी उपय[ोग] करतां येईल. त्या रोगाचें ज्ञान, तो होण्याचीं मुख्य का[रणें] व रोग कसा टाळावा ह्याचें ज्ञान ह्याचा प्रसार मोठ[्या] प्रमाणांत होणें आवश्यक आहे. सामान्य जनतेतील स्त्र[ी] पुरुषांना हें ज्ञान सर्वत्र मिळालें पाहिजे. अमेरिकेसा[रखे] पुढारलेले देश सर्व रोगांवर उपयुक्त असा त्या शास्त्रा[चा] उपयोग करण्याकडे आपले लक्ष्य केंद्रित करीत आहेत.

खेडी, तालुका, जिल्हा व शहरें येथील डॉक्टरांनीं [ह्या] राष्ट्रीय व जीवदयेच्या कार्याला मदत केली पाहिजे. [...] नेहि त्यांच्याशी व कॅन्सरविरोधी संस्थांशी सहकार्[य केले] पाहिजे. रोगग्रस्तांना हुडकून काढण्याचा प्रयत्न वाढ[विला] पाहिजे. असें केलें तरच ह्या भयंकर अशा मानवी शत्रू[चा] पाडाव करणें शक्य होईल.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेदीय अर्कशाला लि; सातारा.

अधिकृत भांडवल:— पांच लक्ष (५०००००)रुपयांचें असून तें पुढीलप्रमाणें विभागलेले आहे

(१) १२७ डिफर्ड शेअर्स, प्रत्येकीं रु. १०० चा — रु. १२७००
(२) ८७३ आर्डिनरी शेअर्स, प्रत्येकीं रु. १०० चा — रु. ८७३००
(३) ८००० आर्डिनरी शेअर्स, प्रत्येकीं रु. ५० चा — रु. ४०००००

रु. ५०००,००

विक्रीस काढलेलें भांडवल:— रु. तीन लक्ष (रु. ३०००,००)

(१) १२७ डिफर्ड शेअर्स (प्रत्येकीं रु. १००) रु. १२७००
(२) ८७३ आर्डिनरी शेअर्स (प्रत्येकीं रु. १००) रु. ८७३००
(३) ४००० आर्डिनरी शेअर्स (प्रत्येकीं रु. ५०) रु. २०००,००

रु. ३०००,००

वरील विक्रीस काढण्यांत आलेल्या भांडवलापैकीं क्रमांक एक व दोनचे एक लक्ष रु. चे शेअर्स खपलेले आहेत. सध्यां फक्त प्रत्येकीं रु. पन्नासच्या ऑर्डिनरी शेअर्सची विक्री चालू आहे. डिफर्ड व ऑर्डिनरी या शेअर्समध्यें नफा वाटणीबाबत कांहींहि फरक नाहीं.

शेअर्सबाबत भरावयाच्या रकमा:— अर्जासोबत प्रत्येक शेअरमागें रु. १० प्रमाणें व अर्ज मंजुरीनंतर रु. १५ प्रमाणें एकूण फक्त पंचवीस रुपये भरावयाचे आहेत. उरलेली रक्कम संचालक मंडळ मागणी करील त्याप्रमाणें भरावयाची आहे.

शेअर अर्जाचे फॉर्म:— शेअर्सकरितां करावयाचा अर्ज कंपनीच्या छापील फॉर्मवर केला पाहिजे. हे फॉर्म कंपनीच्या केंद्रकार्यालयाकडून मिळतील. कोणाहि एका भागीदारास अधिकांत अधिक एकूण रु. ५००० किंमतीचे फक्त १०० शेअर्स घेतां येतील.

कंपनीची व्यवस्था:— कंपनीची व्यवस्था संचालक मंडळाच्या नेतृत्वाखालीं असून ती कोणत्याहि मॅनेजिंग एजन्सीकडे सोपविलेली नाहीं. संचालक मंडळ आजपर्यन्त व सध्यांहि विनावेतन काम करीत आहे.

संचालक मंडळ :
डॉ. वि. ल. आगाशे एल्. सी. पी. एस्. चेअरमन
श्री. रा. ना. गोडबोले, बी. ए., बी. कॉम्., सी. ए. आय् आय्. बी. डायरेक्टर वेस्टर्न इंडिया विमा कंपनी लि; सातारा.
डॉ. मो. ना. आगाशे एम्. बी. बी. एस्. चेअरमन, वेस्टर्न इंडिया विमा कं. लि; सातारा.
डॉ. मे. ना. जोग, एम्. बी. बी. एस्. प्रिन्सिपॉल आर्याग्ल वैद्यक महाविद्यालय, सातारा.
श्री. म. पां. गुर्जर एम्. ए. सातारा.
श्री. द. कृ. साठे बी. ए., एल्. एल्. बी. वकील, सातारा.
वैद्य ***दि. वि. बोडस*** आयुर्वेद विशारद.

सेक्रेटरी : ***श्री. के. जी. कुलकर्णी***
ऑडिटर्स— मेसर्स पी. जी. भागवत चार्टर्ड अकौंटंटस् अँड ऑडिटर्स मुंबई.
बँकर्स— दि युनायटेड वेस्टर्न बँक लि; सातारा.
दि सातारा स्वदेशी कमर्शियल बँक लि; सातारा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



गरोदरपणीच्या आरोग्याचा नंदादीप

यूटोन

गर्भाशय व गर्भ यांना पोषक अशा नामांकित औषधी-द्रव्यांच्या संयोगापासून सिद्ध केलेला हा कल्प गर्भपाताची प्रवृत्ति, आकस्मिक गर्भस्राव व गर्भवतींचें अन्य विकार यांवर परिणामकारक उपाय ठरलेला आहे.

सुलभ प्रसूति आणि बाळसेदार बालक यासाठीं गरोदरपणीं सतत **यूटोन** घेत रहा !

सुखी मातृपदाची इच्छा यूटोन पुरी करील.

तें स्वादिष्ट आणि रुचकर आहे.

आयुर्वेदीय अर्कशाला लि.
सा ता रा.

हें मासिक श्री. *विश्वनाथ लक्ष्मण आगाशे* यांनीं *आनंद प्रिंटिंग प्रेस, सातारा लि.*, येथें छापलें व आर्यांग्ल वैद्य महाविद्यालय, सातारा येथें प्रसिद्ध केलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद प्रसारक मंडळी सातारा या संस्थेचें पुरस्कृत मासिक

आयुर्मीमांसा

५-६-१९५१

गुरुकुल-पत्रिका,
गुरुकुल काँगड़ी.

जुलै
१९५१

वार्षिक वर्गणी
३ रुपये

किरकोळ अंक
८ आणे

या अंकांतील विषय-

आसवारिष्टांवरील निर्बंध तत्काळ दूर झाले पाहिजेत.
वा द सं वा द : गलग्रंथींच्या धोक्याचें वैयर्थ्य.
वाढती लोकसंख्या आणि संतती-नियोजन.
बेळगांवचे वैद्यसंमेलन : नवा अभ्यासक्रम.
वैद्यरत्न गो. आ. फडके यांचे भाषण.
वैद्य संमेलनांतील ठराव.
फलाहार : त्रिधारी निवडुंग.
महाविद्यालयवार्ता : अर्कशाळा वृत्त इ.

प्रमुख संपादक : वैद्यरत्न गो. आ. फडके,
आयुर्वेदाचार्य.

कार्यकारी संपादक : ब. ल. वष्ट,
आयुर्वेद विशारद.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

येत्या अंकांत—

वैद्य बागेवाडीकर यांची लेखमाला
वैद्य धामणकर यांचा लेख
नव्या आयुर्वेदीय अभ्यासक्रमाचा परामर्श इ.

आयुर्मीमांसेचे जाहिरात दर

पूर्ण पान	६० रु.
अर्धे पान	३२ रु.
चतुर्थांश पान	१६ रु.
अष्टमांश पान	८ रु.
चौथें कव्हर	१०० रु.
दुसरे कव्हर	८० रु.
तिसरे कव्हर	८० रु.

कायम स्वरुपाच्या जाहिरातीस सवलत दिली जाईल.

— पत्रव्यवहार करा —

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद प्रसारक मंडळी सातारा या संस्थेचें मासिक

आ यु र्मी मां सा

संचालक : आयुर्वेदीय अर्कशाला लि. सातारा

वर्ष १४ वें] जुलै १९५१ [अंक ७ वा

वार्षिक वर्गणी ३ रुपये : किरकोळ अंक ८ आणे

कोणत्याहि महिन्यापासून वर्गणीदार होता येते.

★ आयुर्मीमांसेंतील लेखांतून व्यक्त होणारी मतें ही त्या त्या लेखकांची मानली जातील. संपादक त्यांशीं नेहमींच सहमत असतात असें नाहीं.

★ आयुर्मीमांसेंत प्रसिद्ध होणाऱ्या लिखाणाविषयींचें सर्व हक्क संस्थेच्या स्वाधीन आहेत.

★ वर्गणी ज्या अंकाअखेर संपत असेल त्या अंकानंतर त्या त्या वर्गणीदारांना पुढील वर्षाची वर्गणी पाठविण्याविषयीं सूचनापत्रें जातात. ज्यांची वर्गणी संपली आहे अशा ग्राहकांनीं हें पत्र मिळतांच म. ऑ. नें वर्गणी पाठवावी. म. ऑ. आली नाहीं अगर अंक नको असल्याबद्दलहि पत्र आलें नाहीं तर त्या वर्गणीदारांना पुढील अंक व्ही. पी. नें पाठविला जातो.

★ अंक मिळाला नसल्याची तक्रार त्या महिन्याच्या दहा तारखेच्या आंत करावी. म्हणजे शक्य असल्यास दुसरा अंक पाठविला जातो.

★ सर्व पत्रव्यवहार 'व्यवस्थापक आयुर्मीमांसा, अर्कशाला बिल्डिंग, सातारा' या पत्त्यावरच करावा.

वैद्य, डॉक्टर व औषध विक्रेते यांच्या माहितीकरितां

आयुर्वेदीय औषधी-निर्मात्यांची सूची

(हें सदर प्रत्येक अंकांत नियमितपणें प्रसिद्ध होत राहील. भारतांतील विशेषतः मुम्बई राज्यांतील सर्व आयुर्वेदीय औषधी-निर्मात्यांचा या सदराद्वारे वैद्य, डॉक्टर व विक्रेते आणि ग्राहक यांना सातत्यानें परिचय होत राहील. एक प्रकारे "Buyer's Guide" हें या सूचीचें स्वरूप असल्यानें या सदराचें महत्त्व जाहिरातदारांना वेगळें सांगावयास नको.

ज्या जाहिरातदारांच्या जाहिराती इतरत्र या अंकांत वर्षाच्या करारानें घेण्यांत आलेल्या आहेत त्यांची माहिती या सूचींत *विनामूल्य* छापली जाते. केवळ सूचीसाठीं मजकूर पाठविणाऱ्या जाहिरातदारानीं वर्षाचे करारानें जाहिरात दिली पाहिजे. वर्षाचा दर फक्त तीस रुपये आहे. ही रक्कम आगाऊ द्यावी लागेल. मजकूर जास्तीत जास्त चार ओळी असावा.)

श्रीपाद फार्मसी, पेण.

विविध प्रकारच्या औषधी वनस्पतींचें विक्रेते. महाराष्ट्रांतील आयुर्वेदीय कारखान्यांना माल पुरविण्यांत यतो. वैद्य व ग्राहकांनीं माहिति मागवावी. बाकेरीभाते खात्रीचे मि ते.

शा जादवजी लल्लूभाई आणि कं०

सर्व प्रकारची काष्ठौषधि व औषधी निर्मितीसाठीं लागणारी कच्ची द्रव्यें यांचे विक्रेते. २४५ काळबादेवी रोड मुंबई २.

जी. ए. मिश्रा आयुर्वेदिक फार्मसी, झांशी. (यू. पी.)

विविध आयुर्वेदीय इंजेक्शन्सचे निर्माते. इंजेक्शनविषयक "सचित्र आयुर्वेदिक इंजेक्शन विज्ञान" या पुस्तकाचे प्रकाशक.

अरविंद केमिकल वर्क्स, छिंदवाडा (मध्य प्रदेश)

विविध आयुर्वेदीय इंजेक्शन्सचे निर्माते. सचित्र आयुर्वेदिक इंजेक्शनचिकित्सा (मूल्य ३ रु.) या पुस्तकाचे प्रकाशक.

डॉ. पुरोहित फार्मसी, कोल्हापूर.

पुरोहित श्वासहारी, शोधना इ. विख्यात औषधांचें निर्माते.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

संपादकीय

वैद्य बागेवाडीकर यांचे अभिनंदन

सोलापूर येथील प्रसिद्ध वैद्य श्री. नृ. ना. बागेवाडीकर यांची आयुर्वेदिक स्टेट फॅकल्टीवर नुकतीच नियुक्ती झाल्याचे जाहीर झाले आहे. या नेमणुकीबद्दल आम्ही वैद्यराज बागेवाडीकर यांचे अभिनंदन करतो. वैद्य बागेवाडीकर हे आयुर्वेदाचे एक अधिकारी विद्वान आहेत. यशस्वी चिकित्सक म्हणूनहि त्यांनीं स्पृहणीय लौकीक मिळविला आहे. आ. वै. महाविद्यालयाचे ते एक जुने माजी विद्यार्थी आहेत. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीशीं झगडा करीत करीत त्यांनीं आपले शिक्षण पुरे केले. विशेष उल्लेखनीय गोष्ट अशी कीं शालेय अभ्यासक्रमानंतरहि त्यांचा व्यासंग आजपावेतो अखंड चालू आहे आणि तो आजन्म चालू ठेवण्याची त्यांची प्रतिज्ञा आहे. या अभ्यासू वृत्तीच्या वळावर त्यांनीं संस्कृत व इंग्रजी या दोन्ही भाषांचे ज्ञान संपादन केलें आणि दोन्हीं भाषेंतील वैद्यक विषयाशीं संलग्न असलेल्या ज्ञानाचा त्यांनीं गाढ परिचय करून घेतला आहे. सांख्यशास्त्र, न्यायशास्त्र इ. प्राचीन शास्त्रांचा आयुर्वेदाच्या दृष्टीनें त्यांनीं उत्कृष्ट अभ्यास केला आहे. पाश्चात्य वैद्यक-विशारदांशीहि मूलभूत तत्वांच्या बाबतींत वादाचे दोन हात करण्याइतके ते समर्थ आहेत. आयुर्वेदीय औषधीशास्त्र व वनस्पति विज्ञान या विषयावरील त्यांचा अधिकार लक्षांत घेऊन पुण्याच्या टिळक विद्यापीठानें आयुर्विद्या पारंगत परीक्षेच्या विद्यार्थ्यांना हे विषय शिकविण्याकरिता गेली कांहीं वर्षें त्यांची योजना केली आहे.

वैद्य बागेवाडीकर यांची आयुर्वेदावर अनन्य निष्ठा आहे व तोच त्यांचा जीवन विषय झालेला आहे. फॅकल्टींत आयुर्वेद हितरक्षणाच्या दृष्टीनें ते आपले कर्तव्य अुत्तम प्रकारे बजावतील अशी आमची खात्री आहे.

उत्तीर्ण विद्यार्थ्यांचें अभिनंदन

आ. वै. महाविद्यालयाचे जे विद्यार्थी अंतिम परीक्षेत अुत्तीर्ण झाले त्यांचे आम्ही अभिनंदन करतो. आपल्या व्यवसायांत ते यशस्वी होवोत अशी सदिच्छा या प्रसंगानें प्रकट करीत आहो. व्यावसायिक जीवनक्रमांत त्यांची आयुर्वेदावर निष्ठा राहील व या विद्येच्या उत्कर्षासाठीं ते परिश्रम करतील अशी आम्हाला आशा आहे.

वैद्य स. ग. काळे यांचा स्वर्गवास

अखिल भारतीय आयुर्वेदीय कारखानदार संघाचे कार्यवाह व सूर्यकिरण फार्मसीचे एक कार्यकर्ते वैद्य स. ग. काळे हे ता. १०-६-५१ रोजी स्वर्गवासी झाले घटना नमूद करतांना आम्हांला दुःख होत आहे. काळे हे आयुर्वेदाचे एक निष्ठावन्त सेवक होते. विशे आयुर्वेदीय औषधी व्यवसायाची त्यांनीं नांव घेण्याज सेवा केली आहे. त्यांच्या निधनामुळें या व्यवसायाची मोठी हानि झाली आहे यांत शंका नाहीं. त्यां आत्म्यास सद्गति मिळो असे आम्ही चिंतितो.

महाविद्यालयाची नवी इमारत

आयुर्वेद प्रसारक मंडळीनें बांधावयास घेतले 'डॉ. मो. ना. आगाशे रुग्णालया' ची इमारत लवकरच पुरीं होईल. सध्या तळमजल्याचे काम पुरे असून वरचा मजलाहि पुरा होत आला आहे. या इमार काम पुरे होण्यासाठीं आर्थिक सहाय्याची फार मोठी आव कता आहे हे यापूर्वी संस्थेच्या कार्यकर्त्यांनीं मीमांसे जाहीर केलेच आहे. जूनच्या दोन तारखेस आ. प्र. मंडळी सर्वसाधारण सभेची सभा भरून या निधीपूर्तीच्या प्रश्न विचार करण्यांत आला. दे. भ. भाऊसाहेब सोमण यांनीं स मार्गदर्शन केले. अध्यक्ष स्थानीं श्री. दे. भ. शंकर साठे होते. तात्कालिक गरज भागविण्याकरि प्रसंग पडल्यास कर्ज काढण्याचा सभेत एकमु निर्णय घेण्यांत आला व हे कर्ज फेडण्यासाठीं इमारतीस आणखी लागेल ते द्रव्य मिळविण्यासाठीं का कर्त्यांनीं व संस्थेच्या हितचिंतकांनीं जनतेला देणग्या विनंति करण्याचे ठरले. या विषयीचा कार्यक्रम कार्य आखीत आहेत. संस्थेच्या माजी विद्यार्थ्यांनीहि या का सहभागी व्हावे व संस्थेकरितां जनतेस सहाय्याची वि करावी. विशेषतः ज्या माजी विद्यार्थ्यांनीं अद्याप रुग्ण निधीस देणगी दिलेली नसेल त्यांनीं कर्तव्यातील आपला पुरा करावा अशी आग्रहाची विनंति आहे.

ना. गाडगीळ यांची संस्थेस भेट

गेल्या महिन्यांत केंद्र सरकारचे मंत्रि ना. काकासा गाडगीळ हे सातार्‍यास आले होते. त्यावेळीं त्यांनीं संस्थेस देऊन समाधान व्यक्त केले. आयुर्वेदीय चिकित्सा प्रणाली देशांत त्वरित व मोठ्या प्रमाणावर प्रसार झाला पाहिजे या दृष्टीनें ही संस्था बहुमोल कार्य करीत आहे अभिप्राय त्यांनीं व्यक्त केला. विद्यार्थ्यांपुढें त्यांनीं वर्षारं भाषण करून नव्या वर्गाचे उद्घाटन केलें.

गेल्या महिन्यांत सातारा जिल्ह्याचे कलेक्टर हेबळे यांनीहि संस्थेस भेट दिली व संस्थेच्या सेवा कार्या समाधान व्यक्त केलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आसवारिष्टांवरील निर्बंध तात्काळ दूर झाले पाहिजेत

ले.– ब. ल. वष्ट, आयुर्वेद विशारद

मुंबई सरकारनें दारूबंदी कायद्यान्वयें १९४९ च्या एप्रीलमध्यें आसवारिष्टांची निर्मिति, विक्री व वापर यांच्यावर निर्बंध घातले. वास्तविक दारूबंदी व आसवारिष्टें यांचा अर्थाअर्थी कांहींहि संबंध नाहीं. पण कार्यकारणभाव, हेतू आणि शास्त्रीय सत्य यापैकीं कांहींहि लक्षांत न घेता हे निर्बंध अद्यापहि चालू ठेवण्यांत आलेले आहेत. या अन्यायाविरुद्ध पुन्हा एकदा वैद्य, आयुर्वेदीय औषधी कारखानदार, औषध विक्रेते, जनता आणि वृत्तपत्रें यांनीं उठावणी केली पाहिजे. मुंबई सरकारचा दारूबंदी कायदा मुंबई राज्याचे वरिष्ठ न्यायालय व भारताचे सर्वोच्च न्यायालय यांच्यापुढें आला तेव्हां या दोन्ही न्यायालयांनीं अल्कोहोल युक्त औषधी द्रव्यांवरील निर्बंध अनवश्यक, घटनेशी विसंगत आणि अन्याय्य असल्यानें ते रद्द केले पाहिजेत असा कौल दिलेला आहे आणि तरीहि हा अन्याय चालूच राहिला आहे हे विशेष होय.

अल्कोहोलचें उपकारकत्व

आसवारिष्टांतील अल्कोहोल हा त्यांत बाहेरून घातलेला नसून तो स्वयंनिर्मित असतो व विशिष्ट मर्यादेपलीकडे त्याचे प्रमाण वाढू शकत नाहीं. हें प्रमाण मदकारी नाहीं हें शास्त्रीय सत्य आहे. हा कोहल औषधी गुणांचा धारक व संरक्षक आहे. म. प्रां. वैद्यसंमेलनाचे अध्यक्ष श्री. अभ्यंकर यानी आपल्या भाषणांत सांगितल्याप्रमाणें नाशवंत वनस्पतींतील औषधोपयोगी अंश घेऊन तो दीर्घकाल टिकविण्यासाठीं आसव कल्पना आयुर्वेदानें योजली. आसवांत औषधी वनस्पति, मधुर पदार्थ व पाणी हे तीन घटक असतात. या मधुर पदार्थांचे आम्ल परिवर्तन होऊ नये अशी काळजी आसव करताना घेतली जाते. आयुर्वेदीय पद्धतीनें तयार झालेल्या आसवांत (१) कोहल ८ ते १० टक्के (२) अम्ल शून्य ते १ टक्का (३) मधूर द्रव्य ३० ते ४० टक्के व (४) औषधी तत्वें हें घटक असतात.

नैसर्गिक परिवर्तनांत १२ ते १४ टक्यांपेक्षा अधिक कोहल कधीच निर्माण होत नाहीं व त्यांत असलेल्या मधुर द्रव्यांमुळें तो अत्यंत मंद गतीनें शरीरांत शोषला जातो असे डॉ. एच्. पी. दस्तूर यानीं "अल्कोहोलचे उपयोग व दुरूपयोग या आपल्या ग्रंथांत (पान १८) म्हटलें आहे. आयुर्वेदीय आसवारिष्टांत सामान्यत: ८ ते १० टक्के कोहल परिणामत: सांपडतो व त्यांत मधुर द्रव्यांचे प्रमाण फारच मोठें असल्यामुळें हें औषधीकल्प कधीहि मादक होऊ शकत नाहींत.

असें असूनहि व ही वस्तुस्थिति अनेकवार आयुर्वेदीय तज्ञांनीं सरकारपुढें मांडली असूनहि त्याची दाद घेतली जात नाहीं हें विलक्षण आहे.

आयुर्वेदावर आघात

हे निर्बंध म्हणजे आयुर्वेदावर प्राणघातक आघात होय. या निर्बंधामुळें आयुर्वेदीय औषधी उत्पादन व्यवसायांवर अत्यंत विपरीत परिणाम झालेला असून हा व्यवसाय विनाशाच्या मार्गाला लागलेला आहे. छोटया कारखानदारांना परवाना फी, अबकारी कर व अनेक जाचक नियम यामुळें या औषधांची निर्मिती करणें अशक्य झालेलें आहे. त्यांची आर्थिक स्थिति अतिशय चमत्कारिक होत चालली आहे.

खेड्यापाड्यांतून आयुर्वेदीय औषधें दुर्मीळ झालीं

या निर्बंधाच्या जाचाला कंटाळून खेड्यापाड्यांतल्या विक्रेत्यांनीं आसवारिष्टांची विक्री बंद केली आहे. अर्थात् इतर आयुर्वेदीय औषधेंहि खेड्यापर्यंत पोंचणें दुर्घट झालें आहे. जनतेला हरघडी उपयोगी पडणाऱ्या या स्वस्त व गुणकारी औषधांची ही अडवणुक त्यांच्या आरोग्यावर परिणाम केल्यावांचून राहणार नाहीं. खेड्यांतून हीं औषधें जावयाचीं बंद झाल्यामुळें आयुर्वेदीय कारखान्यांची विक्री मंदावली असून मुंबई प्रांतांतील हे छोटे कारखाने थोड्याच अवधींत डबघाईस येतील अशी भीति निर्माण झाली आहे.

खेड्यांतून जनतेला वैद्यकीय मदत देणाऱ्या वैद्यांनाहि हीं औषधें मिळण्यांत अडचणी उत्पन्न झाल्यामुळें त्यांच्या रोगचिकित्सेचें एक प्रभावी साधन नष्ट होऊं पाहात आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

न्यायालयाचे निर्णय धाब्यावर बसले?

ता. २२ ऑगस्ट १९५० रोजीं मुंबई हायकोर्टानें सरकार विरुद्ध श्री. एफ्. एन्. बलसारा यांच्या दारूबंदी कायदा–विषयक खटल्याचा निर्णय देतांना " पेय नसलेल्या मद्यार्कयुक्त द्रव्यांच्या यथायोग्य उपयोगाला किंवा मद्यार्क-युक्त वैद्यकीय द्रव्यांच्या व सौंदर्य प्रसाधनाच्या उपयोगाला कायदेमंडळ प्रतिबंध करूं शकत नाहीं " असा स्पष्ट निर्वाळा दिला आहे. या निर्णयांत, " यथायोग्य कारणांसाठीं मद्यार्क-युक्त औषधीद्रव्यें, सौंदर्य प्रसाधनें व पेय नसलेलीं द्रव्यें यांचा उपयोग करण्याला दारूबंदी कायद्यांत ज्या प्रमाणांत प्रति-बंधाच्या तरतुदी केल्या आहेत त्या रद्द समजाव्या, कारण त्या भारतीय घटनेशीं विरोधी आहेत " असें नि:संदिग्धरीत्या घोषित केलें आहे.

असे असूनहि अद्याप या तरतुदी सरकारनें रद्द केल्या नाहीत. भारताच्या सर्वोच्च न्यायालयानेहि मुंबईच्या वरिष्ठ न्यायालयाचा हा निर्णय मान्य केला आहे. मुंबईच्या न्याया-लयाचा निर्णय बाहेर पडता क्षणींच त्या निर्णयांतील सैनिकां–संबंधीचा भाग तात्काळ मागे घेण्यांत मुंबई सरकारने जी तत्परता दाखविली ती एक वर्ष होत आले तरी आसवा–रिष्टांच्या प्रकरणी दिसू शकत नाहीं हें केवढें दुर्दैव ! दुबळ्यांना ठेचीत राहण्याची बेफिकीर वृत्तीच यांतून होत व्यक्त होत नाही काय ?

मुंबईच्या वरिष्ठ न्यायालयाचा निर्णय बाहेर पडल्या–नंतरहि मुंबई सरकारच्या दारूबंदी समितीच्या वतीनें प्रसिद्ध होणाऱ्या 'संजीवन' या मासिकांच्या नोव्हेंबर अंकांत श्री. ल. मा. पाटील यानी हा न्यायालयीन निर्णय उधृत करून लगेच " तथापि मेडिकेटेड टॉनिक वाइन्स, नियंत्रित आसवे व अरिष्टे आणि स्पिरिटयुक्त इतर द्रव्यें यांचे उत्पादन व विक्री पूर्वीप्रमाणेंच बॉंड, प्रिस्क्रिप्शन्स व अवकारी देखरेख याखालीं चालू राहील असे विधान एका भाषणांत केल्याचे प्रसिद्ध करण्यांत आलें आहे. मंत्री महाशयानीं हे निर्बंध कां चालू ठेवण्यांत आले आहेत याचा एकदाहि खुलासा केलेला नाहीं हें विशेष होय. एरवी कित्येक मुलाखती आणि भाषणे यांची खैरात चालू असताना या प्रश्नाविषयीं जनतेपुढे एकहि निवेदन करण्याचे सरकार अगर नामदार मंत्रि यांच्या मनांत आलेले नाहीं हें आश्चर्यजनक नव्हे काय ?

आयुर्वेदाभिमान्यांना आव्हान

याचा अर्थ हाच आहे कीं या देशांत आयुर्वेद शि... राहावा अशी इच्छा असणाऱ्या आयुर्वेदाच्या उपासक... या अन्याया विरुद्ध परिणामकारक झगडा ... पाहिजे. आपल्या दौर्बल्याला हें एक हिणविणारें आव्हान देण्यांत आलें आहे हेंच खरें. बेळगांव येथें या आसवारि... वरील निर्बंधाविरुद्ध महाराष्ट्रांतील वैद्यांनीं ठराव क... निषेध नोंदविला आहे. पण एवढ्यानें भागणार नाहीं. ... संमेलनाच्या अध्यक्षांनीं सरकारकडे या प्रकरणीं शिष्टम... नेलें पाहिजे. वृत्तपत्रांतून आणि महाराष्ट्रांतील स्था... वैद्यसंघटनांच्या वतीनें या अन्यायाविरुद्ध आंदोलन उभा... पाहिजे, आणि न्यायालयांत या निर्बंधांना प्रतिआव्हान ... पाहिजे. तरच हा प्रश्न सुटेल व त्याबरोबरच आयुर्वेदा... लागलेलें ग्रहणहि सुटेल.

महाविद्यालय–वार्ता

परीक्षांचा निर्णय

फॅकल्टी ऑफ आयुर्वेदिक, युनानी तिब्बी सिस्टीम्स् ... मेडिसिन मुंबईतर्फे एप्रिल १९५१ मध्यें घेतलेल्या परीक्षे... आर्यांग्ल वैद्यक महा विद्यालयांतील उत्तीर्ण विद्यार्थी.

वर्ष १ लें:– (१) भागवत ना. श्री. (२) शहा बा. ...
(३) थत्ते ज. द. (४) विखारे प्र. ...
(५) देशपांडे भा. अ. (६) देशपांडे श्री. ...
(७) कानडे मो. गो. (८) कु. मारवा... गोदावरी जी. (९) पंडित अं. ...
(१०) पाटील शा. बा. (११) पोरे ना. ...
(१२) साठ्ये प. य. (१३) झाड रा. वा.

वर्ष २ रें:– (१) वर्वे य. म. (२) दातार मा. ...
(३) गोरे कृ. वि. (४) पतकी आ. ...
(५) साने श्री. द. (६) लिमये य. ...
(७) पटोल ने. द. (८) रानडे सी. ...
(९) रानडे न. ना. (१०) शेट्टी ध. ...
(११) वर्धमाने अ. भ.

वर्ष ३ रें:– (१) देशपांडे व वि. (२) कुलकर्णी गं. ...
(३) पाध्ये दा. ना. (४) वैद्य बा. ...
(५) खाडीलकर व. द. (६) कुलकर्णी भा. ...
(७) परळे पु. ना.

पदवी परीक्षा:—

(१) आठल्ये प्र. मा. (२) बागेवाडीकर कृ. ...
(३) बापट श्री. पां. (४) कु. तांबे मैना... गो. (५) गुंजीकर श्री. शं. (६) ... कर श्री. बा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वादसंवाद

टॉन्सिलसूच्या धोक्याचें वैयर्थ्य

लेखक— ब. ल. वष्ट

Todays health या अमेरिकन नियतकालिकांत The Myth of the "terrible tonsils" या विषयावर मेच्या अंकांत एक लेख प्रसिद्ध झाला आहे. किरकोळ कारणांकरितां आणि कित्येकवेळा दुसरें कांहींच सुचत नाहीं म्हणून टॉन्सिलस्–गलग्रंथी–काढून टाकण्याची प्रथा सध्या आपल्याकडे बरीच वाढलेली आहे. पण गल–ग्रंथी काढून टाकण्याची ही शस्त्रक्रिया केव्हां समर्थनीय मानावी याचा कांहीं दंडक किंवा मर्यादा ठरविण्याची वेळ आतां आलेली आहे. किंबहुना टॉन्सिलस् काढण्याच्या सोप्या सल्ल्यापेक्षां त्या शरीरांत राहू देण्याचाच अधिक विचार केला पाहिजे अशी प्रतिक्रिया तज्ञांमध्ये व्यक्त होऊं लाग–लेली आहे. वरील लेखाचा सारांश मुद्दाम पुढे देत आहे.

टॉन्सिलसूवरील प्रचंड मोहीम

गेल्यावर्षी अमेरिकन वृत्तपत्रांतून डॉक्टरांच्या दाराशीं टॉन्सिलस् काढून घेण्याकरितां उभ्या राहिलेल्या कुटुंबांचे फोटो प्रसिद्ध होत होते. या एकेका कुटुंबांत कित्येकदा दहा दहा माणसे असावयाची. या छाया चित्रांतून गांभीर्यापेक्षां परिहासाचीच प्रवृत्ति आढळून येत होती. गेली कित्येक वर्षे गलग्रंथी या निरुपयोगी आणि रोगांची निवासस्थानें आहेत असे डॉक्टरमंडळी मानीत आली. या ग्रंथीविरुद्ध जणू सशस्त्र धर्मयुद्धच पुकारण्यांत आले. याचा परिणाम असा झाला कीं अमेरिकेंत प्रतिवर्षी वीस लाख मुलांच्या गल–ग्रंथी शस्त्रक्रियेनें बाहेर काढण्यांत आल्या. त्यांच्यापैकीं बहुतेकांच्या बाबतींत मोठेसे सबळ कारण नव्हते. कित्ये–कांच्या गलग्रंथी मुळीच रोगदूषित झालेल्या नव्हत्या. १९४७ सालच्या जर्नल ऑफ अमेरिकन मेडिकल असोसिएशनमध्यें, "अमेरिकेंतील नित्याच्या स्वरूपाची शस्त्रक्रिया' असा टॉन्सिलेक्टमीचा उल्लेख करण्यांत आला.

अलीकडे मात्र पुष्कळ डॉक्टरांच्या मध्यें याविषयीं प्रतिक्रिया दिसू येऊ लागली आहे. जर्नल ऑफ अमेरिकन मेडिकल असोसिएशनमध्ये ही प्रतिक्रिया पुढील शद्बांत व्यक्त झाली आहे.

पहिल्या संरक्षण रेषेवरील सैनिक

"गलग्रंथी या जोपर्यंत प्राकृतिक स्वरूपांत काम करीत असतात तोपर्यंत त्या संरक्षक आहेत आणि त्या काढण्यांत येऊ नयेत. जंतुदूषित ग्रंथीच काढणें इष्ट आहे." सुजलेल्या आणि दाहयुक्त ग्रंथी निश्चितपणें जंतुदूषितच असतात असें मानण्याचें कारण नाहीं. या 'संतप्त' स्थितींत त्या निसर्गानें सोपविलेलें संरक्षक कार्यच करीत असतात. जंतुजन्य विष आकर्षुन घेऊन, त्याच्याशीं झगडा देऊन, शरीराची जंतु-प्रतिकारशक्ति वाढविणें हें त्यांचें निसर्गदत्त काम आहे.

"सुजलेल्या टॉन्सिलस्ना बाहेर काढून एक प्रकारें त्यांचा धिक्कार करण्याऐवजीं त्यांना त्या जंतूशीं देत असले-ल्या झुंजीबद्दल पारितोषिकं देणेंच योग्य ठरेल." असे उद्गार एका प्रसिद्ध तज्ञानें काढले आहेत.

टॉन्सिलस् या लिंफॅटिक सिस्टिमच्या अंगभूत असून जंतुविष शरीरांत अधिक खोल प्रविष्ट होण्यापूर्वीच तें एकत्र आकर्षून घेऊन त्याचा नाश करणें हें त्यांचें कार्य आहे. ऊर्ध्वश्वसन मार्गामधले पहिल्या संरक्षण रेषेवरचे ते सैनिक होत. आणि याच खिडींतून जंतूंचे वारंवार हल्ले होत असतात हें लक्षांत घेतलें पाहिजे.

जंतूना शरीरांत शिरूं न देतां आपल्या सापळचांत पकडण्याची गलग्रंथींची कार्यकुशलता प्रत्यक्ष प्रयोगांनीं अज-मावण्यांत आली आहे. लहान मुलांना दंडांत टोचलेल्या व्हॅक्सीनमधील जंतू गलग्रंथींत आढळलेले आहेत. दहा वर्षा–खालील मुलांत गलग्रंथींच्या सूजेचा प्रादुर्भाव आधिक्यानें होतो. आयुष्यांतले हेंच वय असें आहे कीं, त्यावेळीं शरीरांत रोगजंतूविरुद्ध अखंड झगडा चालू असतो. आणि प्रतिकार–शक्तीची आजन्म उपयोगी पडेल अशी वाढ होत असते. डॉ. फरॉन्सीस एल्. लेडरर व अर्नोल्ड ए. ग्रासमन या विख्यात तज्ञानीं टॉन्सीलस्चें महत्त्वमापन करतांना "लहान मुलांतील स्वयं-रोगप्रतिकार-शक्तीची (auto-immunization) वाढ करण्यांत भाग घेणारा महत्वाचा अवयव" असा त्यांचा गौरव केला आहे. "वयाच्या पांचव्या सहाव्या वर्षी ही प्रतिकारशक्ति अपुऱ्या अवस्थेंत असते. तिची वाढ होण्यास वारंवार होणारा जंतुसंसर्ग हा आवश्यकच असतो. या कार्यक्रमांत गलग्रंथी मधून मधून सुजल्या तरी हरकत नाहीं. पण जर या वयांत या ग्रंथी काढून टाकल्या तर मात्र त्या मुलाचें जन्मभरचें संरक्षण–कवचच काढून घेतल्याप्रमाणें होईल."

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वाढती लोकसंख्या आणि संतति--नियोजन

आयुर्मीमांसेच्या एप्रील व मे अंकांत वरील विषयाची चर्चा याच सदरांत मी केलीं होती. ही चर्चा करण्यांत दोन हेतू होते. एक असा कीं संतती–नियमन वा नियोजन या विषयाचा उल्लेखहि ज्याना सहन होत नाहीं असे कांहीं अधिकारपदस्थ तज्ञ आपल्या देशांत आहेत. आणि संतति–नियमन वा नियोजन हा जसा अर्थशास्त्राच्या कक्षेंतला प्रश्न आहे, तसा किंबहुना अधिक महत्वानें तो वैद्यक शास्त्रातला प्रश्न असल्यानें जेव्हां या क्षेत्रातल्या व्यक्तींच्या मतप्रकटनावर आक्षेप घेतला जातो तेव्हां या प्रश्नांची अधिक छाननी करणें आवश्यक ठरते हा दुसरा हेतू. एप्रील अंकातला शास्त्रीय सत्यें आणि राज्य सत्ता ' या शीर्षकाच्या परिच्छेदाचा आशय एवढाच होता कीं शास्त्रीय क्षेत्रांत अधिकारपदस्थ व्यक्ती आपलें वैयक्तिक मत म्हणजेच अंतिम शास्त्रीय सत्य अशी सक्ती करू शकत नाहींत.

मीमांसेतील या चर्चेचा परामर्ष ' भिषक्विलास ' च्या जूनच्या अंकांत श्री. मा. श्री. किर्लोस्कर यांनीं घेतलेला आहे. श्री. किर्लोस्कर यांनीं घेतलेल्या या परामर्षाबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. सध्या देशांत या प्रश्नाची खूप चर्चा चालू झाली आहे ! पं. नेहरूनीं त्यांच्या बिहार दौऱ्यांतील एका भाषणांत संतति–नियोजन आवश्यक असल्याचे प्रतिपादले आहे. विशेष उल्लेखनीय गोष्ट अशी कीं मुम्बईचे आरोग्य–मंत्रि डॉ. गिल्डर यांनींहि मुम्बईतील एका भाषणांत या विषयाचे महत्व मान्य करून नियोजनाचा पुरस्कार केला आहे.

श्री. किर्लोस्कर यांनीं एका सोव्हिएट लेखकाच्या आधारे जागतिक अन्नोत्पादन खूप मोठ्या प्रमाणांत वाढवितां येईल असे प्रतिपादले आहे. भूपृष्टापैकीं हिंदुस्थानच्या वाट्यास आलेला भाग किती, त्यापैकीं लागवडीस आलेली जमीन किती आणि हिंदुस्थानच्या लोकसंख्येशी तिचे प्रमाण काय आहे याची चर्चा यापूर्वी झालेली आहे. जूनच्या इंडियन रिव्हयूच्या अंकांत प्रसिद्ध झालेली ही आकडेवारी पुढें दिलेली आहे. जगांत इतरत्र धान्य उत्पादन किती वाढू शकेल या हिशेबापेक्षा हिंदुस्थानांत या वाढीची शक्यता कितपत आहे हें आपण लक्षांत घेतले पाहिजे. गेली पांच वर्षे कार्यवाहीत असलेल्या ' अधिक धान्य पिकवा ' मोहि यशहि अजमावलें पाहिजे.

अपुरा आणि निःसत्व आहार, जीवन निर्वाहास करावा लागणारा झगडा, देशाचे खाली घसरलेलें आर्थिक मान हें सर्व लक्षांत घेतां रोगांच्या साथींचे उपासमारीचे बळी ठरणारी प्रचंड मानवसंख्या अखंड वाढत राहण्यापेक्षां धान्योत्पादन आणि लोकसंख्या यांच्यांत तोल (Balance) ठेवला पाहिजे आणि या प्रश्ना वैयक्तिकच नव्हे तर राष्ट्रीय दृष्टिकोनांतून विचार पाहिजे हें श्री. किर्लोस्करांना मान्य होईल अशी सला वाटते. जेव्हां केव्हां हिंदुस्थानांत धन धान्यांचे होईल तेव्हां संतती–वाढीची मोहीमहि हातीं कोणाची हरकत राहाणार नाहीं. पण आज अन्नास दाही दिशा कटोरा फिरविणाऱ्या आपल्या देशाला अमेरिकेच्या आणि आस्ट्रेलियांतल्या संपन्नतेकडे बोट दाख भरमसाट प्रजोत्पादनाची परवानगी देणेंच मानभावीपणा ठरेल हें श्री. किर्लोस्कर ध्यानीं घेतील अशी आ आहे.

भारतातील लोकसंख्या–नियोजन

इंडियन रिव्हयूच्या जून अंकांत डॉ. आर. एम. आगरवा एम्. ए पी. एच्. डी. यांचा 'Population plan ing in India' हा लेख प्रसिद्ध झालेला आहे. लेखांतील आंकडेवारी उद्बोधक ठरेल. हिंदुस्थानांत डोईगणीक लागवडीखालीं आलेली जमीन व जंगलें यां प्रमाणहि त्यांनीं दिलें आहे. जगाच्या पिकाऊ जमिनीपैं हिंदुस्थानच्या वाट्यास फक्त २·४ टक्के जमीन आले आहे. लोकसंख्या मात्र जगाच्या मानानें १५ टक्के आ व्यक्तिगणिक या जमिनीचे प्रमाण हिंदुस्थानांत ०·७७ ए इतकें पडतें. जंगल व्याप्त जमिनीचें प्रमाण ०·२४ ए इतकें आहे. अमेरिकेंत हेच आकडे अनुक्रमे ७·४३ एकर ०·४८ एकर आहेत. हिंदुस्थानांत माणशी सरासरी वा उत्पन्न २७० रुपये आहे. हें आर्थिक मान अत्यंत निकृ दर्जाचें आहे. त्यामुळें दुष्काळ आणि उपासमार, दुब शरीरप्रकृति आणि रोगराई या भीषण कारणांनीं लोकसं वाढीचे नियंत्रण होण्यापेक्षां तें देशानें योजनापूर्वक केलें देश बलवान्, आरोग्यशील आणि संपन्न होणार नाहीं असा श्री. आगरवाल यांचा प्रश्न आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बेळगांवचे वैद्य-संमेलन

गेल्या २७ व २८ मेस बेळगांव येथें महाराष्ट्र प्रांतिक वैद्यसंमेलन भरले होते. या संमेलनांत संमत झालेल्या ठरावां- पैकीं दोन ठरावांचा विशेष विचार झाला पाहिजे व ते सफल होण्यासाठीं निकराचे प्रयत्न करण्यांत आले पाहिजेत. कारण आयुर्वेदाच्या भवितव्यावर त्यांचा तात्कालिक व दूरगामी असा दुहेरी परिणाम होणार आहे. आयुर्वेदशास्त्र, आयुर्वेदीय वैद्यक व्यवसाय व आयुर्वेदीय औषधी उत्पादन यांच्यावर तात्कालिक अनिष्ट परिणाम घडवून आणणारा पहिला विषय म्हणजे आसवारिष्टांवरील अन्याय्य निर्बंध. हा प्रश्न १९४९ सालापासून उभा आहे. हे निर्बंध कसे हेतुशून्य, अनवश्यक व अनर्थ परिणामकारी आहेत हें गेल्या संमेलनाचे अध्यक्ष वैद्यराज पु. वि. धामणकर यांनीं आरोग्य मंदिरांत चार विस्तृत लेख लिहून स्पष्ट केले होते. माझ्या माहितीप्रमाणें हा त्यांचा निबंध सरकारी अधिकारी, मंत्री व सरकारी तज्ञ याच्या अवलोकनार्थ पाठविण्यांत आला होता. पण त्याची कांहीही दखल घेण्यांत आली नाहीं आणि निर्बंध चालूच राहिले हें दुर्दैव होय. मुंबई सरकारच्या ज्या कायद्यान्वयें हे निर्बंध अमलांत आले तो दारूबंदी कायदा मुंबईच्या वरिष्ठ न्याया- लयासमोर आला असता हे औषधांवरील निर्बंध रद्द करण्यांत यावे असा त्या न्यायालयानें निर्णय दिला. हा निर्णय नुकताच भारताच्या सर्वोच्च न्यायालयानेंहि संमत केला आहें. ही वस्तुस्थिती सरकारच्या नजरेसमोर आणून हे निर्बंध रद्द होण्यासाठीं वैद्य मंडळींनी आणि त्यांच्या संघटनांनीं पुन्हा चळवळ केली पाहिजे. यंदाचे संमेलनाध्यक्ष श्री. अभ्यंकर या प्रकरणीं शक्य ते सर्व प्रयत्न करतील अशी आशा आहे. त्यांनींहि आपल्या भाषणांत या निर्बंधाचे वैयर्थ्य स्पष्टपणें दाखवून दिले आहे.

मराठा चेंबर ऑफ कॉमर्सचा उपक्रम

मराठा चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज या व्यापारी संस्थेनेंही न्यायालयाच्या या निर्णयाचा संदर्भ देऊन हे निर्बंध रद्द करण्याची मागणी केली आहे. या उपक्रमाबद्दल चेंबरचे मी अभिनंदन करतो. महाराष्ट्रांत आयुर्वेदीय औषधी उत्पादन व्यवसाय अनेक लहानमोठ्या कारखान्यांच्या रूपानें उर्जिता- वस्थेस येत असताना त्यांच्या भवितव्यावर या निर्बंधानीं फार मोठा आघात केला आहे. हा व्यवसाय चालू राहाणें दिवसें दिवस कठीण होत चालले आहे. चेंबरचे निवेदन पुढें दिले आहे ते सरकार ध्यानी घेईल अशी आशा आहे.

मद्यार्क-औषधाबाबतींत मराठा चेंबरची सरकारला विनंती

मद्यार्कयुक्त औषधांच्या कारखानदारांना दारुबंदी कायद्याखालील नियम-निर्बंधामुळें अनेक अडीअडचणींना तोंड द्यावें लागत असून या अडचणी दूर करण्यासाठीं सदर नियम निर्बंधांचा फेरविचार होणे अत्यंत आग- त्याचें आहे अशी विनंति मराठा चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंड- स्ट्रीज, पुणें या संस्थेच्या कार्यकारिणीनें मुंबई सरकारला एक विस्तृत निवेदन पाठवून केली आहे. औषध-कारखानदारांच्या पुढील अडीअडचणींचा चेंबरच्या कार्यकरिणीनें आपल्या निवेद- नांत प्रामुख्यानें उल्लेख केला आहे. (१) बाँडेड लेबोरेटरीं- च्या खर्चाचा छोट्या कारखानदारांवर पडणारा असह्य बोजा (२) अबकारी कर भरलेल्या अशा मद्यार्कयुक्त वस्तूंपासून बनविलेल्या मालाच्या विक्रीबाबत दुबार होत असलेली कर-आकारणी (३) पक्क्या मालाची विक्री, आयात-निर्यात व वाहतूक यांबाबतचे परवाने मिळविण्यासाठीं होणारा गैरवाजवी विलंब व खर्च या सर्व कारणांमुळें जन- तेच्या नित्याच्या औषधांच्या उत्पादनांत घट झाली असून उत्पादन-खर्चांत अतिशय वाढ झाली आहे. साहजिकच त्यामुळें गिन्हाइकांवर व अशा कारखान्यांत कामावर अस- लेल्या लोकांवर अनिष्ट परिणाम होत आहे. सुप्रिम कोर्टानें प्रस्तुत कायद्याबाबत नुकताच एक उपकारक निर्णय दिला असल्यानें तर सरकारनें दारूबंदी कायद्यांत व त्याखालील नियमांत तात्काळ दुरुस्ती करणें इष्टच आहे असें चेंबरच्या कार्यकारिणीनें निवेदनांत शेवटी म्हटले आहे.

नवा अभ्यासक्रम

आयुर्वेदिक फॅकल्टीनें १९५२ सालापासून अंमलांत आणण्याच्या हेतूनें एक नवा अभ्यासक्रम संमत केला आहे. हा अभ्यासक्रम आयुर्वेदाला हानिकारक असल्यानें तो संमे- लनास अमान्य आहे असा दुसरा ठराव संमेलनांत संमत झाला आहे. आयुर्वेदावर दूरगामी परिणाम करणारा हा विषय आहे. हा अभ्यासक्रम आयुर्वेदीय पदवीधरांचा दर्जा उंचावणारा आहे असा त्याच्या पुरस्कर्त्यांचा दावा आहे, तर या अभ्यासक्रमानें आयुर्वेदाची हानी होईल असें मत संमेल- नांत व्यक्त झालें आहे.

या प्रश्नाची चर्चा करण्याची पात्रता संमेलनाच्या ठिकाणीं नाहीं असा निर्वाळा या अभ्यासक्रमाचे एक समर्थक पुण्याचे आयुर्विद्याकार यांनीं दिलेला आहे. त्याचा संमेलनाच्या पुरस्कर्त्यांनीं अवश्य विचार करावा. आयुर्विद्याकार मे अंकाच्या संपादकीयांत लिहितात,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

"संमेलनानें विद्यापीठ बनण्याचा आव आणून अभ्यासक्रमाचा तपशील आखावा व तोही साधारण सभेंत विवादासाठीं आणावा यांत औचित्यहि नाहीं आणि व्यवहारहि नाहीं. कारण तपशील हा काहीं थोड्या तज्ञानीं आखावयाचा असतो." तज्ञ हे फक्त फॅकल्टीतच असू शकतात आणि संमेलनांत वा अन्यत्र त्यांचा अभाव असतो असे आयुर्विद्याकारांना सुचवावयाचे असेल तर हे विधान फार गंभीर आहे असे म्हणावे लागेल. अभ्यासक्रमाचा प्रश्न निर्णयासाठीं वैद्यांच्या सभेंत आणण्यांत काय गैर आहे हें मला तरी समजू शकत नाहीं. संमेलनांत भाग घेणारे सर्व घटक 'तज्ञ' नसतील. पण गेल्या वर्षी संमेलनानें अभ्यासक्रमाकरितां जी समिति नेमली त्यांतले सभासद हे तज्ञ नाहींत असे आयुर्विद्याकार म्हणू शकणार नाहींत. अशा समित्यांच्या द्वारा ठरविण्यांत आलेला तपशील सर्वसामान्य वैद्यांचा कौल घेण्याकरितां त्यांच्यापुढें मांडला तर त्यांत अनौचित्य काय आहे? विधिमंडळांतील तज्ञांच्या पोटसमित्या किंवा सरकारी तज्ञ 'बिल' तयार करतात आणि संमतीसाठीं ते विधिमंडळापुढें आणतात. कित्येकदा अगदीच अतज्ञ मानल्या गेलेल्या सर्वसामान्य जनतेची प्रतिक्रिया अजमावण्याठीं ते प्रसिद्धहि करतात. ही पद्धत अनुचित आहे काय? जर तज्ञांचा गट विधिमंडळांतील सभासदांना 'तुम्ही या विषयांत अतज्ञ आहांत तेव्हां तुमच्यापुढें हे बिल संमतीसाठीं मांडण्याची जरुरी नाहीं, असे आयुर्विद्याकारांच्या भाषेत बजावू लागला तर त्या तज्ञांना काय उत्तर मिळेल?

आयुर्विद्याकारांनीं आपल्या संपादकीयांत आणखी एक विधान केलें आहे त्याचाहि संमेलनाच्या प्रमुखानीं विचार करावा. गेल्या वर्षी संमेलनाच्या समितीनें आखलेला अभ्यासक्रमच फॅकल्टीनें 'फारच थोड्या फरकानें' संमत केला आहे असे आयुर्विद्याकारांचें म्हणणें आहे. संमेलनाच्या पुरस्कर्त्यांनीं हे विधान पडताळून पाहावे व आपला अभिप्राय स्पष्टपणें जाहीर करावा.

आयुर्वेदाची प्रगति कीं पिछेहाट?

फॅकल्टीनें आंखलेला नवा शिक्षणक्रम हा आयुर्वेदाच्या प्रगतीला उपकारक आहे कीं त्याच्या अंमलबजावणीनें आयुर्वेदाची पिछेहाट होणार आहे अशी समस्या फॅकल्टी व संमेलन यांच्या मत–विरोधामुळें निर्माण झालेली आहे. आयुर्वेदाच्या पुनरुद्धाराकरितां म्हणून जो कायदा अस्तित्वांत आला त्याच्या आधारे निर्माण झालेल्या फॅकल्टीनें या नव्या संकल्पित शिक्षणक्रमांत ॲलोपाथीचा भाग आयुर्वेदाला पूरक असा न ठेवतां त्यावर वाजवीपेक्षां अधि॰ भर दि आहे आणि संशोधन–अन्वेषणानें आयुर्वेद तेजस्वी स्व विद्यार्थ्यांपुढें मांडण्याचा प्रश्न मागे पडून ॲलोपाथी आधुनिकतेमुळें विद्यार्थी त्याकडेच आकर्षिले जाण्याचा सं संभव आहे असा विरोधकांचा दावा आहे. शिवाय सायन्सची प्रवेश–लायखी आणि पाश्चात्य वैद्यक अवास्तव समावेश यामुळें हा अभ्यासक्रम महागडा हो देशी व कमी खर्चाची उपचारपद्धति या वैशिष्ठ्याला व्यवसाय त्यामुळें मुकणार आहे असा त्यावर दुसरा व्या हारिक आक्षेप आहे. तात्विक व व्यावहारिक अशा दो दृष्टींनीं या विषयाची चर्चा होणें आवश्यक आहे व ती आयुर्मीमांसेंत व्हावी असें मला वाटतें.

महाविद्यालय वार्ता

नवे वर्ग

ता. १८ जूनपासून महाविद्यालयाचे नवे वर्ग सुरू झा आहेत. यंदा प्रवेशासाठीं उमेदवारांचे अर्ज खूपच संख्येनें आ पण जागा मर्यादित असल्यामुळें बऱ्याच अर्जदारांना न द्यावा लागला. अर्जांची मोठी संख्या लक्षांत घेता या शिक्ष क्रमाकडे तरुणांचे लक्ष अधिक वेधले आहे हा निष्कर्ष निघ पण यंदा ही संख्या वाढण्याचे आणखी एक कारण होते. पु वर्षापासून नवा शिक्षणक्रम सुरू होणार असून त्यास इंटर–सायन्स ही प्रवेश अट राहाणार आहे असे जाहीर झा असल्यामुळें आर्थिक दृष्ट्या नवा अभ्यासक्रम ज्याना परवड नाहीं अशा वर्गांतील विद्यार्थ्यांनीं गर्दी केली. महाविद्याल यंदा सुमारे साठ विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यांत आला आहे. अधिवेशनाचे उद्घाटक म्हणून ना. काकासाहेब गाडगीळ लाभले हें विशेष होय.

श्रीमती कूपर यांची भेट

सुप्रसिद्ध मरहूम धनजीशहा कूपर यांच्या स्न श्रीमती होमाई कूपर यांनीं गेल्या महिन्यांत महाविद्या व अर्कशाला यांना भेट दिली. दोन्ही संस्थांचें कामक लक्षपूर्वक पाहून त्यांनीं समाधान व्यक्त केलें.

संसार में सर्व प्रथम आयुर्वेदिक इन्जेक्शन की आविष्कर्त्ता और निर्माणकर्ता
जी. ए. मिश्रा आयुर्वेदिक फार्मेसी (रजिस्टर्ड) झाँसी के
बने हुए
तार का पता इन्जेक्शन झाँसी
मिश्रा आयुर्वेदिक इन्जेक्शन्स
फोन नं. ५६२
प्रयोग कर निरोग बने
हमारे यहां इन्जेक्शन लगाने की शिक्षा प्राप्त करने के लिये नियम सूची मगालें।

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

महाराष्ट्र प्रांतिक वैद्यसंमेलन, बेळगांव

प्रदर्शन उद्‌घाटक वद्यरत्न फडके यांचे भाषण

बेळगांव येथे मेच्या ता. २७–२८ ला भरलेल्या महाराष्ट्र प्रांतिक वैद्यसंमेलन प्रसंगी वैद्यरत्न गो. आ. फडके यांनीं प्रदर्शनाचे उद्‌घाटन केलें. दिनांक २७ ला सकाळी नऊ वाजतां हा समारंभ झाला.

प्रदर्शन अुद्‌घाटनापूर्वी वैद्य फडके यांचा परिचय करुन देताना आचार्य वेणीमाधव शास्त्री जोशी म्हणाले " वैद्य फडके हे माझे विद्यार्थी. परिक्षेत त्याना मी नापास करणार होतो. कारण त्यांचा पेपर पाहून त्यांनीं कॉपी केली असली पाहिजे अशी माझी खात्री झाली होती. उत्तरें अगदीं तंतोतंत पुस्तकांची नक्कल असल्यासारखीं होतीं. म्हणून मग मी त्यांची तोंडी परीक्षा घेतली. अगदीं कसून आडवे तिडवे प्रश्न विचारले. आजवर कोणाचीहि एवढी कठीण परीक्षा मी घेतली नव्हती. पण माझ्या कसोटीला ते उतरले असले त्या-वेळचे हे हुषार विद्यार्थी व आजचे प्रथितयश प्राध्यापक, प्रदर्शनास उद्‌घाटक म्हणून लाभले याबद्दल मला अत्यंत आनंद वाटतो. "

वैद्यराज फडके यांचें सविस्तर भाषण पुढें दिलें आहे.

हरिः अें ।

अध्यक्षीय भाषणें, प्रतिनिधींचे ठराव, वैद्यवरांची विद्वत्ताप्रचुर व्याख्यानें, निबंध स्पर्धा इत्यादि संमेलनाच्या अंगाप्रमाणें " प्रदर्शन " हेंही एक संमेलनाचे अंग आहे असें मी समजतो. संमेलनाच्या निमित्तानें महाराष्ट्राच्या निर-निराळ्या विभागातून येथें अनेक विद्वान वैद्यवर उपस्थित होणार आणि विविध विषयावर महत्वपूर्ण चर्चा होणार, चरकाचार्यांनीं वर्णन केल्याप्रमाणें यंदा येथें " तद्विद्यसंभाषा " ही भरणार व त्यामुळें आपल्या ज्ञानांत कांहींतरी नवीन भरच पडणार या कल्पनेनें येथें मी उपस्थित झालों आहे.

संमेलनाच्या निमित्तानें येथें जें प्रदर्शन भरविण्यात येत आहे तें " आयुर्वेदीय प्रदर्शन " असणार अशी माझी दृढ कल्पना आहे.

हिताहितं सुखंदुःखं आयुस्तस्यहिताहितम् ॥
मानं च तत्र यत्रोक्तं आयुर्वेदःस उच्यते ॥

अशी आयुर्वेदाची व्याख्या आपणां सर्वांस विदित आहेच. या आयुर्वेदाचे हेतु, लिंग आणि औषध असे तीन भाग किंवा स्कंध आहेत. या प्रत्येक स्कंधांत स्वस्थ आणि आतुर यांना उपयोगी पडणारी माहिती वर्णन केलेली आहे. स्वस्थ आणि आतुर या दोघांनाही उपयोगी पडणारीं साधनें व माहिती या प्रदर्शनांत आपणांस पाहावयास मिळणार आहे. फिजिऑलजी, हायजिन, मेडिसिन, सर्जरी इत्यादि विषयांवरील पाश्चात्य वैद्यकांतील ग्रंथ पाहिले तरीही त्यांत आरोग्याची किंवा रोगाची कारणें, लक्षणें आणि उपाय हे त्रिस्कंधच आढळतील. पण या ग्रंथांना आपण आयुर्वेदीय ग्रंथ म्हणण्यास कबूल आहांत काय ? आपण कबूल होणार नाहीं अशी माझी खात्री आहे. त्यापेक्षां कांहीं निराळी, स्वतंत्र आणि अधिक मूलगामी विचारसरणी आपल्या आयुर्वेदाची आहे अशी आपल्याप्रमाणें माझीही प्रामाणिक कल्पना आहे.

मानवाचें स्वास्थ्य व त्याचप्रमाणें रोग या दोहोंचाही विचार " दोषधातुमल " याच्या विशिष्ट प्रणालींतून आर्य वैद्यक करिते व ज्या ग्रंथांत दोषधातूंचे वर्णन व विचार-प्रणाली असते त्यास आयुर्वेद शास्त्र असे थोडक्यांत आपणांला म्हणतां येते.

इतर कोणत्याही वैद्यकापेक्षां आरोग्याचा व ते बिघडून रोग झाला असतां तो बरा करण्याचा विचार व तो अधिक सूक्ष्म व मूलग्रामी विचार याच वैद्यकानें केला आहे. प्रत्येक व्यक्तीची प्रकृति कोणत्या दोषात्मक आहे, कोणत्या धातूंचे त्यांत सारत्व वा असारत्व आहे, त्याचा कोष्ठ कोणता आहे, त्याला सात्म्य काय आहे इत्यादिकांचा विचार आयुर्वेद करितो. असा विचार इतर वैद्यक शास्त्रांत क्वचितच केलेला असेल. आपल्या प्रकृतीनुरूप त्यानें आहार, विहार देश, काल इत्यादिकांचा अवलंब केला तर त्याचे आरोग्य दीर्घ काल टिकते. आणि याच्यांत जर अनियमितपणा निर्माण झाला तर व्याधि होतो. हा व्याधि त्याची प्रकृती, कोष्ठ, अग्नि, बल इत्यादिकांचा विचार करून तदनुरूप आहार विहार ठेवला तर परत बरा होतो व मानवाला परत आरोग्य लाभू शकतें. मीठ दही, उडीद, काकडी हे पदार्थ खाऊ नका, यांच्या सेवनानें विशिष्ट रोग होतात, असें पथ्या-पथ्याचे निर्बंध कांहीं विचार केल्यावाचून कसे बरे असतील ? दूध हे कोणत्या माणसाला सारक होईल, कोणाला त्यापासून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पोटांत वात कोंडून मलाच्या गांठी होतील हे आयुर्वेदीय पद्धतीनें चिकित्सा करणारा वैद्य सांगू शकेल. दूध, ताक, संत्री, मोसंब्याचा रस, ग्ल्यूकोज हे पदार्थ सामान्यतः ज्वरासारख्या आशुकारी विकारांतील पथ्याचे पदार्थ मानले जातात. पण वाटेल त्या अवस्थेंत आयुर्वेद त्यांना मान्यता देणार नाहीं. "आमांभिभूत कोष्ठस्य क्षीरं विषमहेरिव ।" असे आयुर्वेद सांगतो. व अवस्था भेदानें त्याचा उपयोग सांगतो. असें कां ? त्यांत कांहीं मूल गामी विचार आयुर्वेदानें केला आहे अशी माझी कल्पना आहे. लिंबाचा रस, आवळा, यांत व्हिटॅमिन सी चे प्रमाण पुष्कळ असते. या व्हिटॅमिन सीसाठीं कागदी लिंबाचा रस किंवा आवळ्याचा रस कोणताही पाश्चात्य वैद्यकाला चालेल. पण आयुर्वेदाला ते खपणार नाहीं. लिंबू आणि आवळा यांत भिन्नत्व आहे. कागदी लिंबाचा रस उष्ण व पित्तवर्धक आहे. उलट आवळ्याचा रस शीत व पित्तशामक आहे. रक्त-क्षयांत लिंबाचा रस चालेल व पांडुरोगांत किंवा रक्तपित्तांत आवळ्याचा रस चालेल, अशी स्वतंत्र विचारसरणी या वैद्य-काची आहे. तेल, तूप, डालडा या द्रव्यांना फॅटस या वर्गाखालीं पाश्चात्य वैद्यक संबोधते. पण आयुर्वेद याही पुढें जाऊन त्यांच्या द्रव्यत्वांत, स्वरूपांत फरक मानतो. फॅट म्हणून वाटेल तेथें ती आयुर्वेद दृष्ट्या वापरतां येणार नाहींत. ज्वरांत पहिले आठ दहा दिवस लंघन घडल्या-नंतर रोगी क्षीण होतो. अशा अवस्थेंत तूप हे अमृताप्रमाणें आयुर्वेद मानतो. हा मान तैलाला किंवा डालडाला मिळ-णार नाहीं. उलट तुपाखेरीज अन्य स्निग्ध द्रव्यें वापरल्यास रोग्याचें आरोग्य अधिकच बिघडण्याचा संभव आहे. तूप हें द्रव्य सहज पचणारे व शोषलें जाणारे असें द्रव्य आहे. त्यानें पाचक रसाचे किंवा अग्नीचे मंदत्व न येतां त्यापासून अग्नि वाढतो व क्षीण धातु वृद्ध होऊन-वाढते. परिणाम शूलांत भात हें अपथ्य द्रव्य आहे तसें गो हें नाहीं. हा भेदाभेद आयुर्वेद सांगतो. प्रवाल, शंख, कप चुना हे सर्व कॅलशिअमचे प्रकार आहेत. पण त्यांतील आयुर्वेद सांगतो.

रोग्याची प्रकृती, दोष दूष्य त्यादिकांचा विचार क आर्यवैद्यकाला चिकित्सा करावी लागते. यासाठीं ए औषध एका रोग्याचे रामबाण होऊ शकत नाहीं. प्रत्येक अवस्था भेदानें मान आहे. एक खोकला म्हटला कीं त्य शेंकडो पाठ आयुर्वेदांत पाहावयास मिळतील. प्रकृत भिन्नत्वामुळें त्या भिन्नभिन्न स्थळीं त्यांचा वापर करा लागतो. असें हें अत्यंत उपयुक्त शास्त्र आहे. पण दुर्दैव गोष्ट म्हणजे त्याचा लोप होत चालला. औषधासाठी पथ्यापथ्यासाठीं भारतीय लोकांना दुसऱ्याच्या तोंडाकडे ब ण्याची पाळी आली आहे. व कांहीं काळानें २०।२५ व आयुर्वेदाचा संपूर्ण नाश होईल अशी चिंता वाटत आहे. का या पद्धतीनुरूप विचार करणारे व ही पद्धत प्रत्यक्षांत अ लांत आणणारे लोक आतां दुर्मिळ होत चालले आहेत. संप्र नष्ट होत चालला. आयुर्वेदीय चिकित्सा करून घे सुशिक्षित माणसेंही मिळत नाहींत. असें मोठे दुर्दैव आहे.

महाराष्ट्रांत वैद्यकीय शिक्षण देणाऱ्या संस्था व त्य पार पडणारे मजसारखे पदवीधर पाहिले तर ही अधिक प्रत्ययास येईल. या संस्थांतून बाहेर पडलेले पदवी कितीसा या पद्धतीचा विचार करितात व या पद्धतीं चिकित्सा करितात ? सर्वच दोष त्यांच्याकडे नाहीं. परिस्थि तीच तशी आली आहे इंजेक्शनें 'दिल्याखेरीज रोग्यांचे स

सर्व प्रकारची आयुर्वेदीय औषधें शास्त्रोक्त पद्धतीनें तज्ञ वैद्यांच्या देखरेखीखालीं तयार केलीं जातात.

ठिकठिकाणीं एजंटस नेमणे आहेत.

दि आयुर्वेदिक धन्वंतरि फार्मसी

अहमदनगर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आनच होत नाहीं. व त्याशिवाय धंदाही बरा चालत नाहीं. पेनिसिलीन, स्ट्रोप्टमायसिन, सल्फाड्रग्ज यांचा प्रचार कसा आहे तो पहा. त्याच्या तालावर धंदा ठेवावा लागत आहे. या द्रव्यामुळेंच सर्व रोग बरे होतात ही जनतेतील विचार प्रणाली बदलून जावयास पाहिजे.

कित्येक लोक आयुर्वेद सनातन आहे, तो मरणार नाहीं. असें म्हणतात. पण क्षीण झालेल्याची उपेक्षा केल्यास तो कसा जगेल? त्याला अन्नपाणी देऊन जगविलें तरच तो जगेल. पूर्वपरंपरेनुरूप गुरुकडे जाऊन शिक्षण घेण्याची पद्धती चांगली होती असेंच वाटतें. त्या परंपरेनें शिक्षण घेतलें तरच आयुर्वेदशास्त्र जगेल व निदान चिकित्सा करतां येईल. परंपरा अबाधित राहील. पण सध्याच्या काळांत आतां ती गोष्ट शक्य नाहीं. वैद्य व्हावयाचें म्हणजे त्यास पुष्कळ खर्च येतो. विशिष्ट शिक्षण प्रणालींतून गेल्याखेरीज त्याला वैद्यकीय धंदा करतां येत नाहीं. व ही प्रणाली तर दुष्ट आहे. याचा अनुभव ३०।४० वर्षें महाराष्ट्रास आलाच आहे. यासाठीं आतां नवीन प्रयोग करण्याची जरूरी नाहीं. पाश्चात्य वैद्यकाचा लखलखाट, व साधन सामुग्री पाहून कोणाचे डोळे दिपून जात नाहींत? आयुर्वेदाचे पाश्चात्य वैद्यकावरोबरीचें लग्न हे याचे प्रमुख कारण माझे मते आहें. त्याची काडीमोड झाली तसेच हे शास्त्र म्हणून जगेल, याची पुनः उन्नती होईल. नाहीतर पाश्चात्य शिक्षणाबरोबर आयुर्वेद हा एक ऐच्छिक संशोधनाचा विषय म्हणून राहील व पुढें ५० वर्षांनीं त्याचाही लोप होऊन जाईल. अशी जबर शंका येत आहे.

आयुर्वेदाचा ऱ्हास वाचविण्यास संमेलन आणि प्रदर्शन हें एक उत्तम साधन आहे. रोग निवारण करण्यास किंवा आरोग्य टिकविण्यास जीं जीं विविध साधनें वापरली जातात त्या सर्वांचा समावेश या प्रदर्शनांत होईल. दुर्मिळ व संशोधित वनस्पती, सिद्धौषधि, आरोग्याचे नकाशे, आयुर्वेदीय दुर्लभ ग्रंथ ह्या सर्व वस्तु या प्रदर्शनांत पाहावयास आपणांस निश्चित मिळतील.

वैद्यक शास्त्र हें प्रत्यक्षावर आधारलें असल्यामुळें वैद्यकाचे प्रत्यक्ष ज्ञान साधन म्हणून या प्रदर्शनाचा मोठा उपयोग आहे.

प्रदर्शनांत आयुर्वेदीय दृष्टचा काय काय असावें? असा प्रश्न पुष्कळ वेळा माझें पुढें येतो. चिकित्सा स्थानांत रसायन प्रयोगांत सोम वनस्पतीचें नांव वाचतो. वर्णन ऐकतो. तिचें २४ प्रकारही सांगितले आहेत. सोम वनस्पतीचीं पानें शुक्ल पक्षांत चंद्राच्या कलेप्रमाणें रोज एक एक वाढत असतात. पौर्णिमेला १५ येतात व कृष्णपक्षांत चंद्राची कला रोज कमी कमी होते त्याप्रमाणें सोमाची पानें रोज एक एक कमी होत जातात व आमावास्येला फक्त तिचा दांडा उरतो असे मनोरम वर्णन ऐकावयास मिळते. पण अशी दुर्मिळ वनस्पती माझ्यासारख्या अभाग्याला पहावयास कधीं काळीं मिळणार आहे कां? ती येथें पहावयास मिळेल काय?

" वृक्षास्तुवरका नाम पश्चिमार्णवतीरजाः । "

तुवरक वृक्षाची फळें आणून त्यांतील मज्जेपासून तेल काढावें व हें तुवरक तेल कुष्टघ्न व महारसायन आहे. इत्यादि वर्णन वाग्भटांत मी वाचतो. पण हा तुवरक कोण याची माहिती मला नाहीं. अशी अज्ञात द्रव्यें या प्रदर्शनांत मला पाहावयास मिळणार आहेत याबद्दल आनंद वाटतो. रास्ना या नावानें बाजारांत काळचा मुळचा विकत मिळतात. पण दोन वर्षांपूर्वी चिपळूण येथील ख्यातनाम वैद्य कै. पंडित रघुनाथशास्त्रीं पटवर्धन यांनीं हळदी सारखे रास्न्याचे गड्डे मला दाखविले. व आपल्या परंपरेनुरूप व निश्चित अनुभवावरून हा रास्ना असें त्यांनीं दाखविलें. एकाच नांवाच्या पण निरनिराळ्या लोकांच्या समजुतीप्रमाणें भिन्न भिन्न असणाऱ्या वनस्पतींचा संग्रह करून त्या द्रव्यांची निश्चिती प्रदर्शनानें झाली पाहिजे.

चरकानीं प्रसूतीगृह कसें असावें याचे वर्णन शारीरांत केले आहे त्याचा नकाशा किंवा मॉडेल मला पाहिजे आहे. जेंताक स्वेद आयुर्वेदीय दृष्टचा देण्याचा विचार मनांत येतो. पण तें स्वेदगृह कसें असावें याचे मानचित्र लाभले तर त्याप्रमाणें वास्तु विशारदाकडून बांधून घेतां येईल. रसायन चिकित्सेंत सांगितलेले कुटी याचे ही चित्र किंवा पलाश द्रोणी हीं पहावयास मिळेल तर बरे होईल. याच प्रमाणें बस्तीयंत्र, शिरोबस्ती, धूमयंत्र व वाग्भट, सुश्रुत यांनीं वर्णन केलेलीं यंत्रें व शस्त्रें याही असल्या प्रदर्शनांत ठेवण्याला लायक वस्तु होतील.

सोलापूरप्रमाणें बेळगांवच्याही प्रदर्शनात सालावादप्रमाणे निरनिराळ्या औषधी कारखानदारांचे स्टॉल येथें पहावयास मिळतील व त्यांत काढे, आसवे, गुटिका व सिद्धौषधी व याहीपुढें नवीन नवीन पेटंट औषधें निश्चित पहावयास मिळतील. ही औषधें पाहून निश्चित समाधान होईलच असें नाहीं. यापासून वैद्यवर्गाचा निश्चित ऱ्हासच

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होत चालला आहे असेच माझ्यासारख्याला वाटल्यावाचून राहणार नाहीं. वैद्यवर्ग व रुग्णवर्ग अधिक अधिक आळशी व परावलंबी झाला असाच याचा अर्थ मला वाटतो. आजची आर्थिक, सामाजिक स्थिती आणि आजचा वैद्यकीय व्यवसाय आणि आजची बाजारपेठ इत्यादि याची कारणें आहेत ही गोष्ट मला पटते. त्यामुळें कितीहि ओरड केली तरी आतां कारखान्याशिवाय आयुर्वेदीय औषधें यापुढें मिळणार नाहीत.यामुळें आयुर्वेदाची सर्व भिस्त आतां कारखान्यांवर येऊन पडली आहे.

कारखानदारांनीं आतां यापुढें पूर्वपरंपरेला धरुन औषधें तयार केली पाहिजेत. तरच आयुर्वेद शास्त्र म्हणून जगण्यांची शक्यता आहे. औषधी करणांत अशास्त्रीयता किंवा भेसळ केल्यास त्याचा गुण वैद्याला दिसणार नाहीं व वैद्याच्या औषधानें गुण येत नाहीं. असा ओरडा होईल व वैद्य लोक आयुर्वेदीय औषधें घेण्याचे टाळतील. व त्याना रोगीही मिळणार नाहींत. कज्जली किंवा सिंदूर कल्पांत वापरावयाचा पारा पूर्ण संस्कारित पाहिजे. असा संस्कार न करिता वापरला तर त्याच्या दोषांची हानी होणार नाहीं व गुणवृद्धि होणार नाहीं. सूतशेखर हें द्रव्य पित्ताची मात्रा म्हणून जनतेंत प्रसिद्ध आहे. त्यांत घालावयाच्या पारदावर उर्ध्वपातनाचा संस्कार नसेल तर त्या मात्रेची क्रिया ऊर्ध्वंगावर कशी होईल व त्या मात्रेनें डोके दुखी ओकाऱ्या भोंवळ हीं पित्ताची लक्षणें कशी कमी होतील ? जनतेचा आयुर्वेदावरील विश्वास मात्र पार उडून जाईल. संस्कारानें पाऱ्यांत काय काय बदल होतो हें आधुनिकांचे रसायन शास्त्र ठरवूं शकत नाहीं. सर्वच गोष्टी केमिस्ट्रीच्या सहाय्यानें आयुर्वेदांतील सिद्ध होतील हा एक मोठा भ्रम आहे. मंडलाकृति सोने दुधांत घालून तें दूध शिजविलें व तें पिण्यास वापरलें तर तें वृष्य कार्य करतें. येथें सुवर्ण अग्नि, व दुग्ध यांचा संस्कार आहे. प्रत्यक्ष सोने दुधांत उतरत नाहीं. वाटेल ती आकृती सुवर्णाची या साठीं चालत नाहीं. विशिष्ठ आकृतीच यासाठीं उपयोगी पडतें. अशा हजारों गोष्टी आयुर्वेदांत आहेत. याला संस्कार म्हणतात. ते प्रत्यक्ष रोगी बरे होण्यावर अवलंबून व सिद्ध होणार आहेत. यासाठीं आपलें डोके न लढवितां पूर्वपरंपरेला धरुन औषधें तयार केली पाहिजेत. आयुर्वेदीय औषधांचा मोठेपणा हा लॅबोरटरींत सिद्ध होणार नाहीं. रोगी बरा होणें ही एक त्यांची कसोटी आहे. यासाठीं आतां आयुर्वेद जगविणें किंवा तो मारणें ही गोष्ट सर्वस्वीं कारखानदारांवर अवलंबून आहे.

औषधासाठीं जी द्रव्यें वापरावयाची त्याचें नियमन नियंत्रण सर्व वैद्यांनीं अेकत्र जमून करण्याची वेळ आतां आ[illegible] आहे. तसेंच औषधींच्या सूचना, त्यांचे निश्चित पाठ, त्यां[illegible] गुणधर्म आणि ज्या पद्धतीनें तें औषध तयार करण्यांत आ[illegible] याची सर्व माहिती यांत सर्व कारखान्यांत सारखेपणा पाहि[illegible] हा सारखेपणा असला तर त्यांचें गुणधर्म सारखे येतील. [illegible] किंवा सूतशेखर म्हटली म्हणजे अमक्या गुणाचा हें निश्चि[illegible] होईल व तो कोणीही वैद्यानें वापरला तर त्यांचें गुण सार[illegible] व अचूक दृष्टीस पडतील. वैद्य व कारखानदार या दोघांना[illegible] या पद्धतीनें फायदा होईल.

आयुर्वेदीय औषधीकल्प रंगरूपानें व गुणानें स[illegible] सारखे उतरण्यांस त्यांत वापरावयाची कच्ची द्रव्यें यांत ए[illegible] सूत्रता व सर्वत्र सारखेपणा पाहिजे. तीच मुळांत अनिश्चि[illegible] आणि अविश्वसनीय असतील तर त्यापासून तयार हो[illegible] औषध दर वेळीं प्रत्येकाचें बदलत राहील. औषधोपयो[illegible] वनस्पती, प्राणिज द्रव्यें, खनिज द्रव्यें, यांची निश्चिती संघ[illegible] स्वरूपानें झाली पाहिजे.

आयुर्वेदीय औषधीकारखानदारांनीं सर्वच औ[illegible] तयार करूं नयेत. देश वा मान याप्रमाणें तीं त्यांनीं त्यां[illegible] तयार करावींत. कुमारी पनवेलला चांगली मिळत आ[illegible] तर तेथें कुमारीकल्प व्हावेत. सातारला अडुळसा पुष्क[illegible] आहे. वासाकल्प तेथें व्हावेत. म्हणजे सर्वांनाच बाजार[illegible] मिळेल व धंदेवाईकपणा कमी होईल.

अशी योग्य औषधें तयार करुन वापरावयास मिळा[illegible] तरच सध्याच्या धकाधकीच्या बाजारांत आमचा वैद्य[illegible] व्यवसाय टिकून राहील आणि आपल्या देशांतील जनते[illegible] आरोग्य आपण आपल्या देशी पद्धतीनें कायम टिकवू श[illegible] ही गोष्ट सिद्ध होईल. परदेशी औषधांकडे आणि कंपन्या[illegible] पाहाण्याची आपल्या लोकांना जरूरी पडणार नाहीं. आप[illegible] देश समृद्ध होईल. आपलें आरोग्य वाढेल.

संमेलनांतील प्रदर्शनाचे निमित्तानें माझें विचार आ[illegible] पुढें मांडण्यास संमेलन चालकांनीं जी मला संधी दिली [illegible] बद्दल मी त्यांचे आणि आपण कोणताही निश्चित वि[illegible] नसलेले भाषण शांतपणें ऐकून घेतलेत याबद्दल आपले[illegible] आभार मानून हें माझें भाषण मी संपवितों.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

महाराष्ट्र प्रांतिक वैद्यसंमेलन, बेळगांव.

म. प्रां. वैद्यसंमेनातील ठराव

बेळगांव येथील म. प्रां. वैद्यसंमेलनांत पुढील ठराव संमत झाले.

ठराव १ ला:—गेल्या सालीं आयुर्वेद क्षेत्रांतील वैद्य पंचानन गंगाधरशास्त्री गुणे, तपस्वी बाबासाहेब परांजपे, वै. रघुनाथशास्त्री पटवर्धन, वै. केशवराव लोंढे, वै. विनायकराव केतकर, वै. रामचंद्र चिंतामण गुणे, वै. प. ह. साठे, वै. गणपत तात्याजी सुपेकर (नागरदेवळेकर) वै, बाबाचार्य सांगली (बेळगांव) या दिवंगत वैद्यांच्या निधनाबद्दल महाराष्ट्र प्रांतीय वैद्य संमेलनाला अत्यंत दुःख होत आहे. त्यांच्या आप्तेष्टांच्या दुःखांत हें संमेलन सहभागी आहे.

ठराव २ रा:—वैद्यांच्या पुनर्नोंदणी बाबत सरकारनें केलेल्या तरतुदीची अंमलबजावणी इतर सर्व वैद्यक व्यवसायिकांना तशी अट लागू होईपर्यंत लागू करण्यांत येऊं नये अशी सरकारला विनंति आहे. या बाबत बोर्डाशीं विचार-विनिमय करण्याकरितां वैद्यांचें एक शिष्टमंडळ पाठविण्यांत यावें.

ठराव ३ रा:—सर्व वैद्यबंधूंना विनंति कीं, सरकारकडे आयुर्वेद विषयक ज्या ज्या बाबतींत दाद मागावयाची असेल अगर बोलणें करावयाचें असेल, मग ती बाब अभ्यासक्रम अगर कोणतीही असो. तसेंच डेप्युटेशन नेणें वगैरें व्यवहारही महाराष्ट्र प्रां. वै, मंडळाचे मार्फतच व्हावा.

ठराव ४ था:—महाराष्ट्र प्रांतीक संमेलनाचें हें अधिवेशन भारत सरकारच्या नभोवाणी खात्याला अशी विनंति करतें कीं, भारताच्या ग्रामीण जनतेला स्वास्थ्य टिकविणें व मामुली रोगांचे उपचार करणे सोपे जावें म्हणून भारताच्या त्या त्या विभागांत सहज उपलब्ध होणाऱ्या वनस्पतीचे उपयोग प्रांतीय भाषेतून वेळोवेळीं ध्वनिक्षेपित करण्यांत यावेत.

ठराव ५ वा:—रजिस्ट्रेशन ट्रिब्यूनलनें यादींत नांव दाखल करणेंसाठीं करावयाच्या अर्जाच्या छापील नमुन्याचें कलम नं. १५ मधील "I had been in regular practice on 4th Nov 1941 व the proof of regular practice on 4th November 1941" या दोन वाक्यांचें मराठी भाषांतर चुकीचें झालें असल्याचें मंडळाचे निदर्शनास आलें आहे, सबब ते भाषांतर सुधारून घेऊन ते नमुने पुन्हां प्रसृत करावे व त्याकरितां आवश्यक ती मुदत मंजूर व्हावी अशी सरकारला विनंति आहे.

ठराव ६ वा:—आयुर्वेदीय औषधी बनविण्याकरितां लागणारी परंतु ज्यांची आयात परदेशांतून करावी लागते अशा औषधी द्रव्यांवरील आयात कर माफ करावा व अशीं औषधें सरकारी नियंत्रित व माफक दरानें वैद्य समाजास पुरविण्यांत यावींत. तसेंच भारतांतून निर्यात होणारीं कच्चीं औषधें भारतास आवश्यक तितक्या प्रमाणांत ठेवून मग त्यांची निर्यात करण्यांत यावी, व भारताबाहेरील अशीं द्रव्यें भारतांत आणण्यांत यावींत.

ठराव ७ वा:—आसवें व आरिष्टें व नित्योपयोगी अनपायी औषधी द्रव्यांवरील गैरसमजानें घातलेलीं बंधनें सरकारनें ताबडतोब दूर करावीं अशी या संमेलनाची सरकारला विनंति आहे.

ठराव ८ वा:—शालेय अभ्यासक्रमांतील पाठय पुस्तकांत व्यवहारांत नित्य उपयुक्त व सहज उपलब्ध होणाऱ्या औषधी द्रव्यांचा परिचय व त्यांचा सामान्य उपयोग यांची माहिती समाविष्ट करून त्यांचें ज्ञान

आयुर्वेदीय कारखानदार व वैद्य यांस लागणारीं औषधि द्रव्यें

दुर्मिळ अस्सल अष्टवर्ग, केशर, सर्व प्रकारची काष्ठौषधि, कस्तुरी, अंबर मौक्तिक (मोती खाका) शौक्तिक, शंख, शुद्ध शिलाजित, सुवर्णमाक्षिक, गोरोचन, प्रवाळ, पारा, गंधक, इ. सर्व प्रकारचीं खनिज व वनौषधि द्रव्यें घाऊक व किरकोळ प्रमाणांत पुरवितो,

गुलकंद आणि मोरावळा हे ठोकबंद मिळतील.

अस्सल व खात्रीपूर्वक माल हेंच आमचें वैशिष्टय!!

विशेष माहितीसाठीं साप्ताहिक दरांचें छापील पत्रक मागवून घ्यावें.

शा. जाधवजी लल्लुभाई आणि कं.

२४५ काळबादेवी रोड, मुंबई २

टे. नं. ३१७९६ Teiegrame- AYURVED.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

देण्याची व्यवस्था सरकारच्या शिक्षण खात्यानें करावी अशी या संमेलनाची विनंति आहे.

ठराव नं ९ वा:—श्रीमंत वैद्य अप्पासाहेब पुराणिक यांनीं कुलाबा जिल्ह्यातर्फे या संमेलनांचें आगामी अधिवेशन पनवेलीस भरविण्याबाबत दिलेले आमंत्रण ही सभा स्वीकारीत आहे.

ठराव नं १० वा:– हिंदुस्थान सरकार आणि प्रांतीय राज्य सरकारच्या विधिमंडळाच्या होणाऱ्या सर्वसाधारण निवडणुकीच्या वेळीं जे उमेदवार आयुर्वेदाच्या उत्कर्षाचे दृष्टीनें काम करण्याचे आश्वासन देतील त्यांनाच (मग ते कोणत्याही पक्षाचे असोत)मतें द्यावीत व ते निवडून येतील असा प्रयत्न सर्व बाजूनें करावा असा या संमेलनाचा महाराष्ट्र प्रांतीय वैद्य बंधूंना आदेश आहे.

या बाबतीत मार्गदर्शन व व्यवस्था करण्याकरितां जिल्हावार एकेक प्रतिनिधी निवडण्यांत यावा व या समितीनें ठरावाचा आशय सिद्धिस जाईल अशी व्यवस्था करावी.

ठराव ११ वा:—सध्यां फॅकल्टी ऑफ आयुर्वेदिक अँड युनानी सिस्टीम्स ऑफ मेडिसिन, जो अभ्यासक्रम तयार करित आहे, त्या अभ्यासक्रमाची रूपरेषा व तपशील, जो प्रसिद्ध केला आहे, त्यांत ॲलोपाथीचा अभ्यासक्रम आयुर्वेदापेक्षां पुष्कळ अधिक आहे, शिवाय आयुर्वेदीय फॅकल्टीला सरकारनें केलेल्या दिग्दर्शनालाही अनुसरून नाहीं म्हणून तो या संमेलनाला अमान्य आहे.

कार्यकारी मंडळ

१ वै. पं. ग. म. अभ्यंकर ...... अध्यक्ष
२ वै. म. वि. पुराणिक ...... खजिनदार
३ वै. ना. ह. जोशी ...... मंत्री
४ वै. लक्ष्मीबाई बोरवणकर ...... मंत्री
५ वै. गणेशशास्त्री जोशी ...... सदस्य
६ वै. वेणीमाधवशास्त्री जोशी ...... ,,
७ वै. पु. वि. घामणकर ...... ,,
८ वै. वि. म. गोगटे ...... ,,
९ वै. स. भा. जोशी ...... ,,
१० वै. भगवंत त्र्यंबक वैद्य ...... ,,
११ वै. वि. दा. एकतारे ...... ,,
१२ वै. द. ब. वैद्य ...... ,,
१३ वै. म. भा. वाटवे ...... ,,
१४ वै. य. धों. नाटोलीकर ...... ,,
१५ वै. गो. आ. फडके ...... ,,

५६ वर्षाच्या अनुभवानें मिळालेल्या दक्षतेनें युक्त व
संपूर्ण शास्त्रशुद्ध औषधांची निर्मिति
हेंच ऊंझा फार्मसी च्या
औषधांचे वैशिष्ट्य आहे

ऊंझा फार्मसी लि. च्या सुसज्ज कारखान्यांत अनुभवी व सुशिक्षित निरीक्षकांकडून प्रत्येक औषध शास्त्रोक्त तसेंच पेटंट उत्तम द्रव्यापासून निर्माण केलें जातें. औषधें संपूर्ण शास्त्रशुद्ध व ५६ वर्षांच्या अनुभवानें प्राप्त झालेल्या दक्षतेनें युक्त निर्माण केलीं जात असल्यामुळें, जे लोक एकवेळ आमचीं औषधें वापरतात, ते हमेशा आमचीच औषधें मागवितात; आणि याच कारणामुळें आमच्या फार्मसीचीं औषधें वैद्य, डॉक्टर व औषधालयें व घरोघर सर्वत्र वापरलीं जात आहेत.

आजपासून आमचीं औषधें वापरून चिकित्सेंत यश प्राप्त करा.

ऊंझा फार्मसी लि. ऊंझा (उ. गुजरात)
महाराष्ट्र एजंट–*जयंत अँड कंपनी*, पुणें शहर.

LIFE COMES FROM APOLLO
THE A.P. WORKS LTD. BARODA
REGD. TRADE MARK

अपोलोज आयुर्वेदीक इंजेक्शन्स
अद्यावत प्रयोगसिद्ध कल्प

आद्य आयुर्वेदीय संस्था म्हणूनच *'प्राइड ऑफ इंडिया'* हें नामाभिमान या संस्थेला योग्य ठरते. आमची इंजेक्शन्स या देशांत व परदेशांत विकली जातात आणि आंग्ल वैद्य व आयुर्वेदीयांमध्यें तीं सारखीच लोकप्रिय झालीं आहेत. आमच्या ट्रेनिंग इन्स्टिट्यूटमध्यें वैद्यांना इंजेक्शनचें शिक्षण दिले जाते. विशेष माहितीसाठीं लिहा व एजन्सी नियम आणि मोफत कॅटलाग मिळवा.

दि अपोलो फार्मास्युटिकल वर्क्स लि.
प्रतापगंज बडोदा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भारतीय आरोग्य-विज्ञान

फलाहार

लेः- वै. दत्तात्रेयशास्त्री जळूकर

जेवणांत भाज्यांचे निमित्तानें पानें, फुलें, शेंगा व फळें यांचा उपयोग कसकसा होतो हें आपण पाहिलें. त्यांत केळ, फणस, पोपई इ. फळांचा भाजी म्हणूनहि उपयोग केला जातो हें सांगितलें व तें खरें आहे. तथापि हीं फळें पक्व झाल्यावर भाजीच्या कामीं न येतां केवळ फलाहार म्हणून घेतलीं जातात. अर्थात अशा फळांना वाटलें तर "सव्यसाची" म्हणूया व म्हणून केवळ फलाहारासाठीं जीं फळें उपयोगिलीं जातात त्यांत ह्या सव्यसाचींना अग्रमान देऊन त्याचें वर्णन प्रथम करून नंतर मग केवळ फलाहाराकडे वळूं.

केळ:— राजेळीं, म्हशेळीं, वेलची, सोनकेळीं इ. केळांच्या अनेक जाती आहेत. प्रायः वसईचीं केळीं सर्वत्र प्रसिद्ध असून त्यांचीच लागवड अलीकडे महाराष्ट्रांत बागाइती गांवांतून भरपूर होऊं लागली आहे. पाण्यांचा भरपूर पुरवठा असेल अशाच विहिरी ह्या पिकांना उपयुक्त होत. यद्यपि बाजारांत केळीं नेहमीं मिळतात तरीपण सामान्यतः आषाढानंतर श्रावणापासून फाल्गुनापर्यंत बऱ्यापैकीं पोसलेलीं व रुचिकर केळें मिळू शकतात. केळ हे एक ईश्वरनिर्मित अपूर्व खाद्य आम्हांस उपलब्ध आहे म्हटलें तरी चालेल. या केळीच्या झाडाचे कंद, गाभा, पानें, फुलें व फळें विकूनच नव्हे तर त्याच्या संपूर्ण झाडाचे अगदीं पुरेपूर पैसे वसूल करूं शकतो. असे पाहावयास मिळते.

भाजीच्या दृष्टीनें केळफुलांचा व कच्च्या केळांचा उपयोग केला जातो. केळफुलें कमळाच्या कळीच्या आकारानें अनेक पानांच्या थरांतून लागलेलीं असून वरचीं तीं लाल रंगाचीं पानें काढून फणीसारख्या आकारानें लागलेल्या ह्या फुलांना काढून घ्यावें लागतें व नंतर त्या फुलांच्या वरची कोवळी परंतु चिवट पांढरी पालवी व आंतला किंजल्क काढून टाकावा लागतो. व नंतर भाजीसाठीं हीं फुलें बारीक चिरून पाण्यात कांहीं वेळ टाकून व पाणी पिळून नंतर पाणी न घालतां नुसत्या तेल-मोहरीच्या फोडणीस घालून शिजवावी लागतात. हळद, मीठ, मिरची, हरभऱ्याचें थोडेसें पीठ घालून फारच सुन्दर व रुचिकर भाजी होतें. पाणी चांगलें पिळलें गेलें नाहीं अथवा किंजल्क म्हणजे त्या फुलामधोमध बारीक दांडा असतो तो काढला नाहीं तर भाजी कडवट होते. पाणी घालूनहि भाजी छान होते पण मग हरभऱ्याच्या पिठाऐवजी मुगाची डाळ घालून ती केली तर चांगली लागते. थंड, मूत्रल व रुचिकर आहे.

केळीं कच्चीं असतांहि भाजी केली जाते व तीहि विशेषतः कोरडी भाजीच अधिक चांगली होते. मात्र फुलांच्यां भाजीपेक्षां त्या कच्च्या केळांची भाजी आनाह म्हणजे मलबद्धकारक विशेष होते असा अनुभव आहे.

कांहीं गोडाजी पिकलेल्या केळ्यांचीहि भाजी करवितात. परंतु तिला खरी लज्जत येत नाहीं.

पिकलेलें केळे

नितांत मधुर रस पैच्छिल्य म्हणजे बुळबुळितपणा, जडत्व, स्निग्धत्व या गुणांमुळे स्त्रोतसांचा अवरोध करणें, कफाची वृद्धि करणें, बल, वर्णकर, वातपित्त, रक्तदोष नाशक असतें. अर्थातच अग्निमांद्य नाहीं, पचनक्रिया उत्तम आहे. परंतु बल पुष्टि असावी अशा लोकांनीं केळांचें सेवन अवश्य करावें. आंबट रस यांत नसल्यामुळें इतर फळांप्रमाणें पिकलेलें केळें भोजनोत्तर न खातां सकाळीं खाणें अधिक योग्य. थोड्यांत समाधान हा याचा विशेष गुण प्रत्ययास येतो व म्हणून अन्नाची कमतरता असतां गरिबांनीं केळांचा आहार करावा. थोड्या खर्चांत पुरेसें खाद्य मिळाल्याचें समाधान प्राप्त होतें. "धनक्षये वर्धति जाठरोऽग्निः" हें सुभाषित लक्षांत घेतलें तर श्रीमंतांपेक्षां गरिबांचें भुकेचें प्रमाण व पचनशक्ति तीव्र असल्यानें जणूं काय त्यांचेसाठींच ह्या फळाची निर्मिति परमेश्वरानें केली आहे असें म्हणतां येईल. एका विशिष्ट जातीच्या केळांना सुकवून वसई-आगाशीकडें सुकीं केळीं बनवतात. फार उत्तम मेवा आहे तो. स्रोतसांचा अवरोध करण्याच्या धर्मामुळें निरनिराळ्या द्वारें रक्त पडत असतां म्हणजे कफांतून, अथवा मल, मूत्र किंवा गर्भाशयमार्गांतून रक्तस्राव होत असतां पिकलेलें केळें हितावह होतें.

पचन कमीं परंतु विकाराचे दृष्टीनें केळें खाणें तर अवश्य असें असतां वेलदोड्याची पूड व मध एकत्र करून त्याबरोबर केळे खावें, म्हणजे पचन ठीक होतें. वेलदोड्याचें केळाशीं अगदीं अहिनकुलवत् वैर आहे, केळ्यांचा कच्चा घड झाडावर असतां त्या घडाचा दांडा थोडा चिरून त्यांत वेलदोड्याची पूड संध्याकाळीं भरून ठेवल्यास एकारात्रींतून संपूर्ण घडाचीं केळें पक्व होऊन जातील. केळी खाऊन अजीर्ण

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

झाल्यास वेलदोडे खावे म्हणजे अजीर्ण नष्ट होतें. पाण्या-सारखें पातळ जुलाब होत असतां केळांस मध लावून यथा-प्रमाण खावें.

फणस:—चेहऱ्यानें उग्र दिसणाऱ्या परंतु अंत:करणाचें सदय पुरुषाची उपमा फणसाला देतां येईल. लंबगोल आकाराचीं एका तांब्या एवढचा व अधिकांत अधिक एका माणसाला उचलण्यास पुरेशा ओझ्या एवढीं वजनाचीं भक्कम अशी ही वरून हाताला बोंचणाऱ्या परंतु खरखरित काटयांनीं युक्त अशीं हिरवट रंगाचीं हीं फळें असतात. केळांप्रमाणेंच कच्चेपणीं त्याची सुद्धां भाजी होते. पक्व झाल्यावर या फळांच्या आंत गोड असे खजुराच्या आकाराचे गरे निघतात व तेच खाण्याचे कामीं येतात. शीत, स्निग्ध वात पित्त नाशक व म्हणूनच कांहींसे कफकर, बल वाढविणारे शुक्रबृद्धिकर असे याचे साधारणपणें केळयां सारखेंच गुणधर्म आहेत. पचनास जड आहेच. किंबहुना केळयांहूनहि पचनास यांना फार वेळ लागतो व याच्या उग्र वासाचे ढेकर बराच वेळ येत राहातात. परंतु अशा स्थितींत अथवा पचन झाले नाहीं किंवा याच्याच अतिरिक्त सेवनाचें कांहीं दुष्परिणाम झाले तर या गऱ्यांच्याच आंतील बी उतार म्हणून देतां येते हें या फळाचें वैशिष्टच आहे. केळांप्रमाणें दुसऱ्या द्रव्याची याचना करावी लागत नाहीं. इतर गुणांत केळांप्रमाणें असूनहि पक्वकेळांप्रमाणें हें अवष्टंभक नसून पक्वफणसाचे गरे सारक म्हणजे शौचशुद्धिकारक असतात. याच्या गऱ्यांच्या पोळचा करून टिकाऊ खाद्य म्हणून करून ठेवतां येतें.

पोपई:– नेहमीं मिळणारीं अशीं हीं फळें आहेत. कच्च्या फळांची भाजी होते. त्याचप्रमाणें प्लीहा म्हणजे पांथरी वाढली असतां कच्या फळांना चिरणी देऊन निघणारे दूध १ चमचाभर व साखर चमचाभर मिश्र करून सकाळीं प्रातर्विधी आटोपल्यावर खाण्यास द्यावें. दूध न निघाले तर कच्चें फळ किसून त्याचा रस काढून साखर घालून १॥-२ मासे मिश्रण दिवसांतून ३ वेळां दिल्यानेंसुद्धां वाढलेली प्लीहा कमी होते. पोपयीच्या दुधापासूनच विलायती पद्धतीप्रमाणें पॅपेन नांवाचें औषध तयार केलें जाते व तें सारक, पाचक असून यकृत प्लीहाजन्य सर्व विकारांवर फायदेशीर होतें. ळकच्च्या फांचा कीसहि वाफ देऊन पांथरीवर बांधतात.

हीं फळें फार उष्ण असल्यानें गरोदर स्त्रियांना देऊं नयेत. मलावष्टंभ प्रवृत्ति असणारांनीं रोज प्रात:काळीं पक्व पोपईचें सेवन करावें. हीं फळेंसुद्धां भोजनोत्तर खाण्यापेक्षां सकाळींच खाणें चांगले. आतां भाजी म्हणून नव्हे परंतु केवळ फलाहार दृष्टीनेंच नित्य खाण्यांत यणाऱ्या किंवा यथाशक्ति खाण्यास आवश्यक अशा फळांचा विचार करू.

आंबा:– पक्व होण्यापूर्वी कैरी म्हणून लोणचे, पन्हे, मुरंबा, गुळांबा रूपानें उपयोग होत असल्याचें वर्णन पूर्वीं येऊन गेलेंच आहे. उत्तम पिकल्यावर अगदीं मधुर रस युक्त व कधींहि वीट म्हणजे खाण्याचा कंटाळा न येणारे फळ आहे. ह्या फळाच्या कितीतरो जाती आहेत. प्रत्येक प्रकारच्या फळाची गोडी, 'न्यारी' च असते. आंबे चोखून कितीहि खाल्ले तरी कंटाळा येत नाहीं पण तितक्याच आंब्याचा रस मात्र खाणें जड जातें. भोजनापूर्वी व भोजना मध्यें आंबे खातां येतात. संग्रहणी सारख्या रोगानें ग्रस्त लोकांनीं केवळ चोखून आंबे खाण्याचा व अन्न कांहींहि न घेण्याचा निश्चय सतत ३।४ महिने कायम ठेवला तर केवळ ह्या पथ्याहारामुळेंच जवळ जवळ रुपयांत बारा आणे संग्रहणी विकार नष्ट होतो, रोगी लालबुंद पडतो. वजन व उत्साह वाढतो असा अनुभव आहे. कांहीं आंब्यांच्या जाती केवळ चिरून फोडी खाण्यासारख्याच असतात. विशेषत: कलमी आंबे हे रस न करितां चिरुन खाण्याच्याच कामाचे असतात. तथापि एकमेव मधूर रसात्मक ह्या कलमी आंब्यांपेक्षां आम्ल रसाची किंचित् खारदार खुमारी असणारे रायवळ म्हणजे गावठी आंबे कांहीं और आहेत यांत शंका नाहीं. केळयाप्रमाणेंच केवळ आंबे खाऊन हंगामात पुष्कळ गरीब लोक आपला निर्वाह करीत असतात असें आढळलें आहे. मध्यंतरी आठळी आणि वर मगज अशी रचना ज्या ज्या फळांची असेल तीं तीं सर्वहि फळें मांस धातु प्रधान समजून बलमांसक्षीण रोग्यास अशी फळें मुद्दाम खाण्यास द्यावीं. "वृद्धि: समानै: सर्वेषाम्" या दृष्टीनें आंबा, फणस जांभूळ इ.

मद्रास आयुर्वेदिक इंजेक्शन्स व बी. टी.
होमिओपाथिक इंजेक्शन्स करितां
प्रत्येक तालुका व प्रमुख शहरासाठीं एकेक एजंट नेमावयाचा आहे. अटी व माहिती पत्रक याकरितां लिहा—
सोल डिस्ट्रिब्यूटर्स
Dr. Y. VENKATRAO & Co.
Ragireddi Buildings
AMALAPURAM [S. India]

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

फळें मांस कमी म्हणजे कृश शरीरी लोकांनीं त्या त्या हंगामांत अवश्य यथाशक्ती खावीं. आंब्याच्या वडचा, पोळचा हे दिवाळ कल्प होत.

नारळः– शहाळें नारळ व सुकें खोबरें अशा तीन अवस्थांचे रुपानें नारळ खाल्लें जातात. नारळाची वरची करवंटी अगदीं टणक होण्या पूर्वी तें कोवळचा स्थितींत असतां करवंटी विळचानें, किंचित छाटून त्या कोवळचा फळांतील थंडगार व गोड पाणी आणि अगदी पापुद्रचासारखे असलेलें खोबरें (मलई) हचांची मजा कोकणापेक्षा देशावरील लोकांना अभिनव पूर्ण वाटल्यास नवल नाहीं:

पक्का नारळ आंत पाणी असतांना फोडून पाणी पिण्याच्या व ओलें जाड खोबरें खाण्याच्या कामीं येतें. तथापि फलाहार दृष्टीनें हचा नारळाचा उपयोग सहसा केला जात नाहीं म्हटलें तरी चालेल. बहुधा ओला नारळ फोडून त्याचें खोबरें खिसून तें अन्य पक्वान्नांत मिश्र किंवा वरून टाकलें जातें. आणि देवदर्शन निमित्तानें नारळ फोडून प्रसाद म्हणून खोबऱ्याचे तुकडे वाटले जातात. टणक कवटीचे आंत सुमधुर सुधीत जलयुक्त हा गाभा खरोखरच दाह शामक व पौष्टीक आहे. जसा मनुष्य शरिरांत कवटीचे आंत मेंदु तसा हचा नारिकेल फलाचा प्रकार आहे. विशेषतः समुद्र कांठाच्या खाऱ्या हवेंतच हचा वृक्षाची जोपासना होते. आणि समुद्रलगतची जमीन अन्नधान्याच्या दृष्टीनें तितकीशी उपयोगी नसते. तांदळासारखें पुष्कळ पाण्याचें पीक तेथें अधिक होते; तथापि तांदूळ हें धान्य तितकेंसें पौष्टिक नाहीं, म्हणून शक्तिसाठीं त्यांच्या जोडीला हा नारळ पदार्थ विधात्यानें निर्माण केला असावेसें वाटतें. बस्तिशोधक, मलावष्टंभक पौष्टिक, शक्तिवर्धक, शुक्रवर्धक हे त्याचे गुण लक्षांत घेतां ईश्वराच्या सृष्टि रचनेंतील चातुर्याची साक्ष पटते. जसें अन्नजल सेवन केलें जातें त्याच रंगारूपाची प्रजा निर्माण होते. हा नियमहि यानिमित्तानें ईश्वरी सृष्टींत पाळला जात असला पाहिजेसें वाटतें. नारळ, नारळाचें दूध, तांदूळ व त्याचे पदार्थ हे शुभ्रवर्णी असल्यानें, 'अन्नात् भवन्ति भूतानि' या नियमान्वये समुद्र कांठच्या प्रदेशांतील लोकांचे शरीर वर्णहि विशेषतः गौर असल्याचेंच आढळतें. ज्वारी, बाजरी, गहू, इ. श्वेतेतर रंगाचें धान्य सेवन करणारी प्रजा तशी नसते. तीत तांबुस, काळी निमगोरी इ. वर्णाचीच फार करून आढळते हें विसरून चालणार नाहीं. तसेंच शक्तीच्या दृष्टीनें तांदूळ इ. सारखें हलकें धान्य व ज्वारी गहू धान्येंहि अवश्य आपला प्रभाव दाखवितातच. अस्तु! एकूण नारळ हा पदार्थ आहार्य म्हणून आहे खरा, परंतु जसें केवळ आंब्यावर राहून दिवस काढतां येतील तसे नारळावर राहून काढणें शक्य नाहीं. व तें हितावहहि होणार नाहीं. म्हणूनच नारळाचा उपयोग केवळ फलाहारांत स्वतंत्र असा थोडा पण पूरक फलाहार म्हणूनच फार होऊं शकतो हें निश्चित! जेवणानंतर सुकें खोबरें चावून खाण्यास किंवा पाण्यांत हरबऱ्याची डाळ, सुकें खोबरें व खारीक हीं द्रव्यें रात्रीं भिजवून सकाळीं चावून खाणें हा एक अंगमेहनत व व्यायाम करणाऱ्या गरीब तरुणांस उत्तम खुराक आहे.

आयुर्वेदाच्या क्षेत्रांत अद्वितीय

अशा शक्तिशाली

अरविंद आयुर्वेदिक इन्जेक्शन्स

चा उपयोग करून रोग्यांना शीघ्र निरोगी करा व यश मिळवा, शक्ति व शुद्धता याबद्दल पूर्ण गॅरंटी दिली जाते. सूचिपत्र मागवा—

सचित्र आयुर्वेदीक इंजेक्शन चिकित्सा–

मूल्य ३ रु. पोस्ट खर्च १० आ.

व्यवस्थापकः— **अरविंद केमिकल वर्क्स**

छिंदवाडा (सी. पी.)

दमा हटतो

तो कायमचाच. पुरोहित श्वासहारी हें एकच २८ वर्षे सतत प्रख्यात व अनुभविक असें वनस्पती औषध आहे कीं, जे तात्काळ आराम देऊन आस्ते आस्ते दमा बरा करतें. औषध घेण्यास सुरुवात करतांच कफ सुटतो, धांप कमी होते, पचनक्रिया सुधारते व फुफ्फुसें मजबूत होऊन कांहीं कालानंतर दमा निखालस बरा झाल्याचा अनुभव येतो. रु. ३।।, ६ व १० किंमतीच्या पॅकिंग मधून सगळीकडे विकत मिळतें अगर

कारखानदार

डॉ. पुरोहित फार्मसी, कोल्हापूर (एस. एम. सी.)

पुरोहित श्वासहारी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

औषधी–परिचय

त्रिधारी निवडुंग

लेः—गो. आ. फडके आयुर्वेदाचार्य

नांवे–सीहुण्डः सिंह तुण्डः स्याद्वज्री वज्रद्रुमो ऽ पिच । सुधा समंत दुग्धाच स्नुक् स्त्रियां स्यात्स्नुही गुडा ।। भा. प्र.
हिंदी–थूहर, सेहुंड. मराठी-तीनधारी निवडुंग
Triangular sponge. milks Hedge

वर्णन–ह्या निवडूंगास तीन धारा असून धारांच्या कांठावर कांटे असतात.

औषधी उपयुक्त भाग:—ह्याची मुळे, दांडा व चीक औषधांत वापरतात

उपयुक्त भाग– दांड्याचा तुकडा फोफाट्यांत जरा भाजून रस काढावा व तो रोगांत वापरावा.

ग्रंथोक्त गुण:—

सीहुण्डो रेचनस्तीक्ष्णो दीपनः कटुको गुरुः ।
शूलमष्टीलिकाध्मान कफगुल्मोदरानिलान् ।
उन्मादमेहकुष्ठार्शः शोथमेदोऽश्मपाण्डुताः ।।
व्रणशोथ ज्वरप्लीह विषदूषी विषं हरेत् ।
उष्णवीर्यं स्नुहीक्षीरं स्निग्धंच कटुकं लघु ।
गुल्मिनां कुष्ठिनांश्चापि तथैवोदररोगिणाम् ।।
हितमेतद्विरेकार्थे ये चान्ये दीर्घ रोगिणः ।। भाः प्र.

रसः– याचा रस कटु म्हणजे तिखट सांगितला आहे. व या रसाला अनुसरून याचीं कार्यें दीपन भेदनादि घडतात.

विपाकः— विपाकाचा नामनिर्देश ग्रंथांत नाहीं. तरि कटुरसानुसार याचा विपाकही कटुच होणार म्हणून या वनस्पतीचा विपाक कटु समजावा.

वीर्यः— रसाः कट्वम्ललवणा वीर्येणोष्णा यथोत्तरम् । तिखट रसाचें वीर्य नेहमीं उष्ण असणार याप्रमाणें याचेंही वीर्य उष्णच आहे.

याचे उष्ण वीर्याचे जोडीला तीक्ष्ण धर्म असल्यानें भेदन–रेचन वगैरे धर्म याचे ठिकाणीं आहेत व याच गुणावर पुढें सांगितलेलें, गुल्म, अष्टीला, उदर वगैरे रोगाचे नाश करण्याचें कार्य स्नुहीकडून होतें.

गुरुः—रस, विपाक, व वीर्य, यांचे दृष्टीनें पाहता, हे द्रव्य लघु असावयास पाहिजे होते, पण, हे द्रव्य गुरु आहे. यावरून या द्रव्याचे कार्य अधोगामी या स्वरूपाचे घडणार हे सिद्ध होते.

दोषावर कार्य—

• ***वातः***—उष्ण, व गुरु या गुणाखेरीज बाकीचे गुण वातवर्धक आहेत.

पित्तः—तीक्ष्ण, उष्ण, कटुरस, हे सर्व गुण पि[त्त] वर्धक आहेत.

कफः—तीक्ष्ण, उष्ण, कटु हे गुण कफनाशक आहे[त].

धातूवर कार्य—

धातुनाश करणारे याचे सर्व गुण आहेत. विशेषतः मे[द] धातूवर याची क्रिया घडते. मांस व मेद यांचे परमा[णू] तीक्ष्ण, उष्ण गुणांनीं झिजवणें व त्यांच्या, आकृतीत प्रकृतीत बदल करणें हे याचे कार्य आहे. ही चिक[ट] वनस्पति असल्यानें त्याचे कार्य दुग्धावर होते. रसधा[तू] स्तन्य, रजयांची शुद्धी होऊन त्या त्या मलायनाकडे पित्त[ा] प्रकोप या वनस्पतीनें होऊं लागेल.

स्नुहीची इतर कार्ये व रोगांत उपयोग—

दीपनः—स्नुहीचा रस, तिखट आहे. विपाक[ही] तिखट होतो. तिखट रसांत अग्नि व वायु या पंचमहाभूतां[चे] आधिक्य असल्यानें, याचे अग्नी दीपनाचे कार्य होते. याचेच जोडीला, तीक्ष्णता हा गुण व उष्णवीर्य येऊन मिळाल्यानें, अग्नीदीपन हा धर्म उत्कटतेनें दृष्टो[]त्पत्तीस येतो. यामुळें याचे अग्नीदीपन हे कार्य दोन तऱ्[हेनें] होते. प्रत्यक्ष अग्नीस तीक्ष्ण, उष्ण गुणांनीं चेतना दे[ऊन] वाढविणें, व दुसरा प्रकार म्हणजे कफानें अग्नि आ[वृत] होऊन तो जर मंद झाला असेल तर तीक्ष्ण उष्ण धर्मानें कफाचा नाश करून अग्नीदीपनाचे कार्य स्नुही[चे] होईल.

रेचनः—त्रिधारी निवडुंग तीव्र रेचक आहे. ब[] श्मन्तकं विद्यात्स्नुहिक्षीरं विरेचने ।। चरक क्षीर विरेचना[त] स्नुही श्रेष्ठ आहे. उष्ण वीर्याचे जोडीला तीक्ष्ण गु[ण] मिळाल्यानें रेचनाचे कार्य तीव्र स्वरूपाचे होते. आणि बरो[बर] गुरु गुण असल्यानें अधोगामि हे कार्य दिसते. जर गुरु गुण जोडीला नसतां तर हे द्रव्य तीव्र वामक असें कदाचि[त] ठरले असते. पण गुरु गुणामुळें तीव्र रेचक असे कार्य होते.

कटुरस, ऊष्ण तीक्ष्ण या गुणांनीं आतड्यांत क्षोभ दाह निर्माण केला जातो. व धातू कडील दोष आतड्[यांत] खेचले जातात व यामुळें आतड्यांत पुष्कळ द्रव नि[र्माण] होऊन पाण्यासारखें पातळ शौचास होते. व पुष्कळ द्रव पद[ार्थ] जुलाबा वाटे बाहेर टाकले जातात.

स्नुहीच्या या विरेचक गुणामुळें उदर गुल्म इत्य[ादि] व्याधींत यांचा उपयोग होतो म्हणून याचे रेचक धर्म[ाला] विशेष महत्व आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शूल–शूल या शब्दानें सामान्यतः कोष्ठांतील शूल असा अर्थ घ्यावयास हरकत नाहीं. हा शूल विकृत झालेल्या वायू–पासून केव्हांही निर्माण होऊ शकेल. स्नुहीनें शूल थांबतो. म्हणजे त्यापासून रुद्ध झालेल्या वायूची गति ताळ्यावर येते. आध्मान, उदर, गुल्म, इत्यादि विकारांत वायु विकृत होतो व त्यामुळें भलत्याच दिशेनें त्याचे व्यापार चालू असतात. अशा वेळीं त्याला योग्य मार्गावर आणण्याचे कार्य स्नुहीनें होते. व या रोगांत विकृत झालेल्या वायुमुळें होणारा शूल थांबतो.

किंवा अपाचित द्रव्यांचा शरिरांत संचय झाल्यानें शूल होत असतो. असा संचय आंतडचांत झाल्यानें शूल होतो. स्नुहीच्या रेचन गुणानें आमाचे निःसारण होते. व शूल कमी केला जातो.

आम– अग्नीच्या दौर्बल्यानें अपाचित राहिलेला भाग म्हणजेच आम होय. या ठिकाणीं आमनाशनाचें कार्य दोन तऱ्हेनें होऊ शकेल. (१) पहिला प्रकार म्हणजे कटुरस, उष्ण वीर्य, दीपन गुण यामुळें अग्नि प्रदीप्त केला जाईल. व प्रज्वलित अग्निनें अपाचित अन्नाचें म्हणजे आमाचे पचन होईल. (२) दुसरा प्रकार म्हणजे रेचन गुणांनीं साठलेल्या दोषांना बाहेर काढून टाकून आमनाशनाचे कार्य होईल. अशा दोन तऱ्हेनें आमनाशनाचे कार्य होईल. पण आमावस्थेंत दोषाचे स्थान व प्रमाण पाहून चिकित्सा करावी लागते. आमाशय हे स्थान असेल तर वमन, व दोष पक्व होऊन पक्वाशयाश्रयी असले म्हणजे विरेचन द्यावयाचे असते.

अष्ठीलिका–फणसाच्या आठळी प्रमाणें मूत्रद्वाराच्या व मलद्वाराच्या मध्ये फुगवटी येते. (Enlarge Prostate) व यामुळे मूत्र व मल प्रवृत्ती बरोबर होत नाहीं. मूत्र संचय व मलसंचय होतो. या ठिकाणीं स्नुहीनें अनुलोमन रेचन ही कार्यें होऊन पोट मोकळे होते. मलसंचय होत नाहीं. व यामुळे मूत्रप्रवृत्ति होण्यास मदत होते.

त्याच प्रमाणें तीक्ष्ण, उष्ण कटु या गुणांनी अष्ठीलिकेत झालेला दोषांचा संचय व धातूंची वृद्धि छेदन, भेदन गुणांनी कमी कमी केली जाते. व या मुळे अष्ठीलिकेची झालेली वाढ कमी होते. यावर शस्त्र कर्म हा चांगला उपाय आहे.

आध्मानः—या विकारांत वायुमुळें पोट फुगतें. मल-संचयाचा परिणाम म्हणून वायूची अनुलोम गति कमी होते व त्यामुळें पुरःसरण नीट न झाल्यानें मल सडतो नासतो व कुजण्याची क्रिया होऊन त्यांत वात (गॅस) निर्माण होतो व पोट फुगतें. स्नुहीनें वायूचें अनुलोमन होऊन मलनिःसारणाचें कार्य व्यवस्थित होतें. व पोटफुगी थांबते. अशा ठिकाणीं कित्येक वेळां सौम्य औषधें देवून भागत नाहीं. कारण मलाचा जबरदस्त संचय असतो तो नाहींसा करण्यास स्नुही-सारखें तीव्र रेचक वापरावें लागतें. (याचा अर्थ– उदावर्त किंवा अॅक्यूट इन्टेस्टायनल आॅव्स्ट्रक्शनमध्यें स्नुही वापरावी असा नाहीं. अशावेळीं बस्ति द्यावा. तेवढ्यानें न भागल्यास शस्त्रकर्म करणें चांगलें.)

गुल्मः—गुल्मामध्ये वात प्रधान दोष असतात. वात वाढविणारी निरनिराळी कर्मे केल्यानें, व त्याचे जोडीला विदाही पदार्थ खाल्ल्यानें, कफनाशक अन्न खाल्ल्यानें, पचन मार्ग,महास्रोतस यांतील वायु कुपित होतो. व तो कफास एकेठिकाणीं जमवून एक ग्रंथी निर्माण करितो. यास गुल्म म्हणतात. यामध्यें मलाचा अवरोध असतो, शूल असतो व ज्या दोषाचे प्राधान्य असेल त्या त्या दोषाची विशेष लक्षणें त्या ठिकाणीं असतात. अशा प्रकारच्या गुल्मांत स्नुहीचा रेचक म्हणून चांगला उपयोग होतो, असें प्राचीन ग्रंथकार प्रशंसोद्गार काढतात. कफनाशन, वातानुलोमन, व रेचन या तीनीही गुणांनीं गुल्मनाशनाचे कार्य होते. संचित झालेल्या कफभूयिष्ठ धातूंचे लेखन व भेदन करून रेचन धर्मानें त्याचे निःसारण करणें या गुणांनीं गुल्म नाशनाचे कार्य होते.

उदरः—

रोगाःसर्वेऽपि मंदेऽग्नौ सुतरामुदराणि तु ।
अजीर्णान्मलिनैश्चान्नैर्जायन्ते मलसंचयात् ।।
दोषातिमात्रोपचयात् स्रोतोमार्ग निरोधनात् ।
संभवत्युदरं तस्मान्नित्यमेनं विरेचयेत् ।।
स्नुक्क्षीरयुक्ताद्गोक्षीराच्छृतशीता त्वजाहृतात् ।
यज्जातमाज्यं स्नुक्क्षीरसिद्धं तश्चतयागुणम् ।।
उपयुंजीत जठरी दोषशेषनिवृत्तये ।
सहस्रं पिप्पलीनां वा स्नुक्क्षीरेण सुभावितम् ।।

वाग्भट.

गुल्मांत संचय स्थानिक असतो, पण उदरांतील दोष-संचय उदरांत सर्वत्र पसरलेला असतो. स्रोतसें मोकळीं, उघडीं व्हावींत व त्यांतून दोष जुलाबावाटे निघून जावेत यासाठीं स्नुहीसारखे तीव्र रेचकाची आवश्यकता असते. विशेषतः कफोदर, बद्धोदर, जलोदर अशा दोषबहुल उदरांत स्नुहीची अवस्था येते.

उन्माद—स्नुहीचे हे कार्य फारसे महत्वाचे नाहीं, आतडचांत मलसंचय होऊन ही विषें मलावाटे रक्तांत शोषली जातात व त्यांचा मेंदूवर अनिष्ट परिणाम होऊन एक प्रकारची उन्मादावस्था प्राप्त होते अशा ठिकाणीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रेचनाचे कार्य करून ज्या स्थळीं विशेष विषें निर्माण होतात ते स्थळ स्वच्छ करण्याचे कार्य स्नुहीनें होते. त्याचप्रमाणें मेंदूत रक्तसंचय फाजील झाल्यानें त्याचा ताण मेंदूतील निरनिराळ्या केंद्रावर होऊन उन्मादासारखी अवस्था प्राप्त होते. अशा वेळीं तो ताण निघून जावा व रक्ताचा प्रवाह मेंदूमधून आंतड्याकडे अधिक गेला तर मेंदूतील संचय कमी होऊन स्वास्थ्य लाभणे शक्य असते. अशा ठिकाणीं रेचक म्हणूनच स्नुहीचा उपयोग होतो प्रत्यक्ष, उन्माद किंवा वेडेपणा घालविण्याचा गुण यांत नाहीं. किंवा हे द्रव्य मेध्यही नाहीं अप्रत्यक्षपणें हे कार्य घडते.

मेह– कफजन्य प्रमेहांत याचा उपयोग होईल. व रेचक म्हणून रोग्याच्या शक्तीनुरूप हें द्रव्य वापरतां येईल. प्रमेह पीटिकांच्या पूर्वरूपांत तीव्र विरेचनाची अवश्यकता असते त्या ठिकाणीं स्नुहीचा उपयोग होईल.

"तीक्ष्णंच शोधनं प्रायो दुर्विरेच्याहि मेहिनः"

प्रमेहांत दोषांचा प्रवाह अन्तः कोष्ठातून मध्यम मार्ग किंवा शाखा यांचेकडे असतो व स्निग्ध द्रव द्रव्यें जास्त प्रमाणांत मूत्रावाटे निघून गेल्यानें मळाकडे त्याचें निःसारण होण्यास कमी पडतात व त्यामुळें मेही माणसाला साधे सौम्य विरेचन लागू पडत नाहीं. आंतड्यांत क्षोभ निर्माण करून आंतड्यांकडे द्रव द्रव्यांचा ओघ ओढून आणून मूत्र मार्गाकडील क्लेदाचा प्रवाह थांबविणारे जोरदार विरेचन द्यावे लागतें. त्याशिवाय मूत्रमार्गाकडील दोषाची प्रवृत्ती पालटत नाहीं. स्नुहीसारखे तीव्र विरेचन अशा अवस्थेंत वापरणें श्रेयस्कर असते.

कुष्ठः—कुष्टांत प्रायः याचा उपयोग बाहेरून लेप लावण्याचे कामीं करितात. विशेषतः कफज कुष्ठांत, कुष्ठ, स्थिर, घन. असे असते अशा वेळीं भेदन करण्यास याचा उपयोगी पडतो.

अर्शः— मुळव्याधींतील, गुदद्वारांत येणारे मांस झडून जाण्यास याच्या चिकाचा उपयोग सांगितला याचे जोडीला तत्सम, चित्रक, दन्ती, यासारखी औ वापरतात. यांचे तीक्ष्ण उष्ण गुणानें मांसाकुरांचें भे होऊन तेथें सांठलेले दुष्ट रक्त वाहून जाते व मग मुळव्या नाहींशी होते. मुळव्याधींत स्नुहीचा पोटांतून उपयो सांगितलेला आढळत नाहीं. फक्त लेपाचाच उपयो दिसतो.

शोथ-सूज:—शरिराच्या कोणत्याही भागांत ज संचय होऊन सूज येते. मग तो जलसंचय मूत्रल औ देंऊन मूत्रमार्गानें, किंवा स्वेदल औषधें देऊन घामाव अथवा, रेचक औषधें देऊन जुलावावाटे घालवावयाचा अस अशा तऱ्हेनें सूजेमधील जल बाहेर काढून टाकल्यावर ओसरते व या ठिकाणीं रेचनानें, सूज नाशनाचें कार्य हो हे औषध देत असतांना रोग्याच्या बलाचा पूर्ण विच केलेला असला पाहिजे. कारण स्नुहीसारख्या तीव्र रेचन शक्तिपात होण्याचा संभव असतो.

मेदः—हें कार्यही विरेचन धर्मानें होतें. मेदोवृद्धी वर नेहमीं कर्षण चिकित्सा करावी लागते. या दृष्टीनें उपयुक्त आहे.

अश्मरीः—स्नुहीचे तीक्ष्ण, उष्ण गुणानें मूतखड्या भेदन होतें. विशेषतः याचा या ठिकाणीं क्षार क वापरावा.

पांडुरोगः—कफज पांडुरोगांत रेचन म्हणून उपयो पडेल.

रामतीर्थ ब्राह्मी तेल

(स्पेशल नं. १) (मेडिकेटेड) डोक्याचे ज्ञान व क्रियातंतु बलवान करते केस काळे आणि मजबूत होतात. टक्कल पडलेल्या जागीं पुन्हां केस येतात. खवडे उवा, लिखा यांचा नाश होतो. स्मरणशक्ति वाढते. डोळ्यांत घातल्यानें दृष्टी सुधारते. कानांत टाकल्यानें कानाचे रोग नाहींसे होतात. गाढ झोप लागते.

सर्वऋतूंत सर्वांना उपयोगी. सर्वत्र मिळते. मोठी बाटली किं. ३-८-०, लहान बाटली किं. रु. १.

श्री रामतीर्थ योगाश्रम, ८ उमेश धाम, २ रा विन्सेंट स्क्वेअर, दादर जी. आय्. पी. रेल्वे स्टेशन जवळ, मुंबई १४.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व्रणशोथः—तीक्ष्ण उष्ण गुणांनीं व्रणशोथनाशनाचें कार्य होतें. या ठिकाणीं कार्य चिकाच्या लेपानें होतें व या ठिकाणीं भेदनाचें कार्य प्रमूख आहे.

दंतीचित्रकमूलवक् सौधार्क पयसी गुडः ।
भल्लातकास्थि कासीसं लेपो भिद्याच्छिलामपि ॥

अशा तऱ्हेचा उत्कृष्ट लेप ग्रंथीविसर्पांत सांगितला आहे. त्यांतील सर्व औषधें तीक्ष्ण उष्ण गुणाचीं व भेदन करणारीं आहेत.

ज्वर– आमज्वर चिकित्सेंत सहसा याचा उपयोग करू नये. तरीपण कांहीं सिद्धौषधी चिकित्सक विरेचन देऊन पक्व ज्वराची आपत्ति टाळण्याचा प्रयत्न करितात. व यासाठीं मेघनाद, इच्छाभेदी अशी औषधें वापरतात. या दृष्टीनें स्नुहीचा उपयोग होणें शक्य आहे.

विषम ज्वरांत ·दोष पक्वाशयांत आश्रय करून बसले असतां त्यांचा नाश करण्यासाठीं हे द्रव्य पाळी भरण्यापूर्वी रेचक म्हणून वापरता येईल. वाग्भट किंवा चरक यांच्या ज्वर चिकित्सेंत या द्रव्यांचा उल्लेख नाहीं.

प्लीहा– याचे अंगच्या शोधन धर्मानें प्लीहा नाशनाचें कार्य होते. प्लीहेत साठलेला संचय याच्या विरेचक गुणानें कमी होऊन प्लीहा वाढलेली कमी होते.

विषः– विषनाशन हें कार्य रेचन गुणांनीं होते. विष पोटांत गेल्यावर म्हणजे ते रक्तांत शोषण्यापूर्वी तावडतोब वमन विरेचन देऊन बाहेर काढून टाकावे असें सांगितलें आहे. म्हणून विषाच्या ज्या सात अवस्था सांगितल्या आहेत. त्यांपैकीं अगदीं पहिल्या अवस्थेंत वमन द्यावें असें सांगितलें आहे व दुसऱ्या अवस्थेंत विरेचन देऊन शक्य तर विषाचे रक्तांत शोषण होण्यापूर्वींच शरिराच्या बाहेर काढून टाकण्याचे कार्य करावे म्हणून विषाच्या द्वितीय अवस्थेंत रेचक म्हणून स्नुही द्यावी.

दूषी विषः—जुने, ऊन, वारा, पाऊस, अग्नि इत्यादिकांनीं हतवीर्य झालेलें. किंवा मुळचेच कमी विषाचे पदार्थ यांना "दूषीवीष" असें म्हणतात. हे अल्प वीर्य असल्यानें शरिरांत पुष्कळ दिवस राहते. व यांत एकदम तीव्र लक्षणें होत नाहीत. अशा दूषीविष बाधेंत स्नुहीचा विरेचन म्हणून उपयोग करावा.

हे सर्व सामान्य स्नुहीचे गुणधर्म सांगितले आहेत. त्याचे कार्यकारी "क्षीर" चीक हे आहे. स्निग्ध गुण यांत असल्यानें वात शमनाचे कार्य होईल, पण हे जहाल औषध असल्यानें याचा जपून उपयोग करावा. येवढाच तांबडा कंदील दाखवून ह्याचे गुण पुरे करितो.

विरेचनांना तीक्ष्णांनां पयः सौधं परं मतम् ॥
अज्ञप्रयुक्तं तद्हन्ति विषवत् कर्म विभ्रमात् ॥

आयुर्वेदीय अर्कशाला

आयुर्वेदीय औषध-विक्रेत्यांना विनंति

अर्कशालेच्या स्थापनेस येत्या विजया दशमीस पंचवीस वर्षें पुरीं होत आहेत. सुप्रसिद्ध आयुर्वेदसेवक **डॉ. मो. ना. आगाशे** यांनीं १९२६ सालच्या विजया दशमीस अर्कशालेची स्थापना केली. डॉ. आगाशे यांनीं १९१८ सालापासून आयुर्वेदाच्या शिक्षण–संशोधन कार्याला वाहून घेतलें आहे. त्यांनीं जोपासलेल्या आयुर्वेद प्रसारक मंडळी या संस्थेच्या नित्यनैमित्तिक खर्चाची व्यवस्था अर्कशाळेच्या नफ्यांतून व्हावी अशी डॉ. आगाशे यांची योजना. या हेतूनें स्थापन झालेली अर्कशाला म्हणजे निस्वार्थी कार्यकर्त्यांचें एक सेवा-क्षेत्रच होय.

अर्कशाळेची व्यवस्था कोणत्याहि मॅनेजिंग एजन्सीकडे नाहीं. तिचे संचालक मंडळ कोणत्याहि स्वरूपांत वेतन घेत नाहीं, आणि या संचालक मंडळांत प्रामुख्यानें वैद्य, डॉक्टर व सार्वजनिक कार्यकर्ते यांचाच समावेश आहे हें या कंपनीचें महत्वाचें वैशिष्ठय होय. कंपनीनें १९५० सालीं झालेला नफा डिव्हिडंड रूपानें वाटलेला असून यापुढे प्रतिवर्ष कंप–नीचें पाऊल पुढेच पडत राहील असा विश्वास आहे.

विक्रेत्यांना विनंति

अर्कशाळेनें सध्या शेअर-विक्रीस आरंभ केलेला आहे. हे शेअर्स बहुसंख्येनें अर्कशाळेच्या औषध–विक्रेत्यांनींच घ्यावे अशी संचालक मंडळाची इच्छा आहे. विक्रेत्यांच्या सह–कार्यानें कंपनीच्या विक्रीत वाढ व्हावी, आणि त्यांतून निर्माण होणारा नफा पुन्हां विक्रेत्यांनाच मिळावा अशी ही योजना आहे. अर्कशाळा ही औषध–विक्रेत्यांनीं चालविलेली एक सहकारी संस्था ठरावी व या संस्थेमार्फत आयुर्वेद–सेवेचें कार्य चिरंतन स्वरूपांत होत राहावे हीच संस्थापक आणि संचालक यांची भूमिका आहे.

अर्कशाळेचे सर्वसाधारण शेअर्स प्रत्येकी फक्त रु५० चे आहेत व प्रारंभी त्यापैकी फक्त निम्मीच रक्कम भरावयाची आहे. प्रत्येक भागीदारानें कमीत कमी पाच शेअर्स घ्यावे अशी संचालकांची इच्छा आहे. अर्क शाळेचे विक्रेते ही योजना सहानुभूतिपूर्वक विचारांत घेतील अशी आशा आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अर्कशालेच्या विक्रेत्यांकरिता

अर्कशाला रौप्यमहोत्सव

आयुर्मीमांसा– विशेषांक

अर्कशालेच्या स्थापनेस येत्या विजयादशमीस पंचवीस वर्षें पुरी होत आहेत. त्या निमित्तानें आयुर्मीमांसेचा विशेषांक प्रसिद्ध व्हावयाचा आहे. या अंकांत अर्कशाळेच्या विक्रेत्यांचा परिचय करून देणारें एक सदर समाविष्ट व्हावयाचे आहे. कंपनीच्या विक्रेत्यांना यासंबंधी स्वतंत्र सविस्तर पत्रें जातीलच. या सदरांत परिचय प्रसिद्ध करण्याकरिता प्रत्येक विक्रेत्यानें पुढील माहिती सामान्यतः धाडावी.

१ स्वतःचें संपूर्ण नांव २ दुकानचें नांव ३ दुकान भागीदारींत असल्यास भागीदारांची नांवे ४ दुकान केव्हां स्थापन झाले? ५ दुकानाची वैशिष्ठयें ६ अर्कशालेच्या मालाची वर्षाकाठीं किती विक्री होते ? ७ धंद्यासंबंधी व व्यक्तिसंबंधी सांगता येण्यासारखी विशेष माहिती. माहितीसोबत विक्रेत्यांनीं छायाचित्र पाठविल्यास ठीक होईल.

विक्रीवाढीची हाक

रौप्यमहोत्सवाच्या या वर्षांत विक्रीची जास्तींत जास्त वाढ व्हावी असे प्रयत्न कंपनीकडून चालू आहेत. विक्रेत्यांनीं या कामीं अधिकांत अधिक सहकार्य द्यावे. विशिष्ट मर्यादेहून अधिक विक्री करणाऱ्या विक्रेत्यांना 'ज्युबिली–बोनस' देण्या-संबंधीच्या योजनेचा विचार चालू आहे.

नवा उपक्रम

अर्कशाळेच्या वतीनें या महिन्यापासून व्यापार–वार्ता या नांवाचे नियतकालिक सुरु होणार आहे. या नियतकालिकांत औषध विक्रेत्याना उपयुक्त असणारी माहिती विशेषतः सर–कारी निर्बंध, कायदे इ. ची माहिती दिली जाणार आहे. हे नियतकालिक सर्व औषध–विक्रेत्यांना विनामूल्य पाठविले जाईल. तरी ज्यांचे पत्ते कंपनीकडे नोंदविलेले नसतील त्यांनीं ते नोंदवून ठेवावे.

अर्कशाला वृत्त

वैद्यसंमेलन

बेळगांव येथें मेच्या २७ व २८ तारखास भरले[ल्या] महाराष्ट्र प्रांतिक वैद्यसंमेलन प्रसंगीं अर्कशाळेनें अ[पला] स्टॉल ठेवलेला होता. स्टॉलची सर्व व्यवस्था कंपनीचे सेल[्स] आर्गनायझर ना. श्री. पाध्ये हे पाहात होते. कंपनीत[र्फे] प्रतिनिधी म्हणूनहि श्री. पाध्ये संमेलनास उपस्थित हो[ते.] स्टॉल पाहून व विशेषतः अर्कशाळेच्या पेटंट औषधांच[ी] माहिती समजावून घेऊन वैद्य मंडळींनीं समाधान व्यक्त केले. विशेषतः संमेलनाचे अध्यक्ष श्री. अभ्यंकर यांनीं अर्कशाळेच्या औषधाविषयीं संतोष व्यक्त केला.

चूर्ण–यंत्र

अर्कशाळेनें मागविलेलें चूर्ण–यंत्र (Disintegrator) बसविण्यांत आलेले असून ते लवकरच सुरू होईल. [या] यंत्राचा विशेष हा आहे कीं पाळेमुळें वा औषधी फळें यां[चे] चूर्ण हातोडयांच्या आघातानीं होते. दळणाप्रमाणें हे चू[र्ण] होत नाहीं त्यामुळे त्यांत उष्णता निर्माण होत नाहीं. [या] यंत्रामुळें चूर्णाचा भरपूर पुरवठा करतां येईल. व औषधी-उत्पादनाची गतिहि वाढेल अशी खात्री आहे.

नवी लेबल्स

अर्कशाळेच्या पेटंट औषधांना नवी कलात्मक लेबल्स करून घेण्यांत आली असून त्यांचा वापर सुरू झालेला आहे, विक्रेत्यांनीं पेटंट औषधांच्या आर्डर्स अवश्य पाठवाव्यात.

शेअरविक्री

शेअर विक्रीबाबत नुकतीच नवी मोहीम सुरू करण्यां[त] आलेली असून विक्रेत्यांमधून शेअर्सची विक्री होऊ लागलेल[ी] आहे. शेअर्स मर्यादित संख्येनेंच विकावयाचे असल्यानें विक्रे[त्यांनी] त्यांनी त्वरित माहिती मागवून घ्यावी.

औषधीकरण–सल्लागार

सोलापूर येथील ख्यातनाम वैद्य आ. वै. महा विद्या-लयाचे माजी विद्यार्थी व आयुर्वेदिक स्टेट फॅकल्टीचे नुकते[च] नियुक्त झालेले सदस्य वैद्यराज नृ. ना. बागेवाडीकर यां[नीं] औषधीकरण सल्लागार या नात्यानें कंपनीस सहकार्य देण्याचे आमची विनंती मान्य केली आहे. त्यांच्या व्यापक अनुभवा-चा कंपनीस निःसंशय बहुमोल लाभ होईल.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अर्कशाला निर्मिति

अर्कशाला–पेटंट औषधें

गंधर्व हरीतकी

दीर्घकालिन मलावरोधाची संवय, बद्धकोष्ठ, पोटफुगी, पोटांत गुबारा धरणें, शूल इ. विकारांवर सौम्य विरेचक म्हणून हें औषध नामांकित ठरलेलें आहे. वार्धक्यांतील वातविकारांवर गंधर्व हरीतकी अत्यंत हितकर असल्याचा अनुभव आहे.

द्राक्षा कुमारी

पाचक, अग्निदीपक, आमपाचक, कासश्वासनाशक व यकृत, प्लीहावृद्धीवर गुणकारी असा हा द्राक्षासव व कुमारी आसव यांचा संयुक्त कल्प आहे. लहान मुलांच्या विकारांवरील हें एक उत्कृष्ट औषध आहे.

यूटोन

गर्भरक्षक व गर्भपोषक औषधांचा हा कल्प गरोदरपणीं सतत घेत राहिल्यास गर्भस्राव वा गर्भपात यांची भीति राहात नाहीं. वांत्या, डोकेदुखी, मळमळ, अपचन हे गरोदरपणांतले त्रास दूर होतात. झोप चांगली येते. पचन सुधारते, दुग्धाशयांची स्वाभाविक वाढ होते. गर्भाशयाच्या विकारातहि हें औषध उपयुक्त ठरलेले आहे.

लोहिन

विविध कारणांनीं झालेल्या रक्तक्षयावरील हें रामबाण औषध आहे. ताज्या आवळ्यांचा रस, लोह, रौप्य, सुवर्ण–माक्षिक, शिलाजित इ. चा हा अवलेह कल्प असून यानें रक्तवृद्धि होऊन प्रकृति सुधारते. हें एक उत्कृष्ट टॉनिक आहे.

वसंत मिश्रण

जीर्णज्वर, रात्रीं घाम यणें, थकवा वाटणें, किंचित् खोकला, अंगाची रसरस ही लक्षणें म्हणजे क्षयाचे अग्रदूत होत. वसंत मिश्रण हा सुवर्ण व कॅलशियम युक्त कल्प असून तो सर्व धातुवर्धक, रसायन, बल्य, शरीरांतील प्रतिकारशक्तीची वाढ करणारा आहे. गरोदर स्त्रिया, सूतिका, मुलें व वृद्ध यांनीं त्यांचा अवश्य उपयोग करावा. ते एक नेहमीकरतां असलेलें टॉनिकहि आहे.

स्तन्यशोधन

हें औषध मातेच्या दुधांतील दोष नाहींसे करून शुद्ध दुधाची वाढ करतें. या औषधानें मातेची प्रकृतीहि सुधारते. दुधांतले दोष नाहींसे झाल्यामुळें तें बालकाला मानवतें व त्याला बाळसें येतें.

एग्युमिक्श्चर

सर्दी, पडश्यामुळें येणारा ताप, एन्फ्ल्यूएंझा, व विषमज्वर यासाठीं एग्युमिक्श्चर वापरावें. तें ज्वरघ्न, मूत्रल, स्वेदल व वेदना, तृषा, हृदयदौर्बल्य यांचा नाश करते. कोणत्याहि ज्वरांत नेहमीं उपयोगी पडणारें हें एक अनुभवसिद्ध औषध आहे.

ॲस्थ्मोलिन

दमा, डांग्या खोकला व जुनाट स्वरुपाचा त्रासदायक खोकला यांवर हें औषध गुणकारी आहे. यांत अभ्रक भस्मासारख्या आयुर्वेदांतील नामांकित औषधाचा समावेश असल्यानें कफस्थानावर उत्कृष्ट कार्य करणारा हा कल्प दम्यासारख्या विकारावर अत्यंत उपयोगी ठरला आहे.

अर्कशाळेचीं ही अनुभवसिद्ध औषधें वैद्यांनीं नित्य चिकित्सेंत अवश्य उपयोगांत आणावी. हीं औषधें तज्ज्ञ वैद्यांच्या मार्गदर्शनाखालीं तयार केली जात असून तीं सातारा येथील आयुर्वेद प्रसारक मंडळीच्या रुग्णालयांत गेली कित्येक वर्षें वापरली जात आहेत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेदीय अर्कशाला लि; सातारा.

शेअर विक्री सुरू आहे

अधिकृत भांडवल:— पांच लक्ष (५०००००) रुपयांचें असून तें पुढीलप्रमाणें विभागलेलें आहे.

(१) १२७ डिफर्ड शेअर्स, प्रत्येकीं रु. १०० चा— रु. १२७००
(२) ८७३ आर्डिनरी शेअर्स, प्रत्येकीं रु. १०० चा—रु. ८७३००
(३) ८००० आर्डिनरी शेअर्स, प्रत्येकीं रु. ५० चा—रु. ४०००,००

रु. ५०००,००

विक्रीस काढलेलें भांडवल:— रु. तीन लक्ष (रु. ३०००,००)

(१) १२७ डिफर्ड शेअर्स (प्रत्येकीं रु. १००) रु. १२७००
(२) ८७३ आर्डिनरी शेअर्स (प्रत्येकीं रु. १००) रु. ८७३००
(३) ४००० आर्डिनरी शेअर्स (प्रत्येकीं रु. ५०) रु. २०००,००

रु. ३०००,००

वरील विक्रीस काढण्यांत आलेल्या भांडवलापैकीं क्रमांक एक व दोनचे एक लक्ष रु. चे शेअर्स खपलेले आहेत. सध्यां फक्त प्रत्येकीं रु. पन्नासच्या ऑर्डिनरी शेअर्सची विक्री चालू आहे. डिफर्ड व ऑर्डिनरी या शेअर्समध्यें नफा वाटणीबाबत कांहींहि फरक नाहीं.

शेअर्सबाबत भरावयाच्या रकमा:—अर्जासोबत प्रत्येक शेअरमागें रु. १० प्रमाणें व अर्ज मंजुरीनंतर रु. १५ प्रमाणें एकूण फक्त पंचवीस रुपये भरावयाचे आहेत. उरलेली रक्कम संचालक मंडळ मागणी करील त्याप्रमाणें भरावयाची आहे.

शेअर अर्जाचे फॉर्म:—शेअर्सकरितां करावयाचा अर्ज कंपनीच्या छापील फॉर्मवर केला पाहिजे. हे फॉर्म कंपनीच्या केंद्रकार्यालयाकडून मिळतील. कोणाहि एका भागीदारास अधिकांत अधिक एकूण रु. ५००० किंमतीचे फक्त १०० शेअर्स घेतां येतील.

कंपनीची व्यवस्था:—कंपनीची व्यवस्था संचालक मंडळाच्या नेतृत्वाखालीं असून ती कोणत्याहि मॅनेजिंग एजन्सीकडे सोपविलेली नाहीं. संचालक मंडळ आजपर्यंत व सध्यांहि विनावेतन काम करीत आहे.

संचालक मंडळ : डॉ. वि. ल. आगाशे, एल्. सी. पी. एस्. चेअरमन.
श्री. रा. ना. गोडबोले, बी. ए., बी. कॉम., सी. ए. आय्. आय्. बी.
डायरेक्टर वेस्टर्न इंडिया विमा कंपनी लि; सातारा.
श्री. मो. ना. आगाशे, एम्. बी. बी. एस्. चेअरमन, वेस्टर्न इंडिया विमा कं. लि; सातारा.
डॉ. मे. ना. जोग, एम्. बी. बी. एस्. प्रिन्सिपॉल आर्यांग्ल वैद्यक महाविद्यालय, सातारा.
श्री. म. पां. गुर्जर, एम्. ए. डायरेक्टर वेस्टर्न इं. वि. कं. सातारा.
श्री. द. कृ. साठे, बी. ए. एल्. एल्. बी. वकील, सातारा.
वैद्य दि. वि. बोडस, आयुर्वेद विशारद.

सेक्रेटरी : श्री. के. जी. कुलकर्णी

ऑडिटर्स : मेसर्स पी. जी. भागवत चार्टर्ड अकौंटंटस् अँड ऑडिटर्स मुंबई.

बँकर्स : दि युनायटेड वेस्टर्न बँक लि; सातारा.
दि सातारा स्वदेशी कर्मशियल बँक लि; सातारा.

— शेअर अर्जाचे मागणीसाठीं लिहा —

सेक्रेटरी आयुर्वेदीय अर्कशाला लि. सातारा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वैद्यांकरिता सवलत योजना

आयुर्वेदीय अर्कशाळेने जुलै महिन्याकरिता वैद्यवर्गासाठीं एक योजना जाहीर केलेली असून या योजनेनुसार वैद्यांना नित्य चिकित्सेंत लागणारी औषधें सवलतीनें दिली जातील.

पत्र धाडून योजना मागवून घ्या.

सेल्स मॅनेजर,

आयुर्वेदीय अर्कशाला लि: सातारा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गरोदरपणीच्या आरोग्याचा नंदादीप

यूटोन

गर्भाशय व गर्भ यांना पोषक अशा नामांकित औषधी-द्रव्यांच्या संयोगापासून सिद्ध केलेला हा कल्प गर्भपाताची प्रवृत्ति, आकस्मिक गर्भस्राव व गर्भवतींचें अन्य विकार यांवर परिणामकारक उपाय ठरलेला आहे.

सुलभ प्रसूति आणि बाळसेदार बालक यासाठीं गरोदरपणीं सतत यूटोन घेत रहा !

सुखी मातृपदाची इच्छा यूटोन पुरी करील.

तें स्वादिष्ट आणि रुचकर आहे.

आयुर्वेदीय अर्कशाला लि.
सा ता रा.

हें मासिक श्री. विश्वनाथ लक्ष्मण आगाशे यांनीं आनंद प्रिंटिंग प्रेस, सातारा लि., येथें छापलें व आयुर्वेद वैद्यक महाविद्यालय, सातारा येथें प्रसिद्ध केलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गुरुकुल कांगड़ी

आयुर्वेद प्रसारक मंडळी सातारा या संस्थेचे पुरस्कृत मासिक

आयुर्मीमांसा

या अंकांतील विषय-

चंद्रप्रभा गुटी— नृ. ना. बागेवाडीकर
संधान-विधी— पु. वि. धामणकर.
फलाहार— दत्तात्रेयशास्त्री जळूकर.
बाल यकृतोदर— गो. वि. जोशी.
संपादकीय : वाचकांचा पत्रव्यवहार इ.

प्रमुख संपादक : वैद्यरत्न **गो. आ. फडके**,
आयुर्वेदाचार्य.

कार्यकारी संपादक : **व. ल. वट्ट**,
आयुर्वेद विशारद.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सविनय नमस्कार विशेष–

गेल्या अंकापासून शेकडो वैद्य आणि औषधविक्रेते याना आयुर्मीमांसेचा अंक सप्रेम भेटीदाखल धाडण्यांत येत आहे.

- आयुर्वेद प्रसारक मंडळी सातारा या संस्थेनें आयुर्वेद–सेवेचें एक साधन म्हणून आयुर्मीमांसेचे प्रकाशन आरंभिलें. अर्कशाळा या कामीं सहकार्य करीत आहे.
- आयुर्मीमांसा मासिकाची ही वाङ्मयीन शास्त्रसेवा प्रतिष्ठा पावत आहे. हिंदी, गुजराथी, कानडी या भाषांतील नियतकालिकांतून आयुर्मीमांसेंतील लेखांचे अनुवाद प्रसिद्ध होत आहेत. नामवंत विद्वान आणि अभ्यासू चिकित्सक यांचे लेख मीमांसेंतून प्रसिद्ध होत असतात.
- सार्वजनिक संस्थांचा आर्थिक संसार हा नेहमींच ओढघस्तीचा असतो. आ. प्र. मंडळी या नियमाला अपवाद नाहीं. वैद्य व औषध विक्रेते आणि आरोग्य व वैद्यक विषयक वाङ्मयाची आवड असलेले वाचक यांनीं वर्गणीच्या रूपानें या सेवा–कार्याच्या कामीं संस्थेस सहाय्य करावे अशी विनंति आहे.

—प्रकाशक

औषधी–कारखानदारांना विनंति

- औषधी–कारखानदारांच्या मालाच्या प्रसिद्धी करण्यास आयुर्मीमांसा हे एक उत्कृष्ट माध्यम आहे.
- महाराष्ट्रांतील बहुसंख्य वैद्यांकडे आयुर्मीमांसेचा अंक जातो. गेल्या अंकापासून सुमारें पाचशे औषधी-विक्रेत्यांकडे हें मासिक सप्रेम भेटीदाखल पाठविलें जात आहे.
- जाहिरातींच्या रूपानें औषधी–कारखानदारांनीं या मासिकास सहाय्य करावे अशी विनंति आहे.

—व्यवस्थापक

आयुर्मीमांसा जाहिरात दर

पूर्ण पान ६० रु. अर्धे पान ३२ रु. चतुर्थांश पान १६ रु. अष्टमांश पान ८ रु.
चौथे कव्हर १०० रु. दुसरे व तिसरे कव्हर प्रत्येकीं ८० रुपये.

कायम स्वरुपाच्या जाहिरातीना सवलत दिली जाते.

पत्रव्यवहार करा—

–जाहिरात व्यवस्थापक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद प्रसारक मंडळी सातारा या संस्थेचें मासिक

आ यु र्मी मां सा

संचालक : आयुर्वेदीय अर्कशाला लि. सातारा

वर्ष १४ वें] ऑगस्ट १९५१ [अंक ८ वा

वार्षिक वर्गणी ३ रुपये : किरकोळ अंक ८ आणे

कोणत्याहि महिन्यापासून वर्गणीदार होता येते.

★ आयुर्मीमांसेंतील लेखांतून व्यक्त होणारी मतें ही त्या त्या लेखकांची मानली जातील. संपादक त्यांशीं नेहमींच सहमत असतात असें नाहीं.

★ आयुर्मीमांसेंत प्रसिद्ध होणाऱ्या लिखाणाविषयींचे सर्व हक्क संस्थेच्या स्वाधीन आहेत.

★ वर्गणी ज्या अंकाअखेर संपत असेल त्या अंकानंतर त्या त्या वर्गणीदारांना पुढील वर्षाची वर्गणी पाठविण्याविषयीं सूचनापत्रें जातात. ज्यांची वर्गणी संपली आहे अशा ग्राहकांनीं हें पत्र मिळतांच म. ऑ. नें वर्गणी पाठवावी. म. ऑ. आली नाहीं अगर अंक नको असल्याबद्दलहि पत्र आलें नाहीं तर त्या वर्गणीदारांना पुढील अंक व्ही. पी. नें पाठविला जातो.

★ अंक मिळाला नसल्याची तक्रार त्या महिन्याच्या दहा तारखेच्या आंत करावी. म्हणजे शक्य असल्यास दुसरा अंक पाठविला जातो.

★ सर्व पत्रव्यवहार 'व्यवस्थापक आयुर्मीमांसा, अर्कशाला बिल्डिंग, सातारा' या पत्त्यावरच करावा.

आयुर्मीमांसेतील लेखांच अनुवाद व उतारे या विषयीं सूचना.

आयुर्मीमांसा मासिकांत गेलीं तीन चार वर्षे औषधीकरण शास्त्र-विषयक लेख वैद्यराज पु. वि. धामणकर हे लिहीत आहेत. हे लेख नैमित्तिक स्वरुपाचे नसून त्यास चिरकालिक महत्व असल्यामुळें अन्य प्रांतांतील वैद्यांसाठीं ते अन्य भारतीय भाषांत अनुवादित केलें जात आहेत. आयुर्मीमांसा ही ज्ञानाच्या बाबतींत कृपण राहू इच्छित नाहीं. या शास्त्रीय वाङमयाचा जेवढा प्रसार होईल तेवढा इष्टच. पण अनुवाद प्रसिद्ध करणाऱ्या या अन्यभाषिक नियतकालिकानीं त्या त्या लेखाचे लेखकाकडे आपल्या नियतकालिकाच्या दोन प्रती पाठवाव्या. आयुर्मीमांसेकडेहि भेटी दाखल एक प्रत धाडावी.

अनुवादित लेखाच्या तळाशीं आयुर्मीमांसा मासिकाचा संक्षिप्त उल्लेख न करता तो संपूर्णपणें करावा व आयुर्मीमांसा मासिकांचा पत्ता देऊन मूळ लेख ज्या अंकात प्रसिद्ध झाला असेल त्या अंकाचा महिना व वर्ष नमूद करावे. उतारे प्रसिद्धिणारांनींहि वरील पद्धतीनें आयुर्मीमांसेचा उल्लेख करावा व अंकहि धाडीत असावे.

ही सूचना पाळली जाईल अशी अपेक्षा आहे. वस्तुतः आयुर्मीमांसेतील लेखांचे सर्व हक्क संस्थेकडे आहेत हेहि संबंधितानीं ध्यानीं घेण्याचीं कृपा करावी.

—संपादक

'लोहीन' विषयीं

वैद्यराज भगवानशास्त्री खेडकर यांचा अभिप्राय

आपल्या लोहीनबद्दल आमचा अभिप्राय उत्तम आहे. रक्ताल्पतेच्या विकाराकरितां २५-३० रोग्यावर वापरून पाहिलें. सर्वानाच उत्तम फायदा झाला.

– वैद्य भगवानशास्त्री खेडकर,
मानवथ, (हैद्राबाद राज्य)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

छोट्या जाहिराती

वैद्य, डॉक्टर व औषध विक्रेते यांच्या माहितीकरितां

आयुर्वेदीय औषधी-निर्मात्यांची सूची

(हें सदर प्रत्येक अंकांत नियमितपणें प्रसिद्ध होते भारतांतील विशेषतः मुम्बई राज्यांतील सर्व आयुर्वेदीय औषधी-निर्मात्यांचा या सदराद्वारे वैद्य, डॉक्टर व विक्रेते आणि ग्राहक यांना सातत्यानें परिचय होत असतो. एक प्रकारे "Buyer's Guide" हें या सूचीचें स्वरूप असल्यानें या सदराचें महत्त्व जाहिरातदारांना वेगळें सांगावयास नको.

ज्या जाहिरातदारांच्या जाहिराती इतरत्र या अंकांत वर्षाच्या करारानें घेण्यांत आलेल्या आहेत त्यांची माहिती या सूचींत *विनामूल्य* छापली जाते. केवळ सूचीसाठीं मजकूर पाठविणाऱ्या जाहिरातदारानीं वर्षाचे करारानें जाहिरात दिली पाहिजे. वर्षाचा दर फक्त तीस रुपये आहे. ही रक्कम आगाऊ द्यावी लागेल. मजकूर जास्तीत जास्त चार ओळी असावा.)

श्रीपाद फार्मसी, पेण.

विविध प्रकारच्या औषधी वनस्पतींचें विक्रेते. महाराष्ट्रांतील आयुर्वेदीय कारखान्यांना माल पुरविण्यांत यतो. वैद्य व ग्राहकांनीं माहिती मागवावी. वाकेरीभाते खात्रीचे मिळते.

शा जादवजी लल्लूभाई आणि कं०

सर्व प्रकारची काष्ठौषधि व औषधी निर्मितीसाठीं लागणारी कच्ची द्रव्यें यांचे विक्रेते. २४५ काळबादेवी रोड मुंबई २.

जी. ए. मिश्रा आयुर्वेदिक फार्मसी, झांशी. (यू. पी.)

विविध आयुर्वेदीय इंजेक्शन्सचे निर्माते. इंजेक्शनविषयक "सचित्र आयुर्वेदिक इंजेक्शन विज्ञान" या पुस्तकाचे प्रकाशक.

अरविंद केमिकल वर्क्स, छिंदवाडा (मध्य प्रदेश)

विविध आयुर्वेदीय इंजेक्शन्सचे निर्माते. सचित्र आयुर्वेदिक इंजेक्शनचिकित्सा (मूल्य ३ रु.) या पुस्तकाचे प्रकाशक.

डॉ. पुरोहित फार्मसी, कोल्हापूर.

पुरोहित श्वासहारी, शोधना इ. विख्यात औषधाचें निर्माते.

आयुर्वेदिक धन्वतरी फार्मसी अहमदनगर

सर्व प्रकारची आयुर्वेदीय औषधें शास्त्रोक्त पद्धतीनें वैद्यांच्या देखरेखीखालीं तयार केली जातात.

ऊंझा फार्मसी लि. उंझा (उ. गुजराथ)

छप्पन्न वर्षांपासून चालू असलेली संस्था. शास्त्रोक्त व पेटंट औषधे तयार केली जातात.

अपोलो फार्मास्युटिकल वर्क्स लि.,

विविध आयुर्वेदीय इंजेक्शन्सचे निर्माते. वैद्याना इंजेक्शनचे शिक्षण दिले जाते. पत्रव्यवहार— प्रतापगंज वडोदा

आयुर्वेदीय अर्कशाला लि., सातारा.

सर्व प्रकारचीं आयुर्वेदीय औषधें तयार केली जातात. आयुर्वेद प्रसारक मंडळी या संस्थेच्या रुग्णालयांत ती पारखली जातात. महाराष्ट्र, कर्नाटक, मध्यप्रदेश, हैद्राबाद या भागांत सर्वत्र विक्रेते आहेत.



या सदरांत आपली जाहिरात अवश्य द्या.

हे सदर औषध विक्रेत्यांकडून वाचले जाते. ते एजन्सीकरितां पत्रव्यवहार करतात. आणि त्यांतून नवीं विक्रीकेंद्रे सुरू होतात.

हें सदर अवश्य वाचा.
तें उपयुक्त आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

संपादकीय

" सप्रेम भेट " प्रसार योजना

महाराष्ट्रांत वैद्यांची फार मोठी संख्या आहे. देशी वैद्यक बोर्डाचें रजिस्टर चालून पाहिलें म्हणजे ही संख्या विश्वासपूर्वक पांचेक हजारांचे घरांत दिसते. सुमारें मनावर ठसते. बहुसंख्य वैद्य खेडचापाडचांतून व्यवसाय करतात. अलीकडील नव्या शिक्षणक्रमानुसार शिक्षण घेतलेल्यांची संख्या थोडी आहे. केवळ नोंद झालेल्यांचीच संख्या अधिक आहे. या वैद्यांना नियमित स्वरूपांत वैद्यकीय वाङ्मय वाचावयास मिळत असेल असे वाटत नाहीं. डॉक्टरवर्ग बहुधा शहरांत राहातो. त्यांची स्थानिक संघटना असते. त्यांचेकडे त्यांची वैद्यकीय मासिकें येत असतात. प्रसंगविशेषी त्यांच्या चर्चा होतात. सभा भरतात. नव्या शोधांची दखल घेतली जाते. शास्त्राच्या विकासाकडे त्यांचे लक्ष असते. कित्येक वेळां त्यांची नियतकालिकें ह्याकडे त्यांचे लक्ष वेधून घेतात.

वैद्यांच्या अशा स्थानिक संघटना फारशा नसाव्या. ज्या गावीं एक दोनच वैद्य आहेत तेथें हें अशक्यच असते. वर्षातून एकदां संमेलनास जाण्यापलिकडे त्यांचा व्यवसाय-बंधूंशीं संबंध येत नाहीं. अशावेळीं नियतकालिक हेंच त्यांचे शास्त्रीय जगाशी संबंध ठेवणारे साधन ठरते. आयुर्मीमांसा हें एक असे साधन आहे.

वैद्यसंमेलनांत राजकारणाला प्राधान्य आले आहे. तेथें शास्त्रीय चर्चा पुरेशा गांभीर्यानें होत नाहीं या आक्षेपांत तथ्य आहे. याशिवाय या संमेलनाची उपस्थितिहि वैद्यांच्या संख्येच्या मानानें अत्यल्प असते. तेव्हां निव्वळ शास्त्रचर्चेला वाहिलेलें आयुर्मीमांसा मासिक वैद्यांच्या अपेक्षा पुष्कळशा प्रमाणांत पुऱ्या करू शकेल. वर्गणी भरून मासिक मागविणें ही प्रथा आपल्याकडे तितकीशी लोकप्रिय नाहीं. ते मासिक, आपणहून दारी आले म्हणजे त्याचे स्वागत होण्याची शक्यता अधिक, मग वर्गणीहि देणें अशक्य नसते.

या अंकापासून आयुर्मीमांसा अनेकाना सप्रेम भेटीदाखल धाडली जात आहे ती या पार्श्वभूमीवरच. तिचे स्वागत होईल अशी आशा वाटते.

वैद्य जळूकर यांच्या

लेखमालेचा गौरव

आयुर्मीमासेंत सर्वसाधारण जनतेस आयुर्वेदीय स्वास्थ्य विज्ञानाची माहिती करून देण्याकरितां वैद्य जळूकर शास्त्री हे लेखमाला लिहीत आहेत. गेल्या अंकांतील त्यांच्या लेखाचे सविस्तर उतारे पुण्याच्या दैनिक प्रभातमध्ये व मुंबईच्या दैनिक लोकमान्यात उधृत करण्यात आले. हा लेख उधृत करतांना ता. ६ जुलैच्या प्रभातच्या अंकांत प्रा. श्री. म. माटे यांनीं जळूकर यांच्या लेखमालेचा पुढील शब्दांत गौरव केला आहे.

" सातारा येथील आयुर्मीमांसा मासिकांत वैद्य दत्तात्रेय शास्त्री जळूकर यांनीं फार सुंदर माहिती दिली आहे. तीवरून दिसून येईल कीं केवळ पूरक अन्न म्हणून नव्हे तर त्यांतल्या त्यांत स्वस्त आणि पौष्टिक अन्न म्हणून केळचांचा उपयोग फार आहे.

" केळी खा " या सरकारी आग्रहाचें ग्रहण सर्वांनींच करावयास हवे पण ती खात असताना जळूकरांच्या सूचना अवश्य ध्यानी ठेवाव्या. "

आयुर्वेदीय अर्कशाला

हैद्राबाद राज्य सोल एजन्सी

हैद्राबाद राज्यांतील वैद्य व विक्रेते यांनीं आयुर्वेदीय अर्कशाळेच्या मालाविषयीं खालील पत्त्यावर पत्रव्यवहार करावा.

ज. बा. बापट

अर्कशाळा सोल एजन्सी ऑफीस
द्वारका भुवन
जुना जालना (N. S. Rly.)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

औषधि-गुण-धर्मशास्त्र

चंद्रप्रभा गुटी

ले. वैद्य- *नृसिंहाचार्य बागेवाडीकर*, आयुर्वेद चिकित्सक

(जून अंकावरून पुढें चालू)

आर्तव शब्दाचे दोन अर्थ आहेत. १ मासिक स्राव. २ स्त्री बीज. यापैकीं कोणत्या विकृतींत चंद्रप्रभेचें कार्य घडतें याचा विचार करावा लागेल. प्रथम मासिक स्रावाच्या विकृतीचा विचार करूं.

मासिक स्रावाच्या विकृतींत साधारणपणें कष्टार्तव, अनार्तव आणि अत्यार्तव असे प्रकार पडतात.

कष्टार्तव— या विकारांत चंद्रप्रभा ही बहुमोल कार्य करते. हिच्या जोडीला कनकसुन्दर द्यावा. (चंद्रप्रभा ३ गुंजा, कनकसुन्दर ३ गुंजा यांच्या मिश्रणाच्या ३ पुड्या) हें मिश्रण साधारणपणें दोन दोन तासांच्या अंतरानीं तीव्र वेदना होत असतां देणें. सबंध दिवसातून प्रत्येकाचें प्रमाण जास्तींत जास्त ६ गुंजा देण्यास हरकत नाहीं.

अनार्तव— या विकारास अनेक कारणें आहेत. इतर कांहीं रोगाचा उपद्रव म्हणून हा विकार असूं शकतो. उदा.- क्षय, पंडु इत्यादि. अशा वेळीं मूळ रोगांचा विचार करावयास पाहिजे. मूळ रोगाची चिकित्सा करणें आवश्यक आहे. पण पंडूमुळें जर अनार्तव असेल तर चंद्रप्रभेचें कार्य दिसून येते. कारण चंद्रप्रभा ही पंडुरोगावर कार्य करणारी आहे. हल्लीं मोठ्या शस्त्रक्रियेनंतर अनार्तव होत असल्याचें दृष्टोत्पत्तीस येते. अशा अवस्थेंत चंद्रप्रभा द्यावी. यानीं रक्त-धातूची वाढ होऊन आर्तव सुरू होते. कांहीं स्त्रिया षंढी-योनि असतात. यांत अनार्तव असते. पण हा विकार गर्भाशयाची वाढ न झाल्यामुळें असतो. बीजवह स्रोतसें नसतात. बीज-कोशही नसतो. (च. चि. अ. ३०/३३) अशा अवस्थेंत चंद्र-प्रभा कार्य करूं शकत नाहीं. बालवयांत शरिराची वाढ न झाल्यामुळें वयांत आल्यानंतर आर्तव येत नाहीं. अशा अवस्थेंत चंद्रप्रभा दूधसाखरेबरोबर द्यावी. कांहीं स्त्रियांत ऋतुमतीची लक्षणें दिसतात पण आर्तव दर्शन होत नाहीं. मासिक स्रावाऐवजीं श्वेत स्राव होतो. (सुश्रुत) यावेळीं अवश्य चंद्रप्रभा देणें. रक्तगुल्मांत अनार्तव असल्यास त्यांत या गुटीचा उपयोग होत नाहीं.

अत्यार्तव— पाळीच्या वेळीं किंवा ऋतुकाल न... जो अति रक्त-स्राव होतो, त्यांस अत्यार्तव असें म्हण... हा विकार केवळ वातविकृतीमुळें होत नसून यांत पित्त... विकृत होऊन द्विदोषजन्य विकार होतो. याचे वाति... पैत्तिक, श्लेष्मिक असे तीन प्रकार पडतात. या विकारा... चंद्रप्रभा ही केवळ दोषानुरूप कार्य करीत नसून द्रव्यप्रभावा... कार्य करते. ही गुटी विशेषेकरून जननेंद्रियावर कार्य करणा... आहे. या स्थानांत उत्पन्न होणाऱ्या रोगावर हिचें क... प्रभावी दिसून येते. अत्यार्तवांत अशोक साल हे प्रभा... औषध आहे. नुसता अशोक कल्प देण्यापेक्षां याच्या बरो... चंद्रप्रभा द्यावी.

गर्भस्राव, गर्भपात— कांहीं कांहीं स्त्रियांत गर्भस्रा... किंवा पाताची संवय जडलेली असते. या विकारांत चंद्रप्र... ही फारच गुणकारी आहे असा अनुभव येतो. गर्भधारणेनं... रोज चंद्रप्रभा ३ गुंजापर्यंत दूधसाखरेबरोबर द्यावी. ... एकाएकीं पोटांत दुखूं लागून गर्भस्रावाची किंवा पाताची ... लक्षणें दिसूं लागली तर चंद्रप्रभा २-२ गुंजा प्रत्येक दोन ... तासानीं द्यावी. चोवीस तासांत सुमारें चंद्रप्रभा १२ गुंजेप... देण्यास हरकत नाहीं.

अपानवायूच्या विकृतीमुळें गर्भाशयाच्या ठिकाणीं ... कांहीं रोग उत्पन्न होतात. त्यांचा विचार आयुर्वेदी... वाङ्मयांत योनी रोगांत केलेला आहे. पण ती नांवें दिल्या... सामान्य वाचकांना चंद्रप्रभेचा उपयोग करणें कठीण जाई... म्हणून गर्भाशयाचे पुढें मागें कलंडणें असें म्हणणें बरें. गर्भा... शय मागें किंवा पुढें कलला असल्यास चंद्रप्रभा अवश्य द्या... अनुपान मात्र तूपसाखरेचे ठेवावे.

एकंदर स्त्री रोग हे वात विकृतींमुळें उत्पन्न होता... (नहि वाताद्दृते नास्ति वनितानां प्रदुष्यति) या वात दोषा... चंद्रप्रभेंत असणाऱ्या उष्ण, तीक्ष्ण, स्निग्ध, गुण-प्रभावा... कार्य घडून येतें.

मूत्रेंद्रिय व मूत्र

मूत्रोत्पत्ति ही पक्वाशयांत होते असें आयुर्वेदाच... म्हणणें आहे. समान वायू आणि पाचकपित्त यांचेकडून मूत्रो... त्पत्ति होते. मूत्र हें द्रव्य कटुरसात्मक आणि लवण अनु... रसात्मक आहे. हें उष्ण, तीक्ष्ण, रुक्ष गुणयुक्त आहे. मूत्रो... त्पत्तीच्या कार्यात यकृत, वृक्क, मूत्राशय, मूत्रमार्ग हीं साध... आहेत. आपणांस प्रथम प्रमेह या रोगाचा विचार करावया...

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आहे म्हणून साधक अवयवें कोणती ती सांगितलीं. आतां प्रमेह रोगातील दोष आणि दूष्यें कोणती ते पाहूं.

प्रमेह रोगांत प्रामुख्यानें कफ दोष विकृत असतो. आणि दूष्यें मेद, मांस, हे धातु आणि क्लेद हीं आहेत. या रोगांत प्रामुख्यानें कफ दुष्टी असल्यामुळें कफाच्या विरुद्ध गुणांची आवश्यकता चिकित्सेमध्यें असावी लागते. चंद्रप्रभेंत उष्ण, तीक्ष्ण, सर या गुणांचा प्रभाव असल्यामुळें हिचें कार्य दिसून येतें. पुष्कळ आणि स्वच्छ लघ्वी होत असतां या गुटीमुळें लघ्वीचें प्रमाण कमी होते. पित्तज प्रमेह ग्रंथकारानीं जरी याप्य सांगितला आहे तरी चंद्रप्रभेचे पित्तज प्रमेहांत शीत-वीर्यानीं कार्य घडते. प्रमेहांत वृक्क विकृति असते. वृक्क हे मेद आणि रक्त यापासून उत्पन्न होतात. म्हणून प्रमेहांत प्रामुख्यानें मेद-धातु आणि कफ दोष (मेदधातुगत कफ) यावर कार्य करणाऱ्या कल्पाची आवश्यकता आहे. चंद्रप्रभा ही गुण-प्रभावानीं व द्रव्य-प्रभावानीं प्रमेहांत कार्य करते.

मूत्रवृद्धि— कांहीं रोगांत मूत्राची वृद्धि होऊन मूत्राशय भरलेला असतो. या अवस्थेंत जर अपानाची दुष्टी असेल तर मूत्र बाहेर टाकले जात नाहीं. विशेषेंकरून ज्वराच्या सान्निपातिक अवस्थेंत अशी स्थिती आढळते. त्यावेळीं चंद्रप्रभेचें कार्य होते असा अनुभव आहे. रोग्यास मूत्रवृद्धीमुळें त्रास होत असल्यास शलाकानीं मूत्र काढावे. नंतर चंद्रप्रभा द्यावी.

या कल्पाचे कार्य पुरीष क्षयांत चांगल्या प्रकारें होतें. पुरीष क्षयाचे रोगी हल्लीं बरेच दिसतात. याचें कारण अन्नाचा तुटवडा हें आहे. पुरीष उत्पन्न करणारी धान्यें खाण्यांत येत नाहींत. (द्विदल माष इ.) यामुळें पुढील लक्षणें रोग्यांत दिसतात. आंतड्यांत आवाज होणें, कुक्षींत वायू संचार, पार्श्वपीडा, हीं लक्षणें असता चंद्रप्रभेनीं वाताचे शमन तात्पुरते होते. चंद्रप्रभा १ ते २ गुंजा तुपाबरोबर देणें व आहारात सुधारणा करण्याची सल्ला देणें.

रसादि-धातूवरील कार्य

रसादि धातुवरील द्रव्यांचे कार्य विपाकानंतर होते. म्हणून विपाकाचा विचार द्रव्यांची निवड करीत असतांना प्रथम करणें भाग आहे. कोणत्याही द्रव्यांचे कार्य विपाकानंतर होते. विपाकाशिवाय द्रव्य शरिरांत जाऊं शकत नाहीं. म्हणून हें द्रव्य जाठराग्नि संयोगामुळें कितपत शोषणीय होते याचें ज्ञान वैद्यास असणें आवश्यक आहे. तसेंच ज्याप्रमाणें बाह्य अग्नि संस्कारामुळें द्रव्यांच्या गुणांत बदल होतो, त्याप्रमाणें जाठराग्नि संयोगानें द्रव्यांच्या गुणांत बदल होत असतो. विपाकाच्या बाबत दोन तऱ्हेच्या भाषा आयुर्वेदांत आढळून येतात. १ रसात्मक २ गुणात्मक. कोणतीहि भाषा घेतली तरी त्यांतील विचारात फारसा फरक होत नाहीं. कारण रस हे गुणाशिवाय कार्य करीत नाहींत. रसात्मक भाषा विशेष रूढ असल्यामुळें तीच वापरणें बरें. विपाकाचे महत्व ग्रंथकारानीं पुढील सूत्रांत सांगितलें आहे.

"सर्वं शरीरानुग्रहात् ।" (र. वै.) विपाकानंतर द्रव्य हें सर्व शरिरात जात असल्यामुळेंच विपाकाला महत्व दिलें गेलें. आतां आपण या गुटीचा विपाक कोणता आहे त्याचा विचार करूं. चंद्रप्रभा गुटीची कारण द्रव्यें जीं आहेत त्यांत गुरू गुणात्मक द्रव्यांचा अभाव आहे. उष्ण गुण ६६.८, लघु ५२.९, सर ३२.८, अशा गुणात्मक द्रव्यांचा विपाक हा लघु होतो. या गुणांशीं सहकार्य करणारे उष्ण, सर हे उत्कृष्टत्वानीं असल्यामुळें ही गुटी शरिरांत लवकर कार्य करणारी आहे. ही सर्व शरीरांत लवकर प्रसरणारी आहे. रसायनद्रव्यांत या कार्याचें महत्व फार आहे. रसायनद्रव्यें सर्व धातूंत लवकर जाणारी असतात हें रसायन शब्दाच्या स्पष्टीकरणावरून कळून येईल.

अपोलोज आयुर्वेदीक इंजेक्शन्स

अद्यावत प्रयोगसिद्ध कल्प

आद्य आयुर्वेदीय संस्था म्हणूनच '*प्राइड ऑफ इंडिया*' हें नामाभिमान या संस्थेला योग्य ठरते. आमची इंजेक्शन्स या देशांत व परदेशांत विकली जातात आणि आंग्ल वैद्य व आयुर्वेदीयांमध्यें तीं सारखीच लोकप्रिय झालीं आहेत. आमच्या ट्रेनिंग इन्स्टिटयूटमध्यें वैद्यांना इंजेक्शनचें शिक्षण दिले जातें. विशेष माहितीसाठीं लिहा व एजन्सी नियम आणि मोफत कॅटलाग मिळवा.

दि अपोलो फार्मास्युटिकल वर्क्स लि.
प्रतापगंज बडोदा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रसायन शद्बांत रस-अयन असें दोन शद्ब आहेत. रस म्हणजे शरिरांतील, आद्य धातु, अयन म्हणजे जाणें. रसाचें जाणें. रस-धातु नेहमीं फिरतच असतो. नुसता रसधातु फिरत असला तरी त्याचे रूपांतर रक्तांत होण्याला कांहीं संस्कार त्याच्यावर होत असतात. ह्या संस्कारामध्यें धात्वग्निचें कार्य महत्वाचें आहे. रस-धातूत असणारा अग्नि रसाचे पचन करतो आणि नंतर रक्त-धातु तयार होतो. ही क्रिया होण्यास विशिष्ट काल लागतो. ह्या कालापेक्षां लवकर कार्य करणारीं जीं द्रव्यें तीं रसायनद्रव्यें होत. म्हणजे रस-धातूचे रूपांतर रक्तादि धातूमध्यें लवकर करणारीं जीं द्रव्यें तीं रसायनद्रव्यें. रसरक्तादि धातूंची वाढ झाल्यामुळें रोगांचा नाश होतो. याला अपवादात्मक कांहीं रोग आहेत. रसायन द्रव्यांचे कार्य सामान्यपणें पुढीलप्रमाणें सांगितलें आहे. "रसायनं च तज्ज्ञेयं यज्जराव्याधि नाशनम्" या व्याख्येपेक्षां जास्त स्पष्ट व्याख्या पुढील सूत्रांत केलेली आहे.

दीर्घमायुःस्मृतिमेधामारोग्यं तरुणं वयः ॥
प्रभावर्णस्वरौदार्यं देहेंद्रियबल प्रदम् ॥
वाक्सिद्धि प्रणतिं कांति लभते ना रसायनात् ॥
लाभोपायो हि शस्तानां रसादीनां रसायनम् ॥

दीर्घायुष्य, स्मृति मेधा, आरोग्य, तारुण्य, कांति, वर्ण, सुस्वर, औदार्य, देह आणि इंद्रियें, यांना श्रेष्ठ बल प्राप्त होणें इ.

वरील सूत्रांवरून असें दिसून येतें कीं, रसायन द्रव्यांचे कार्य षट्धात्वात्मक चिकित्सा पुरुषावर घडून येतें. या चिकित्सा पुरुषांत चेतना-धातु आहे. हा धातु म्हणजे आत्मा होय. आत्म्याचीं लक्षणें आयुर्वेदाचार्यांनीं सांगितलीं आहेत. तीं पुढीलप्रमाणें आहेत. चेतना, धृति, बुद्धि, स्मृति, अहंकार, प्रयत्न. (च. शा. अ. ३ सू. १०) आत्म्यापासून निघणाऱ्या चेतनेची वाढ आपणांस रसायन-द्रव्यांनीं करतां येते. किंवा धृति, बुद्धि, इ. गुणांची वाढ करतां येते. उदा.- तूप हे धृति, स्मृति वाढविणारे आहे. अशा तऱ्हेनें द्रव्यांच्या कार्याचा विचार आयुर्वेदीय निघंटूकारानीं केला आहे. रसायन-द्रव्यें हीं आत्म्याच्या गुणावर आणि पंचमहाभूतात्मक अशा देहावर कार्य करणारीं आहेत. हें रसायन-द्रव्याचें वैशिष्ट्य आहे.

चंद्रप्रभेचें रसायनकार्य

शरिराचे मूल घटक दोष, धातु आणि मल हे आहेत. यांचे योग्य पोषण होण्यासाठीं आहारद्रव्यें आहेत. या द्रव्यांनीं जरी त्यांचे पोषण होत असले तरी शरिरांतील कार्यकारि घटक जे दोष त्यांत काल, अर्थ, आणि कर्म यांच्या हीन, अति, मिथ्यायोगानीं वैषम्य निर्माण होते. ते वैषम्य नाहीं करण्यासाठीं रसायन-द्रव्यांची आवश्यकता आहे. द्रव्यापेक्षां रसायन-द्रव्यांचे कार्य जलद होते.

रसधातूवरील कार्य— रस-धातूच्या क्षीणतेमुळे शरिरावर रुक्षत्व येते. श्रम सहन न होणें, शोष, ग्लानि, दुसऱ्याचे बोलणें सहन न होणें, हीं लक्षणें उत्पन्न होतात. अशा तऱ्हेचे रोगी पाहावयास मिळतात. रस समान द्रव्यांच्या अभावी उत्पन्न होणाऱ्या रसक्षीणतेमध्यें चंद्रप्रभा शीत-वीर्यानीं कार्य करते, पण आहारांत किंवा अनुपानार्थ दुधा-सारखी रस वृद्धिकर द्रव्यें द्यावी.

रक्त-धातूवरील कार्य— शरिरांतील ऊर्ध्व अधः मार्गानीं रक्त-स्राव होऊन जर रक्तक्षीणता आली असेल तर यांनीं रक्तवृद्धी होते. कांहीं रोग्यांत आमाशयस्थ रंजक-पित्त विकृत झाल्यामुळें रक्त क्षीण होते. हें रंजक-पित्त आमाशयातून अन्नाबरोबर पक्वाशयांत येते. तेथून ते रस-रसाबरोबर यकृत आणि प्लीहेंत जाते आणि तेथें रसाला रक्तत्व आणते. आमाशयांतच जर रंजक-पित्त क्षीण असेल तर रक्तोत्पत्ति होणें असंभवनीय आहे. अशा वेळीं प्रभा प्रभा हानि, तृड् हानि, मेधा कमी होते, कोणतेही काम करण्याचें धैर्य होत नाहीं. शरिरातील मार्दव कमी होते. हीं लक्षणें असतां चंद्रप्रभा २ गुंजा प्रमाणानीं द्यावी. दिवसांतून ३ वेळा.

चंद्रप्रभेचें हें कार्य गुण-प्रभावानीं व द्रव्य-प्रभावानीं होते.

दमा हटतो

तो कायमचाच. पुरोहित श्वासहारी हें एकच २८ वर्षे सतत भरल्यात व अनुभविक असें डॉक्टरी औषध आहे कीं, जें तात्काळ आराम देऊन आस्ते आस्ते दमा बरा करतें. औषध घेण्यास सुरुवात करतांच कफ सुटतो, धांप कमी होते, पचनक्रिया सुधारते व फुफ्फुसें मजबूत होऊन कांहीं कालानंतर दमा निखालस बरा झाल्याचा अनुभव येतो. रु. ३॥, ६ व १० किमतीच्या पॅकिंग मधून सगळीकडे विकत मिळतें अगर कारखानदार

डॉ. पुरोहित फार्मसी, कोल्हापूर (एस. एम्. सी.)

पुरोहित श्वासहारी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मांस-धातू—क्षीण झाला असतां संधिवेदना होतात याची कल्पना आज तरी अस्तित्वांत नाहीं. संधिवेदना म्हटल्या कीं, आपणापुढें आमवात, वातरक्त, उपदंश, पूतिप्रमेह इ. रोग उभे राहतात. पण कांहीं रोगी असे भेटतात कीं, त्यांना हा कोठलाही रोग झालेला नसतांना अशक्तता, कृशता, आणि संधिवेदना हीं लक्षणें असतात. अशा रोग्यास चंद्रप्रभा द्यावी. म्हणजे चांगला उपयोग होतो.

मेद-धातू—मेद धातूची वृद्धी अगर क्षीणत्व असो. चंद्रप्रभा ही लंघन आणि बृंहण उभय कार्य करणारी आहे. मेद धातूची वृद्धि झाली असतां थोड्या श्रमानीं जो थकवा वाटतो तो मात्र कमी होतो. पण मेदाची वृद्धि फारशी कमी होत नाहीं.

मेद—क्षीणतेमध्यें मात्र या गुटीचा उपयोग होतो.

अस्थि—फारसे अनुभवात्मक नाहीं.

मज्जा—कार्य अद्याप निश्चित लिहितां येण्यास रखे नाहीं.

शुक्र—या धातू वरील कार्याचे विवेचन मागे केलेले आहे.

रसादि धातूंची वृद्धि या गुटीमुळें झालेली आढळते. आणि धी, धृति, स्मृति यांचीहि वाढ होते. पण चंद्रप्रभेचें रसायन कार्य तरतम भावानीं पाहिलें तर मध्यम प्रतीचें आहे. पण शुक्र धातूवरील कार्य मात्र उच्च दर्जाचे आहे.

रोग आणि उपयोग

रोग	योजना	अनुपान
कष्टार्तव	चंद्रप्रभा ३ गुं.+कनकसुंदर ३ गु=पुड्या ३	गरम पाणी
गर्भपात	गर्भपाताची संवय चंद्रप्रभा २गुं. १ पुडी दोन २-२ तासानीं देणें. १२ गुं. पर्यंत (चोवीस तासांत)	थंड पाणी
श्वेत प्रदर	चंद्रप्रभा ३ गुं+ गोदंतीभस्म ३ गुं.+त्रिवंग ½ गुंज=पुड्या तीन	दूध साखर
अनियमित ऋतुस्राव	चंद्रप्रभा ३ गुं. + अशोक घन ३ गुन्जा पु. ३	पाणी
शूल	चंद्रप्रभा ३ गुं. +कनकसुंदर ३ गुं. + शंखवटी ३ गुं.=३ पुड्या २-२ तासानीं	लिंबू रस २ चमचे साखर
अंतर्मुख योनी (रिट्रोव्हर्शन) (गर्भाशयाचे)	चंद्रप्रभा ३ गुं.+दशमूल घन ३ गुं. = पु. ३	पाणी
फलवाहिनी शोथ	चंद्रप्रभा ३ गुं.+वंगभस्म १½ गुं. +गंधकरसायन १½ गु. = पु. ३	दूध साखर
शुक्रक्षीणता	चंद्रप्रभा ३ गुं. +वंगभस्म १ गुं.+ अश्वगंधा घन ६ गुं.=पु. ३	दूधसाखर
कास	चंद्रप्रभा ३ गु.=पुड्या ३	आल्याचा रस, मध
पंडू	चंद्रप्रभा ६ गुन्जा पु. ३	दूध साखर
प्रमेह (बहुमूत्रता)	चंद्रप्रभा ६ गुन्जा = पुड्या ३	पाणी

अर्कशाळेचें हैद्राबाद राज्यांतील

पहिले पुरस्कर्ते व हितचिंतक

वैद्यराज रा. द्वे. साखळकर.

हैद्राबाद-राज्यांत अर्कशाळेची सोल एजन्सी स्थापन होताच अर्कशाळेच्या औषधांची पहिली मागणी नोंदविणारे वैद्य म्हणून वैद्यराज साखळकर यांचे गांव कंपनीच्या इतिहासांत नोंदले जाईल. वैद्य साखळकरांचा जीवन परिचय खालीं दिला आहे.

जन्म कामारी (तालुका हादगांव जि. नांदेड) येथें. गृहस्थिती गरिबीची असल्यानें मॅट्रिकपर्यंत अनाथ विद्यार्थी गृहाच्या आश्रयानें विवेक वर्धिनी हायस्कूलमध्यें शिक्षण झाले. त्यानंतर प्रारंभी जालना येथें तहसील ऑफिसमध्यें क्लार्क म्हणून,नंतर मिशनस्कूलमध्यें शिक्षक म्हणून, त्यापुढें मिलीटरी खात्यांत व सेंट्रल बँकेत नोकरी करावी लागली. पण या अवधींत त्यांनीं वैद्यकीय वाङमय वाचलें. आयुर्वेदीय ग्रंथांचा अभ्यास केला. वैद्यकीय व्यवसाय हेच ध्येय ठरवून नोकरी सोडली व १९४१ सालीं निखिल भारतीय आयुर्वेद विद्या-पीठाची आयुर्वेदभिषक् हीं परिक्षा उत्तीर्ण झाले. त्यांना मुम्बई राज्याच्या कायद्याप्रमाणें रजिस्ट्रेशनहि मिळाले आहे.

व्यावसायिक अनुभवासाठीं वैद्यराज नागोराव पत्की जालना यांचेकडे ते एक वर्षभर राहिले. नंतर हिंगोली येथें त्यांनीं स्वतंत्र दवाखाना सुरू केला. ते आपला व्यवसाय यशस्वीरीत्या चालवीत आहेत. त्यांचा आयुर्वेदाचा अभ्यास सततच चालू असतो. त्यांना एक मुलगा व एक मुलगी अशी अपत्ये आहेत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वाचकांचा पत्रव्यवहार—

महाराष्ट्रांत कांहीं थोडी मासिकें आणि क्वचित् साप्ताहिक व पाक्षिक किंवा प्रासंगिक वैद्यक-पत्रिका डोकावतांना दृष्टीस पडतात. त्यामध्यें सातारा येथें निघणारें आयुर्मीमांसा मासिक बरीच वरच्या दर्जाची कामगिरी करीत आहे, असें कोणी विधान केल्यास ते विद्वज्जनसंमत होईल असें वाटते. आयुर्मीमांसा मासिकाच्या गेल्या दोन वर्षांतील स्थूल परिक्षणानें सुद्धां हें म्हणणें सिद्ध होईल.

आयुर्मीमांसेचे मुख्य लेखक (१) वैद्य फडके (२) वैद्य घामणकर (३) वैद्य मणूरकर (४) वैद्य जळूकर (५) संपादकीय स्फुटे श्री. वष्ट, शिवाय डॉ. वि. ल. आगाशे, डॉ. आपटे प्रभृती यांच्या लेखांनीं जनतेची उत्कृष्ट सेवा केलेली आहे.

ज्वर विशेषांक— ह्यांत सामान्य ज्वरापासून त्रिदोष सन्निपातादि भयप्रद ज्वरांसंबंधी साद्यंत विवेचन वाचकांस सापडेल.

औषधीशास्त्र विशेषांक भाग २ रा:— याचा पहिला भाग स्वतंत्रपणें यापूर्वी छापून प्रसिद्ध झालेला आहे. तो ज्यांच्या डोळचापुढें नाहीं. त्यांना ह्या भागाचें वाचन अडखळविणारें वाटेल, परंतु संपूर्ण ग्रंथ पाहूनच योग्य मतप्रदर्शन करतां येईल. तथापि दोन्ही भाग वाचलेल्यांना ह्या ग्रंथाचें यथार्थ मूल्यमापन मौलिकतेनें करतां येईल

आयुर्मीमांसेनें आलें, लिंबू, सुण्ठ, बिब्वा, लसूण ह्या औषधी व अन्य खाद्य पदार्थांपासून तों सर्व फळें, फळभाज्या कंद पालेभाज्या, ऊंस इ. पर्यंत सर्व खाद्य व सेव्य वस्तूंचे गुणधर्म वाचकांना या काळांत तपशीलवार सांगितलें ऋतुचर्या म्हणजे कालवरत्वें आहार विहार कोणते, कसे व का करावे तें सांगितलें. तांदूळ, गहू, जोंधळा, मका ही धान्यें य सर्व द्विदल धान्यें यांच्या गुणदोषाचे यथार्थ ज्ञान करून देऊन युक्त आहाराचे जणू पाठच दिलें. सुजाण माणसानें यावरून आहार-योजना केल्यास त्याचें कल्याणच होईल.

'हृदयाचें स्थान कोणते ?' "ही चिकित्सा कोणती?" असे शास्त्रीय प्रश्न बुद्धिमंतास टाकले आणि सरकारकर प्रसंगोपात निर्भिड टीका केली.

आयुर्मीमांसेस मी सदैव यश चिंतितो.

—द्वा. मो. भट, मिरज.

नवा अविष्कार

स्त्री, पुरुष, बालक या सर्वांच्याकरिता

अत्युत्तम महौषधी

नवरत्नरस

★

हा हिरा, माणिक, मौक्तिक इ. नवरत्नें आणि सुवर्ण यांच्या संयोजनानें तयार करण्यांत आलेला कल्प आहे. शरीरस्थ रस, रक्त आदि सप्त धातूंची शुद्धि, वृद्धि व पोषण, शुक्र, वीर्य यांची शुद्धी आणि पुष्टी करणें हे या औषधाचें विशिष्ट कार्य आहे. तसेच यानें नपुंसकत्व, वीर्यस्राव, स्वप्नदोष इ. चे निर्मूलन होऊन नवयौवन प्राप्त होते. स्त्रियांच्या गर्भाशयशोथ, प्रदर वारंवार होणारा गर्भपात, गर्भवतीच्या हातापायांवरील सूज व फिक्कटपणा यांवरहि गुणकारी आहे. वंधत्वाचा दोष दूर करणारी ही अपूर्व औषधी आहे. मुलांचे अस्थिदौर्बल्य दूर करून अस्थि बलवान करणारे, कॅलसियम व व्हिटॅमिनची उणीव, दुधाचे अपचन नष्ट करून बालकांना धष्टपुष्ट करणारे असे हे औषध आहे. क्षय, जीर्णज्वर, कास, श्वास, मधुमेह, मानसिक दुर्बलता इत्यादि मध्येंहि अतिशय उपयुक्त आहे.

नवरत्नरस—निरोगी लोकांकरिता रसायन व रोगी लोकांना आरोग्य प्राप्त करून देणारे हे महान औषध आहे.

एका बाटलीची किंमत दोन रुपये

ऊंझा फार्मसी लि. ऊंझा

(गुजराथ)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

औषधीकरण–शास्त्र

संधान विधि

(ले. वै. पु. वि. धामणकर, धूतपापेश्वर, पनवेल.)

शोध अवचित लागतात. संशोधन मात्र महत्कष्टानें व दीर्घ कालानें होतें. प्राचीन काळीं कागद नव्हता. सर्व लेखन ताडपत्रावर होई. ताडाच्या झांवळचा तोडतां तोडतां एक दिवस त्याची पोई तुटली गेली, झाडाच्या गाभ्यासही धंद लागला. दुसरें दिवशीं पुनः त्या वनांत लोक हिंडत असतांना त्यांना मनोहारि गंध दरवळत असलेला आढळला. शोधतां शोधतां ताडाचें झाडापासून स्रवणाऱ्या रसाचा हा गंध आहे. आणि तो रस प्यायल्यानें मनुष्य गुंगतो, हें ही त्यांचें निदर्शनास आलें.

एकच कल्पना नाना तऱ्हेनें निरनिराळ्या कालीं किंवा समान कालींही एक वा अनेक लोकांना स्फुरतें, सुचतें; असेंही कांहीं कांहीं वेळेस दिसते. संधान विधीचें असेंच झालें असावें. वरील कल्पनेशीं साम्य दर्शविणाऱ्या आणखीही कल्पना अशाच अवचित कळल्या. उदा:– एकदां दुधाचें दहीं होणें ही क्रिया दृष्टोत्पत्तीस आली. त्यावरुन पदार्थाचें मूळ रूप कांहीं कारणानें व कालानें बदलतें. बदललेलें स्वरूपही मूळच्या–हून भिन्न गुणांचें तयार होते; असें आढळून आलें. कांहीं लोकांस हीच विक्रिया शिजवलेल्या अन्नावर घडून आलेली दिसली.

नीरेचा प्रथम शोध लागला तो ही अवचितच. त्यांनीं ताडाच्या पोईतून थेंब थेंब स्रवणाऱ्या पदार्थावरून व त्या पदार्थाचे काल परिणामावरून ताडाला नांवें ठेवलीं. ताजा रस (नीरा)– ज्यांना मिळाली त्यांनीं ताडाचें झाडास "आसवद्रुः" असें म्हटलें. नीरा आंबल्यानंतर जे ती प्यायले त्यांनीं त्याच झाडास "मद्यद्रुः" म्हटलें. "मोहद्रुम" ही म्हटलें, कारण त्या द्रवानें मद आलेला आढळला. ह्यानंतर असाच पदार्थ आणखी कोणत्या झाडापापासून निघूं शकेल याचा शोध चालूं असतां माड व शिंदी हे दोन तत्सदृश वृक्ष हातीं त्यांचे लागले. व तेव्हां पासून शिंदीचे, त्यांचे ताडाचें व माडाचें झाडांस मदकारि । मोहकारि । मदाढ्यः । मद्ययोनिः । वगैरेही आणखी नांवें पडलीं.

प्रथम प्रथम लोक ह्या तिन्ही झाडांपासून काढलेली नीरा पीत असत. तिनें हर्ष उत्पन्न होई. तो सुखावह असे. त्यामुळें त्याला सुखमद म्हणत. हा आनंद सात्विक असे, तो पर्यंत हें पानही सर्व सात्विक लोक–संमत असे. परंतु नीरा आंबल्यानंतर ती मादक, उन्मन कारिणी होते. हें पाहिल्यानें ताडी, माडी, शिंदी पिणें श्रेष्ठ वर्गानें निषिद्ध मानलें व त्याज्यही ठरविलें.

तरीपण मदलोलुप लोक हें पान करीतच असत. ह्याच लोकांनीं नैसर्गिक निपजेवर आपली गरज भागत नाहीं; असें पाहून आणखी आपलें संशोधन पुढें चालूं ठेवलें, तेव्हां मोहाची फुलें, द्राक्षें. शिवणफळें, खजूर इ. पदार्थ त्यांना असे सांपडले कीं त्यापासून ताडी, माडी, व शिंदी पेक्षांही जोरदार, मदकारक पदार्थ निर्माण होऊं शकतात; पुनः हे पदार्थ टिकाऊ असल्यानें त्यापासून मादक पदार्थ केव्हांही आणि कितीही निर्माण करतां येतील असें त्यांचे निदर्शनास आलें.

कालांतरानें अशा प्रकारची नैसर्गिक संपत्तीही अपुरी पडूं लागली. मग मध, गूळ, साखर हे स्वतंत्र असलेलें मधुर पदार्थ मद्य निर्मितीचें कामीं ते उपयोजूं लागले. त्यानंतर धान्य वर्गावर त्यांचें लक्ष गेलें. व त्या त्या पदार्थाचे अनुबंधावरून माध्वी, गौडी, शार्कर, सुरा, मंदिरा इ. नांवें त्या त्या मादक पदार्थास पडलीं.

आसवारिष्ट कल्पनेचा उगम

मादक पदार्थांचें सेवन पराकोटीला गेलें. त्यापासून नाना विकारांनीं लोक पछाडले जाऊं लागले. जिकडे तिकडे आजारच आजार, दारिद्र्य, दुःख ह्यांचे साम्राज्य पसरलें. सर्व समाज व्यसनी बनूं लागला. हाहाःकार उडाला. अशावेळीं समाजांत घडणारीं परिवर्तनें लक्षपूर्वक पाहून समाजास वळण लावणारे कांहीं लोक असतात ते पुढें येतात. धर्मशास्त्रकार हा त्यांतला पहिला वर्ग. ह्यानीं आयुर्वेदाचें सहाय्यानें, स्वास्थ्याचे लक्षण ठरविलें. तें स्वास्थ्य टिकविणारे आचार, विचार, आहार, विहार सांगितले. म्हणजेच स्वास्थ्य-रक्षक योजना त्यांनीं तयार केली. वैद्यकांत हिला प्राधान्य आहे. पण त्याचे पुढें जाऊन आयुर्वेदानें रोगप्रतिबंधक अशा आणखी दोन योजना आंखल्या. असंयमी लोकांना रोग होतात. तें दूर करणें हें आपले काम आहे; असें मानून नीरा, मद्य ह्या बाबतही त्यांनीं एक उपाय योजना शोधून काढली.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रथम त्यानीं मद्य विधीचा अभ्यास केला. त्याची अवस्थांतरें व त्यांचे परिणाम लक्षांत घेतले. आनंद केव्हां होतो, हें पाहिलें. हयांचा उपशम कशानें होऊं शकतो, तेंही ठरविलें आणि मद्यजनित रोग प्रतिकारक योजना तयार केली.

कांहीं द्रव्यांच्या लहान मोठ्या प्रमाण मात्रेनें होणाऱ्या परिणामांचा उपशम तेंच द्रव्य सम प्रमाणांत दिल्यानें होतो. हा सिद्धांत त्यांना मद्योत्पन्न विकार चिकित्सेंत उपयुक्त वाटला. व मद्य निर्माण विधीच हांती घेऊन त्यांत मद्यांतले दोष* टाळणेंकरिता मूळ पदार्थ व प्रकिया यांत सुधारणा, बदल करून आर्य वैद्यकाचा संधान विधि निश्चित केला. आसव नि अरिष्ट. इ. पदार्थ हीं हयाचीच आपत्यें होत.

संधानविधीचा काळ

संधान विधीचा काल निश्चित करणें अवघड आहे. तरी पण एवढें खरें कीं भारतीय युद्धा पूर्वींही आसवें अथवा अरिष्टें प्रचलित होतीं; असें इतिहासावरून समजतें. विस्तवावर आसव शिंपडून त्याचें वाफ़ेनें मनुष्याचा दुखरा शरीरावयव शेंकावा. किंवा हृया धुरानें हवा शुद्ध करावी, असे उल्लेख महाभारतांत सांपडतात. तसेंच आयुर्वेदही त्या काळापर्यंत अष्टांगानें परिपुष्ट झाला होता, असें दिसतें. हृयावरून नक्की वर्ष संख्या सांगता येत नसली तरी संधानविधीकाल हा फार प्राचीनतम आहे. एवढें मात्र निश्चित म्हणतां येतें.

× आसवारिष्ट संज्ञा

'आसव' शब्दांतला मूळ धातु 'षुञ्' त्याचे 'सू' असें एक रूप होते. 'सू' धातूचा अर्थ निष्कासन, पीडन असा आहे.

त्या वरून आसव शब्दाची निरुक्ति कांहींशी बरी वाटतें. तो शब्द अन्वर्थक वाटतो. पण तशीं गोष्ट अरिष्ट शब्दाची दिसत नाहीं. त्या बावतचे मिळालेले सर्व खुलासे पुढे दिले आहेत. ते प्रमाण मानले तर ते पुढे पाठरचनेंत अथवा नामाभिधानांत अनुसरलेलें दिसत नाहीत. त्यामुळें अरिष्ट संज्ञा तितकीशी समर्पक वाटत नाहीं. पण ती हजारों वर्षे रूढ असल्यानें तिचा त्याग करणेंही तितकेसे सोपें नाहीं, किंबहुना अशक्यच.

+ आसव तें अनग्निसिद्ध नि अरिष्ट तें अग्निसिद्ध ही व्याख्या गदनिग्रहकर्त्या शोढलनें प्रथम केलीं. ती शारंगधरानें उचलली, पण ह्या व्याख्या झाल्या पंधराव्या शतकांत आणि संज्ञा तर रूढ आहेत चरक कालपासून. आणि संज्ञाभेद स्वतःच चरकादिकांनींच काय पण शोढल, शारंगधरांनींही मानला नाहीं किंवा पाळलाही नाहीं. उदा.

कल्पनाम	द्रव स्वरूप	द्रव्य स्वरूप	ग्रंथाधार
अष्टशतारिष्ट	द्रव निर्देश नाहीं	मृदु	च.
चंदनासव	साधें पाणी	कठीन प्रव्य	भै.
जीरकाद्यरिष्ट	काढा	सुगंधी,मृदु,दाहशामक	भै.
देवदार्वासव	काढा	सुगंधी, मृदु	ग.
द्राक्षासव	काढा	मृदु	ग. नि
दुरालभासव	काढा नाहीं	मृदु	ब.

---

* मद्यदोषाः। मद्ये मोहो भयं शोकः क्रोधो मृत्युश्च संश्रितः।
सोन्मादमदमूर्च्छाधाः सापस्मारापतानकाः।
यत्रैकःस्मृति विभ्रंशः तत्र सर्वमसाधुवत्।
इत्येवं मद्य दोषज्ञा मद्यं गर्हयंति यत्नतः। च. चि.

× आसवः पुं. (अङ+सूञ. +अप्ः।) शब्दकल्पद्रुम
आसव—षुञ अभिषवे स्वादिसे "ऋदोरप्" (पा. ३।३।५
अरिष्टः पुं. (रिष्हिंसायां कर्तरिक्तः नञ समासः।
श. क.

आसवः। सूयन्ते तोय कार्यं क्रियंते यस्मिन्स आसवः।
शा. दीपिका

आसुतत्वादासव संज्ञां। च.सं.॥ संधान रूपत्वात् चक्र

अरिष्टः। न रिष्यत इति अरिष्टः। वै. पं. हरि प्रपन्न
इक्षु विकार संहिताऽभया चित्रकदंतीपिप्पल्यादिभूरिभेषज
क्वाथादि संस्कारवान् अरिष्टोऽभिधीयते। (सुश्रुते डल्हणटीका
अस्य गुणः अर्शशोथग्रहणीकफरोगनाशित्वं इतिराजवल्लभः।

अरिष्टो द्रव्यसंयोग संस्कारादधिको गुणैः।
बव्हदोष हरश्चैव दोषाणां शमनश्चसः।
दीपनः कफवातघ्नः सरः पित्त विशोधनः।
शूलाध्मानोदरप्लीह जरा जीर्णार्शसांहितम्। सुश्रुत
अरिष्टं लधुपाकेन सर्वतश्चगुणाधिकम्।
अरिष्टस्य गुणाज्ञेया बीजद्रव्यै गुणैः समाः। श. क.

अरिष्ट—उक्तंच मंद्याकाराधिकद्रव्यैराद्यैः कृतस्तुयः।
सोऽरिष्टः स्यात्। अ. हृ. अरुणदत्तटीका
आसव—आसवस्तु द्रव्याण्यासुत्य कृतस्तुयः।
अ. हृ. अरुणदत्त टी

अरिष्ट—इतिद्रव्य प्रधान अस्य भेदकः। शाङ्गधर दीपिका
+अरिष्ट—अरिष्ट क्वाथ सिद्धस्यात्। शार्ङ्गधर
+ आसवः। यदपक्वौषधांबुभ्यां सिद्धःस आसवः। शा. सं.
मिथ्यातिहीनपीतेन योव्याधिरुपजायते।
समपीतेन तेनैव स मद्येनैवोपशाम्यति।
च. चि. अ. २४९०॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

धान्यकारिष्ट	काढा	सुगंधी,मृदु, दा. श.	ग. नि.
धात्र्यरिष्ट	रस		च. सं.
पर्पटाद्यरिष्ट	काढा	शीत मृदु	भै. र.
पिप्पल्यरिष्ट	काढा नाहीं	उष्ण मृदु	यो. र.
पिप्पल्यासव	काढा		शा. र.
पुनर्नवासव	काढा		च. सं.
मुस्तकारिष्ट	काढा	सुगंधी, शीत, मृदु	भै. र.
लवंगासव	काढा	,, उष्ण ,,	ग. नि.
लोहासव	काढा नाहीं	कठीन	भै. र.
वासकासव	काढा	मृदु, आर्द्र	ग. नि.
हरीतक्यासव	काढा	,,	ग. नि.

जल, रस, हिम, कषाय, कोहल हे आधार द्रव, औषधी हीं आधेय द्रव्यें आणि मधुर पदार्थ हीं साधक द्रव्यें ह्यांवरून किंवा ह्या सर्वांचे संयोगानें तयार झालेल्या औषधाचे रस, वीर्य, विपाक, प्रभाव व गुण, कर्म ह्यांवरून आसवारिष्ट संज्ञेंत भेद दाखवितां येत नाहीं.

सुश्रुताचार्यांनीं तर चिकित्सास्थान अध्याय १० मध्यें निरनिराळ्या कल्पांचे विधि दिले आहेत. तेथें आसवविधी सांगतांना 'अरिष्ट कल्पेन विदध्यात्' असें म्हटलें आहे. तेव्हां पृथक्‌ आधार द्रव तयार झाल्यानंतर पुढच्या विधींत कांहीं फरक नसल्यानें विंधी वरूनही आसव नि अरिष्ट ह्या संज्ञा पृथक संभवत नाहींत. किंवा दर्शवितांही येत नाहींत.

पण आसव आणि अरिष्ट ह्या दोन्ही संज्ञा कायम ठेवावयाच्या तर त्यामध्यें विशेष भेददर्शक वर्णनही आवश्यक आहे. ह्या दृष्टीनें विचार करतां शोढलानें म्हटल्याप्रमाणें अग्निसिद्ध तें अरिष्ट व अनग्निकृत तें आसव असें म्हटल्यानें दोन्ही संज्ञामधील फरक स्पष्ट होऊन दोन्ही संज्ञा कायम राहूं शकतात व रूढही होऊं शकतात. मात्र त्याकरितां कांहीं रूढ नांवांत फरक करावा लागेल. उ.– पिप्पल्यरिष्ट ऐवजीं पिप्पल्यासव म्हणावें. परंतु ह्या निबंधांत विवरणाचे सोयीसाठीं जागोजाग आसव हाच शब्द दोन्ही करितां योजावयाचें ठरविलें आहे.

आसवांचे प्रकार

अग्निवेशांनीं आसव तयार करावयाचे पदार्थ आठ सांगितले. नंतर त्यांत नववा पदार्थ साखर मिळविला. हे नऊ म्हणजे धान्य, फल, मूल, सार, पुष्प, कांड, पत्र, त्वक् आणि साखर. ह्या प्रत्येकापासून पुनः निरनिराळ्या नांवाचे पदार्थ तयार होतात. त्यांचींही नांवें त्यांनीं दिली आहेत ती अशी—

१ धान्य–सुरा, सौवीरक, तुषोदक, मैरेय, मेदक, धान्यांबु–६

२ फल—अक्रोड, अजमोदा, आंबाडा, आंवळा, उंबर, कंवठ, केवडा, खजूर, खिरणी, चारोळी, जांभूळ, द्राक्ष, धावडा पिंपळ, पिंपरी, फणस, फालसा, बेहेडा, बोर, रानबोर, रायबोर, वड, शिवण, शंखिनी, शिंगाडा, हिरडा.—२६

३ मूल—अस्कंद, एरंड, निशोत्तर (कृष्ण), बेल, शतावरी, शेवगा, चित्रक, दंती, निशोत्तर (श्वेत), सालवण, द्रवंती—११

४ सार—अर्जुन, असाणा, आघाडा, खैर–पां., खैर–तां. गंधीहींवर, चंदन, जेष्ठमध, टेंभुर्णी, तिवस, धावडा, बोर, राळवृक्ष, अशोक, वंजुल, शिसवा, शिरस. शमी, सातवीण, शाल (ल) शाल (वृ)......२०

५ पुष्प—कमलश्वेत, कमल–शतपत्र, कमलनील, कमल–चंद्रविकाशी, कमल–रक्त, कमल सू. वि., कमल–अष्टपत्र, मोह (पाश) वाघाटी, धायटी...१०

६ कांड—इक्षु–श्वेत, रक्त, इ. ४ प्रकार—४

७ पत्र—पटोल, देवदाली—२

आयुर्वेदीय कारखानदार व वैद्य यांस लागणारीं औषधि द्रव्यें

दुर्मिळ अस्सल अष्टवर्ग, केशर, सर्व प्रकारची काष्ठौषधि, कस्तुरी, अंबर मौक्तिक (मोती खाका) शौक्तिक, शंख, शुद्ध शिलाजित, सुवर्णमाक्षिक, गोरोचन, प्रवाळ, पारा, गंधक, इ. सर्व प्रकारचीं खनिज व वनौषधि द्रव्यें घाऊक व किरकोळ प्रमाणांत पुरवितो,

गुलकंद आणि मोरावळा हे: ठोकबंद मिळतील.

अस्सल व खात्रीपूर्वक माल हेंच आमचें वैशिष्ट्य !!

विशेष माहितीसाठीं साप्ताहिक दरांचें छापील पत्रक मागवून घ्यावें.

शा. जाधवजी लल्लुभाई आणि कं.

२४५ काळबादेवी रोड, मुंबई २

टे. नं. ३१७९६ Telegrame– AYURVED.

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

८ त्वग्—लोध्र (श्वे.) लोध्र (रक्त), कंकोळ, भेंड ४

९ मधु—मध, साखर, गूळ. १

(च. सं. सू. अ. २५)

श्रीमच्चरक आचार्यांनीं एकंदर ८४ पदार्थांचा नाम-निर्देश केला. प्रकार सांगितले नऊ. त्यांतले आजचे प्रतिनिधी खालीलप्रमाणें:—×

१ धान्य– औषधी योगांत ह्यांचे आसव निर्दिष्ट केलेलें नाहीं.

२ फल– फलारिष्ट (हरितकी)

३ मूल– मूलारिष्ट (पुष्कर)

४ सार– खदिरारिष्ट (खदिर)

५ पुष्प– मधूकारिष्ट (मधूक)

६ कांड– अमृतारिष्ट (गुळवेल)

७ पत्र– तांबूलासव (नागवेल)

८ त्वग्– लोध्रासव (लोध्र)

९ मधु– मध्वासव (मधु)

१० क्षीर– क्षीरासव (वेळू)

चरकांत न आलेल्या पदार्थांचीही आसवें सध्यां रूढ आहेत. उदाहरणार्थ—कुडा, अडुळसा, इ०

आसवलक्षण*

चरक कालीं स्वास्थ्यरक्षण व रोगहरणाचें कार्यांत आहार योजनेवर विशेष भर होता. आहाराचे परिणाम शरीर व मनावर होतात. हे परिणाम तनमनाचा क्षोभ न करितां कार्य करतील अशी दक्षता आहार योजना करतांना घेत असत.

तनमनोव्यापारांत बिघाड झाल्यास ती विकृती दूर करण्यास आहाराचे जोडीला औषधांचाही उपयोग करीत. त्यांत आसव हा एक कल्प प्रमुखत्वानें वावरत होता. त्याचे लक्षण सांगताना मन, शरीर, आणि अग्नि यांचें बल वाढवणारें, झोप आणणारें, शोक, अरुचि नाहींशीं करणारें ते आसव; असें सांगितलें.

ह्याकरितां आसवादिकांचे शब्द, स्पर्श, रूप, गंध हे पदार्थ, (रसनाक्षिमनोहरः) सुरभिगंधः। तांबूला ग. नि.) मनोज्ञ असायला पाहिजेत; असा औषधी विचार्यांचा कटाक्ष आहे. तो लक्षांत घेऊन आसव तयार केलें तरच तें तनमनाचा क्षोभ न करतांही त्यांचें हरपलें स्वास्थ्य पुनः पूर्ववत् प्रस्थापित करूं शकेल.

अशी दक्षता घेऊन तयार केलेलें आसव, दीपन पाचक, सुगंधी, रुचिकर, आल्हादकर, हृद्य, बल्य असे असायला तर पाहिजेच. शिवाय त्यानें तनमनाचा क्षोभ होता कामा नये किंवा त्यांना उत्तेजनही लाभतां कामा नये. तर ती बलशाली व शांत, तृप्त झालीं पाहिजेत.

उक्तंच–दीपनः पाचनो हृद्यः बल्यो रुच्यंश्च शांतिकृत्।
मुखप्रियः सुखमदः रसनाक्षि मनोहरः।
सुगंधिश्च स्थिरमदः निर्मलः प्रवरासवः। इत्येके।

तेव्हां आसवाचें लक्षण वर लिहिल्याप्रमाणें असायला पाहिजे, हे उघड आहे.

मद्य-लक्षण

माज उत्पन्न करतें तें मद्य. मद्य पंचरसात्मक आहे. त्यापैकीं अम्ल हा त्याचा स्वाभाविक रस. बाकीचे कटु, तिक्त कषाय, मधुर, हे त्याचे अनुरस होत. अम्लरसांत मद्य अग्रगण्य आहे. पण हा त्याचा मान तें नवें असतें तोपर्यंत त्याला मिळतो. मद्य जसजसें जुनें होत जातें तसतसें त्याचा गुणांतर होतें. हे गुणांतर अगदीं विपरीतही असूं शकतें. इतकें कीं, त्याचे अम्लत्वसुद्धां नाममात्र शिल्लक उरतें. ह्या दृष्टीनें मद्य परिवर्तन स्पृहणीय आहे. तें नीट लक्षांत येण्या करितां त्याची अवस्थांतरे येथें देत आहे.

× आसव प्रकार– धान्य, फल, मूल, सार, पुष्प, काण्डपत्र त्वचो भवंत्यासव योनयोऽग्निवेश, संग्रहेणाष्टौ, शर्करा नवमी एषां आसवानां आसुतत्वादासव संज्ञा। चरक सू. अ.४८

*मनः शरीराग्नि बल प्रदानामस्वप्नशोकारुचि नाशनानां
संहर्षणानां प्रवरासवानामशीतिरुक्ता चतुरुत्तरैषा॥
शरीररोग प्रकृतौ मतानि तत्वेन चाहार विनिश्चयो
उवाचयज्जः पुरुषादिके ऽस्मिन्मुनि स्तथ। प्राणिवर्ग
संवांश्च॥ च. सू. अ. २५
मुखप्रियः सुखमदः सुगंधिर्बस्तिरोगनुत्
जरणीयः परिणतो हृद्योवर्ण्यश्च शार्करः।
च. सू. अ. २७ श्लो.
तीक्ष्णः सुरासवो हृद्यो मूत्रलः कफवातनुत्।
स्थिरमदः विज्ञेयोऽनिल नाशनः॥ सुश्रुत सू. अ. ४
१०७

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नवें मद्य– शीत, त्रिदोष जनक, विदाही, विशद, गुरू.

जुनें मद्य– वृष्य, हृद्य, सुगंधी, दीपन, स्रोतःशुद्धि व हविष्कृत्, लघु.

जृष्ट मद्य– अतीव मादक, दुर्गंधी, विरस, गुरू, भ्रम, बुद्धिभ्रंशकर.

मद्यगुण— हर्ष व उत्साहजनक, मादक, पौष्टिक, आरोग्यरक्षक, पौरुषपर, आनंदकारक, मदकर, प्रसन्नता, तृप्ति होते, शक्ती येते. भीति शोक व थकवा जातात. झोंप उत्तम होतें, झोपाळूंची झोंप उडते. मलमूत्र विसर्जन साफ होते, मार, बंधन, कष्ट, दुःख ह्यांचे विस्मरण होतें. आणि जीभ जड असली तर ती हलकी होते. व वाचा खुलते. रूचकर, दीपन, पाचन.

मद्य अत्यंत वृद्ध मनुष्याचाही रतिविषयक व प्रीति–संयोग वाढवितें. वृद्धांना आनंद व उत्साह विशेषत्वानें प्राप्त होतो. पंच ज्ञानेंद्रियांचे शब्द स्पर्शादि भाव मद्याचे पहिल्या अवस्थेंत छान तरतरीत होतात. वृद्ध मनुष्य आपली सर्व दुःखें विसरतो. त्याला जीवनांत आनंद वाटतो.

मद्यदोष–– मोह, भीती, शोक, राग, मृत्यु, उन्माद, मद, मूर्च्छा, अपस्मार, अपतानक, हे सर्व विकार मद्याति-पानानें होतात. फार कशाला, ज्याचे ठिकाणीं एका स्मृतिचा भ्रंश झाला असतां जगांतील सर्व अनिष्ट दुःखें आणि आपत्ती ओढवण्याचा धर्म स्थित असतो. तो पदार्थ असाधुवत होय.

सुरा जर्जरी करोति । प्रकृत्यामद्यमम्लोष्णम् । मद्यं अम्लेपुच श्रेष्ठम् । यत्रैकः स्मृतिविभ्रंशस्तत्र सर्वमसाधूवत् । मद्या संबंधाचीं अशीं वर्णनें व कार्यें वाचली व पाहिलीं म्हणजे मद्याचे स्वाभाविक स्वरूप लक्षांत येतें. असें असूनहि त्यांस विष व अन्न यांची उपमा दिली आहे. पण दोन्ही उपमा सदोष आहेत. विषा मधील व्यवायि विकाशीत्वादि गुण साम्यामुळें ती उपमा योग्य ठरते. पण अन्नोपमाहीं अगदींच विपरीत व एकांतिक वाटतें—प्राणाः प्राण भृतामन्नं तदयुक्त्या निहत्यसून् । च. चि. अ. २४ श्लो. ५८ असें म्हटले आहे. अन्नतारी अन्नमारी म्हणतात. तें ही खरें आहे. परंतु मद्याप्रमाणें अन्नानें मनुष्य कधीं असंयमी होत नाहीं. अति भक्षणाचें व्यसन कधीं लागत नाहीं. अतिभक्षण हा नित्याचा अभ्यास होऊं शकत नाहीं. शिवाय अति भोजनानें मनुष्य मद्याप्रमाणें लागलींच मरतो असेंही नाहीं. तर अन्नमारी ह्याचा अर्थ अपाचित अन्न वाजवीपेक्षां अधिक काल पोटांत राहिलें तर त्याचे रूपांतर अन्न विषांत होतें व तें विष शरीरास कष्ट देतें. क्वचित प्रसंगी प्राणहरणही करतें. पण प्राण वाचविण्यास ह्या कामीं काल लाभतो तसा मद्यातिरेकांत सांपडत नाहीं.

अन्नं वृत्ति कराणां श्रेष्ठम् । अन्नं वै प्राणाः। असें म्हटलें आहे. असा उल्लेख मद्यासंबंधानें केव्हांही करता येण्यासारखा नाहीं. कारण मद्यावांचून जीवन अडत नाहीं. मद्यसेवन न करतांही मनुष्य जगूं शकतो. तशी स्थिति अन्नाची नसल्यानें मद्यास अन्नाची उपमा (किंतु मद्यं स्वभावेन यथैवान्नं तथास्मृतम् च. चि. अ. २४ श्लो. ५७). देणें युक्त होणार नाहीं.

मद्य व विष हे पदार्थ कितीही तेज असले तरी त्यांची गणना, एकांताहित पदार्थांत, धातुप्रदूषण द्रव्यांतच होणार. नित्याचें वा जीवनीय पेय अगर भक्ष्य म्हणून त्यांना केव्हांही जीवनांत स्थान लाभणार नाहीं. हीं द्रव्यें जीवनास नित्योपयोगी नव्हेत. फार तर शरीर रोगग्रस्त झालें असतां रोगनिवारक म्हणून हीं द्रव्यें युक्त ठरूं शकतील. ती ही सर्वत्र नव्हेत. कांहीं विकारांत मद्य व विष प्राणहारक, हानिकारकच ठरतात. त्यामुळें मद्य व विषांचा उपयोग मर्यादित आहे. सार्वत्रिक नाहीं. अशा कारणानें मद्य व विष हीं द्रव्यें तीव्र औषधी म्हणून ठरतात. त्यांना अन्न केव्हांच म्हणतां येणार नाहीं. कांहीं प्राण्यांचें हें भक्ष्य व पेय आहे. पण ते प्राणी मनुष्य नव्हत. नित्याचें अन्न म्हणून ह्यांचा उपयोग करतां येत तर नाहींच पण साधें पेय म्हणून रोज घेऊं म्हटलें तरीही तें भावत नाहीं. कारण शारीरिक घटकांचा विनाश हा त्यांचा स्वाभाविक परिणामच आहे. हें कार्य अपेक्षित असतां मात्र मद्य उपयुक्त ठरतें. हें कार्य जीवनीय असलें तरी तें आपद्धर्मीय होय. अन्नाची गोष्ट तशी नाहीं. अन्न प्रीणन, जीवन, वृष्य घटक जनन–संवर्धक आहे, म्हणूनही मद्यास अन्नाची उपमा विडंबनात्मक वाटतें.

मद्याचे गुण वर दिलेच आहेत. मद्यपान होतांच तें सर्व शरीर प्रथम व्यापतें. नंतर हृदयांत प्रवेश करतें. मनाचा क्षोभ करतें. बुद्धि भ्रष्ट करतें. मनुष्यास उत्तेजन लाभून तो उन्मत होतो. त्याला कालांतरानें धुन्दीही येते व तो निचेष्ट पडतो. मद्यांत क्षोभ, मद, स्मृति, बुद्धिभ्रंश हे गुण असतात. त्यांचे पृथःकरण करूं गेल्यानें मद्यांतील मद व क्षोभ हे धर्म मद्यम्लांत असतात. उत्तेजकत्व हें त्यांतील कोहलांत असतें. मद आणणें हा मद्याचा निजस्वभाव. त्या–

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करितांच लोक मद्य पितात. मद उत्तेजन Stimulation उद्दीपन Excitation, मादन Intonication व अवसादन Dipression. ह्या चार क्रिया म्हणजे मद्याच्या मदाच्या चार अवस्था होत. मद्यांत मधुररस अनुरसांत असल्यानें मधुर रसाचें प्रीणन, जीवन, बृंहण, वृष्य हें धर्म मद्यांत आढळत नाहींत. ह्याच कारणानें मधुर रसाचे गुणांशीं साम्य असलेल्या ओज द्रव्याचा मद्य नाश करतें. ओज व मद्य ह्यांचे दहा दहा गुण अगदीं परस्परविरोधी आहेत इतकेंच नव्हे तर त्या त्या मद्य गुणानें ओज गुणांचा नाश होतो. हा दृक्प्रत्यय असल्यानें ओजसंचय करणारें सात्विक, तापसी, मुनी हे लोक मद्यास शिवतही नाहींत. मद्याचा व्यामोह विलक्षण आहे. ह्याची एकदां गोडी लागली कीं ती सुटत तर नाहींच पण उलट ती वाढतच जाते व मनुष्य सर्वास मुकतो. ह्या त्याच्या स्वभावामुळें 'पिबेदात्मवतासदा।' असें सांगितलें असूनही आत्मवान् लोक मद्यापासून चार पावलें दूरच राहतात.

ओजगुण— १ गुरुत्व २ शैत्य ३ मार्दव ४ श्लक्ष्णत्व ५ बहलत्व ६ माधुर्य ७ स्थैर्य ८ प्रसन्न ९ पिच्छिल १० स्निग्ध. त्याचे नाशकगुण–लाघव, औष्ण्य, तैक्ष्ण्य, विकाशी, सूक्ष्मत्व, अम्लत्व, व्यवायि, आशुकारित्व, विशद, रुक्ष.

ओजस्तु तेजो धातूना शुक्रांतानां परंस्मृतम्। ...ओजो विवृद्धौ देहस्य तुष्टि पुष्टि बलोदयः। (अ. हृ. सू. अ. ११ श्लो. ३७ ते ४१) अशा तोलाचा भारी पदार्थ ज्या मद्यानें नाश पावतो. पर्यायानें सर्व जीवित कार्याचाही विघात होतो. असा एकांतिक नि विध्वंसक पदार्थ जीवनीय वर्गांत कसा बसूं शकेल बरें? तो तसा बसतो म्हणणें अवास्तवतेचें दर्शक चिन्ह ठरणार नाहीं का?

नवीन मद्यापेक्षा जुनें मद्य बरें मानतात. कारण काला तरानें त्यांतलें अम्लत्व कमी कमीं होत जातें. मद्याची तीव्रता, मादकता, अम्लरसावरच अधिष्ठित असल्या अम्लरस मात्रेनें, तीव्रतेनें, तीक्ष्ण स्पर्शानें जस जसा क होत जातो, त्या मानानें घशांत जळजळणें, छातींत चरचर हे धर्म कमी होतात. अम्लरसाचा स्पर्श थंड अ अत्यम्लरस सुशीत असतो. तो मद्यांत चांगला प्रतीत होतो. आंबटपणा कमी होतांना मद्याचें मादकत्वही कमी कमी हो जाते. म्हणूनच जुनी दारू बिनधोक समजली जात असावी.

मद्यांत दुसरा पदार्थ कोहल असतो. त्यानें म उत्तेजक गुण युक्त होतें. हा धर्म अम्ल संयोगानें तीव्रत होत जातो. तर मधुर संयोगानें मंद होत जातो.

ह्या परिभवनामुळें जुनें मद्यांत अम्लरस, मधु झालेला आढळतो. तेव्हां जुनें मद्य अतीव मादक ठर नाहीं. त्यानें मद येतो तो सुखावह ठरतो. त्याला सुखम म्हणतात. तें विदाही नसतें. तें मुख प्रिय होतें. त्यापा मद अत्यल्प प्रमाणांत, उत्तेजन मध्यम प्रमाणांत व ब श्रेष्ठ प्रमाणांत लाभतें. त्यामुळें जुनें मद्य, बल्य, पौष्टि समजतात. औषध म्हणून द्यायचे झालें तर ते असें जु मद्यच श्रेष्ठ मानतात. मद्योत्थानाञ्च रोगाणां मद्य प्रबोधकम्। (च. च. चि. अ. २४।६१) मद्यजन्य विकारा मद्य हेंच श्रेष्ठ औषध आहे असें म्हणतात. तेथें ज पुराण मद्य घ्यावें असा अर्थ अभिप्रेत असतो; हें जाणा मद्य जरी सौम्य असलें तरी सुद्धां तें अत्यंत लघुमात्रे बरेंचेसें पाणी मिसळून व पौष्टिक आहाराबरोब देण्यास सांगितलें आहे.

सर्व प्रकारची आयुर्वेदीय औषधें शास्त्रोक्त पद्धतीनें तज्ञ वैद्यांच्या देखरेखीखालीं तयार केली जातात.

ठिकठिकाणीं एजंटस नेमणे आहेत.

दि आयुर्वेदिक धन्वंतरि फार्मसी
अहमदनगर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आसव आणि मद्य

आसव नि मद्य यामधील साम्य, भेद नि विरोध दर्शविणारा तक्ता

सदर	आसव	मद्य
निर्माण हेतु	तन, मन, अग्नींना बल्य व रोगहर औषधी द्रव	अल्पमात्रेनें त्वरित मोहक, मादक पेय
विधि	१ निष्कासन २ संधान ३ विमर्दन	१ निष्कासन, २ संधान ३ उद्धरण
आधार	१ पाणी २ वनस्पतिद्रव	१ पाणी २ वनस्पतिद्रव, ३ धान्यद्रव
आधेय	१ उद्भिज्ज, २ प्राणिज ३ खनिज	१ उद्भिज्ज
साधन	परिवर्तन	परिवर्तन
साधक	उत्कृष्ट व अनम्ल–गूळ साखर, किण्व व धायटीफूल	गुडादि मधुर पदार्थ किंवा ह्या पदार्थांचा रेंदा, काकवी मोहाची फुलें
कोहलजाति	स्वयंभू	स्वयंभू व उद्धरित
कोहलशतमान	५ ते १२	३५ ते ९०
कोहलकार्य	१निष्कासन २वीर्यरक्षण ३ वीर्यवर्धन ४ संहर्षण	१,२,३, आसवा प्र. ४उत्तेजन, ५ मादन
आसवांत मधुरद्रव्य शतमान	मध २०, गूळ ४०, साखर ३०,	शून्य
मधुरद्रव्यप्रयोजन	१ कोहलसंजनन २ शरीरक्षण ३ बलप्रदान ४ आल्हादन ५ कोहलबाधा प्रतिबंधक	१ कोहलसंजनन २ अम्लसंजनन
अम्लरस	अग्निदीपन,स्वादजनन अम्लशतमान ०·२ ते ०·५	अग्निउत्तेजक, कोहलसहाय्यक कर्कशताजनक
आम्लशतमान		प्रभूत
बाह्यस्पर्श	शीतोष्ण	शीततम
अंतःस्पर्श	उष्ण	जळजळीत,चरचरीत
रूप व गंध	मनोज्ञ	मनोज्ञ
रस	तीन	पांच
प्रधानरस	मधुर	अम्ल
अनुरस	कटु, तिक्त, कषाय, अम्ल	कटु, तिक्त, कषाय, मधुर
रुचि	स्वादु, प्रिय,	अम्ल, अप्रिय
वीर्य	उष्ण	शीत, उष्ण
विपाक	मधुर	अम्ल
स्वाभाविक क्रिया	दीपन, पाचन, आल्हादन संहर्षण	तीव्र–दीपन पाचन उत्तेजक, मादक जर्जरकर
प्रभाव	...	व्यामोहन
प्रतिक्रिया	...	अवसादक
परिणाम	हितावह, टिकाऊ, व्यसन जडत नाहीं.	अहितावह, टिकाऊ व्यसन जडतें
स्वास्थ्य	रक्षक, प्राप्तिकर	विध्वंसक
लाभ	आरोग्य, शांति समाधान	अनारोग्य, अज्ञान, दारिद्र्य
मद	स्थिर व सुख	तीव्र, अस्थिर
सेवनहेतु	स्वास्थ्यरक्षण, रोगप्रतिकार	आनंदभोग
सेवनविधि	सुखानें, प्रसन्न वदन व मनानें	दुःखानें, मुखवक्रतिपूर्ण
जीवनांत स्थान	रोगपरिहारक म्हणून आवश्यक	पौष्टिक व स्निग्धाहारी, आत्मवान् व संयमी माणसास जीवनीय, स्वास्थ्यरक्षक, बल्य, उत्तेजक, प्रथम मददायक, इतरास ह्याविपरीत
मनावर परिणाम	आल्हादन, बलप्रदान,	क्षोभक, सत्वगुणनाशक, रजोगुणवर्धक तमोगुण अतिवर्धक
वैकल्य	दूर करणें	जवळ करणें
ओज	वर्धक	विध्वंसक
दोषावर परिणाम	औषधिद्रव्यानुसार	कफोच्छेदक, पित्तोत्तेजक, वातानुलोमक
अग्नीवर परिणाम	दीपन, पाचन, बल्य	उत्तेजक, अवसादक
रसादि धातूंवर परिणाम	बल्य, वर्धक, तर्पक	क्षीणन, क्षपण, पीडन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सदर	आसव	मद्य
मेंदू, हृदय, यकृत, अन्नमार्ग	बल्य	उत्तेजक, क्षोभक अवसादक, वैकृतिक
स्वाभाविक दोष	...	मोह, भय, शोक, क्रोध, स्मृतिविभ्रम, मृत्यु, गुन्हाप्रवृत्ति इ.
वर्ज्य	...	बाल, वृद्ध, स्त्री, क्षत-क्षीण, व्रती, यति, उपवासी, उपासक, साधक, असंयमी, उपदंश व परमारोगी क्षयी
मात्रा अल्प	अकार्यकर	बल्य, रोगहर
मात्रा मध्यम	अपेक्षित कार्यकर	क्षोभक उत्तेजक
मात्रा मोठी	तापदायक	मादक
अतिमात्र	व्याधिजनक	अवसादक, मरणावह

मद्यासंबंधानें वरील कोष्टकांत अन्याय केल्यासारखा दिसेल. पण तें लिहितांना त्याचे हीनातियोग व त्याचा प्रभाव जमेस धरूनच मांडणी केली आहे. कारण मद्यपानाबाबत आचार्यसुद्धां अत्यंत दक्षतेनें पण विरोधीच लिखाण लिहितात. उदाहरणार्थ— पिबेदात्मवता सदा। मद्यं न पेयं पेयं वा स्वल्पंसुबहुवारिवा। मद्य विक्रय संधान दानादानाति नाचरेत्। मधु (मद्य) मांसंच वर्जयेत्। हीं वचनें मद्याचे अपाय-संभवाचे द्योतक होत. मद्य अत्यंत अल्प प्रमाणांत औषध म्हणून क्वचित् घेतलें तर तें प्राणदायी आहे, रसायनही आहे. पण एकदां वाघास मनुष्य रक्ताची गोडी लागली कीं, तो जसा मनुष्याचे शोधासच लागतो, तसें मद्याचें आहे. मद्याची गोडी लागली कीं, मोह पडतो, व्यसन जडतें. रसनेनें तें एकदां चाखलें किं मग ती मुंगळ्यासारखी त्याला चिकटते व ओढाळ मनाला आपलेकडे खेंचून मद्यमोहांत अडकविते. ते कायमचेच. ही आपत्ति अटळ असल्यानें मद्यवर्णन भयसूचकच लिहितात—

बुद्धिं लुंपति यद्द्रव्यं मदकारितदुच्यते ।
तमोगुण प्रधानंच यथा मद्यं सुरादिकम् ॥ शाङ्र्गधर

हा अनुभव आहेच ना! मग मद्य संधान कल्पकांनीं काय साधले? मद्यानें आजवर कोणाचें कल्याण केलें आहे!! विषांप्रमाणेंच ह्याचा उपयोग औषधांत करतात. कोकेन्, अफू, चरस इ. विषोपविषांच्या दुःष्परिणामापेक्षां मद्याचे दुष्परिणाम अतिभयंकर आहेत. त्यामुळेंच मद्या संबंधें कोणीहि बरें बोलत नाहींत.

मादक पेय निर्माण करणें हा मद्य संधानांतला हेतु, तर मन शरीर अग्नि यांना बल देऊन ती शांत प्रसन्न राखून त्यांना न दुखवितां त्यांची झीज भरूत काढणें हा आसव कल्पनेचा हेतु आहे. आसवानें शरीर अगर त्याचे अवयव दुबळे होत नाहींत, मद्यानें मात्र ते दुबळेच काय पण निकामी सुद्धां होतात.

सुख, शांति. आणि स्वास्थ्य यांचे प्राप्तीकरितां आसव निर्माण झालें तर मद्य यांचा धुव्वा उडविणारे ठरलें. हा विरोध दृष्टिआड करून भागणार नाहीं आसवाचे गुणदोष लक्षांत घेरून निरनिराळ्या रोगांत त्याची योजना करतात.

शुक्र आणि ओज ही दोन्ही सौम्य आहेत. सोमगुण भूयिष्ठ आहेत. त्यांचे वर्धन, स्थिरीकरण याकरितां आसवांची योजना तर मद्य प्रकार अगदीं ह्या उलट आहे. त्यामुळें शुक्र–ओज ह्याचे क्षयामुळें राजयक्ष्मा होतो. तेव्हां तेथें मद्य अगदीं वर्ज्य आहे. आसवें मात्र क्षयांत चालतात. इतकेंच नव्हे तर तीं उत्तम उपकारक ठरतात. उदा. नारिकेलासव, द्राक्षासव, योगराजासव इ."

सबंध आसव वर्गाची संख्या १२० पैकीं २८ क्षय, धातु-क्षय कफक्षय इ. क्षयाचें प्रकारांत छान काम देतात. क्षयांत शुक्र, ओज, अग्नि, मन, तन क्षीण झालेली असतात. ह्या सर्वांची दुरूस्ती आसव करूं शकतें, तें त्यांचे साम्य प्रस्थापित करूं शकतें. कारण आसव सुखप्रिय, ल्हादन, मधुर, सोमात्मक सुखमद आणि बल्य आहे. मद्याची गोष्ट अगदीच निराळी.

मद्य स्वतः अम्ल प्रकृतीचें. तोही अम्लरस कसा तर " सर्वेषां मद्यम्लानां उपर्युपरिवर्तते "। च. सू. अ. २४ असा अम्लरस दीपन, पाचन खरा पण तो कंठरुक् तोदाविदाहकर असा आहे. क्षयांत तर हा एक भयंकर दोषच समजला जातो मदात्यय रोगांत मात्र मद्य हाच पदार्थ अल्पमात्रेने तो रोगनाशक गणला आहे खरा.

देव व दानव हे एकाच अदितीचे पुत्र. रावण, कुंभकर्ण विभीषण, हे एकाच मातेचे पुत्र. पण त्यांच्यात किती फरक आढळतो बरें. तीच स्थिती येथें आहे. आसवादि मद्यादि हीं एकाच संधान विधीचीं अपत्यें. पण देव दानवा बाबत आपण भेद मानतो. तसाच विवेक येथेंही करायला हवा. मद्यांचे सदरांत आसव घालणें हें विलक्षण अज्ञान होय. अपत्यें भिन्न

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

किंबहुना विरुद्ध प्रकृतीची निघालीं, म्हणून माता कोणी त्याज्य ठरवीत नाहीं. पूर्व संचिता प्रमाणें जो तो प्राणी जन्म तो. त्याच प्रमाणें द्रव्यसंग्रह आणि प्रतिक्रिया व हेतु ह्यावर आणि आसव ह्यांची स्वभाव निर्मिति अवलंबून असतें.

ताड, माड, शिंदी ह्यां पासून नीरा निघतें. तिचें जें तेच आसवायाचे. नीरा आंबली कीं मदावह होते. ती त्याज्य ठरतें. अगदीं हाच प्रकार आसवांबावत आहे. आसव आंबलें कीं तें बिघडलें. विनष्टमम्लतांयातम्। शा.

नीरेच्या अवस्थांतरावरून आसवांची स्थित्यंतरें ठर-तात. व आसव ही मद्यपूर्व स्थिति होय असें म्हणतात; पण बरोबर नाहीं. कारण अम्लत्व निर्मिति हा आसव विधीतला नाहीं. तर ती विकृती आहे. आपत्ति आहे. ती टाळण्या-करितां मधुर पदार्थ प्रभूत प्रमाणांत संयोजून आधींच दक्षता घेतली जाते. तसेंच मद्याचा जो श्रेष्ठ गुण अम्लत्व त्याचे प्रतिबंधक द्रव्य धायटीफूल, सुगंधीद्रव्य आवापद्रव्यांत प्रथम आवर्जून योजून ठेवतात. तेव्हां सामान्य विधी एकच असला तरी द्रव्य संग्रह भेदानें अगदीं निरनिराळ्या प्रकृतीचे पदार्थ, यत्नें निर्माण होतात. ही गोष्ट विशेषत्वानें लक्षांत घेऊन मद्य व आसव ह्यांची गल्लत करूं नये.

रजोगुण सोडला तर आसव हें सात्विक व मद्य हे तामस गुणात्मक आहे; असे खात्रीनें म्हणतां येतें. एवढा आसव आणि मद्यांत मोठा आणि निश्चित फरक आहे.

लेखांक १२ रा

विषय– संधानविधान, पात्रनिर्णय, जलविवेक.

मद्यविषयक संदर्भ

श्रेष्ठरस– मद्यं अम्लेषुच श्रेष्ठम्। अ. हृ. चि. अ. ७ श्लो. ८

श्रेष्ठं मम्लेषु मद्यंच। च. चि. अ. २४ श्लो. ११२

सर्वेषां मद्यंमम्लानउपर्युं परिवर्तते ॥

च. चि. अ. २४ श्लो. ११४

प्रकृति– प्रकृत्या मद्यमम्लोष्णंमम्लं चोक्तं विपाकतः।
सर्वं सामान्य तस्य विशेष उपदेश्यते ॥ च. सू. अ. २७।१७३ श्लो. ९

पंचरस– सर्वं मद्यं पंचरसं तदुच्यते ॥ शा. दीपिका

अनुरस–मद्यस्याम्ल स्वभावस्थ चत्वारोऽनुरसास्मृताः॥
मधुरश्च कषायश्च तिक्तं कटुक एवच ॥
मद्योत्क्लिष्टेन दोषेण रुद्धः स्त्रोतः सुमारुतः।
करोति वेदनां तीव्रां शिरस्थास्थिषु संधिषु ॥ च. च. अ. २४ श्लो. ११५

मद्यगुण– हर्षणं प्रीणनं वल्यं भयशोकश्रमापहम्।
प्रागल्भ्यवीर्यप्रतिभातुष्टिपुष्टिवलप्रदम्।
सू. अ. २७ श्लो. १८९

गुण– लघूष्ण सूक्ष्म तीक्ष्णाम्ल व्यवाय्याशुगमेवच ॥
रूक्षं विकाशि विशदं मदं दश गुणं स्मृतम् च. चि. अ. अ. २४ श्लो. २०

नवें– नूतनं मद्यं स्मृतं शीतं वातलं पित्तलं तथा।
त्रिदोष जनकं दाहि कफकृत विशदं गुरु ॥ नि. र. भा. १।१४७

जुनें– जीर्णं मद्यं क्षामकं स्याद्दीपनं रुचिकृल्लघु ॥
सुगंधि वृष्यं हृद्यंच स्रोतसांच विशोधकृत् ॥ नि. र. भा. १।१४७

कार्य– मद्यं हृदयमाविश्य स्वगुणैरोजसो गुणान् ॥
दशभिर्दशसंक्षोभ्य चेतो नयति विक्रियाम् ॥
च. वि. अ. २४ श्लो. ९७

प्रेत्यचेहच यच्छ्रेयः श्रेयोमोक्षश्चयत्परम् ॥
मनाः समाधौ तत्सर्वमायत्तं सर्वदेहिनाम्।
मद्येन मनसश्चास्य संक्षोभः क्रियतेमहान्॥
महामारुत वेगेन तटस्थस्येव शाखिनः ॥ च. चि. अ. २४ श्लो. ५०।५१

ओजोगुण– गुरु शीतं मृदु श्लक्ष्णं बहलं मधुरं स्थिरम्।
प्रसन्नं पिच्छिलं स्निग्धमोजो दशगुणं स्मृतम्। च. चि ३३/२८

ओजनाश– गुरुत्वं लाघवाच्छैत्यंचौष्ण्यादम्ल स्वभावतः।
माधुर्यं मार्दवं तैक्ष्ण्यात्प्रसादं चाशुभावनात् ॥
रौक्ष्यात्स्नेहं व्यवायित्वात्स्थिरत्वं श्लक्ष्णतामपि।
विकाशिभावात्पैच्छिल्यं वैशद्यात्सांद्रतांतया ॥
सौक्ष्म्यान्मद्यं निहन्त्येवमोजसः स्वगुणैर्गुणान् ॥
सत्वं तदाश्रयं चाशु संक्षोभ्य जनयेन्मदम् ॥
रसधात्वादि मार्गाणां सत्वबुद्धींद्रियात्मनाम्।
प्रधानमौजगश्चैव हृदयं स्थानमुच्यते ॥
अतिपीतेन मद्येन विहतेनौजसाचयत्।

परिणाम—हृदयं याति वैक्लव्यं तत्रस्था ये च धातवः ॥
च. चि. २४/२ ३४

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भारतीय आरोग्यविज्ञान

फलाहार

लेखक—*दत्तात्रेयशास्त्री जळूकर*

गेल्या अंकापासून या लेखमालेंत आहार्य फळांचा परामर्श घेण्यांत येत आहे. या लेखांकांत जांभुळ, सीताफळ, अंजीर, बोरे इ. फळांचे गुणधर्म देण्यांत आले आहेत.

जांभूळ—कषाय म्हणजे तुरट, आम्ल म्हणजे आंबट व मधुर म्हणजें गोड असे तीन रस ह्या फळांत मुख्यतः वास्तव्य करीत असतात व त्यामुळें तें ग्राही म्हणजे मलावष्टंभक, रोचक म्हणजे रुचि उत्पन्न करणारें व पाचक आहे. आंब्यांचा हंगाम उन्हाळ्यांत तर ह्या जांभळांचा हंगाम पावसाळ्यांत असतो. व पावसाळ्यांत साधारणतः अग्निमांद्य असलेले लोकाना थोड्याहि अपचनामुळें अतिसार, आंवेची हगवण इ. विकार हटकून होतात. अर्थातच त्यावेळीं सातासमुद्रापलीकडील औषधींचें असात्म्य सेवन करण्यापेक्षां जन्मापूर्वी जसें मातृस्तनांत दुग्ध तसें तुमच्या आरोग्यनाशास कारणीभूत रोगांची प्रतिकारी योजना या अगदीं घरीं, दारीं, रानावनांत त्या त्या ऋतुपरत्वें पूर्वींच निरनिराळ्या वनस्पतींची पत्र, पुष्पे, फळें, मुळें, कंद इ. रूपानें भरपूर निर्माण करून ठेवीत असतों हें जणुं ईश्वरानें ह्या रूपानें सुचवून ठेविलें आहे. 'पण लक्षांत कोण घेतों ?' एकूण बरसातींत होणाऱ्या आमातिसार, पक्वातिसार, विषूचिका इ. रोगांवर जांभळें भोजनोत्तर खाणें हितावह होतें. जांभळे नुसतीं किंवा सैंधव, जिरेंपूड लावून खावीं. त्यांचा रस, त्यांचा शिरका करूनहि घेतां येतो. उष्ण काळांत अन्नापेक्षां पाणीच अधिक लागतें व त्यामुळें जेवण नीट होत नाही ही गैरसोय जशी तृप्तिकर आंब्यांनीं दूर होते तशी वर्षाकालांत सर्वत्र पाणीच पाणी होऊन हवा व शरिरांतहि आर्द्रता वाढते व त्याचा परिणाम मलमूत्रातिसारांत मंदाग्नि लोकांना भोगावा लागतो. परंतु जांभळांचें भोजनोत्तर ह्या ऋतूत नित्यप्रति सेवन केल्यानें ह्या क्रियांचें यथावत् नियमन होतें.

सीताफळ— पोटांत प्रत्यक्ष अत्यंत थोडा अंश उपयुक्त म्हणुन घेतला जातो आणि वाया जाणाराच भाग अधिक असें सीताफळ आहे. आषाढ ते अश्विनमास ही या फळांची उत्पत्ति स्थितिलय कालमर्यादा आहे. म्हणजेच साधारणतः जांभळांचा हंगाम संपणे व यांचा सुरू होणें असा हा योग आहे. म्हणजे शरदऋतु भरून हीं मिळावीं अशी निसर्गाची योजना आहे असें म्हटले पा 'पित्तं शरदि कुप्यति' शरदऋतूंत पित्त प्रकुपित हो तज्जन्य नानाविध पित्त विकार होत असतात. अशा पित्तशामक फळांची जरूर म्हणून हीं फळे आमचेक निर्माण होतात. मधुर, शीतल, रुक्ष, वातल, पौष्टि बलवर्धक आणि पित्तशामक असे ह्या फळांचे गु असल्यामुळें हें या ऋतूंत खाणें उपयुक्त नाहीं असें म्ह येणार नाहीं.

अंजीर— याच सुमारास म्हणजे आषाढ श्राव एकवेळ व पुन्हां पौष माघांत असे दोन बहार अंजिराचे येता रस व विपाक काळीं मधुर असें फळ आहे. पचायला थो जड असल्यानें अग्निमांद्य असणारांनीं खाऊं नये हें क पचन चांगलें असेल अशानीं हें फळ अवश्य खावें. भ रक्त वाढविणारें, पुरुषत्व वाढविणारें कृशांना पुष्ट कर व उष्णतां नाशक असे याचे गुणधर्म आहेत. ओले वाळवूनहि अंजीर खातां येतात. सुके अंजीर वात म्हणजे कोरड्या खोकल्याला लौकर कमी करतात. सक वेंळीं ताजे अंजीर कांहीं दिवस नित्य खाण्याचा परि ठेवल्यास बद्धकोष्ट व्यथा नाहीशी होते. सुके अंजीर तुपांत किंचित तळून ठेऊन खाणें अधिक चांगले! सा प्रमाण या फळांत शें. ६० ते ७० टक्के असतें म्हणतात.

ऊस— हें फळ नसून एकप्रकारें याला तृणकांड म तरी चालेल. याचे प्रकार पुष्कळच आहेत. परंतु सर्वसा गुण शीतल, स्वादु, रसविपाक काळीं मधुर, मूत्रल, क असून बद्धकोष्ठ, रक्त व पित्त विकारांचें शमन करणारा याचा रस काढून पिणें पचनास जड आहे. परंतु भोजनोत्तर सोलून चावून रस चोखून घेणें हें पचनास फार चांगलें व

बोरें— रानबोरें व बागाइती बोरें असे मुख्य दोन यांत आहेत. रानबोरांतहि बारीक, मोठी अशा दोन जाती आढळतात. परंतु बागाइती बोरें हीं कलम लावलेल्या झाडांवर येतात व त्यांत पुष्कळच चांगल्या जाती आहेत. आंबट व मधुर असे दोन मुख्य रस बोरांत अ व म्हणून-भोजनोत्तर बोरें खाणें चांगलें. अश्विन महिन्या त्या सर्वहि बोरांचा हंगाम पौष माघापर्यंत असतो. बा मोठ्या बोरांचे जातींत पक्वावस्थेंत बहुधा लौकर कीड- पडते. परंतु कांहीं जातींत कितीहि दिवस बोरें राहीली सडत नाहींत व आळी पडत नाहीं असें वैशिष्ठ्य पाह येतें. आमच्या खानदेश जिल्ह्यांतील जळगांव जव मेहरूण तलावाच्या पाण्यानें जे बगीचे होतात त्यांत बोरां

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

…ळाडें फार असून कीड न पडणें व कच्चेपणीहि गोडी ही दोन वैशिष्ट्यें त्या फळाची असलेमुळें परदेशीसुद्धां फार जातात.

पेरू— याचवेळीं निर्माण होणारें हेंहि फळ आहे. सीताफळाच्या अगदीं विरुद्ध प्रकार याचा आहे. सीताफळ खाण्यांत जसा बराच भाग वायां जातो तसें याचें होत नाहीं. फक्त डेखाजवळील थोडा भाग काढून टाकला कीं, अगदीं संपूर्ण फळ खाण्याचे कामीं येतें. शरद व हेमंत ह्या दोन ऋतूंत व कांहींशी शिशिर ऋतूंतहि हीं फळें उपलब्ध असतात. यांतील कांहीं जाती कच्चेपणींसुद्धां गोड असतात. शीघ्र तृप्तिकर अशीं हीं फळें आहेत. पचनास जड आहेतच. हेमंत व शिशिर ऋतूंत थंडीच्या प्रभावानें अग्नि इतर दिवसांपेक्षां प्रखर असतो व त्यामुळें याचें पचन होऊं शकतें. तथापि अगदींच अग्नि मंद असणारांना ह्यांचा उपयोग नाहीं. दिवसभर ह्याचेच ढेकर येत राहातात. यावरूनच त्याच्या गुरुत्वाची कल्पना होते. ह्याच्या कच्च्या त्याचप्रमाणें पक्क्या पेरूंचीहि भाजी करण्याचा प्रघात आहे. फलाहार म्हणून सकाळीं हात तोंड धुतल्यावर आणि तिसरे प्रहरीं म्हणजे दुपारचें जेवण साधारण पचल्यानंतर हीं फळें कापून त्याच्या फोडींना सैंधव-मिरपूड लावून खाणें फार हितावह असतें. आंत बिया असतात. त्यासुद्धां चावून खाल्यास हें फळ सारक न नुसता गीर मलावष्टंभक आहे. आंतील गर कांही फळांत लाल रंगाचा असतो. तीं पांढऱ्यापेक्षां मधुर असतात.

चिकू— तपकिरी रंगाची ही फळें जणू फलवर्गाच्या सैन्याच्या आघाडीवरील हे मिलिटरीच; व म्हणून यांचा पोशाख तपकिरी ठेवला आहे. उत्तम पौष्टिक असल्याशिवाय यांना मान कसा मिळणार ? ह्यांत सर्व फळांपेक्षां 'लोह' अधिक प्रमाणांत असतें म्हणून रक्त कमी असणाऱ्यांनीं नित्य भोजनोत्तर हीं फळें खावीं. तसेंच निरोगीनाही खाण्यास उत्तम आहेत. पक्की झाल्याशिवाय हीं फळें खातां येत नाहींत; कारण त्यांत कच्चेपणीं एक प्रकारचा चीक असतो व तो तोंड चरबट करतो. शिवाय रसपोष न झाल्यामुळें रुचिसुद्धां नीट लागत नाहीं, पक्व फळें मात्र फारच गोड असतात. ह्या फळाच्या बिया पोटांत जाणार नाहींत ही विशेष दक्षता घ्यावी. गेल्यास विषारी परिणाम होतात. ॥-१॥ गुंज प्रमाणांत बी पोटांतून दिल्यास लघ्वी चांगली सुटते.

कवठ—स्वतंत्ररीत्या फलाहार सदरांत जरी हें फळ समाविष्ट होत नसलें तरी हें रानांत स्वतंत्र येणारें असल्यामुळें स्वतंत्र वनवृत्ति लोकांना वनविहारांत सेवन करण्यासारखें हें फळ आहे. समुद्रकांठीं कठीण कवचीचें जसें नारळ तसे गिरिकंदरीं कठीण कवचीचें हें कवठ. नारळांत पाणी व मगज असतो; ह्यांत फक्त मगज भरपूर असतो. नारळ नितांत मधुर तर कवठ आम्ल मधुर संयोगी आहे. नारळ हें मेंदूला शांत ठेवणारें व तृप्तिकर आहे तर हें आंतड्यावर व रक्त-धातूवर कार्यकारी आहे. साधारणपणें बेलफळाशीं या फळाचे गुणधर्म जुळतात. आंतड्यांतील मुरडा व आंव कमी करणें हा फार मोठा गुण याचे ठिकाणीं आहे. पित्तप्रधान खोकला असतां कवठ खाण्यानें फायदा होतो. याचा गर वाळवूनहि ठेवतां येतो. चटणी किंवा सार करण्यासाठीं गूळ घालून ताक किंवा पाण्यांतून वापरतां येतो. ओला गर वांटून गूळ घालून केलेली चटणी फारच उत्तम रुचिकर व पाचक असते. दुष्काळांत कवठाचा गर पिठांत मिश्र करून त्याच्या भाकरी खातात. कवठाप्रमाणेंच गोरख चिंचहि या कामीं उपयोगांत आणतात. यांच्या गराची कढीहि केली जाते.

डाळिंब—'प्रायः अम्लं पित्तजननम्' म्हणजे आंबट रस हा बहुधा पित्त वाढविणारा आहे. परंतु डाळिंब आणि आंवळा हे दोन पदार्थ आम्लरस युक्त असूनहि यांच्यांतील आम्लरस पित्त न वाढवितां पित्त कमी करतो. डाळिंबापासून होणारा डाळिंबावलेह आणि आवळ्याचा केला जाणारा मुरावळा पित्तशामक आहेत हें आजीबाईपासून सर्वांना माहीत आहे. कषाय, मधुर व आम्ल रसांचें मिश्रण ह्या फळामध्यें असल्यामुळें व यांचा विपाक मधुर होत असल्यामुळे हा धर्म आला असें म्हणतां येईल. आजाऱ्यांनीं डाळिंबाचे दाणे, अथवा रस सकाळीं त्याचप्रमाणें उन्हाचे वेळीं दुपारीं पित्तशामक म्हणून नुसताच किंवा औषधांच्या अनुपानार्थ वापरावा. स्वस्थ प्रकृतीचे लोकांनीं भोजनोत्तर डाळिंबाचे दाणे अवश्य खावेत. रुचिकारक, अग्निदीपक, त्रिदोषनाशक व हृदयाला हितावह असतें. मात्र आजच्या काळांत चिकू, डाळिंब, मुसंबी हीं फळें किंवा इतर सुकीं फळें गरिबांना घेणें जड जात आहे हीं गोष्ट विसरून चालणार नाहीं. अर्थातच अल्पमोली बहुगुणी उपलब्ध अशा फळांकडेच त्यांनीं आपला मोर्चा वळवावा हें सांगणें नकोच.

द्राक्षें— ओलेपणीं व वाळल्यावरहि उपयोगांत येणारें द्राक्ष हें फळ होय. तथापि विशिष्ट प्रकारची द्राक्षांची जातच वाळवितां येते. सर्वच द्राक्षें सुकवितां येत नाहींत तीं सडतात. वसई तालुक्यांत आगाशी गांवीं केळीं सुकवून 'सुकी केळीं-सुकेळीं' नांवानें विकलीं जातात हें मागें सांगितले आहेच; तशीच द्राक्षें सुकवून विकलीं जातात ह्यांना 'मनुका' म्हणतात. भोजनोत्तर खाण्याजोगीं हीं फळें होत. 'लहान

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मूर्ति पण थोर कीर्ति ' अशी ह्यांची स्थिति आहे. कच्चीं द्राक्षें सहसा खाऊ नयेत. तीं रक्त पित्त वाढवितात. यासाठीं पिकून लाली वर आलेलीं द्राक्षें खाण्यास वापरावीं. द्राक्षापासून मद्य बनविलें जातें. परंतु मद्यापासून उत्पन्न होणाऱ्या 'मदात्य' विकारावर द्राक्षें रामबाण आहेत. मधुर व आंबट हे दोन प्रमुख रस असल्यानें तृप्ति कारक, अग्निदीपक रस. धातु वाढवून अनुलोम क्षयाची परंपरा टाळणारी, रक्तपित्तनाशक व अत्यंत रुचकर असतात. या फळांवरील रोग नाश होण्यासाठीं वेलींवर "बोर्डो मिश्रण ' नांवाचें मोरचूदयुक्त औषध शिंपडलें जातें. म्हणून हीं फळें खाण्यापूर्वी स्वच्छ धुवून घ्यावीं हें बरें. तसें न केल्यास थोडचा अधिक प्रमाणांत हीं खाल्ल्यानें तोंड सोललें जातें हें लक्षांत ठेवावें. द्राक्षाचे हंगामांत रोज नियमानें द्राक्षें अर्धा पावशेर तें पावशेर पर्यंत खावीं. अगदीं चेहरा लालबुंद होऊन रक्तहि शुद्ध होतें. आमच्या शेजारी राहाणाऱ्या एका मळेकऱ्याचे मळ्यांतील मजुरानें रोज निदान अर्धा शेर प्रमाणांत द्राक्षें खाल्ल्यामुळें त्याचा जुनाट इसब गेल्याचें एक उदाहरण पहाण्यांत आहे. इतर कोंणतेहि औषध त्यानें घेतलें नव्हतें. किंवा खाण्यांत नेहमींच्या आहारांतहि कांहीं परिवर्तन केलें नसतांहि हा परिणाम झाला. यावरून मलमूत्र शुद्धिद्वारा रक्तदोष नाहींसा झाला असावासें अनुमान करतां येतें. तथापि इसबा सारख्या चिकट व दुःसाध्य रोगानीं पीडित रोग्यांनीं अधिक प्रमाणावर याचा अनुभव घेऊन पाहाणें अवश्य आहे.

संत्री-- नारिंग-लिंबू वर्गांतील हें फळ होय. हें थंड आहे अशीं पुष्कळांची कल्पना आहे. पण ती बरोबर नाहीं. हें अत्यंत उष्णवीर्य आहे. रसांत आंबट, मधुर, विशेषतः हस्त नक्षत्राच्या बहाराची फळे गोडीला बरीं असतात. नारिंग किंवा संत्रे पचनास सुद्धां जड आहे. रुचिकर व वात नाशक धर्म आहे. भोजनोत्तर खाण्यास बरें !

मोसंबी—लिंबू वर्गांतीलच हें फळ. परंतु अति गोड असल्यामुळें त्याला 'राजलिंबू' असें नांव दिलें गेलें आहे. आज काल कोणत्याही आजारांस दूध व मोसंबी हा पथ्याहार म्हणून देण्याची जणूं पद्धति पडूनच गेली आहे. डॉक्टरा प्रमाणें वैद्यहि उठल्या बसल्या मुसंबी खाण्याची रुग्णास शिफारस करीत असतात हें आश्चर्य आहे. रस, वीर्य, विपाक, प्रभाव दृष्टचा विचार प्रत्येक आहार्य द्रव्याचा करूनच वैद्यांनीं रोग्यास पथ्यापथ्य सांगावें हें योग्य. पण आम्ही तो विचारच करीत नाहीं. कफज्वर, आमज्वर किंवा कफप्रकृति असता मुसंबी देणें योग्य नव्हे. निरोगी स्वस्थ प्रकृतीचे लोकांनीं मात्र मधुरफळ म्हणून तुष्टि पुष्टि अशा त्या मुसंब्याचें अवश्य सेवन कर... दाहशामक, पित्तनाशक, व वातनाशक आहे.

टोमॅटो-सर्व प्रकारची जीवन सत्त्वें (Vitamin... असल्याची पाश्चात्य वैद्यकानें ग्वाही दिलेलें हें फळ ... कच्चेपणीं हिरवें व पिकल्यावर लाल जर्दरंग होत असून ... वांग्यासारख्या बिया असतात म्हणून याला लाल ... अिंग्रजी वांगे असे कांहीं लोक म्हणतात. कच्चेपणीं आंबट पक्वावस्थेंत मधुर युक्त अम्ल असा रस त्या फळाचा अ... पचनावर ह्याचा परिणाम बरा होतो. रुचकर हि असल्... पिकलेलीं फळें नुसती सुद्धां खातात. जेवणांत थोड्या... कांद्याच्या फोडी यांतच मिसळून दही घालून तोंडी लावण्या... कोशिंबीर केली जाते. व ती उत्तम रोचक पाचक अस्ते.

सर्व साधारणपणें नित्य प्रचारांत व उपयुक्त अ... फळांचें वर्णन आतां झालें. परंतु एवढयानें अजून आ... प्रकरण संपलेंसें होत नाहीं. कारण हीं वर्णन केलेलीं सर्व ... ताजेपणीं वापरलीं जातांत परंतु फलाहार सदरांत सुकले... फळेंहि वापरावीं लागतात व त्यांना 'मेवा' असें पोक्त ... आहे. अर्थातच पुढील प्रकरणामध्यें ह्या सुक्यामेव्याबद्द... आपणास विचार कर्तव्य आहे. व तो तेवढां करून संपला ... मग हें आहार प्रकरण संपलें असें म्हटलें तरी चालेल. ... आतां पुढील वेळेपासून 'सुकामेवा कसा काय येतो इक... वाचकांनीं लक्ष ठेवावें एवढें सुचवून हें प्रकरण संपवितों.

आयुर्वेदाच्या क्षेत्रांत अद्वितीय
अशा शक्तिशाली
अरविंद आयुर्वेदिक इन्जेक्शन्स
चा उपयोग करून रोग्यांना शीघ्र निरोगी करा व यश मिळवा. शक्ति व शुद्धता याबद्दल पूर्ण गॅरंटी दिली जाते. सूचिपत्र मागवा—
सचित्र आयुर्वेदीक इंजेक्शन चिकित्सा—
मूल्य ३ रु. पोस्ट खर्च १० आ.
व्यवस्थापकः— अरविंद केमिकल वर्क्स
छिंदवाडा (सी. पी.)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अनुभूत चिकित्सा—

बाल यकृतोदर

Infantile Cirrhosis of Liver

ले.– वै. गो. वि. जोशी, लोणंद.

बाल यकृतोदर असें ह्या रोगाचे स्वतंत्र प्रकरण आयुर्वेदांत वर्णिलेलें नाहीं. उदर प्रकरणामध्यें यकृतोदरांत जीं तत्वें सांगितली आहेत तीच घेऊन बाल यकृतोदरासंबंधीं व्यवहार करावा लागतो. परन्तु यकृतोदराचा हा व्याधी मुलांमध्यें स्वतंत्र रीतीनें मोठ्या प्रमाणांत आढळून येतो ही गोष्ट सर्वमान्यच आहे. बाल यकृतोदराचे आढळणारे प्रमाण व त्यामुळें येणाऱ्या मृत्युचें प्रमाण पाहिलें म्हणजे ह्या रोगाचें मारक स्वरूप लक्षांत येतें. बालांची हत्या करणाऱ्या ह्या दारुण विकाराची सर्व नवी जुनी चिकित्सा पाहिली म्हणजे संपूर्ण निराशा पदरीं येते.

त्यासाठीं ह्या विकाराची चर्चा व्हावी व अनुभवी, यशस्वी चिकित्सा करू शकणाऱ्या व केलेल्या वैद्यांनीं व डॉक्टरनीं आपले अनुभव प्रसिद्ध करावे ह्यासाठीं प्रेरक म्हणून हा संमिश्र स्वरुपाचा लेख लिहिण्याचें धाडस (अल्प अनुभव असतांनाही) करीत आहे.

व्याख्या— सामान्यतः ६ महिन्यापासून ३ वर्षापर्यंतच्या मुलामध्यें यकृतवृद्धी, पाण्डुता, ज्वर, कामला व शेवटीं जलोदर ह्या लक्षणांनीं आढळणारा हा रोग होय.

कारणें— ह्या रोगाचे कारण शास्त्रांत पाहिलें तर आढळून येणारी सर्व कारणें पुष्कळशी अनिश्चित आहेत.

१) जीवनसत्वें व प्रथिनें ह्यांचा पुरवठा योग्य प्रकारें होऊं न शकल्यामुळें यकृत जन्तुज सांसर्गिक रोगांना सहज बळी पडून हा रोग होतो. असा एक अनुभव आहे.

२) हिंवताप, बाल अतिसार, डांग्या खोकला, सरक्त प्रवाहिका, देवी व गोंवर ह्या विकारांच्या विषारामुळें यकृतावर परिणाम होऊन हा विकार होतो. माझे स्वतःचे अनुभवात जे ५–६ रोगी आहेत त्यामध्यें डांग्या खोकल्यांतून ह्या विकाराची सुरवात झाल्याचें दिसून आलें आहे. तसेंच हिंवताप हा विकार प्रथम होऊन त्यामुळें यकृत बिघडून हा विकार सुरूं झालेला मी पाहिला आहे. त्याचप्रमाणें सोमल, ताम्र, पारद, सल्फा, औषधें ह्या औषधांचा विपारी परिणाम होऊनही हें आढळते.

३) जन्मतः यकृतोदर होऊ शकेल अशा प्रकारची शारीरिक रचना वा प्रवृत्ति कांहीं लोकांत असते.

ह्या संबंधीं Antiseptic 1949 October मध्यें Allergic disorders ह्या सदराखालीं विद्वान लेखक श्री. शर्मा ह्यांनीं लेख लिहून पुष्कळ पुरावा मांडलेला आहे. जिज्ञासूनीं वाचून पहावा. कांहीं मुलांना हा यकृताचा अशक्तपणा असतो व त्यांना न सोसणारे कांही पदार्थ असतात व त्यामुळें यकृतावर त्याचा विषारी परिणाम होऊन मग यकृताच्या घटकांचा नाश होतो व अशा प्रकारें यकृतोदर घडून येतो.

४) दारू व उपदंश ही पूर्वीं एकमेव म्हणून सांगितली जाणारी कारणें आतां पुस्तकांतून काढली जाऊ लागली असल्यानें त्यासंबंधीं कांहीं लिहिण्याची जरूर उरलेली नाहीं.

वरील कारणमीमांसा पटण्याजोगी आहे. आहारात जावयाचे संरक्षक (यकृतास) पदार्थ कमी पडल्यामुळें हा रोग उद्भव असावा. ही कल्पना सर्वस्वी बरोबर वाटत नाहीं. कारण अगदीं गरीब लोकांत जेथें हा तुटवडा असतो तेथें पुष्कळ प्रमाणांत हा रोग म्हणून आढळावयास हवा. परंतु तसा प्रकार फारसा आढळत नाहीं.

दुसरी रोग विषारांची कल्पना मला बऱ्याच प्रमाणांत पटते व माझा तसा अनुभव आहे.

तिसरी Hepatic diathesis हेंही बरेच पटते. कारण एकेका कुटुम्बामध्यें ह्या रोगानें बरीच मुलें गेलेली आढळतात व आणखी चौकशी केली तर आमवात श्वास हे रोग, इतर ॲलर्जिक रोग ह्यांचा संबंध लागतो व त्याची उदाहरणें रा. शर्मा ह्यांनीं दिलेली आहेत ती पहावी.

विकृतशारीर— विषारामुळें अगर न मानवणारे पदार्थ यकृतांत आलेमुळें हळूहळू त्यांचा परिणाम यकृतावर होऊं लागतो. क्रॉनिक इन्फ्लमेशन सुरूं होते. ही क्रिया चिरकारीं असलेमुळें ह्या अवस्थेंत यकृताचे इतर घटक कार्यप्रवण असतात व त्यामुळें प्रत्यक्ष लक्षणें ह्यावेळीं कांहीं दिसत नाहींत.

ही क्रिया वाढू लागते. त्यामुळें यकृत घटकांचा नाश होऊ लागतो व त्याची प्रतिक्रिया म्हणून यकृत घटकामध्यें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

संख्या-वृद्धी होऊं लागते व ती अनियमित होतें. ह्यामुळें यकृतवृद्धि हें स्पष्ट लक्षण दिसू लागतें व मृत यकृतघटक चरबीनें भरून जातात; ह्यावेळीं इतर लक्षणेंही उत्पन्न होऊं लागतात.

तिसरी अवस्था म्हणजे यकृत आकारानें लहान होत जाऊन त्यामध्यें घटकनाश सुरूं होतो. यकृत हातास लागेनासे होतें. यकृताकडे येणारी अन्नवह स्रोतसें व रक्तवह स्रोतसें रुद्ध होतात व रोधाची सर्व लक्षणें प्रतीत होतात.

अशा थोडक्यांत तीन अवस्था असतात.

लक्षणें

***सुरवातीची लक्षणे*—** मुलाची आई मुलाची प्रकृती आताशा ठीक नाहीं, कोठ्यांत बारीक ताप असतो, अंग हाताला गरम लागते. दिवसेंदिवस मूल फिकट फिकट पडत चाललें आहे असें सांगतें. प्रत्यक्ष थर्मामिटर आपण लावून पाहिलें तर ताप त्याला लागत नाहीं. मूल चिडखोर व निस्तेज दिसतें. तें अस्वस्थ असतें. कसेंही खेळविलें तरी रहात नाहीं. त्याला चैन पडत नाहीं. अशा प्रकारची हीं लक्षणें असतात.

***पहिली अवस्था*--** मुलाच्या पचनाच्या तक्रारी सुरूं होतात. कांहीं कांहीं मुलांची भूक इतकी जाते कीं, मूल एक थेंबभरसुद्धां दूध घेत नाहीं. थोडेसें जबरदस्तीनें पाजलें तर पितें असे त्याची आई सांगतें.

तर कांहीं मुलें ही जास्त खा खा करतात व तिखट पदार्थावर त्यांची हाव जास्त असते. गोड पदार्थ आवडत नाहींत. अतिसार अगर मलावष्टंभ असतो. परसाकडेस पांढरे व पातळ घाण वास येणारे होतें.

प्रत्यक्ष तपासणी केली तर ताप थर्मामीटरला लागत नाहीं. पाण्डुता स्पष्ट दिसते. यकृत थोडेसे वाढलेले हाताला लागतें व टणक असते. परन्तु तीन वर्षापर्यंत यकृत सामान्यतः हातास लागतेच. त्यामुळें हें रोगाचे कीं स्वाभाविक आहे हें समजत नाहीं. टणकपणा अगर काठिण्य हे एक लक्षण असते. पण प्रत्यक्षतया फारसा फरक कळत नाहीं व बारीक ताप येत असेल म्हणून कांहींतरी ज्वरघ्न विशेषतः थंडीतापाचे उपचार केले जातात.

***दुसरी अवस्था*—** ह्या अवस्थेमध्यें ज्वर येऊ लागतो. १००° ते १०३° पर्यन्त येतो एखाद दुसरा आठवडा टिकतो. अगर अनियमीत येतो. त्याचा असा नियम नसतो. व मूल आणखी अशक्त होऊं लागते. पोट मोठें दिसू लागते. यकृत जास्त वाढलेले हातास लागते. प्लीहावृद्धी होते. यकृत ट[णक] असते. पोटावर निळ्या शिरा दिसतात. व बहुधा ह्या अवस्थे[त] मध्यें पुष्कळशी मुले चिकित्सेस आणतात. ह्यावेळीं भूक अगदी मंद, फुफुसे प्राकृतिक, ह्यावेळीं न्युमोनिया वगैरे उपद्रव होण्याचा संभव असतो.

यकृत व पांथरी वाढलेली, पाण्डुता व अनियमीत ज्वर ह्यामुळें मपाक्रिन अगर पालुड्रिन क्विनीन ही औषधे ज्वरनाशक म्हणून दिली जातात.

***तिसरी अवस्था*—** पोट खूप मोठें, पाण्डुता, ज्वर हातापायावर सूज यकृतवृद्धी ३-४ बोटापर्यंत.

पोटांत पाणी साठणें, कामला हृदय Systolic Bruit Haemic murmur पुष्कळदा आढळते. रक्ताची वान्ति आढळते. परसा कडण्यामध्यें रक्त आढळते.

शेवटल्या अवस्थेंत ज्वर खूप वाढतो. मूल बेशुद्ध होते Symptoms of Cholaemia होतात व मृत्यू असा ह्या रोगाचा क्रम आहे.

***रोगविनिश्चय*—** मुलाचे वय, विशेषतः बाकीची मुले किती जिवंत आहेत ? नसल्यास कशानें मेली ह्याच विकाराने मेली काय ? हे मार्गदर्शक होते.

तसेच आईबाप वगैरे कुटुंबियांना ॲलर्जिक रोग आहे काय हे पाहावें

दुसऱ्या व तिसऱ्या अवस्थेंत रोग ओळखणें कठीण नसते त्यामुळें पहिल्या अवस्थेंत रोग ओळखणें जरूर असते. व त्यावेळीं पूर्व रोगांची चौकशी करावी

प्रत्यक्ष ज्वर नसतांना, पाण्डुता व यकृत टणक हातास लागणें व पुढें पुढें मुलाचा विशिष्ट निस्तेज चेहरा, व त्यावरील विशिष्ट भाव, व निस्तेज डोळे ह्या गोष्टीवरून रोगविनिश्चय होऊ शकतो.

***रोगभाविष्य*—** ९० टक्के हा रोग असाध्य आहे. असे माझे अनुभवान्ती मत आहे. दुसऱ्या व तिसऱ्या अवस्थेंत निश्चयानेंच हा रोग असाध्य आहे.

प्रथम अवस्थेंत हीं रोग कारणें दूर करता आली तर कदाचित साध्य होईल.

पण औषधी उपचारांनीं ह्या रोगाची वाढ दुसऱ्या अवस्थेंत थांबवून धरतां येते. व थोडीशी प्रगती दिसते. पण पुनः दुखणें उलटतेंच असा अनुभव आहे.

CC-0: In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चिकित्सा— प्रथम अवस्थेमध्यें ज्या पूर्व रोगामुळें हा रोग उद्भवत असेल तो रोग लवकर बरा करणें, वाढू न देणें त्याचप्रमाणें मुख्यतः मुलाना हॉटेलचे पदार्थ खाण्याची, जास्त गोडाचे पदार्थ खाण्याची संवय असलेस बंद करणें.

सामान्यतः ज्यांच्या घरामध्यें अशा प्रकारच्या एकदोन केसेस झालेल्या असतील, त्या मुलामध्यें आईचे दूध हें कारण असते. तेव्हां ते दूध बंद करणें.

गाईचे दूध चांगले व तेच द्यावे. परंतु ते उकळून त्यांतील साय काढून टाकावी व पाजावे. दुधांतील फॅटस् ह्या बहुधा अशा मुलाना पचत नाहींत व हा विकार सुरू होतो. असा पुष्कळांचा अनुभव आहे. माझा व्यक्तिशः ह्याबद्दल अजून कांहीं अनुभव नाहीं.

High Carbohydrate, high protien, Low fat असे आहाराचे थोडक्यांत सूत्र आहे. त्याबरोबर इतर औषधें द्यावी.

दुसऱ्या अवस्थेमध्यें रोगी मुख्यतः चिकित्सेसाठीं आपणाकडे येतो. व म्हणून ह्याचवेळची औषधी चिकित्सा जास्त विस्तारानें पाहणें जरुर आहे. त्याचप्रमाणें त्याचे फलाचाही जास्त विचार केला पाहिजे.

रोगाच्या उत्पत्तीबद्दल ज्या निरनिराळ्या कल्पना पुढें येत आहेत त्यामध्यें अन्नामधील घटक कमी पडल्यामुळें हा रोग होतो असे आहे. त्यामध्यें methionine व Choline व B Complex ही तीन जीवनसत्त्वें होत. व म्हणून आजकाल ही नवीन अतिशय महाग असणारीं औषधें प्रचारांत येत आहेत. त्याचबरोबर यकृतसत्त्व व B Complex c Choline अशी इंजेक्शनस् वापरली जातात. ह्याबद्दलचा विचार पुढें करू. दुसरी प्रचलित औषधें म्हणजे आयुर्वेदीय वनस्पती औषधें (१) कुमारी (२) पुनर्नवा (३) कडुनिंब (४) कालमेघ (५) अनंतमूळ (६) गुळवेल (७) ताम्र (८) लोह ही सर्व औषधें यकृताची क्रिया वाढविणारी आहेत. ह्यामुळें यकृत जास्त कार्यप्रवण होते. त्यामुळें वृद्धि कमी होते. भूक सुधारते. पाण्डुता कमी होते. शौचास साफ होतें. व थोडीशी सुधारणा दिसते. मात्र ज्वरावर कांहीं फारसा परिणाम होत नाहीं.

जम्मीज लिव्हर क्युअरमध्यें ह्या औषधाखेरीज त्यामध्यें झिंक आक्साइड असते. त्याचा उपयोग एंपिरिकल आहे असे दिसते! विशिष्ट असा त्याचा काय उपयोग आहे हे प्रत्यक्ष विदित नाहीं.

ज्वर जोरांत येऊ लागला म्हणजे त्याच्यापुढें हात टेकण्याची पाळी येते. पेनिसिलिनचा कोर्स संपूर्ण दिला; अगर क्विनीन टोचले, पोटांतून दिले तरी सुद्धां कांहींही उपयोग होत नाहीं. त्याचा जोर वाढताच राहतो.

मी पाहिलेल्या रोग्यांतून तीन रोग्यांचा ज्वर बिलकूल आटोक्यांत आला नाहीं. व त्यांतच त्यांचा मृत्यू झाला.

अंडीं, मोसंबी, टोमॅटो, लिंबाचा रस हा गरीब लोकांना परवडणारा आहार. व त्यांत सी व बी व्हिटामिन्स चा पुरवठा भरपूर होण्या सारखा आहे. साय काढून दूध घेणेस हरकत नाहीं.

ही प्रचलीत आहार, औषध, व इजेंक्शनची जी चिकित्सा वर्णिली आहे. तिचा कोणत्याही प्रकारे उपयोग न होता. ६ ते ७ रोगी मृत्यु मुखी पडलेले मी पाहिलेले आहेत. त्यांपैकीं निवडक दोन रोग्यांची उदाहरणें खालीं देतो ती पाहिली म्हणजे चिकित्सेचें वैयर्थ्य खात्रीनें लक्षांत येईल.

रुग्णाचें नांव——रत्ना अप्पा धायगुडे –वय २ वर्षें रा. लोणंद.

उपस्थित तक्रारी:–

१ पोट मोठें, यकृत प्लीहा वृद्धि, पोटांत पाणी सांठलेले नाहीं.

२ मधून मधून अनियमित ताप, पाण्डुता.

३ भूक मुलीस अजिबात लागत नाहीं.

४ परसाकडेस ३–३ दिवसांत होत नाहीं. ह्या लक्षणावरून बाळ यकृतोदर निदान करून—

औषधें—

१ लिव्हर कांपाऊंड केओलिन

२ व्हिटॅमिन् बी काम्प्लेक्स (टी. सी. एफ्.)

३ लिव्हर एक्स्ट्रक्टची इंजेक्शन्स–बीकांप्लेक्स (C. D. C.) शक्तीप्रमाणें दर २ दिवसांनीं.

आहार—आईचे दूध बंद, त्याप्रमाणें दूध गाईचे साय काढून उकळून पाजणें. अंड्याचा पांढरा बलक, मोसंबी व ग्लूकोज रोज घेणें व इंजेक्शनें सुरूं केलीं. पहिल्या महिन्यांत थोडी सुधारणा झाली. ६ पौन्ड वजन वाढलें. आहारांत दूध. व अंडी वगैरे वाढविलीं. व हीच चिकित्सा केली.

परंतु एक महिन्यानंतर हीं सर्व चिकित्सा चालू असतां चालू असतां इतर कोणताही विकार उपद्रव म्हणून न येता पुन्हां परतून व तो १५ दिवस हीच चिकित्सा देऊन सुद्धां

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बरा होईना. तेव्हां पुण्यास बालरोग तज्ञाकडे पाठविली व त्यानंतर १५ दिवसांनीं सदर रुग्ण ज्वर व त्याबरोबर Cholaemia होऊन वारला.

दुसरा रुग्ण– xxx नामदेव तेली रा. लोणंद वय २ वर्षे. बाल यकृतोदर, दुसरी अवस्था. तपासल्यानंतर असाध्य म्हणून सांगितला व पुण्यास पाठवून दिला.

Liver Com, c choline

Vitamin B Complex

Liver extract सदर चिकित्सा २ महिने चालू होती. हे सर्व देऊनसुद्धां हा रुग्ण १५ दिवसापूर्वीच वारला.

अशा प्रकारें जम्मीज लिव्हर क्युअर देऊन व सर्व अद्यावत चिकित्सा करून वारलेले ७ ते ८ तरी किमान रोगी मला पूर्णपणे सांगता येतील.

तेव्हां ह्या रोगासंबंधी कोणी वैद्य वा डॉक्टर यशस्वी चिकित्सा करूं शकत असल्यास त्यांनीं आपले अनु[भव] रुग्णाच्या हकीगती देऊन प्रसिद्ध करावे. म्हणजे पुष्क[ळ] उपयोग होईल. त्याचप्रमाणें विशेषतः आयुर्वेदीय औषधां[चा] उपयोग प्रसिद्ध करावा अिंग्रजी औषधें निकामी आहेत [हें] दाखविण्यासाठीं त्यांचा उपयोग केलेला आहे.

सारांश– बाल यकृतोदर ह्या रोगाची व्याख्या देऊ[न] त्याबद्दलची प्रचलित कारण–मीमांसा वर्णिली.

विकृतीविज्ञान व लक्षणशास्त्र सांगून त्यांचे अवस्थावा[र] वर्णन केलें.

ह्या रोगाची कारण परंपरा लक्षांत घेऊन आलेल[ी] नवी, जुनी चिकित्सा मांडली.

प्रत्यक्ष अनुभव घेऊन चिकित्सेचें निष्फळत्व मांडले [व] प्रचलित कालामध्यें दारुण असा हा असाध्य रोग पूर्ण वर्ण[न] केला व ह्यावर यशस्वी आयुर्वेदीय चिकित्सा प्रसिद्ध झाले[स] शास्त्राचे दृष्टीनें फायदा होईल.

1949	November	Antiseptic	Idem.	Infantile hepatic Cirrhosis.
1949	October	,,	A. V. S. Sharma	Allergic disorders.
1950	Abstracts from the current medical literature No. 3			Infantile hepatic Cirrhosis.
1949	,,	T. C. F.	,, ,, No. 2	Cirrhosis of liver treatment with milk and milk products.
1949	,,	,,	No. 3	Dietary treatment Cirrhosis of liver.
1950	April	Antiseptic	by A. V. S. Sharma	Some observations on portal cirrhosis of liver in adults.

रामतीर्थ ब्राह्मी तेल

(स्पेशल नं. १) (मेडिकेटेड) डोक्याचे ज्ञान व क्रियातंतु बलवान करते केस काळे आणि मजबूत होतात. टक्कल पडलेल्या जागीं पुन्हां केंस येतात. खवडे उवा, लिखा यांचा नाश होतो. स्मरणशक्ति वाढते. डोळ्यांत घातल्यानें दृष्टी सुधारते. कानांत टाकल्यानें कानाचे रोग नाहींसे होतात. गाढ झोप लागते.

सर्वऋतूंत सर्वांना उपयोगी. सर्वत्र मिळतें. मोठी बाटली किं. ३–८–०, लहान बाटली किं. रु. २.

श्री रामतीर्थ योगाश्रम, ८ उमेश धाम, २ रा विन्सेंट स्क्वेअर, दादर जी. आय्. पी. रेल्वे स्टेशन जवळ, मुंबई १४.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेदीय अर्कशाला लि., सातारा.

शेअर विक्री सुरू आहे

अधिकृत भांडवल:— पांच लक्ष (५०००००) रुपयांचें असून तें पुढीलप्रमाणें विभागलेलें आहे

(१) १२७ डिफर्ड शेअर्स, प्रत्येकीं रु. १०० चा—रु. १२७००
(२) ८७३ आर्डिनरी शेअर्स, प्रत्येकीं रु. १०० चा—रु. ८७३००
(३) ८००० आर्डिनरी शेअर्स, प्रत्येकीं रु. ५० चा—रु ४०००,००

रु. ५०००,००

विक्रीस काढलेलें भांडवल:— रु. तीन लक्ष (रु. ३०००,००)

(१) १२७ डिफर्ड शेअर्स (प्रत्येकीं रु. १००) रु. १२७००
(२) ८७३ आर्डिनरी शेअर्स (प्रत्येकीं रु. १००) रु. ८७३००
(३) ४००० आर्डिनरी शेअर्स (प्रत्येकीं रु. ५०) रु. २०००,००

रु. ३०००,००

वरील विक्रीस काढण्यांत आलेल्या भांडवलापैकीं क्रमांक एक व दोनचे एक लक्ष रु. चे शेअर्स खपलेले आहेत. सध्यां फक्त प्रत्येकीं रु. पन्नासच्या ऑर्डिनरी शेअर्सची विक्री चालू आहे. डिफर्ड व ऑर्डिनरी या शेअर्समध्यें नफा वाटणी–बाबत कांहींहि फरक नाहीं.

शेअर्सबाबत भरावयाच्यां रकमा:— अर्जासोबत प्रत्येक शेअरमागें रु. १० प्रमाणें व अर्ज मंजुरीनंतर रु. १५ प्रमाणें एकूण फक्त पंचवीस रुपये भरावयाचे आहेत. उरलेली रक्कम संचालक मंडळ मागणी करील त्याप्रमाणें भरावयाची आहे.

शेअर अर्जाचे फॉर्म:— शेअर्सकरितां करावयाचा अर्ज कंपनीच्या छापील फॉर्मवर केला पाहिजे. हे फॉर्म कंपनीच्या केंद्रकार्यालयाकडून मिळतील. कोणाहि एका भागीदारास अधिकांत अधिक एकूण रु. ५००० किंमतीचे फक्त १०० शेअर्स घेतां येतील.

कंपनीची व्यवस्था:— कंपनीची व्यवस्था संचालक मंडळाच्या नेतृत्वाखालीं असून ती कोणत्याहि मॅनेजिंग एजन्सीकडे सोपविलेली नाहीं. संचालक मंडळ आजपर्यंत व सध्यांहि विनावेतन काम करीत आहे.

संचालक मंडळ : डॉ. वि. ल. **आगाशे**, एल्. सी पी. एस्. चेअरमन.
श्री. **रा. ना. गोडबोले**, बी. ए., बी. कॉम., सी ए. आय्. आय्. बी. डायरेक्टर वेस्टर्न इंडिया विमा कंपनी लि; सातारा.
श्री. **मो. ना. आगाशे**, एम्. बी. बी एस्. चेअरमन, वेस्टर्न इंडिया विमा कं. लि; सातारा.
डॉ. **मे. ना जोग**, एम्. बी. बी. एस्. प्रिन्सिपॉल आर्यांग्ल वैद्यक महाविद्यालय, सातारा.
श्री. **म. पां. गुर्जर** एम्. ए. डायरेक्टर वेस्टर्न इं. वि. कं. सातारा.
श्री. द. कृ. **साठे**, बी. ए. एल्. एल्. बी. वकील, सातारा.
वैद्य दि. वि. **बोडस**, आयुर्वेद विशारद.

सेक्रेटरी : श्री. **के. जी. कुलकर्णी**

ऑडिटर्स : मेसर्स पी. जी. भागवत चार्टर्ड अकौंटंटस् अँड ऑडिटर्स मुंबई.

बँकर्स : दि युनायटेड वेस्टर्न बँक लि; सातारा.
दि सातारा स्वदेशी कमर्शियल बँक लि; सातारा.

— शेअर अर्जाचे मागणीसाठीं लिहा —

सेक्रेटरी आयुर्वेदीय अर्कशाला लि. सातारा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

R. No. B. 5225

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



यूटोन

गर्भाशय व गर्भ यांना पोषक अशा नामांकित औषधीं-द्रव्यांच्या संयोगापासून सिद्ध केलेला हा कल्प गर्भपाताची प्रवृत्ति, आकस्मिक गर्भस्राव व गर्भवतींचें अन्य विकार यांवर परिणामकारक उपाय ठरलेला आहे.

सुलभ प्रसूति आणि बाळसेदार बालक यासाठीं गरोदरपणीं सतत यूटोन घेत रहा !

सुखी मातृपदाची इच्छा यूटोन पुरी करील.

तें स्वादिष्ट आणि रुचकर आहे.

आयुर्वेदीय अर्कशाला लि.

सा ता रा.

हें मासिक श्री. *विश्वनाथ लक्ष्मण आगाशे* यांनीं *आनंद प्रिंटिंग प्रेस, सातारा लि.*, येथें छापलें व आर्यांग्ल वैद्यक महाविद्यालय, सातारा येथें प्रसिद्ध केलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद प्रसारक मंडळी सातारा या संस्थेचे पुरस्कृत मासिक

आयुर्मीमांसा

गुरुकुल-पत्रिका,
गुरुकुल कांगड़ी

प्रमुख संपादक : वैद्यरत्न गो. आ. फडके,
आयुर्वेदाचार्य.

कार्यकारी संपादक : व. ल. वट्ट,
आयुर्वेद विशारद.

या अंकांतील विषय–

वाद-संवाद : नवा अभ्यासक्रम
संधान-विधी— पु. वि. घामणकर.
सुकामेवा - दत्तात्रेयशास्त्री जळूकर.
अर्कशाला वृत्त : वाचकांचा पत्रव्यवहार
महाविद्यालय वार्ता इ.

गेल्या अंकापासून आयुर्मीमांसेंत संधानविधी ही महत्वपूर्व लेखमाला सुरू झालेली आहे. येत्या अंकापासून वैद्यराज नृ. ना. बागेवाडीकर यांचे सिद्धौषधिविषयक लेखांक प्रसिद्ध होत राहतील. वैद्य जळूकर यांच्या लेखांचेहि सर्वत्र स्वागत होत आहे. आयुर्मीमांसेचे अंक केवळ वाचनीयच नसून संग्राह्यहि असतात. ग्राहकांनीं आपले अंक चालू ठेवावेत व वाचकांनीं वर्गणीदार व्हावे अशी विनंति आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्मीमांसेचे जाहिरातदार

आयुर्मीमांसेंत नित्य व नैमित्तिक स्वरूपांत जाहिरात देत असलेल्या जाहिरातदारांचे आम्ही अत्यंत आभारी आहोत. हे जाहिरातदार आयुर्वेद-शास्त्राच्या वाङमय-सेवेस महत्त्वपूर्ण सहाय्य करीत असून आपल्या मालाचा परिचय अत्यंत उचित अशा माध्यमांतून जनतेस करून देत आहेत. त्यांची माध्यम-विषयक निवड अगदीं अचूक आहे. कारण औषधी-व्यापारांतले महत्त्वाचे घटक असलेले वैद्य व विक्रेते यांच्याकडे आयुर्मीमांसा नियमित जाते.

नित्य जाहिरातदार

१ शा. जादवजी लल्लूभाई आणि कं. मुंबई
२ उंझा फार्मसी लि., उंझा (गुजराथ)
३ आयुर्वेदिक धन्वन्तरी फार्मसी लि. नगर
४ डॉ. पुरोहित फार्मसी, कोल्हापूर
५ अरविंद केमिकल वर्क्स, छिंदवाडा
६ अपोलो फार्मास्युटिकल वर्क्स लि. बडोदे
७ जी. ए. मिश्रा आयुर्वेदिक फार्मसी, झांशी.
८ श्रीपाद फार्मसी, पेण.
९ श्रीरामतीर्थ योगाश्रम, मुंबई.
१० आयुर्वेदीय अर्कशाला लि., सातारा.

नैमित्तिक जाहिरातदार

१ धूतपापेश्वर इंडस्ट्रीज लि. पनवेल.
२ द. क्. सांडू ब्रदर्स चेंबूर लि. चेंबूर
३ अलेंबिक केमिकल वर्क्स लि. बडोदे
४ आयुर्वेदाश्रम फार्मसी लि. अहमदनगर
५ वेस्टर्न इंडिया विमा कं. लि. सातारा

इतरहि आयुर्वेदीय औषधी उत्पादनसंस्था प्रसिद्धी माध्यम म्हणून आयुर्मीमांसेची निवड करतील अशी आशा आहे.

—जाहिरात व्यवस्थापक

औषधी-प्रसिद्धीचें एकमेव मराठी माध्यम आयुर्मीमांसा

जाहिरात दर

पूर्ण पान	६० रुपये
अर्धे पान	३२ ,,
चतुर्थांश पान	१६ ,,
अष्टमांश पान	८ ,,
चौथें कव्हर पान	१०० रुपये
दुसरे कव्हर पान	८० ,,
तिसरे कव्हर पान	८० ,,

कायम स्वरूपाच्या जाहिरातीं सवलत दिली जाईल.

— पत्रव्यवहार करा —

पुढील अंकापासून

- हें पान जाहिरातदारांसाठीं राखून ठेवलें जाणार आहे.
- या पानावर जाहिरातदारांचा क्रमशः परिचय छापला जाण्याचा आहे.
- आयुर्मीमांसा जाहिरातदारांना शक्य तें सर्व सहकार्य देत असते

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद प्रसारक मंडळी सातारा या संस्थेचें मासिक

आ यु र्मी मां सा

संचालक : आयुर्वेदीय अर्कशाला लि. सातारा

वर्ष १४ वें] सप्टेंबर १९५१ [अंक ९ वा

वार्षिक वर्गणी ३ रुपये : किरकोळ अंक ८ आणे

कोणत्याहि महिन्यापासून वर्गणीदार होता येते.

★ आयुर्मीमांसेंतील लेखांतून व्यक्त होणारी मतें ही त्या त्या लेखकांची मानली जातील. संपादक त्यांशीं नेहमींच सहमत असतात असें नाहीं.

★ आयुर्मीमांसेंत प्रसिद्ध होणाऱ्या लिखाणाविषयींचे सर्व हक्क संस्थेच्या स्वाधीन आहेत.

★ वर्गणी ज्या अंकाअखेर संपत असेल त्या अंकानंतर त्या त्या वर्गणीदारांना पुढील वर्षाची वर्गणी पाठविण्याविषयीं सूचनापत्रें जातात. ज्यांची वर्गणी संपली आहे अशा ग्राहकांनीं हें पत्र मिळतांच म. ऑ. नें वर्गणी पाठवावी. म. ऑ. आली नाहीं अगर अंक नको असल्याबद्दलहि पत्र आलें नाहीं तर त्या वर्गणीदारांना पुढील अंक व्ही. पी. नें पाठविला जातो.

★ अंक मिळाला नसल्याची तक्रार त्या महिन्याच्या दहा तारखेच्या आंत करावी. म्हणजे शक्य असल्यास दुसरा अंक पाठविला जातो.

★ सर्व पत्रव्यवहार 'व्यवस्थापक आयुर्मीमांसा, अर्कशाला बिल्डिंग, सातारा' या पत्त्यावरच करावा.

बाल यकृतोदर-विशेषांक

आयुर्मीमांसेच्या आगस्ट अंकांत वैद्य गो. वि. जोशी यांनीं 'बाल यकृतोदर' या विषयासंबंधीं लिहिलेला चर्चात्मक लेख मीमांसेच्या लेखक-वाचकांनी वाचला असेलच. आयुर्वेदीय व आंग्ल वैद्यक विशारदांना या विकाराचें कष्टसाध्यत्व किंबहुना असाध्यता ज्ञात आहेच. या विषयावर जितकी चर्चा होईल तेवढी आवश्यकच आहे. विशेषतः या विकारासंबंधींचे चिकित्साविषयक अनुभव प्रसिद्ध झाले तर त्यांतल्या यशापयशाची मीमांसा होऊन कांहीं निष्कर्ष काढतां येतील. म्हणून या विषयाचा समग्र स्वरूपांत एकत्र विचार होण्याकरितां आयुर्मीमांसेचा विशेषांक काढण्यांत येणार आहे. या अंकाकरितां लेखकांनीं व अनुभवी चिकित्सकांनीं आपले लिखाण शक्य तितक्या त्वरित पाठवावे अशी विनंती आहे. संपादकीय कार्यालयांतून व्यक्तिगत पत्रें जात आहेतच, पण वैयक्तिक विनंतीची वाट न पाहातां सर्वांनीं या अंकाकरितां लिखाण धाडावें.

—संपादक

'सप्रेम भेट' योजनेचें यश

आयुर्मीमांसेचे अंक वैद्य व औषधविक्रेते आणि औषधीकारखानदार यांना सप्रेम भेट धाडले जात आहेत. आयुर्मीमांसेच्या या शास्त्रीय वाङ्मय सेवेस वर्गणीच्या रूपानें सहाय्य करण्याविषयीं सर्वांना आगस्ट अंकांत विनंती केली होती. या विनंतीस मान देऊन पुढील ग्राहकांनीं वर्गणी धाडली आहे.

१ श्रीप्रताप आयुर्वेदिक रीसर्च इन्स्टिटयूट अमळनेर
२ वैद्य द्दि. ल. भंडारी मानवथ (हैद्रावाद)

श्रीप्रताप आयुर्वेदिक रीसर्च इन्स्टिटयूटचे मॅनेजर श्री. वैद्य वि. दा. एकतारे लिहितात. "आपल्या मासिकाचे वर्गणीदार म्हणून संस्थेचें नांव दाखल करावे. आपलें मासिक संतोषदायक आहे."

—व्यवस्थापक

संसार में सर्व प्रथम आयुर्वेदिक इन्जेक्शन के आविष्कर्ता और निर्माणकर्ता
जी. ए. मिश्रा आयुर्वेदिक फार्मेसी (रजिस्टर्ड) झाँसी के
बने हुए
मिश्रा आयुर्वेदिक इन्जेक्शन्स
प्रयोग कर निरोग बनें
प्राप्त करने के लिये नियमसूची मंगा लें।

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वाद-संवाद

नवा अभ्यासक्रम

लेखक— ब. ल. वष्ट

भिषग्विलासकारांचें अभिनंदन

आयुर्मीमांसेच्या जुलै १९५१ च्या अंकांत आयुर्वेदिक स्टेट फॅकल्टीच्या नव्या संकल्पित अभ्यासक्रमासंबंधीच्या चर्चेचा मी केवळ उपक्रम करून ठेवला होता. आयुर्वेद-शास्त्राच्या तत्वांची व व्यवहाराची या देशांत पुनश्च वैभव-पूर्वक प्रतिष्ठापना व्हावी या हेतूला अनुसरून जे मार्ग वा कार्यक्रम आखावयाचे, त्यांत या शास्त्राच्या शिक्षणप्रणालीचें महत्व अनन्य साधारण आहे हें कोणासहि मान्य करावे लागेल. कारण शिक्षण हें एकां घटक राज्यांत किंवा देशांत सर्वत्र एकसूत्रतेनें दिले जाते, त्या शिक्षणाला शासन संस्थेची संमती आणि पुरस्कार लाभलेला असतो आणि या शिक्षणक्रमांतून जे पदवीधर तयार होतात तेच शास्त्राची जनतेतील प्रतिष्ठा सांभाळीत वा वाढवीत असतात. हा एक अखंड चालणारा कार्यक्रम आहे. सभा, संमेलनें, चर्चा, चळवळी, लेखन, संशोधन ही सर्व प्रासंगिक, नैमित्तिक. त्यांतून या शिक्षण कार्यास वळण वा पुष्टी लाभावयाची इतकेंच. प्रधान कार्य शिक्षणाचे. त्यांतूनच तत्व आणि व्यवहार या दोन्ही क्षेत्रांत शास्त्राचा बोज वाढत असतो. म्हणूनच या नव्या संकल्पित अभ्यास क्रमाची शक्य तेवढी विस्तृत चर्चा व्हावयास हवी आहे. या विषयांत आयुर्वेदाच्या उपासकांनीं निष्ठेनें लक्ष घातले पाहिजे.

नगरच्या भिषग्विलासकारांनीं आपल्या ऑगस्ट १९५१ च्या अंकांत या अभ्यासक्रम प्रकरणीं निःसंदिग्ध, विचारपूर्ण आणि वास्तवतेला अनुलक्षून आपलें मत प्रकट करून या प्रश्नाचें गांभीर्य आयुर्वेद-जगतापुढें मांडलें आहे याबद्दल मी त्यांचें मनःपूर्वक अभिनंदन करतो. शास्त्राच्या क्षेत्रांत खुली चर्चा व्हावी, सरकारीं संस्था वा तज्ञ यांचे निर्णयच अंतिम मानले जाऊ नयेत हें स्पष्ट आहे. विशेषतः या प्रकरणीं सत्तेचें दडपण येणें तर सर्वथा अनिष्ट असते. पण अशा खुल्या मत-प्रदर्शनाला वाव देण्यांत आलेला नाहीं भिषग्विलासकार लिहितात, "हा नवीन पदवी अभ्यासक्रम सध्या तावडतोब जारी करावा कीं नाही या संबंधीचे विविध महाविद्यालयांतील शिक्षकांचें संयुक्त मत फॅकल्टीनें प्रथम अजमावयास पाहिजे होते. ते लोकशाहीला शोभून दिसलें असते." भिषग्विलासकारांचें हे सर्वच संपादकीय वाचनीय असल्यानें आयुर्मीमांसेच्या वाचकांकरितां तें उधृत करणेंच अवश्य वाटते.

भिषग्विलासकारांचा संपादकीय लेख

" बोर्डाच्या निरीक्षक समितीनें विद्यालयांत शिक्षणविषयक सुधारणा करण्याच्या ज्या सूचना केल्या होत्या तदनुसार पूर्णता आणण्याची संस्थेचे कार्यकर्ते प्रयत्न करीत आहेत. नवें स्वतंत्र इंद्रिय विज्ञानशाला सर्व अपेक्षित साहित्यानें सुसज्ज केली आहे. 'प्रत्येक विषयाला स्वतंत्र अध्यापक पाहिजे' ही निरीक्षक समितीची सूचनाही प्रत्यक्षांत आणण्याची कोशीस झाली आहे. पाश्चात्य वैद्यकाचे विविध विषयासाठीं स्वतंत्र अध्यापक उपलब्ध होणें सुलभ आहे. परंतु आयुर्वेदविषयाच्या बाबतींत ही गोष्ट तितकोशी सहज होणें सुलभ नाहीं. व्यवसायांत यशस्वी असणारा प्रत्येक डॉक्टर वैद्य अध्यापक होऊ शकेलच असें नाहीं. अध्यापन हा एक अभ्यास आहे, ही एक कला आहे. एक सहज प्रवृत्तीही आहे. प्रत्येकावर तिचा वरद हस्त असेलच असें नाहीं. डॉक्टर बहुसंख्य असल्यानें त्यांचे अध्यापक उपलब्ध होतात. परंतु वैद्यांची व " दृष्टकर्मा तीर्थात्तशास्त्रार्थ " अशा वैद्यांची संख्या अद्यापी अत्यल्प असल्यानें प्रत्येक विषयाला स्वतंत्र व उत्तम अध्यापक मिळणें सहज शक्य नसतें. प्रांतांतील विविध विद्यालयांच्या आयुर्वेदीय अध्यापकांची जीं माहिती आम्ही मिळवली आहे त्यावरूनही हीच गोष्ट स्पष्ट होते. पुणें, सातारा ह्या ठिकाणींही निरीक्षक समितीच्या हीं सूचना अमलांत येऊं शकली नाहीं असें दिसतें. निरीक्षक समितीची ही सूचना आदर्श आहे, परंतु नजीकच्या कांहीं वर्षांत तरी ही पूर्णांशानें अमलांत येण्याची शक्यता दिसत नाहीं.

ह्या व अशाच मौलिक कारणाकरिता फॅकल्टीनें शिफारस केलेल्या नवींन पदवी-अभ्यास क्रमाशीं आम्हीं सहमत होऊं शकत नाहीं. विद्यापीठाची 'इंटर सायन्स' ही नवीन पदवी परीक्षेसाठीं प्रवेशाची लायकी आहे. पदवी-अभ्यासक्रमाला प्रवेश घेऊं इच्छिणाऱ्या विद्यार्थ्याचा शैक्षणिक दर्जा कोणत्या युक्तिवादानें निश्चित केला आहे याचा बोध होत नाहीं.

अभ्यासक्रमांतील पाश्चात्यवैद्यकाच्या विविध विषयांना अनुसरून हा शैक्षणिक दर्जा ठरविला आहे, असें वाटतें. पाश्चात्य वैद्यकाचे अभ्यासक्रमासाठीं जो प्रवेश दर्जा आहे तो आयुर्वेदाच्या अभ्यासक्रमांतील पाश्चात्य विषयांच्या अभ्यासा साठीं प्रवेश दर्जा असला पाहिजे असा फॅकल्टींतील डॉक्टरांचा अट्टाहास असेल. परंतु फॅकल्टीच्या आयुर्वेद परिक्षेत आयुर्वेद

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

प्राधान्य आहे. आयुर्वेदाला उपकारक किंवा आयुर्वेदीय सिद्धांताचें स्पष्टीकरणाकरतां सहाय्यक असेल इतक्याच प्रमाणात त्यांत पाश्चात्य वैद्यकीय विषयांचा अंतर्भाव असावा; याचप्रमाणें आयुर्वेदीय पदवीधरांना यशस्वी व्यवसाय करतां यावा इतक्याप्रमाणांत आयुर्वेदाच्या अभ्यासक्रमांत पाश्चात्य वैद्यकीय विषयांची जोड दिली आहे. या अभ्यासक्रमानें पदवीधरांचे वैद्यकीय ज्ञानही अद्ययावत् रहाते. या सर्व फॅकल्टीनें चालू असलेला संमिश्र अभ्यासक्रम आम्हांस पसंत आहे; हा तो अभ्यासक्रम गेली कांहीं वर्षे प्रांतांतील महाविद्यालयांतून यशस्वी रीतीनें चालूंहि आहे. परंतू हा कनिष्ट (?) अभ्यासक्रम स्थिर होतो न होतो तोच फॅकल्टीनें नवीन पदवीअभ्यासक्रम १९५२ पासून अमलांत आणण्याची घोषणा केलीं आहे. बेळगांवचे सुप्रसिद्ध आयुर्वेदाभिमानी डॉक्टर सावनुर यांचाहि या नवीन प्रवेशलायकीस विरोध आहे. ' मॅट्रिक्युलेशन् ' हीच प्रवेश लायकी असावी असेंच त्यांचेहि मत मत आहे.

मे महिन्यामध्यें हचा नवीन अभ्यासक्रमाचे विषयवार तक्के व एक पत्र फॅकल्टीकडून प्रत्येक महाविद्यालयाच्या मुख्याध्यापकाकडे पाठविले गेले. " १९५२ जून पासून पदवीअभ्यासक्रम जारी करण्याचे फॅकल्टीनें निश्चित केलें आहे. त्याचा अभ्यासक्रम आपणांकडे पाठविला आहे, अभ्यासाचे तपशीलाबाबत आपल्या विद्यालयाच्या तत् तत् विषयाचे शिक्षकाच्या कांही सूचना असतील, तर त्या कळवाव्यात; " असा आदेश पत्रांत आहे.

सल्लामसलतीकरतां हा अभ्यासक्रम पाठविण्याचे पूर्वी हा नवीन पदवी-अभ्यासक्रम सध्यां तावडतोब जारी करावा कीं नाहीं, या संबंधीचें विविध महाविद्यालयांतील शिक्षकांचे संयुक्त मत फॅकल्टीनें प्रथम अजमावयास पाहिजे होते. ते लोकशाहीला शोभून दिसले असते. प्रांतांतील विविध-विद्यालयांतील शिक्षक मतदारांची संख्या सुदैवानें कांहीं फार नाहीं. फॅकल्टीनें नाहीं, तरी जे वैद्य निवडून येण्यासाठीं विविध विद्यालयांतील शिक्षकांचेकडे मते मागण्यास आले होते, त्या उमेदवार वैद्यांनीं तरीं हे कर्तव्य तत्परतेनें पार पाडावयास पाहिजे होते. परंतु सिंहासनावर आरूढ झालेला मेहेरबान् मंत्री प्रजेचे स्मरण कसे ठेवेल !

आम्हीं संमिश्र अभ्यासक्रमाचे पुरस्कर्ते आहोत. आयुर्वेदाचा दर्जा, व प्रतिष्ठा वाढवावी असें आम्हासही वाटते. तथापि चालू असलेल्या आयुर्वेद अभ्यासक्रमांतून कांहीं तरी स्थिरभाव निर्माण होईपर्यंत काहीं नवीन प्रयोग सुचविणें हास्यास्पद होईल. चालू अभ्यासक्रमांतील आयुर्वेदीय विषय व नवीन पदवी परीक्षेसाठीं सुचविण्यांत आलेल्या अभ्यासक्रमातील आयुर्वेदीय विषय यांचे तौलनीक सूक्ष्म निरीक्षण केलें तर नवीन अभ्यासक्रमांत कांहीं अभिनव मौलिक भर असल्याचें दिसत नाहीं. पाश्चात्य वैद्यकीय विषयांत मात्र डोळचांत भरण्यासारखी भर आहे. आयुर्वेदाच्या विषयांची मांडणी विस्तृत केली आहे. आयुर्वेदाच्या पदवी परीक्षेस लायक अशी पूर्व तयारी अद्यापी आमची नाहीं. हें वास्तविक सत्य कबूल करण्यांचे टाळून, डॉक्टरी वेगानें चालण्याचा आव आणला तर परिणामीं आमचा " पादास्थिभ्रंश " होण्याची साधार भीति आहे.

हचा चळवळीच्या आहारीं जाऊन हसे करून घेण्यापेक्षा प्रांतांत असणाऱ्या विद्यालयांतील आयुर्वेदाच्या अध्यापकांनीं डॉ. म्हसकर संशोधन समितीनें केलेल्या शिफारसीपैकी कांहीं

सर्व प्रकारची आयुर्वेदीय औषधें शास्त्रोक्त पद्धतीनें तज्ञ वैद्यांच्या देखरेखीखालीं तयार केली जातात.

ठिकठिकाणीं एजंटस् नेमणे आहेत.

दि आयुर्वेदिक धन्वंतरी फार्मसी

अहमदनगर

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कार्यें हाती घेऊन ती संघटित सहकार्यानें पार पाडावीत अशी आमची आग्रहाची विनंती आहे.

(१) आर्षग्रंथांतील आयुर्वेदीय संज्ञाची अर्थ निश्चिती (२) विविध विषयांचे पाठ्यग्रंथ प्रकाशित करणें. (३) आमवात; मधुमेह; पांडु; उदर; जलोदर; इत्यादि रोगांच्या निवडक रुग्ण चिकित्सेने अनुभव संयुक्त मार्गदर्शनाखालीं संकलित करणें. (४) चालू पदवीधर वैद्यांच्या व्यवसायांतील व्यावहारिक अडचणी दूर करणें व फॅकल्टी व सरकार मार्फत करून घेणें (५) पदवीनंतर एकेका खास विषयांच्या पारंगत अगर प्राविण्य अभ्यास क्रमाच्या तात्विक व प्रात्यक्षिक शिक्षणाची अद्ययावत् व्यवस्था करणें. (६) अध्यापन कार्यात सुसूत्रता आणण्यासाठीं दरवर्षी वासंतिक अध्यापक वर्ग चालविणें. अित्यादि.

ही व अशा तऱ्हेची पूर्व सिद्धता असल्याशिवाय नवीन पदवी अभ्यास क्रमाची कल्पना उराशीं बाळगणें परिणामीं आत्मघातकच ठरेल."

आधी कळस मग पाया !

भिषग्विलासकारांनीं म्हटल्याप्रमाणें आयुर्वेदाच्या संशोधन-अन्वेषणाचे कार्य हातीं घेण्यापूर्वी पदवी-परीक्षेचा अट्टाहास चालविण्यांत अर्थ नाहीं. शिक्षणक्रमाचा दर्जा केवळ कागदोपत्रीं वाढवून वाढत नाहीं किंवा केवळ आंग्ल वैद्यकाच्या शिक्षणक्रमाची नक्कल केल्यानेंहि तो वाढणार नाहीं.

आधी पाश्चात्य शास्त्रांच्या तज्ञांनीं त्या शास्त्राच्या विकासा साठीं आणि संशोधनाकरितां जे परिश्रम केले त्यांचे अनुकरण केले पाहिजे. डॉ. म्हसकर समितीनें सूचित केलेला संशोधनाचा कार्यक्रम कांहीं कालमर्यादा निश्चित करून हातीं घेतला व तेवढ्या अवधीत संज्ञा निश्चिती, ग्रंथसंशोधन, संस्कृत प्रसिद्ध व अप्रसिद्ध आयुर्वेदीय वाङ्मयाचें परिशीलन, दुर्मीळ हस्तलिखितांचा संग्रह व अभ्यास, तत्व-बोधास सुसंगत अविष्कार आणि या सर्वांच्या आधारे विषयानुरूप पाठ्य ग्रंथांची निर्मिती केल्यावांचून अभ्यासक्रमाचा दर्जा कसा उंचावणार ? आयुर्वेदीय तत्वांच्या अर्थाबद्दल अनेक प्रवाह आहेत, मत भिन्नतां आहे. त्यांचे एकसूत्रीकरण करून सर्वत्र एकता आणावयास नको काय ? ज्या आयुर्वेदीय चिकित्सेचा आणि औषधी कल्पांचा या पदवीधरांकडून अवलंब केला जावा अशी अपेक्षा आहे त्या चिकित्सानुरूप औषधी-पाठचिंतामणीचा उपक्रम प्रथम झाला पाहिजे. असा पाठचिंतामणी सर्वमान्य, सर्वस्वीकृत असा असला पाहिजे. औषधांचे प्रमाणीकरण कोणत्या निकषानुसार व्हावे तें ठरले पाहिजे. हा सर्व पायाभूत भाग पुरा करण्यापूर्वी केवळ 'पदवी' चा कळस लावल्यानें खरा कार्यभाग होणार नाहीं. पदवी हा शब्दच केवळ विरुद म्हणून अलंकारासारखा स्वीकारण्याचा मोह पुष्कळांना होतो आणि मागे किती नामधारी विद्यापीठांनीं तिकिटाच्या दरासारखे दर लावून पदव्या विकण्याची टांकसाळच काढली होती. शब्दांचे

आयुर्वेदाच्या क्षेत्रांत अद्वितीय
अशा शक्तिशाली
अरविंद आयुर्वेदिक इन्जेक्शन्स

चा उपयोग करून रोग्यांना शीघ्र निरोगी करा व यश मिळवा. शक्ति व शुद्धता याबद्दल पूर्ण गॅरंटी दिली जाते. सूचिपत्र मागवा—

सचित्र आयुर्वेदीक इंजेक्शन चिकित्सा—

मूल्य ३ रु. पोस्ट खर्च १० आ.

व्यवस्थापकः— अरविंद केमिकल वर्क्स
छिंदवाडा (सी. पी.)

LIFE COMES FROM APOLLO · THE A.P. WORKS LTD. BARODA · REGD. TRADE MARK

अपोलोज आयुर्वेदीक इंजेक्शन्स
अद्यावत प्रयोगसिद्ध कल्प

आद्य आयुर्वेदीय संस्था म्हणून 'प्राइड ऑफ इंडिया' हें नामाभिमान या संस्थेला योग्य ठरते. आमची इंजेक्शन्स या देशांत व परदेशांत विकली जातात आणि आंग्ल वैद्य व आयुर्वेदीयांमध्ये तीं सारखीच लोकप्रिय झालीं आहेत. आमच्या ट्रेनिंग इन्स्टिटयूटमध्यें वैद्यांना इंजेक्शनचें शिक्षण दिले जाते. विशेष माहितीसाठीं लिहा व एजन्सी नियम आणि मोफत कॅटलाग मिळवा.

दि अपोलो फार्मास्युटिकल वर्क्स लि.
प्रतापगंज बडोदा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अर्वाचीनांकडेच तज्ञांचे लक्ष असावयास हवे. आयुर्वेदीय शिक्षणक्रम अधिक सखोल, निर्दोष, एकसूत्रात्मक आणि व्यापक व्हावयास पाहिजे असेल तर आज अनेक शतके उपेक्षिले गेलेलें संशोधन-अन्वेषणाचे कार्य हातीं घेतलें पाहिजे. हें कार्य जसे प्रगत होईल तसतसें आयुर्वेदीय शिक्षण अधिक परिपुष्ट, प्रभावी आणि सुप्रतिष्ठित होणार आहे हे काय तज्ञांना सांगावयास हवे ?

समन्वय-सहकार कीं विषम तुलना ?

व्यवहार-निर्वाहासाठीं जरूर तेवढा पाश्चात्य वैद्यकाचा भाग आयुर्वेदीय शिक्षण क्रमांत केवळ पूरक म्हणून समाविष्ट करण्यास कोणाचाहि विरोध नव्हता. ह्यापुढें जाऊन आयुर्वेदीय विषयांच्या बरोबरीनें आंग्ल वैद्यकाचे विषय शिकवावयाचे असतील तर या दोन शास्त्रप्रणालींचे प्रवाह परस्परांचा छेद करणारे, विरोधी स्वरुपाचे असे न राहाता त्यांचा कांहीं समन्वय, सहकार होणें शक्य असेल तर ती दृष्टी पत्करली पाहिजे. या दृष्टीकोनानुसार आंग्ल वैद्यकाचे विषय शिकविणाऱ्या प्राध्यापकांना आयुर्वेदाचे ज्ञान असलें पाहिजे. आयुर्वेदविषयीची त्यांची भूमिका ज्ञानपूर्वक तुलनेची असली पाहिजे. असे उभयशास्त्रविद् प्राध्यापक निर्माण करण्याविषयीची योजना १९३८ सालीच डॉ. मो. ना. आगाशे यांनीं आरोग्य-मंत्री डॉ. गिल्डर यांना सुचविली होती. ही योजना अधिकारारूढ संस्थेनें किंवा तज्ञांनीं पुरस्कारलेली नाहीं हें दुर्दैव होय.

आंग्ल आणि आयुर्वेदीय विषय आजच्या स्वरुपांत, आजच्याच पद्धतीनें शिकविण्यांत प्रत्यक्ष आयुर्वेद शास्त्राला उपकारक असा कोणता लाभ घडून आलेला आहे हें स्पष्ट होणें इष्ट आहे. याच संदर्भांत आयुर्मीमांसेच्या एका वाचकाकडून मला आलेल्या पत्रांतील प्रश्न मला येथें विचारार्थ मांडावेसे वाटतात.

या प्रश्नांची उत्तरें हवीत

१ आयुर्वेदाचा 'पदवी-अभ्यासक्रम' पुढील वर्षापासून सुरु होणार आहे असे ऐकतो. या पदवीधरांना आंग्ल वैद्यकाच्या उच्च शिक्षणक्रमाकरितां सरकारमान्य विद्यापीठांतून प्रवेश मिळणार आहे काय ? अथवा आयुर्वेदाचा असा पदव्युत्तर शिक्षणक्रम आंखला गेला आहे काय ?

२ पदवी ही फक्त सरकारमान्य विद्यापीठे देऊ शकतात असा माझा समज होता. आयुर्वेदीय स्टेट फॅकल्टीला देशांतील या मुंबई राज्यांतील युनिव्हर्सिटयांनीं मान्यता दिली आहे काय ?

३ वरील दोन प्रश्नांना होकारार्थी उत्तरे नसतील तर डिप्लोमा ऐवजी डिग्री हा केवळ शाब्दिक फरक ठरणार नाहीं काय ?

४ इंटर सायन्सची प्रवेश लायकी व पदवीयोग्य अभ्यासक्रम अमलांत येण्यापूर्वी केंद्र व राज्य सरकारांनीं नेमलेल्या समित्याकडून संशोधन विषयक ज्या शिफारसी करण्यांत आल्या आहेत. त्यांच्या अंमलबजावणीस प्राधान्य देणे इष्ट नाहीं काय? कीं शिक्षण आणि शास्त्रसंशोधन यांचा सापेक्ष संबंध नाहीं असें मानावयाचे ?

५ फॅकल्टीचा शिक्षणक्रम आयुर्वेद-प्रधान असावा ही भूमिका फॅकल्टीतल्या तज्ञांना मान्य असावीसे वाटते. आज गेली दहा वर्षे चालू असलेल्या शिक्षणक्रमांतून जे पदवीधर बाहेर पडले त्यांनीं आयुर्वेदांत कोणती मौलिक भर टाकली, निदान, चिकित्सा व्यवहारांत ते प्राधान्येकरुन आयुर्वेदीय चिकित्सेचाच अवलंब करीत आहेत काय यासंबंधी फॅकल्टीनें कांहीं चाचणी घेतली आहे काय ? परिणामावरून हेतूचा अंदाज करावयाचा झाल्यास या बाबतींतला अनुभव निराशाजनक आहे असे मला वाटते. हा अनुभव जमेस धरून नवा शिक्षणक्रम पूर्वीपेक्षाहि अधिक आयुर्वेदप्रधान असणे इष्ट आहे. कारण शेवटीं या देशांत आयुर्वेद तरणार अगर मरणार असेल तर तो चिकित्सेच्या प्रत्यक्ष व्यवहारांतच. त्या दृष्टीनें फॅकल्टीनें आयुर्वेदोपकारक असे कांहीं धोरण आखले असल्यास ते स्पष्ट होणें अगत्याचे आहे."

या प्रश्नांना उत्तरें मिळतील अशी अपेक्षा आहे.

आयुर्वेदीय अर्कशाला

हैद्राबाद राज्य सोल एजन्सी

हैद्राबाद राज्यांतील वैद्य व विक्रेते यांनीं आयुर्वेदीय अर्कशाळेच्या मालाविषयीं खालील पत्त्यावर पत्रव्यवहार करावा.

ज. बा. बापट

अर्कशाळा सोल एजन्सी ऑफीस

द्वारका भुवन

जुना जालना (N. S. Rly.)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

महाविद्यालय-वार्ता

रुग्णालय निधीसाठीं सहाय्याची विनंति

रुग्णालयाची नवी इमारत

डॉ. मो. ना. आगाशे रुग्णालयाच्या नव्या इमारतीच्या बांधकामास सुरवात झाल्याचें पूर्वीच जाहीर झालेलें आहे. आणखी २-३ महिन्यांत ती पुरी होईल असा विश्वास वाटतो. सध्याच्या काळीं इमारती बांधणें हें एक "दिव्य" आहे, मूळ नकाशा तयार करून इमारतीचे प्रत्यक्ष स्वरूप पुरे होईपर्यंत अनेक अडचणींना तोंड द्यावें लागतें. रुग्णालयासारख्या सार्वजनिक उपयुक्ततेच्या इमारतींना सरकारी नियंत्रित दरानें सीमेंट, लोखंड, आदि मालाचा पुरवठा शक्य तितक्या लौकर होण्यास अधिकारीहि आपल्याकडून सवलती देतात पण सध्याची पुरवठ्याची स्थिती व मालाची "नेआण" करण्यांतील अडचणी, यामुळें हातीं घेतलेलें काम केव्हां पुरें होईल याचा अंदाज करणें कठीण जाते. मालाची जुळवणी करण्याकरितां नाना उलाढाली कराव्या लागतात, तरीही यशाची निश्चिति नसतेच. अशाही परिस्थितींत आमचें बांधकाम तज्ज्ञ श्री. एम्. जी. करमरकर, बी. ई. आणि ट्रायो-बिल्डर या कॉंट्रॅक्टर्स फर्मचे चालक रा. हेमंतराव करमरकर व एम्. जे. गद्रे यांच्या दीर्घ प्रयत्नानें एवढी मोठी इमारत लवकरच पुरी होऊन गेल्या कित्येक वर्षे कल्पनेंत वावरणारी ही योजना निदान दोन तृतियांश तरी साकार होईल. दोन तृतीयांश यश म्हणण्याचें कारण, मूळ नकाशांत या इमारतीचें तीन मजले आहेत. त्यापैकीं आज फक्त दोनच मजले बांधून पुरे व्हावयाचे आहेत.

आयुर्वेद प्रसारक मंडळीच्या इतिहासांत हेंही श्रेय थोडके नव्हे. १९३७ सालीं स्वतःच्या मालकीची जागा व इमारत खरेदी करून अवघ्या १३।१४ वर्षांत संस्थेनें केलेली कमाई अत्यंत स्थूल मानानें लक्षांत घेतली तरीही वरील विधानाची सत्यता पटेल. जागा खरीदणें व जुन्या इमारतींत अवश्यक तो फेरफार करून आर्यांग्ल वैद्यक महाविद्यालयाचा संसार थाटणें-करतां मूळ २०००० रुपये खर्चले. वसतिगृह असलेली इमारत, शस्त्रक्रिया गृह व आज उपयोगांत आणली गेलेली रुग्णालयाची इमारत, व शरीर विज्ञान गृहाची नवी इमारत या करतां एकूण १,२०,००० रुपये प्रत्यक्ष खर्च आला आहे. या तिन्ही इमारती पहिल्या प्रतीच्या आहेत. १९३७ सालीं प्रथ[म] १५ रुग्णांची सोय होईल येवढें रुग्णालय सुरू करून आज [ते] ५० रुग्णांची सोय होईल, इतकें वाढलें आहे. १९४१ सा[लीं] सहा प्रसूतींची सोय केली गेली. आज त्या ठिकाणीं १५ ते [२०] प्रसूतींची सोय होऊं शकते. याकरतां साधन सामुग्री व शस्त्र-क्रियेची अद्ययावत् साधनें यांकरतां संस्थेनें जवळ जवळ ती[स]-चाळीस हजार रुपये खर्चले आहेत. आणि आज बांधली जा[त] असलेली इमारत दोन लाख रुपयांच्या घरांत जाणार आहे. सातारसारख्या आडवळणी व सामान्य आर्थिक परिस्थि[तीत] असलेल्या ठिकाणीं केवळ १३।१४ वर्षांतील ही कामगिरी स्पृहणीय नाहीं असें कोणीही म्हणणार नाहीं.

कार्याची दखलगिरी

परवा १५ आगष्ट स्वातंत्र्यदिनाच्या समारंभा[त] आपल्या संस्थेंत भाषण करतांना येथील सुप्रसिद्ध "**कर्मवीर *भाऊराव पाटील***" यांनी सांगितलें कीं, "मृत्यूनंत[र] वारसांना विनासायास द्रव्यसहाय्य देणारी ***वेस्टर्न इंडिया विमा कंपनी***, मृत्यूपूर्वी दरिद्री जनतेच्या औषधपाण्याची सोय करणारी ***आर्यांग्ल वैद्यक महाविद्यालय*** आणि गरीब जनतेच्या मुलाबाळांना शिक्षण देऊन त्यांना सुधार[णा] करणारीं ***रयत शिक्षण संस्था*** या तीन संस्था म्हणजे सातारची मानस्थळें होत." कर्मवीरांनीं केलेला हा गौर[व] आर्यांग्ल वैद्यक महाविद्यालयाच्या कार्याची परस्परच ग्वाही दे[त] आहे. संस्थेच्या रुग्णालयाचा उपयोग ज्या वर्गांतील रुग्णांना प्रामुख्यानें व्हावा अशी चालकांची मूळ इच्छा त्यांच्याच पुढाऱ्यांचे हें उद्‌गार कार्यकर्त्यांच्या उत्साहांत अधिकच भ[र] घालतील व त्यांना कार्यप्रवण करतील याची खात्री वाटते. बाह्य देखाव्यानें व नकली ठाकठीकपणा नि थाटमाट ठेवल्यानें कधीनव्हत भेट देणाऱ्या पाहुण्याचे डोळे दिपविता येतीलही पण प्रत्यक्ष रोगी म्हणून दाखल होणाऱ्यांच्या "भावना" काय होतात हें पाहूनच रुग्णालयाचें यशापयश ठरविणे योग्य ठरेल! या न्यायानें कर्मवीरांनी काढलेल्या उद्‌गारांनी खेड्यांतील गरीब जनतेच्या भावना स्पष्ट केल्या गेल्या आहेत. आम्हाला हेंच पारितोषिक मिळवावयाचें आहे. अर्थात् येवढ्यानें हरकून जाऊन सर्व मिळाले असें आम्ही मानीत नाहीं. यापेक्षां फार मोठा पल्ला गाठावयाचा आहे. संस्थेच्या गरजा आतां पूर्ण झाल्या, यापुढें केवळ दैनंदिन कार्य करीत राहिले म्हणजे भागेल अशी परिस्थिती रुग्णालय व शिक्षण संस्था याच्या आयुष्यांत कधींकाळीं निर्माण होऊ शकेल अशी आशा व्यर्थ आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रुग्णालयाच्या बांधकामास दोन लाख रुपये खर्च येणार आहे. सरकारनें आता पर्यंत ५१००० रुपये दिलेले आहेत. बाकी ५०,००० रुपये इमारतीचें बांधकाम पुरे होऊन जिल्हा इंजिनियर साहेबांचे तपासणी नंतर मंजूर होतील. पण संस्थेलाही एक लाख रुपये खर्चावे लागणार वाहेत. डॉ. मो. ना. आगाशे सत्कार समारंभाचें निमित्तानें जो निधी प्रत्यक्ष हातीं आला तो शारीर विज्ञान गृहाकरतां त्यावेळी खर्च करावा लागला. यामुळें या इमारतीच्या खर्चाची विवंचना निर्माण झाली. हाती निधी नसताना इमारत बांधणी सुरुच कां केली ? असा एक रास्त व सयुक्तिक प्रश्न सहज विचारतां येईल. पण डॉ. मो. ना. आगाशे सत्कार निधी हा रुग्णालया करतांच जमविला असल्यानें तो रुग्णालय इमारतीकडेच खर्च व्हावा ही नैतिक जबाबदारी होती. सरकारचे रु ५१००० आधीच मिळाले होते. व बांधकाम सुरु न करतां ती रक्कम तशीच जमा ठेवणें अशक्य होते. शिवाय रुग्णालय वाढीची योजना, संस्थेच्या स्थैर्याच्या दृष्टीनें व कायम मान्यता,व , वाढता शिक्षणक्रम या दृष्टीनें शक्य तितक्या लवकर पूर्ण करण्याशिवाय गत्यंतर नव्हते. याकरतांच हे बांधकाम हांती घेण्या शिवाय दुसरा मार्ग नव्हता. पैशाची अडचण सहज दूर करणें अशक्य होते. म्हणून शेवटीं कार्य–कर्त्यांनीं जरा धारिष्ट करूनच कर्ज काढण्याचें ठरविले व येथील युनायटेड वेस्टर्न वॅंक व वेस्टर्न इंडिया विमा कंपनी या दोन संस्थानीं मिळून ७५००० रुपयांचें कर्ज दिलेही. या उभय संस्थांनीं ऐन अडचणीच्या वेळीं चालकांना जी ही मदत केली त्याबद्दल दोन्ही संस्थांचें आम्ही अत्यंत ऋणी आहोत. हे कर्ज मिळविण्यास अनेक सहाय्यकांचे श्रम खर्ची पडले आहेत. विविध प्रकारच्या घटनाना तोंड द्यावे लागले आहे. "सार्वजनिक कार्य करणें पाप होय" असेंही क्षण अनुभवले आहेत पण या सर्व दिव्यांतून पार पडून रुग्णालयाचा उद्घाटन समारंभ लवकरच करण्याचें भाग्य लाभेल अशी आशा निर्माण झाली आहे.

या दोन मोठ्या संस्थाखेरीज खालील वैयक्तिक कर्जेही संस्थेला मिळाली आहेत.

रा. रा. केशव नारायण परांजपे	१०००
वैद्य वा. कृ. आपटे शिपोशी	५००
रा. रा. शंकर सदाशिव वैद्य बी. ए. बी. टी. प्रमुख म. हायस्कूल कराड	२५००
एक माजी विद्यार्थी	१०००
रा. रा. दत्तात्रय रा. भिडे	२०००
श्री. रघुनाथ दिनकर ऊर्फ बाळासाहेब माजगांवकर	३०००
क्ष तर्फे सौ. लक्ष्मीबाई आगाशे	७००
डॉ. मे. ना. जोग, सातारा	२०००
श्रीमती सीताबाई भ्र. रा. वि. लेले	२००
डॉ पां. के. कोल्हटकर, सेक्रेटरी सातारा प्रदर्शन कमिटी, सातारा.	१००

इमारतीकरतां खालील देणग्याही मिळाल्या आहेत.

डॉ मो. ना. आगाशे सत्कार समिती	५५००

(यांत जाजू बंधूंची आश्वासित रक्कम जमा झाली आहे)

डॉ. एम्. ए. परांजपे एम्.बी.बी.एस्. सांगली	५००
रा. वा. पां. दिवेकर सातारा	१००
रा. पी. जी. भागवत मुंबई	१०१
कै. गो. द. जोग तर्फे य. रा. फडके वकील	५०
रा. रा भास्कर विनायक तेंडूलकर रत्नागिरी	५१
भाटिया सोप फॅक्टरीतर्फे रा. ना. गोडबोले	५१

खालील अटीसहीत देणगी मिळाली आहे.

श्रीमती पार्वतीबाई कुलकर्णी	रु. ९७५

युनायटेड वेस्टर्न वॅंकेचें कर्ज तातडीनें फेडावयाचें असून वेस्टर्न इंडियाचे कर्ज १० वर्षे मुदतीचें व सवलतीच्या व्याजाचें दरानें फेडण्याची मोकळीक मिळाली आहे.

वरील इमारत पुरी झाली व हें कर्ज फिटलें म्हणजे भागले असें नाहीं. इमारतीचा तिसरा मजला पुरा व्हावयाचा आहे. प्रसूतिगृहाची सध्याची सोय अगदीच अपुरी व जुजबी आहे. त्याकरतां नवी इमारत बांधणें अवश्य आहे. रोग्याच्या नातेवाइकांना स्वयंपाक करण्याकरतां व सामान ठेवण्याकरतां निवाऱ्याची जागा परिचारिकांना व नोकरांना राहाण्याच्या क्वार्टर्स, "क्ष" किरणांनीं तपासणीची कायमची व्यवस्था व अशीच आधुनिक निदानोपयुक्त साधनें, यांची जुळवाजुळव करावयाची आहे. व रुग्णालयाचें कार्य विनाआयास चालू राहील असा कायम निधी व पूर्ण वेळ देणाऱ्या कार्यकर्त्यांची जोड हीं भावी स्वप्नें आहेत. जनतेच्या चांगूलपणावर व आमच्या कार्यकर्त्यांच्या चिकाटी व निष्ठेवरच हें प्रत्यक्षांत उतरणार आहे.

शिक्षण साधनांत सिव्हिल हॉस्पिटलची भर

यंदा पासून तिसऱ्या व चौथ्या वर्षातील विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक शिक्षणाकरितां येथील सरकारी सिव्हिल हॉस्पि–टलचा उपयोग करण्याची सरकारनें मंजुरी दिली आहे. कांहीं तांत्रिक स्वरूपाच्या अडचणी दूर होताच महाविद्यालयाच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विद्यार्थ्यांना सिव्हिल हॉस्पिटलमध्येंही प्रात्यक्षिकाकरितां ड्यूटी लावल्या जातील ! या तांत्रिक अडचणी दूर करण्याचा संस्था आटोकाट प्रयत्न करीत आहे. व मे. सिव्हिल सर्जन साहेब डॉ. डी. व्ही. नाडकर्णीही या प्रयत्नांना साथ देत आहेत. महाविद्यालयाच्या दृष्टीनें हें एक महत्वाचें पाऊल टाकले जात आहे.

जिमखाना मंडळ

प्रतिवर्षाप्रमाणें जिमखाना मंडळाच्या निवडणुकीही होऊन डॉ. वि. ह. टिळक यांचे नेतृत्वाखालीं नवें कार्यकारी मंडळही उत्साहानें कार्यास लागलें. सरकार्यवाह म्हणून रा. पलंगे व कुमारी मारवाडी, रा. बर्वे, चौगुले, शेटे आदि विभाग प्रमूख आप आपली कामें करूं लागलें. पण यंदाचा विशेष हा कीं हें कार्यकारी मंडळ अधिकारावर येते न येते तोंच विद्यार्थ्यांनीं जिमखान्याची नवी घटना बनविण्याचा बूट काढून तो तडीसही नेला. ही एक मोठीच कामगिरी केली गेली. या नव्या घटने प्रमाणें आतां फिरून नवीन निवडणुका ता. ३० रोजीं झाल्या. अशा रीतीनें रा. पलंगे यांचे कार्यकारी मंडळ अल्पजीवी ठरले असले तरी या अल्पायुष्यांतही 'नवी घटना' बनविण्याचे अविस्मरणीय कार्य उरकण्याचा प्रभाव त्यांना दाखविता आला हे यश कांहीं थोडके नव्हे ! ! डॉ. वि. ह. टिळक यांच्या सारखे प्रभावी कर्णधार व स्वतःला हवी तशी घटना बनवून निवडलेले नवीन कार्यकारी मंडळ तेव्हां यापुढें जिमखान्याची कामे विशेष उत्साहानें पार पाडली जाणार असें मानण्यास हरकत नाहीं. नव्या पदाधिकाऱ्यांचें आम्हीं अभिनंदन करतो.

रुग्णालयाच्या आवारांत

गेल्या अडीच महिन्यांतील रुग्णालयांचा पूढील प्रमाणें अहवाल आहे. एकूण नवें रोगी १२९ प्रवेशित केले गेले. पैकीं ५७ पुरुष, ४९ स्त्रिया व २३ मुले होती. खेजची सरासरी उपस्थिति जून २९ जुलै ३१ व ऑगस्ट १५ पर्यंत २७ इतकी पडते. प्रसूति गृहांत एकूण ६४ प्रसूति झाल्या, पैकीं ५५ सुलभ प्रसूति व ९ अनैसर्गिक प्रसूति झाल्या. अनैसर्गिक प्रसूतिमध्यें गर्भपात, फॉर्सेप्स अशा होत्या. प्रसूतिगृहाचा खेड्यांतील १२ स्त्रियांनीं फायदा घेतला. एकुण शस्त्रकर्में १०८ झाली. पैकीं ३२ महत्वाची (मेजर) शस्त्रकर्में झाली व ७६ किरकोळ (मायनॉर) शस्त्रक्रिया केल्या गेल्या. महत्वाचीं शस्त्र कर्में (मेजर ऑपरेशन्स) पुढील प्रमाणें फिश्चुला इन् ॲनो ३. प्रॉस्टेटेक्टमी २ अपेंडिसेक्टमी २, टॉन्सिलक्टमी ४ मॅस्टॉइड १ ओव्हेरियन् सिस्ट (रिमूव्हल) १ ॲम्प्यूटेशन्स २ स्ट्रॅंग्युलेटेड हार्निया २ हिस्टेरेक्टमी गॅस्ट्रोजेजुनॉस्टमी १ ॲंटीरियर काल्पोरॅफी १ डी आणि सी

डोळ्याची तीन ऑपरेशनें झाली ईन्युक्लिएशन व कॅटरॅक्ट १

कै. रामचंद्र बल्लाळ काळे चिकित्सालयांत (आउट पेशंट) जून महिन्यांत एकूण ९८६१ जुलै महिन्यांत १५. व आगस्ट १५ तारखेपर्यंत ६४० इतक्या रुग्णाना औषधोपचार केला गेला.

रुग्णालयाचा वरील वृत्तांत पाहातां रुग्ण संख्या, प्रसूति संख्यां व शस्त्रक्रिया यांत सर्वत्र वाढ झाल्याचें निदर्शनास येईल. त्यांतल्यात्यांत स्ट्रॅंग्युलेटेड् हर्निया, गॅस्ट्रोजेजुनॉस्टमी, अपेंडिसेक्टमी, हिस्टेरेक्टमी असली मोठमोठी ऑपरेशन्स अधिकाधिक होऊं लागली आहेत. व याचें मुख्य कारण म्हणजे डॉ. ***द्वा. ब. मालशे*** एम्. एस्. एफ्. सी. पी. एस्. यांची मिळालेली संस्थेला जोड होय. डॉ. मालशांच्या आगमनानें शस्त्रक्रिया विभागाचें कार्य व दर्जा निश्चित वाढलेला आहे. डॉ. ***बोकीलाहि*** डोळ्यांचें कार्य उत्साहानें करीत आहेत. या दोन्ही तज्ञ कार्यकर्त्यांमुळें जनतेच्या मनांत विश्वास उत्पन्न होऊन रुग्णालय जनसेवेचें कार्य अधिक प्रमाणांत करीत राहील असा विश्वास वाटतो.

नव चैतन्य मंडळ

हें एक नवें " अभ्यास मंडळ " विद्यार्थ्यांनी काढलें आहे. महाविद्यालयीन दैनंदिन व शिक्षणक्रमाच्या अभ्यासा व्यतिरिक्त व्यापक अभ्यास व्हावा व विद्यार्थ्यांची बौद्धिक पातळी वाढावी असा यांत हेतू दिसतो. प्रति रविवारीं तज्ञांची व्याख्यानमाला तूर्त सुरूं केली गेली आहे. पहिले व्याख्यान डॉ. शरद् आठल्ये एम्. बी. बी. एस् यांचे " Personality Physiology " इंद्रिय विज्ञान व व्यक्तिमत्व या विषयावर डॉ. बापूसाहेब जोग यांचे अध्यक्षतेखालीं झाले. दुसरे व्याख्यान त्रिदोषांचे आयुर्वेदांतील स्थान या विषयावर आचार्य फडके यांनी दिले. अशा व्याख्यानांची टिपणें केली गेली तर मीमांसेत प्रसिद्ध करतां येतील. व माजी विद्यार्थ्यांनाही त्याचा फायदा घेतां येईल ! मात्र " आरंभशूराः खलु दाक्षिणात्याः " असा अनुभव येऊं नये. या उपक्रमास आम्ही सुयश चिंतितो.

श्रीपाद फार्मसी, पेण.

विविध प्रकारच्या औषधी वनस्पतींचें विक्रेते. महा- राष्ट्रांतील आयुर्वेदीय कारखान्यांना माल पुरविण्यांत ... वैद्य व ग्राहकांनीं माहिती मागवावी. वाकेरीभाते खात्रीचे मिळ...

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेदीय औषधीकरण

संधान विधी

[लेखांक दुसरा]

लेखक—वैद्य पु. वि. धामणकर, धूतपापेश्वर, पनवेल.

[औषधीकरण शास्त्रांतील एका महत्त्वाच्या विभागा-विषयीं सुरू झालेल्या वैद्य धामणकर यांच्या लेखमालेचा हा दुसरा लेखांक प्रसिद्ध होत आहे. या लेखमाले-विषयी वाचकांनीं आपला अभिप्राय कळवावा, अशीं विनंति आहे. —संपादक]

संधान-विधान

मराठींत, " काय संधान बांधलंय " असा एक वाक्प्रचार रुढ आहे. त्याचा काय होऊं घातलें आहे ? काय साधायचें आहे ? असा अर्थ. ह्याच अर्थी 'अढी घालणें' हाही एक वाक्प्रचार रूढ आहे. अढी सामान्यतः आंबा, केळ इ. फळांची घालतात. केळ्यांचें अढी घालणेंस " भट्टी लावणें " म्हणतात. अढींत कोंडलेल्या उष्णतेनें ती मधील फळांचा पाक होतो. तो केवळ मधुर असतो. ही अढी निवाऱ्याचे जागीं झाकून ठेवलेली असते. त्याशिवाय स्थिर उष्णतामान तिला लाभत नाहीं. उष्णता स्थिर नसली तर पाचनही नीटसें होत नाहीं. ह्या करितां पाचन क्रिया पूर्ण होई पर्यंत ती अढी चाळवावयाची नाहीं, ती मधील उष्णता ढळवावयाची नाहीं. तिला वारा लागू द्यायचा नाहीं. म्हणून ती आडोशाचे जागीं बहुधा घालतात. म्हणजे इष्टकार्य उत्तम साधतें.

आसव प्रक्रियेंत सुद्धां हाच विधी आहे. येथें शुष्क, घन, द्रव पदार्थ एका भांड्यांत घालून भांड्यांवर सुयोग्य झांकण ठेवून त्यांच्या संधीस कापडमाती करून तें भांडें हवा बंद करावयाचें असतें. ह्या संधीलेपन विधीमुळें ह्या प्रक्रियेस संधान विधी हें नांव पडलें. ह्या विधींत मुद्राबंधनासच फार महत्व आहे. त्यावरुनही संधानविधी हे नांव पडलें. पण हें अन्वर्थक नांव शास्त्रीय व दुर्बोध म्हणून तें मागें पडलें. आणि आसव विधी हें सोपे नांव व्यवहारांत रूढ झालें. दुसरें असें कि संधान विधीची दोन अपत्यें. १ मधुर रस प्रधान, सात्विक, ओजस्कर, आणि दुसरें अम्लरस प्रधान, तामस आणि ओज विघ्वंसक. ह्या दोहोंमधला फरक संधान शब्दानें स्पष्ट होत नाहीं. ही गोष्ट आसव विधी ही संज्ञा वापरल्यानें साधते. आसव आणि मद्य हीं स्वभावतःच विभिन्न असल्यानें भाषेंत, वाङ्मयांतही निःसंदिग्धता आलेली बरी ह्या दृष्टीनें आसवविधी हें नांव विशेषत्वदर्शक, पुनः अन्वर्थक म्हणूनही तें मला योग्य वाटलें. अधिक पसंत पडलें. म्हणूनच मी ह्या निबंधांत प्रक्रिया कल्प-वाचक संज्ञा म्हणून आसव विधी हेंच नांव उपयोगांत आणलें आहे.

चरक, सुश्रुतानंतर हजारांहून अधिक वर्षांनीं शारंगधर झाला. आसव, अरिष्ट ह्या संज्ञा पृथक कल्पून पूर्वाचार्यांनीं त्यांच्या व्याख्या निरनिराळ्या दिल्या नाहींत. तो खटाटोप शोढलानें केला. पण तो काय उपयोगाचा ? हा भेद पूर्वाचार्यांनीं मानलेला नाहीं. उदा० सुश्रुतानें चि. अ. १० मध्यें कांहीं कल्प विधी दिले आहेत. अरिष्टवत् आसव साधावें म्हटलें असून अरिष्ट विधींत कढवण नाहीं. किंबहूना हा विधी पिंडासव स्वरुपाचाच दिसतो कारण—

आसव विधी	अरिष्ट विधी
चूर्णे—भाग ३	चूर्णे–तो. ३०४ (३)
काकवी—भाग २	गूळ–तो. २०० (२)
पाणी—भाग १	पाणी–तो. ११२ (१)

सुश्रुतमतें आसव नि अरिष्ट या संज्ञेंत वा त्याच्या प्रक्रियेंत कांहींहीं फरक नाहीं.

संधान विधान क्रम—

१ द्रव तयार करणें. २ मधुर पदार्थ मिळविणे. ३ भांडे धुपविणें. ४ भांड्यास अंतर्लेप देणे. ५ भांड्यांत

※ संधीयते येन तत्संधानम् ।
द्रवेषु चिरकालस्थं द्रव्यं यत्संधितं भवेत् ।
आसवारिष्ट भेदैस्तत् प्रोच्यते भेषजोदितम् ॥ शा. सं.
अरिष्टानतो वक्ष्यामः—
पूतीक चव्य चित्रक सुरदारु सारिवा दन्ती तिवृत्त्रिकटुकानां ।
प्रत्येकं षट्पलिका भागा बदर कुडवस्त्रिफला कुडव इत्येषां ।
चूर्णानि ततः पिप्पली मधु घृतैरन्तः प्रलिप्ते घृतभाजने प्राक्कृत ।
संस्कारे सप्तोदक कुडवानयो रजोऽर्ध कुडवमर्ध तुलां च ।
गुडस्याभिहितानि चूर्णान्यावाप्य स्वनुगुप्तं कृत्वा यवपल्ले ।
सप्तरात्रं वासयेत् ततो यथाबल मुपयुञ्जीत, एषोरिष्टः ।
आसवानतो वक्ष्यामः—
पलाशभस्म परिस्त्रुतस्योदकस्य शीती भूतस्य त्रयो
भागा द्वौ फाणितस्यै कध्यमरिष्ट कल्पेन विदध्यात् ।
एवं तिलादीनां क्षारेषु शालसारादौ न्यग्रोधारग्वधादौ
मूत्रेषुचासवान् विदध्यात् । सु. चि. अ. १०

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

द्रव (मधुर द्रव्य युक्त) व आवाप द्रव्य घालणें, ६ संधिलेप देणें. ७ स्वनुगुप्त करणें ८ इष्टकाल। नंतर तो द्रव गाळून घेणें.

आसव विधी आख्यानास खरी सुरवात आता होणार. आतां हृया विधी संबंधीच्या एकेका गोष्टीस क्रमाक्रमानेंच आरंभ करूं. आयुर्वेदीय औषधीकरणांत काल हा पदार्थ प्राधान्यानें मानावा लागतो. त्यांतलें त्यांत आसव विधीचें टिपण कालाशीं फार जमावें लागतें. म्हणून त्याचा आपण प्रथम विचार करूं.

आसव विधींत १ साधन २ संधान आणि ३ पाककाल असे तीन काल प्रकार संभवतात. पैकीं सुरवातीचा साधनकाल हा आता क्रमानें प्राप्त झाला आहे. त्याचा विचार प्रथम करून मग इतरांचा विचार यथाक्रम करणें सोयीचें होईल.

सबंध वर्षांत सहा ऋतु आहेत. पैकीं कांहीं ऋतु आसव विधीस प्रतिकूल तर कांहीं अनुकूल आहेत. ऋतूंची कालगणना देश व हवामानानुसार बदलत जाते. चरक, सुश्रुत, कालांतला फरक आपण मानतो. आजही तसाच फरक मानावा लागतो. त्यामुळें ऋतूपेक्षां महिन्यांचा उल्लेख सोयीचा पडतो.

ज्येष्ठाचे सुरवातीस मृगनक्षत्रच लागतें. हाच पावसाळ्याचा प्रारंभ. पावसास सुरवात होते. तापलेल्या जमिनीवर पावसाचें पाणी पडतें. जमिनींतून गरम गरम हवा व निरनिराळे गंध बाहेर पडतात. जिकडे तिकडे आंबूस वास सुटतो. त्यामुळें हा काल अम्लविपाकी समजला जातो. आसवांत अम्लपाक अनिष्ट. तेव्हां हा ऋतुकाल हवेचे दृष्टीनें योग्य ठरत नाहीं.

दुसरें असें कि हृचा वेळेस जो पाऊस पडतो त्याचे पाण्यांत, हवेंत अंतराळीं असलेलीं नानाविध जंतूंची अंडीं, नाना प्रकारचा केरकचरा, धुरळा असतो. तो पृथ्वीवर येतो. त्यांतच पृथ्वीवरील मलमूत्रादि घाण मिसळतें. त्यामुळें मृगापासून हस्तनक्षत्र अखेरचें पाणी क्षार, मृत्तिका मल व जंतु हृयांनीं जुष्ट असतें. तें पाणीं सुद्धां आसवांना मानवत नाहीं. म्हणजे आजचे मास गणनेनें ज्येष्ठ, आषाढ, श्रावण, भाद्रपद हे महिने किंवा ग्रीष्म आणि वर्षा हें ऋतु आसव विधीस प्रतिकूल ठरतात.

शरदांत चित्रा नक्षत्राचें कडक उन्ह पडूं लागलें, रात्रीं चंद्राचें स्वच्छ चांदणें पडूं लागले म्हणजे जमीन, ती वरील व ती खालील पाणी अगस्ति नक्षत्र उदयानें, स्वच्छ, निर्मल, 'नाभिष्यंदि न वारूक्ष' इतकेंच नव्हेत तर 'पानादिषु अमृतोपमं' होतें. हवाही निवळतें. त्यामुळें पाणी ग्राह्य ठरतें.

शरद्, हेमंत, शिशिर, आणि वसंत हे ऋतु मात्र आ[illegible] विधीस निर्वेध लाभतात. त्यांतही फळा फुलांच्या पूर्ण विका[illegible] मानानें तारतम्य ठरतेंच. उदा. हेमंतांतली द्राक्षें आंबट [illegible] वसंतातली गोड, तेव्हां द्राक्षासवास हेमंतापेक्षां वसंत ऋतू [illegible] पडतो. मोहाची नवीं फुलें वसंतांत लाभतात. तेव्हां म[illegible] पु'पासवासही वसंत ऋतु बरा. कुमारी आसवास शरद् [illegible] सोयीचा पडतो. कारण सहा ऋतूंपैकीं हृयाच ऋतूंत कोर[illegible] पूर्ण पक्व होते व ती रसभरित असते. त्यामुळें तिंचा [illegible] अधिकांत अधिक मिळतो.

ग्रीष्म वर्षाऋतूंत नवीन आसव तयार करावयास [illegible] नये इतकेंच नव्हे तर जुनें आसव सुद्धां हृया ऋतूंत अगदीं प[illegible] हवा बंद ठेवावें. तें आसव गाळणे, पहाणें इ. क्रियाही [illegible] नयेत. कारण हवेंतील जंतु व विपाक ह्यांचा संसर्ग त्या[illegible] बाधण्याचा फार संभव असतो.

सारांश आसवाचा साधन काल ठरवितांना हवा, पा[illegible] आणि द्रव्य विकास ह्या तीन गोष्टी लक्षांत घ्याव्या लागता[illegible]

भांडीं (*पात्र*)

१ औषध मिसळणें, २ उकळणें आणि ३ पाकाकरि[illegible] ठेवणें ह्याकरितां भांडीं लागतात. सुरवातीस सोनें. रुपें, त[illegible] यांचे कलश व दगडाच्या टाक्या, मातीचे घट, काचेचे बु[illegible] इ. प्रकारचीं भांडीं उपलब्ध होतीं. पैकीं सोनें आणि मातीचीं भांडीं आसवाकरितां इष्ट मानलीं गेलीं होतीं.

धातुपात्रावर क्षार आणि षड्रस यांचे परिणाम होतात. धातूची भांडीं उत्तम उष्णतावाहक असतात. हवेंतल[illegible] उष्णतामानानुसार धातुपात्राचे उष्णतेंत बदल होतो. म्हणू[illegible] निधापनाकरितां धातुपात्र कनिष्ठ मानतात. मात्र मिश्रणाकरितां कथिलांचीं कल्हई केलेलीं धातुपात्रें इष्ट मानतात.

दगडाच्या टाक्यासुद्धां मिश्रणाचें कामीं बऱ्याच उपयो[illegible] पडतात. फक्त त्या वजनानें जड असल्यानें हलविण्यास [illegible] स्वच्छ करण्यासही गैरसोयीच्या पडतात. शिवाय आज [illegible] मिळतही नाहींत.

मिश्रणयोग्य मोठें भांडें कांचेचें मिळूं शकत नाहीं. [illegible] धातु, मृत्तिका, अश्म, कांच ह्या सर्वांना काष्ठानें मागें टा[illegible] आहे. आज अपेक्षित आकाराचीं लांकडी पात्रें मिळतात. [illegible] टिकायला, धुवायला, हलवायला उत्तम असून ह्यांना इ[illegible] संसर्ग बाधण्याचा संभवही नाहीं. काम झाल्यानंतर [illegible] कामाचे वेळेस उकळत्या पाण्यानें व *चुन्याचे निवळी*[illegible] लांकडी द्रोण धुतले कीं तें निर्जंतुक व निरम्ल होतात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

काढा करण्याकरितां सुद्धां लांकडी डोणी उपयुक्त ठरते. काढा करण्याकरितां सुद्धां लांकडी डोणी उपयुक्त ठरते. बाफेची नळी ह्या भांड्यांत गोलाकार बसविली किं क्वथनही सुंदर होतें. पण हें सर्वांनाच शक्य नाहीं. ह्याकरितां कथलाचीं कल्हई केलेलीं तांब्याचीं भांडीं प्रशस्त होत. माती, दगड, कांच हीं भांडीं अग्निसंयोगानें अगर धक्क्यानें केव्हां भंगतील ह्यांचा भरंवसा नसतो. त्यामुळे क्वथनाकरितां ह्यांचा विचार बाजूस ठेवणेंच सोयीचें.

सुवर्ण, रूपें, तांबें, लोह, पितळ, कथील, प्लॅटिनम् ह्यांचीं किंवा ह्यांचा मुलामा दिलेलीं भांडीं मिळतात. पण काढा करतांना, सार निष्कासन होत असतांना, पाणी बाष्परूप होऊन उडत असतें. अशा वेळीं पात्र आकृति, हवेचा दाब, उष्णता नियत काल ह्यांचीं मानें सारखी ठेवून पात्रांचे धातूंत बदल केला तर हें उड्डयन खालील मानानें होतें उदाहरणार्थः—

चांदीचें भांडें १००·०	कथील भांडें १४·५
तांब्याचे भांडें ७३·०	लोखंड भांडें ११·९
पितळी भांडें २३·६	प्लॅटिनम् भांडें ८·४

चांदीचें आस्तरण फार महाग. तांब्या पितळेचें आस्तरण अम्लविरोधी, प्लॅटिनम् उड्डयनांत अगदींच कमी, त्यापेक्षां लोह बरें पण त्याचें आणि क्षार, लवण, कषाय इ. द्रव्यांचें वांकडें. त्यामुळें सर्व सोयीस्कर असें कथिलाचें आस्तरण होय. ह्या दृष्टीनें विचार करतां तांब्याच्या भांड्यास आंतून कथिलाची कल्हई देऊन तें वापरावें किंवा तांब्याचें नळ्यांस बाहेरून कथलाची पक्की कल्हई करून त्या बाष्प वहनाकरितां उपयोगांत आणाव्यात.

पाकाकरितां भांडीं लागतात. ह्या कामीं १ पाषाण, २ कांच ३ धातूवर अम्ल, क्षार, लवण उष्णता ह्यांचे परिमाण घडतात. म्हणून हे सर्व प्रकार प्रथमच निकालांत निघतात. विचार्य पात्रें म्हणजे सौवर्ण, माहेय आणि काष्ठ. पैकीं सौवर्ण दुर्लभ म्हणून तें बाजूस ठेवावें लागतें. माहेय उत्तम. पण तें प्रचंड कारखान्यांना सोयीचे पडत नाहीं. तेव्हां मिश्रण, क्वथना प्रमाणेंच संधापनासही काष्ठ पात्र उत्तम उपयोगी पडतें. तरीपण प्रथम माहेया संबंधानें व त्याचे प्रतिनिधी संबंधानें थोडी माहिती दिली तर तीं घरीं औषधें करणारांस सोयीची होईल; असें वाटल्यावरून ती माहिती प्रथम देत आहे.

माठाचे प्रकार व प्रतिनिधी

१ कोरा माठ, २ स्निग्ध माठ, ३ लाक्षामाठ, ४ काच-लिप्तघट, ५ काच घट.

१ कोरा माठः—सर्वांत उत्तम. पण तो झिरपतो फार. व वाजवीपेक्षां जास्त थंड रहातो. त्यामुळें आसवांतला बरचसा द्रव झिरपल्यानें आसव कमीं उतरते. अतिशैत्यामुळें आसव पाचन होतच नाहीं. ह्या दोन दोषामुळें कोरामाठ अनुपयुक्त.

२ स्निग्धमाठः—माठाची सच्छिद्रता कमी व्हावी म्हणून ते दुधा तुपानें राबवितात. दूधच कोऱ्या माठांत विरजून त्याची छिद्रें बुझवितात. किंवा दूध दुभत्या कामीं नेहमीं उपयोगांत असल्यानें राबलेलें स्निग्ध भांडे न झिरपणारें, उष्णता स्थैर्य टिकविणारे म्हणून ठींक असलें तरी ते खंवट होण्याची, जंतु जुष्ट होण्याची शक्यता फार, त्यामुळे तेही जरा गौणच मानतात.

३ लाक्षाघटः— चिनी मातीच्या भांड्यास कांचेचे आवरण देऊन कपत्रशा तयार करतात. तसाच हा एक प्रकार आहे. कोऱ्या मडक्यांत आंतून बाहेरून लाखेचें सारवण दिल्यानें झिरपणें, खंवट होणें, कमी अधिक थंड होणें ह्या सर्व दोषांपासून तो घट मुक्त होतो. आसव संधानास अगदीं योग्य होतो. पण तो वरणीपेक्षां महाग पडतो. वरणींत माती असते. तीस आंतून बाहेरून कांचेचे आवरण देतात. त्यानें ती लाक्षाघट गुणयुक्त शिवाय अधिक टणक होते. त्यामुळें फूटीचा संभव फारसा उरत नाहीं.

४ काचघटः— कांचेचा बुधला फुटण्याचा संभव फार, हालविण्यांत, धुण्यांत धोका फार आणि पुनः उष्णता-वाहक म्हणून तोही त्याज्य ठरतो. तेव्हां घरगुती आसव प्रक्रियेकरितां काचलिप्त बरणीच श्रेयस्कर ठरते. बरणीस मळसूत्राचें वा पेचाचे झांकण असतें. त्यामुळें हवा बंद करण्यास, मुद्रा अथवा संधिलेप देण्यासही ती अत्यंत सोयीची असते.

काष्ठ पात्र

१ पासून ५०० वरण्यांच्या मानाचें लांकडी पीप मिळू शकतें. १ लाकडी पींप उष्णतावाहक नसतें. त्यामुळें धान्यराशी वा भूगर्भाची आवश्यकता पडत नाहीं. २ आंतली उष्णता आंतले आंत कोंडून राहिल्यानें आसवाचें परिवर्तन क्रमाक्रमानें योग्य असेंच होत राहतें ३ पात्र अपेक्षेपेक्षां जरा मोठेंच घेतलें तर मोठ्या प्रमाणांतलें आसवही गाळण्याचें काम उरत नाहीं. आवापद्रव्यांची पिशवी काढून घेतली, कार्बनडाय-ऑक्साईड उडवून लावला कीं, तोंड आसव संपेपर्यंत कायमचे बंद करून खालच्याभागीं नळी करितां छिद्र ठेवून तें रबरी बुचानें बंद करतां येतें. ह्या पेक्षांही उत्तम गोष्ट म्हणजे पिपाच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वरच्या फळीसच एक भोंक ठेवायचें व त्यास रबरी बुच घट्ट बसवावयाचे. जरूर तेव्हां तें काढून त्या छिद्रांतून रबराची नळी आंत सरकवावी. व सायफन प्रोसेसनें आसव काढून घ्यावें. हें आसव म्हणजे आसवाची निवळीच होय. ती प्रस्तुता (Eiltrate) पेक्षां हीं उत्तम ठरतें. व आसव बिलकुल वायां जात नाहीं. कोहलमान घटत नाहीं. ह्या व अशा विविध गुणांनीं व किफायतशीरपणानें काष्ठ पात्र आज सर्व दूर शास्त्र आणि लोक संमत झालें आहे खरे.

पाणी

पात्रानंतर पाण्याचाच क्रमांक लागतो. कारण आसवांत पाणी हें आधार द्रव्य आहे. तें अथ पासून इतिपर्यंत ह्याचा भूमिकेंत असते. काष्ठौषधी मधील सारभाग पाण्यांत उतरवून तो कोहलाचे मदतीनें टिकाऊ व उच्चवीर्य करायचा असतो. काष्टौषधी मधील अर्क अलग होण्यास पाण्यासारखा दुसरा सोपा द्रावण (Solvent) नाहीं. तसेंच मधूरद्रव्यापासून अगर मोह अथवा धातकी पुष्पापासून कोहल निर्माण करायचा तर पाणी हाच पदार्थ मध्यस्थ म्हणून योजतात. म्हणून आसवांत पाण्याचें महत्व फार आहे. आसवांत पाणी प्राधान्यानें आणि बाहुल्यानें असतें. पाण्याचें अच्छत्वावरच सार निष्कासन व कोहलभवन हीं कार्यें अवलंबून असतात. ह्या कार्याकरितां श्रेष्ठप्रतीच्या पाण्याची फार जरूर असते. ह्या दृष्टीनें आसव विधी करितां घ्यावयाच्या पाण्याकडे पहावें. आणि असें पाणी कोणत्या ऋतूंत सहजीं आणि विपुल मिळूं शकते. तो ऋतू आसव प्रक्रियेस युक्त जाणावा.

आसवांकरितां लागणारे उत्तम प्रतीचे पाणी शरद् ऋतूपासून उपलब्ध होऊं शकतें. तेव्हां दिवसा सूर्य तप्त किरणांनीं तळपतो. तर रात्रीं चंद्र अतिशीतल असतो. रात्रंदिवस पाण्यावर हे संस्कार सारखे चालू असतात. त्यांतच ह्याच सुमारास अगस्ति नक्षत्राचा उदय होतो. त्यामुळें पाणी स्वच्छ, निर्मल निर्विष होतें. ह्या पाण्यांतले सर्व क्षार, मृत्तिका व अंतराळीं तरंगणारे पदार्थ दिवस रात्रींच्या ऊष्ण शीतसंस्कारानें जल पृष्ठावर येऊन पचून जातात. [illegible] तळाशीं बसतात. नवीन पाणी येणें बंद झालेले असतें. त्या[illegible] हे पाणी शुद्ध व स्वच्छ राहतें. ह्यांत काष्ठौषधींचें अर्क [illegible] उतरतात. व आसव बिघडण्यांचा दोष, पाण्याकडे येण्या[illegible] संभव उरत नाहीं.

साधारणत: भाद्रपद वद्य पक्षांत शरद् ऋतूं लाग[illegible] तेव्हांच अगस्ति नक्षत्राचा उदय होतो. पितरांना अस्वच्छ पा[illegible] आवडत नाहीं म्हणून त्यांनी आपला आगमन कालही अगस्ति[illegible] नक्षत्रोदयाशीं निगडीत ठेवलेला दिसतो. पितरांना अगस्ति पु[illegible] फार प्रिय. कारण तें फूल सुद्धां अगस्ति नक्षत्राचा उदय झा[illegible] म्हणजेच फुलतें. त्यावरून अगस्ता फुलला कीं अगस्ति नक्ष[illegible] उगवलें व पाणी निवळलें असें धोरण बांधतात. आसवां[illegible] आरंभास सुद्धां हा मुहूर्त उत्तम जाणावा. अणुतैला करि[illegible] आंतरिक्षजल लागतें त्या करितांही शरद् ऋतूंतीलच दिव्यां[illegible] श्रेष्ठ जाणून त्याचा संग्रह करावा.

"हल्लीं एकंदर कमीत कमी नऊ तऱ्हेचें, व [illegible] निरनिराळ्या स्वरूपाचें पाणी आहे. व त्यांतील कांहीं प्रका[illegible] पाणी फारच उत्कृष्ट गुणकारी असतें. इतकेंच नव्हे तर त्यां[illegible] जीव जंतूंचा मुळींच प्रादुर्भाव होऊं शकत नाहीं. कारण त्यां[illegible] कोणताही कीटक जगूं शकत नाहीं. मात्र तें मानवी जीव[illegible] अत्यंत हितकर ठरतें. अशा जंतुघ्न किंवा रोगनाशक आणि सु[illegible] देह देणाऱ्या पाण्यांस 'दैवी देणगी' जाणून असें पाणी देणा[illegible] गंगा नदीस देव कोटींत सामील केलें तर हां काय मनुष्य दो[illegible] आहे ! आयुर्वेदानेंही ह्या गंगेच्या पाण्याचा समावेश दिव्य-जलांत केला आहे. सामान्यत: १ प्राणवायु, व २ हायड्रो[illegible] ह्यांचे संयोगापासून पाणी होते. पण अलिकडे हायड्रोज[illegible] वजनानें तीन प्रकारचा असतो असें सिद्ध झालें आहे. आ[illegible] ह्या हायड्रोजन भेदामुळेंच पाण्याचें भिन्न भिन्न प्रकार संभव-तात. असें मानतात.

प्राचीन कालीं फक्त आकाशांतूनच मेघावाटे पाणी मि[illegible] त्याला दिव्य अथवा धारोदक म्हणत. ते सर्वांत उत्तम. [illegible] त्यांत सुद्धां मृग नक्षत्राचे पाणी कनिष्ठ व त्याज्य. कारण [illegible] नक्षत्राचे वेळेस हवेंत जीव, जंतु, त्यांचीं अंडी, धुराळा निर-निराळ्या रोगांचीं वा रोपांचीं बीजें तरंगत असतात. तीं [illegible] मेघजल खालीं येतांना त्यांत मिसळतात. तेव्हां तें पाणी व[illegible] सांगितलें तें बरोबर. हस्त नक्षत्राचे वेळेचे हवामान मृगा[illegible] अगदीं विभिन्न, विपरीतच म्हटलेलें सोयीचें. जमीन साधार[illegible] दमसर असल्यानें धुराळा उधळायला सुद्धां सुरवात झाले[illegible] नसतें. त्यामुळें हवा स्वच्छ असतें. म्हणून ते धारोदक निर्म[illegible] असें मिळतें.

कांचने राजते पात्रे काचे वापि मनोहरे ।
रक्षणीयं प्रयत्नेनआदि वैद्योपदेशत:
॥ दशमूला रिष्ट. शा. टी.
स्वर्ण कुंभे निदध्याभ्याजने मृण्मये ऽ पिवा
। सारस्वतारिष्ट. भै. र.
पात्रे पाषाण मृण्मये । कुमार्यासव. शा.
तन्मासमायसेभांडे । मध्वासव च. सं.
भाण्डे पुराणे सुस्निग्धे । कुमार्यासव ग. नि.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाणी मूलतः शुद्ध, स्वच्छ, निर्मल परंतु तें खालीं येते. तेव्हां आनूपादि देशांत व विभिन्न ऋतूंत पडतें त्यामुळें देश व कालानुसाराचे हवामानाचे परिणाम ते पडायला लागल्यापासून त्यावर व्हायला सुरवात होतें. तें जमिनीवर पडल्यानंतर भूमिगुण संसर्ग होतो. त्यामुळेंही त्याचे गुण बदलतात. यांतसुद्धां मृगारंभाचे पाणी मलमूत्र जीवजंतू इ. घाण येत असल्यानें तें सर्व कर्मास अनुपयुक्त किंवा अत्यंत दूषित समजलें जातें. तदनंतरचे पण पृथ्वीवरचें पाण्यास गंगाम्बु, गांगम, ऐंद्र, आंतरिक्षं म्हणतात. हें पाणीं चांदीच्या भांड्यांत ठेवुन पहावें. अविवर्ण, अविलन्न असें असले तर तें घ्यावें. नाहीतर तें सामुद्र समजावें व आश्विन महिना उगवेपर्यंत ते पिऊं नये. आश्विन महिन्यांत भूपृष्ठावरील पाणी निवळूं लागते. त्यांत नवीन पाण्याची भर पडणें बंद होते. अगस्ति नक्षत्राचे उदयानें तें पाणी अधिक निर्मल, स्वच्छ व त्रिदोषजित होतें म्हणून त्याला 'हंसोदक' म्हणतात. हें अमृततुल्य असतें.

हंसोदकांतसुद्धां गंगोदक चांगलें. गंगोदक आपण तर पवित्र, पावन, पापहारी, अविपन्न मानतोच. पण आधुनिक शास्त्रदृष्ट्यासुद्धां तें असामान्य ठरलेलें आहे. ह्या गंगोदकांत सुद्धां तिला वसंतांत बर्फ वितळून पूर येतो. तें पाणी सर्वांत उत्तम. पुराचें पाणी खरें पण तें गढूळ नसतें तर स्फटिकासारखे आदीं स्वच्छ असतें.

श्रेष्ठ उदकाचे गुण

किंचित तुरट, मधुर, पातळ. स्वच्छ, हलकें कफ न करणारें रुक्ष वा स्निग्ध तें पाणी सर्वोत्तम च.सं हवामानानुसार ऋतुमानानुसार पाण्याचे स्वाभाविक गुण निरनिराळे संभवतात. उदाहरणार्थ—

वर्षा—जड, कफकारक, च. सं.
(पीनस, कास श्वासप्रद नि.शि)

शरद्—स्वच्छ, हलकें, कफ न करणारें. च. सं.
(पथ्य, वात कफघ्न नि. शि.)

हेमंत—जड, शीत, स्निग्ध, बल्य, वीर्यवर्धक, च. सं.
(बुद्धिदं नि. शि.)

शिशिर—हेमंतांतल्यापेक्षां जरा हलकें, कफवातनाशक च. सं. (कल्याणकर)

वसंत—तुरट, गोड, रूक्ष, च. सं.
(तृष्णा, दाह, वमिनाशक नि. शि.)

ग्रीष्म—रूक्ष व कफहारक (वसंताप्रमाणें) च. सं.

आपले इकडे ज्येष्ठ महिना मृग नक्षत्र-ग्रीष्म ऋतू एकत्र येतात. त्यामुळें ग्रीष्मजल वरील गुणांचे संभवत नाहीं. तें त्याज्य स्वरूपांत असतें. सहा ऋतूंत शारदीय जल अत्यंत प्रशस्त तम मानलें असून त्याची वाखाणणीही फार केली आहे. उदा. शारद जल सुकुमार व विशेष स्निग्ध आहार घेणाऱ्यांना फार प्रशस्त. राजेरजवाडे, नाजुक लोक यांनीं शरद् ऋतूंतील पाण्याचा संग्रह करून तो सांठा आशरद् खानापानादिकांकरितां वापरावा. च. सू.

आंतरिक्ष व आर्तव जलाचे गुण आपण पाहिलें. आतां भूमिसंसृष्ट जलांचें गुण कोष्टक पाहून आपण हें प्रकरण पुरें करूं.

पाणी
- आर्तव
  - दिव्यम्
  - भौम
- अनार्तव

१ धारा – धार, तौषर – दंव, भूपृष्ठावरील
२ कारा – गारा, हैम – बर्फ भूपृष्ठाखालील

भूपृष्ठावरील पाणी

गांगम्—मृग व हस्त नक्षत्र सोडूनचें निर्मल जल.

सामुद्र—आश्विनातलें-हस्तापर्यंतचे

आर्तव—मृगादि नऊ नक्षत्रांत पडलेलें-दिव्य-भौम.

अनार्तव—मृगादि नऊ नक्षत्रां विरहित पडले-दिव्य भौम.

भूमिसंसृष्ट जल (भौम)

भूपृष्ठावरचे	(आश्विनानंतरचें)	भूपृष्ठाखालचे
सागर,	नदी,	विहीर
सरोवर,	पाट	आड
तलाव,	दंव	उन्हाळा
शेत,	गारा	झरा
गुहा	बर्फ	पऱ्हा

भूपृष्ठावरील पाण्याचे गुण

सागर—कफजित्, त्वग्दोषहर– दोषल· दोषजनक, श्लीपद, अग्निमांद्य रक्तविकार कारक नि. र. त्रिदोषकर, लवण, उष्ण, दाहक, वैवर्ण्य कर, विस्त्र, दाहपित्त, रक्तरोगकृत नि. शि,

सरोवर—तुरट, रुक्ष, मधुर, लघु, बल्य, रोचन, तृष्णाघ्न, परंतु मलमूत्रावरोधक. नि. र. स्वादु, कषाय, वातल. नि. शि.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तलाव--सरोवराप्रमाणेंच मलमूत्रावरोधक, स्वादु. कषाय. वातल पण विपाकानें कटु, रक्तरुक् कुष्ठपित्तघ्न हेमंतांत सुखकारक, नि. र.

शेत—अभिष्यंदी, मधुर, गुरु, दोषल.–नि. र.

गुहा--स्वादु, शीत, रुक्ष, दीपन, पाचन, रोचन, मधुर, विशद, लघु, कफ, पित्त, ज्वर, उचकीनाशक, प्रावृटकाले हितकर-नि. र.

धार—बल्य, लघु, रसायन, समधात, तृप्तिकृत्, आनंद-दायक, जीवन, पांचक, त्रिदोषघ्न,तंद्रा, मूर्च्छा,दाह, श्रमहारक,

कार—गुरु, रूक्ष,स्थिर, घन, पित्तघ्न, कफवातकृत्‌विषद

तौषर—शीत, रूक्ष, वातल, कफपित्तघ्न, उरःकंठ, गलरोग, मेदहर.

हैम—शीत,गुरू,धातुवर्धक,पित्तनाशक,वातकारक,नि.र.

नद्यांचें पांणी

सामान्य—स्वच्छ, लघु, दीपन, पाचन, रुच्य, उष्ण, पथ्य, मधुर, तृषाहर

गंगा—स्वच्छ, स्वादु, दीपन, पाचन, पावन, अत्यंत तम, रूच्य, पथ्य, शीत, पापहारि, तृष्णामोहहर, श्वेत. प्रज्ञाकर, लघु, त्रिदोषघ्न, रूजाहर, अमृताप्रमाणें उत्तम. ह्या गुणांत देशभेदानुसार फरक होत जातो.

यमुना—स्वादु, दीपन, पाचन, रोचन, वल्य, वातल पित्त, दाह, वमन, श्रमहर, कृष.

नर्मदा—लघु, शीतल, सुपथ्य, रूच्य, मधुर, पित्तप्रकोपन

सरस्वती—स्वादु, पूत, रुच्य, पथ्य, लघु, दीपन, कांतीकृत्, रूजाहर.

चंद्रभागा—सुशीत, दाह, पित्त, शमन, वातल.

मधुमति--चंद्रभागेप्रमाणेच पण, दीपन, पाचन.

शोण--रुच्य, पथ्य, बल्य, क्षीणांगंपुष्टिदं, संताप-शोषहर.

वेत्रवती--सुमधुर, दीपन, पाचन, पुष्टिदं, कांतिदं, वृष्य, बल्य.

पयोष्णी—रुच्य, पवित्र, पापहर, सर्वामयहर, बाल-कांतिप्रद, लघु

वितस्ता—स्वादु, त्रिदोषहर, लघु, प्रज्ञाबुद्धिप्रद, पथ्य, तापजाड्यघ्न.

मही—सुस्वादु, लघु, बलपित्तकर.

शरयू—स्वादु, बलपुष्टिकर.

गोदावरी—पित्तार्ति, रक्तार्ति, समीरहारि, पापहारि, दीपन, परंपथ्य, कुष्ठादि रोगहर, तृषाहर.

कृष्णा— स्वादु, पूत, जाड्यकर, पित्तास्त्रकोपहर

कृष्णावेण्या— स्वच्छ, रुच्य, दीपन, पाचन,

भीमरथी — पथ्य, स्वादुतर, सुकांतिद, लघु, कृष्णाजलवत्.

तुंगभद्रा— स्निग्ध, निर्मल, स्वाददं, गुरू, पथ्य कंडुपित्तास्त्रहृत्. प्रायः साम्ये पथ्यकरम्.।

कावेरी-- स्वादु श्रमघ्न, लघु, दीपनं, दद्रुकुष्ठ दोषघ्न. मेधाकर रूचिद.

ताम्रपर्णी-- पवित्र, पुण्यवर्धन, स्नान पानहित.

नदींतला डोह-- दीपन, मधुर, पथ्य. कफवातहृ

पाटाचे पाणी-- स्वारू, गुरू, दोषद, शीतज्वरावह

भूपृष्ठाखालील पाणी

विहीर-- पित्तल, दीपन, क्षारसंयुतम्, लघु, त्रिदोष कफवातहरम्। वसंत ग्रीष्मांत उत्तम

आड-- १ मधुर-कफहर वात पित्तहर.
२ मचुळ, वात, पित्त, कफकर.

उफाळा-- पित्तघ्न, अविदाही, शीतल, प्रीणन, मधु बल्य, लघु, किंचित् वातकर.

झरा-- मधुर, दींपन, कटुपाकी, लघु, कफपित्त वातल

उन्हाळा-- त्वगामयहर, अतिदीपन, स्पर्शोष्ण गंधवान् देशानुसार साधारण गुण.

आनूप-- स्निग्ध, गुरू, पित्तहर, कफाग्निमांद्यकृत्

जांगल—स्वादु, त्रिदोषघ्न, रुचिप्रद, पथ्य, आयु वीर्यपुष्टि कांतिकृत्.

साधारण—रुच्य, दीपन, पाचन, रोचन, पौष्टिक लघु, श्रम, तृष्णापह, वातकफमेहघ्न.

हे गुणधर्म नि घंट शिरोमणींतले आहेत.

कालानुसार पथ्यतमत्वम्

वसंत—उफाळा.
ग्रीष्म—विहीर.
वर्षा—दिव्यम्.
शरद—नदी.
हेमंत—तलाव.
शिशिर—सरोवर सुश्रुत.

पाण्याचे प्रकार फार आहेत. पैकीं वरील सहा व आंत रिक्ष आणि स्वयं विशीर्णादि शिलातलोभ्दवम् हे दोन प्रकार

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मिळून आठ प्रकार त्यांतले त्यांत विशिष्ट कालीं का होईना ण प्रशस्त मानतात हें खरें.

शहरांतलें पाणी

सध्यां मोठमोठालीं शहरें आहेत. त्यांना पाणी पुरवठा रसाचा होतो. हें पाणी स्वभावत: तुरट, रुक्ष, मलमूत्रावरोधक तल, तशांत तें पाणी लोखंडी–बिड–नळांतून वहात येतांना ोहाचे कषायत्व मलावष्टंभत्व अधिक घेत घेत येतें. सारसाचे ाहीं दोष क्लोरिनेशन्नें घालवितात. पण वरील दोषांपैकी क्षत्व अधिक वाढतें. त्यामुळें पाण्याचे जीवन तर्पण, हृद्य, . गुण रहात तर नाहींतच पण तें जीवन विरोधी गुणांचे ाल्यानें शहरी जीवन कष्टमय होतें, त्यांची आंतडीं नादुरुस्त होतात. व त्यांनां आंतड्यांचे रोगही लौकर होतात व ते ीव्रतेनें जाणवतातही.

आयुर्वेदीय औषधांचे बहुतेक कारखाने अशा मोठमोठ्या हरांतून विखुरलेले आहेत. आणि त्यांना पाणी मिळतें तें ारसाचें. त्यामुळें आसवांचे गूण पूर्णांशानें मिळू शकत नाहींत.

पाण्याचे विविध उपयोग

१ काष्ठौषधीमधील सारभाग उत्तम त्यांत उतरावा ागतो.

२ प्राणिज पदार्थ त्यांत पूर्ण मिसळावें लागतात.

३ खनिज पदार्थ त्यांत संपूर्णतया विरावे लागतात.

४ मधुर पदार्थांचे स्फुटन उत्तम तऱ्हेनें योग्य कालांत ह्वावें लागतें.

५ मधुर पदार्थ, किण्व वा धातकी इ. फुलांपासून उत्तम तीचा कोहल निपजावा लागतो.

६ अम्लाची निर्मिति अत्यल्प प्रमाणांत पण ती जरूर ह्वावी लागते.

पाण्याचें प्रकरण जरा लांबल्यासारखें वाटतें. पण आसवविधींतलें पाण्याचें वैशिष्टच, प्रमुखस्थान, प्रधान कार्य, इ. लक्षांत घेतां केला हा विस्तार अत्यंत संक्षिप्त आहे, असें वाटल्यावांचून राहाणार नाहीं. पाण्याचे विविध उपयोग वर दिले आहेत ते लक्षांत घेतले म्हणजे पाणीं हें माणसांप्रमाणेंच आसवाचेही जीवन आहेसें वाटतें. जगांतील पंचमहाभूतांपैकीं पृथ्वीचें काम पाणी आसवविधींत करतें असें म्हणावें लागतें. अशा ह्या माहात्म्यामुळें आसवाकरितां जितकें अधिक गुणवान् पाणी मिळेल तितकें चांगलें ही कल्पना ध्यानीं यावी. प्रयत्न मनीं यावा आणि आर्त परित्राणाचें कार्य सुकर व्हावें म्हणून हें सर्व लिहावें लागलें.

संदर्भ

दिवा सूर्यांशु संतप्तं निशिचंद्रांशु शीतलभ् ।
कालेन पक्वं निर्दोषंमगस्त्येनाविषीकृतम् ॥
हंसोदक मितिख्यांतं शारदं विमलं शुचि: ।
स्नान पानावगाहेषू हितंमत्र्वु यथामृतम् ॥
जीवनं तर्पणं हृद्यं ल्हादि वुद्धि प्रबोधनम् ।
गंगांबुनभसो भ्रष्टं स्पृष्टं तर्केंदुमारुतैः ॥
हिताहितत्वे तभ्दूयो देशकालावपेक्षते ।।
तन्वव्यक्तरसं मृष्टं शीतं लघ्वमृतोपमम् ।
येनाभिवृष्टममलं शाल्यन्नं राजतस्थितम् ॥
अक्लिन्नमविवर्णंच तत्पेयं गांगम् अन्यथा ।
तन्नपातव्यं मासादाश्वयुजांद्विना । अ.हृ.अ. ५
ऐन्द्र—ऐन्द्रमम्बु सुपात्रस्थं अविपन्नं सदापिवेत् ।
अ: हृ. सू. अ ५
यदन्त रीक्षात्पततीन्द्रसृष्टं चोक्तैश्च पात्रैः
परिगृहृचतेऽम्भ: ।
तदैन्द्रमित्येव वदन्ति धीरा नरेंद्र पेयं
सलिलं प्रधानम् ॥ च. सू. अ. २७

रामतीर्थ ब्राह्मी तेल

(स्पेशल नं. १) (मेडिकेटेड) डोक्याचे ज्ञान व क्रियातंतु बलवान करते केस काळे आणि मजबूत होतात. टक्कल पडलेल्या जागीं पुन्हां केस येतात. खवडे उवा, लिखा यांचा नाश होतो. स्मरणशक्ति वाढते. डोळ्यांत घातल्यानें दृष्टी सुधारते. कानांत टाकल्यानें कानाचे रोग नाहींसे होतात. गाढ झोप लागते.

सर्वऋतूंत सर्वांना उपयोगी. सर्वत्र मिळतें. मोठी बाटली किं. ३–८–०, लहान बाटली किं. रु. २.

श्री रामतीर्थ योगाश्रम, ८ उमेश धाम, २ रा विन्सेंट स्क्वेअर, दादर जी. आय्. पी. रेल्वे स्टेशन जवळ, मुंबई १४.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

श्रेष्ठजल—ईषत्कषायमधुरं सुसूक्ष्मं विशदं लघु ।
अरूक्षमनभिष्यंदि सर्वं पानीयमुत्तमम्
च सु. अ. २७/१९८

आरोग्यांबु—पादशेषं तु यत्तोयं मारोग्यांबु तदुच्यते ।
आरोग्यांबु सदा पथ्यं कास श्वास कफापहम् ॥
सद्यो ज्वरहर ग्राहि पाचनं दीपनं लघु ॥
भा. प्र, खं. १

पानीयं पानीयं शरदि वसंतेच पानीयम् ।
नादेयं नादेयं शरदि वसंतेच नादेयम् ॥ यी. र.

शारदीयजल–तनु लघ्व नभिष्यंदि प्रायः शरदि वर्षति ।
तत्तुये सुकुमाराः स्युः, स्निग्धभूयिष्ट भोजना॥
तेषां भोज्येच भक्ष्येच लेह्ये पेयेच शस्यते ॥
च. सू. अ. २७/२००

राजभीराजमात्रैश्च सुकुमारैश्च मानवैः ।
गृहीत्वा तु शरद्यापः प्रयोक्तव्या विशेषतः ॥
च. सू. अ. २७/२०४

श्रेष्ठ— निर्मलं मल जिज्जलंम् । अ. हृ.
आंतरिक्ष मुदकंनाम् पथ्यत्वेन ।
जलेषु दिव्यं श्रेष्ठमृ । नि. र.
वर्षाना देय मुदकानाम पत्यत्वेन ।

स्वभाव— उदकं क्लेदयति । च. सू. अ. २७
उदक माश्वास कराणाम् । चं. सं.

निषिद्ध— विभ्रान्तेषूच कालेषु यत्प्रयच्छंति च तोयदाः ।
सलिलं तत्तु दोषाय युयंज्ते नात्र संशयः॥च.सू.अ.२७
अनार्तवंच यद्दिव्यमार्तवं प्रथमंचयत् ।
लूतादि तंतु विण्मूत्र विषसंश्लेष दूषितम् ।
अ. हृ. सू. अ. ५

अष्टविधं— दिव्यान्तरिक्षं धुनिजं च कौपं स्वयं निशीर्णाद्रि शिला तलोभ्दवम् ।

शस्तजलं— तडागजं सारसमौभ्दिदं यत्तोय मतमष्टविधं मनोहरम् । आ. प्र.

मागील लेखांत

आसवारिष्ट कल्पनेचा उगम. संधान विधी काल. आसवारिष्ट संज्ञा. आसवांचे प्रकार. आसव–मध लक्षण. आसव–मद्य तुलना.

पुढील लेखांत

औषधी. आसवांतील धात्वंश. मधुर द्रव्यें. आणि मधुर द्रव्यांचे प्रयोजन.

नवा अविष्कार

स्त्री, पुरुष, बालक या सर्वांच्याकरिता

अत्युत्तम महौषधी

नवरत्नरस

★

हा हिरा, माणिक, मौक्तिक इ. नवरत्नें आणि सुवर्ण यांच्या संयोजनानें तयार करण्यांत आलेला कल्प आहे. शरीरस्थ रस, रक्त आदि सप्त धातूंची शुद्धि, वृद्धि व पोषण, शुक्र, वीर्य यांची शुद्धी आणि पुष्टी करणें हे या औषधाचें विशिष्ट कार्य आहे. तसेच यानें नपुंसकत्व, वीर्यस्राव, स्वप्नदोष इ. चे निर्मूलन होऊन नवयौवन प्राप्त होते. स्त्रियांच्या गर्भाशयशोथ, प्रदर वारंवार होणारा गर्भपात, गर्भवतीच्या हातापायांवरील सूज व फिक्कटपणा यांवरहि गुणकारी आहे. वंध्यत्वाचा दोष दूर करणारी ही अपूर्व औषधी आहे. मुलांचे अस्थिदौर्बल्य दूर करून अस्थि बलवान करणारे, कॅलशियम व व्हिटॅमिनची उणीव, दुधाचे अपचन नष्ट करून बालकांना धष्टपुष्ट करणारे असे हे औषध आहे. क्षय, जीर्णज्वर, कास, श्वास, मधुमेह, मानसिक दुर्बलता इत्यादि मध्येंहि अतिशय उपयुक्त आहे.

नवरत्नरस—निरोगी लोकांकरिता रसायन व रोगी लोकांना आरोग्य प्राप्त करून देणारे हे महान औषध आहे.

एका बाटलीची किंमत दोन रुपये

ऊंझा फार्मसी लि. ऊंझा

(गुजराथ)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भारतीय आरोग्यविज्ञान

फलाहार

सुकामेवा

लेखक—वैद्य दत्तात्रेयशास्त्री जळूकर.

जगांत कोणतीहि वस्तु नष्ट होत नाहीं. तिचें रूपांतर होतें असा निसर्ग नियम आहे. " वासांसि जीर्णानि यथा विहाय नवानि गृण्हाति नरोऽपराणि तथाशरीराणि विहाय जीर्णान्यन्यानि संयाति नवानि देही ॥ भगवान् श्रीकृष्णांनीं भारतीय युद्धांत आपल्या हातून लाखों जींवांचा संहार होणार असा व्यामोह होऊन कर्तव्य पराङमुख होऊं पाहाणाऱ्या अर्जुनाला उपदेश करतांना हेंच सांगितलें आहे कीं लढाईंत किंवा अन्य कारणांनीं जीं शरीरें नष्ट झालेलीं आपण पाहातों त्या सर्वहि शरिरांना सोडून त्यांचा देही (आत्मा) दुसरें नवीन शरीर धारण करण्यासाठीं निघून गेलेला असतो. म्हणून आपण त्या शरिराला 'मृत' म्हणतो. " व्यवहारांत जीवसृष्टि विशेषतः मानवेतर कीटक सृष्टींतील कांहीं योनी अशा आहेत कीं वर्षाकालाचें दिव्य जीवन (आकाशांतून वृष्टिरूपानें) पृथ्वीच्या पृष्ठभागावर पडतांच त्या जीवनाच्या स्पर्शानें ती जीवसृष्टि–ते कीटक–जंतु पुन्हां नवजीवन धारण करून संचार करूं लागलेले आपण पाहातों. दानवीं, गोगलगायी, मखमली (तांबडया) गोगलगायी, बेडूक इ. प्राणी वर्षाकालीन पहिली जोरदार वृष्टि झाल्याच्या दिवशींच काय, पण कांहीं तासांच्या अवधींतच भूपृष्ठावर वावरूं लागलेले आपण पाहातों. पुष्कळांना तर असेंच वाटतें कीं हे सर्व प्राणी आकाशांतूनच पडत असावेत. परंतु तें तसें नसून विशिष्ट काळापर्यंत भूपृष्ठावर वावरणाऱ्या ह्या प्राण्यांचे देह नानाविध आघात अपघाताला बळी पडतात. पायाखालीं चिरडलें जाणें, गाडी घोडयाखालीं चेंगरणें, अति संतप्त किरणांनीं जलाशय सुकून यांचे देह होरपळून जाणें इ० कारणांनीं ह्या कीटकांचे देह छिन्नविच्छिन्न होऊन त्यांतील पार्थिवांश पृथ्वींत मिसळून जातो. व पुन्हां वर्षाकालारंभापर्यंत ह्याच रजःकणांत तद्रूप होऊनच तो रहात असतो. व ईश्वरी किंवा निसर्ग योजनेनुसार हे सर्वहि नष्टभ्रष्ट, छिन्नविच्छिन्न, अणु-रेणुरूप झालेले देह दिव्य जीवनाचा (अंतरिक्ष जलाचा) स्पर्श होतांच पुनश्च सचेतन होऊन वावरूं लागतात. वनस्पति जीवनहि असेंच आहे. स्वार्थी मानव जीव हा बुद्धि व शरिरानें सर्व जीव सृष्टींत श्रेष्ठ गणला गेला आहे; त्यानें या अन्य जीवसृष्टीला प्रसंग विशेषाचें आपलें खाद्य बनवून टाकलें. व या निमित्तानें इतर सर्व जीवसृष्टि ही मानवीदेहाच्या त्या त्या पांचभौतिक अंशाला पुष्ट करण्याचें कार्य करीत असते व आपलें परोपकारित्व सिद्ध करीत असतें हा नियम जगा-पुढें मांडला.

मानवी देहधारणपोषणावश्यक आहार्य सर्वहि वस्तु ह्या प्राणिज व उभ्दिज्ज सृष्टीनेंच पुरविल्या आहेत असें म्हणावयास कांहीं अडचण नाही. 'आहार' विषयक लेख मालेंत धान्याहारानंतर फलाहार व त्यांतहि पुन्हा सुकलेल्या फळांचा आहार विचारांत घेत असतां वरील घडामोड सहज ध्यानांत आली व म्हणून तिचा उल्लेख केला. सुकीं फळें ज्यांना आपण 'सुकामेवा' म्हणतों ते वनस्पति जीव सृष्टीचें ते ते देह वा त्याचे विशिष्ट अवशेष आपल्या बुद्धि चातुर्यानें जतन करून ठेवून विशिष्ट कृतीनें, तऱ्हेनें, वेळप्रसंगीं आपल्या देह पुष्टीसाठीं त्यांचा आहार्य वस्तु म्हणून उपयोगांत आणतांना मानवानें असाच विचार केला नसेल काय कीं, वनस्पति जीव-सृष्टीचे सर्वहि उपयुक्त जीवनांश अन्य रूपांत संरक्षित केलेले असले कीं योग्य वेळी आहार द्रव्य मिषानें त्यांचा स्वतःच्या जीवनशक्तीशीं मेळ घालून ह्या संरक्षित व भुक्त द्रव्यांतील सुप्त शक्ति जागृत करावयात व सहजच 'वृद्धिः समानै सर्वेषां' तत्त्वानें त्या जागृत जीवशक्तीनें आपली जीवनशक्ति अधिक प्रज्वलित करून घ्यावी हें इष्ट व शक्य आहे." सुकामेवा हा त्या त्या वनस्पति सृष्टीचा संपूर्ण परिपाक होऊन निर्माण झालेलें फळ किंवा बीज रूपानेंच आमच्या पुढें आलेला असतो.

वृद्धांचा कायाकल्प करावयाचा असता जो शास्त्रोक्त विधी आहे त्यांतहि जराजर्जर व वलीपलित युक्त शरीर पहि-ल्यांदा अधिक कृश होतें. ऊर्वरित जीर्ण दंत नख केशादि गळतात. अगदीं वाळल्या खारकेसारखे अस्थिचर्मावशिष्ठ शरीर होऊन जातें व नंतर त्या सर्वांग शुद्ध अशा बाह्यतः क्षीण दिसणाऱ्या शरीरांतील जीवनशक्तीशीं जेव्हां त्या त्या कल्पांतील संजीवक द्रव्यांतील सुप्त शक्तीचा संयोग होतो तेव्हां मानवी शरीरांत असलेलें ते ते जीवन घटक उमलतात व पाहतां पाहतां देह सर्वांगसुंदर तजेलदार, बनतो. हाच अनुभव ग्रथित केला आहे.

आहार्य द्रव्यांतील फलाहारांत सुकामेवा समाविष्ट करण्यांतील आहारशास्त्रज्ञांचा हेतु आतां एवढया प्रदीर्घ विवेचनावरून वाचकांचे ध्यानी येण्यास हरकत नाहीं. आतां पाश्च्यात्य आधुनिक विज्ञानवेत्यांच्या दृष्टीनें पाहूं जातां ते सुद्धां असेंच पण निराळया रीतीनें सांगतात. कीं " फळांचे अन्न दृष्टया २ भाग पैकीं ८० टक्के पेक्षां अधिक जलांश अस-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

णारीं फळें अस्वाद देणारीं असतात. व कमी पाण्याचीं अन्न म्हणून उपयोगी पडतात. सुकीं फळें खजूर, मनुका, अंजीर यांत पोषण शक्ती केळ्यांपेक्षां अधिक आहे. कवचफळें यांत मेद पदार्थ फार असतात; पिष्टभाग कमी. 'अ' सत्व थोडें 'ब' साधारण आणि 'क' सत्व मुळींच नसतें. मेदामुळें कवचफळें पचनास जड पण शिजविल्यानें सुपाच्य होतात. ह्यात प्रथिनें व जीवमूल्यें फार असतात म्हणून यांचा मांसल पदार्थांसारखा उपयोग करावा. बदाम, अक्रोड, पिस्ते, भुईमुग, खोबरें हीं उपयुक्त फळें होत. चांगली चांपून खावीं" (डॉ. म्हसकर आहार)

आपल्याला साधारणतः गरिबांपासून श्रीमंता पर्यंत सर्वांच्या खाण्यांत येणाऱ्या अथवा सर्वांना आपल्या ऐपती प्रमाणें खातां येणाऱ्या सुक्याफळांचा विचार करावयाचा आहे. व तीं फळें म्हणजे आक्रोड, अंजिर, काजु, काळीं द्राक्षें, खजूर खिसमिस, खोबरें, गोडंबी, चारोळी, जर्दाळू, पिस्ते, बदाम सुकेळीं होत. त्यां प्रत्येकाचा संक्षेपतः विचार करुं.

१ अक्रोड—मध्यम वर्ग किंवा गरिबांना दर्शनानेंहि दुर्लभ असा हा मेवा आहे. या झाडाला साधारणपणें ३० ते ४० वर्षांनंतर फळे येऊं लागतात. यावरूनच याचें दीर्घ जीवित्व व्यक्त होते. अर्थातच अशा दीर्घजीवी वृक्षाची फळें नित्य खाण्यास मिळणें ही भाग्याचीच गोष्ट नव्हे तर काय? पिकलेलीं फळें सामान्यतः पेरू एवढीं मोठीं असतात. आंतील गाभा खाण्यास अत्यंत मधुर, स्वादिष्ट असतो. याची चव सामान्यतः बेहडाच्या आठळींतील मगजाप्रमाणें असतें. हें फळ तैल प्रचुर आहे. स्निग्ध असल्यानें वात नाशक धर्म आलाच! परंतु पचनास जड असल्यानें कफ प्रकृति लोकांनीं खाऊं नये हें बरें. धातुवृद्धिकर व पौष्टिक असल्यानें पौष्टिक पाक वगैरेमधूनच योग्य प्रमाणांत याचा उपयोग करणें चांगलें. सारकहि आहे.

२ अंजीर--गरिबांना अंजीर मिळाले नाहींत तर त्यांनीं उंबराचीं फळें खावी. *गरिबांचे ते अंजीरच!* ओले अंजीर सर्वत्र नेहमीं मिळत नाहींत म्हणून ते सुकवुन ठेवून त्याच्या माळा करून ठेवतात. तथापि अंजीर सुकविण्याची पद्धति आपले देशांत फारशी नाहीं. सुके अंजीर अरबस्तानांतून आपल्याकडे येतात. मधुर, थंड, व पचनास जड असून दाह, रक्तदोष पित्त व वातनाशक हा यांचा स्वभाव असल्यानें पचनक्रिया बरी परंतु शक्ति व रक्तवृद्धि ज्यांना हवी असेल त्यांनीं अंजीर सकाळीं अवश्य खावेत. अगदींच नुसते खाण्यापेक्षां ते तुकडें करून बदामगर, खडिसाखर वेलचीपुड, केशर, चारोळी, पिस्ते, बेदाणा हीं सर्व सम प्रमाणांत गाईच्यां साजुक तुपांत भिजूं घालून नंतर ८ दिवसां उपयोग करावा. हें सर्व मिश्रण पचनक्रिया असेल त्या मा १ ते २ तोळे रोज सकाळीं घ्यावें. अल्पवयी (८ व आंतील) मुलांस मात्र देऊंच नये. मोठयांचे शरीरा कडकी घालवून धातुवृद्धि करणारा हा फार छान योग सुक्या अंजिराच्या काढयानें गुळण्या केल्या तर गळ्या व जिभे जवळील सूज कमी होते.

३ काजू--हे सुद्धां स्निग्ध व ऊष्ण असतात. धा वर्धक व अग्निमांद्य नाशक आहेत. अनशेपोटीं खाल्ल्या उष्णता वाढते. श्रीमंत लोक शेंगदाण्या ऐवजीं काजू वापरतात. कुटून तूप साखर घालून उपोषणासाठीं करतात. तसेंच मधल्या वेळचे खाणें म्हणून काजू, किसमि खारीक, खडिसाखर असा मेवा किंवा चिवडा वगैरे म यांचा उपयोग केला जातो. पातळ भाज्यांतून याचप्रमा केशरीभात, वांगीभात, कांदे-बटाटेभात, मसालेदार चि इ. मध्यें स्वादासाठीं काजू वापरले जातात.

४ काळीं द्राक्षें (मनुका.)— द्राक्षाच्या अनेक जाती आहेत हें मागें सांगितलें आहेच. द्राक्षें सुकवून ठेव कीं त्यांना मनुका म्हणतात. द्राक्षाचे गुणधर्म पूर्वी येउन गेलें आहेत. तेव्हां द्विरुक्ति नको. रक्तशुद्धि व रक्तवृद्धि फार मोठे सद्गुण द्राक्षांत तसेंच मनुकांत आहेत. रस रक्ता धातूंची परंपरा सुधारणें ही महत्वाची क्रिया द्राक्षें किंवा मनु करीत असलेंमुळें रसरक्तादि धातूंची उत्पत्ति थांबले क्षयीं रोग्याला उत्तम. आणि वजन कमी होत चाललें अ असें आढळत असतां नित्यरात्रीं स्वतःच्या मूठ भरून मनु चावून खाऊन पोटभर पाणी प्याल्यास रसक्रिया सुधारून व वाढतें असा अनुभव आहे. ओलीं द्राक्षें जेवणानंतर थोड्या वेळानें तर मनुका आहार साधारण पचत आल्या वेळीं म्हणजे ४।६ तासांनीं खाणें बरें. आजारीपणांत तव्यावर परतून संस्कार लावलेल्या मनुका द्याव्या. रुचि व भूक वाढवितात.

५ खजूर— तुष्टि, पुष्टि व शांति समाधान प्राप्त होण्यासाठीं खाद्यपदार्थांत खजूर समाविष्ट केला आहे. सुका मेवा म्हणून खजूरापेक्षां खारिकच वापरण्याचा प्रघात अधिक आहे. देव-देवतांच्या पुढें बदाम व खारीक हीं फळें प्राय नैवेद्य म्हणून ठेवण्याचा प्रघात ज्यांच्या आठवणींत असे त्यांनाहि देवपूजेंत सुद्धां ह्या सुक्यामेव्याचा समावेश का केला असेल हें ध्यानीं येईल. रात्रीं १ खारकेचे तुकडे, २ तोळे हरबऱ्याची डाळ व १ तोळा सुके खोबरें पाण्यांत भिजत घालून सकाळीं चांगलें चावून खाणें हा गरिबांचा व्यायामा नंतर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

...त्तम खुराकच होय. दांत येत असतां लहान मुलांच्या हिरड्या ...ळसळ करीत असतात व प्रत्येक वस्तु हिरड्यांनीं दाबण्याकडे ...यांची प्रवृत्ति होते अशा वेळीं खारीक त्यांचे हातीं असूं द्यावी, म्हणजे हिरड्या मजबूत होण्यास फार मोठी मदत होते. अशा वेळीं पेपरमिंट किंवा अितर बाजारू मिठाईचे खाद्य पदार्थ देणें योग्य नव्हे. बलवृद्धि साठीं खारका फोडून बिया काढून ...काव्या आणि दुप्पट वजनाइतक्या उत्तम साजूक तुपांत त्या भिजत टाकाव्या. व रोज १-२ तोळें खाण्याचा सकाळीं अभ्यास ठेवावा. चांगलें बल वाढते. उत्तम चावून खाण्याची दक्षता ...ण्यारास खारीक गुणावह होते. काजूचे, खारकांचे, खोबऱ्याचे ...कडे, खिसमिस, खडिसाखर व मनुका हा सुकामेवा अलीकडे ...र्निगच्या जमान्यांत पाहुण्याना उपहार म्हणून देतांना फार पाहाण्यांत येतो. आजारीपणांत खारीक भाजून द्यावी. खारकांचें लोणचेंहि केलें जातें. खीरहि करतां येते.

वाचकांचा पत्रव्यहार

मीमांसेचा उत्कर्ष होवो !

"नियमित प्रकाशन, सुंदर छपाई, बुद्धीस चालना ...गारें व्यवहारोपयुक्त, संशोधक व अभ्यासू लेखकांनीं लिहिलेले लेख ह्या त्रिपुटीवरच कोणत्याहि नियतकालिकाचा बरेवाईटपणा अवलंबून असतो. ह्या दृष्टीनें विचार करता आयुर्मीमांसेनें अत्यल्पावधींत वैद्य आणि सामान्य जनांचे चित्त आकर्षित करून अुच्च श्रेणीच्या वैद्यकीय मासिकांत वरचा दर्जा मिळविला आहे यांत शंका नाहीं. मीमांसेचा अुत्तरोत्तर अुत्कर्ष होवो."

नशिराबाद
३-८-१९५१ } — वैद्य *दत्तात्रेयशास्त्री जळूकर*

वैद्यराज बागेवाडीकरांचा महत्वपूर्ण लेख

"आपल्या आयुर्मीमांसेच्या मे १९५१ च्या अंकांतील वैद्य नृसिहाचार्य बागेवाडीकर यांचा चंद्रप्रभागुटीवरील लेख आपल्याला माहीत आहेच. त्यांतील शक्तीची अक्षयता आणि बदल या शीर्षकाखालील मजकूर फार महत्वाचा आहे. 'लोप्यतावच्छिन्ना धर्मिणः शक्तिरेव धर्मः' याप्रमाणें ज्या शक्ती-मुळें द्रव्यांची रचना होते ती शक्ति कार्य द्रव्यांच्या रस, वीर्य, विपाक आणि प्रभाव यापैकीं ज्या स्थानांत असते त्याप्रमाणें कार्य घडते हे लक्षांत घेतां आपल्या मासिकांत औषधी गुणधर्म-शास्त्र या सदरांत इतर औषधांचा व वनस्पतींचाहि या दृष्टीनें ऊहापोह केल्यास भरीव कामगिरी होईल."

— *जी. पी. पाठक, गोंदवले.*

'संधानविधी'—अभ्यसनीय लेख

"आपला आगस्ट १९५१ चा आयुर्मीमांसा अंक मिळाला. आयुर्मीमांसा अंकाची छपाई सातारसारख्या ठिकाणीं फारच छान झालेली आहे. आंतील सर्व लेख वैद्य व डॉक्टरांच्या अुपयोगी आहेतच. ***ह्या शिवाय ते सर्व साधारण शिक्षित माणसालाहि खात्रीनें उपयुक्त ठरतील.*** विशेषतः 'संधान-विधि' हा लेख उल्लेखनीय आहे. लेखकानें मद्य व आसवारिष्टें यांतील दाखविलेला फरक अभ्यसनीय आहे. आयुर्मीमांसा अंकाचें स्वागत सर्वांकडून निश्चित होईल."

— *ज. ग. देवकुळे, मुंबई*

(या पत्राचे लेखक श्री. ज. ग. देवकुळे हे नामवंत व्यापारी–कलातज्ञ असून मुंबईस ते रॅशनल आर्ट सर्व्हिस ही संस्था चालवितात. वैद्यक शास्त्राशीं त्यांचा केवळ औषधी कारखान्यांचा व्यापार–कलेशी जो संबंध येतो तेवढ्यापुरता मर्यादित परिचय असूनहि आयुर्मीमांसेंतील शास्त्रीय लेख त्यांनीं वाचले व आपला अभिप्राय आस्थापूर्वक कळविला, हे विशेष होय. सुशिक्षित व बुद्धिनिष्ठ भारतीयांपुढें–ते वैद्य-शास्त्र विशारद असोत वा नसोत–आयुर्वेदांतील आरोग्य-विज्ञान व रोगनिवारण विषयक तत्वांची मांडणी करीत राहणें लाभकारक ठरेल हाच याचा निष्कर्ष आहे. —संपादक)

दमा हटतो

तो कायमचाच. पुरोहित श्वासहारी हें एकुन २८ वर्षें सतत प्रख्यात व अनुभविक असें डॉक्टरी औषध आहे कीं, जें तात्काळ आराम देऊन आस्ते आस्ते दमा बरा करतें. औषध घेण्यास सुरुवात करतांच कफ सुटतो, धांप कमी होते, पचनक्रिया सुधारते व फुफुसें मजबूत होऊन कांहीं कालानंतर दमा निखालस बरा झाल्याचा अनुभव येतो. रु. ३॥, ६ व १० किमतीच्या पॅकिंग मधून सगळीकडे विकत मिळतें अगर

कारखानदार
डॉ. पुरोहित फार्मसी,
कोल्हापूर (एस. एम. सी.)

पुरोहित श्वासहारी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

यूटोन

घटकद्रव्यें : (१) उदुंबर फळें (२) अश्वगंधा (३) शतावरी (४) अशोक (५) काटेमाठ (६) ज्येष्टमध (७) मनुका (८) इंद्रजव (९) पारसिक यवानी (१०) उपळसरी (११) लवंग (१२) वेलची (१३) दालचिनी (१४) धातकी पुष्प (१५) शर्करा.

'यूटोन' हा कल्प स्त्रियांचें आरोग्य रक्षण, त्यांच्या विशिष्ट रोगांचे निवारण आणि गरोदर स्त्रियांच्या बाबतींत शक्तिवर्धन, गर्भरक्षण व गर्भपोषण हे हेतू ध्यानीं घेऊन योजण्यांत आलेला आहे. अशोक हे महिलांच्या गर्भाशय विकारांवरील सर्वश्रेष्ठ औषध यूटोनमध्यें समाविष्ट आहे. अश्वगंधा आणि शतावरी ही बलवृद्धि करणारी औषधें असून शतावरी विशेषत: गर्भाशयाला बल देते. अुदुंबर फळें ही गर्भस्थापक व गर्भरक्षक आहेत. काटेमाठ, ज्येष्ठमध, मनुका ही द्रव्यें शीत, रक्तप्रसादक व रक्तस्राव प्रतिबंधक असल्यानें प्रदरादि विकारांत ती अुपयुक्त ठरलेली आहेत. अुपळसरी रक्तपित्तशामक व गर्भाशयाची विकृति दूर करणारी वनस्पति आहे. या निवडक व श्रेष्ठ गुणकारी औषधांचा 'यूटोन' मधील संयोग निरोगी स्त्रीजीवन आणि मातृपदप्राप्ती या दृष्टीनें अत्यंत परिणामकारक ठरलेला आहे.

गर्भाशयाचें शैथिल्य, सूज, स्थानभ्रष्टता, विकृति, व त्यांतून निर्माण होणारे श्वेत-रक्तप्रदरादि अुपद्रव, अनियमित मासिक ऋतुस्राव, अत्यार्तव, इत्यादि दोषांमुळें स्त्रियांची प्रकृति बिघडते. वैवाहिक जीवन दुःखी होते. मातृपदप्राप्तीचा संभव दुरावतो. गर्भधारणा झाली तरीहि गर्भस्राव वा गर्भपाताचा धोका असतो. गरोदरपण सुखावह होत नाहीं. रक्तक्षीणता येते; आणि प्रकृति कित्येकदा कायमचीच खालावते. युटोनच्या घटक द्रव्यांची गुण-वैशिठ्यें ध्यानीं घेतली तर हे सर्व दोष दूर करून स्त्रियांना आरोग्य, पुष्टी, गर्भधारणक्षमता, आणि सुखी मातृपदाचे आश्वासन देण्याचें कार्यकर्तृत्व या कल्पाच्या ठिकाणीं आहे असा प्रत्यय येतो.

घटक द्रव्यांची गुणवैशिष्ट्यें

१ उदुंबर फळें-- उंबराच्या पक्व फळांचे प्रमाण यूटोनमध्यें आधिक्यानें आहे. त्यांचा रस मधुर आणि कषाय असून वीर्य शीत आहे. अर्थात् ती उत्कृष्ट पित्तशामक आहे. रक्त, मांस, शुक्र या धातूंत वाढलेली पित्ताची उ[ष्णता] व तीक्ष्णता दूर करून शरीरांत शैत्य प्रस्थापित करणें रक्तप्रसादन आणि रक्तस्तंभन करणें हें उंबराचें वि[शिष्ट] कार्य आहे. कषायरस व शीत वीर्य यामुळें रक्तवाहि[न्यांचें] संकोचन होते. त्यांना क्षते पडल्यानें होणारा रक्त[स्राव] थांबतो. ही क्रिया विशेषत: गर्भाशयावर घडे[ते]. त्यामुळें योनिगत रक्तपित्त, अत्यार्तव, रक्त व श्वेतप्रदर हे विकार नष्ट होतात. गर्भाशयाच्या पूर्व किंवा पश्चा[त्] पटलांचें बहिरागमन, योनिमार्गाचें शैथिल्य हेहि दो[ष] दूर होतात.

उंबरफळें ही गर्भस्थापक आहेत. गर्भधारणेच्या दृष्टीनें गर्भाशय व त्याच्याशीं संलग्न असलेल्या अवयवांतील दोष व विकृति दूर करून अनुकूलता निर्माण करणे हेहि त्यांचे कार्य आहे. गर्भधारणेनंतर पहिल्या तीन महिन्यांत कित्येकवेळा रक्तस्राव होतो; गर्भस्रावाचें भय असते. या काळांत गर्भरक्षक म्हणू[न] उदुम्बर फळें कार्य करतात.

२ *अश्वगंधा*:--मधुर, शुक्रवर्धक बलदायक सर्व धातुपरिपोषक व क्षयघ्न अशी या औषधाची ख्याति आहे. योनी, गर्भाशय बीजकोश हे अवयव पुष्ट व कार्यकारी होऊन गर्भधारणेस अनुकूल अशी या अवयवांची सिद्धता करण्यांत अश्वगंधा अग्रगण्य आहे. कमरदुखी पार्श्वशूल व संधिवेदना अश्वगंधा घेतल्यानें दूर होतात. अश्वगंधा ही उत्कृष्ट शक्तिवर्धक असल्यानें गर्भवतीची प्रकृति सुधारते, आणि गर्भाचें उत्तम प्रकारें पोषण होते.

३ *शतावरी*:— मधुर, स्निग्ध, शीत व पुष्टिकर असून रस, मांस व शुक्र या धातूंची वृद्धि करते. गर्भाशयाला उत्तम बल देणारी वनस्पति म्हणून शतावरीचें महत्व असाधारण आहे. ही क्षीरी वनस्पति आहे. दुग्धाशयाची स्वाभाविक वाढ करण्याचें कार्यही ती करते. अधोमार्गातील रक्तस्रावावर ती अत्यंत प्रभावी आहे. गर्भाशयगत रक्तपित्त, अत्यार्तव, श्वेतप्रदर यावर शतावरी अतिशय गुणकारी आहे.

४ *अशोक*:--गर्भाशय विकृतीवरील अग्रगण्य औषधी म्हणून अशोकाला सर्व वैद्यक प्रणालींकडून एकमतानें मान्यता मिळालेली आहे. या वृक्षाची साल औषधांत योजतात. ती तुरट व किंचित कडू आहे. रक्तसंग्रहण हें अशोक सालीचें प्रमुख कार्य आहे. गर्भाशयाच्या अंत[स्]त्वचेस शैथिल्य आल्यामुळें उत्पन्न होणाऱ्या सर्व विक[ारांवर]

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रांत अशोक गुणकारी आहे. विशेषतः या शैथिल्याचा परिणाम म्हणून रक्तप्रदर किंवा अत्यार्तव ही लक्षणें असतां अशोकाचा अुत्तम अुपयोग होतो.

५ *काटेमाठः*--शीत, स्निग्ध व विषनाशक आहे. गर्भाशयाची पीडा दूर करून त्याला बळ प्राप्त करून देते. अत्यार्तव व श्वेतप्रदर यावर गुणकारी आहे. वारंवार गर्भपाताची सवय असल्यास गर्भस्थापक म्हणून अुपयोगी पडते व पूर्ण दिवस जाऊन सुखरूप प्रसूति होते.

६ *ज्येष्ठमधः*--मधुर, शीत, रक्तपित्तप्रशमन, रोपण व बृंहण आहे. धातुक्षीणतेमुळें गर्भाशयाला आलेले दौर्बल्य नाहीसे होऊन प्रकृति सुधारते. ज्येष्ठमध गर्भवाढीस पोषक आहे.

७ *मनुकाः*--शीत, स्निग्ध, वृष्य, मांसधातुपोषक रक्तपित्तशामक आहेत. अरुचि, वांत्या, छातीची व पोटाची जळजळ, डोकेदुखी यावर मनुका अुत्तम प्रकारे अुपयोगीं पडतात. मलमूत्रविसर्जनक्रियेतील त्रास त्या दूर करतात.

८ *इंद्रजवः*-- तिक्त, कटु व शीत आहे. शूल कमी करते. स्तंभक आहे. रस धातूवर कार्य करीत असल्यानें रसाचे अुपधातू स्तन्य व रज यांची शुद्धि करते.

९ *पारसिक यवानीः*—हे वातशामक व गर्भाशयस्थ वेदनांचे शमन करणारें औषध आहे. यानें झोप चांगली येते. व मेंदूला शांतता मिळते.

१० *उपळसरीः*—मधुर, शीत, स्निग्ध, सुगंधी, वृष्य बल्य व वर्ण्य आहे. स्तन्याशयांची स्वाभाविक वाढ करते. गर्भाशयस्थ रक्तपित्त आणि गर्भाशयाची सूज नाहीशी करून गर्भधारणा झाली असल्यास पूर्ण दिवस भरुन स्वाभाविक प्रसूति होण्यास सहाय्य करते. रक्त व श्वेत प्रदरावर गुणकारी आहे.

११ *लवंगः*—सुगंधी, व दीपक, पाचक आहे. ती कोष्ठस्थ वाताचे शमन करते. गरोदरपणीं होणाऱ्या वांत्या थांबून भूक लागते. पचन चांगले होते. पोटांत वात कोंडत नाहीं.

१२ *वेलचीः*—रुचकर, सुगंधी व स्वादिष्ट असून अग्निप्रदीपक व पाचक आहे. वांती, करपट ढेकरा यावर वेलची उत्तम आहे.

१३ *दालचिनीः*—सुगंधी, दीपक, पाचक व वातशामक असून पोटशूळ व पोटफुगी दूर करते.

१४ *धायटीची फुलें*:— कषायरसात्मक, शीत व स्तंभक आहेत. श्वेतप्रदर व रक्तप्रदर यांत धायटीची फुलें चांगली उपयोगी पडतात.

१५ *शर्कराः*—दाह व तृषाशामक असून पित्तशामक, बल्य व मूत्रल आहे.

यूटोनचे त्रिविध गुणधर्म

आरोग्यदायक व बलवर्धकः—यूटोन हा संयुक्त कल्प मधुर, शीत, धातुवर्धक, कांतिदायक, पुष्टिकारक व स्त्रीरोग नाशक आहे. त्यामुळें स्त्रियांना आरोग्य प्राप्त होतें. अग्नीदीपन, आहार पाचन व धातुपरिपोषण या गुणांमुळें प्रकृति सुधारते. पुष्टिदायक औषधांचा यूटोनमध्यें समावेश असल्यानें ते एक उत्कृष्ट टॉनिक आहे.

स्त्रीरोग-नाशकः— गर्भाशयाचे विविध विकार, मासिक पाळीतील अनियमितपणा, रक्त आणि श्वेतप्रदर, बीजकोश, व गर्भाशय यांचें दौर्बल्य, अशक्तता, रक्तक्षीणता, डोकेदुखी, कमरदुखी, ओटी पोटांतील वेदना या रोगांचा व उपद्रवांचा अुपशम करून यूटोन स्त्रियांना स्वास्थ्य व अुत्साह प्राप्त करून देते.

गर्भरक्षक व गर्भपोषकः—निरोगी शरीर प्रकृति व गर्भाशय, बीजकोश इ. अवयवांची पुष्टी व कार्यक्षमता यामुळें गर्भधारणेस अनुकूलता निर्माण होते. गर्भरक्षण व गर्भपोषण करणारी औषधें यूटोनमध्यें आहेत. त्यामुळें गर्भस्राव वा गर्भपात यांची सवय वा संभव दूर करून गरोदरपण सुखावह करण्याचें कार्य यूटोन करते. गरोदरपणीं होणाऱ्या वांत्या, डोकेदुखी, मळमळ, मलावरोध, मूत्रविसर्जनांतील अडथळे हे अुपद्रव दूर होतात. गर्भाची वाढ व्यवस्थित होते. योग्य कालीं सुलभ प्रसूति होअून बाळसेदार बालक जन्म घेते. यूटोनचे नियमित सेवन म्हणजे सुखी मातृपदाचें निश्चित आश्वासन होय.

यूटोन कल्पाचें वैशिष्ठ्यः—यूटोन हें द्रव औषध आहे. तें स्वादिष्ट, रुचकर, सुगंधी, हृद्य व लज्जतदार आहे. चार चमचे औषध समभाग पाण्यांतून सकाळी व सायंकाळी अगर वैद्यांच्या सूचनेनुसार घ्यावे.

पूयपरमा, अुपदंशादि विकारांनीं वंध्यत्व आलेले असल्यास अथवा गर्भस्राव वा गर्भपात होत असल्यास या विकारांची चिकित्सा केल्यावाचून यूटोन अुपयुक्त ठरणार नाहीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

फारच चांगला उपक्रम

औषधी शास्त्रावरील अभिप्राय

(वैद्यरत्न गो. आ. फडके, आयुर्वेदाचार्य, यांनीं लिहिलेल्या 'औषधी शास्त्र खंड १ व २ यावर आरोग्य मंदिर मासिकाच्या आगस्ट १९५१ च्या अंकांत वैद्यराज पु. वि. धामणकर यांनीं लिहिलेला अभिप्राय महत्वपूर्ण वाटल्यावरून येथें अुधृत करीत आहो. --संपादक.)

"पाश्चात्त्यांनीं वनस्पतींची कुटूंबें ठरवून तदनुसार वनस्पतींचे गट पाडले, तर, आयुर्वेदांत वनस्पतींचें वर्गीकरण त्यांचे कार्य भेदानुसार केलेलें आढळतें.

द्रव्याचे जीवन, द्रव्याचें स्वरूप आणि त्याची अुपयुक्तता अशा तीन प्रकारांनीं द्रव्य परिचय करून घ्यावयाचा असतो. अुपयुक्ततेचेहि दोन भाग पडतात. १ अन्य द्रव्यांवर व २ शरिरावर घडणारा परिणाम. शरीरावर घडणाऱ्या कार्याचें वर्णन तीन तऱ्हेचें आढळते. १ लक्षण २ अवयव ३ पदार्थ. ह्यापैकीं कशाचा तरी अवलंब करून तदनुरोधे द्रव्याचे गुणदोष वर्णितात. वैद्य फडकेशास्त्री यांनीं तिसरा पंथ स्वीकारून द्रव्याची माहिती रसवीर्य विपाकादिदृष्ट्या दोष, दूष्य व मल ह्या आयुर्वेदीय आधारावर सोपपत्तिक देण्याचा हा पुन्हा प्रयत्न केला आहे. अुपक्रम फारच चांगला साधला आहे. अशी पुस्तकें लिहिणारे विद्वान फारच विरळा. तेव्हां अशा लेखकांची पुस्तकें त्वरित विकत घेऊन त्यांना नवे लिखाण लिहिण्यास प्रवृत्त करणें अगर प्रोत्साहन देणें हें ग्राहकांचें सत्कार्यच ठरेल.

-- पु. वि. धामणकर

पदवीधर वैद्यांस विनंती

मॅट्रिक नंतर चार वर्षांचा अभ्यासक्रम घेऊन जे निरनिराळ्या आयुर्वेद महाविद्यालयांतून परीक्षा देऊन पास झालेले पदवीधर वैद्य प्रांतामध्यें व्यवसाय करीत आहेत त्यांना पदवीधर मतदार संघांत नांव नोंदण्याची सरकारनें मुभा द्यावयास पाहिजे होती. परंतु सरकारचा तसा विचार दिसत नाहीं. तरी या बाबतींत योग्य ती चळवळ करण्याचें म. प्रां. वैद्य मंडळानें ठरविलें आहे. तरी ज्यांचेवर अन्याय झाला आहे त्यांनीं मंडळाचे कचेरींत कळवावें.

कचेरीचा पत्ता—
महाराष्ट्र प्रांतीय वैद्यमंडळ
८७ मुगभाट मुंबई नं. ४

आ.
वैद्य बोरवणकर
मंत्री म. प्रा. वैद्यमंडळ

आयुर्वेदीय कारखानदार व वैद्य यांस लागणारीं औषधि द्रव्यें

दुर्मिळ अस्सल अष्टवर्ग, केशर, सर्व प्रकारची काष्ठौषधि, कस्तुरी, अंबर मौक्तिक (मोती खाका) शौक्तिक, शंख, शुद्ध शिलाजित, सुवर्णमाक्षिक, गोरोचन, प्रवाळ, पारा, गंधक, इ. सर्व प्रकारचीं खनिज व वनौषधि द्रव्यें घाऊक व किरकोळ प्रमाणांत पुरवितो,

गुलकंद आणि मोरावळा हे: ठोकबंद मिळतील.

अस्सल व खात्रीपूर्वक माल हेंच आमचें वैशिष्ट्य !!

विशेष माहितीसाठीं साप्ताहिक दरांचें छापील पत्रक मागवून घ्यावें.

शा. जाधवजी लल्लुभाई आणि कं.
२४५ काळबादेवी रोड, मुंबई २

टे. नं. ३१७९६ Telegrame- AYURVED.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अर्कशाला–वृत्त

विक्री:—अर्कशाळेचीं विक्री नियोजित कार्यक्रमानुसार चाललेली असून हे वर्षहि विक्रीच्या दृष्टीनें यशस्वी ठरेल अशी अपेक्षा आहे.

उत्पादन.— सप्टेंबर पासून बाळकडू, परिपाठादि काढा, खदिरारिष्ट, जीरकारिष्ट इ. कांहीं नवी औषधे बाजारांत येत आहेत. गेले दोन महिने 'शिशुजीवन' या पेटंट औषधांचा पुरवठा होऊ शकला नाहीं. पण सप्टेंबरच्या पंधरा तारखेपासून ते औषध बाजारांत येऊ शकेल असा विश्वास वाटतो.

लोकल सेल्फ गव्हर्नमेंट इन्स्टिटयूट कडून मान्यता:-- मुंबई सरकारच्या लोकल सेल्फ गव्हर्नमेंट इन्स्टिटयूट या स्थानिक स्वराज्य संस्थाशीं संबंधित असलेल्या संस्थेकडून अर्कशाळेस 'प्रमाणभूत आयुर्वेदीय ओषधी उत्पादन संस्था' म्हणून मान्यता मिळालेली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या दवाखान्यावर काम करणाऱ्या वैद्यानीं अर्कशाळेचे औषधी-विषयक वाङमय मागवून घ्यावे व अर्क शाळेच्या औषधांचा चिकित्सेंत अनुभव घ्यावा अशी विनंति करावीशी वाटते!

नवे विक्री केंद्र:—नागपंचमीच्या सुमुहूर्तावर पुण्यास *'आदर्श एजन्सी'* यांनी आपल्या व्यवसायास शुभारंभ केला असून त्यांनीं अर्क शाळेची सर्व औषधे विक्रीकरितां ठेवलेली आहेत. त्यांना अर्कशाळेने पुणें शहरांतील 'प्रमुख विक्रेते' म्हणून आनंदपूर्वक मान्यता दिलेली असून कंपनीच्या पुणें शहरांतील ग्राहकांना अर्कशाळेची औषधें आता सुलभरीत्या मिळण्याची सोय झाली आहे.

नवी लेबल्स:--आगस्ट पासून पुढील औषधें आकर्षक अशा नव्या लेबल्ससह बाजारांत आली आहेत. लोहीन. च्यवनप्राश अष्टवर्ग युक्त. द्राक्षाकुमारी. गंधर्वहरीतकी. स्तन्यशोधन.

भेटी:--आगस्ट महिन्यांत मुबईचे श्री. ज. ग. देवकुळे यांनीं कंपनीस भेट दिली. श्री. देवकुळे हे 'नॅशनल आर्ट सर्व्हिस या व्यापारी कलाकेंद्राचे संचालक व 'मकरंद साहित्य' या प्रकाशनाचे संपादक आहेत. त्यांनीं आपल्या भेटींत कंपनीच्या कार्यकर्त्यांना कांहीं अुपयुक्त सूचना केल्या. लेबर ऑफिसर श्री. पोंक्षे यानीं कंपनीस भेट देऊन समाधान व्यक्त केले. दुधनी येथील वैद्य श्री वा. ब. फडके यांनीं कंपनीस याच महिन्यांत भेट दिली. श्री. फडके हे गेली तीस वर्षे वैद्यकीय व्यवसाय करीत असून आर्यांग्ल वैद्यक महाविद्यालयाच्या आरंभ काळांतले विद्यार्थी अहेत. भेटीच्या वेळीं झालेल्या संभाषणांत त्यांनीं अनेक वनस्पतींचे चिकित्सेंतील नवे अुपयोग सांगितले. त्यांनीं आपले चिकित्सेंतील अनुभव ग्रथित करुन त्यांचा लाभ आयुर्मीमांसेस देण्याविषयीं कार्यकर्त्यांनीं विनंती केली.

नवे भागीदार:--अर्कशाला ही वैद्य, विक्रेते व आयुर्वेद सेवक यांची एक प्रकारची सहकारी संस्थाच असून तीत कोणाचेहि आर्थिक हितसंबंध गुंतलेले नाहींत या भूमिकेमुळें कंपनीच्या विक्रेत्यांनीं व वैद्यांनीं कंपनीचे भागीदार व्हावे अशी विनंति यापूर्वी आयुर्मीमासेत करण्यांत आली होती. या महिन्यांत हैद्राबाद राज्यांतील श्री. **रमण एकनाथ राखे**, अरविंद औषधालय अुमरी, भुसावळचे श्री. ***भालचंद्र रामचंद्र भावे***, कमिशन एजंट आणि श्री. ***श्री. मो. शहापूरकर*** नेवासे यांनीं भागीदारांसाठीं अर्ज धाडले आहेत. त्यांचें आम्ही अभिनंदन करतो.

WILICO
STRONGHOLD OF PROTECTION

आजचा बेत उद्यावर ....

टाकू नका

आज विमा घेण्याचा बेत उद्यावर टाकणें हिताचें नाहीं, कारण आजचे वय व प्रकृती पुढें आहे अशीच राहील याची खात्री नाहीं.

आपल्या गरजेनुरूप

– वेस्टर्न इंडिया –

विमा कंपनीची

पॉलिसी घेऊन आपल्या कुटुंबाची भरपूर व्यवस्था करून ठेवा. नाविन्यपूर्ण अनेक योजना व माफक हप्त्याचे दर. सविस्तर माहिती मागवा.

–: मॅनेजर :–

वेस्टर्न इंडिया लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि.
सातारा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अर्कशाला विशेषांक

जुलै १९५१ च्या अंकापासून आयुर्मीमांसा मासिकाचे अंक अर्कशालेच्या औषध-विक्रेत्याना व वैद्य आणि डॉक्टर ग्राहकांना सप्रेम भेटीदाखल धाडण्यांत येत आहेत. आयुर्मीमांसेंतून प्रसिद्ध होणाऱ्या विचारगर्भ शास्त्रीय वाङ्मयाचा प्रचार व प्रसार व्हावा हा हेतू या 'सप्रेम भेट' योजनेच्या मुळाशीं आहे. त्याबरोबरच आयुर्वेदीय चिकित्सा पद्धती व आयुर्वेदीय औषधें याकडे व्यावसायिकांचे आणि ग्राहकांचे लक्ष वेधावे हाहि एक उपहेतू आहे. वैद्यक व्यवसायी व सामान्य जनता याना जोडणारे दुवे म्हणून औषध विक्रेत्यांचें या दृष्टीनें विशेष महत्व आहे. त्यांच्या सक्रीय प्रेरणेनें आयुर्वेदीय चिकित्सा पद्धती व औषधे यांचा जनतेंत सुलभ रीतीनें प्रचार होऊ शकतो.

आयुर्वेदीय अर्कशालेनें आयुर्वेदाच्या औषधी निर्मिती व प्रसाराच्या क्षेत्रांत गेली पंचवीस वर्षे यथाशक्ति कार्य केले आहे. तिला या कार्यात ज्यानीं सहयोग दिला त्यांचा कृतज्ञतापूर्वक गौरव करावा व या सेवेचा इतिहास जनतेपुढें नम्रतापूर्वक सादर करावा या हेतूनें आयुर्मीमांसेचा अर्कशाला विशेषांक प्रसिद्ध करावयाचा आहे.

अर्कशाला–विशेषांकाची योजना

या अंकांत पुढील प्रकरणांचा स्थूलमानानें समावेश होणार आहे.

(१) आयुर्वेदीय औषधी–निर्मिती : शास्त्र व व्यवसाय
(२) आयुर्वेदीय औषधींचे भवितव्य : चर्चा
(३) अर्कशालेचा इतिहास
(४) अर्कशालेचे सहकारी : वैद्य, विक्रेते, मार्गदर्शक यांचा परिचय

या चौथ्या प्रकरणाची पूर्तता होण्यासाठीं अर्कशाळेचे वैद्यग्राहक व विक्रेते यांनीं आपला संक्षिप्त परिचय धाडावा अशी विनंति आहे.

पहिल्या व दुसऱ्या प्रकरणांतील विषयाना अनुलक्षून येणाऱ्या लेखांचे स्वागत केलें जाईल. अर्कशालेचे समव्यवसायी कारखानदार, आयुर्वेद हितैषी विचारवंत व औषधीकरण शास्त्रज्ञ यांच्याकडून लिखाणाची अपेक्षा आहे.

या अंकांत प्रसिद्ध होणारा सर्व मजकूर १५ सप्टेंबर अखेर आमच्या हातीं येणें आवश्यक आहे.

कार्यकारी संपादक
आयुर्मीमांसा मासिक.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शेअर विक्रीचा शुभारंभ

आयुर्वेदीय अर्कशाळेच्या शेअर–विक्री बाबत आयुर्मीमांसेंत केलेल्या निवेदनास अनुसरून वैद्य व औषध–विक्रेते अर्कशाळेचे भागीदार होत आहेत.

या अंकात 'अर्कशाला वृत्त' या सदरांत शेअर अर्ज धाडणाऱ्या विक्रेत्यांचा कृतज्ञता–पूर्वक उल्लेख करण्यांत आलेला आहे.

अर्कशाळेच्या पंचविसाव्या वर्षपूर्तिनिमित्त येत्या विजया-दशमीस रौप्य महोत्सव साजरा होणार आहे. तत्पूर्वी वैद्य व विक्रेते यांनीं बहुसंख्येनें अर्कशालेचे भागीदार व्हावे अशी विनंति आहे.

अर्कशाळेची वैशिष्ठ्यें

- अर्कशाला ही मॅनेजिंग एजन्सीच्या व्यवस्थेखाली नसून संचालक मंडळच तिचें काम पाहाते.
- संचालक मंडळ प्रारंभापासून व सध्याहि विनावेतन काम करीत आहे.
- अर्कशाळेची विक्री प्रतिवर्षी वाढत असून १९४८ च्या मानानें १९५० सालची विक्री ६० टक्क्यांनीं जास्त आहे.
- १९५० सालीं कंपनीनें भागीदारांना नफा वाटलेला असून तो यापुढें प्रतिवर्षी वाटता येईल अशी संचालकांना उमेद आहे.

— पत्रव्यवहार करा —

—सेक्रेटरी आयुर्वेदीय अर्कशाला लि. सातारा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अर्कशाला-निर्मिती

अर्कशाला निर्मित

यूटोन

गर्भपोषक
आणि
गर्भरक्षक टॉनिक

मातृपदाच्या
प्राप्तीपूर्वी
एकमेव औषध योजना

गरोदरपणीं होणाऱ्या वांत्या, डोकेदुखी वगैरे वेदना दूर होऊन प्रकृति सुधारते. गर्भस्राव किंवा गर्भपात यांचा संभव निश्चितपणें टळतो. सर्व काळांत प्रकृती उत्तम रहाते.

आयुर्वेदीय अर्कशाला लि., सातारा

स्तन्यशोधन

मातेच्या दुधांतील दोष नाहीसे करून शुध्द दुधाची वाढ करते

...या औषधानें मातेची प्रकृती सुधारून दूध निर्दोष होतें. साहजिकच बालकाला मानवतें.

अर्कशाला निर्मिती

आयुर्वेदीय अर्कशाला लिमिटेड सातारा

मातृपदाच्या
प्राप्तीनंतर
आयुर्वेदाचा एकमेव आदेश

हें मासिक श्री. *विश्वनाथ लक्ष्मण आगाशे* यांनीं *आनंद प्रिंटिंग प्रेस, सातारा लि.*, येथें छापलें व आर्यांग्ल वैद्यक महाविद्यालय, सातारा येथें प्रसिद्ध केलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद प्रसारक मंडळ, सातारा या संस्थेचें पुरस्कृत मासिक

आयुर्मीमांसा

प्रमुख संपादक : वैद्यरत्न गो. आ. फडके, आयुर्वेदाचार्य.

कार्यकारी संपादक : ब. ल. वष्ट, आयुर्वेद विशारद.

ऑक्टोबर १९५१

वार्षिक वर्गणी ३ रुपये

किरकोळ अंक ८ आणे

या अंकांतील विषय–

महायोगराज गुग्गुळ— नृ. ना. बागेवाडीकर.

संधान-विधी— पु. वि. धामणकर.

सुकामेवा— दत्तात्रेयशास्त्री जळूकर.

वाचकांचा पत्रव्यवहार.

महाविद्यालय वार्ता : आयुर्वेद वार्ता इ.

आयुर्मीमांसेच्या सप्रेम भेट योजनेचें सर्वत्र स्वागत होत आहे. ज्या वैद्य व विक्रेते यांना सप्रेम भेटीदाखल अंक धाडला जातो त्यांच्यापैकीं ज्यांना शक्य असेल त्यांनीं आयुर्मीमांसेची वार्षिक वर्गणी धाडून सहकार्य करावे, अशी विनंति आहे. ज्यांच्याकडून वर्गण्या येतील त्यांना आयुर्मीमांसेमधून नामोल्लेखपूर्वक साभार पोंच दिली जाईल. आयुर्वेद सेवेच्या या कार्यांत सर्वांचे सहकार्य लाभेल अशी आशा आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेदाच्या क्षेत्रांत अद्वितीय

अशा शक्तिशाली

अरविंद आयुर्वेदिक इन्जेक्शन्स

चा उपयोग करून रोग्यांना शीघ्र निरोगी करा व यश मिळवा. शक्ति व शुद्धता याबद्दल पूर्ण गॅरंटी दिली जाते. सूचिपत्र मागवा—

सचित्र आयुर्वेदीक इंजेक्शन चिकित्सा—

मूल्य ३ रु. पोस्ट खर्च १० आं.

व्यवस्थापकः— **अरविंद केमिकल वर्क्स**

छिंदवाडा (सी. पी.)

★

अपालोज आयुर्वेदीक इंजेक्शन्स

अद्यावत प्रयोगसिद्ध कल्प

आद्य आयुर्वेदीय संस्था म्हणूनच

' प्राइड ऑफ इंडिया ' हें नामाभिमान या संस्थेला योग्य ठरते. आमची इंजेक्शन्स या देशांत व परदेशांत विकली जातात आणि आंग्ल वैद्य व आयुर्वेदीयांमध्यें तीं सारखीच लोकप्रिय झालीं आहेत. आमच्या ट्रेनिंग इन्स्टिटयूटमध्यें वैद्यांना इंजेक्शनचें शिक्षण दिले जाते. विशेष माहितीसाठीं लिहा व एजन्सी नियम आणि मोफत कॅटलाग मिळवा.

दि अपोलो फार्मास्युटिकल वर्क्स लि.

प्रतापगंज वडोदा.

आयुर्वेदीय कारखानदार व वैद्य यांस लागणारीं औषधि द्रव्यें

दुर्मिळ अस्सल अष्टवर्ग, केशर, सर्व प्रकारची काष्ठौषधि, कस्तुरी, अंबर मौक्तिक (मोती खाका) शौक्तिक, शंख, शुद्ध शिलाजित, सुवर्णमाक्षिक, गोरोचन, प्रवाळ, पारा, गंधक, इ. सर्व प्रकारचीं खनिज व वनौषधि द्रव्यें घाऊक व किरकोळ प्रमाणांत पुरवितो,

गुलकंद आणि मोरावळा हे ठोकबंद मिळतील.

अस्सल व खात्रीपूर्वक माल हेंच आमचें वैशिष्ट्य !!

विशेष माहितीसाठीं साप्ताहिक दरांचें छापील पत्रक मागवून घ्यावें.

शा. जाधवजी लल्लुभाई आणि कं.

२४५ काळबादेवी रोड, मुंबई २

टे. नं. ३१७९६ Teiegrame- **AYURVED.**

दमा हटतो

तो कायमचाच. पुरोहित श्वासहारी हें एकच २८ वर्षे सतत प्रख्यात व अनुभविक असें डॉक्टरी औषध आहे कीं, जें तात्काळ आराम देऊन आस्ते आस्ते दमा बरा करतें. औषध घेण्यास सुरुवात करतांच कफ सुटतो, धांप कमी होते, पचनक्रिया सुधारते व फुप्फुसें मजबूत होऊन कांहीं कालानंतर दमा निखालस बरा झाल्याचा अनुभव येतो. रु. ३॥, ६ व १० किमतीच्या पॅकिंग मधून सगळीकडे विकत मिळतें अगर कारखानदार

डॉ. पुरोहित फार्मसी, कोल्हापूर (एस. एम. सी.)

पुरोहित श्वासहारी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद प्रसारक मंडळी सातारा या संस्थेचें मासिक

आ यु र्मी मां सा

संचालक : आयुर्वेदीय अर्कशाला लि. सातारा

वर्ष १४ वें] ऑक्टोबर १९५१ [अंक १० वा

वार्षिक वर्गणी ३ रुपये : किरकोळ अंक ८ आणे

कोणत्याहि महिन्यापासून वर्गणीदार होता येते.

* आयुर्मीमांसेंतील लेखांतून व्यक्त होणारी मतें ही त्या त्या लेखकांची मानली जातील. संपादक त्यांशीं नेहमींच सहमत असतात असें नाहीं.

* आयुर्मीमांसेंत प्रसिद्ध होणाऱ्या लिखाणाविषयींचें सर्व हक्क संस्थेच्या स्वाधीन आहेत.

* वर्गणी ज्या अंकाअखेर संपत असेल त्या अंका-नंतर त्या त्या वर्गणीदारांना पुढील वर्षाची वर्गणी पाठविण्याविषयीं सूचनापत्रें जातात. ज्यांची वर्गणी संपली आहे अशा ग्राहकांनीं हें पत्र मिळतांच म. ऑ. नें वर्गणी पाठवावी. म. ऑ. आली नाहीं अगर अंक नको असल्याबद्दलहि पत्र आलें नाहीं तर त्या वर्गणीदारांना पुढील अंक व्ही. पी. नें पाठविला जातो.

* अंक मिळाला नसल्याची तक्रार त्या महिन्याच्या दहा तारखेच्या आंत करावी. म्हणजे शक्य असल्यास दुसरा अंक पाठविला जातो.

* सर्व पत्रव्यवहार ' व्यवस्थापक आयुर्मीमांसा, अर्कशाळा बिल्डिंग, सातारा ' या पत्त्यावरच करावा.

अर्कशाला-विशेषांक

आयुर्वेदीय अर्कशालेस येत्या विजयादशमीस पंचवीस वर्षें पुरी होत आहेत. कंपनीच्या इतिहासांतील या संस्मरणीय प्रसंगीं अर्कशाला-विशेषांक प्रसिद्ध करण्याची योजना आयुर्मीमांसेनें आखली आहे. वस्तुतः हा अंक विजयादशमीसच प्रसिद्ध होणे योग्य. पण अर्कशाळेचा रौप्य महोत्सव या वर्षाचें अखेरीस डिसेंबर महिन्यांत साजरा करण्याचा निर्णय घेण्यांत आलेला असल्यानें हा विशेषांक त्यानंतर म्हणजे बहुधा जानेवारीस प्रसिद्ध होईल.

अर्कशालेचे संस्थापक व सातारा येथील आयुर्वेद प्रसारक मंडळीचे प्रमुख कार्यकर्ते डॉ. मो. ना. आगाशे यांच्या १९४९ सालच्या प्रारंभी साजऱ्या झालेल्या षष्ठ्यब्दिपूर्ति समारंभाचे वेळी प्रकट करण्यांत आलेला ' डॉ. आगाशे रुग्णालय ' उभारण्याचा संकल्प मूर्त स्वरूप घेत आहे. या रुग्णालयाची इमारत आता पुरी होत आलेली असून तिचा उद्घाटन समारंभ या वर्षाच्या डिसेंबर महिन्यांत होणार आहे. अर्कशाळेचा रौप्य-महोत्सवहि त्याचवेळीं साजरा करण्यांत औचित्य आहे. कारण अर्कशालेच्या संस्थापकाच्या आयुर्वेद-सेवेचें प्रतीक म्हणून उभारल्या जाणाऱ्या रुग्णालयाचें उद्घाटन म्हणजे सेवेच्या एका नव्या दालनाचा प्रारंभच ! या प्रारंभक्षणीं डॉ. आगाशे यांच्या प्रेरणेनें आणि पुण्याईनें पंचवीस वर्षें चाललेल्या अर्कशाळेच्या कार्याचा अहवाल जनतेला सादर करण्यांत इतिहासाची दोन टोकें एकत्र करण्याचें श्रेय मिळणार आहे.

या विशेषांकांत अर्कशाळेचे विक्रेते व वैद्य यांच्या परिचयाचें जे प्रकरण समाविष्ट व्हावयाचे आहे त्याकरितां माहिती हाती येत आहे. विक्रेत्यांनीं ही वाढलेली मुदत लक्षांत घेऊन माहिती धाडावी अशी विनंति आहे.

— कार्यकारी संपादक

संसार में सर्व प्रथम आयुर्वेदिक इन्जेक्शन के आविष्कर्ता और निर्माणकर्ता
जी. ए. मिश्रा आयुर्वेदिक फार्मेसी (रजिस्टर्ड) झांसी के
बने हुए
मिश्रा आयुर्वेदिक इन्जेक्शन्स
प्रयोग कर निरोग बने
हमारे यहां इन्जेक्शन लगाने की शिक्षा प्राप्त करने के लिये नियम सूची मंगालें।

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

छोट्या जाहिराती

वैद्य, डॉक्टर व औषध विक्रेते यांच्या माहितीकरितां

आयुर्वेदीय औषधी-निर्मात्यांची सूची

(हें सदर प्रत्येक अंकांत नियमितपणें प्रसिद्ध होते भारतांतील विशेषतः मुम्बई राज्यांतील सर्व आयुर्वेदीय औषधी-निर्मात्यांचा या सदराद्वारे वैद्य, डॉक्टर व विक्रेते आणि ग्राहक यांना सातत्यानें परिचय होत असतो. एक प्रकारे "Buyer's Guide" हें या सूचीचें स्वरूप असल्यानें या सदराचें महत्त्व जाहिरातदारांना वेगळें सांगावयास नको.

ज्या जाहिरातदारांच्या जाहिराती इतरत्र या अंकांत वर्षाच्या करारानें घेण्यांत आलेल्या आहेत त्यांची माहिती या सूचींत *विनासूल्य* छापली जाते. केवळ सूचीसाठीं मजकूर पाठविणाऱ्या जाहिरातदारांनीं वर्षाचे करारानें जाहिरात दिली पाहिजे. वर्षाचा दर फक्त तीस रुपये आहे. ही रक्कम आगाऊ द्यावी लागेल. मजकूर जास्तीत जास्त चार ओळी असावा.)

श्रीपाद फार्मसी, पेण.

विविध प्रकाराच्या औषधी वनस्पतींचें विक्रेते. महाराष्ट्रांतील आयुर्वेदीय कारखान्यांना माल पुरविण्यांत येतो. वैद्य व गाहकांनीं माहिती मागवावी. वाकेरीभाते खात्रीनें मिळते.

शा जादवजी लल्लूभाई आणि कं०

सर्व प्रकारची काष्ठौषधि व औषधी निर्मितीसाठीं लागणारी कच्ची द्रव्यें यांचे विक्रेते. २४५ काळबादेवी रोड मुंबई २.

जी. ए. मिश्रा आयुर्वेदिक फार्मसी, झांशी. (यू. पी.)

विविध आयुर्वेदीय इंजेक्शन्सचे निर्माते. इंजेक्शनविषयक "सचित्र आयुर्वेदिक इंजेक्शन विज्ञान" या पुस्तकाचे प्रकाशक.

अरविंद केमिकल वर्क्स, छिंदवाडा (मध्य प्रदेश)

विविध आयुर्वेदीय इंजेक्शन्सचे निर्माते. सचित्र आयुर्वेदिक इंजेक्शनचिकित्सा (मूल्य ३ रु.) या पुस्तकाचे प्रकाशक.

डॉ. पुरोहित फार्मसी, कोल्हापूर.

पुरोहित श्वासहारी, शोधना इ. विख्यात औषधी निर्माते.

आयुर्वेदिक धन्वतरी फार्मसी अहमदनगर

सर्व प्रकारची आयुर्वेदीय औषधें शास्त्रोक्त पद्धतीनें तज्ञ वैद्यांच्या देखरेखीखालीं तयार केली जातात.

ऊंझा फार्मसी लि. उंझा (उ. गुजराथ)

छप्पन्न वर्षांपासून चालू असलेली संस्था. शास्त्रोक्त व पेटंट औषधे तयार केली जातात.

अपोलो फार्मास्युटिकल वर्क्स लि.,

विविध आयुर्वेदीय इंजेक्शन्सचे निर्माते. वैद्याना इंजेक्शनचे शिक्षण दिले जाते. पत्रव्यवहार— प्रतापगंज बडोदा

आयुर्वेदीय अर्कशाला लि., सातारा.

सर्व प्रकारची आयुर्वेदीय औषधें तयार केली जातात. आयुर्वेद प्रसारक मंडळी या संस्थेच्या रुग्णालयांत ती पारखली जातात. महाराष्ट्र, कर्नाटक, मध्यप्रदेश, हैद्राबाद या भागांत सर्वत्र विक्रेते आहेत.

या सदरांत आपली जाहिरात अवश्य द्या.

हे सदर औषध विक्रेत्यांकडून वाचले जाते. ते एजन्सीकरितां पत्रव्यवहार करतात. आणि त्यांतून नवीं विक्रीकेंद्रे सुरू होतात.

हें सदर अवश्य वाचा.
तें उपयुक्त आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भारतीय-आरोग्यविज्ञान

सुकामेवा

लेखक—वैद्य दत्तात्रेयशास्त्री जळूकर

मागील अंकांत सुक्यामेव्याचे कांहीं पदार्थ वर्णिण्यांत आले होते. या अंकांत उरलेले पदार्थ दिले आहेत.

६ **खोबरें**—मस्तकाच्या कवटीच्या आंतील मेंदूला शांतता प्राप्त होऊन निवांत झोंपलेल्या मनुष्याला जबरदस्तीनें इच्छेविरूद्ध जागवून त्याच्या शांत मेंदूच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडविल्या म्हणजे "माझ्या झोंपेचें खोबरें करून टाकलें" असें तो म्हणत असल्याचें आपण कित्येक वेळां ऐकलें असेल. नारळाच्या आंतील खोबऱ्याचा गोटा वरच्या कवटीच्या आंतच सुरक्षित राखून 'श्रीफळ' म्हणून म्हणजेच भाग्य, लक्ष्मी, पुरुषार्थाचें, बुद्धिमतेचें चिन्ह म्हणून प्रतीक या दृष्टीनें देव-ब्राह्मण व थोरां मोठ्यांचा सत्कार करतांना अर्पण केला जातो. यांतील तत्व खोबरें हें बुद्धिवर्धक अमूल्य रत्न असल्यामुळें जसें त्याला कठिण कवचांत जतन करून ठेवण्यांत परमेश्वरानें कारागिरी व्यक्त केली आहे तेंच कौशल्य शक्तीपेक्षांहि महत्त्वाचें कार्य करणारें बुद्धि सामर्थ्य बाळगणारी 'मेंदू' ही वस्तु सुद्धां कठिण कवचीच्या पेटाऱ्यांतच सुरक्षित ठेवून व्यक्त केलें आहे हें होय. सांगण्याचें तात्पर्य हें कीं बुद्धीचीं कामें करणारांना खोबरें खाणें फार हितावह आहे. खोबऱ्याचा सतत उपयोग करणाऱ्या कोंकणांतील बहुतांश व्यक्ति बुद्धिमान् असतात असें आढळून येतें. कवचीचीं फळें हीं बहुतेक बुद्धिवर्धक होत. समुद्रकांठीं जसा नारळ किंवा खोबरें त्याचप्रमाणें इतरत्र बदाम उपयुक्त होत. खोबरें हें उत्तम वीर्यवर्धक व पुष्टिकारकहि आहे. मलावष्टंभक धर्म त्यांत असल्यामुळें शौचाचा उपद्रव असणारांनीं सुक्या खोबऱ्याचा तुकडा चावून खावा; वारंवार शौचास जावेंसें वाटणार नाहीं व अधिक शौच झाल्यामुळें आलेली क्षीणता नष्ट होईल. स्निग्ध गुणामुळें सहजच वातनाशक धर्म यांत आहे व जेवतांना चटणीमध्यें खोबऱ्याचा समावेश, खिचडीवर खोबऱ्याचा कीस घालण्याची पद्धति, कढी-आमटी-हरबऱ्याच्या पिठाच्या पाटवड्या हे, मध्यें खोबऱ्याचे तुकडे व कीस घालण्याचा प्रघात यासाठींच आहे. वातामुळें शरीर हलतें. कांपतें, अशांनीं लसूण-खोबऱ्याची चटणी अवश्य खावी. शिवाय खजुराच्या वर्णनांत सांगितल्याप्रमाणें हरभऱ्याची डाळ-खारीक-खोबरें हा खुराक व्यायामप्रेमी, गरीब पण कृश तरुणांनीं अवश्य घ्यावा.

गोडंबी— सुक्या मेव्यांत सरसरकट वापरण्याची ही वस्तु नव्हे. खाण्यास बऱ्या असल्या तरी फार उष्ण असल्यामुळे बेतानेंच खाव्यात. विशेषतः हिवाळ्यांत आणि कफ विकृतींतच ह्यांचा उपयोग करणें बरें. फुटाणें, गोडंब्या, गूळ, व तूप एकत्र करून लाडू २।२ तोळे वजनांचे करून खावेत. पार्श्वशूल किंवा वातानें होणाऱ्या चमका लवकर कमी होतात. बाळंतिणीला डिंकाचे व मेथ्याचे लाडू करतांना त्यांतहि गोडंब्या घालतात. यांत त्यांचा वातनाशक धर्मच लक्षांत घेतला जातो. एवंच गोडंबी हा सुकामेवा शोकानें खाण्याचा नव्हे. औषध म्हणूनच उपयोग करणें बरें.

चारोळी— ह्यां सुद्धां मेवा म्हणून नित्य खाण्याच्या नव्हेत. प्रघातहि नाहीं. तथापि रुचकर, बलकर व पित्तनाशक आहेत. आंग खाजवून त्यावर गांधी येतात व तें सुजतें अशा शीतपित्तावर मूठभर चारोळ्या व तेवढीच साखर एकत्र करून खाण्यानें फायदा होतो. बासुदी करतांना व पौष्टिक पाकांमध्यें चारोळ्या घालण्याचा प्रघात आहे. बदामाचा प्रतिनिधि म्हणून यांचा उपयोग होतो.

जर्दाळू— हें मूळचें आपल्या कडील नव्हे. चीनमध्यें याचे वृक्ष होतात, पंजाब व काश्मिरांतहि याची लागवड होऊं लागली आहे. मोठ्यां सुपारी एवढीं मऊ त्वचेचीं हीं फळें असतात. हीं अत्यंत मधुर असतात त्वचा खाल्यावर आंत पुन्हा लहान बिया निघतात. ते बदाम असतात. असा एकाच फळांत हा द्विविध मेवा असतो.

पिस्ते— कडुनिंबाच्या बीजांसारखीं हीं फळें अफगणिस्तान अिराण, सोरियांतून इकडे येतात रुचीला गोड नव्हे पण स्वादिष्ट कांजु, बदाम, शेंगदाण्यासारखा हा मेवा आहे. हें श्रीमंतांचें चैनीचें खाद्य आहे. आपल्याकडें बरेंच महाग असतें. बदाम, काजू, अक्रोड, खिसमिस, खडिसाखरे बरोबरच मेवा म्हणून पिस्ते सुद्धां वापरले जातांत. बहुतेक पौष्टिक पाकांत पिस्ते वापरतात. मिठाईचे दुकानांत मिठाईचे बर्फी, पेढें, दराबा वगैरेंच्या परातीं भरून ठेवल्यां असतां वरून चिकटलेल्या हिरव्या डाळिंब्या दिसतात तेच पिस्त्याचे तुकडे होत.

बदाम—गोड व कडू असे २ प्रकार बदामांत आहेत. हिंदुस्थानांत बदामाचीं झाडें फळत नाहींत. युरोप व तुर्क-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्तानांतून बदाम आपलेकडे येतात. पांडुर व ढिसूळ कवच युक्त बदामांना कागदी बदाम म्हणतात व त्यांत सहसा कडू बदाम आढळत नांहींत. हीं कवच युक्त फळेंच असल्या- मुळें खोबरे किंवा नारळाप्रमाणें बदामसुद्धां मेंदूचें कार्य व्यवस्थित करविणारे आहेत. बुद्धिजीवी लोकांनीं भोजनोत्तर बदाम ३।४ तासांनीं खाणें किंवा नित्य प्रातःकाळीं बदामाचा शिरा अथवा लापशी करून घेणें चांगलें.हे स्नेहन व रसधातूवर कार्य करणारे असल्यामुळें पुरुषांना शुक्रवर्धक म्हणून, बाळंतिणीना स्तन्यजनक म्हणजे दूध वाढविण्यासाठीं उपयुक्त होतात. हिवाळ्यांत पौष्टिक म्हणून बदामपाक आणि बाळंतिणीच्यासाठीं करावयाच्या लाडवांत बदाम प्रमुख असतात हें सांगणें नकोच. बदाम नुसते खाण्यापेक्षां रात्रभर गरम पाण्यांत भिजवून सकाळीं बिया खोलून नतर उपयोगांत आणावेत. अशा कृतीनें बदामांत नवीनच पचनक्रियेस उत्तेजक असें एक सत्व तयार होतें त्याचा चांगला उपयोग होतो. थोडे अवष्टंभक आहेत.

शेंगदाणे—गावराणी व जपानी भुइमुगाच्या शेंगा सर्वांच्या परिचयांच्या आहेत. अगदीं गरिबांना सुद्धां इच्छेनुसार खातां येण्या जोगा हा एक सुका मेवाच आहे. फार बदाम हा श्रीमंतांचा तसाच शेंगदाणा हा गरिबाना पौष्टीक मेवा म्हणून ईश्वरानें निर्माण केला आहे म्हटलें तरी चालेल. जेवणानंतर नित्य स्वतःच्या मूठभर गांवराणी भुइमुगाच्या शेंगा भाजून त्याचे दाणें चांगले चावून खाणाराला शौचशुद्धी विषयीं कधींच कुरकुरण्याचें कारण पडणार नाहीं. जपानी शेंगदाणा तेल अधिक निघण्याचे दृष्टीनें उपयुक्त आहे. परंतु तो ऊष्ण असल्यानें मेंदूची कामें करून बदामाचीं उणीव भरून काढण्या- साठीं अशक्त लोकांनीं गावराणी भुइमुगांचे दाणेच खावेत हें बरें!

सुकेळीं—वसई तालुक्यांत आगाशीं येथें सुकेळीं—सुकीं केळीं—चांगली होतात हें लहानपणी भूगोल विषय शिकवितांना पाठ केलें होते. परंतु वैद्यक शिक्षणाचे सहाध्यायी आगाशीचे वैद्य जोगळेकर यांचेकडे मित्रप्रेमास्तव आगाशी येथें जावें लागेल व सुकेळ्यांसाठीं प्रसिद्ध असलेला हा गांव प्रत्यक्ष पाहाण्याचा योग येईल अशी त्यावेळीं कल्पना सुद्धां नव्हती. अर्थात खानदेशांत कोकणचे पाहुणे आल्यावर परत जातांना जसे ते इकडचा मेवा म्हणून मेहरुणचीं बोरें, पेरु कि… प्रसिद्ध गावठी आंबे थोडे फार बरोबर नेणारच तसे… खानदेशचा पाहुणा कोंकणांत गेल्यावर त्याला पाहुण्यांस… मिळालेले असोले नारळ, पोफळें, फणस, ताडगोळे आणि… आगाशी सारख्या ठिकाणीं प्रसिद्ध असलेलीं सुकेळीं बरोबर… आणणारच! वादी सारख्या चपटचां आकाराची साधारण… अशीं हीं सुकेळीं आगाशींला ठराविक वजनाचे केळ्यांचे… सोपटांत गुंडाळलेले पुडे तयार विकत मिळतात. सामान्य… ताज्या केळ्याहून अगदीच निराळी पण खूप गोड चव असे… यांची यांची मोठमोठाली तारांचीं जाळीं करून त्यांत सूर्य… प्रकाशांत मोठ्या बंदोबस्तानें व कौशल्यानें ही केळी सुकवि… जातात. ‘ राजेळी ’ नांवाच्या केळ्यांची एक जातच … कामी उपयोगांत आणली जाते. अशी माहिती मिळाल्याचें… आठवतें. साधारणतः फाल्गुन ते ज्येष्ठ महिन्यांत ता… केळ्यांचा हंगाम कमी होतो. अशा वेळीं व एरव्ही ति… प्रहरचे मधले खाणें म्हणून त्या सुकेळ्यांचा खुराक उपयो… आणला जातो. हीं सुकेळीं म्हणजे ताज्या केळ्यांचें जणूं … सत्वच! अर्थातच थोड्याप्रमाणांत तुष्टि व पुष्टि देणारें खाद्य होत असल्यास नवल नाहीं.

प्रिय वाचक ! हा सुकामेवा यद्यपि आपणांस… नित्य कांहीं उपलब्ध होऊं शकणार नाहीं ही लेखकास स्वा… भवानेंच जाणीव आहे. तथापि विवेचन हें आबाल… तसेच गरीब श्रीमंत स्त्रीपुरुषांसाठीं असल्यानें मीमांसे… वाचकवर्गांत काय सगळेच दरिद्रीनारायण थोडेच आहे… जे थोडे कां होईना लक्ष्मीपुत्र असतील त्यांनाहि त्यां… स्वास्थ्यासाठीं हा सुकामेवा आवश्यक आहेच कीं ! त्यांतू… कांहीं वस्तु मध्यमवर्ग तर कांहीं अगदीं गरिबांना … यथावसर उपयोगांत आणणें सोयीचें होण्याचाहि सं… मुळींच नाहीं असें तरी कसें म्हणतां येईल ? तरी … तऱ्हेनें हा सुकामेवा एकदांचा आपण सर्वांनीं सध्यां नि… वांचून समजून घेऊन पचनी पाडला म्हणजे हें लेख… सुरू केलेलें हें ‘ फलाहार प्रकरण ’ संपलें असें समज… अडचण नाहीं आतां यापुढें अधिक महत्वाच्या ‘ पक्वा… विषयक विभागाचें ताट आपणापुढें विस्तारायचें … सेवनाची तयारी असू द्या म्हटलं !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

महाविद्यालय–वार्ता

गणेशोत्सव

प्रतिवर्षाप्रमाणें यंदाहि आयर्गिल वैद्यक महाविद्यालयांत गणेशोत्सव थाटानें साजरा झाला. सर्व विद्यार्थ्यांनीं या उत्सवांत समरसतेनें भाग घेऊन नवे आणि आकर्षक कार्यक्रम योजले व पार पाडले.

दि. ५।९।५१ ला सकाळीं 'श्री' ची स्थापना झाली. यंदाहि साताऱ्यांतील कुशल व नामवंत मूर्तिकार श्री. निळूभाऊ भावे यांनीं श्री ची सुंदर मूर्ति भेट म्हणून दिलेली होती. रोषणाईचें काम प्रामुख्यानें श्री. देशपांडे यांनीं आपल्याकडे घेतलेलें होते. त्यांना श्री. चव्हाण यांनीं सहाय्य केले. श्री. देशपांडे हे सध्याच्या विद्यार्थी वर्गातले हौशी आणि कुशल चित्रकार आहेत. यंदा ते चौथ्या वर्षांत असल्यामुळें त्यांनीं आपलें सर्व नैपुण्य रोषणाईंत व्यक्त केलें होते.

व्याख्यानें–प्रवचनें

दि. ६ ला संध्याकाळीं पं. यज्ञेश्वर शास्त्री केळकर यांचें " पिंडी तें ब्रह्मांडी " या विषयावर प्रवचन झालें. बाह्य सृष्टी आणि शरीर यामधील व्यापारांचे साम्य त्यांनी या प्रवचनांत समर्पकपणे प्रतिपादलें. दि. ८ ला पं. महादेव शास्त्री जोशीं, पुणे यांचे गणेश महिमा या विषयावर व्याख्यान झालें. पं. जोशी हे प्रथितयश लेखक, प्राचीन शास्त्रेतिहासाचे अभ्यासू व प्रवासाचा विपुल अनुभव घेतलेले असल्यामुळें त्यांचे व्याख्यान अतिशय रंगलें. दि. ९ ला साताऱ्यांतील सुप्रसिद्ध साहित्यिक श्री. मो. रा. वाळंबे यांचें " विडंबन–काव्य " या विषयावर व्याख्यान झालें. श्री. वाळंबे हे महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांचे आवडते वक्ते आहेत. साहित्य क्षेत्रांतला एकेक विषय घेऊन ते प्रतिवर्षी विद्यालयांत व्याख्याने देतात आणि वैद्यकासारख्या रूक्ष मानलेल्या विषयाचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना साहित्यांतल्या शास्त्र व कला यांचा परिचय करून देतात. यंदाच्या व्याख्यानांत विडंबन–काव्य हा काव्यप्रकार त्यांनीं आपल्या विनोदी नि ओघवती शैलीनें समजावून सांगितला. दि. १० ला पी. डी. लेले एम् ए. बी. टी. यांचे Adopt and Adapt या विषयावर व्याख्यान झाले.

चक्री व्याख्यानाचा अभिनव कार्यक्रम

दि. ७ ला सायंकाळी ७ ते ८–४५ पर्यंत चक्री व्याख्यानाचा कार्यक्रम रंगला. विद्यार्थी शासित मंडळाचे प्रमुख डॉ. टिळक यांनीं ही कल्पना काढली आणि ती विद्यार्थ्यांनी यशस्वी करून दाखविली. ही कल्पना अशी होती; समाजातल्या विविध व्यवसायांच्या लोकांनीं समाजाच्या धारणेचे श्रेय आपणाकडेच कसे येते व आपला व्यवसाय हाच समाजाचा जीवनाधार कसा आहे हें सांगावयाचे. या विविध सामाजिक घटकांच्या प्रतिनिधींची भूमिका एकेका विद्यार्थ्यानें आपल्याकडे घेतली. त्यांच्या विवेचनांत युक्तिवाद, वक्तृत्व, उपरोध इ. विविध गुणांचा वापर सहजच झाला. निरनिराळया भूमिका व त्या घेतलेले विद्यार्थी असे होते. (१) शास्त्रज्ञ श्री. वैद्य (२) सन्यासी श्री. फडके (३) तत्वज्ञानी श्री. पाठक (४) शेतकरी श्री. चौगुले (५) व्यापारी श्री. बाव (६) अध्यापिका कु. वेलणकर (७) वकील श्री. बर्वे

सर्व प्रकारची आयुर्वेदीय औषधें शास्त्रोक्त पद्धतीनें तज्ञ वैद्यांच्या देखरेखीखालीं तयार केलीं जातात.

ठिकठिकाणीं एजंटस नेमणे आहेत.

दि आयुर्वेदिक धन्वंतरि फार्मसी

अहमदनगर

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(८) राजकारणी मुत्सद्दी श्री. मुंगड (९) विद्यार्थी श्री. गोरे (१०) डॉक्टर श्री. माजगांवकर (११) संपादक श्री. परळे (१२) धर्मगुरु श्री. बापट (१३) कामकरी श्री. एकसंबेकर (१४) अध्यापक श्री. मेहता (१५) गृहिणी सौ. लिमये (१६) शिपाई श्री. डुड्डु (१७) सरकारी नोकर श्री. येलगूडकर या सतरा विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमांत दोन तास पर्यंत वक्तृत्वाची बहार केली.

करमणुकीचे कार्यक्रम

दि. ६ ला श्री. गोवईकर वकील यांचें ' आग्र्याहून सुटका ', हें दीर्घकाव्य त्यांनी गाऊन दाखविले. त्यानंतर श्री. वाटवे यांच्या दिलरुबा वादनाचा कार्यक्रम झाला, दि. ७ ला सायंकाळी शिवराज मंडळातर्फे आर्केस्ट्रावादन झालें. त्यानंतर कु. माधव अभ्यंकर यानीं क्रांतीकारकांच्या चरित्रांवरील पोवाडे गावून दाखविले. दि. ९ ला विद्यार्थ्यांचे विविध करमणुकीचे कार्यक्रम झाले.

दि. ९ ला रांगोळीचे प्रदर्शन विद्यार्थ्यांनीं भरविलें होते. त्यांत श्री. देशपांडे, घोगरे, चव्हाण, कु. बंड यांनीं भाग घेतला होता. दुपारी स्त्रियांच्या हळदी कुंकवाचा कार्यक्रम झाला. रांगोळ्यांच्या कार्यक्रमांत श्री. देशपांडे यांचा क्रमांक पहिला आला व श्री. चव्हाण यांचा दुसरा आला. करमणुकीच्या कार्यक्रमांत पुढीलप्रमाणें क्रम लागले. श्री. माजगावकर, श्री. रानडे, श्री. अष्टेकर, कु. वेलणकर, श्री. एलगुडकर, श्री. चौगुले, श्री. शहा. चैतन्य मंडळातर्फे या विद्यार्थ्यांना डॉ. टिळक यांचे हस्ते बक्षिसे देण्यांत आली.

गणेशोत्सव मंडळाच्या कार्यक्रमांचे सूत्र चालक श्री. अ. भा. फडके यांचेकडे होते. यशांतल्या त्यांच्या वाटयाचा गौरवपूर्ण उल्लेख करणें आवश्यक आहे. त्यांना सर्व विद्यार्थी व प्राध्यापक यांचें सहकार्य लाभले आणि आर्यांग्ल वैद्यक महाविद्यालय म्हणजे विद्यार्थी व प्राध्यापक यांच्या स्नेहभावानें चाललेले गुरुकुल हा जुना लौकीक यंदा सार्थ झाला.

आयुर्वेदीय अर्कशाला

हैद्राबाद राज्य सोल एजन्सी

हैद्राबाद राज्यांतील वैद्य व विक्रेते यांनीं आयुर्वेदीय अर्कशाळेच्या मालाविषयीं खालील पत्त्यावर पत्रव्यवहार करावा.

ज. बा. बापट

अर्कशाळा सोल एजन्सी ऑफीस
द्वारका भुवन
जुना जालना (N. S. Rly.)

रामतीर्थ ब्राह्मी तेल

(स्पेशल नं. १) (मेडिकेटेड) डोक्याचे ज्ञान व क्रियातंतु बलवान करते केस काळे आणि मजबूत होतात. टक्कल पडलेल्या जागीं पुन्हां केस येतात. खवडे उवा, लिखा यांचा नाश होतो. स्मरणशक्ति वाढते. डोळ्यांत घातल्यानें दृष्टी सुधारते. कानांत टाकल्यानें कानाचे रोग नाहींसे होतात. गाढ झोप लागते.

सर्वऋतूंत सर्वांना उपयोगी. सर्वत्र मिळतें. मोठी बाटली किं. ३-८-०, लहान बाटली किं. रु. २.
श्री रामतीर्थ योगाश्रम, ८ उमेश धाम, २ रा विन्सेंट स्क्वेअर, दादर जी. आय्. पी. रेल्वे स्टेशन जवळ, मुंबई १४.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वाचकांचा पत्रव्यवहार

संयुक्त खानदेश वैद्य मंडळाचाच गौरव

माननीय संपादक महोदय, स. न. वि.

आगस्टचा मीमांसेचा अंक आपण सप्रेम भेट म्हणून पाठविला तो पोहोचला. आनंद झाला व त्यावद्दल आभारी आहे.

' मीमांसा ' मासिकाच्या द्वारें शास्त्रीय लेखांबरोबरच सात्विक, व्यवहारोपयुक्त व वैद्य आणि वैद्येतर वाचकानाहि उपयुक्त वाङ्मयाची निर्मिती अधिकाधिक होत आहे. ही विशेष समाधानाची गोष्ट आहे. आयुर्वेद जगतांतील नामवंत लेखकां बरोबरच संयुक्त खानदेशांतील वैद्य श्री. जळूकरशास्त्री यांच्याहि अगदी सुबोध व सामान्य जनोपयुक्त लेखमालेस स्थान देऊन संयुक्त खानदेश वैद्य मंडळाचाच आपण गौरव केला आहे, असे मी मानतो. मी आयुर्मीमांसेस यश चिंतितो,

भ. त्र्यं. वैद्य, धुळे
भूतपूर्व मंत्री सं. खा. वैद्य मंडळ,

आयुर्मीमांसा वैद्यकीय नियतकालिकांत यशस्वी होईल.

स. न. वि.

आपण आग्रहापूर्वक सप्रेम भेटीचा अंक पाठविलांत त्याबद्दल आभारी आहे. मी मीमांसेचा गेली दहा वर्षे वाचक आहे. महाराष्ट्र आ. म. विद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांतर्फे संयुक्तपणे वैद्यकीय मासिकें मागविली जातात त्यांत आयुर्मीमांसा आहे. आपणास दिवसेंदिवस प्रभावी लेखकवर्ग मिळत असल्यानें आयुर्मीमांसा वैद्यकीय नियतकालिकांत यशस्वी होईल यांत शंकाच नाहीं. आपले औषधी शास्त्राचे दोन्ही भाग वाचनीय असून लेखकानें नवीन पद्धतीनें औषधी गुणधर्म जनतेपुढे मांडल्याबद्दल अभिनंदन करीत आहे.

वै. र. गो. कुलकर्णी मुंबई.

आयुर्वेदाची तेवती ज्योत

स. न. वि.

आपले आयुर्मीमांसा मासिक वैद्य वर्गाला व औषधांची माहिती जाणून घेऊ इच्छिणाऱ्या सर्व सामान्य वाचकाना विशेष उपयुक्त आहे. सप्रेम भेट योजना अभिनंदनीय आहे आयुर्वेदाची ही ज्योत अखंड तेवत राहून ती वृद्धिंगत व्हावी असे इच्छितो.

— सूर्यकांत जनरल स्टोअर्स, मानवथ

अभ्रक भस्माचें भिंगारेकृत विवेचन

स. न. वि.

आयुर्वेद पत्रिकेच्या १५ आगस्ट व १ सप्टेंबरच्या अंकांत डॉ. इंदुभूषण भिंगारे यांनीं एक पुटी अभ्रक भस्म हे सहस्त्रपुटी अभ्रकाइतकेंच गुणकारी वगैरे स्वरूपाचे जे दोन लेख लिहिले आहेत त्यांशीं वैद्य कितपत सहमत आहेत ? औषधें किती परिश्रमानें तयार केली जातात यापेक्षा उपरुग्ण पद्धतीनें त्यांची श्रेष्ठाश्रेष्ठता ठरविणे इष्ट अशा स्वरूपाची विधानें पुरेशा पुराव्यासह करावयास नकोत काय ? एकपुटी अभ्रक मिळूनहि सहस्त्रपुटी अभ्रक वर्षानुवर्षे करणारे शास्त्रकार अज्ञ आहेत काय ?

वै. भा. र. पटवर्धन, चिपळूण.

स्तन्यशोधन म्हणजे साक्षात् अमृतच !

" मी आतापर्यंत आपल्या कंपनीची बरीच औषधें मागविली व मागवीत आहें. त्यांत गंधर्व–हरीतकी चूर्ण हे अतिशय उपयुक्त ठरलें. स्तन्यशोधन हे तर मातांच्या करितां अमृतच आहे. या औषधानी मला यश दिलें आहे.

–– वै. द. कृ. निरखी, मानवथ.

आयुर्वेद वार्ता

बोर्ड ऑफ रिसर्च इन आयुर्वेद

मुंबई सरकारनें वरील बोर्ड, रिसर्च कमिटीनें १९५० साली केलेल्या शिफारशीच्या अनुरोधानें ता. ८-८-१९५१ रोजीं ठराव नं. ६२३८।३३ करून निर्माण केले आहे. या बोर्डाकडे आयुर्वेदिक फार्माकोपिआ (निघंटु) व पुढे दिलेल्या १२ विषयांवरील क्रमिक पुस्तके निर्माण करण्याचें काम नियुक्त केले आहे– १ शरीररचना २ रसशास्त्र व आयुर्वेदिक फार्मसी ३ पदार्थ विज्ञान ४ शरीरक्रिया ५ द्रव्यगुण ६ निदान पंचक व संप्राप्ति विज्ञान ७ स्वस्थवृत्त ८ विषतन्त्र ९ रोग

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विज्ञान १० शल्यशालाक्य ११ सौतिक-स्त्री-रोग व बालरोग १२ आहार शास्त्र.

वरील विषयावरील क्रमिक पुस्तके तयार करतांना ती पूर्णपणे चरक, सुश्रुत व वाग्भट या आयुर्वेदाच्या प्रमुख ग्रंथावर आधारलेली असावी. इतर कांहींही मजकुर त्यांत येऊं नये असें बोर्डाच्या सभासदांचें मत आहे.

अशा तऱ्हेचीं पुस्तके कदाचित् यापूर्वी तयार होऊन प्रसिद्धही झाली असतील. अशीं पुस्तके प्रसिद्ध झालेली असल्यास ती बोर्डाच्या रिसर्च लायब्ररीकडे देणगी म्हणून अथवा उपयोगाकरितां उसनी म्हणून द्यावी अशी बोर्डाच्या अध्यक्षांची विनंति आहे.

अशी पुस्तके बोर्डाच्या पसंतीस पडल्यास बोर्ड अशा पुस्तकांची विद्यार्थ्यांकरितां व वैद्यवर्गाकरितां वापरण्यास अवश्य शिफारस करील.

अशी पुस्तके नसल्यास ती नवीन लिहून तयार करणे जरूर आहे व अशी पुस्तके तयार करण्याकरितां वैद्यवर्गानें बोर्डास जरूर मदत करावी व कोणी अशी पुस्तके बोर्डाच्या आदेशानुसार लिहिण्यास तयार असल्यास त्यानें तसें बोर्डाकडे कळवावें.

अशी कोणी मदत केल्यास त्याबद्दल योग्य तो मुशाहिरा बोर्ड देण्याचा प्रयत्न करील, कोणी ग्रंथलेखकानें आपले पुस्तक बोर्डास अर्पण केल्यास त्याचाही स्वीकार केला जाईल. बोर्डानें पुस्तक विकत घेतल्यास त्यावर बोर्डाचेंच स्वामित्व राहील.

ज्या कोणास अशा प्रकारचें क्रमिक पुस्तक लिहावयाची इच्छा असेल त्यानें आपली सर्व माहिती पदवी योग्यता इत्यादि बोर्डाकडे पाठवावी.

अशा तऱ्हेनें आयुर्वेदाच्या उन्नतिकरतां सहकार्य करणाऱ्या बद्दल बोर्ड नेहमीच कृतज्ञ राहील.

अशा तऱ्हेचे विनंती पत्रक बोर्डाचे अध्यक्ष डॉ. कृ. श्री. म्हसकर यांनीं आयुर्वेदभिमानी वैद्य व डॉक्टर वर्गाकडे पाठविले आहे.

बोर्डाचा पत्ता:— डॉ. सोराब अर्देशीर ई हकीम एम्. बी. बी. एस्. नं. १० बी. डी. डी चाळ डीलाईल रोड. पोस्ट जेकब सर्कल मुंबई नं. ११

अनुभवसिद्ध

अर्कशाला–औषधें

यूटोन : गर्भरक्षक
गर्भपोषक
शक्तिवर्धक

लोहीन : रक्तवर्धक
मेंदूला बलदायक
शक्तिदायक

वसंतमिश्रण : जीर्णज्वर, रक्तक्षीणता
व क्षयाची पूर्व
आणि प्रारंभिक लक्षणें
यांवर गुणकारी

शिशुजीवन : लहान मुलांचा
दमा, खोकला, अचपन
यावर उत्तम व शक्तिवर्धक

स्तन्यशोधन : मातेचें दूध निर्दोष
करणारे व वाढविणारे
औषध.

हीं औषधें विक्रेत्यांच्या दुकानीं
अवश्य असली पाहिजेत.

त्यांची मागणी सतत वाढत आहे.

आयुर्वेदीय अर्कशाला लि. सातारा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेदीय औषधीकरण-

संधान विधी

(लेखांक ३ रा)

लेखक—वैद्य पु. वि. धामणकर, धूतपापेश्वर पनवेल.

औषधी—

आसवांत पाणी हें आधार द्रव्य समजलें जातें. त्यांत औषधातील कार्यकारी द्रव्य उतरावयाचे असते. त्याकरितां साधे पाणी, कोहलयुक्त पाणी किंवा अग्निसंस्कार ह्यांचा उपयोग प्रामुख्यानें करतात. ह्या औषधी वर्गांत तीन प्रकार आहेत. १ उभ्दिज्ज २ प्राणिज ३ खनिज.

उभ्दिज्ज औषधें—

उभ्दिज्ज म्हणजे जमिनीचा भेद करून तिचे पोटांतून बाहेर आलेलें. ह्यांत सर्व काष्टौषधींचा अंतर्भाव होतो. त्यांतही पुनः हेतुनुसार तीन भेद केले आहेत. १ कांहीं औषधी अर्क निष्कासनाकरितां असतात. २ तर कांहीं अन्य हेतुकरितां असतात. उदा. सुगंधी वर्ग विकृतिप्रतिबंधक, टिकाऊ किंवा अम्लत्व प्रतिबंधक म्हणून ३ मधूक व धातकी पुष्प कोहलजनक म्हणून असे तीन हेतु काष्टौषधी योजनेंत असतात.

सामान्यतः काष्टौषधी आणण्यास शरद् ऋतु उत्तम मानला आहे. पण ह्यापेक्षां वनस्पतीचें औषधी उपयुक्त अंग परिपुष्ट व इष्ट स्थितीला पोहोंचल्यानंतर ती ती वनस्पती आणणें श्रेयस्कर हें म्हणणें अधिक सोयीचें. कारण सर्वच वनस्पतींची पूर्णावस्था शरदांतच येते असें नाहीं. पण शरदाचा उल्लेख बाहुल्यानें आहे. कारण तो पहिला पाक काल आहे.

पूर्णावस्था दर्शक कांहीं काल—

गोरफड—शरद	जांभूळफळ—ग्रीष्म	धातकीपुष्प—वसंत
आवळाफल—हेमंत	ब्राम्ही—शरद	पलाशपुष्प—वसंत.
अडुळसापत्र—वसंत	द्राक्षफल—वसंत	मधूकपुष्प—वसंत

आहरण काल.

पान—फुलें उमलूं लागल्यानंतर पण बीं धरण्यापूर्वी, सूर्योदयापूर्वी.

फूल—पूर्ण उमलण्यापूर्वी, धुकें निःशेष व सूर्योदय होतांच.

फळ—पूर्ण पक्व झाल्यावर पण सुकण्यापूर्वी.

त्वग्—पहिली पालवी गळली पण नवी आलेली नाहीं अशा वेळीं.

मूळ—एक वर्ष पुरें झाल्यानंतर शरदांत.

क्षीर—शरद ऋतूंत सूर्योदयापूर्वी.

रस, हिम, फांट आणि कषाय कोहलजल, सुरासव अशा अनेक प्रकारांनीं आसवांचा मूळ द्रव तयार करतात. अस्त्रहरारिष्टांत नुसता अडुळशाच्या पानांचा रस तर धात्र्यासवांत आंवळ्याचें फळांचा रस घेतला आहे; पण जीरकारिष्टांत जिऱ्याचा हिम तर लवंगासवांत लवंगेचा फांट उपयोगी ठरतो; अशोक, कुडा, इ. च्या सालीं काष्ठौषधी–दशमूळ यांचा काढा करणेंच श्रेयस्कर पडतें. आचार्यांनी रस, हिम, फांट, कषाय ह्यांच्या व्याख्या, त्यांचे उपयोग त्यांचा वर्ग ह्या संबंधी मूलगामी माहिती आपआपल्या ग्रंथांमधून दिली आहे. ती आपण मानतो. तेव्हां त्याच साहित्याचा उपयोग औषधी व्यवहारांत केला गेला तर अधिक फायदा होतो; असें दिसून आलें आहे. उदा. कुटजारिष्टांत–कुडासाल ५ शेर, मनुका २॥ शेर मोहपुष्प ४ तो. शिवणफळ ४० तो. पाणी ५२ शेर, शेष $\frac{१}{४}$ शेर असें सांगितलें आहे. सध्यां कुड्याची साल ओली मिळणें दुरापास्त. तेव्हां घ्यावी लागतें सुकींच, सुकीं साल मृदु गणली तरी ती वजनानें हलकीं असल्यानें चतुर्थांश शेष उरतांना साल इ. चा आकार (Volume) पाण्यापेक्षां मोठा घडल्यानें तीं पाण्यावर राहतात. पाण्यावरचे भागांतील सारांश पाण्यांत उतरत नाहीं. त्याकरितां कुटजारिष्ट प्रक्रियेंत पुढीलप्रमाणें फरक करावासा वाटतो. नव्हे तसें केल्यानें कुड्याचे सालींमधील अर्क पूर्णांशानें पाण्यांत उतरतो असें निदर्शनास आलें आहे. उदा. १ कुडासाल (पृथुचूर्ण) ५ शे. आदले दिवशीं सायंकाळीं पाण्यांत भिजत घालून दुसरें दिवशीं पूर्ण भिजून फुगलेली. पाणी ८० शेर घालून प्रथम २० शेर उरवावा. व मग पुनः अपेक्षित १३ शेर प्रमाणाइतका आटवावा.

२ द्राक्षांचा काढाहीं वर प्रमाणेंच करावा.कुटजारिष्टांत द्राक्षामधला मधुर रसच हवा असतो, असें नव्हे तर येथें त्यामधील कषाय रसात्मक द्रव्याची विशेषत्वानें जरुरी असते.

६ मोहपुष्प, काश्मीरीफल यांचा काढाही मृदु द्रव्य म्हणून त्या परिभाषेप्रमाणें पृथग् करून शेवटीं तिन्ही काढे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

एकत्र उकळून अपेक्षित द्रव्याचे मान साधावें. असें केल्यानें प्रत्येक पदार्थामधील वीर्यात्मक द्रव्य पूर्णांशानें उतरते. व पुनः क्वथनानें प्रत्येक पदार्थामधील परस्पर रासायनिक संयोगही उत्तम घडतील. (मोहपुष्प, काश्मीरी व द्राक्षाफल ह्यांचा काढा एकत्र करणें बरें)

दुसरी गोष्ट जीरकारिष्टांत जिऱ्याचा काढा सांगितला आहे तसा तो घेऊन जीरकारिष्ट केलें तर त्यानें दूध बेतांत सुटतें. पण स्तनपानानंतर मातेला थकवा येतो. हा दोष जीरकाचा हिम व फांट घेतल्यानें दूर होतो. इतकेंच नव्हे तर फांट अगर हिमानें दूध प्रभूत उत्पन्न होतें. मातेस शीण येत नाहीं. व मुलाचे पोटांत वात धरत नाहीं. असें प्रत्यक्ष प्रयोगांती सिद्ध झालें आहे.

वरील दोन्ही उदाहरणांत मूलतत्व निर्वेध राहून व्यवहार सुखाचा झाला, विनाश वांचला, इतकेच नव्हे तर तो वांचल्यानें विशेषही साधला आहे. तेव्हां अशा प्रकारचे फरक मी स्वतः केलें. त्याप्रमाणें आसवें तयार केलीं. व आर्तांचा दुवा घेतला. तसा इतरानाहीं लाभावा म्हणून हें सुचविलें.

कोरफडीचा रस ग्रीष्म, वर्षांत सुटतच नाहीं. तार येतें त्याला.ती शरदांत बंद होते. आणि रस प्रभूत सुटतो. अडुळशाचे पानांस जरा वाफ दिल्यानेंच त्यांचा रस चांगला सुटतो. रस काढण्यांतही काल व युक्ती साधाव्या लागतात.

हिम व फांट विधी सरळ आणि सोपे आहेत. क्वथन मात्र तितकेंसें सुलभ नाहीं. तेथें पाण्याची व औषधी प्रत पाहून क्वथनगति ठरवावी लागते. मुख्यतः निष्कासन योग्य असे पाणी निवडावें लागतें. हें पाणी लघु, निर्मल, निर्भेळ असावे लागते.

क्वाथ्य द्रव्याचें मृदु, लघुत्वावरून पाणी व क्वथन काल ठरवावा लागतो. कसातरी अग्नि देऊन एकदांचे पाणी उडविणें म्हणजे क्वथन नव्हे, तर अर्क निष्कृति सारख्या गतीनें होत राहून ती पूर्ण होईपर्यंत आवश्यक तें (अग्नि) उष्णतामान सारखें सतत चालूं ठेवावें लागतें. आणि असें केलें तरच त्या त्या पदार्थांचें सर्व वा अपेक्षित द्रव्य द्रवांत उतरते. ह्या दृष्टीनें कांहीं कांहीं ठिकाणीं पाण्याचें व शेषाचें ग्रंथोक्त प्रमाण अपुरें पडतें. तेथें आवश्यक तो फरक जरूर करावा. हें वरील उदाहरणावरून स्पष्ट झालें आहे.

काढा तयार होतांच तो गरम गरम असतांनाच गाळून घेण्यांत पूर्ण लाभ आहे. काढा थंड होतांना पाण्यांतलें विद्रुत द्रव्य परत काष्ठौषधीमध्यें जाऊन बसतें व मूळ हेतु सर्वांशानें साधत नाहीं. गरम गरम चोथा फार दाबण्याचें कारण पडत नाहीं. उलट थंड चोथा फार पिळावा लागतो. आणि असें करून ही तो सर्व सारभाग सोडीत नाहीं. तेव्हां दुहेरी नुकसान वाचवावें हें बरें.

पसरट भांडयांत काढा करणें चांगलें. कारण त्यांत क्वाथ्य द्रव्य व अग्नि प्रवाह छान खेळू शकतात. अर्क निष्कासन व बाष्पीभवन सारखे व उत्तम होत राहते. हवाबंद भांड्यांतील क्वथन कमी उष्णतेवर व लौकर होतें. अधिक उष्णता सहन न होणाऱ्या औषधांबाबत हा विधी फार उपयुक्त ठरतो आणि ह्यास वाफेचे सहाय्य विनधोक व किफायतशीर पडतें.

तयार कोहलांत फलसार (अफू) त्वक्सार (कापूर) मृगसार (कस्तुरी) असे पदार्थ मिसळूनही कांहीं आसवें तयार केलेलीं आहेत. आसवविधी प्रक्रियेंत त्या पुष्कळशा पायऱ्या ह्यांत गळलेल्या आहेत. आसवसार व उभ्दिज्ज किंवा प्राणिजसार ह्यांचें हें मिश्रण आहे. ह्यामुळें असले आसव प्रकार केव्हांहीं आणि अगदीं थोडया कालांत तयार होऊ शकतात.

खनिज पदार्थ आसवांत विरविणें वा मिसळणें ही गोष्ट अग्निवेशानेंच सुरु केली, ती सुश्रुतानें अनुसरली व शोढलानें तिचा प्रचार खूप केला. शोढलानें ४१ आसव योग संयोजिले पैकीं ९ त लोहाची योजना केली आहे. उभ्दिज्जांतील सार पाण्यावरोबर सेवन करतां येतें. पचतें. संशोषले जातें. तसा प्रकार लोहाबाबतही व्हावा अशी आचार्यांची आकांक्षा. पण उभ्दिज्जसार पाण्यांत उतरतें, मिसळते तसे लोहसार विरत नाहीं. त्यामुळें आसवांमार्फत लोहांचा उपयोग तितकासा यशस्वी झाला नाव्हता. आजही तीच स्थिति आहे. आणि ही स्थिति सुधारण्याकरितां पुष्कळच संशोधन व्हायला पाहिजे.

आसवांचे पाठ चरक, सुश्रुत वाग्भट, शोढल, भैं. र. यो. र., आ. वि; सि. भे. म; यो. चि., वृ. यो. त. यांनीं योजले पण आसवांत लोहाचा उपयोग ग. नि. कार शोढलानें फार केला हें खालीं कोष्टकावरून स्पष्ट होतें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ग्रंथकार	च.	सु.	वा.	शो.	भै. र.	यो. र.	शा	सि.भे.म.	वृ. वै.	यो. चि.	वृ.यो.त.	वृ. नि.र.	च.द.	आं. वि.	एकूण
आसवसंख्या	२३	३	१	४१	३५	१	१	१	१	१	१	१		२	११३
पैकी लोहयुक्त	२	२	–	९	३	१	१	१	१	०	–	–	–	–	२०

आसवारिष्टांतील निर्दिष्ट लोहधात्वंश

नांव	पा. तो.		धातु. तो.	काल (दिवस)	ग्रंथ	शतमान
१ अभयारिष्ट	२०४८	लोहरज	१२८	३०	ग. नि.	६·२
२ कूष्मांडासव	१०२४	,,	३२	१५	,,	३·१
३ खर्जूरासव	७०४००	,,	८	५	,,	
४ गंडीरासव	२०४८	,,	१२८	३०	,,	६·२
५ पिप्पलीमूलासव	२०४८	,,	८००	१०	,,	३९·५
६ मंडूरारिष्ट	१०२४	मंडूररज लोहरज	२०० २००	१५	,,	३९५
७ रसायनारिष्ट	२०४८	लोहपत्र	८००	१०	,,	३९·५
८ रोहितकारिष्ट	२०४८	लोहरज	२४	३०	,,	१·१
९ लोहासव	८१९२	लोहकिट्ट लोहरज	४०० ८	२१	,,	५·०१ ·०१
१० लोहासव	२०४८	लोहरज	४	३०	भै. र.	·१
११ पत्रांगासव	२०४८	,,	४	३०	,,	·२
१२ सारस्वतारिष्ट	२५६	स्वर्णप्रतनुपत्रंच	१	३०	,,	·४
				(मासाज्जातरसंदृष्ट्वा हेमपत्रे क्षयंगते) भै. र.		
१३ त्रिफलारिष्ट		लोहरज	१६	३०	चु. सं.	पिंडासव
१४ मध्वासव		,,	३२	३०	,,	
१५ पूतिकाद्यरिष्ट		,,	२००	७	सुश्रुत	पिंडासव १७८
१६ लोहारिष्ट		तीक्ष्णलोहपत्राणि	मांसास्त्रींश्च	तुरोवपथ	यावदालोह	संक्षयात् सुश्रुत
१७ जंब्वासव	१०२४	मंडुरभस्म	१२	३०	वृ. वै.	१·१
१८ कुमारी आसव	२५६	मंडूर	४	८	सि. भे. म.	१·५
१९ ,,	१०२४	लोहभस्म माक्षिकभस्म	२०० २	३०	शा.	१९·
२० ,,	१२८०	लोहभस्म ताम्रभस्म	२ २	२०	यो. र.	·३

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आसवांत विरविण्याकरितां लोह, मंडूर, ताम्र, आणि सुवर्ण अितक्या धातूचा उपयोग केला आहे. त्यांत धात्वंशाचे शतमान '३ ते .३९ पर्यंत बदललेलें दिसत आहे. आज मितीस आसवांत विरलेल्या लोहाचे गणित केलें तर ते '५ ते १ पर्यंत बदललेलें आढळतें. तेव्हां किती आसवांत किती लोह किती दिवसांत विरतें ह्या बाबत प्रयोग होऊन त्यांचीं किमान व कमाल प्रमाणें ठरलीं जाणें जरूर आहे.

लोहारिष्ट व सारस्वतारिष्ट प्रकरणीं सांगितलेलें लोह-क्षयमान केव्हांच दृष्टोत्पतीस येत नाहीं. पण त्यांचें संस्कार त्या त्या आसवांवर झालेले दिसतात. त्यावरून हे धातु विरणें आवश्यक आहेत कीं, त्यांचे साक्षित्व अपेक्षित आहे हा प्रश्न उपस्थित होतो. ह्याचाही उलगडा व्हायला पाहिजे.

मधुर द्रव्यें–

औषधींचें कार्यकारी द्रव्य कषाय पद्धतीनें पाण्यांत उतरतें तसें बिन कषायाचें आसवांत होत नाहीं. शिवाय काढ्यांत अर्क उतरला तरी तो टिकाऊपणांत अक्षम असल्यानें त्याला संरक्षकाची जरूरी लागतें. हें संरक्षणाचें व द्रवांत अंतराळीं विहरत असलेल्या घटकांतील अवशिष्ट कार्यकारी द्रव्य निष्कासनाचे कार्य कोहल करतो. काढा न करतां पाण्यांत औषधें घातलीं तरी औषधीमधील गुणद्रव्य निष्कासनाचें कार्यही कोहल करतो. शिवाय कोहलानें औषधी वीर्य सुद्धां वाढतें.

हा कोहल निर्माण करण्याचें कार्य मधुर पदार्थ करतात. मध, गूळ, काकवी, आणि साखर हे चारही पदार्थ कोहल जनक आहेत. शिवाय ह्यांचेंमुळें आसवांस घनत्व येतें रंग, येतो, औषध मधुर होतें. व तें बल्य, बृंहण, प्रीतीकर आणि मनोल्हादक, संतोष दायक ठरतें. अशा कारणांनी औषधींचे नंतर मधुर पदार्थांचाच क्रम लागतो.

वरील चार मधुर पदार्थांत दोन वर्ग पडतात. १ मधुवर्ग २ इक्षुवर्ग. मध आयता मिळतो. तयार मिळतो. म्हणून त्यासंबंधी प्रथम विचार करूं.

मधाचा शोध फार प्राचीन काळीं लागला. चरक काळीं फक्त चारच प्रकार ज्ञात होते. सुश्रुतानें त्यांत आणखी चारांची भर घातली. व प्राप्तमधूचे त्याचे अवस्थानुरूप आणखी चार प्रकार केलें. निघंटरत्नाकरानें आणखी तीन प्रकारांचा शोध लावला. मिळून मधाचे एकूण प्रकार १५ झालें, पैकीं माश्यांच्या जातींवरून पडलेले प्रकार ८ कालपाकानें घडणारे ४ व इतर कारणानें होणारे ३, अशा त्या पंधरांची पुनः वर्गवारी आहे.

चरक	सुश्रुत		निघंटरत्नाकर
१ माक्षीक	५ छात्र –	१ नवा	१ सदोष
२ भ्रामर	६ आर्ध्य,	२ जुना	२ निर्दोष
३ क्षौद्र	७ दाल,	३ आम	३ क्वथित
४ पौतिक	८ औद्दालक,	४ पक्व	

मधाचे गुण

व्रण शोधन संधान रोपणं वातलं मधु। वाग्भट
सांधणें हा मधाचा मुख्य व सामान्य गुण होय.
मधुसंदधाति। च. सं

गुण व कार्य—मधुर, रुक्ष, योगवाही, आनंदकर, रोपण, उष्ण, मेधाकर, मेधाप्रसादक, दीपन, मृदु, योगरक्षक, वर्णप्रसादक, लेखन, सूक्ष्म, रूचिकर, नाडीशुद्धिकर, संग्राही, वृष्य, वातकर, व्रणसुधारक, विशद, पित्तकर, नेत्रहितावह.

रोग नाशन—कुष्ठ, हिक्का, मेह, विष, काम..., अतिसार, अर्श, कृमि, वांति, कंडू, आध्मान, गलरोग, का..., ग्लानि, कफ, क्लैब्य, रक्तरोग, मद, तृष्णा, दाह, व्रण, मलबं...

मध गोळा करण्यांत माश्यांचा नंबर वरचा. त्या ... प्रकारच्या असतात. त्यांचे स्वभावानुसार त्या मध गोळा करतात. साठवितातहि. माशांचे प्रकार व त्यांचे वैशिष्ट्य.

माक्षींक— स्थूल, कपिल, रानमाशी संग्रहीत

भ्रामर—भुंगा, निळा, काळा,

क्षौद्र— करडचा रंगाची छोटी माशी.

पौतिक:—पिंगट रंगाची पुत्तिक माशी. हीं मा... बहुधा मेवामिठाई, मिष्टांन्नावर बसते.

छात्र:—पिंवळी माशी. ही थंड प्रदेशांत रहाते, ... पुष्पांतला मध हिला फार आवडतो. हिच्या मोहळाचा आकार ***छत्री*** सारखा आढळतो.

आर्ध्य:—तांबूस, पिंवळा भुंगा. हा निबिड अरण्यांत राहतो. ह्या भुंग्यास तीक्ष्ण सोंड असते.

दाल:—इंद्रनील मण्यास रख्या रंगाची माशी ही छोटी असते. ***वृक्ष कोटरांत मोहोळ बांधणें हा तिचा स्वभाव***

काल पाक प्रकार–

आम:—माशांनी नुकताच गोळा केलेला. त्याज्य.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पक्व—पोकड्या बंद करून, मोहोळास त्रारा घालून निवळून पाकविलेला स्वच्छ मध-मध्यम.

नवा—पक्वच पण मोहोळांतून नुकताच आणलेला मध्यम.

जुना—एक वर्षानंतरचा पक्व मध-उत्तम.

क्वथित—समल मध जल स्वेदावर उकडून निर्भेळ केलेला-साधारण.

ग्लुकोजः—८४-९% (मधु) फॉर्मिक अम्ल १-९%
सुक्रोज—२-६९% (शर्करा) क्षार ०-१२%
पाणी—१०·०३% (जल) नैत्रोजन भाग १·२९%
विशिष्ट गुरुत्व १·३६

उत्तम मधाचें लक्षण

१ मधु पाण्यांत बुडतो.
२ माशी मधांत रुतत नाहीं.
३ कुत्रा उत्तम मध चाटत नाहीं.
४ उभ्या कापडावर मध सांडल्यास तो त्यांत न भिनता घरंगळत खालीं जातो.
५ तेला प्रमाणें जळतो.

मधाचें परीक्षण

१ **शब्द**— मधांत पाणी फारच थोडें असतें. जें असतें तेंही मधाशीं एकरूप झालेलें असतें. त्यामुळें अग्नि संयोग झाला तरीही तें स्वत्व प्रगट करूं शकत नाहीं. अथवा पृथग्भाव्ही दाखवीत नाहीं. ह्या कारणानें जलनिर्भेळ अगर पक्का मध अग्नीवर टाकला तरी चुर् चुर अि. कोणताच शब्द करीत नाहीं. अच्छ व उत्तम मधांत बुडविलेली कापसाची वात तेल अगर तुपाप्रमाणें निर्वेध व निःशब्द जळतें.

स्पर्श— उष्ण संयोगानें त्वरित पातळ होणें हा मधाचा सहज धर्म आहे. त्यामुळें दोन बोटांचे चिमटींत मध घोळला तर तो उत्तरोत्तर पातळच होत जातो. काकवी व साखरेचा पाक ह्या बाबत उलट अनुभव येतो.

स्वरूप— मधांत हवेचे बुंद तरंगत असतात. त्यामूळें मध ठिपकेदार व फुगीर दिसतो.

रस— मधाचे रस तज्जनक फुलावर अवलंबून असतात. तरीपण सामान्य रस म्हणून मधाचा रस मधुर व अनुरस कषाय (तुरट) असें ठरलें आहे.

कषाय व मधुर रसाव्यतिरिक्त असलेलें मधाचे रस चिरकाल टिकाऊ नसतात. कालांतरानें ते आपोआप बदलतात. किंवा निगूढ होतात. शेवटींहि तो तुरट गोडच लागतो.

५ **गंध**—साखर जळतांना घाण येते, तशी मधाची येत नाहीं. मधास एक विशिष्ट गंध असतो. हा गंध असतो छान. पण फार वेळ ध्यावासा वाटत नाहीं. कुत्रा तर त्याचे वासामही फिरकत नाहीं. हा वास फार दृढ असतो. एरंडेल, कॉडलिव्हर ऑईलचा वास मधुसंयोगानें मरतो.

६ **रंग**—गव्याज्य सदृशंमधु । गायीचे तुपासारखा पिंगट, ओशट रंग मधास असणें हें औत्तम्याचें लक्षण आहे. नवे पणीं मध अनेक रंगाचा असतो. पण हे सर्व रंग टिकाऊ नसतात. ऋतुमानानुसार ते सारखे बदलत जातात. त्यामुळें रंगावरून मधाचें इष्टानिष्टत्व नक्की ठरवितां येतेच असें नाहीं.

मधांतील भेसळ—

मधांत दोन प्रकारची भेसळ आढळते. १ सहज, २ कृत्रिम, १ ल्या प्रकारांत मेण, माश्यांची लाळ व विष्ठा ह्यांचा समावेश होतो. ही भेळ अपरिहार्य असली तरी ती आसव प्रक्रियेंत अनिष्ट होय. दुसरा प्रकार तर लबाडीनें जाणून बुजून केलेला असतो. ह्यांत सुद्धां दोन प्रकार आढळतात. १ काकवी, साखर, साखऱ्या व गूळ, २ रा वर्ग कणीक, पीठ, खडू सरस व मेण मात्र हें पदार्थ मधाशीं समरत्व झालेले नसतात. त्यामुळें ते दूर करतां येतात.

भेसळीचे पदार्थ आसव प्रक्रियेंत फार मोठा विघाड निर्माण करतात. उदा.

सरस, मेण—आसव बनण्यास प्रतिबंध करतात.

काकवी, कणीक, पीठ—आसव आंबट होण्यास कारणीभूत होतात.

लाळ, विष्ठा—आसवांचे गंध रंग, रूप, रस विघडवितात. म्हणून मधाची शुद्धि आवश्यक ठरते.

मधु शोधन विधि

एक मोठी थोरली कढई घ्यावी. तींत निम्मे पाणी घालावें. त्यांत एक लाकडी ठोकळा सोडावा. त्यावर एक जडसर पसरट पातेलें ठेवावें. तें पातेलें शोध्य मधानें अर्धे भरावें. व मग ह्या स्वेदन यंत्रास अग्नि द्यावा.

पाणी तापलें कीं मध तापतो. उष्णतेनें मध पातळ होतो. हलका होतो. तो वरवर येऊं लागतो. त्याला उकळी फुटली कीं त्यांतला जड भाग तळाशीं जाऊन बसतो. हलका भाग पृष्ठभागावर येऊन तरंगत राहतो. व साधारण व घन पदार्थ

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मधांत अंतराळीं तरंगत राहतात. ऊन मधावर फेस येतो त्याला मळी म्हणतात.

ह्या मळींत मेण माशांचे पंखाचे, सोंडेचे सूक्ष्म पराग, त्यांची विष्ठा वा मृत शरीरें सापडतात. शिवाय ह्यांत केरकचराहीं असतो तो निराळा. म्हणून ज्ञान्यानें ही मळी हळूंच काढुन अलग करावी. मळी निघाली कीं मध स्वछ दिसूं लागतो.

हा मध जाड फडक्यानें हळूंच व जपून गाळावा. म्हणजे जड पदार्थ मागे व घन पदार्थ कापडावर राहतात. अशा तऱ्हेनें मधांतली पुष्कळशीं घाण व भेळ निघून जाते. मधांत काकवी, साखर, साखऱ्या, गूळ ह्यांची भेसळ उमगतां येते. पण ती अलग करतां येत नाहीं. असे जरी आहे तरी ती स्वेदन संस्कारानें मधाशीं एकरुप होते. व मग ती पासून कांहीं भय रहात नाहीं.

मध तापविला कि त्यांतील पाणी कमी होते. व हवा उडून जातें. त्यामुळें तो अधिक संहत व गुरु होतो. औषधी योगांत वापरण्यास हा मध चांगला.

देश, काल, माशी, फूल अशा चार प्रकारावरून मध निरनिराळ्या प्रकारचा मानतात. प्राचीन आचार्यांनी माक्षीक हा मध श्रेष्ठ मानला आहे. आधुनिक विद्वानांचे मतें ही निर्णय-पद्धति बरोबर नाहीं. वृक्षांचें फुलावरून मधाचे प्रकार कल्पिणें सर्वांत उत्तम; असें त्यांना वाटतें. पण एवढें खरें कि मध जुना घ्यावा, ह्याबाबत प्राचीन अर्वाचीनांचें एक मत आहे. (अधिक माहिती आयुर्मीमांसा १९४८ जानेवारी अंकांत)

गूळ—काकवी—साखर

हीं तिन्ही अपत्यें एकाच उंसाची. अग्निवेश कालीं हे तीनही पदार्थ ज्ञात होते. मात्र तेव्हां उंसाचे प्रकार दोन होते. ते सुश्रुत कालीं १२ झाले. भाव प्रकाश व निघंटरत्नाकरांत १।१ प्रकार अधिक दिसून येतात. निघंटूमधूनही कांहीं प्रकार आढळतात. सर्व मिळून २४ उंसांची नोंद आयुर्वेद साहित्यांत आहे.

चरक—१ पौड्रक २ वंशक

सुश्रुत—,, ,, ३ कांतार, ४ भीरुक, ५ श्वेत-पोरक, ६ नीलपोरक ७ तापसेक्षु, ८ कोष्ठेक्षु, ९ सूचीपत्र, १० दीर्घपत्र, ११ नैपाल, १२ कोशकृत्.

वाग्भट—१३ शतपर्वक भा. प्र १४ मनोगुप्ता. म. पा. नि. १५ रक्तेक्षु १६ कृष्णेक्षु ग. नि. १७ सु. १८ वणुनिखन

राजनि.—१९ श्वेतेक्षु २० करंकेक्षु २१ असिपत्र २२ मधुतृण २३ गुडतृण पैकीं कोणी श्वेतेक्षु, नीलेक्षु, रक्तेक्षु हीं नांवें अनुक्रमें पौड्रक, वंशक, कांतार, ह्यांस दिलेलीं आढळतात.

गुळाचे प्रकार व गुण—

१ ***अधौत***—मळी न काढलेला-प्रभूत कृमी, मेद मज्जा, रक्त, मांस, कफकर.

२ ***धौत***—मळी काढलेला—मलमूत्र साफ करणारा मंद कफावह.

३ ***गरम गूळ***—काहिलींतला—रक्तपित्तकर, ऊष्ण.

४ ***ताजा गूळ***—ढेपीचा—अभिष्यंदी, अग्निमांद्यकर,

५ ***नवा गूळ***—१ वर्षा आंतला—नातिपित्तकर गुरु, स्निग्ध, मेद व कफकर.

६ ***पक्का गूळ***—एक वर्षाचा जुना—रुच्य, पथ्य, हृद्य, स्वादु, लघु, स्निग्ध, वृष्य, दीपन, पौष्टिक, रसायन, श्रमहर त्रिदोषघ्न, पित्तवातहर, संयोगेन ज्वरहर.

७ ***जुना गूळः***—२ वर्षांचा—पक्या गुळाचे गुण अधिक प्रमाणांत लाभतात.

८ ***औषधीगुडः***—३ वर्षांचा—जुन्यांत श्रेष्ठ. सर्व रोगहर. सर्वरोगेगेषुउत्तम.

तीन वर्षांनंतर गूळ आस्ते आस्ते हीन वीर्य होत जातो.

समल, विमल, सक्षार, निःक्षार, चिकीचा, रवाळ असे सहा पोट भेद प्रत्येक गुळाचे प्रकारांत संभवतात. बियाणें जमीन, खत आणि हवापाणी यांचेवर हे पोटभेद आधारलेले असतात. शिवाय गूळ तयार करण्यांतले कौशल्यही गुळांत फरक घडवितें. तरीपण गुळाचें सामान्य गुण कांहीं संभवतात ते वर दिले आहेत आता त्याचे इतर गुण पहा—

१ रंग Colour २ स्पर्श Texture ३ आर्द्रता Moisture ४ रुचि Taste ५ साखर Sucrose ६ मधुजन Glucose ७ मळ Dirt ८ क्षार Phosphates ९ स्वाद Flavour.

रंग— तांबडा, पांढरा, पिवळा, काळा, टिकाऊ व बिनटिकाऊ रंग

स्पर्श— चिक्कण, दमट, रवाळ, मृदु, मध्य, कठीण

रुचि— साम्ल, सतिक्त, सलवण, सुमधुर.

ही तीन लक्षणें सामान्य मनुष्य पारखूं शकतो. पुंड्या नामक उंसास सोनखत दिलें तर सर्वांत उत्तम असा गूळ तयार होतो.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वर्ण पिवळ्या रंगाचा रवाळ, केवल मधूर गूळ उत्तम जाणावा. वर्षभरानंतर पिवळा, रवाळ, साखरे प्रमाणें मोकळा मधुर गुळही उत्तम जाणावा.

हल्लीं उत्तम गूळ मिळणें दुरापास्त झालें आहे. कारण खरेस भाव जास्त झाल्यानें अधिकांत अधिक साखर देणाऱ्या देशी उंसाच्या जाति व परदेशी खते हयाचा प्रचार फार ला आहे. औषधी कार्यांकरितां तरी पुंड्याउंसाची लागवड नखतांवर झाली तर फार बरें होईल.

गुळाचे संशोधन सरकार कडून चाललेलें आहे. तेथें त साखरेचें मान अधिकांत अधिक देणारा ऊंस कोणता, खरेचे मान वाढविणारे खत कोणतें, हया संबंधानें संशोधन लूं असतें. हया संशोधनांत भारतांतील बीं, बियाणें, खत, मीन हयांची जोपासना होत नाहीं. त्यापेक्षां कचरा, शेण, तू अशी देशी खतें व पुंड्या, वंशक, कांतार, असे देशी ऊंस ांची वाढ अधिकांत अधिक आणि तीही पुनः किफायतशीर ीं करतां येईल अिकडे लक्ष देऊन संशोधन झालें तर तें श्रम भारताचें कामीं येतील. मानवी जीवनाचे दृष्टीनेंही ा पदार्थाकडे पाहिलें पाहिजे. हया गोष्टी झाल्याशिवाय सवांचे औषधी प्रामाण्य ठरणें दुरापास्त आहे.

कवी

चरक, सुश्रुत, वाग्भटांनीं काकवी त्रिदोषकृत मानली . पण तिचा त्यांनीं संपूर्णतया अव्हेर केला नाहीं. ाही पदार्थाचा उपयोग करून घेणें ही तर आयुर्वेदीयांची मोठी आणि उत्तम गोष्ट आहे. चिकित्सास्थानांत चिकित्सेंत अनुपान म्हणून, तर योनिरोगांत रक्तस्थाप-, कल्पस्थानांत वमन विरेचन योगांत साखर व गुळा-नीं त्यांनी काकवीचाच उपयोग केला आहे. दोषांचा लेश चांगला करणाऱ्या योगांचे लेह काकवींतच तयार वेत असे स्वतः चरकाचार्यच सांगतात. परंतु आसव, ष्ट हया कल्पांत मात्र प्राचीन अर्वाचीनपैकीं कोणीही ार्यांनी काकवीचा उपयोग सांगितलेला नाहीं.

गूळ तयार होण्याचे अलिकडील अवस्थेला काकवी तात. अलिकडे भाकरी पोळीबरोबर ही खातातही. र तयार करतेवेळीं तदितर सर्व भाग अलग करतात. ाही काकवीच म्हणतात. पण ही कोणी खात नाहीं. हिच्यापासून उत्तम दारू तयार करतात. सरकार हया ापासून पॉवर अल्कोहलही काढतें.

सामान्यतः अपक्व स्थितींतला कोणताच पदार्थ मग तें धान्य फल, मूल, कांहींही असो, ती अवस्था योग्य मानीत नाहींत, शक्त गुण त्यांत नसतात. कारण उलट दोषा-धिक्यच तेथें आढळतें. तीच स्थिति काकवीची असल्यानें हा पदार्थ दोषल, गुरु, अभिष्यंदि मानवांना सहजीं न मानव-णारा असें ठरवून आसव योगांतही त्याला वगळलें आहे.

साखर

उसांतले प्रकार खरे आहेत. पण त्या प्रत्येक प्रकारा-पासून तयार होणारे गूळ व साखर हे पदार्थ तत्तप्रकारच्या विशेष गुणांनीं युक्त असतात असें मात्र नव्हे, असें अर्वाचीनांचे मत. पण प्राचीन आचार्यांचें मत हया विरुद्ध आहे. चरक-कालीं पौंड्र, वंशक हे दोनच प्रकार होते ऊंसाचे. पण हया दोन्ही प्रकारच्या ऊंसापासून तयार होणाऱ्या गूळ व साखरेचे गुणधर्म निरनिराळे असतात. हें त्यांनीं नमूद करून ठेवलें आहे. तीच विचारपद्धति त्यांचे अनुयायांनीं वा मागील ग्रंथकारांनीं अनुसरली आहे.

चरक कालीं धमाश्या पासूनही साखर तयार करीत असत. पुढें पुढें अशा प्रकारांत भर पडत पडत नि. शि. काला-पर्यंत तें यावनाली (जोंधळी) माध्वी (मधाची) तव-राज–(यवाज) पुष्पोभ्दवा (फूलसाखर) असे चार प्रकार परिणत झाले. हया चार प्रकारांसह आज मितीस १० प्रकार ज्ञात आहेत.

प्राचीन	*अर्वाचीन*
धान्य शर्करा	द्राक्षशर्करा
यासशर्करा	फलशर्करा
पुष्पशर्करा	दुग्धशर्करा
मधुशर्करा	कंदशर्करा
इक्षुशर्करा	तालशर्करा

पण मोठ्या प्रमाणांत लाभणारे व स्वस्त नि सोयीस्कर पडणारे असे प्रकार अवघे तीनच होत. इक्षु, ताल, कंद हया प्रकारांपासून निघालेली पृथग् शर्करा एकाच गुणाची असते असें कांहीं अधुनिक विद्वान् सांगतात. पण अनुभव मात्र निराळा आहे.

साखरेचे सामान्य गुण.

वृष्य, बल्य, शीत, चक्षुष्य, मधुर, स्निग्ध, सर, लघु, बृहण, जंतुघ्न, तृषा, मद, मूर्च्छा, श्वास, क्षय, दाह, अर्श, वात, विष, मोह, वांति, कास, कृमि, श्रम, भ्रांति, पित्त, रक्तदोष, अतिसार, क्षतक्षीण, उरःक्षत, जुष्टव्रण, ह्या विकारांत प्रशस्त.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गूळ साखर यांमधील फरक

	एक औसांत ग्रॅमस्				एक औसांत मिली ग्रॅमस्			
	प्राधिन	मेद	कार्बोदक	रक्षा	खट	स्फुर	लोह	उष्णांक
ईक्षुरस	०·४२	०·१६	६·२	—	—	—	—	२८
नीरा	०·०३	०·०५	४·०२	०·१८	४२·०	३·०	७·४	१६·७६
गूळ	०·१०	०·०२	२८·०	०·१८	२२·५	१०·४	३·३	११४
साखर	...	...	२८·३	...	...	...	...	११३
काकवी	०·०६	...	१७·०	...	...	...	...	१६८
मध	०·११	...	२०·२	...	...	...	...	८१

प्राचीन काळीं उसा प्रमाणेंच धमासा, जोंधळचाचें ताट, ताड, माड, शिंदी ह्यां पासूनही गूळ तयार करीत. ह्यांचा उपयोग औषधांत सुद्धा करीत असत. उदा:-१ तालजं गुडं प्रस्थ मात्रकम् । ४१२ भल्लातकरसायन वै. चिं. २ पुरातन ताल गुडः । १६ ऋतु शूल निवारिणी. व्या. सं ३ त्रिगुडं ताल खर्जूरिका इक्षुजंच । ७१३ मेशी पाक. रसायन सं (र. यो. सा.)

आयुर्वेदीय औषधी कारखानदारांनीं ताड गुळाचें विश्लेषण, अन्वेषण करून आसव विधींतलें ह्याचें स्थान निश्चित करावें. नीरा समितीनेंही हा प्रयोग हाती घेण्यासारखा आहे.

मध	गूळ	साखर	काकवीं
लघु	लघु	लघु	गुरु
स्वादु	स्वादुतर	स्वादु	स्वादु
रुक्ष	स्निग्ध	स्निग्ध	स्निग्ध
शीत	शीत	शीत	शीत
सूक्ष्म	स्थूल	वल्य	स्थूल
मेध्य	हृद्य	...	...
वृष्य	वृष्य	वृष्य	...
चक्षुष्य	...	चक्षुष्य	...
विशद	...	...	...
रुचिदं	रुचिदं	...	...
लेखन	बृंहण	बृंहण	...
दीपन	दीपन	...	अभिष्यंदी
वातल	त्रिदोषघ्न	पित्तघ्न	त्रिदोषकर
आल्हादक	रसायन	...	...

मध	गूळ	साखर	काकवी
ग्लानिहर	श्रमहर	श्रमहर	...
रक्तदोषघ्न	कृमिकृत्	रक्तदोषघ्न	...
व्रण शोधन,	सारक	सर	मूत्रबस्तिशोधक
रोपण	मूत्रल	व्रण्य	मूत्रशोधक

मध, गूळ आणि साखर यांतील फरक दाखविणारी जुनीं नवीं कोष्टकें पाहिलीं म्हणजे त्यांत (मधुर) रसाचे साम्य असलें तरी त्यांचे गुणांत पृथक्त्व ते स्पष्टही आहे म्हणून विचारवंत एका ऐवजीं दुसरा पदार्थ सहसा घेणार नाहीं. इतके ते भेद, विशेष स्पष्ट आहेत. (अधिक माहिती करितां आयुर्मीमांसा १९४९ आक्टोबर अंक पहा.)

मधुर द्रव्य प्रयोजन

मधुर रस हा सात्म्य रस आहे. त्यामुळें त्याचे स्वागत शरीराकडून उत्तम होते. उलट तो ही रस, रक्त, मांस, मेद अस्थिमज्जा, शुक्र, ओज यांची वाढ चांगली करतो. मधुररस, स्निग्ध, शीत, गुरु, त्वच्य, केश्य, मेध्य, प्रीणन, जीवन, तर्पण, स्नेहन, स्थिरीकरण आहे. आयुष्य सुखा समाधानानें काल व्यतीत करविणारा आहे.

ह्या त्याच्या औत्तम्यामुळें तो मन शरीर आणि अग्नि ह्यांना बल, उत्साह, आनंद देणाऱ्या आसव कल्पांत प्राधान्यानें योजला आहे. साधारण मानतः वात, पित्त, कफ दोषावर गूळ, साखर, मध यांची क्रमानें योजना करतात.

अर्वाचीन पंडितांचें मतें मधुर द्रव्याचे उपयोग खालीलप्रमाणें ठरतात—

१ औषधाचे ग्रहण सुकर व्हावें.
२ " पचन " "

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३ ,, संशोषण ,, ,,
४ औषध सुरुच्य व्हावें.
५ औषधांत परिवर्तन — पचन व्हावें.
६ कोहल निर्माण व्हावा.

७ संरक्षक	१२ प्रीणन
८ पोषक	१३ जीवन
९ बल्य (तन, मन, अग्नि)	१४ तर्पण
१० रंगदायक	१५ अल्हादन
११ घनत्वावह	१६ ओजोवर्धन

आतांपावेतों सदरें निश्चित झालीं आहेत. ह्याबाबत धिक वारकावा होऊन तीं तीं प्रमाणें निश्चित होण्यारितां फार मोठ्या संशोधनाची अत्यंत जरूर आहे.

धुर द्रव्यप्रमाण

अग्निवेश कालीं आसव कल्पनेचा उदय झाला. रक कालापर्यंत तो त्याच स्वरुपांत होता. त्यामुळें चरकानें ठ्यांत कांहीं फरक केला नसावा. चरक संहितेत २३ सवें आहेत. त्यांत मधुर द्रव्यांचे जलद्रोणी प्रमाण ५ तापासून २३ शेरापर्यंत बदलत गेलेलें आढळतें.

चरकानंतर बऱ्याच वर्षांनीं वत्स सुश्रुत झाला. त्यानें सवारिष्ट कल्पनाविधी व्यवस्थित दिले आहेत. १ वैरे-निक निःक्काथ भागाः शीतास्त्रयोमतः । व्दौ फाणितस्य । सू. अ. ४. २- उष्णोदकस्य शीतीभूतस्य त्रयोभागाव्दौ णितस्यच ।। चि. अ. १० मधुना मधुरीकृते । सुश्रुत.

तरीपण मधुर द्रव्य प्रमाण निश्चित झालेलें नव्हतें. रण सूत्रस्थानांत व चिकित्सास्थानांत विधी सांगतांना ी तीन भाग व मधुर द्रव्य दोन भाग असें प्रमाण गितलें आणि पूतिकाद्यरिष्टांत — पिंडासवांत ११२ तो. ी व २।। शेर गूळ. वृश्चिकाद्यरिष्टांत २ भाग पाणी ाग मध सांगितला. मधुना मधुरीकृते । असेंही सांगितलें तर लोहारिष्टांत फाणितीभावमापन्नं । असें लक्षण गितलें.

आसव काकवीसारखे घट्ट असावें, आसव गोड व्हावे लक्षणें सांगून पाण्याशीं प्रमाणें मात्र १:२, ३:२, २:१, सांगितलीं. पहिल्यांत फाणिती भाव येतो; पण कोहल अम्ल परिवर्तन होत नाहीं. दुसरें मान मात्र बरेचसें क्त वाटते. तिसऱ्यांत मधुरत्व येत नाहीं. आणि आसव त आंबट होते. सुश्रुतानेंच आसवाचें पहिलें लक्षण मुख असें दिलें आहे. ह्या दृष्टीनें तिसरा प्रकारही त्याज्य ी.

ग. नि. व भै. र. ह्या ग्रंथकारांचा उदय सुश्रुतानंतर १५ शें वर्षांनीं झाला. कारण हे ग्रंथ १४।१५ व्या शतकांतले आहेत. ह्या दोघानीं आसवारिष्टांचें पाठही बरेच संयोजिले. प्रथम ह्यानीही द्रोणी ५ते १५ शेर मधुर द्रव योजला. पण शेवटीं शेवटीं द्रोणी दहा शेरावर ते आलेले दिसतात. फक्त मधाचे प्रमाण मात्र त्यांनीं द्रोणी १५ शेरच ठेवलेलें दिसत आहे.

चरक कालीन प्रायोगिक अवस्था सुश्रुत कालीं बरीच वर आली होती. तीच ग. नि; भै. र. कालीं पूर्णावस्था पावली, असें म्हण्यास हरकत पडूं नये. कारण सुश्रुत मतें ३:२ हें प्रमाण मध्यम ठरतें तर ग. नि. मतें १३:१० म्हणजे सुश्रुता-पेक्षां द्रोणी २ शेर जास्त. कांहीं चिंता नाहीं. च. सं. त सुद्धां हें प्रमाण कांहीं ठिकाणीं अवलंबलें आहे. आणि ह्या प्रमाणांची आसवें उत्तम मुखप्रिय, स्थिरमद, बल्य, वृष्य होतात. असा आजचाही अनुभव आहे. तेव्हां गूळ व साखर १३:१० आणि मध १३:१५ हे प्रमाण सर्व आसवारिष्टां-करितां प्रमाण मानावें असें माझा अनुभव सांगतो.

मुख्य गोष्टी ह्या लक्षांत घ्यायला पाहिजेत कीं मधुर द्रव्य पाण्यांत विरघळलें पाहिजे. आसव मधुर रसात्मक झाले पाहिजे आणि पुनः त्यांत कोहल प्रभूत, अम्ल किंचित् मानानें व अल्पमानानें स्वादा पुरते निर्माण व्हायला पाहिजे. तरच विधीचे मनःशरीराग्नि बल प्रदत्व, मुख प्रियत्व, हे मूळ हेतु साधतात.

मधुर द्रव्याचे हीन मान अम्लत्व प्रभूत निर्माण करते. अधिक प्रमाण परिवर्तन प्रतिबंधक ठरते. तेव्हां ही दोन्ही मानें वर्ज्य ठरतात. आतां आपण ही मानें कोणती ते पाण्यांत मधूर द्रव्याचे विरणारे प्रमाण पाहूं म्हणजे ठीक होईल.

मधूर द्रव्य विद्राव्यता	पाणी मधुरपदार्थ प्रमाण
पाणी व गूळ १:३ :	पाणी १३ शेर १० शे. गूळ
पाणी व साखर १:२ :	,, ,, १० शे. साखर
पाणी व मध १:३	,, ,, १५ शे. मध
किंवा अधिकही	

काकवी

फाणितमाचिनोति । (दोषान्) च. सू. २७।४
इक्षु विकाराणां अहितम् । च. सू. २५।३८
फाणितं गुर्वभिष्यंदि चयकृन्मूत्र शोधनम् । अह.
गुरुमधुरमभिष्यंद्य बृहणंतत्रिदोषकृत् ।। सुश्रुत

मागील अंकीं:-संधानविधान, पात्रनिर्णय, जलविवेक.
पुढील अंकीं:— परिवर्तक, प्रक्षेप, प्रलेप, प्रधूम, मिश्रण, करण, संधान, निधापन, आस्यापन, उद्घाटण, पक्वापक्वतानिर्णय, गालन, प्रयोजन, निर्मलीकरण, पुनरुष्णीकरण, सुगंधधारण, उद्धरण, आसवांत होणारे बिघाड त्यांचा प्रतिबंध व निराकरण.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

औषधि–गुणधर्म–शास्त्र

योगराज–गुग्गुळ

ले.—वैद्य नृसिंहाचार्य बागेवाडीकर. "आयुर्वेद चिकित्सक"

ग्रंथोक्त ''.......पाठ

" नागरंपिप्पली चव्यं पिप्पलीमूलचित्रकौ "
" भृष्टं हिंग्वजमोदा च सर्षपो जीरकद्वयम् "
" रेणुकेंद्रयवाः पाठा विडंगं गजपिप्पली "
" कटुकातिविषा भाङ्र्गी वचामूर्वे त्रिभागतः "
" प्रत्येकं शाणिकानि स्युर्द्रव्याणीमानि विंशतिः "
" द्रव्येभ्यः सकलेभ्यश्च त्रिफला द्विगुणा भवेत् "
" अेभिश्चूर्णीकृतैः सर्वैः समो देयश्च गुग्गुलुः "
" वंगं रौप्यं च नागं च लोहसारं तथाभ्रकम् "
" मंडूरं रससिंदूरं प्रत्येकं पलसम्मितम् "
" गुडपाकसमं कुर्यादिमं दद्याद्यथोचितम् "
" अेकपिण्डं ततः कृत्वा धारयेद्घृतभाजने "
" गुटिकाः शाणमात्रास्तु कृत्वा ग्राह्या यथोचिताः "
" गुग्गुलुर्योगराजोऽयं .... "

(शा. सं म. खं. अ. ७/५६–६२)

सुंठ, पिंपळी, चवक, पिंपळमूळ, चित्रक, जिरे, शहाजिरे, भाजलेला हिंग, अजमोदा, पांढरी मोहरी, रेणुकबीज, इंद्रयव, पहाडमूळ, वावडिंग, गजपिंपळी, कुटकी, अतिविष, भारंगमूळ, वेखंड, मोरवेल, प्रत्येक तीन तीन मासे, त्रिफळा दहा तोळे, गुग्गुळ पंधरा तोळे. वंग, रौप्य, नाग, लोह, अभ्रक, मंडूर, रससिंदूर हीं द्रव्यें प्रत्येकीं चार चार तोळे.

कल्पविधि:– गुग्गुळाशिवाय सर्व द्रव्यें अेकत्र खलावीं. यांचे चांगलें मिश्रण झाल्यानंतर शुद्ध गुग्गुळाचा पाक करून त्यांत वरील सर्व द्रव्यांचे मिश्रण थोडे थोडे टाकून खलावें. या सर्व द्रव्यांचा अेकजीव झाल्यानंतर याच्या गोळ्या करणें. यां गोळ्या तुपांनीं रावलेल्या मडक्यांत ठेवणें. या संस्काराचें महत्व पुढें येणार आहे. हीं सर्व द्रव्यें ५८ तोळे होतात.

योगराज कां म्हटलें ?

गुग्गुळाच्या कल्पांत याचे स्थान अत्यंत महत्वाचे आहे. म्हणजे हा कल्प इतर गुग्गुळ कल्पाहून श्रेष्ठ आहे. गुग्गुळाचे कैशोर गुग्गुळ, गोक्षुरादि, त्रिफळा गु. इ. जे गुग्गुळ कल्प आहेत त्यांत जो द्रव्यांचा संयोग केला आहे त्यापेक्षां योगराज गुग्गुळांतील निरिंद्रिय द्रव्यांचा संयोग महत्वाचा आहे, या संयोगामुळेंच हा कल्प निरनिराळ्या रोगांत कार्य करूं शकतो. निरिंद्रिय द्रव्यें हीं योगवाहि आहेत म्हणून ह्या कल्पातील प्रधान द्रव्य जें गुग्गुळ त्याच्या गुणधर्माची वाढ होते. इतर कल्पांत ही योजना नाहीं. दुसऱ्या गुग्गुळ कल्पांत प्रधान द्रव्यें निराळीं आहेत म्हणून त्या कल्पांना निराळीं नांवें दिली आहेत. उदा. गोक्षुरादि गुग्गुळ. यांत गोखरू हें प्रधान द्रव्य आहे.

या कल्पांत गुग्गुळ हें प्रधान द्रव्य आहे. बाकीचीं सेंद्रिय द्रव्यें समान गुणात्मक, निरिंद्रिय द्रव्यें योगवाहि. असा योग घडवून आणला आहे. यामुळें यांस योगराज गुग्गुळ असें नामाभिधान दिलें आहे.

कल्पातील द्रव्यांचे रसात्मक विश्लेशण

शेकडा	रस	तोळे	मासे
३८·९	कटु.	२२	६
३७·९	कषाय.	२२	०
२३·२	तिक्त.	१३	६
१००		५८	०

कल्पाच्या समवायि – कारण – द्रव्यांचें सेंद्रिय निरिंद्रिय विश्लेषण

सेंद्रिय द्रव्यें.	निरिंद्रिय द्रव्यें.
सुंठ, पिंपळी, चवक, पिंपळमूळ, चित्रक, जिरे, शहाजिरें, भाजलेला हिंग, अजमोदा, पांढरी मोहरी, रेणुकबीज, इंद्रयव, पहाडमूळ, वावडिंग, गजपिंपळी, कुटकी, अतिविष, भारंगमूळ, वेखंड, मोरवेल, प्रत्येक ३–३ मासे. त्रिफळा १० तो. गुग्गुळ १५ तो. अेकंदर द्रव्यें ३० तोळे.	वंग, रौप्य, नाग, लोह, अभ्रक, मंडूर, रससिंदूर. प्रत्येक ४–४ तोळे. अेकंदर २८ तोळे.
शेंकडा ५१·७......सेंद्रिय द्रव्यें.	निरेंद्रिय द्रव्यें......शेंकडा ४८·३

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

समवायि–कारण–गुणात्मक–द्रव्यांचे–विश्लेषण

गुणात्मक द्रव्यें	शेंकडा प्रमाण
ण	८४·७
र	५२·७
ष	४९·६
घु	४९·८
त	२७·३
च्छिल	२५·८
शद	२५·८
गंध	२१·९
क्ष्ण	९·०४
	७·३
म	२५·८

विपाकात्मक विश्लेषण

शेंकडा	रसात्मक विपाक	तोळे	मासे
८५·३४	कटु	४९	६
१४·६५	मधुर	८	६
९९·९९		५८	

वरील सर्व विश्लेषण कल्पाचे गुणधर्म ठरविण्यास योगी पडणारे आहे म्हणून ते प्रथम दिले आहे-

या कल्पांत प्रधान आणि अप्रधान द्रव्यें कोणती आहेत, ा विचारहि प्रथमच करावा लागेल. या कल्पांत गुग्गुळ धान द्रव्य आहे. याचे प्रमाण २५·८ इतके आहे. म्हणजे दर द्रव्याचा १/४ एक चतुर्थांशापेक्षां अधिक आहे. म्हणन कल्पाचे गुणधर्म गुग्गुळावर अवलंबून आहेत. तरी पण तयार होत असतां द्रव्यांचा संयोग संस्कार, कारण चे प्रमाण इ.गोष्टींचा विचार करावा लागतोच. रसात्मक लेषणांत कटु रसात्मक द्रव्याचे प्रमाण ३८·९ आहे. कषाय त्मक द्रव्यें ३७·९ आणि तिक्त रसात्मक द्रव्यें २३·२ त. या कटु, कषाय, तिक्त रसाचा विपाक कटु होतो. पण ादात्मक कांहीं द्रव्यें असल्यामुळें विपाकाच्या प्रमाणांत निर्माण झाला आहे. उदा. सुंठ ही कटु रसात्मक आहे. तिचा विपाक मधुर होतो. अशीं कांहीं कारण द्रव्यें यामुळें मधुर विपाकाचे प्रमाण १४·६५ आहे. व कटु कात्मक द्रव्याचे प्रमाण ८५·३४ आहे. या कल्पाची ण द्रव्यें कटु, कषाय, तिक्त रसाची आहेत. हे रस वात प करणारे आहेत. ही वस्तुस्थिति दृष्टिआड करून णार नाहीं. म्हणून आपण प्रथम याच गोष्टीचा विचार करूं. या कल्पांत असणाऱ्या कारण द्रव्यांत कोणते प्रभावी द्रव्य आहे कीं, त्यामुळें कल्पाच्या गुणधर्मांत एकदम उलट कार्य घडते ? अशीं कांहीं अपवादात्मक द्रव्यें आहेत कीं, तीं कटु रसात्पक असूनही वात प्रकोपन न करता वात शमनाचें कार्य करतात. वाग्भटानें तिक्त, आणि कटु रसात्मक कांहीं अपवादात्मक द्रव्य दिली आहेत. तीं,

" तिक्तं कटु च भूयिष्ठं अवृष्यं वातकोपनम् "
" ऋते मृता पटोलाभ्यां शुंठीकृष्णारसोनतः " वा. सू. अ. १० १५

गुळवेल, कडू पडवळ, हीं तिक्त रसात्मक, सुंठ, लसूण हीं कटु रसात्मक, हीं चार द्रव्यें वात–प्रकोपक नाहींत, उलट वातक नाशक आहेत. तसेंच अवृष्य नाहींत, उलट वृष्य आहेत. याचप्रमाणे या कल्पांत गुग्गुळ हें द्रव्य आहे. हें त्याच्या गुणधर्माकडे लक्ष दिल्यास कळून येईल.

" गुग्गुलुर्विशदस्तिक्तोवीर्योष्णः पित्तलः सरः "
" कषायकटुकः पाकेकटूरोक्षपोलघुः परः "
" भग्नसंधानकृत्वृष्यः सूक्ष्मः स्वर्यो रसायनः "
" दीपनः पिच्छिलो वल्यः कफवातव्रणापची: "
" मेदोमेहाश्मवातास्च क्लेदकुष्ठाममारुतान् "
" पिडिकाग्रंथिशोफार्शोगंडमालाकृमीन्जयेत् "

गुग्गुळ हा वातनाशक आणि वृष्य आहे हें वरील गुण–धर्मावरून दिसून येते. या कल्पांत हें प्रधान द्रव्य असून याचे प्रमाणही वरेच मोठें आहे. म्हणून या कल्पाचे कार्य गुग्गुळ या प्रधान द्रव्याला अनुसरून होते. हें योगराज गुग्गुळाच्या गुणधर्मावरून म्हणतां येते.

" ....त्रिदोषघ्नो रसायनः "
" मैथुनाहारपानानां त्यागो नैवात्र विद्यते "
" सर्वान्वातामयान्कुष्ठानर्शांसि ग्रहणीगदम् "
" प्रमेहं वातरक्तं च नाभिशूलं भगन्दरम् "
" उदावर्तं क्षयं गुल्मं अपस्मारमुरोग्रहम् "
" मन्दाग्निं श्वासकासंच नाशयेदरुचिं तथा "
" रेतोदोषहरः पुंसां रजोदोषहरः स्त्रियाम् "
" पुंसामपत्यजनको वन्ध्यानां गर्भदस्तया "
" रास्नादिक्वाथसंयुक्तो विविधं हन्ति मारुतम् "
काकोल्यादिशृतात्पित्तं कफमारग्वधादिना "
" दार्वीशृतेन मेहांश्च गोमुत्रेण च पाण्डूताम् "
" मेदोवृद्धि च मधुना कुष्ठं निम्बशृतेन च "
" छिन्नाक्थायेन वातास्रं शोथं शूलं कणाशृतात् "
" पाटलाक्वाथसहितो विषं मूषकंज जयेत् "

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

"त्रिफलाक्वाथसहितो नेत्रार्तिं हन्ति दारुणम् "
" पुनर्नवादिक्वाथेन हन्यात्सर्वोदराण्यपि " (शा. म. अ. ७)

गुग्गुळ आणि योगराज गुग्गुळ गुणधर्मातील साधर्म्य वैधर्म्य.

साधर्म्य	*वैधर्म्य*
त्रिदोष नाशक, रसायन वातनाशक, कुष्ठ वातरक्त, अर्श प्रमेह, मेद, मन्दाग्नि, आम, यांचे नाशकत्व, वृष्य, दीपन, रस, तिक्त, कषाय, कटु, विपाककटु,	योगवाहि, रजोदोष आणि रेतोदोष हरत्व, श्वास कास नाशकत्व, ग्रहणी, भगंदर, क्षय, गुल्म, अपस्मार, नाभिशूल, यांचे नाशकत्व,
गुण:-उष्ण, सर, विशद, लघु, सुक्ष्म, पिच्छिल, रूक्ष,	गुण:-शीत, "स्निग्ध तीक्ष्ण गुरू.

हें साधर्म्य वैधर्म्य कां निर्माण झालें ? तर या कल्पाचीं जीं कारण द्रव्यें आहेत. त्यांचा संबंध कार्य द्रव्यांशीं असतो म्हणून असें गुण भेद कार्य भेद, दिसतात. कारण द्रव्यांचा, कारण गुणांचा आणि कारण कर्माचा कल्प तयार होत असतां जो समवाय होतो त्यामुळें कल्पांच्या गुणधर्मात सजातीय आणि विजातीय कार्य उत्पन्न होते. हा समवाय घडवून आणण्याकरितां संस्काराची आवश्यकता असते. याशिवाय द्रव्यांचा संयोग, त्यांचे प्रमाण, इ. गोष्टी विचारांत घ्याव्या लागतात.

"इति द्रव्य क्रियायोगमानाद्यैस्सर्वमादिशेत् (अ.हृ.अ.६/३०)

द्रव्य:—या कल्पातील द्रव्यें कोणकोणत्या गुणांची आहेत याचा विचार करणें आवश्यक आहे. मागें कल्पांत असणाऱ्या गुणद्रव्यांचा विचार त्याच्या प्रमाणासह केला आहे. या कल्पांत उष्ण गुणात्मक द्रव्यांचें प्रमाण ८४·७ आहे. या उष्ण गुणांच्या कार्याला अनुकूल अशा सर, रुक्ष, लघु गुणांचे प्रमाणही त्याच्या क्रमाक्रमानी कमी मिश्र केलेले आहे. दोष आणि मल यांचें पचन अुष्ण गुणाकडून होत असते. पण द्रव्यांच्या ठिकाणी सूक्ष्म गुण हा प्रभावी घटक आहे. हा गुण द्रव्याला स्रोतसामध्यें घेऊन जातो. आणि नंतर द्रव्य व दोष यांचा संयोग होतो. या संयोगामुळें द्रव्याच्या इतर गुणांचे कार्य सुरु होते. द्रव्य हें स्रोतसांत गेल्या नंतर त्यातील उष्ण गुणानीं दोष आणि मल यांचें पचन होऊं लागते, दोष आणि मळ यांचे विकृत स्वरुप नाहीसें झाल्यावर त्यांना स्वस्थानी परत जाण्याकरितां किंवा नेण्याकरिता सर गुणांची आवश्यकता आहे सर गुणामुळें वात आणि मल यांचे अनुलोमन केलें जातें. रुक्ष गुणामुळें शरिरांतील क्लेद कमी केला जातो. ज्या अवस्थेंत शरिरांत क्लेद वाढतो तेथें या गुणाकडून आर्द्रता कमी होते. कफ दोषाच्या वृधिमध्यें या गुणांचे कार्य होत असते, लघु गुणांचे कार्य शरिरांत लाघव निर्माण करणे, अुत्साह, स्फूर्ती उत्पन्न करणें हें आहे. योगराज गुग्गुळांत या गुणांचे प्राधान्य आहे. हें प्राधान्य निर्माण करण्यासाठीं कल्प तयार करणाऱ्यानीं विशिष्ठ द्रव्याचा समवाय संबंध घडवून आणला आहे. द्रव्य हें सजातीय द्रव्यांना, गुण हे सजातीय गुणांना आरंभक आहेत. म्हणून सामान्य द्रव्यें एकत्र मिश्र करुन त्यांचा कल्प बनविला आहे. (सामान्य मेकत्वकरम्) हें सामान्यत्व कटु रसात्मक आहे. या कल्पांत कटु रसात्मक द्रव्यें ३८·९ आहेत.बाकीच्या रसांचा विपाक कटु होतो. एकंदर द्रव्यांचा विपाक ८५·३४ आहे.या कल्पाचे एकंदर कार्य कटु रसात्मक होते. विपाकाचे कुर्य रसाप्रमाणें होते. (रसैरसौतुल्य फल:) अशारीतीनें कटुरसानीं सामान्यत्व येते. तसेच गुणांचेही सामान्यत्व या कल्पांत सहाजिकच आलेलें आहे. या कल्पाचीं समवायि कारण द्रव्ये आणि गुण यांचे सामान्यत्व पाहिल्या नंतर त्यांत कांहीं विशेष द्रव्यांचे समवायहि केले आहेत. तें कां याचा विचार करुं. कटु रसामुळेंच शरिरावर दुष्परिणाम होऊं नये म्हणून या विशेष द्रव्यांचा उपयोग केला आहे, तीं द्रव्यें म्हणजें मधुर विपाकात्मक होत मधुर विपाकात्मक द्रव्यांचे प्रमाण १४·६५ आहे.

रस आणि विपाक यांचे कार्य गुण-प्रभावांत अंतर्भूत होते. याच प्रमाणें वीर्याच्या कार्यांचा अंतर्भाव गुण- प्रभावांतच केला आहे. या कल्पाच्या कार्यांचे विश्लेषण द्रव्य-प्रभाव, गुण-प्रभाव आणि द्रव्य-गुण-प्रभाव या पद्धतींनें पुढें येणार आहे. तूर्त आपणांस कल्पामध्यें द्रव्यें कोणत्या तत्वानीं मिश्र केली आहेत एवढेंच पाहावयाचे होते. म्हणून त्याचे विवेचन केलें आहे. समान-गुण-धर्माची द्रव्यें मिश्र केल्यामुळें कल्पाच्या गुणधर्मात कोणता फरक होतो ते पाहूं.

समान गुण-धर्मात्मक द्रव्यें संयोजित केली असता त्यांच्या कार्यात वाढ होते. म्हणजे त्यांचे कार्य जास्त प्रभावी होते. (मध्वादेरपि द्रव्यस्य किंचित् द्रव्यं समानगुणस्य शक्त्युत्कर्ष कुर्वदेव दृष्टम्) हीं कल्पना फार जुनीं आहे. चरकांतही अशारीतीनें चिकित्सा केलेली आढळून येते. पित्तज्वराच्या चिकित्सेत पित्तनाशक अनेक द्रव्यें मिश्र केलेले काढे आढळतात. याचप्रमाणें रसायन कल्पांतहि अनेक समान गुणधर्मात्मक द्रव्यें मिश्र करुन कल्प तयार केलें आहेत.

या कल्पांत उष्ण द्रव्यांचे प्रमाण ८४·७ आहे. कटु रसात्मक व कटु विपाक असणारी द्रयें उष्ण वीर्य असतात

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सा सामान्य नियम आहे. या नियमाला अनुसरुन हा कल्प ष्ण वीर्य आहे. या कल्पांत उष्ण वीर्यात्मक द्रव्यें अधिक माणांत संयोजित केली आहेत. या समान वीर्यत्वाचे महत्व रकाचार्यांनीं पूढील सूत्रांत सांगितलें आहे.

तुल्य वीर्य असणाऱ्या द्रव्यांचा संयोग अधिक असला र क्रियासामर्थ्य वाढते. आणि विरुद्ध वीर्य असणाऱ्या व्यांचें कार्य त्यांना बाधक होऊं शकत नाहीं.

(विरूद्धवीर्यमप्येषां प्रधानानामबाधकम्, अधिकं ल्यवीर्ये हि क्रियासामर्थ्यामिष्यते. च. क.) या सूत्रावर कानीं टीका लिहिली आहे तींत पुढील स्पष्टीकरण केलें ाहे. "तुल्यवीर्ये संयुक्ते सति क्रियासामर्थ्यमधिकं भवति त्यर्थः"

या कल्पांत प्रधान द्रव्य गुग्गुळ आहे, तो कटु, तिक्त, षाय रसात्मक आहे. म्हणून या कल्पांत कटु, तिक्त कषाय सांचीं द्रव्यें संयोजित करण्यांत कल्पकाराची शास्त्रीयता सून येते. यांत कांहीं विरुद्ध वीर्यात्मक द्रव्यें आहेत पण ांचे विरुद्ध कार्य होत नाहीं. तेहि प्रधान द्रव्याप्रमाणे र्य करतात.

यानंतर दुसरा एक संयोग या कल्पांत केलेला ाहे तो सेंद्रिय आणि निरिंद्रिय द्रव्यांचा होय. निरिंद्रिय ्यें हीं योगवाहि आहेत. तीं सेंद्रिय द्रव्यांचे क्रिया मर्थ्य वाढवितात. सेंद्रिय द्रव्यें ५१·७ आणि िरिंद्रिय-द्रव्यें ४८·२ आहेत.

या विवेचनांत द्रव्यांचे सेंद्रिय आणि निरिंद्रिय वर्गी-रण, त्यांचा संयोग व त्याचे महत्व दाखविलें. नंतर सर्व द्रव्यावर केल्या जाणाऱ्या क्रियांचे महत्व काय ाचा विस्तार करुं.

क्रिया:—म्हणजे संस्कार होय. या कल्पांत संस्कार फार सोपा आहे गुग्गुळातच प्रथम पाक करून त्यांत द्रिय आणि निरिंद्रिय द्रव्यें मिश्र करावीं. नंतर त्यांचा कजीव होऊन गोळा होईपर्यंत खल करावा किंवा खलांत मिश्रण घेऊन बत्त्यांनीं कुटावें. त्याचा एकपिंड झाला णजे तो गोळा तुपानीं राबलेल्या मडक्यांत ठेवावा. ा त्या पाकांत एकजीव होण्याइतपत तूप मिश्र करावें.

संस्कारामुळें कोणते गुणांतर होते? ा याची आवश्यकता काय? दोन द्रव्यांचा संयोग समवाय होण्यासाठीं क्रिया करावी लागते. ही क्रिया ने, पाणी, भावना, इ. प्रकारानीं आयुर्वेदांत सांगितलो हे. योगराज गुग्गुळांत पाक-क्रिया आणि घृत-भावना हा संस्कार अत्यंत महत्वाचा आहे. पाक-क्रियेनीं द्रव्यांचा, गुणांचा समवाय होतो. आणि नवीन द्रव्य तयार होते. आणि घृत-भावनेनीं त्यांत कमी असणाऱ्या स्निग्ध गुणांची वाढ होते. गुग्गुळ कल्पांत स्निग्ध गुण २९·९ आहे, आणि रूक्ष गुण ४९·६ आहे. रूक्ष गुणाचे आधिक्य असल्यामुळें त्याचे प्रभावी कार्य होऊं नये म्हणून स्निग्ध द्रव्याची भावना दिलेली आहे. या कल्पांत गुग्गुळ हें प्रधान द्रव्य आहे. पण ते रूक्ष गुणात्मक आहे. त्याच्या या रूक्ष गुणाचे कार्य कमी प्रमाणानीं व्हावें. हा हेतू शास्त्रीय विचाराला धरून आहे हें पुढील उताऱ्यावरून दिसते.

"अल्पस्यापि महार्थत्वं प्रभूतस्याल्पकर्मताम्"
"कुर्यात्संयोगविश्लेषकालसंस्कारयुक्तिभिः" (च. क. अ. १२।४८)

अल्प द्रव्याचे कार्य फार मोठे आणि फार प्रमाण अस-लेल्या द्रव्याचे कार्य कमी व्हावें याकरितां अनुक्रमे संयोग आणि विश्लेष, काल, आणि संस्कार या क्रिया कराव्या. या कल्पांत रूक्ष गुणांचे विश्लेषण व्हावें या हेतूनें तुपाचा संयोग योगराज गुग्गुळ या द्रव्याशीं केला आहे. तुपांत असणाऱ्या स्नेह गुणाचा संयोग कल्पांत असणाऱ्या स्नेह गुणाशीं होतो, आणि कल्पांत असणाऱ्या रूक्ष गुणांचे विश्ले-षण होते. या विश्लेषणानीं रूक्ष गुणाचे प्रभूत कार्य कमी केले आहे. या संस्कारामुळें हा कल्प उष्ण स्निग्ध गुणांनीं युक्त झाला आहे. यामुळें याचे कार्य विशेषें करून वात-रोगांत होते.

मान—या कल्पांत सर्व द्रव्यापेक्षां गुग्गुळाचे प्रमाण अधिक आहे. व तेंच प्रधान द्रव्य आहे. याचे प्रमाण २५·८ आहे. म्हणून या कल्पाचे कार्य गुग्गुळ या द्रव्याप्रमाणे होते. आतां आपण गुग्गुळाचे गुणधर्म आणि कल्पाचे गुणधर्म यांच्यामध्यें साधर्म्य वैधर्म्य कां निर्माण झाले आहे त्याचा विचार करुं.

योगराज गुग्गुळ हा योगवाहि, शीत, स्निग्ध, तीक्ष्ण, आणि गुरू या अधिक गुणांनीं युक्त झाला आहे. याचे कारण त्यांत असणाऱ्या द्रव्यांचा संयोग होय. घृताचा संयोग झाल्यामुळें त्यांत शीत, स्निग्ध गुणांची वाढ झाली: योगवाहि कार्यकर्तृत्व निरिंद्रियद्रव्याच्या संयोगानीं त्याच्या ठिकाणीं आले आहे. रेतोदोषहरत्व, अपत्य जनकत्व हें कार्य घृताच्या संयोगानीं या कल्पाच्या ठिकाणीं आले आहे. कर्म हें कारण द्रव्यांच्या कर्माप्रमाणेच येते असें नाहीं. ते कारण द्रव्याप्रमाणे किंवा त्याहून भिन्न असेही निर्माण

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होते. हा कल्प कारण द्रव्याप्रमाणे कार्य करणारा आहे. म्हणून यांस सजातीय कर्म करणारा असें म्हणतां येईल.

निरनिराळीं द्रव्यें अेकत्र करून अेक जिनसी योगराज गुग्गुळ हें कार्यद्रव्य तयार केलें आहे. याचे कार्य किती तऱ्हेनीं होते तें पाहूं. स्वाभाविक अुत्पन्न झालेलें द्रव्य असो किंवा कृत्रिम तयार केलेलें द्रव्य असो, त्याच्या कार्याचा विचार आयुर्वेदीयांनीं पुढीलप्रमाणे केला आहे.

" तद्द्रव्यमात्मनाकिंचित्किंचिद्वीर्येणसेवितम् "
" किंचिद्रसविपाकाभ्यां दोषं हन्ति करोति वा "
सु. सू. अ. ४०/१६

सेवन केलेल्या द्रव्याचे कार्य कांहीं त्याच्या स्वतःकडून कांहीं वीर्याकडून कांहीं रस, विपाका कडून होते. ही विचार सरणी द्रव्य, रस, वीर्य, विपाक इ. मत मतांतराच्या गलबल्यातून समन्वयात्मक निघालेली आहे. हीच योग्य व अनुभवात्मक आहे. या विचार सरणीचा अनुवाद वाग्भटानेंहि पुढील सूत्रांत केला आहे.

" किंचिद्रसेन कुरुते कर्म पाकेन वा परम् "
" गुणांतरेणवीर्येण प्रभावेणैवकिंचिन "
वा. सू. अ. ६/९/२२-२३

सुश्रुताच्या विचार सरणीपेक्षा वाग्भटाच्या विचारांत थोडा फरक आहे. वाग्भटानें रस आणि गुण हे दोन निराळे केले आहेत. सुश्रुत गुणांचा स्वतंत्र अुल्लेख करीत नाहीं. वरील विचाराप्रमाणे आपण या कल्पांतील जें प्रधान द्रव्य गुग्गुळ त्याचा विचार करूं.

गुग्गुळाच्या कार्याचे विश्लेषण

द्रव्य–प्रभाव कार्य	गुण–प्रभाव कार्य	द्रव्य–गुण–प्रभाव
वृष्य, रसायन, वातनाशक.	कटु, तिक्त, रसाश्रयि गुण. कटु विपाकाश्रयि गुण, अुष्ण, लघु सर, सूक्ष्म, या गुणामुळें दीपन, मेद नाशक, क्लेद नाशक, प्रमेह नाशक, पिच्छिल गुणामुळें अस्थिसंधानकर, प्राणधारण. विशद गुणामुळें क्लेद कमी करून व्रण रोपण.	ग्रंथिनाशक, गंडमाला, शोफ, आमवात नाशक.

वरील कार्याचे स्पष्टीकरण

द्रव्य – प्रभावः— गुग्गुळ हा कटु तिक्त कषाय रसात्मक आहे; याचा विपाक कटु आहे. कटु, तिक्त रस हे वातप्रकोप करणारे असतात असा सामान्य नियम आहे. पण याला कांहीं द्रव्यें अपवाद आहेत. त्या अपवादात्मक द्रव्यांत गुग्गुळाची गणना करावी लागते. हीं अपवादात्मक द्रव्यें तरी असे कार्य कां करतात ? असा प्रश्न अुत्पन्न होतो. याचे अुत्तर ग्रंथकारानीं द्रव्य–प्रभाव असें दिलें आहे. कटु, तिक्त द्रव्यें अवृष्य असतात पण यालाहि गुग्गुळ अपवादच आहे. गुग्गुळ हें द्रव्य वृष्य, वातनाशक, रसायन कार्य करते तें द्रव्य–प्रभावानीं होय.

गुण – प्रभावः— रसद्वारा, वीर्यद्वारा, विपाकद्वारा जीं कार्यें होतात तीं सर्व गुणप्रभावांत येतात. या तीन प्रकारापैकीं रसद्वारे होणाऱ्या कार्याचा विचार प्रथम करूं.

रसामार्फत होणारें कार्यः— गुग्गुळांत असणाऱ्या कटु, तिक्त, कषाय रसांचे कार्य मुखापासून पक्वाशयांत रसांचे पचन झाल्यानंतर विपाकाच्या कार्यास सुरवात होते. रसांची रचना विशिष्ट पंचमहाभूतात्मक असते. अुदा. मधुर रस हा पृथ्वी आणि आप या महाभूतापासून अुत्पन्न होतो. द्रव्यांची रचना महाभूतांच्या विशिष्ट प्रमाणानीं होते. (प्रमाणतः प्रभाश्चावयवानामुत्कर्षसत्भावः) म्हणून द्रव्य–प्रभावाचे कार्य निराळे होतें. कटु, तिक्त, कषाय रसांचे कार्य महास्रोतसांत कसें घडतें तें पाहूं.

रसाचे कार्य स्थानिक होते, असें कांहीं विद्वानांचे मत आहे. ते आज मी गृहीत धरून विवेचन करीत आहे. रसांचीं कार्यें आयुर्वेदांत जीं सांगितलेंली आहेत तीं पाहतां रसाचे कार्य सार्वदेहिक होत असावें असे वाटते. पण हे आज विचारांत घेऊन घोटाळा निर्माण करणें बरे नाहीं. रसांचे कार्य सार्वदेहिक असल्याचा आधार कांहीं उदाहरणें घेऊ मधुर रसाचे कार्य दोन तऱ्हेनीं सांगितलें आहे. एक स्थानिक आणि दुसरे सार्वदेहिक, स्थानिक कार्य म्हणजे त्याच्यां स्वरुपाचे वर्णन ज्या सूत्रांत केलें आहे ते त्या सूत्रांत " देहस्य ल्हादनो क्षप्रसादनः " असें म्हटलें आहे. हें जरी स्वरुप म्हणून सांगितलें असलें तरी हें कार्य सार्वदेहिक आहे. सार्वदेहिक कार्याचे वर्णन धातूना बल देणें, बृहण इ. हीं कार्यें रसांची कीं विपाकांची ? असा प्रश्न उत्पन्न होतो. येथें मधुर रसाचा विपाक मधुर होत असल्यामुळें दोहोंचे कार्य सारखेंच होते. पण तिक्त आणि कषाय रसांच्या बाबतींत मात्र अडचण उत्पन्न होतें, कारण या दोन रसांचा विपाक कटु होतो. येथें तिक्त आणि कषाय रसांचे सार्वदेहिक कार्य जें वाग्भटानें लिहलें आहें ते होत नाहीं काय ? उदा. तिक्त रसाचे कार्यांत स्तन्य शोधन हें सार्वदेहिक कार्य सांगितले आहे तें होते कीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नाहीं? कारण याचा विपाक कटु होतो. याबाबतींत मला असें वाटतें कीं, तिक्त रसाचे कार्य जे वाग्भटानीं सांगितलें आहे. त्याप्रमाणें होते, असा अनुभव येतो. स्तन्य शोधन गण वाग्भटानें सूत्रस्थानांत दिला आहे. तो दिला असतां मुलांना तिक्त रसानीं छर्दी सुरु होते. दुधाला किंचित् कडवटपणा येतो तरी या गोष्टीचा, या घटनेचा विचार वैद्यांना करावा लागेल. ही घटना आणखी कांहीं प्रयोगानीं सिद्ध करावी लागेल तो पर्यंत आपण रसाचे स्थानिक कार्य धरून चालू. या रसांत असणाऱ्या गुणांचे कार्य मुखापासून पक्वाशया पर्यंत होते.

विपाक:— विपाकाचें कार्य द्रव्यांच्या पचनानंतर सुरूं होते. कायाग्नीमुळें जें रस, गुण द्रव्यांत असतात त्यांत वदल होतो. आणि त्यांचेच कार्य दोष, धातु आणि मल यांच्यावर होते. हें कार्य आपणांस अनुमानानीं आणतां येते. गुग्गुळाचा विपाक कटु आहे त्याचे कार्य दोष, धातु आणि मल यांच्यावर घडते.

वीर्य:— वीर्याचे कार्य क्षेत्र फार मोठें आहे. वीर्य दोन प्रकारचे मानावे हें बरे. वीर्याच्या कार्याचे ज्ञान प्रत्यक्ष आणि अनुमानानीं होते. वीर्य शरिरांत जोपर्यंत असते तोपर्यंत कार्य घडत असते. अर्थात् द्रव्याचे शरिरांत अस्तित्व असे पर्यन्त वीर्याचे कार्य होत असते. या वीर्याच्या व्याख्या दोन प्रकारच्या आहेत. १ वीर्यं तु येन या क्रियते क्रिया ना वीर्यं कुरूते किंचित् सर्वा वीर्यंकृता क्रिया " (चरक) येन कुर्वंति तद्वीर्यं " (सुश्रुत) याचे स्पष्टीकरण चक्रदत्त पुढील प्रमाणे करतो. " येनेति रसेन वा विपाकेन वा प्रभावेण वा गुर्वादिपरस्त्वादिभिर्वा गुणैर्या तया तर्पणल्हादनशमनादिरुपा कृत्स्ना क्रियत इत्युपदिश्यते तस्यां क्रियायां तद्रसादि वीर्यम् " द्रव्यांचे रसाकडून विपाकाकडून, प्रभावाकडून, गुर्वादिगुणाकडून, परत्वादि गुणाकडून ल्हादन, शमन इ. ज्या क्रिया होतात. त्या सर्व वीर्या कडूनच केल्या जातात. २ " रसविपाकप्रभावातिरिक्ते प्रभूतकार्यकारिणीगुणे वीर्यम् इति संज्ञा " रस, विपाक, प्रभाव यांच्याहून निराळा द्रव्यांत असणारा कार्यकारि गुण. या दोन विचारांत विरोध आहे. पहिल्या विचारापेक्षा दुसरा विचार माझ्या दृष्टीनें योग्य आहे. रस, विपाक आणि प्रभाव यांच्याहून वीर्याचे कार्य निराळें आहे हें सिद्ध करतां येते. सृष्टीतील कोणतेहि द्रव्य सत्व, रज, आणि तम या त्रिगुणांना सोडून नाहीं. त्रिगुणांपैकीं रज म्हणजे शक्ति य शक्ती कडूनच द्रव्याचीं रचना होते. या संबंधी विवेचन चंद्रप्रभा लेखांत केलें आहे. ही जी शक्ति तीच द्रव्यातील वीर्य अशी कल्पना पहिल्या प्रकारांत मांडलेली आहे. आणि दुसऱ्या प्रकारांत ह्या शक्तींच्या ज्या कार्य करण्याच्या तऱ्हा आहेत त्यांचा विचार केला आहे. हाच विचार आपणांस रस, वीर्य, विपाक आणि प्रभाव या दृष्टिकोनातून करावयाचा आहे. रस, विपाक आणि प्रभाव यांच्या ठिकाणीं असणारी जी शक्ति ती म्हणजे वीर्य हें म्हणणे योग्य नाहीं. कारण द्रव्यांत शक्ति मूलतःच आहे, त्याशिवाय द्रव्याची उत्पत्ति होऊ शकत नाहीं. म्हणून रस, विपाक, प्रभाव यांच्याहून निराळी जी शक्ति ते वीर्य, हीच व्याख्या योग्य आहे. ती शक्ति कोणती ? कशी ओळखतां येईल ? याचा विचार करूं.

द्रव्याकडून रस, वीर्य, विपाक आणि प्रभाव या प्रकारानीं क्रिया घडतें या चार प्रकारांतील भेदाचे ज्ञान आपणास कसें होतें तें पाहूं.

रस, वीर्य, विपाक आणि प्रभाव यांच्या कार्यांतील भेद

करण	प्रामाण्य	कार्यस्थानें	कार्य
१ रस	प्रत्यक्ष	निपात स्थान. १ अंतः २ बहिः	बोधक कफ, आमाशयांतील रंजक–पित्त व क्लेदक कफ यांची वृद्धि आणि क्षय.
२ वीर्य	प्रत्यक्ष, अनुमान	शरीर, इंद्रियें, मन आणि आत्मा.	द्रव्याचा आणि शरीराचा संबंध झाल्यापासून द्रव्य शरीराबाहेर जाईपर्यंत वीर्याचे कार्य चालू असते. ते कार्य म्हणजे संयोग आणि विभाग हें होय. वीर्याचे प्रकार दोन. ऊष्ण आणि शीत. उष्ण वीर्याचें कार्यः—भ्रम, तृड्, ग्लानि, स्वेद, दाह, आशुपाकिता, वातकफाचे शमन, हीं सर्व कार्ये विभागात्मक आहेत. भ्रमामध्यें मनोदेश आणि देहदेश विकृत होतात. मनाच्या दोषांपैकीं रज विकृत होतो, देह देशापैकीं पित्त, वात विकृत होतात. मनोदेशांतील रज, आणि देहदेशातील वायु हें विभागाला कारण आहेत,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

			भ्रम विकारांत शरीर इंद्रियें, मन यांचा संयोग नाहींसा होतो. याचप्रमाणें दाह, तृष्णा रोगांत पित्त आणि रक्त तृष्णेमध्यें बल क्षय होतो. हें कार्य अुष्ण वीर्यामुळें होते. आणि पित्त वाढते. अशा रीतीनें अुष्ण वीर्यामुळें शरीर, इंद्रियें, मन, आत्मा यांच्या संयोगाचा नाश केला जातो. शीत वीर्याचें कार्यः— याचें कार्य शरीर, इंद्रियें, मन, आणि आत्मा यांचा संयोग टिकविणें, किंवा संयोग अुत्पन्न करणें, ल्हादन, जीवन, स्तंभन, रक्त-पित्त प्रसादन हीं सर्व कार्यें संयोगात्मक आहेत. अुदा. जीवन आणि रक्त प्रसादन यांचा विचार करूं. रक्तं जीव इति स्थितिः ॥ रक्त हें जीवन आहे. तसेंच रक्त प्रसादनामुळें शरीर, इंद्रियें, मन आणि आत्मा यांचा संयोग केला जातो. रक्त हें या संयोगाला आश्रय-भूत आहे. (शरीरेंद्रियसत्वात्मसंयोगाश्रयरक्त) असें डल्हण म्हणतो. संम्मीलन आणि उन्मीलन हीं कार्यें पाणी आणि अग्नि यांची आहेत. (सम्मीलनमद्‌भिरुन्मीलनं तेजसा) संकोच आणि विकास असें याचे पर्याय शब्द आहेत. सृष्टी ही अग्नि सोमात्मक आहे म्हणून उष्ण व शीत अशीं दोनच वीर्यें मानलीं आहेत. हीं दोन गुणांतही समाविष्ट केलेलीं आहेत. पण गुणांचे कार्य द्रव्य पचनानंतर होते. उष्ण आणि शीत या दोन गुणांचे कार्य शरिरांतील चयापचयाशीं निगडित असल्यामुळें त्यांना वीर्य असें म्हटलें आहे.
३ विपाक	अनुमान	रसरक्तादि धातु, त्रिधातु, त्रिमल.	द्रव्याच्या पचनानंतर दोष, धातु आणि मल यांच्या वृद्धिक्षयामुळें याचे ज्ञान होते. द्रव्याचे पचन होत असतां द्रव्याची जी पंचमहाभूतात्मक रचना त्या पंचमहाभूतांचेही पचन होते, आणि त्यांच्या गुणांचे कार्य विपाकामार्फत होते, तसेंच गुरु-मंदादि गुणांचेही पचन होऊन रसांतर आद्य रस—धातू-बरोबर सर्व शरिरांत जाऊन रसादि धातूंचे, त्रिधातूंचे वृद्धि किंवा क्षय उत्पन्न करते. तसेंच दोषांचे शमन करते.
४ प्रभाव	शब्द	सर्व शरीर	रस, वीर्य, विपाक यांची कार्यकारण मीमांसा सांगता येते, सांगितली आहे. पण प्रभावाची कार्यकारण मीमांसा सांगतां येत नसल्यामुळें तो अचिंत्य आहे असें शास्त्रकारांनीं म्हटलें आहे. अशीं द्रव्यें आधुनिक वैद्यकांतही आहेत. त्यांना अेंपिरकल असें म्हणतात. याचे कार्य त्रिधातु, रसादि सप्त धातु, त्रिमल यांच्यावर होतें. वृद्धि, क्षय, दोष शमन, रोगघ्न, वमन, विरेचन, विषघ्न.

रस, वीर्य, विपाक आणि प्रभाव यांच्या कार्यान्ने स्पष्टीकरण वरील प्रमाणे केले आहे. या स्पष्टीकरणानीं आपणांस प्रत्येकाच्या कार्यांत आणि स्थानांत भेद कसा आहे तें कळण्यासारखें आहे. वीर्यामध्यें असंवादी शक्ति रस, विपाक आणि प्रभाव याहून निराळी आहे, हें वरील विवेचनावरून समजून येईल. मागे गुग्गुळाच्या कार्याचा विचार रसापर्यंत येवून थांबला आहे. तरी आपण रसानंतर गुग्गुळाच्या वीर्य विपाक आणि प्रभाव या कार्याचा विचार वरील स्थान परत्वें व कार्यपरत्वें करणें आवश्यक आहे. आणि तसेंच द्रव्य—प्रभाव, गुण—प्रभाव, द्रव्यगुण—प्रभाव या चौकटींत ते विवरण कसें बसते त्याचा विचार पुढील लेखांत करीत आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नवा अविष्कार

स्त्री, पुरुष, बालक या सर्वांच्याकरिता

अत्युत्तम महौषधी

नवरत्नरस

हा हिरा, माणिक, मौक्तिक इ. नवरत्नें आणि सुवर्ण यांच्या संयोजनानें तयार करण्यांत आलेला कल्प आहे. शरीरस्थ रस, रक्त आदि सप्त धातूंची शुद्धि, वृद्धि व पोषण, शुक्र, वीर्य यांची शुद्धी आणि पुष्टी करणें हे या औषधाचें विशिष्ट कार्य आहे. तसेच यानें नपुंसकत्व, वीर्यस्राव, स्वप्नदोष इ. चे निर्मूलन होऊन नवयौवन प्राप्त होते. स्त्रियांच्या गर्भाशयशोथ, प्रदर वारंवार होणारा गर्भपात, गर्भवतीच्या हातापायांवरील सूज व फिक्कटपणा यांवरहि गुणकारी आहे. वंध्यत्वाचा दोष दूर करणारी ही अपूर्व औषधी आहे. मुलांचे अस्थिदौर्बल्य दूर करून अस्थि बलवान करणारे, कॅलशियम व व्हिटॅमिनची उणीव, दुधाचे अपचन नष्ट करून बालकांना धष्टपुष्ट करणारे असे हे औषध आहे. क्षय, जीर्णज्वर, कास, श्वास, मधुमेह, मानसिक दुर्बलता इत्यादि मध्येंहि अतिशय उपयुक्त आहे.

नवरत्नरस—निरोगी लोकांकरिता रसायन व रोगी लोकांना आरोग्य प्राप्त करून देणारे हे महान औषध आहे.

एका बाटलीची किंमत पांच रुपये

ऊंझा फार्मसी लि. ऊंझा

(गुजराथ)



ग्राइपीन

दांत येतेवेळीं मुलांना अपचन, जुलाब इ. विकार होतात. त्यांवर "ग्राइपीन" हें अत्यंत गुणकारी औषध आहे.

धूतपापेश्वर इंडस्ट्रीज लि.

पनवेल—मुंबई

सातारा— द. रा. कुलकर्णी व व्ही. जी. डिंगणकर
द. सातारा जिल्हा एजंट—भारत वस्तु भांडार, सांगली
कोल्हापूर— वि. अ. पाडळकर, महाद्वार.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

R. No. B. 5225

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शेअरविक्री कार्यक्रमाची प्रगति

आयुर्वेदीय अर्कशाळेच्या शेअरविक्रीसंबंधीं आयुर्मीमांसेंत यापूर्वीं जाहीर विनंति केली होती. व्यक्तिशःहि अर्कशाळेचे विक्रेते व वैद्य यांना विनंतिपत्रें धाडली जात आहेत. शेअर मागणीचे अर्ज कंपनीकडे येऊ लागले असून या कार्यक्रमाची अपेक्षेनुसार प्रगति होत आहे.

कंपनीचे विक्रेते व ग्राहक वैद्य यांनीं या विजयादशमीचे पूर्वीं आपले अर्ज पाठवावे. ज्यांना अर्जाचे फार्म पोहोचले नसतील त्यानीं ते त्वरित मागवून घ्याव.

कंपनीचे कमीतकमी दहा शेअर्स घेऊन भागीदार होणाऱ्या विक्रेत्यांना व वैद्याना माल–विक्रीबाबत कांहीं कायम स्वरुपाच्या सवलती देण्याबद्दलचा निर्णय घेण्यांत आलेला आहे. त्यासाठीं त्वरित पत्रव्यवहार करावा.

★ अर्कशाळेची वैशिष्ट्यें ★

- अर्कशाळा ही मॅनेजिंग एजन्सीच्या देखरेखीखालीं नसून संचालक मंडळच तिचे काम पहाते.
- संचालक मंडळ प्रारंभापासून व सध्याहि विनावेतन काम करीत आहे.
- अर्कशाळेची विक्री प्रतिवर्षीं वाढत असून १९४८ च्या मानानें १९५० ची विक्री साठ टक्क्यानीं जास्त आहे.
- १९५० साली कंपनीनें भागीदारांना नफा वाटलेला असून तो यापुढें प्रतिवर्षीं वाटता येईल अशी संचालकांना उमेद आहे.

पत्रव्यवहार करा–

सेक्रेटरी, आयुर्वेदीय अर्कशाला लि; सातारा.

हें मासिक श्री. *विश्वनाथ लक्ष्मण आगाशे* यांनीं *आनंद प्रिंटिंग प्रेस, सातारा लि.*, येथें छापलें व आर्यांग्ल वैद्यक महाविद्यालय, सातारा येथें प्रसिद्ध केलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद प्रसारक मंडळी सातारा या संस्थेचें पुरस्कृत मासिक

गुरुकुल-पत्रिका
गुरुकुल काँगड़ी.

आयुर्मीमांसा

8-8-2042

प्रमुख संपादक : वैद्यरत्न गो. आ. फडके, आयुर्वेदाचार्य.

कार्यकारी संपादक : ब. ल. वष्ट, आयुर्वेद विशारद.

या अंकांत--

संधान-विधि

वैद्यराज पु. वि. धामणकर यांच्या लेखमालेचा चौथा लेखांक या अंकांत प्रसिद्ध होत आहे. या लेखमालेचें अनन्य साधारण महत्त्व जाणत्या वाचकांनीं मान्य केलेलें असून तिचें सर्वत्र स्वागत होत आहे. आयुर्वेदीय औषधीकरण शास्त्राच्या एका वैशिष्टयपूर्ण उपांगाचें शास्त्रीय विश्लेषण करणारे हे लेख आयुर्वेदीय ज्ञानभांडारांत बहुमोल भर टाकीत आहेत. या लेखांच्या प्रसिद्धीचा मान आयुर्मीमांसेस मिळाला याचा विशेष आनंद वाटतो.

आयुर्वेदीय वाङ्मयसेवा

आयुर्मीमांसेस ही वाङ्मयसेवा परिणामकारक रीतीनें करतां यावी याकरिता मीमांसेच्या वाचकांनीं वर्गणीदार होऊन व आयुर्वेदीय कारखानदारांनीं जाहिरातीच्या रूपानें, सक्रीय सहाय्य करावे अशी विनंति आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

औद्योगिक क्षेत्रांतील आदर्श उपक्रम

> " कंपनीच्या सहकारी–विक्रेत्यांना भागीदार या नात्यानें तिच्या मालक वर्गांत समाविष्ट करण्याची अर्कशालेची योजना आदर्श आणि अभिनव आहे "

या शब्दांत अर्कशालेचे हितचिंतक– विक्रेते आपलें मनोगत व्यक्त करीत आहेत.

अर्कशालेच्या विक्रेत्यांनीं या उपक्रमाचा अंतःकरणपूर्वक पुरस्कार केलेला असून विजयादशमीपासून आतापावेतो बहुसंख्य विक्रेत्यांनीं या योजनेंत सक्रीय भाग घेतलेला आहे किंवा तिला आपला पूर्ण पाठिंबा दर्शविलेला आहे.

निदान एक शेअर घेऊन शुभारंभ करा !

ज्या विक्रेत्यांनीं या योजनेचें स्वागत केलेलें असूनहि आर्थिक अडचणीमुळें त्यांत अद्यापी सहभागी होता आलेलें नाहीं त्यांनीं निदान या महिन्यांत एक शेअर घेऊन शुभारंभ करावा. पुढील वर्षीं यथाक्रम हप्त्यांनीं त्याना दहा शेअर्सची संख्या पुरी करता येईल.

★

आपला अर्ज आजच पाठवा : अवधि थोडा आहे

आयुर्वेदीय अर्कशाला लि. सातारा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद प्रसारक मंडळी सातारा या संस्थेचें मासिक

आ यु र्मी मां सा

संचालक : आयुर्वेदीय अर्कशाला लि. सातारा

वर्ष १४ वें] डिसेंबर १९५१. [अंक १२ वा

वार्षिक वर्गणी ३ रुपये : किरकोळ अंक ८ आणे

कोणत्याहि महिन्यापासून वर्गणीदार होता येते.

★ आयुर्मीमांसेंतील लेखांतून व्यक्त होणारी मतें ही त्या त्या लेखकांची मानली जातील. संपादक त्यांशीं नेहमींच सहमत असतात असें नाहीं.

★ आयुर्मीमांसेंत प्रसिद्ध होणाऱ्या लिखाणाविषयींचें सर्व हक्क संस्थेच्या स्वाधीन आहेत.

★ वर्गणी ज्या अंकाअखेर संपत असेल त्या अंकानंतर त्या त्या वर्गणीदारांना पुढील वर्षाची वर्गणी पाठविण्याविषयीं सूचनापत्रें जातात. ज्यांची वर्गणी संपली आहे अशा ग्राहकांनीं हें पत्र मिळतांच म. ऑ. नें वर्गणी पाठवावी. म. ऑ. आली नाहीं अगर अंक नको असल्याबद्दलहि पत्र आलें नाहीं तर त्या वर्गणीदारांना पुढील अंक व्ही. पी. नें पाठविला जातो.

अंक मिळाला नसल्याची तक्रार त्या महिन्याच्या दहा तारखेच्या आंत करावी. म्हणजे शक्य असल्यास दुसरा अंक पाठविला जातो.

सर्व पत्रव्यवहार 'व्यवस्थापक आयुर्मीमांसा, अर्कशाला बिल्डिंग, सातारा' या पत्त्यावरच करावा.

अर्कशाला-विशेषांक

अर्कशालेच्या रौप्य-महोत्सवानिमित्त आयुर्मीमांसेचा विशेषांक प्रसिद्ध व्हावयाचा आहे. मुंबई राज्यांतील सार्वत्रिक निवडणूक संपल्यानंतर कंपनीचा रौप्य महोत्सव साजरा होणार असून त्यानंतर हा विशेषांक प्रसिद्ध करण्याचा निर्णय घेण्यांत आलेला असल्यानें अंकास अद्याप अवधी आहे.

डिसेंबरच्या मध्यापासून अंकाच्या छपाईस सुरवात होईल.

अर्कशालेच्या विक्रेत्यांनीं व ग्राहक वैद्यांनीं आपला परिचय डिसेंबर अखेर पाठविण्याची कृपा करावी.

विशेषांकाची वैशिष्ट्यें

- अर्कशालेचा इतिहास
- अर्कशाला-विक्रेत्यांचा परिचय
- अर्कशालेच्या ग्राहक वैद्यांचा परिचय
- अर्कशालेची विकास योजना
- आयुर्वेदीय औषधी निर्मिति-व्यवसायाविषयीं चर्चात्मक लेख

विक्रेत्यानो, हे वर्ष पुरे होण्यापूर्वी विक्रीची जास्तीत जास्त मर्यादा पुरी करा आणि अर्कशालेच्या विक्रेत्यांच्या संघटनेत वरचा क्रमांक मिळवा.

विक्रीवाढ ही एक खिलाडू स्पर्धा आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

छोट्या जाहिराती

वैद्य, डॉक्टर व औषध *विक्रेते यांच्या माहितीकरित*

आयुर्वेदीय औषधी-निर्मात्यांची सूची

(हें सदर प्रत्येक अंकांत नियमितपणें प्रसिद्ध होते भारतांतील विशेषतः मुम्बई राज्यांतील सर्व आयुर्वेदीय औषधी-निर्मात्यांचा या सदराद्वारे वैद्य, डॉक्टर व विक्रेते आणि ग्राहक यांना सातत्यानें परिचय होत असतो. एक प्रकारे "Buyer's Guide" हें या सूचीचें स्वरूप असल्यानें या सदराचें महत्त्व जाहिरातदारांना वेगळें सांगावयास नको.

ज्या जाहिरातदारांच्या जाहिराती इतरत्र या अंकांत वर्षाच्या करारानें घेण्यांत आलेल्या आहेत त्यांची माहिती या सूचींत *विनामूल्य* छापली जाते. केवळ सूचीसाठीं मजकूर पाठविणाऱ्या जाहिरातदारानीं वर्षाचे करारानें जाहिरात दिली पाहिजे. वर्षाचा दर फक्त तीस रुपये आहे. ही रक्कम आगाऊ द्यावी लागेल. मजकूर जास्तीत जास्त चार ओळी असावा.)

श्रीपाद फार्मसी, पेण.

विविध प्रकाराच्या औषधी वनस्पतींचें विक्रेते. महाराष्ट्रांतील आयुर्वेदीय कारखान्यांना माल पुरविण्यांत येतो. वैद्य व गाहकांनीं माहिती मागवावी. वाकेरीभाते खात्रीने मिळते.

शा जादवजी लल्लूभाई आणि कं०

सर्व प्रकारची काष्ठौषधि व औषधी निर्मितीसाठीं लागणारी कच्ची द्रव्ये यांचे विक्रेते. २४५ काळबादेवी रोड मुंबई २.

जी. ए. मिश्रा आयुर्वेदिक फार्मसी, झांशी. (यू. पी.)

विविध आयुर्वेदीय इंजेक्शन्सचे निर्माते. इंजेक्शनविषयक "सचित्र आयुर्वेदिक इंजेक्शन विज्ञान" या पुस्तकाचे प्रकाशक.

अरविंद केमिकल वर्क्स, छिंदवाडा (मध्य प्रदेश)

विविध आयुर्वेदीय इंजेक्शन्सचे निर्माते. सचित्र आयुर्वेदिक इंजेक्शनचिकित्सा (मूल्य ३ रु.) या पुस्तकाचे प्रकाशक.

डॉ. पुरोहित फार्मसी, कोल्हापूर.

पुरोहित श्वासहारी, शोधना इ. विख्यात औषधाचें निर्माते.

आयुर्वेदिक धन्वतरी फार्मसी अहमदनगर

सर्व प्रकारची आयुर्वेदीय औषधें शास्त्रोक्त पद्धतीनें तज्ञ वैद्यांच्या देखरेखीखालीं तयार केली जातात.

ऊंझा फार्मसी लि. ऊंझा (उ. गुजराथ)

छप्पन्न वर्षांपासून चालू असलेली संस्था. शास्त्रोक्त व पेटंट औषधे तयार केली जातात.

अपोलो फार्मास्युटिकल वर्क्स लि.,

विविध आयुर्वेदीय इंजेक्शन्सचे निर्माते. वैद्याना इंजेक्शनचे शिक्षण दिले जाते. पत्रव्यवहार— प्रतापगंज बडोदा.

आयुर्वेदीय अर्कशाला लि., सातारा.

सर्व प्रकारची आयुर्वेदीय औषधें तयार केली जातात. आयुर्वेद प्रसारक मंडळी या संस्थेच्या रुग्णालयांत ती पारखलीं जातात. महाराष्ट्र, कर्नाटक, मध्यप्रदेश, हैद्राबाद या भागांत सर्वत्र विक्रेते आहेत.

संसार में सर्व प्रथम आयुर्वेदिक इन्जेक्शन की आविष्कर्त्ता और निर्माणकर्त्ता
जी॰ए॰ मिश्रा आयुर्वेदिक फार्मेसी (रजिस्टर्ड) झाँसी के
बने हुए
नारफापता इन्जेक्शन झाँसी
मिश्रा आयुर्वेदिक इन्जेक्शन्स
फोन नं॰ ४६३
प्रयोग कर निरोग बनें
हमारे यहां इन्जेक्शन लगाने की शिक्षा प्राप्त करने के लिये नियम सूची मंगालें।

हें सदर अवश्य वाचा.
तें उपयुक्त आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

एक अर्कशाला औषध

स्तन्य शोधन

घटक द्रव्यें : १ शतावरी २ गुळवेल ३ काडेचिराईत ४ कुटकी ५ पाठा ६ सारिवा ७ देवदार ८ सुंठ ९ नागरमोथा १० इंद्रयव

"स्तन्यशोधन" हा कल्प मातांचें दूध निर्दोष व्हावें व अंगावर पिणाऱ्या बालकाचें आरोग्य सुधारावें या हेतूनें निर्माण करण्यांत आला आहे. चरकाचार्यांनीं जो दहा औषधांचा "स्तन्यशोधक गण" सांगितला आहे त्यांतील द्रव्यें या कल्पांत आलीच आहेत. शिवाय शतावरी हें स्तन्यवर्धक आणि शोधक द्रव्य अधिक घातलें आहे. याचे कारण अंगावर मूलतः दूध उत्पन्न झाल्याखेरीज व त्याचा प्रवाह सतत असल्याखेरीज, शुद्धी करितां येणार नाहीं. स्तन्य कमी न पडता त्याचा भरपूर स्राव व्हावा व ते मात्र शुद्ध असावें असा यांतील हेतू आहे.

निर्दोष दुधाचा वर्ण, स्पर्श गंध व चव हीं प्राकृतिक असतात. एकाद्या कांच पात्रांत स्वच्छ पाणी घेऊन त्यात दुधाची धार मिसळल्यास तें दूध त्या पाण्याशीं झटकन एकरुप होऊन पसरतें. असें स्तन्य शुद्ध आहे. असे समजावें. अशा दुधापासून तें पिणाऱ्या बालकाचें आरोग्य कायम टिकतें व ते बालक चांगलें पुष्टपुष्ट होते.

दुधांत असणारा द्रवांश, त्यांतील मधुरता अथवा शर्करा, स्निग्ध भाग, ही सर्व प्राकृतिक असावी लागतात. म्हणजे ते दूध मुलाला सहज पचते व त्याला मानवते. व त्यापासून त्याला कोणताच विकारही होत नाहीं. याच्या उलट त्यांतील प्राकृतिक गुण कमी झाले तरी ते दूध पथ्यकर ठरत नाहीं किंवा त्या दुधांत फाजील गुणांची वाढ झाल्यानंतर ते आरोग्याची हानी केल्या खेरीज राहात नाहीं. दूध अधिक दाट, अधिक स्निग्ध, अधिक मधुर, अधिक पांढरे असणें हें दोषच समजलें जातात. किंवा त्यांचा प्राकृतिक वर्ण जाऊन ते आंबूस, काळपट, निळसर, पिवळसर, होणें ही विकृतिच समजली जाते. दुधाची प्राकृतिक गोडी जाऊन, ते तुरट, खारट, आंबट, कडवट लागणें हीं दुष्ट त्यांची लक्षणें आहेत. तसेंच ते फार पातळ, रूक्ष, चिकट फेसाळ, तंतुयुक्त असले तरी विकृतच समजलें जातें. बालकाचें आरोग्य, तें ज्या स्वरुपाचें दूध आईच्या अंगावर पितें, त्यावर सर्वस्वी अवलंबून आहे. आईचे दूध बिघडलेले असेल तर तें प्राशन करणाऱ्या मुलाचेंही आरोग्य तात्काळ बिघडून टाकते. मुलाची वाढ होत नाहीं. मुलाला विविध स्वरुपाचे लहानपणींच रोग होतात. अशावेळीं, रोगाचें मूळ कारण म्हणजे त्या मुलाचा आहार जे दूध तोच विकृत असतो. ते दूध सुधारल्या खेरीज त्या बालकांचे रोग बरे होण्याची शक्यता नसते. अशावेळीं मातेला दूध शुद्ध होण्याचें औषध दिलें तर तिचे दूध सुधारून ते पिणारे तिचे अर्भकही सुधारेल. या हेतूनें "स्तन्यशोधन" हा पाठ बनविण्यांत आला आहे. स्तन्य शुद्ध नसेल तर मुलाला धोका असतो. त्याची वाढ नीट होत नाहीं. त्याची प्रकृति बिघडते. एकदा रोगांनीं त्याच्या देहांत ठाणें केले कीं ते मग सुधारणें अवघड असते. त्याच्या भावी आरोग्याचेहि या दुष्ट स्तन्यामुळे मातेरे होते. "स्तन्य शोधन" यातील औषधांची योजना सर्व तऱ्हेच्या दुधांतील दुर्गुण लक्षांत घेऊन केली आहे. ते दूर झाले म्हणजे स्त्रियांना आरोग्य लाभते. गृहरत्नावर संसार सुखाचा होणें वा न होणें ही गोष्ट अवलंबून आहे. ती चांगली असली म्हणजे कौटुंबिक सुख निश्चित लाभते. असे आश्वासन देण्याचे कार्यकर्तृत्व "स्तन्य शोधन" या कल्पांत आहे असा प्रत्यय येतो. अंगावरील दूध बिघडण्याचे मुख्य कारण आईचा मिथ्या आहार हें असते. विकृत आहारामुळें तिच्या शरीरांत विकृत अन्नरस निर्माण होतो. तिच्या शरीरांतील वातादि दोष बिघडतात. तिचें शरीर धातूही विकृत होतात. अशा विकृत दोष दूष्य संमूर्च्छनामुळें स्तनांत निर्माण होणारे स्तन्य हेंहि विकृतच होते. व ते पिणारे बालकही विकृत होते. अशी ही परंपरा बंद पाडून मातेच्या शरीरांतील दोष सुधारण्याचें प्रमुख कार्य यांतील घटक द्रव्ये करितात हें त्यांच्या गुणधर्मावरून कळून येईल.

घटक द्रव्यांची गुण वैशिष्ट्यें

१ शतावरी—

स्तन्यजनन आणि स्तन्य शोधन आहे. मधुर रस, शीतवीर्य, गुरु, हे हिचे प्रमुख गुण आहेत. विशेषतः ती पित्तजन्य स्तन्य दुष्टी कमी करिते. दुधावाटे होणारी कडकी कमी करून मुलाचें आरोग्य राखते. दुधाचा वर्ण, निळसर, तांबुस, पिवळसर झाला असतां तो प्राकृत करण्याचें कार्य शतावरीचें आहे. तसेंच, अंगावरील दूध कडु आणि आंबूस झाले असतां मूल अंगावर नीट पीत नाहीं. दुधाची ही विकृत चव पालटून ते अधिक मधुर व स्वादिष्ट करण्याचें कार्य शतावरी करितें. दुधावाटे मुलाच्या शरीरांत पित्तप्रकोप, अपचन जुलाब, ज्वर, मुखपाक ही लक्षणें असतां शतावरी उपयोगी पडते. शतावरीनें मुलाला शक्ती येते, व त्याचा वर्ण सुधारतो.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेदाच्या क्षेत्रांत अद्वितीय

अशा शक्तिशाली

अरविंद आयुर्वेदिक इन्जेक्शन्स

चा उपयोग करून रोग्यांना शीघ्र निरोगी करा व यश मिळवा. शक्ति व शुद्धता याबद्दल पूर्ण गॅरंटी दिली जाते. सूचिपत्र मागवा—

सचित्र आयुर्वेदीक इंजेक्शन चिकित्सा—

मूल्य ३ रु. पोस्ट खर्च १० आ.

व्यवस्थापकः— अरविंद केमिकल वर्क्स
छिंदवाडा (सी. पी.)

★

अपोलोज आयुर्वेदीक इंजेक्शन्स

अद्यावत प्रयोगसिद्ध कल्प

आद्य आयुर्वेदीय संस्था म्हणूनच

'प्राइड ऑफ इंडिया' हें नामाभिमान या संस्थेला योग्य ठरते. आमची इंजेक्शन्स या देशांत व परदेशांत विकली जातात आणि आंग्ल वैद्य व आयुर्वेदीयांमध्यें तीं सारखीच लोकप्रिय झालीं आहेत. आमच्या ट्रेनिंग इन्स्टिट्यूटमध्यें वैद्यांना इंजेक्शनचें शिक्षण दिले जाते. विशेष माहितीसाठीं लिहा व एजन्सी नियम आणि मोफत कॅटलाग मिळवा.

**दि अपोलो फार्मास्युटिकल वर्क्स लि.
प्रतापगंज बडोदा.**

आयुर्वेदीय कारखानदार व वैद्य यांस लागणारीं औषधि द्रव्यें

दुर्मिळ अस्सल अष्टवर्ग, केशर, सर्व प्रकारची काष्ठौषधि, कस्तुरी, अंबर मौक्तिक (मोती खाका) शौक्तिक, शंख, शुद्ध शिलाजित, सुवर्णमाक्षिक, गोरोचन, प्रवाळ, पारा, गंधक, इ. सर्व प्रकारचीं खनिज व वनौषधि द्रव्यें घाऊक व किरकोळ प्रमाणांत पुरवितो,

गुलकंद आणि मोरावळा हे ठोकबंद मिळतील.

अस्सल व खात्रीपूर्वक माल हेंच आमचें वैशिष्ट्य !!

विशेष माहितीसाठीं साप्ताहिक दरांचें छापील पत्रक मागवून घ्यावें.

शा. जाधवजी लल्लुभाई आणि कं.
२४५ काळबादेवी रोड, मुंबई २

टे. नं. ३१७९६ Teiegrame- AYURVED.

दमा हटतो

तो कायमचाच. पुरोहित श्वासहारी हें एकच २८ वर्षे सतत प्रख्यात व अनुभविक असें डॉक्टरी औषध आहे कीं, जें तात्काळ आराम देऊन आस्ते आस्ते दमा बरा करतें. औषध घेण्यास सुरुवात करतांच कफ सुटतो, धांप कमी होते, पचनक्रिया सुधारते व फुफुसें मजबूत होऊन कांहीं कालानंतर दमा निखालस बरा झाल्याचा अनुभव येतो. रु. ३॥, ६ व १० किमतीच्या पॅकिंग मधून सगळीकडे विकत मिळतें अगर

कारखानदार
डॉ. पुरोहित फार्मसी,
कोल्हापूर (एस. एम. सी.)

पुरोहित श्वासहारी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२ गुळवेल—

ही तिक्त, मधुर, शीत, वृष्य व रसायन आहे. दीर्घ-कालीन अंगात मुरलेला ज्वर व कडकी गुळवेलीच्या सेवनानें कमी होतात. स्तन्यदुष्टी मुळे कित्येक वेळा मुलाला ज्वर, ओकाऱ्या, जुलाब, कावीळ, अंगावर पित्ताच्या गांधी उठणें, आगपेण, त्वचा रोग इ. उत्पन्न होतात. अशा ठिकाणीं गुळवेल उत्तम कार्य करिते. अंगावरील दुधाची गुळवेलीनें शुद्धि होऊन, मुलाच्या अंगाची थंड व दाह कमी होतात. गुळवेलीनें पित्त नीट वाहूं लागते. पचन मार्गांतील फाजील पित्त कमी होऊन पचन सुधारते. लघवीला साफ होऊन लघ्वीवाटे पडणारी खर गुळवेलीनें थांबते.

३ काडेचिराईत—

कडू, शीत, लघू, कफ पित्त शामक आहें. सर्वप्रकारच्या ज्वरांत चिराईत वापरतात. ती दीपक, पाचक, व दाहशामक आहे. ती स्तन्य शोधनाचे कार्य करिते. विशेषतः दुधांत स्निग्ध भाग फार वाढला असतां तो कमी करण्याचें कार्य चिराईतानें होते. दुधांत स्निग्धांश फार वाढला म्हणजे दुधाला तूप, तेल, या यांचा वास येतो. तें दुध लहान मुलास पचण्यास जड होते. व त्याला अग्निमांद्य, निद्राधिक्य, खोकला, दमा असे कफाचे विकार होतात. ही सर्व विकृति दुधामुळें होते. ती कमी करण्याचे कार्य काडेचिराईत करिते.

४ कुटकी—

कडू, शीत, मल भेदन करणारी, दीपन, पाचक व दाह-शामक आहे. हिचा मुख्य उपयोग हिवतापांत करितात. ज्वरांत हिनें शौचास साफ होऊन पित्त पडून जाते. पोटाची आग कमी होते. पित्तस्राव करणारी असल्यामुळें हिचा उपयोग स्रोतोरोधजन्य कामलेंतही होतो. मलावरोधाचा परिणाम म्हणून अंगावर निरनिराळ्या तऱ्हेची पित्ताची गांदळे उठतात. त्वचारोग उद्भवतात. त्यांत कुटकी उपयोगी पडते. ही हृद्य आहे. शोथ, व उदर यांत ही वापरतात.

५ पाठा—

कडू व पित्तशामक आहे. ही ज्वरांत व अतिसारांत वापरतात. तसेच ही शोथहर आहे. हिनें लघवीला साफ होते. मूत्रकृच्छ्‌ मूत्राघात, जीर्ण परमा, लघवीतून खर पडणें या विकारांत पाठा वापरतात.

६ सारिवा—

मधुर, शीत, स्निग्ध, वृष्य, व रसायन आहे. अंगांत वाढलेली उष्णता उपळसरीनें कमी होते. पोटांतील आग, लघवीची आग, शौचाची आग, कमी होऊन शीतता प्रस्था-केली जाते. पित्तवाढीचा परिणाम रक्तावर होऊन त्वचा रोग उद्भवतात. त्यांत सारिवा देतात.

उपळसरीनें भूक लागते. अन्न पचते. रक्त निरोगी होते. वर्ण लाल होतो व शरीर पुष्ट होते. पित्तप्रधान स्तन्य-दुष्टी कमी करणारे हें एक श्रेष्ठ औषध आहे.

७ देवदार—

तिक्त, कटु, उष्ण, वातकफनाशक व दुर्गंधीहर आहे. देवदाराची मुख्य क्रिया अन्न पचनाची आहे. त्यामुळे शरीरांत साठलेली, विविध जातीची आम द्रव्यें पचवून त्यांना स्वेद व मूत्रावाटे बाहेर काढून टाकण्याचे कार्य देवदार करिते ज्वर, संधिवात, जलोदर शोथ, यांत देवदार वापरतात. कफास दुर्गंधी येत असता तो दूर्गंधी कफ कमी करण्याचे कार्य देवदारानें होते.

८ सुंठ—

दीपक, पाचक, ग्राही, व हृद्य आहे. हिनें पचन क्रिया सुधारून पोटांत वात धरत नाहीं. पोट शूल, संधीशूल, हृत् शुल यांत सुंठ फार वापरतात.

९. नागरमोथाः—

तिक्त कटु व शीत, आहे. तो कफ पित्तशमनाचे कार्य करितो. तो दीपक, व आमपाचक आहे. ज्वर, अतिसार, आमांश, तृष्णा रोग, मूत्ररोग यांत नागरमोथा वापरतात. नागरमोथ्यानें दुधाची शुद्धी होते. यासाठीं तो बाळंतिणीस देतात.

१० इंद्रजवः—

कुडयाचे बी हें दीपक, पाचक, तिक्त, कटु, शीतल, व ग्राही आहे. अतिसार, रक्तातिसार आव यांत कुडयाचे बी वापरतात. यानें भूक लागते व स्तंभन कार्य होते. सर्व प्रकारच्या ज्वरांत कुडयाचे बी वापरतात. तिक्तरसामुळें ते उत्कृष्ट ज्वरघ्न ठरले आहे. अर्श रोगांत इंद्रजव वापरतात.

स्तन्य शोधनाचे विविध गुणधर्म

आरोग्य रक्षक व बलवर्धक—

स्तन्य शोधन हा कल्प मधुर, तिक्त, त्रिदोष नाशक व बालरोग नाशक आहे. ज्यांच्या अंगावर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मूल पीत आहे अशा मातांनीं याचे सेवन केल्यास त्यांचे शरीर निरोगी होऊन त्यांचे अंगावरील दूध निर्दुष्ट होते व त्यामुळें तें दूध पिणारे त्यांचे बालकही पूर्ण आरोग्यवान होते. मातेच्या दूधांतून स्तन्यशोधनातील द्रव्यांची क्रिया मुलावर होते. यामुळे मुलांचा अग्नि प्रदीप्त राहून मुलाला मातृस्तन्य सहज पचते. व धातू परिपोषण व्यवस्थित होऊन मूल निरोगी व बाळसेदार बनतें.

बालरोग नाशक—

मातृस्तन्य व ते बिघडलेले मुलाच्या पोटांत गेल्यानें त्या मुलाला पचनमार्गाचे विविध विकार जडतात- त्याचें तोंड येते, मूल दहयासारखे प्यालेले दूध भडभड ओकते. त्याला तें दूध पचत नाहीं. पोट फुगतें. पोटांत गुबारा धरतो. मुलाला चैन पडत नाहीं. तें आळोखे पिळोखे देतें. त्याला शौचाला आणि लघ्वीला साफ होत नाहीं. कधीं याचेच उलट शौचास होऊं लागली म्हणजे भसग्ट, कुजकठ, दुर्गंधी युक्त चोथापाणीं अडखळत अडखळत शौचास होते. किंवा निरनिराळचा रंगाचे होते. मुलाला चैन पडत नाहीं. मूल कृश होते. व पोट मात्र मोठे उंबारल्या-सारखे होते. अशा विकृतीत दूध बिघडले आहे हें जाणून मातेला स्तन्यशोधन देत जावे. चार सहा दिवसांत तिचें दूध सुधारुन मुलांला क्रमाक्रमानें दूध पचूं लागून ते पुनः निरोगी व पहिल्या सारखे गुटगुटीत होते.

श्वासमार्गाचे विकार—

मुलाला स्तन्य दुष्टीमुळें कित्येक वेळा वारंवार पडसे येते, खोकला येतो. किंवा प्रत्यक्ष श्वासाचाच आवेग येतो. मूलांचे पोट उडूं लागते. श्वासोश्वास जबर होतात. छातीजवळ कान नेल्यास " घुरघुर " असा आवाज ऐकूं येतो व मुलाला दम लागलेला असतो. अशा ठिकाणीं मातेचे दूध बिघडलेले असणें हेंच प्रामुख्यानें कारण असतें. स्तन्य शोधनानें [illegible] सुधारतें व तद्द्वारा मुलाचे हें सर्व रोग बरे होतात. व्रण वीसर्प, खरूज विर्चर्चिका असे कित्येकवेळा मुलाच्या त्वचेवर रोग आढळतात. मूल अंगावरल्या दुधाखेरीज कांहींच घेत नसते. अशा स्थितींत उठलेले खरूज, फोड, पीटिका, तोंडा-वरील हातापायावरील आगपैण, गांठी हे सर्व बाळाचे त्वचारोग स्तन्यशोधनानें लवकरच बरे झाल्याचीं अनेक उदाहरणें आहेत. फोडांची आग, कंड, व लस हीं लवकर थांबतात. यासाठीं हे मातेला द्यावे. व मीठ दही वर्ज करण्यास सांगावे म्हणजे लवकर गुण दिसतो.

मुलाचे अंग कित्येक वेळा सदैव गरम लागते. त्याच्या अंगांत ताप असतो. त्याच्या गळयाला व डोक्याला रात्रीं घाम येतो. अशा ठिकाणीं " स्तन्यशोधन " चांगले उपयोगी पडते.

असा बालांच्या विविध रोगांत " स्तन्य शोधन " हा कल्प उपयोगी पडतो. मुलांचा अग्नि प्रदीप्त राहून मलमूत्र विसर्जनाचे कार्य यानें व्यवस्थित होते. ज्वर कास श्वास पांडु कामला असे विविध त्रैदोषिक विकार लवकर बरे होतात असें हें श्रेष्ठ औषध आहे.

स्तन्य शोधनाचे प्रमाण—

चार चमचे औषध समभाग पाण्या बरोबर सकाळीं व सायंकाळीं मातानी घ्यावें. वैद्याच्या सल्यानुसार यां प्रमाणांत फेरबदल करण्यास हरकत नाहीं.

स्तनांवर चिरम्या, फोड, किंवा स्तनांत गांठी, विद्रधी पूं, व्रण असे स्तनरोग असतां, या रोगांची स्वतंत्र चिकित्सा करून घेतल्या खेरीज " स्तन्य शोधन " उपयोगी ठरणार नाहीं.

भृंगराजासव—

आंतड्यांतील अनेक दोषांमुळें बद्धकोष्ठ होणाऱ्या व तज्जन्य सर्व विकारांवर अत्यंत उपयोगी.

दि आयुर्वेदिक धन्वन्तरी फार्मसी लिमिटेड;
अहमदनगर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

WILICO
STRONGHOLD OF PROTECTION

कर्तव्यपालनाचें समाधान!

मुलाचें शिक्षण, मुलीचा विवाह, पत्नीस पेन्शन, व स्वतःचे
वृद्धापकाळाची सोय हीं सर्व

वेस्टर्न इंडियाची

★ अभिनव योजना ★

पॉ लि सी

घेऊन करा, व कर्तव्यपालनाचें खरें समाधान व आनंद उपभोगा.

आपल्या विम्यासाठीं व प्रतिनिधित्वासाठीं एक आदर्श
व सर्वोत्कृष्ट विमा संस्था

— *सविस्तर माहितीसाठीं लिहा अथवा भेटा* —

—:मॅनेजर:—

वेस्टर्न इंडिया लाइफ इन्शुअरन्स कं. लि.,
सा ता रा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

संधानविधी

(लेखांक ५ वा.)

ले.– वै. पु. वि. धामणकर धूतपापेश्वर–पनवेल

परिवर्तन

१ आसवी भवन, २ परिवर्तन ३ आसव संभव, ४ आसव जनन, ५ परिपचन. पाणी आणि मधुर पदार्थ एकत्र आले कि कालांतरानें त्यांत एक प्रकारचा रासायनिक बदल घडतो. त्या क्रियेला उद्देशून वरील पाचहि शब्द योजलेले आढळतात. इंग्रजींत ह्या अर्थी फर्मेंटेशन हा शब्द रूढ आहे. परिवर्तन व फर्मेंटेशन ह्यांत कांहीं वर्ण तर कांहीं उच्चार साम्य आहे. शिवाय रूपांतर, पालट, ह्या अर्थी तो शद्ब वापरला जात आहे. वर्तन ह्याला हालचाल असाही अर्थ आहेच. तेव्हां रूपांतर, हालचाल ह्या क्रिया ज्या गोष्टींत होतात तिला परिवर्तन ही संज्ञा देणें योग्यच ठरतें. पुन्हा शद्बही सुटसुटीत आणि व्रयस्थ आहे.

मद्य व आसव संधानांत हीच क्रिया प्रमुख पण मद्यांत ती अम्लाधिक तर आसवांत कोहल प्रधान असतें. दोन्हींतही दोन्हीं प्रकार अवश्य ठरतात. पण दोघांचे हेतु अगदी भिन्न आहेत. मद्य अगदीं तीव्र मादक व्हावे; अशी इच्छा असल्यानें कोहलास अम्लरसाची जोड भरपूर देण्यांत येतें. उलटपक्षीं आसव सुखमद करावयाचे असतें. त्या करितां तेथें अम्लत्व प्रतिबंधक योजना आगाऊच केलेली आढळते. आसवांत दीपन पाचन व स्वाद ह्या पुरताच अम्लाचा उपयोग असतो आणि ही कार्यें त्याचे अल्प प्रमाणानें होऊं शकतात. तितकेंच अम्ल आसवांत श्रेष्ट व इष्ट मानले आहे. अम्ल उत्कटत्वानें जाणवू लागले तर त्या पदार्थाची आसव ही संज्ञा जाऊन त्याला चुक्र म्हणू लागतात. म्हणजेच आंबलेले ते आसव नव्हे.

ह्या करितां प्राचीन काली फार प्रयोग झाले. प्रयत्नांची तर पराकाष्ठा झाली. त्यांत परिवर्तनाकरितां मधुर द्रव्यांची जरुर आहे असें दिसून आलें. मधुर वर्गात केवल मधुर म्हणून मध, साखर, गूळ, काकवी, हे चार पदार्थ श्रेष्ठ ठरतात. ह्या चारही पदार्थांत सुक्रोज सामान्यत्वानें आहे. साखरेंत ग्ल्यूकोज नाहीं. मध, साखर, काकवींत फॉस्फेटस् नाहींत. गुळांत मात्र शुक्रोज, ग्ल्यूकोज, आणि फॉस्फेटसूही आहेत. परिवर्तन क्रिया जलद सुरूं व्हावी, ती जोरांत सुरूं व्हावी; तर फॉस्फेटसूचा उपयोग करावां! अशी युक्ती आहे. ह्यादृष्टीनें चारही पदार्थांत परिवर्तन श्रेष्ठ म्हणून गुळाचाच क्रमांक लागतो.

गूळ आणि काकवी हीं दोन्ही परिवर्तनशील आहेत. त्यांत पाणी असतें आणि त्यांना हवेचें अनुकूल्य लाभलें की ते पदार्थ आपोआप फुटूं, फसफसूं, आंबू लागतात. ह्या परिवर्तनास स्वयंजात किंवा स्वयंभूत असें म्हणावें.

असा स्वतःच परिवर्तनशील असलेला पदार्थ आसवांत योजणें केव्हांही चांगलें. पण काकवी हा पदार्थ दोषांचा चय व उत्क्लेश करणारा असल्यानें एकांतहित पदार्थांत तो बसूं शकत नाहीं. हिताहितामध्यें त्याची गणना करून जरूर तेव्हां औषध म्हणून त्याचा उपयोग करून घेतला. हें योजना कौशल्य दर्शकत्वाचें श्रेष्ठ लक्षण होय. अन्यत्र काकवी कनिष्ठ मानली आहे. ऊंसाचे पदार्थांत साखर ही श्रेष्ठ, काकवी ही कनिष्ठ मानली आहे. ह्या दोषामुळें तो अिक्षु विकृतींत श्रेष्ठ ठरला नाहीं. साखर निर्दोष पदार्थ आहे. एकाकी व अच्छही आहे.

काकवी अनिष्ट मानल्यानंतर गूळ हाच पदार्थ शिल्लक राहतो. तो मध व साखरेच्या मानानें स्वस्त, सुलभ असा असूनही परिवर्तन श्रेष्ठ ठरतो. असा पदार्थ पाण्यांत घालून परिवर्तन क्रिया सुरूं करतात. पण ती गति मंद असते. आणि हवेचा संसर्गक्षम असते. त्यामुळें अम्ल अगर कोहल जनक पैकीं जे जंतु हवेंत बाहुल्यानें असतात, ते त्या मिश्रणांत घुसतात. वाढतात. पुष्ट होतात. बलवान होतात. आणि दुसऱ्या जंतूना तेथें टिकू देत नाहींत व जगूही देत नाहींत. मिश्रणांत दोन्ही प्रकाराचे जंतु शिरतात. राहतात परंतु कालाचा पाठिंबा ज्याला त्याची वाढ, प्रगति अधिक. असा हा निसर्ग आहे.

गुळाच्या ह्या अवस्थेमुळें गुळांत होणारे परिवर्तन कालावर अवलंबून माणसाच्या इच्छेला त्यांत वाव कमी. त्यामुळें हे परिवर्तन कालापेक्षी ठरलें. मनुष्य तर असा परस्वाधीन होण्यात तयार नव्हता. त्याला बुद्धी होती. तिचे जोरावर त्यानें अपेक्षित परिवर्तन अपेक्षित प्रमाणांत वा कालांत घडवून आणणाऱ्या पदार्थाचा शोध सुरूं केला. तेव्हां त्याला किण्व हा पदार्थ सांपडला. किण्वानें परिवर्तन लौकर सुरुं होतें. होतें सुरुं तें जोरदारही असतें. पण तें परिवर्तन आम्ल किंवा कोहल प्रधानही असूं शकतें, किण्व स्वतःच अम्ल किंवा कोहल पैकीं ज्या प्रकृतीचे असेल त्या स्वभावानुसार परिवर्तन व्हायचें. म्हणजे पुनः येथें अनैश्चित्य आणि परावलंबनही आलें. कालापेक्षां हा पदार्थ हुकमी खरा, पण प्रकृति भिन्नत्वामुळें तोही गौणच ठरला.

अम्लत्व प्रतिबंधक आणि कोहल जनक असा निश्चित आणि जोरदार पदार्थ पाहिजे होता. मद्य संधानांत उपयुज्यमान मोहपुष्प हा पदार्थ त्यांनीं आसव प्रक्रियेत वापरून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ाहिला. पण तो आपला स्वभाव सोडण्यास तयार नाहीं सें अनुभवास आल्यानें तोही त्यांचा आशा किरण मावळला. ग मात्र त्याने प्रयत्नास यश आलें आणि त्यांना पाहिजे ोता तसा असा अगदी उत्तम पदार्थ त्यांना सांपडला. त्याचें व धायटीफूल.

धायटीफूल संयोगानें मधुर द्रवांत यीस्ट नामक जंतु तस्चयानें निर्माण होतो. इतकेंच नव्हे तर तो बलवानही सतो. त्याची वाढ अति झपाटयानें होते. त्याचें बाहुल्य ाणि बल ह्यांचे जोरावर तो अम्ल जनक जंतूंचा संहार त्तम करतो.

यीस्ट जंतु भयंकर खादाड असतात. त्यांचें खाद्य भरपूर ळें म्हणजे तें धष्ट पुष्ट होतात. बलवान राहतात. व भितर ोणा जंतूंचें त्यांचे पुढें कांहीं चालत नांहीं. ह्याकरितां ाचार्यांच्या विविध प्रमाणांतले तेरा शेर पाण्यांत दहाशेर गूळ वा साखर आणि मध घालायचा झाल्यास तो १५ शेर लण्याचे मान प्रयोगांतीं उत्तम ठरलें असावें; असा माझा नुभव कौल देतो. ही प्रमाणें मला अत्यंत युक्त वाटली.

पाण्यांत निम्में किंवा निम्याहून कमी प्रमाणांत मधुर य घातल्यास अम्ल परिवर्तन जोरदार सुरू होतें. अशा श्रणांत यीस्ट जंतू जगूंच शकत नाहीं. त्याला द्रव मधुरत्व हिजे. मधुना मधुरी कृते हें सुश्रुत वचन ह्या बाबतींत इष्ट टतें. किंवा चरक, शोढलांनीं वरील प्रमाणें जेथें जेथें योजलीं हेत तीं तीं आसवें आजही अत्यंत श्रेष्ठ दर्जाचीं होत हेत; हें स्पष्ट आहे.

हें मधुर द्रव्याचें प्रमाण घातलें तरी परिवर्तन क्रिया मंदगतीची असते. फक्त तींत अम्लत्व फारसें येण्याची भीति नसते. पण धायटी फूल घातल्यास हे परिवर्तन द्रुतगतीनें चालू होतें. कोहलाचें मान वाढतें. त्यामुळें अम्लत्व प्रतिबंधन, मधुररस प्राधान्य, कोहलाधिक्य ह्या गोष्टी छान साधतात. त्याचा परिणाम औषधाचे वीर्य वाढण्यांत होतो. हा प्रयोग वीरसिंहानें सिद्ध केला. आणि धायटी फूल घालण्यांचे प्रयोजन अधिक दृढ केलें. वीरसिंह शोढलापूर्वी होऊन गेला. त्यामुळें शोढलाचे प्रत्येक आसवांत धायटी फूल घातलेलें आढळतें.

परिवर्तनारंभ

दत्वा बलोऽप्यमेतत्त्रीणि दिनानि पाणिना पात्रे ।
सभवेद्यदा शब्दस्ततो गुडशतफलानि त्रीणि देयानि ॥

तांबूलासव-शोढल.

मध, पाणी, धायटीफूल, औषधी एकत्र करून खूप ढवळून ३ दिवस ठेवून द्यावीत. ह्यांत स् स् स् आवाज होऊं लागला म्हणजे त्यांत आणखी गूळ घालून पुनः संधिलेप देऊन तें बंद स्थितींत १५ दि. ठेवावे असें शोढल सांगतो. म्हणजे परिवर्तन तिसरें चवथें दिवशीं सुरु होतें. हें त्याला कळलें होतें हें निश्चितच. आणि हें कार्य होत असतांनांचें दृश्य स्पृहणीय, रमणीय असतें. अग्नि न लावतां द्रव तापला कसा आणि त्यांत मंदमंद आवाज आणि बुडबुडे येतात कसें ? हे पहात, मनन करीत असतां मति गुंग होते व बुद्धिबल आणि संशोधन ह्याबद्दल अत्यंत आदर उत्पन्न होतो.

रामतीर्थ ब्राह्मी तेल

(स्पेशल नं. १) (मेडिकेटेड) डोक्याचे ज्ञान व क्रियातंतु बलवान करते केस काळे आणि मजबूत होतात. टक्कल पडलेल्या जागीं पुन्हां केस येतात. खवडे उवा, लिखा यांचा नाश होतो. स्मरणशक्ति वाढते. डोळ्यांत घातल्यानें दृष्टी सुधारते. कानांत टाकल्यानें कानाचे रोग नाहींसे होतात. गाढ झोंप लागते.

सर्वऋतूंत सर्वांना उपयोगी. सर्वत्र मिळतें. मोठी बाटली किं. ३-८-०, लहान बाटली किं. रु. २.
श्री रामतीर्थ योगाश्रम, ८ उमेश धाम, २ रा विन्सेंट स्क्वेअर, दादर जी. आय्. पी. रेल्वे स्टेशन जवळ, मुंबई १४.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

•मधांत नायट्रोजनस पदार्थ असतात. त्यांचे सहाय्यही परिवर्तन क्रियेस बरे होते पण त्यापेक्षां गुळांतील फॉस्फेटस्चे कार्य अधिक बलवान सहाय्यक असें होत असावे हें जाणूनच कीं काय शोढलानें प्रथम मध असूनहि परिवर्तनक्रम सुरुं होतांच म्हणजेच यीस्ट जंतु जनन सुरुं होतांच, त्यांचे पोषक असें फॉस्फेटस् त्यांना गुळांतून दिले असावेत.

आजची संशोधनाची संज्ञा, परिभाषा पद्धति किंवा आवजारें त्यावेळीं नसतीलही. त्यांची संशोधन पद्धति भिन्नही असूं शकेल. पण कार्य अगर परिणाम हे एकच झालेलें आढळतात. आजचे व त्यांचे प्राचीन काळचे संशोधन फलांत फरक कांहीं दिसून येत नाहीं एवढें मात्र खरें.

धातकी पुष्प किण्व म्हणून वापरणें सार्वमतानें श्रेष्ठ ठरलें. किण्व संज्ञेचा अर्थ किण्यते इति किण्वम्, आवाज करतें किंवा करवितें जे. किण्व घातल्यानें आसवांत परिवर्तन जोरानें सुरूं होतें. आवाज स्पष्टपणीं ऐकूं येतो. हें आपण पाहिलें आहे. पण हें परिवर्तन सुरूं करून दिल्यानंतर ३० दि. पेक्षां अधिक काल हें पुष्प त्या आसवांत ठेवूं देत नाहींत. ह्याचा अर्थ तें बिघडतें असें नव्हें. तें किण्व परिवर्तन जननशील असतेंच. पण तें फार काल ठेवल्यास कोहल जनन अधिक होईल. तें तर आपणांस नको. तेव्हां तें दूर केलेलेंच बरें अशा समजुतीनें धातकी पुष्प दूर करण्यास सांगितलें असावें; असें आम्हांस वाटतें. कारण अशा प्रकारें उद्धृत पुष्प पुनः आम्हीं उपयोगांत आणीत असू व त्याचा योग्य फायदा आम्हांस मिळतही असे. हे पाहिल्यानंतरच धायटी पुष्प कोश व पराग, नि त्यांचे हिम ह्यांबावत आम्ही प्रयोग केलें. त्यांचे बलाबल पाहिलें व एका प्रांतापुरतें तरी ते प्रयोग सिद्ध होऊन द्रोणास फक्त ४ तो. धायटी फूल पुरेसें होऊं लागले. १२० तो. ची बचत प्रत्येक द्रोणामागें होऊं लागली हा काय फायदा थोडा झाला ?

कोहल

आसवांत पाणी, मधुरद्रव्य, औषधि आणि किण्व घालतात. त्यानंतर त्यांत रासायनिक परिभवन होतें. औषधि द्रव्यांतील कार्यकारी द्रव्य पाण्यांत उतरतें. मधुर द्रव्याचे मधुजन, कार्बनडायाक्साईड गॅस, कोहल व अम्लांत रुपांतर होते. कांहीं मधुर पदार्थ मूळ स्वरुपांत तसाच राहिलेंलाही आढळतो. मधुर द्रव्यांचे रुपांतर सर्वंकशः कां होत नाहीं तसेंच किती मधुद्रव्यापासून अम्ल व कोहल किती किती निर्माण होतात हें अद्याप नक्की सांगतां येत नाहीं. पण अम्ल व कोहल ह्यांची निर्मिती होते. ही गोष्ट खरी. तसेंच अम्लोत्पादन अजिबात टाळतां येत नाहीं. हें तितकेच खरे. ह्या बावत पाश्चात्य देशांत संशोधन चालूं आहे. त्यावर विसंबण्यापेक्षां आपला विषय आपण हातिं घेऊन त्याचा छडा आपणच लावावा हें खरें. अस्तु.

कोहलाचे पर्याय शब्द

(१) मद्यार्क, सुरासत्व, सुरावीर्य

(२) आसवार्क,आसवसत्व,, आसववीर्य, आसवसार, कोहल मद्य संधान विधींत कोहलास अर्क, सत्व, वीर्य म्हटलें आहे. आसव संधानकांनीही त्याच संज्ञा उचलल्या. फक्त ' मद्य ऐवजीं ' आसव ' उपपद बदललें. पण ह्या तिन्ही युक्त नाहीत त्या यथार्थही नाहींत. कारण अर्क निष्कासन विधींमधील प्रक्रियासाम्यावरुन कोहलास अर्क म्हटले तर अर्क म्हणजे औषधातील कार्यकारी द्रव्य. तशी गोष्ट कोहलाची नाही. अच्छकोहल कोणत्याही मद्यांचे अगर आसवाचें गुण देत नाही. तेव्हां ही संज्ञा अयथार्थ ठरते. सामान्यतः कार्यकारी द्रव्य द्रवाशी संलग्न असले म्हणजे त्याला अर्क म्हणतात. तोच अर्क घन, शुष्क स्वरूपांत झाला कि त्याला रसक्रिया म्हणतात. सत्व ह्या सर्वाहून निराळे वनस्पतीमधील पिष्टमय भागास अगर मिश्रधातु, उपधातुमधील मूलभूत भागास सत्व म्हणतात. कोहल बाबत त्यांतली एकही

आयुर्वेदीय अर्कशाला

हैद्राबाद राज्य सोल एजन्सी

हैद्राबाद राज्यांतील वैद्य व विक्रेते यांनीं आयुर्वेदीय अर्कशाळेच्या मालाविषयीं खालील पत्त्यावर पत्रव्यवहार करावा.

ज. बा. बापट

अर्कशाळा सोल एजन्सी ऑफीस
द्वारका भुवन
जुना जालना (N. S. Rly.)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ोष्ट संभवत नाहीं. वीर्य ह्याचा अर्थ कार्यकारी शक्ती असा आहे. ही शक्ती शीत व उष्ण अशी दोन प्रकारची असूं शकते. कोहलाबाबत तसा कांहीं प्रकार नाहीं. तो शीत वा उष्ण ही नाहीं. तर तो ज्या वीर्यात्मक पदार्थाशीं संलग्न त्याचें तें तें वीर्य वाढवितो. असा निर्वाळा वीरसिहानें दिला आहे. तोच बरोबर आहे. तेव्हां ज्यांना स्वतःला मूळचा कांहीं अर्थ रूढ आहे त्याची उपमा दुसऱ्या पदार्थास देताना उपमा आणि उपमेय यांत अधिकांत अधिक साम्य असण्यावर उपमेयाची प्रहृति अवलंबून राहाते. ह्या दृष्टीनें विचार करतां अर्क, सत्व, वीर्य ह्यापैकीं कशाचेच साम्य कोहलात नाहीं. तेव्हां ह्या तीन्ही उपमा बरोबर नव्हत. हेंच खरें.

येथें दृष्टांतादाखल पारद घेता येईल. पारद संयोगानें, आक्षित्वानें कज्जली, पर्पटी, सिंदूर, पोट्टली इ. कल्प टिकाऊ होतात. त्यांचे कार्यकारित्व म्हणजेच वीर्य वाढते. तरी पण तो पारद त्या त्या कल्पांशी एकजीव झालेला नसतो. तो पारद त्या त्या कल्पांतून निर्वेध निघूं शकतो. त्या कल्पांचे गुण त्याला बिलकूल चिकटत नाहींत. ह्या कल्पांत कोठें तो टिकवण म्हणून तर कोठें आश्रयभावानें राहातो. हीच अगदी नक्की भूमिका आसव कल्पांत कोहलाची. कोहलाशीं आसवांतले कार्यकारी द्रव्य संलग्न असतें. तोपर्यंत तो संयुक्त पदार्थाचे गुणाची अभिवृद्धी करतो. पण अलग झाला कीं पुनः पूर्ववत् स्वयंगुणाचा असा हा पदार्थ निर्लेप होऊं शकत असल्यानें कोणत्याच औषधाचा, कसलाच वारसा ह्याचेकडे येऊं शकत नाहीं.

राहतां राहिले कोहल नांव. ह्याचा उच्चार व स्वभाव मूल भाषेंतील अल्कोहल शद्वाशीं जमणारा असल्यानें मूळ शब्दांत बदल करुन घेतलेला हा शद्व बरा वाटतो. सुश्रुतानें ह्या कोहलाचा उपयोग प्रथम केला. त्याची ही कल्पना प्राचीन अर्वाचीन पंडिताना, विद्वानाना मान्य होऊन तिचा व्यवहारही त्यांनी रुढ केला. कोहल पुष्प धातकी पुष्प हें नांव त्याचेच द्योतक चिन्ह होय.

मलेरिया शत्रु, पांढरें कोड

ही दोन पेटंट औषधें मागवून धन, यश व कीर्ति मिळवा.

माहिती मागवा—

वैद्य— बी. आर. बोरकर, 'आयुर्वेद भवन'

मु. पो. मंगरूळपीर, जि. अकोला (वऱ्हाड).

प्राचीन कालीं किंवा आजही अशी गोष्ट आहे कि दुसऱ्या भाषेंतील शद्व आपल्या भाषेत घेतांना त्यांतील उच्चार साम्य शक्यतोवर साधायचे आणि आपले भाषेंतील व्यवहारास सोयीचे होईल, असें त्याचें उच्चारण नक्की करायचे. असें शब्द उदाहरण दाखला देतां येतांत ते असे.

१ शुल्बारि—सल्फर	५	उमाननीय	—अमोनियम्
२ सम —सेम	६	प्रथिन	—प्रोटिन
	७	स्वसु	—सिस्टर
३ अस्तु —येस्	८	मातृ	—मदर
	९	भ्रातृ	—ब्रदर
४ शोक —शॉक	१०	पितृ	—फादर

अशाच पैंकी अल्कोहलचे कोहल झालें असावें. आर्यलोक उत्तरेकडून प्रवास करीत करीत येत असतां ज्या ज्या भाषेशीं त्यांचा संबंध आला त्या भाषेंतील शद्वही त्यांचे बरोबर प्रवासी बनले व त्या त्या नवीन प्रांतांतील भाषेंशीं तद्रुप झाले किंवा त्यांनीं नवीन रूपे धारण केली. ह्या व्यवहारांतून संस्कृत शद्व जन्मास आला. अनेक भाषांचे एकीकरण करून ती सुधारुन म्हणजेच तीवर संस्कार करून समाजोपयोगी तयार केलेली ती संस्कृत भाषा. आजची संस्कृत भाषा अनेक भाषा मिळून झालेली असल्यानें तीत निरनिराळ्या भाषेंतील सदृश शब्द सांपडतात. आफूस चिनी लोल ज्यापेन म्हणतात. ती भारतांत आली तेव्हां अफेन असें नांव पडले.

कोहलाचे प्रकार

कोहल स्वतंत्र स्वरूपांत सृष्टींत सांपडत नाहीं. सृष्ट पदार्थांत रासायनिक परिभवन होऊनच त्याची निर्मिती होते. आसवांत तो अशाच तऱ्हेनें निर्माण होतो. म्हणून त्याला (Self generated) स्वयंजःत कोहल म्हणतात. टिंक्चर तयार करतांना इतरत्र तयार झालेला वा पृथक् केलेला कोहल उपयोगांत आणतात. जरूर तर मागाहूनही तो अधिक घालतात. टिंक्चरमध्यें कोहलजनन होत नाहीं. द्रव घटल्यानें कोहलमान वाढतें त्यामुळें त्या कोहलास प्रक्षेपित, प्रक्षिप्त (Added. Injected) कोहल म्हणतात. दोन्ही कोहलांचे अच्छ स्वरूप एकाच गुणधर्माचे असते. व्यवहाराचे सोयीकरितां हे भेद केले आहेत. ह्यापेक्षां निराळ्या स्वरूपाचेही आणखी कांहीं प्रकार केलें आहेत. त्यांतला १ प्रकार बाह्योपचारार्थ व २ रा अंतरोपचारार्थ उपयोगांत आणावयाचा असतो. उ. methylated spirit ह्याला methyl alcohol म्हणतात. मूळ कोहलमध्यें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

wooden naptha pyridine सारखे विषारी पदार्थ घालून तो पिण्याला अपात्र केलेलें असते. ह्याचा उपयोग, स्टोव्ह पेटविणें, बाह्यलेपार्थ, अफूसारखे पदार्थ विरविणें इ. बाह्योपचार्थच करतात. दुसरा प्रकार पोटांत घेण्याचा असतो. त्यांतही पुन्हां निरनिराळ्या कारणानें पोटभेद पडतात. उदा. धान्यांपासून तयार केलेला तो Ethyl alcohol ह्याला इंडस्ट्रीयल अल्कोहोलही म्हणतात. औषधी पदार्थ निर्जंतुक करण्यास ह्याचा उपयोग करतात. ह्याशिवाय Butyl, Amyl, Profoyl असे अनेक भेद आहेत. ग्लीसरीनचा सुद्धां उल्लेख अशाच एखाद्या अल्कोहोल संज्ञेनें करतात.

उपयुक्ततेच्या दृष्टीनें अल्कोहोलचे विविध शक्तिमान मर्यादित केलें आहे. १०० अच्छ कोहलांत बाष्पोदक मिसळलें कीं तो प्रकार stronger spirit or over proof अशा नांवानें संबोधतात. ७५% व २५% बाष्पजल मिश्रणास under proof or weaker spirits म्हणतात. शंभराचे वर व खालीं बाष्पजल मिश्रणानें हें दोन प्रकार झालें. औषधी कार्यांत वापरतात ती बहुधा under proof च असतात. उदा. अच्छ कोहल–शंभर टक्के– निर्भेळ

रेक्टिफाईड कोहल (spirit) ९० कोहल १० भाग बाष्पोदक
प्रूफ– कोहल ,, ५७·१० कोहल बाकीचे बाष्पोदक
डिल्यूट– ,, ,, ४५· ,, ,, ,,

कोहलाचा प्रत्येक प्रकार व त्याचें शक्तीमान स्वतंत्र राष्ट्रानी कायद्यानें ठरवून दिले आहे. बदल अगर अदलाबदल करण्यास कायद्यानें शिक्षा व दंडही ठेवलेले असतात.

कोहलाचे मोजमाप

कोहल वजन करून घेतात. किंवा मापानें मोजूनही घेतात. साधारणतः विशिष्ट गुरुत्व आणि शतांश शक्तिमान ह्यांचा गुणाकार करून त्याला ०·७९३६७ ह्या आंकड्यानें भागलें म्हणजे वजनाचे रुपांतर मापांत होतें. उदा. ४९·५ शतमानाचे वजन ५७·३ शतमान मापन होतें. (४९·५× ०·९२०÷०·७·७९३६९=५७·३) उलटपक्षीं ०·७९३७ ला विशिष्ट गुरुत्वानें भागा व त्याला दिलेल्या शतमानानें गुणा म्हणजे कोहलाचे वजन–तोलमान निघेल. उदा. ०·७९३६७÷ ०·९२०×५७·३=४९·५.

तोलमान व मोजमान ह्यांत फारसा फरक नाहीं. आणि त्यांची नित्यशः जरूर पडतें असेंही नाहीं. पण व्यवहारांत दोन्ही पद्धति रूढ आहेत. आणि परीक्षणाचे वेळेस पूर्वीच्यानें कोणती पद्धति स्विकारली आहे हें कळलें तर दुसऱ्याचें काम सोपें होतें. ह्याकरितां लिखाणांत सुद्धां नेहमी हें लिहिण्याची पद्धति रूढ आहे. साधारणतः तोलमान असल्यास W/V असें चिन्ह व मोजमान असल्यास V/V असें चिन्ह काढतात.

आसवांत कोहलाची उपयुक्तता दोन तऱ्हेनें, एक टिकवण संरक्षक म्हणून २ वीर्यवर्धक म्हणून. साधारण मानतः ५ टक्के शतमान आसव टिकविण्याकरितां व ५ ते १० पर्यंन्तचे शतमान औषधाचे वीर्य उच्च होण्याकरितां जरूर पडतें असा अनुभव आहे.

आसवांत मधुर द्रव्य पाण्याचे पाऊणपट असलें तर त्यानें कोहल आवृत्त होतो. किंवा घसा लेपित होतो म्हणा अशा वेळीं कोहलाची चरचर जाणवत नाहीं एवढें खरें

अच्छ कोहल

उकळण विंदु– ७८%७९° विशिष्ट गुरुत्व ·७९४

शब्द– स्पर्श– शीत

रूप–रंगरहित पारदर्शक रस– जळजळीत

गंध– विशिष्ट– गं.ड– मनोज्ञ

स्वभाव (धर्म)– उयशील, अक्षय्य टिकाऊ, योगवाही जंतुघ्न, व्रण्य

गुण– दीपक, बल्य, उत्तेजक, कांतिकर, स्मृति बुद्धिकर रूक्ष.

उपयोग– १ पाण्यांत न विरणारें पदार्थ विरविण्याकरितां उ. कापूर

१ पाण्यांत न उतरणारे अर्क उतरविण्याकरितां उ. गंधद्रव्य

१ रंग, वार्निश, पेंट इ. पातळ करण्याकरिता.

सचित्र सुबोध मराठी
इंजेक्शन–विज्ञान
सल्फोनामाइडस्, पेनिसिलिन, स्ट्रेप्टोमायसिन, क्लोरोमायसिटिन, सीरम्स, व्हॅक्सिन्स इ.
७०० वर इंजेक्शनांची अद्यावत माहिती.
किंमत ६ रु. ट. ख. निराळा.
डॉ. डी. ए. घाटगे
मु. पो.– कागल (S. M. C.)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

इतर उपयोग

१ मृत शरीरांतले अवयव टिकविण्याकरितां.

१ उपकरणें निर्जंतुक करण्याकरितां.

१ शय्याव्रण कोहलनें धुतलें तर तेथें निब्बट त्वचा येते.

१ साधे व्रण कोहलनें धुतल्यास त्यांवर एक अत्यंत पातळ पापुद्रा येतो व त्यामुळे हवेंतील जंतू, धुराळा इ. जखमेत जाऊं शकत नाहीत.

१ चिघळणारे व्रण कोहल धावनानें खुरखुरीत व कोरडे होतात.

१ त्वचेवर जोरानें चोळल्यास त्वचा लाल होतें. हलकेंच लावल्यास थंडगार वाटतें. म्हणून विंचू दंशस्थानी लावतात.

अम्ल

आसवांत अम्लाची एका विशिष्ट मर्यादेपर्यंत जरुरी आहे. भांगेचे पेय थंडाई तयार करतांना त्यांत उष्ण वीर्य मिरें अगदीं थोडें कां होईना पण तें घालतात. कारण तेथें मिऱ्याच्या तिखट रसाची स्वादन व दीपन कार्याकरितां अत्यंत जरुरी असते. त्याचप्रमाणें येथें ठसक, स्वाद, दीपन ह्या हेतूंकरितां अम्लत्वाची जोड आवश्यक वाटते.

अम्लत्व निर्मिति अजिबात टाळतां येत नाहीं. मात्र ती नियंत्रित करतां येते. अम्लत्व थोडें असूनही मंद भासते. ह्याला कारण मधुर पदार्थाचें मान. हें मान निम्याहून कमी असेल तर किंचित अम्लत्व सुद्धां महतप्रतीत (२·०) होईल. पण तें मधुरद्रव्य पाऊणपट असलें तर त्याचें आधिक्यानें अम्लत्व आवृत होते. मधुररससंयोगानें तें सौम्यही होतें. स्वाद व रुचि ह्या दोन गुणांनी मधुररसाशीं साथ करतें. त्यामुळें आसव खुमासदार बनावें.

अम्लाचे प्रकार

आतांपावेतों आसवांतले अम्ल म्हणजे असेटिक अॅसिड असें ज्ञात झालें आहे. पण मला वाटतें आसवांतल्या कांहीं पदार्थांत मूळची जी अम्लें होतात, ती अंशमानानें वा अस्तित्व रूपानें तरी प्रतीत व्हायला पाहिजेत. परिवर्तन क्रियेंत तीं आम्लें रूपांतरितच होत असतील तर तीं सांपडणार नाहींत. हा भाग निराळा. पण तसाही निर्णय अद्याप लागलेला दिसत नाहीं. ह्याचा छडा लागणें अत्यंत जरूर आहे. आणि तो संशोधनानें लागेलही, असें वाटतें.

प्राकृतिक अम्लांचे प्रकार .

तक्र–Butyric Acid	मद्य–Formic Acid
द्राक्ष फल–Malic Acid	दधिमस्तु–Lactic Acid
धात्री फल–Galic Acid	कागदी लिंबू–Citric Acid
हरीतकीफल–Tannic Acid	चीच–Acetic Acid

आसवांत अम्लमान

किमान ०·२ कमाल २·०००

अत्यम्ल संभव

१ धायटी फुलाचा अभाव	५ पात्र वा द्रव्य अम्ल जंतु जुष्ट
२ मधुर द्रव्याचे हीनमान	६ आसव उघडें राहणें
३ अम्ल विपाकी हवा ऋतु	७ संधिलेप कच्चा असणें
४ अम्ल स्वभावी किण्व	८ मुद्रा नक्की नसणें

Alcoholic Fermentation

ह्या विषयावर पाश्चात्य देशांत अनेक ग्रंथ परिश्रम-पूर्वक लिहिले गेले आहेत. त्यांचे परिशीलन करून N. E. Harden ह्यांच्या ह्याच नांवाच्या ग्रंथाधारें श्री. शि. पां जोशी Msc. यांनी भिषग्विलास पु. ३०।१० मध्यें ह्याच नांवानें एक लेख लिहिला. त्यांतील एतद्विषयक शास्त्रीय भाग येथें उधृत करीत आहे. आशा आहे कीं ह्या भागाचे वाचनानें परदेशांतील प्रयत्न व त्यांची प्रगति ही ध्यानीं येतील व परिवर्तन क्रमाचाही उमज पडेल. श्री. जोशी आपले लेखांत म्हणतात—

" परिवर्तन " ही एक (Chemical) रासायनिक पायरी आहे. ही सुरूं असतां मूळ पदार्थांचे घटक फुटून त्यांतून नवीन पदार्थ निर्माण होतात, अगदीं नेहमींच्या तपमानावर ३५° ते ४५° ही क्रिया चालूं रहाते. व जे नवीन पदार्थ निर्माण होतात त्यापैकीं बहुधा एखादा वायु Gas तसेंच ह्यावेळीं पदार्थांचें उष्णतामान थोडेंसें वाढतें. हें परिवर्तन घडून येण्यास एखाद्या परिवर्तकाची (Enzyme) गरज असते. हे परिवर्तक पदार्थ प्राणिज किंवा उद्भिज्ज असून त्यांत नायट्रोजन असतो.

परदेशचा पहिला प्रयत्न

इ. स. १५ व्या शतकाचे सुरवातीस युरोपांत जी एक ज्ञानार्जनांची लाट उसळली; त्या वेळेपासून ह्या नैसर्गिक घटना अगर चमत्कारांकडे लोकांचें व शास्त्रज्ञांचें अधिक लक्ष वेधलें. पण हें परिवर्तन कसें घडून येतें हें सांगण्याचा पहिला प्रयत्न विलिस Wilis ह्या शास्त्रज्ञानें १६५९ मध्यें केला. त्याचे म्हणणें असें होतें कि, ज्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पदार्थात परिवर्तन घडून येते त्या पदार्थाच्या अणुंमध्यें अस्थिरता उत्पन्न होऊन, त्यांना गति मिळते. व यामुळें त्यांची पहिली मांडणी मोडून, हे अणु दुसऱ्या अणूंशी मिसळतात व दुसरे नवीन पदार्थ निर्माण होतात. कांहींना गति इतक्या जोराची मिळते कीं मूळ पदार्थापासून ते दूर उडून जातात. (म्हणजे त्यांचे रूपांतर वायूंत होतें.)

मद्यार्क परिवर्तन घडून येण्यास साखरेची अत्यंत जरुरी आहे. ही गोष्ट त्यावेळीं लोकांना माहीत होती. तसेंच या परिवर्तनांत उत्पन्न होणारे मुख्य दोन पदार्थ १ कोहल, २ द्विप्राणिल कर्ब वायु. ते साखरेपासून तयार होतात. हें 'लेबॉइजर'' हृया फरेंच शास्त्रज्ञानें दाखविलें. 'गेलुसाक' च्या मतें परिवर्तनाला हवेची अत्यंत जरुरी असते.

हृयानंतर १८३५ ते १८३८ पर्यंत तीन शास्त्रज्ञानीं हृया बाबतींतले आपआपले महत्वाचें शोध पुढें मांडले. दारु तयार करतांना, किण्व म्हणून जी ''यीस्ट'' नांवाची वनस्पती वापरली जात असे त्यामधील पेशी गोल असून त्यांची वाढ होते. मात्र त्यांना गति नसते. कोहल परिवर्तन हे यीस्टमधील जीवंत पेशीमुळें घडून येतें, असे 'कॉगनॅर्ड लाणूर हृयांचे म्हणणें होतें. 'कुझिंग' यानें वरील मताला पुष्टि दिली व सूक्ष्मदर्शक यंत्राच्या सहाय्यानें यीस्टचे बारकाईनें वर्णन केलें. त्याचे जरूर ती मूलतत्वे व अनुरूप परिस्थिती असतां यीस्टची वाढ होते व हृया यीस्टमुळेंच परिवर्तन घडून येतें. परिवर्तन व जीवाणु यांचा संबंध आहे. असें मानणारा तिसरा शास्त्रज्ञ 'श्वान' (Schwann) हा होय, यानें असें दाखविलें कीं शिजविलेल्या पदार्थामध्यें कांहीं कालानें जी विकृति (putrification) उत्पन्न होते; ती हवेंतील जंतू-मुळेंच होय. तसेंच ही विकृति व परिवर्तन हृयात साम्य असल्यानें परिवर्तन हेंही जंतु मुळेंच घडून येत असावें.

हृया सर्व शोधांचा एकूण मतितार्थ असा निघूं लागला आहे कीं परिवर्तन हें एक प्रकारच्या विशिष्ट जीवाणूंमुळें घडून येतें. परंतु त्या वेळचे रसायनशास्त्रांतले महर्षि 'विर्क्षेली' व 'फॉन्ली विग यांना हीं मतें बिलकूल पसंत नव्हती. त्यांच्यामतें परिवर्तन हें जीवाणूंमुळें घडून येत नसून कांहीं एका विशिष्ट रासायनिक कल्पामुळेंच (Chemical compound) घडून येतें. परंतु त्यावेळीं त्यांचेजवळ त्यांच्या मताला पुष्टि घेणारा प्रायोगिक पुरावा असा कांहींच नव्हता. यांतच आणखी "पाश्चर' हृया जगप्रसिद्ध संशोधकाच्या कार्याची भर पडली. कोहल परिवर्तन हें यीस्ट पेशींच्या जीविताशीं निगडीत आहे, असा प्रयोगसिद्ध सिद्धांत त्यानें मांडला. सूक्ष्म दर्शक यंत्राच्या सहाय्यानें "दुग्धाम्ल परिवर्तनाचा सखोल अभ्यास करून त्यानें असें दाखवून दिलें कि हें एका विशिष्ट प्रकारच्या जीवाणूंमुळेंच घडून येतें. तमतशीं त्या द्रव्यांतील यीस्ट पेशींची वाढ होत जाते. हें त्यानें दाखविलें. हृया वेळपर्यंत असा समज होता कि, सर्व साखरेचें कोहल व कर्बद्वि प्राणिल वायु हृया दोन पदार्थांत रूपांतर होते. परंतु ही समजूत बरोबर नसून फक्त ९५% साखरच हृया कामीं खर्च होतें. व बाकीच्या बाकीच्या ५% पासून आपणाला ग्लीसरीन् सक्सिनिक अॅसिड वगैरे पदार्थ मिळतात. हे दाखविणारा पहिला शास्त्रज्ञ पाश्चरच होय.

त्याच्या उलट मत, 'ट्रॉब' ह्यानें लगेच मांडले कीं, यीस्ट पेशींमध्यें असलेल्या एका विशिष्ट परिवर्तकामुळें हें परिवर्तन घडून येतें. हें परिवर्तक प्रथिन सारखें असून, त्यांना विशिष्ट रासायनिकपट नाही आहे. आणि हृया मतास आणखी कांहीं वर्षांनीं बिनतोड अशी पुष्टिही मिळाली.

पेशीविरहित परिवर्तन

कुकनेर हृया जर्मन शास्त्रज्ञानें १८९७ मध्यें यीस्ट पासून एक रस काढून, त्या द्रावणाच्या सहाय्यानें परिवर्तन घडवून आणलें. मुख्य म्हणजें हृया द्रावणांत यीस्ट पेशी मुळींच नव्हत्या. हृयाचाच अर्थ होतो कि पेशी नसतानासुद्धां परिवर्तन होऊं शकतें; असें सिद्ध झालें.

हृयावरून हृया प्रश्नाला एक नवीनच चालना मिळाली. इतर अनेक रासायनिक क्रियाप्रमाणेंच ही ही एक रासायनिक क्रियाच आहे. हें ठरल्यामुळें याचा अभ्यास करण्यास पुष्कळांना हुरुप चढला. आणि तेव्हां-पासून आतांपर्यंत हृया प्रश्नाबाबत फार मोठें संशोधन कार्य झालेलें आहे तरीही पण साखरेपासून कोहल तयार होई-पर्यंत ज्या अनेक क्रिया होतात त्या सर्वतोपरी नीटशा अजूनही समजलेल्या नाहींत. त्याबद्दल अजूनही संशोधन चालूं आहे.

"झायमेज"

यीस्ट पेशीपासून काढलेल्या रसानें परिवर्तन घडवून आणतां येतें ही गोष्ट बुकनेरचे लक्षांत आली. आणि ज्या प्रभावी द्रव्यामुळें हें घडवून आणतां येतें. त्या द्रव्यास त्यानें 'झायमेज्' हें नांव दिलें. हा यीस्ट रस ३०°। ३५°९ शतांशापर्यंत तापवून वाळवून त्याचें चूर्ण करतां येतें. व हृया चूर्णांत परिवर्तन शक्ति असते. हृया रसांत जर कोहल व ईथर हृयाचे मिश्रण घातले तर एक सांका जमतो. व हृया वाळविलेल्या सांक्यामुळें परिवर्तन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

घडवून आणता येतें. यीस्टला पुरेसा दाब देऊनही रस मिळविता येतो. किंवा आयुर्वेदीय पद्धतीनें तयार केलेला यीस्ट हिमही परिवर्तन शक्तीसह आढळतो. मात्र हा रस ५०°१ चे वर तापविल्यास परिवर्तक नाहिंसें होतें. वाटेल त्या तऱ्हेच्या यीस्टपासून परिवर्तकत्व मिळेल असें नाहीं. कारण यीस्टचे कांहीं प्रकार असेही आढळले आहेत कीं, ज्यांच्या रसांत ही जननशक्ती मुळींच नसते. हा यीस्टरस कांहीं वेळ तसाच ठेवल्यास, त्यांत स्वयंपरिवर्तनाला सुरवात होते.

परिवर्तक व सहपरिवर्तक
(Enzymes and Co-enzymes)

हा यीस्ट रस जर परासूक्ष्म गाळून घेतला तर यांतील सांका एका बाजूस व इतर द्राव एका बाजूस असे दोन भाग करतां येतात. पुढें असें आढळलें कीं हा सांका अगर हा द्राव यांपैकीं, कोणा एकालाही परिवर्तन एकटयाला असें घडवून आणतां येत नाहीं. परिवर्तन घडवून आणण्यास दोघांचीही अत्यंत जरुरी आहे. ह्यापैकीं साक्यांतील द्रव्यास Enzyme (परिवर्तक) व द्रावांतील द्रव्यास Co Enzyme (सहपरिवर्तक) असें नांव दिलें आहे. आतां ह्यामधील यीस्टचें प्रमाण नेहमीं सारखेंच असेल असे नाहीं. पुष्कळवेळा एक दुसऱ्यापेक्षां फारच कमी प्रमाणांत आढळतो. त्यामुळें परिवर्तन थोडावेळ चालून पुढें तें आपोआप थांबतें. अशी स्थिति असतां जो कोणता परिवर्तक कमी असेल त्यांची भरपाई केल्यानंतर परिवर्तन पुनः सुरुं होतें; असा अनुभव आहे. परिवर्तन चालू असतां हा सहपरिवर्तक हळु हळु नाहिसा होत असतो. उकळल्यानें सह-परिवर्तकाचा नाश होत नाहीं. मात्र परिवर्तनकाला इतकी उष्ण सहन होत नाहीं. हा सहपरिवर्तक प्राण्यांच्या स्नायूंत शरीराच्या निरनिराळ्या भागांत रक्तामधील रक्ताणूंमध्यें व दुधामध्यें असतो.

फॉस्फेटस्

वरील दोन परिवर्तकांचे सहाय्यानें साखरेंत परिवर्तन घडवून आणतां येते. परंतु जर फॉस्फेटस् नसलीं तर हें परिवर्तन होत नाहीं. म्हणजेच परिवर्तनाला फॉस्फेटस् अत्यावश्यक आहेत. साखरेच्या द्रवाचें परिवर्तन चालू असतां जर वरून फॉस्फेटस् त्यांत घातलीं तर परिवर्तन वेग व एकूण परिवर्तन हीं दोन्हीं वाढतात.

इतर कांहीं द्रव्यांचे कार्य

परिवर्तन चालूं असलेल्या अशा यीस्ट व साखरेच्या मिश्रणांत वरून कांहीं पदार्थ टाकले तर कांहींचें कार्य विरोधक मदतीचें तर कांहींचे स्वरूपाचे होते; असें दिसतें. फॉस्फेटस्चें कार्य यीस्ट रसावर उत्तेजक स्वरूपाचें घडतें. हें वर आलेच आहे. परंतु यीस्ट रसाच्या ऐवजीं जर यीस्ट पेशीमुळेंच परिवर्तन घडून येत असेल तर यावरून घातलेल्या फॉस्फेटस्चा कांहींहीं उपयोग होत नाहीं (असें म्हणावें लागेल.) पायरुविक अम्ल किंवा अल्डिहाइडस् ह्यामुळें सर्व साधारणतः परिवर्तनाला उत्तेजनच मिळतें. तसेंच परिवर्तन होत असलेल्या अशा यीस्ट व साखरेच्या मिश्रणांत जर आपण सोडियम सल्फाईड टाकलें तर एक महत्वाचा फरक घडून येतो. याच्या योगानें तयार होणाऱ्या कोहल व द्विप्राणिल वायु हयांच्यात एकदम घट होऊन त्यांचे ऐवजीं ग्लिसरीन् व असिट्ल्डिहाईड हयांच्या प्रमाणांत वाढ होते. ग्लिसरीनचें हे प्रमाण साखरेच्या २०% इतक्यापर्यंत वाढतें. गेल्या महायुद्धांत १९१४।१८ जर्मनीमध्यें मोठ्या प्रमाणावर ग्लीसरीन तयार करण्यास या पद्धतीचा अवलंब केला होता.

परिवर्तन चमत्कारांतील रासायनिक क्रिया

परिवर्तन घडून येत असतांना निरनिराळ्या रासायनिक क्रिया कसकशा घडत जातात. त्याबद्दल नक्की माहिती अजून उपलब्ध झाली नाहीं. तरी त्या क्रिया कशाप्रकारें घडून येत असाव्यांत त्याबद्दल तर्क करण्यास बरीच जागा आहे. १ साखरेपासून कोहल व कर्बद्विप्राणिल वायु तयार होतात. ते एकाच टप्प्यांत होत नसून त्या क्रिया साखळीप्रमाणें दुव्या-दुव्यांनीं एकमेकांशीं संलग्न असाव्यात. २ साखरेंतील प्रत्येक दुवा (दोन्ही टोकांचा शेवटचा दुवा वगळयास) ज्याप्रमाणें आपल्या दोन्ही बाजूच्या दुव्यास सांधतो त्याप्रमाणेच ह्या प्रक्रियांची स्थिति असावीं असा तर्क आहे. मात्र ह्या साखळींतील दुवे कोणते. ह्याबद्दल शास्त्रज्ञांत एकमत नाहीं. या बाबतींतील कांहीं मतें पुढील प्रमाणें आहेत. बुकनेर व त्याचे सहकारी यांचे मतें साखरेपासून प्रथम दुग्धाम्ल तयार होतें. व त्यानंतर ह्यापासून कोहल व कर्बद्विप्राणिल तयार होतात,

लेवदेवचें मतें यावेळीं पुढील प्रमाणें क्रिया घडतात.

(१) साखरेपासून ($C_6 H_{12} O_6$) ग्लिसरल्डिहाईड ($C_3 H_6 O_3$) व डायहायड्रॉक्सि एसिटोन् ($C_3 H_6 O_3$) हे दोन पदार्थ तयार होतात.

ह्यापैकीं दुसरा पदार्थ व फॉस्फेटस् यामध्यें आणखी कांहीं गौण प्रक्रिया (Side reaction) होऊन मूळ साखर पुनः तयार होते.

(३) ग्लिसरल्डिहाईडचे पायरुविकाम्ल ($C_3 H_4 O^3$) त्यांचे कर्बद्विप्रणिल व असिटल्डिहाईड पासून नंतर कोहल अशीं रुपांतरें होतात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कांहींच्या मतें साखरेपासून प्रथम पायरुविकाम्ल तयार होते. व त्यानंतर ह्यापासून इतर घटक तयार होतात. परंतु ह्यातही हे पायरुविकाम्ल कसें तयार होतें. ह्याबाबत मतभेद आहेत.

वरील विवेचनावरून असें दिसून येईल की, परिवर्तन क्रिया नक्की कशी घडून येते, ह्याबाबत अद्याप पुरेसें ज्ञान लाभलेलें नाहीं. यीस्ट व यीस्ट रसानें घडवून आणलेलें परिवर्तन ह्यांस थोडा फरक आहे. यीस्ट रसानें केलेलें परिवर्तन थोडें कमी बलवान् ठरतें. तसेंच यीस्टपासून होणाऱ्या परिवर्तनावर फॉस्फेटस्‌चा कांहींहीं परिणाम होत नाहीं. परंतु यीस्टरसामुळे होणारें परिवर्तन वाढतें. यीस्ट-पासून, खल करून, जसजसा आपण यीस्ट तयार करतो तसतसें या द्रव्यामुळें होणारे परिवर्तन कमी होत जातें. ह्याचाच अर्थ असा करतां येईल कीं या यीस्ट पेशीमध्ये अशी कांहीं विशिष्ट रचना आहे की जिच्यामुळें परिवर्तनाचे काम सुकर होतें. खल कमी केल्यामुळें जसजशी ही रचना नाहिशीं केली जातें. तसतसें परिवर्तनाचें कार्य हळूहळू कमी होत जातें.

यीस्टमध्यें निरनिराळे प्रकार आहेत. व त्या सर्वांच्या सहाय्यानें परिवर्तन घडवून आणतां येईलसें नाहीं. मात्र असें आढळलें आहे कीं ज्याच्या यीस्टमुळें मधुशर्करेंत परिवर्तन घडवून आणतां येईल त्या त्या यीस्टमुळें फलशर्करेंत तही परिवर्तन होतें.

परिवर्तन हें साधारणत: ३° ते ३५° शतांश उष्णता-मानापर्यंतच चालू राहतें. व त्या तपमानाचें वर हळुं हळू बंद होतें. ५० शतांशाचे वर यीस्ट रसांतली परिवर्तन शक्ती नाहींशी होते. ही गोष्ट वर आलीच आहे. तसेंच यीस्ट पेशी-पासून १४% कोटला असलेला असा द्राव तयार होईपर्यंतच परिवर्तन चालू राहते. कारण ज्यांत कोटल याहून जास्त प्रमा-णांत आहे. अशा द्रवांत यीस्ट पेशा जीवंत राहू शकत नाहींत.

Dr. H. P. Dastur L.M. & S. यांनीं Alcohol, its uses and misuses नामक निबंध लिहिला आहे त्यांत स्वयंपरिवर्तनाबावत खालील वचन उध्दृत केलें आहे. (धा.)

Fermentation comes to a natural end when the alcohol in the fermenting liquids reaches a concentration of 12 to 14 p.c. If higher concentrations are desired these can only be obtained through the process of distillation.

Dr. H. P. Dastur

मागील अंकीं–प्रक्रिया अंगें पुढील अंकीं–मद्ये व टिंक्चर्स

नवा अविष्कार

स्त्री, पुरुष, बालक या सर्वांच्याकरिता

अत्युत्तम महौषधी

नवरत्नरस

★

हा हिरा, माणिक, मौक्तिक इ. नवरत्नें आणि सुवर्ण यांच्या संयोजनानें तयार करण्यांत आलेला कल्प आहे. शरीरस्थ रस, रक्त आदि सप्त धातूंची शुद्धि, वृद्धि व पोषण, शुक्र, वीर्य यांची शुद्धी आणि पुष्टी करणें हे या औषधाचें विशिष्ट कार्य आहे. तसेच यानें नपुंसकत्व, वीर्यस्राव, स्वप्नदोष इ. चे निर्मूलन होऊन नवयौवन प्राप्त होते. स्त्रियांच्या गर्भाशयशोथ, प्रदर वारंवार होणारा गर्भपात, गर्भवतीच्या हातापायांवरील सूज व फिक्कटपणा यांवरहि गुणकारी आहे. वंध्यत्वाचा दोष दूर करणारी ही अपूर्व औषधी आहे. मुलांचे अस्थिदौर्बल्य दूर करून अस्थि बलवान करणारे, कॅलशियम व व्हिटॅमिनची उणीव, दुधाचे अपचन नष्ट करून बालकांना धष्टपुष्ट करणारे असे हे औषध आहे. क्षय, जीर्णज्वर, कास, श्वास, मधुमेह, मानसिक दुर्बलता इत्यादि मध्येंहि अतिशय उपयुक्त आहे.

नवरत्नरस—निरोगी लोकांकरिता रसायन व रोगी लोकांना आरोग्य प्राप्त करून देणारे हे महान औषध आहे.

एका बाटलीची किंमत पांच रुपये

ऊंझा फार्मसी लि. ऊंझा

(गुजराथ)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

०१९५३१

आभार—

आमच्या विनंतीस मान देऊन जे विक्रेते व वैद्य अर्कशाळेचे भागीदार झाले आहेत त्यांचे आम्ही अंतःकरण-पूर्वक आभारी आहोत.

शेअर अर्ज स्वीकारण्याची शेवटची मुदत
३१ डिसेंबर १९५१

विनंति—

ज्या वैद्य व विक्रेत्यांनीं अर्कशालेचे भागीदार होऊन कंपनीशी जिव्हाळ्याचा ऋणानुबंध निर्माण करण्याचा शुभ संकल्प केलेला आहे त्यांनीं आता आपले शेअर अर्ज त्वरित धाडण्याची कृपा करावी.

आयुर्वेदीय अर्कशाला लि. सातारा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

078432

अर्कशालेची वैशिष्ट्यें

अर्कशालेचे शेअर्स घेणें लाभकारक आहे

कारण—

★ गेली पचवीस वर्षे अनेक आपत्तींना तोंड देऊन कंपनीनें स्थैर्य प्राप्त करून घेतलें आहे, आणि ती आतां भक्कम पायावर उभी असून तिची उत्तरोत्तर प्रगति होत आहे.

★ कंपनीची व्यवस्था कोणत्याहि मॅनेजिंग एजन्सीकडे नसून संचालक मंडळच प्रारंभापासून विना-वेतन काम करीत आहे.

★ अर्थात् कंपनीच्या नफ्यावर सर्वतोपरी भागीदारांचाच अग्रहक्क आहे.

★ डिफर्ड व ऑर्डिनरी या दोन्ही प्रकारच्या शेअर्सच्या बाबतींत नफा वाटणीच्या दृष्टीनें पूर्ण समानता आहे.

★ अर्कशालेच्या नफ्याचा कांहीं अंश आयुर्वेदशिक्षण व रुग्णसेवा या कार्याकरितां दिला जातो. त्यामुळें गुंतविलेल्या रकमेवर योग्य व्याज मिळून शिवाय सार्वजनिक उपयुक्त कार्यास सहाय्य केल्याचें श्रेय भागीदाराना लाभते.

आयुर्वेदाला व आयुर्वेदीय औषधी व्यवसायाला स्वतंत्र भारतांत उज्वल भवितव्य असल्यानें व भारतांतील कोट्यावधि जनतेचा गरज आयुर्वेदीय औषधें हजारो वर्षांपासून पुरवीत असल्यानें हा व्यवसाय चिरंतन स्वरूपाचा आहे.

हें मासिक श्री. विश्वनाथ लक्ष्मण आगाशे यांनीं आनंद प्रिंटिंग प्रेस, सातारा लि. येथें छापलें व आर्यांगल वैद्यक महाविद्यालय, सातारा येथें प्रसिद्ध केलें.

11—30
SAHARANPUR

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

Compiled
1999-2000

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar